म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. २८६९

# अमृत

## मामा क्षीरसागर अमृत महोत्सव गौरव ग्रंथ



REFBK-0022794

[illegible] નિબંધ [શિક્ષણ વિષયક]

[शिक्षण विषयक] निबंध
२७८१
२२७९४
१५।१२।७९
संदर्भ शाखा

# अमृत

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

**सूचनाः**—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

20 JAN 1980

(क्र. मा. प.)

**मामा क्षीरसागर अमृत महोत्सव समिती**

© मामा क्षीरसागर अमृत महोत्सव समिती

प्रकाशन तिथी : २४ डिसेंबर १९७८

मुखपृष्ठ : मधू पाटील

आतील रेखाचित्र : व्ही. एन्. ओके

प्रकाशक :
दि. ह. सहस्रबुद्धे
कार्याध्यक्ष, मामा क्षीरसागर अमृत महोत्सव समिती
धरम पेठ, नागपूर ४४००१०

मुद्रक :
नाना डेंगळे
साधना प्रेस
४३०–३१ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

प्राप्तिस्थान : साधना प्रकाशन, ४३०–३१ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

किंमत रु. २०–००

२०८९
२२०८४
निबंध

# ग्रंथाचे अंतरंग


ग्रंथारंभी थोडेसे ... पाच
लेखकांची ओळख ... आठ

**शुभेच्छा**

जयप्रकाश नारायण ... अकरा
आचार्य विनोबा भावे ... बारा
आचार्य भणसाळी ... तेरा
एस्. एम्. जोशी ... चौदा
मामांचे रेखाचित्र ... पंधरा

**शिक्षण विचार**

१. समता, समान संधी आणि उत्कृष्टता
ग. वि. अकोलकर ... १
२. आपण मनावर घेतले तर— !
प्रभा श्रीनिवास ... ११
३. ‘ बिन भिंतीची अपुली शाळा ’
श्री. अ. दाभोलकर ... १६
४. विज्ञानरुची वर्धन
मधुकर ना. गोगटे ... २५
५. शेतीविकास आणि शिक्षण
विलास साळुंखे ... २८
६. ग्रामीण शाळांच्या शैक्षणिक समस्या
कृ. वा. तारे ... ३३
७. शिक्षण सुधारणामार्गावरील अडसर
दि. ह. सहस्रबुद्धे ... ३९
८. शैक्षणिक उत्पादकता
वि. उ. चांदूरकर ... ४७
९. विकासवाडीचे विकसते कमळ
अनुताई वाघ ... ५६

१०. ' मेळवुनि हात '
शांता किर्लोस्कर ... ६२
११. विज्ञानाचे अध्यापन
ना. वि. करंबेलकर ... ६६
१२. आंतर भारतीची मनोभूमी
प्र. द. पुराणिक ... ७३
१३. ' आहुतीचे आव्हान '
मु. श्री. पंधे ... ७९
१४. उच्च शिक्षणातील परभाषांच्या साहित्याचे अध्ययन व अध्यापन
प्र. वा. ऊर्ध्वरेषे ... ८२
१५. नवी स्त्री — सुगंधा शेंडे ... ९७
१६. शिक्षणात गीतेचे स्थान — डॉ. ग. श्री. खैर ... १०५
१७. भारतीय शिक्षणपद्धतीचे लोकशाहीकरण — वि. मा. कुलकर्णी ... ११६
१८. दास्यमुक्तीसाठी शिक्षण — वासू देशपांडे ... १२१
१९. बालांच्या आनंद-प्रवृत्ती — राजा मंगळवेढेकर ... १२५
२०. शिक्षण आणि संस्कृती — प्रा. नरहर कुरुंदकर ... १३१
२१. भाषा आणि शिक्षण — भालचंद्र फडके ... १३८
२२. मनोरंजनाची नवीन क्षितिजे — हरी बारपुते ... १४५
२३. भाषेच्या पाठ्यपुस्तकांची निर्मिती : अनुभव व अपेक्षा
शंकर पाटील ... १६१
२४. वाचिकतेच्या शापातून शिक्षणाची सुटका — यदुनाथ थत्ते ... १७६
२५. शिक्षण-प्रशिक्षणाची नवी दृष्टी — वसंत दत्ताराम देसाई ... १८०

## व्यक्तिमत्त्व विचार

१. माझे खरे मामा — लीलावती भागवत ... १
२. आचार्यकुलाचा आशावाद व आशीर्वाद — कृ. द. बेदरकर ... १०
३. ' जरि माझेरें श्रीमंतें होंति। तुम्हा ऐसी '
प्रा. मनू गंगाधर नातू ... १५
४. जीवनबाग फुलवणारा माळी — श्री. वा. मेहेंदळे ... १९
५. आमचे तात्या — प्रा. सुहासिनी पटवर्धन ... २५
माझी जीवनयात्रा — मामा क्षीरसागर ... ३१

□ □

# ग्रंथारंभी थोडेसे

## संपादकीय

श्री मामा क्षीरसागर हे महाराष्ट्रातील अनेकांच्या प्रेमादराचे एक स्थान आहेत.

त्यांच्या वयाची पंचाहत्तर वर्षे पूर्ण होत आहेत, हे समजले तेव्हा अनेकांना ह्या निमित्ताने आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी काहीतरी करावेसे स्वाभाविकपणेच वाटू लागले.

मामांच्या पाच दशकांचा जीवनपट म्हणजे एक महान ज्ञानयज्ञच आहे. हा यज्ञ त्यांनी आपल्याच जीवनाच्या समिधा घालून निरंतर धगधगीत ठेवला आहे.

विदर्भाच्या अमरावती जिल्ह्यातील दर्यापूरचे प्रख्यात प्रबोधन विद्यालय हा त्यांच्या शैक्षणिक कार्याचा फक्त एक पैलू आहे, पण त्यांनी जे शैक्षणिक कार्य केले ते बरेचसे अनौपचारिक स्वरूपाचेच आहे.

त्यांच्या त्या अनौपचारिक शिक्षणाची बांधिलकी जीवनमूल्यांशी होती, केवळ पाठ्यक्रमाशी नव्हती.

स्वाभाविकच आचार्यकुलाची कल्पना विनोबांनी पुढे मांडली तेव्हा मामांना एक मनाजोगते काम मिळाले. शिक्षकांच्या मूल्यात्मक प्रबोधनाच्या ह्या कार्यात मामा रमून गेले. त्यानिमित्ताने महाराष्ट्रभर त्यांनी संचार केला.

मामांची बिनभिंतीची शाळा लाखो गुरूंची गाठ घालून देत असे. हे शैक्षणिक कार्य खऱ्या अर्थाने सांस्कृतिक स्वरूपाचेच असे, कारण ते बोथटलेली मने आणि थिजलेली बुद्धी वितळवून वाहते करी आणि जाणिवा तरल आणि विस्तृत करी.

मामांची दृष्टी कमी झाली आणि शरीर पुरेशी साथ देईनासे झाले तेव्हा मामांचा संचार कमी झाला, पण त्यांचे शिक्षणाचे कार्य मात्र पूर्वीच्याच उत्साहाने चालू आहे.

वात्सल्यावाचून संवर्धन नाही आणि शिक्षण हेही मानवतेचे संवर्धनच आहे. मामांच्यामधला वात्सल्यभाव रक्त-संबंधांनी कधीच मर्यादित झाला नाही.

जात-धर्म-वंश-प्रदेश वा स्त्री-पुरुष अशा कोठल्याही मर्यादा त्यांच्या वात्सल्याने कधी जुमानल्या नाहीत. त्यांच्या ह्या वात्सल्य गुणामुळेच त्यांचा स्वतःचा संसार नसला तरी अवघ्यांचा संसार त्यांचाच झाला आहे आणि त्यामुळे त्यांच्या जीवनात आर्षता कधी शिरली नाही.

मामांचा अमृतमहोत्सवानिमित्त गौरव करण्याचे ठरले तेव्हा मामांना किती अवघडल्यासारखे झाले! त्यांना ती एक नसती उपाधी वाटली. पण त्यांच्या वात्सल्याने न्हाऊन निघालेल्या मंडळींपुढे त्यांचे काही चालले नाही. मामांचा गौरव अर्थातच त्यांच्या जीवनदृष्टीला साजेसा करण्याचे पथ्य मात्र सर्वांनी मान्य केले.

बॅ. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली अमृत महोत्सव समिती स्थापन झाली. शिक्षणक्षेत्रातील अनेक मान्यवरांनी, सर्वोदय कुलातील कार्यकर्त्यांनी आणि सार्वजनिक जीवनाबद्दल आस्था असणाऱ्या मंडळींनी अमृत महोत्सव समितीचे सदस्यत्व आनंदाने स्वीकारले.

आचार्यकुलाच्या संकल्पनेप्रमाणे शिक्षण क्षेत्रात प्रत्यक्ष प्रयोग कुठेतरी सुरू व्हावेत, अशी मामांची तळमळ ध्यानी घेऊन त्या दृष्टीने पावले टाकायचे ठरले.

विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यात वडगाव फत्तेपूर या गावी श्री गजानन विद्यालय चालते. त्याचे संचालक व शिक्षक यांनी त्या दृष्टीने प्रयोग करण्याची सिद्धता दाखवली. यवतमाळ जिल्ह्यातील वणी तालुक्यात कुंभा या गावी भारत विद्यामंदिर ही संस्था चालते. त्या संस्थेच्याही संचालकांनी व शिक्षकांनी अशीच तयारी दाखवली. त्यासाठी ता. १४, १५ व १६ ऑक्टोबर १९७८ रोजी वणी येथे एक शिबिर आयोजित करण्यात आले होते.

शिक्षणक्षेत्रातून प्रयोगांना फाटा मिळतो. तेव्हा तेथे नोकरशाही किंवा सौदा करू पाहणाऱ्या संघटना बोकाळण्याचा धोका असतो. शिक्षणाला मग उगवत्या पिढ्यांचे फारसे सोयरसुतक वाटेनासे होते.

नोकरशाहीची व सौदाबाजीची मिठी बसली की शिक्षणाचा संकोच होत जातो आणि शिक्षणाच्या नावाखाली एक उपचार व कर्मकांड तेवढे बोकाळते.

मामांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने शिक्षणक्षेत्रातून हद्दपार झालेली प्रयोगशीलता पुन्हा जोपासली जाईल ही मोठीच आशादायक घटना आहे.

आचार्यकुल संकल्पनेप्रमाणे प्रयोग करू पाहणाऱ्या या संस्थांच्या परिघात आणखीही शाळा प्रवेश करतील अशी आशा आहे.

मामांच्या अमृत महोत्सवा निमित्त एक गौरव ग्रंथ संपादित करावा असेही अमृत महोत्सव समितीने ठरवले. आचार्यकुलाचे संस्थापक आचार्य विनोबा भावे यांनी अमृत महोत्सव कार्यासाठी एक रुपया देऊन आपल्या सदिच्छा व्यक्त केल्या तेव्हा समितीचा हुरूप वाढला.

गौरवग्रंथाच्या संपादनाची जबाबदारी समितीने विश्वासाने आमच्यावर सोपवली आणि आम्हीही आनंदाने ती स्वीकारली.

ग्रंथाच्या स्वरूपासंबंधी चर्चा करून एक आराखडा तयार केला. ग्रंथाचे दोन

भाग असावे असे ठरले. एका भागात शिक्षणविषयक वैचारिक लेख द्यावेत व दुसरा विभाग मामा क्षीरसागरांच्या जीवन व कार्यासंबंधी असावा, अशी योजना.

आराखडा तयार झाला तेव्हा ही जबाबदारी किती मोठी आहे याची कल्पना आली. पण मामांच्या पुण्याईने ती पार पडेल असे आम्ही मानले.

स्वप्न रंगवताना आम्ही चुकारपणा केला नाही. पण ते स्वप्न साकार करण्यातील अडचणींची कल्पना हळूहळू येऊ लागली. अर्थात आमचे स्वप्न आमच्यापाशीच असल्याने त्याच्याशी तुलना करून ग्रंथाचे मूल्यमापन करणे वाचकांना शक्य नाही, ही सोयीची बाब आहे. त्यामुळे गौरवग्रंथाबद्दलची निराशा कोणाच्याही मनाला स्पर्श करणार नाही.

गौरव-ग्रंथ साजेसा व्हावा म्हणून अनेक लेखकांनी सौहार्दपूर्ण साह्य केले. चरित्र-विषयक विभाग अनेकांच्या हृद्य आठवणींनी सजला. चरित्रविषयक विभागाच्या चौपट भाग वैचारिक लेखांनी व्यापला आहे. त्यामुळे बुद्धी आणि भावना ह्या दोन्ही पातळींवर ग्रंथ संग्राह्य झाला आहे, असे म्हणावेसे वाटते.

मामांच्यासारखी माणसे स्वतःच्या जीवनाबद्दल क्वचितच बोलतात. खरे म्हणजे अशा मंडळींचे जीवन समजून घेणे हेही एक मोठेच शिक्षण असते. पण त्यांचा नम्र, संकोची स्वभाव आणि जीवनाची त्यांना कर्मक्षेत्रात खिळवून ठेवणारी उत्कट हाक यामुळे हे फारसे साधत नाही. जीवनग्रंथाचीच पाने लिहिण्याचा हव्यास जडलेल्या मंडळींना आपले जीवन कलम-कागद घेऊन नोंदवण्याची उसंतच कुठे असते!

पण अण्णाजी वैद्यांनी मामांची पाठ धरल्याने मामांचा नाइलाज झाला आणि मामांनी आपल्या जीवनयात्रेतील काही टप्पे सांगणारे एक टिपण तयार केले.

गौरव ग्रंथाच्या अखेरी त्या टिपणाचा समावेश करता आला ही फार आनंदाची गोष्ट आहे. महाराष्ट्रातील पन्नास वर्षांच्या तेजस्वी इतिहासाची ही नोंददेखील अत्यंत प्रेरक आणि उद्बोधक ठरेल.

मामांच्या पुण्याईमुळे शिक्षण क्षेत्राशी व मामांशी संबंधित मंडळी आम्हाला वश झाली व ग्रंथाचे कार्य तडीस गेले.

मामांना कृतज्ञतापूर्वक हा ग्रंथ समर्पण करून आमची ही आदरांजली त्यांनी स्वीकारावी अशी विनंती करतो.

मामांचा परिवार एवढा विशाल आहे की एवढ्याशा ग्रंथात सर्व गोष्टी सामावणे शक्य नाही. पण याबाबत पुढे काही करू इच्छिणारांचे काम ह्या ग्रंथामुळे काहीसे सुकर होईल व तेवढेही आमच्या समाधानाला आज तरी पुरेसे आहे.

□ □

# गौरव-ग्रंथाच्या लेखकांविषयी

- **ग. वि. अकोलकर :** अनुभवी शिक्षक व शिक्षणतज्ञ. शिक्षणविषयक अनेक पुस्तकांचे लेखक.
- **श्रीमती प्रभा श्रीनिवास :** मुंबईत ' सल्ला ' नावाचे एक विद्यार्थी मार्गदर्शन केंद्र चालवतात. लेखक.
- **श्री. अ. दाभोलकर :** कोल्हापूर जिल्ह्यातील गारगोटीच्या मौनी विद्यापीठात अध्यापक आणि प्रयोगपरिवार या चळवळींचे प्रवर्तक.
- **म. ना. गोगटे :** मराठी विज्ञान परिषदेचे कार्यकर्ते व ख्यातनाम इंजीनियर.
- **विलास साळुंखे :** अक्युरेट इंजीनियरिंग उद्योगाचे प्रमुख आणि ग्रामगौरव प्रतिष्ठानाचे कार्यकर्ते.
- **कृ. वा. तारे :** विदर्भातील एक नाणावलेले मुख्याध्यापक.
- **दि. ह. सहस्रबुद्धे :** शिक्षक प्रतिनिधी म्हणून पूर्वी विधान परिषद सदस्य. नागपूरमध्ये शिक्षक प्रबोधिनी नावाची संस्था चालवतात.
- **प्रा. वि. उ. चांदूरकर :** नागपूरमधील एका महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आणि आचार्य कुलाचे कार्यकर्ते.
- **अनुताई वाघ :** ठाणे जिल्ह्यातील कोसवाड येथील बालसेविका प्रशिक्षण संस्थेच्या संस्थापक. आदिवासी मुलांच्या शिक्षणाचे कार्य. फाय फाउंडेशनच्या पारितोषिकाच्या मानकरी.
- **शांता किर्लोस्कर :** पालक-शिक्षक संघाच्या कार्यकर्त्या. लेखक.
- **प्रा. डॉ. ना. वि. करंबेलकर :** विज्ञानविषयक प्रबोधन करणारे लेखक.
- **प्र. द. पुराणिक :** पुण्यातील हिंदी हायस्कूलचे भूतपूर्व प्रधानाचार्य. राष्ट्रीय एकात्मतेसंबंधी व इतर अनेक शैक्षणिक प्रयोग त्यांनी आपल्या शाळेत यशस्वीपणे केले आहेत.
- **मु. श्री. पंधे गुरुजी :** खामगावच्या राष्ट्रीय शाळेचे संवर्धक. दृश्य कलांचे थोर शिक्षक.
- **प्रभाकर ऊर्ध्वरेषे :** लेखक आणि नागपूर विद्यापीठातील इंग्रजी अध्यापन विभागाचे निवृत्त संचालक.

- **सुगंधा शेंडे** : अध्यापक आणि लेखक.
- **डॉ. ग. श्री. खैर** : पुणे विद्यार्थी गृहाचे संवर्धक. शिक्षणतज्ज्ञ. गीतेचे अभ्यासक, लेखक आणि वक्ते.
- **वि. मा. कुलकर्णी** : देशविदेशांतील सामाजिक कार्याचे अभ्यासक. पुण्याजवळील राजगुरुनगर भागात ग्रामविकासाच्या कार्याचे प्रवर्तक. पत्रकार व पत्रविद्येचे अध्यापक.
- **वासू देशपांडे** : पुण्याच्या रावसाहेब पटवर्धन विद्यालयाचे मुख्याध्यापक. मुख्याध्यापक महासंघाच्या १९७८ च्या अधिवेशनाचे अध्यक्ष. राष्ट्र सेवा दलाचे कार्यकर्ते. ' लोकशाहीचा कैवारी : नाथ पै ' या पुस्तकाचे लेखक.
- **राजा मंगळवेढेकर** : मराठीतील बालवाङ्मयाचे ख्यातनाम लेखक व संपादक.
- **नरहर कुरुंदकर** : नांदेड येथे प्राचार्य. वैचारिक साहित्याचे लेखक.
- **भालचन्द्र फडके** : पुणे विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक. दलित साहित्याचे अभ्यासक.
- **हरी बारपुते** : केंद्रीय शारीरिक शिक्षण संस्थेचे भूतपूर्व संचालक आणि क्रीडा क्षेत्रातील एक मान्यवर शिक्षक.
- **शंकर पाटील** : मराठीतील आघाडीचे कथाकार. चित्रपट कथालेखक. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळातील अधिकारी.
- **यदुनाथ थत्ते** : साधना साप्ताहिकाचे संपादक. आंतर भारती, राष्ट्र सेवा दल व साने गुरुजी कथामाला इत्यादी चळवळींशी संबंध.
- **वसंत देसाई** : पुण्यातील गांधी प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य व अनेक शैक्षणिक पुस्तकांचे लेखक.
- **श्रीमती लीला भागवत** : प्रख्यात बालवाङ्मय लेखिका आणि आकाशवाणीवरील निवृत्त अधिकारी.
- **कृ. द. बेदरकर** : नाशिक येथील निवृत्त मुख्याध्यापक व आचार्यकुलाचे कार्यकर्ते.
- **मनू गंगाधर नातू** : मराठीच्या ख्यातनाम निवृत्त प्राध्यापक.
- **श्री. वा. मेहेंदळे** : रोहे येथील सामाजिक कार्यकर्ते.
- **प्रा. सुहासिनी पटवर्धन** : मुंबईत प्राध्यापक.

◻ ◻



# गणेशभक्तांचे श्रद्धास्थान

## फडके श्रीगणपती मंदिर

गणानां त्वा गणपतिं हवामहे
कविं कवीनामुपमश्रवस्तमम् ॥
ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत आ नः
शृण्वन्नूतिभिः सीद सादनम् ॥

धी यशोदाबाई गो. गं. फडके चॅरिटेबल ट्रस्ट, फडकेवाडी, विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई ४०० ००४.

# शुभेच्छा

# शतकाचा टप्पा असाच गाठा

आनंदवन वरोरा
डिसेंबर २४, १९७८

मामांचे जीवनावर दुर्निवार प्रेम आहे.
शैशवाशी मामांची कधीच फारकत झालेली नाही.
मुलांच्या मेळाव्यात मामा आपल्याला सतत दिसतील.
मुलांच्या डोळ्यांत त्यांना जगाचे विलक्षण असे सौंदर्य पुन:पुन्हा दिसते.

अनेकांच्या जीवनात दिवसाला दिवस जोडीत आयुष्य वाढत जाते, पण मामा त्या दिवसांना जिवंतपणा आणीत, नवचैतन्य देत मोठे होतात, असे जाणवते.

आपल्या सर्वांच्या मामांना, भलाईच्या ह्या वतनदाराला शतकाचा टप्पा गाठता यावा.

**बाबा आमटे**

जीवनावर मनस्विनी श्रद्धा हे चिरतारुण्याचे लक्षण. म्हणूनच आम्हा आनंदवासियांना आणि आमटे परिवाराला मामा तरुण वाटतात.

**सौ. साधना आमटे**

जयप्रकाश नारायण
JAYAPRAKASH NARAYAN

दूरभाष : ५१२३९
Telephone : 51239

कदमकुआँ * पटना—८००००३ * बिहार * भारत  Kadamkuan * Patna-800003 * Bihar * India

संदेश

मुझे यह जानकर खुशी हुई कि महाराष्ट्र के वयोवृद्ध जनसेवक मामा क्षीरसागरजी की आयु के 75 वर्ष पूर्ण होने के उपलक्ष्य में उन्हें सम्मानित करने का आयोजन किया जा रहा है।

सत्ता और संपत्ति के मोह से दूर रहकर अपने को समाज की सेवा में खपा देने वाले व्यक्तियों का सम्मान करना भी वास्तव में समाज की सेवा ही है, क्योंकि ऐसे कार्यक्रमों के जरिये समाज में त्याग और सेवा जैसे गुणों की प्रतिष्ठा बढ़ती है।

मामा क्षीरसागरजी महाराष्ट्र में आचार्य कुल तथा जनाभिमुख सृजनशील शिक्षा के कार्य को आगे बढ़ाने में निष्ठापूर्वक लगे हैं, अत: उनके अमृत-महोत्सव के निमित्त इन प्रवृतियों को आगे बढ़ाने का जो कार्यक्रम सोचा गया है वह उचित ही है। मुझे आशा है कि इस आयोजन से आचार्य कुल तथा समाजोपयोगी शिक्षा की प्रवृत्तियों को एवं समाजसेवा की प्रेरणाओं को बल मिलेगा।

जयप्रकाश नारायण

जयप्रकाश नारायण

पटना,
23 नवम्बर 1978

श्री. मामा क्षीरसागर

को स्नेहसे

**विनोबा**

ब्रह्मविद्या मंदिर
10.9.1978

बाबा की शुभकामना

## भणसाळी ग्राम सेवा मंडळ, पो. टाकळी

दिसंबर ६, १९७८

श्री मामा क्षीरसागरका अमृत महोत्सव, उनकी आयुके पचहत्तर वर्ष पूरे होनेके उपलक्ष्यमें मनाया जा रहा है, यह जानकर खुशी हुई.

सेवाश्रम के साथ उनका निकट एवं सौहार्दपूर्ण संबंध रहा है. दीनदलितोंकी सेवाही सच्चे अर्थमें परमात्माकी सेवा है. ऐसी सेवाही सेवकका बल होता है.

परमात्मा मामाको उदंड दीर्घायुरारोग्य प्रदान करें, ऐसी मैं प्रार्थना करता हूँ. महोत्सवकी सफलताके लिये हार्दिक शुभकामनायें.

**भणसाळी**

# शुभेच्छा !

## एस्. एम्. जोशी

श्रद्धेय मामा क्षीरसागर यांच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. सध्या भारतीय समाज ज्या परिस्थितीतून जात आहे त्या परिस्थितीत मामांसारख्या खऱ्या अर्थी आचार्य या संज्ञेस पात्र असलेल्या व्यक्तित्वांचे विशेष महत्त्व आहे.

एक युग संपत आहे. त्यामुळे समाजातील निरनिराळे घटक विस्कळीत झालेले आपण पाहात आहोत. नव्या युगासाठी समाजास एकेठिकाणी बांधणारी शक्ती उदयास आलेली प्रकर्षाने दिसत नाही. संपत आलेल्या युगात पाप-पुण्य कल्पना लोकांना वाईट मार्गापासून दूर ठेवण्यास पुष्कळच साहाय्यभूत होत होती. आता नरक व स्वर्ग या कल्पनांवर लोकांचा फारसा विश्वास उरलेला नाही. वाईट काय, चांगले कोणते यांचा निर्णय ऐहिक जीवनाच्या संदर्भातच इतःपर करावा लागेल. त्यामुळे माणुसकीची भावना जोपासण्यास लोकांच्या व प्रामुख्याने नव्या पिढीच्या मनावर समानतेवर आधारलेल्या नव्या समाजाच्या उभारणीस आवश्यक संस्कार होणे फार महत्त्वाचे झाले आहे. जीवन-कलह तीव्रतर होत असल्याने तरुण पिढीला गृहशिक्षण फारसे मिळत नाही. पाठशाळांतून मिळणाऱ्या शिक्षणामध्ये नव्या समाजासाठी लागणाऱ्या नैतिकतेचे संस्कार होताना दिसत नाहीत. मामा क्षीरसागर यांनी स्वातंत्र्यपूर्व काळापासून शिक्षणाच्या क्षेत्रास वाहून घेतले आहे.

दर्यापूरच्या प्रबोधन विद्यालय या संस्थेची वर्षानुवर्षे त्यांनी निष्ठेने सेवा केली आहे. आणीबाणीच्या काळात विनोबांच्या आशीर्वादाने आचार्यकुलाने एक विशिष्ट भूमिका पार पाडली, त्यात मामांनी सक्रिय भाग घेतला होता.

आता आणीबाणी संपली असली तरी ज्या नव्या युगाची आपण वाट पाहातो आहोत त्या युगाला पोषक जीवनमूल्यांचे संस्कार नव्या पिढीच्या मनावर होणे आवश्यक आहे. मामांच्याकडून ती अपेक्षा केल्यास अनाठायी होणार नाही. तरुणांना संस्कार देण्याचे कार्य त्यांच्या हातून वयाची शंभर वर्षे गाठीपर्यंत होत राहावे अशा शुभेच्छा मी त्यांच्या अमृतमहोत्सव समारंभाच्या निमित्ताने व्यक्त करतो !

□ □



# शिक्षण-विचार

# समता, समान संधी आणि उत्कृष्टता

## ग. वि. अकोलकर

शिक्षणाचे प्रयोजन सामाजिक दृष्ट्या फार व्यापक व सर्वस्पर्शी आहे. शिक्षण हे समाजधारणेसाठी जसे आवश्यक आहे, तसेच ते सामाजिक प्रगतीसाठी नि सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक आहे, हा विचार आता सर्वांनी मान्य केला आहे. शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्याचा लाभ सर्वांना मिळावा यासाठी शिक्षणाच्या प्रसारावर भर देण्यात येत आहे. समाजाच्या अगदी खालच्या थरापर्यंत शिक्षणाचे लोण जाऊन पोचले पाहिजे आणि समाजातील कुणीही व्यक्ती शिक्षणापासून वंचित राहू नये, असा प्रयत्न सर्वत्र केला जात आहे. या प्रयत्नामागे आणि आग्रहामागे एक सामाजिक व सांस्कृतिक मूल्य आहे आणि ते म्हणजे **समता**.

फ्रेंच राज्यक्रांतीतून जी मूल्यत्रयी उदयास आली, तिच्यात स्वातंत्र्याच्या बरोबरीने समतेचे स्थान आहे. लोकसत्ताक व समाजवादी विचार–प्रणालीचा स्वीकार केलेल्या राष्ट्रांनी समतेचे महत्त्व फार मानले आहे. आपल्या सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञानाची आधारशिला समता ही मानण्यात आली आणि राजकीय क्षेत्रापुरतीच समतेची कल्पना मर्यादित न ठेवता आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रांत ती प्रस्थापित व्हावी, असा प्रयत्न सुरू आहे.

समतेचा साक्षात्कार व अनुभव सामाजिक व अन्य क्षेत्रांत व्यक्तीला यावयाचा असेल तर, शिक्षणाची त्यासाठी गरज आहे. शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीचा हक्क समजला जावा व शिक्षण ही केवळ धनिकांची व उच्चभ्रू वर्गाची मिरासदारी राहता कामा नये, असे स्पष्टपणे मान्य झाले आहे. विशिष्ट वर्गात वा जातीत जन्म झाल्यामुळे प्राप्त होणारा ‘ विशेष–अधिकार ’ म्हणून शिक्षणाकडे एके काळी पाहिले जात होते (अजूनही कित्येक ठिकाणी असे पाहिले जाते); पण तो दृष्टिकोन आता बदलत आहे. व्यक्तीचा जन्म कोणत्याही कुळात, वर्गात, वर्णात, जातीत किंवा धर्मात झालेला असो, तिची भाषा कोणतीही असो, तिला किमान शिक्षण मिळाले पाहिजे व तिला आपला स्वतःचा जास्तीत जास्त विकास करून घेण्याची संधी समाजाने व शासनाने प्राप्त करून दिली पाहिजे, असा आजचा विचार आहे. ही संधी धडधाकट व निरोगी व्यक्तीप्रमाणेच अपंग व दुबळ्या व्यक्तीलाही मिळावी आणि समाजाचा एक घटक म्हणून तिला स्वावलंबी व स्वाभिमानाचे जीवन जगता यावे, या विचारापर्यंत आपण येऊन पोहोचलो आहोत.

## व्यक्तिविकासाचे प्रमुख साधन : शिक्षण

शिक्षण ही व्यक्तिविकासाची एक महान शक्ती असल्याने शिक्षणाचा प्रसार सर्वत्र व्हावा, शिक्षण सक्तीचे व निःशुल्क करून प्रत्येकाला त्याचा लाभ घेता यावा, असा प्रयत्न केला जात आहे.

शिक्षणाने व ज्ञानाने व्यक्तीला मनुष्यपण येते, तिचा आणि समाजाचा उत्कर्ष शिक्षणाने होतो, सुसंस्कृत आणि अभिरुचीपूर्ण जीवन जगण्याचे सामर्थ्य शिक्षणाने प्राप्त होते, नवनिर्मितीला वाव मिळतो आणि अनेक सुप्त गुण प्रकट होऊ लागतात. प्रतिभा व प्रज्ञा यांना नवे नवे उन्मेष फुटतात आणि समाजाची प्रगती सतत होत राहते. ज्ञान ही व्यक्तीची, समाजाची आणि राष्ट्राची अमोल साधनसंपत्ती आहे आणि आजच्या ज्ञान-विज्ञानाच्या युगात राष्ट्रांचा जो उत्कर्ष होत आहे, त्याचे मूळ शिक्षणात आहे हे सांगण्याची गरज नाही. शिक्षणाची व संस्काराची अधिक महती वर्णन करण्याची यापेक्षा अधिक गरज नाही.

शिक्षणाचे हे सामर्थ्य व्यक्तिस्वातंत्र्याचा आग्रह धरणाऱ्या लोकसत्तात्मक राष्ट्रा-प्रमाणे समाजवादी राष्ट्रांनीही ओळखले आहे. लोकशाही राष्ट्रात व्यक्तीला प्रतिष्ठा व स्वयंगत मूल्य आहे म्हणून तिच्या शिक्षणाचा व तिला उपलब्ध करून द्यावयाच्या शैक्षणिक संधीचा विचार पोटतिडिकीने केला जातो तर, साम्यवादी देशात उत्पादन-वाढीला उपयुक्त असा एक कार्यक्षम घटक म्हणून व्यक्तीकडे पाहिले जाते व त्या कार्यक्षमतेसाठी शिक्षणाचे महत्त्व मानले जाते. व्यक्तीच्या विकासासाठी शिक्षणाचे महत्त्व या सगळ्याच देशांत मान्य केले जाते व तिला उच्च दर्जाचे सांस्कृतिक जीवन उपभोगावयास मिळावे, असा उद्देश बाळगण्यात येतो. सोविएत देशामध्ये शिक्षणाला फारच महत्त्व दिले जात आहे. ‘शिक्षण हा सर्वच बालकांचा विशेषाधिकार आहे, राज्यकर्त्यांची ती मेहेरबानी नाही’ असे तिथे अभिमानाने सांगितले जाते. रशियाने पहिला स्पुटनिक उडवून आपला देश शिक्षणात अग्रेसर असल्याचे जगाला दाखवून दिले आहे. शिक्षणाची समान संधी सर्वांना उपलब्ध करून दिल्याचा हा सुपरिणाम आहे.

भारतासारख्या सर्वच विकसनशील देशांना शिक्षणाची किती नितान्त आवश्यकता आहे; या देशातील अज्ञान, दारिद्र्य, उपासमार आणि रोगराई या चार प्रबळ शत्रूंशी कसा मुकाबला करावयाचा आहे, हे विशेष तपशीलाने सांगावयाची गरज नाही. या चारही शत्रूंचे निर्मूलन करून समाजाचा आर्थिक विकास सांधणे व लोकशाही दृढमूल करणे ही कामगिरी शिक्षणालाच बजावावयाची आहे. हे एक प्रचंड सामाजिक परिवर्तनच आहे. मॅडम कर्ले यांनी आपल्या ‘मागासदेशातील शिक्षणाचे स्थान’ या पुस्तिकेत यासंबंधी सखोल विवेचन केले आहे. भारतालाही ते मार्गदर्शक ठरणारे आहे.

# शिक्षणाची समान संधी

शिक्षणाची समान संधी सर्वांना उपलब्ध करून देणे यात सामाजिक न्याय सामावलेला आहे व सामाजिक न्यायाचे तत्त्व म्हणून समान संधीचा म्हणजेच समतेचा पुरस्कार करण्यात येत आहे. शिक्षणाचा असा सार्वत्रिक प्रसार होऊ लागला की, स्वाभाविकपणे काही अडचणी निर्माण होऊ लागतात व काही सामाजिक समस्या पुढे ठाकतात. अशा समस्यांपैकी एक समस्या म्हणजे आपली साधनसामग्री मर्यादित असल्या-कारणाने शिक्षणाचा प्रसार मर्यादित ठेवून गुणी व हुशार मुलांना शिक्षणाची अधिकाधिक संधी देणे, इष्ट होणार नाही काय ? शिक्षण सार्वत्रिक केले की, अपुरी साधनसामग्री, शिक्षकांचा तुटवडा, निकृष्ट इमारती यामुळे शिक्षणाचा दर्जा खालावण्याची फार भीती असते. तेव्हा अनेकांना सामान्य व निकृष्ट दर्जाचे शिक्षण देत राहावयाचे की त्यांची थोडी आबाळ सहन करून शिक्षणाचा उपयोग करू शकतील व आर्थिक प्रगतीला हातभार लावू शकतील अशा निवडक व्यक्तींना शिक्षण द्यावयाचे ? थोडक्यात, अशा प्रकारे संख्यावाढ विरुद्ध गुणवत्तेचे संगोपन असा वाद निर्माण होतो आणि गुणवत्ता ढासळणे म्हणजे उत्कृष्टतेला सुरुंग लागणे.

सार्वत्रिक शिक्षणाइतकी शिक्षणाची गुणवत्ता सांभाळणे व उत्तरोत्तर तिची पातळी उंचावत ठेवणे ही गोष्ट समाजाच्या आर्थिक प्रगतीसाठी व सांस्कृतिक विकासासाठी सारखीच आवश्यक आहे. समाजाच्या संस्कृतीचा उच्च स्तर वेगवेगळ्या क्षेत्रातील नेते हेच निर्माण करीत असतात व हे त्यांचे नेतृत्व त्यांनी प्राप्त करून घेतलेल्या उत्कृष्टतेवर अवलंबून असते. लेखक, कवी, कलावंत, शास्त्रज्ञ, स्थापत्यविशारद, तंत्रविशारद, प्रशासक, सेनानी, इत्यादी विविध क्षेत्रांतील मान्यवर व्यक्ती समाजात नव्या ज्ञानाची भर घालतात व समाजाचे भौतिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक जीवन समृद्ध करतात. अशा व्यक्ती संख्येने थोड्याच असतात आणि म्हणूनच त्यांचे महत्त्व विशेष असते. 'एकश्चंद्र स्तमो हन्ति नच तारागणोऽपि सन्' या सुभाषितात सांगितल्याप्रमाणे त्यांचे महत्त्व फार आहे. आपल्या अंगच्या गुण-समृद्धीमुळे समाजजीवनाची सारी अंगे हे गुणवंत, कलावंत नि ज्ञानवंत उजळून टाकतात. आपल्या कर्तृत्वासाठी ते नवनवी क्षितिजे निर्माण करतात. गुणवत्तेचे व आदर्शांचे नवे निकष व नवे मानदंड निर्माण करतात. सर्व सामाजिक जीवनात चैतन्य, आनंद नि उत्साह ओतण्याचे श्रेय त्यांनाच असते. अष्टपैलू व चतुरस्र व्यक्तींची त्यासाठी गरज आहे. तेव्हा त्यांची आबाळ करता कामा नये. उलट त्यांना अधिका-धिक विविध संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत व त्यातच समाजाचे कल्याण आहे. समाजाने आपली मर्यादित साधनसामग्री सामान्य मुलांच्यावर न उधळता उत्कृष्टतेची बीजे ज्यांच्यात असतील त्यांच्यावरच खर्च करणे शहाणपणाचे ठरेल. सुप्त बुद्धिमत्ता शोधून व हुडकून काढून तिचा परिपोष करण्यासाठी वेगवेगळे मार्ग हाताळले पाहिजेत. ज्ञानाची व

कलांची विविध दालने त्यांना खुली करून दिली पाहिजेत व त्यांच्या मार्गातील अडथळे दूर केले पाहिजेत, असे दुसऱ्या पक्षाचे म्हणणे आहे.

एकीकडे समतेचा नि समान संधीचा एक जीवननिष्ठा म्हणून स्वीकार आणि दुसऱ्या बाजूला व्यक्तीच्या व राष्ट्राच्या उत्क्रांतीसाठी व कल्याणासाठी उत्कृष्टतेचा पुरस्कार अशा कैचीत लोकशाही समाज सापडला आहे. या दोन पक्षांपैकी एकाचीच निवड केली तर, दुसऱ्यातील चांगल्या गोष्टींना मुकावे लागते. लोकसत्तात्मक समाजापुढे असा विलक्षण पेच उभा आहे. अशा वेळी मनात विचार येतो, समता नि उत्कृष्टता यांचा मेळ घालता येणार नाही का ? त्यांचा समन्वय साधता येणार नाही का ? अमेरिकेतील एक शिक्षणतज्ज्ञ ' जॉन गार्डनर ' यांनी ' एक्सलन्स कॅन वुई बी इक्वल अ‍ॅण्ड एक्सलंट टू " या नावाचे पुस्तक लिहून अमेरिकेत जीवनाच्या संदर्भात या विचाराचा परामर्श घेतला आहे. त्यात त्यांनी या प्रश्नाचे स्वरूप आणि त्याची उकल यांची सखोल चर्चा केली आहे. इंग्लंडमधील एक शिक्षणतज्ज्ञ जॉन वैझे यांनीही आपल्या ' एज्युकेशन फॉर टुमारो ' या पुस्तकात, ' इक्वॅलिटी अँड ॲबिलिटी ' ( समता आणि क्षमता ) या प्रकरणात या विषयाची चर्चा केली आहे. इंग्लंडमधील दुसरे एक शिक्षणतज्ज्ञ ' जॉन् पिकरिंग ' यांनी ' चॅलेंज टू एज्युकेशन ' या पुस्तकात ' सोशल जस्टिस–द मेनी ऑर फ्यू ' या प्रकरणात ही समस्या हाताळली आहे. भारतीय शिक्षणातील संख्या, समता व व गुणवत्ता या बाबतीतील परिस्थितीवर श्री. जे. पी. नाईक यांचे ' इल्युजिव्ह हूँगल इन इंडियन एज्युकेशन ' हे पुस्तक चांगले प्रकाश टाकते. ज्यांच्या ठिकाणी सुप्त सामर्थ्ये वा क्षमता आहेत, ज्यांच्या सुप्त सामर्थ्याचे अस्फुट अंकुर प्रकट झाले आहेत वा होऊ लागले आहेत असे ' प्रज्ञावंत ' विद्यार्थी निवडून काढून त्यांच्या शिक्षणाची सोय दर्जेदार शिक्षणसंस्थांत करण्यास अनेकांचा विरोध आहे. कोठारी शिक्षण आयोगाने जेव्हा ' मेजर युनिव्हर्सिटीज ' ची–ज्येष्ठ विद्यापीठांची कल्पना पुढे मांडली तेव्हा तिला कसून विरोध झाला व ती कल्पना बाजूस पडली. महाराष्ट्राच्या शिक्षणविषयक पत्रिकेत उच्च व सामान्य असे दोन प्रकारचे दोन स्तरांवरील अभ्यासक्रम असावेत, अशी सूचना केली होती. तिलाही स्वतःला बहुजनसमाजाचे कैवारी म्हणवून घेणाऱ्यांनी कडाडून विरोध केला, हे सर्वांना माहीत आहेच. अधिक बुद्धिमान व सामान्य बुद्धीचे असा भेद करणे, विद्यार्थ्यांची निवड करणे, या गोष्टी लोकशाहीत बसत नाहीत, त्यामुळे समतेचे तत्त्व पायदळी तुडविले जाते असे म्हटले जाते. पण हे म्हणणे अज्ञानमूलक, एकान्तिक, समतेचा वा समान संधीचा विपर्यास करणारे आहे.

तेव्हा आपल्याला समता व समान संधी यांचा नेमका आशय काय, हेच एकदा स्पष्ट करून घेतले पाहिजे.

## समता व समान संधी यांचा आशय

डॉ. राधाकृष्णन आयोगाने उच्च शिक्षणाच्या ध्येयांचे विवरण करताना त्यात

लिबर्टी, जस्टिस आणि इक्वॅलिटी यांचेही विवरण केले आहे. समतेचा (इक्वॅलिटी) अर्थ विशद करण्यासाठी मानवी हक्कांच्या समतेचे पहिले कलम आयोगाने उद्धृत केले आहे. ते कलम पुढीलप्रमाणे :

" All human beings are born free & equal in dignity & rights. They are endowed with reason & conscience & should act towards one another in a spirit of brotherhood."

ही समता मान्य केल्यानंतर निसर्गाने प्रत्येक व्यक्तीला बुद्धीचे व क्षमतेचे देणे वेगवेगळ्या प्रमाणात दिले आहे, ही गोष्ट मान्य करायला हवी. या बाबतीतील मानसशास्त्राचे संशोधन स्वीकारणे आवश्यक आहे. 'All native differences in intellect and interest must be recognised' असे आयोगाने स्पष्टपणे सांगितले आहे. निसर्गप्राप्त शक्तीचा विकास करून घेण्याची संधी मिळणे हाच समानसंधीचा आशय होय. या बाबतीत आयोगाचे पुढील उद्गार फार महत्त्वाचे आहेत : Equality of opportunity does not mean identical opportunities for all. तर ज्याला त्याला आपल्या कुवतीप्रमाणे बुद्धीची झेप असेल त्याप्रमाणे व नैसर्गिक कल आणि अभिरुची यांच्याप्रमाणे शिक्षण घेण्याची संधी असणे हाच समान संधीचा खरा अर्थ होय. सगळ्यांनी एकाच मार्गाने वा एकाच चाकोरीतून धावत सुटणे हा समान संधीचा अर्थ नाही. जेव्हा आई आपल्या चार वेगवेगळ्या वयाच्या मुलांना पौष्टिक दूध वेगवेगळ्या प्रमाणात देते तेव्हा ती भेदभाव वा पक्षपातीपणा करीत नसते, तर ज्याला जेवढे पचेल तेवढेच देण्याचा विवेक ती करीत असते. समान संधीचा आशय विशद करताना प्रा. देवदत्त दाभोळकर यांनी म्हटले आहे की, " शिक्षणाची समान संधी याचा अर्थ पात्रतेचा विचार न करता सर्वांना सारख्याच ज्ञानशाखांचे, सारख्याच पद्धतीचे शिक्षण देणे असा नव्हे. विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक प्रवृत्तींना अनुरूप असे विविध कार्यक्रम असतील, अधिकाधिक बुद्धीच्या विद्यार्थ्यांना पेलतील असे कनिष्ठ, मध्यम व वरिष्ठ पातळींवरचे अभ्यासक्रमही असतील."

तेव्हा ज्यांच्या अंगी विशिष्ट तऱ्हेची व दर्जाची गुणवत्ता प्रकट व अप्रकट स्वरूपात आढळते त्यांच्यासाठी स्वतंत्र संस्था निर्माण करणे, हेच सर्वांच्या हिताचे असते. अशा खास संस्थांची तरतूद शिक्षणव्यवस्थेत असावी असा सर्वच शिक्षणआयोगांचा आग्रह आहे.

ज्येष्ठ विद्यापीठाच्या शिफारसींवर आक्षेप घेतले जातील हे लक्षात घेऊन शिक्षण आयोगाने त्यांचे खंडन केले आहे. (११·२५). आयोगाने म्हटले आहे, " प्राज्ञ व सामान्य असा भेद करणे यात लोकशाहीला बाधा असण्यासारखे काही नाही. उलट ही गोष्ट आम्हा सर्वांच्या हिताची आहे. आपल्याजवळची उपलब्ध. मोजकी साधनसामग्री

सर्वसामान्य संस्था व विद्यार्थी यांच्यासाठी खर्च करून सर्वांचीच आबाळ करणे आणि 'सामान्य' (मिडीऑकर) बुद्धीचे पोषण करणे यात शहाणपण नाही. आपण जी समाजवादी समाजरचना करण्याची प्रतिज्ञा केली आहे तिच्यासाठी तीक्ष्ण बुद्धीच्या, प्रतिभाशाली, प्रशिक्षित, कुशल, नेतृत्वक्षम नि दर्जेदार मनुष्यबळाची गरज आहे. उत्कृष्टतेचा ध्यास घेतलेल्या व पाठपुरावा करणाऱ्या व्यक्तींची निकड आहे. इंग्लंड, अमेरिका व सोविएत रशिया यांचा गेल्या पन्नास-पाऊणशे वर्षांचा इतिहास पाहिला तर हेच दिसेल की, ज्यांच्या सुप्त गुणांना, क्षमतांना वेळींच खतपाणी मिळाले, स्वतंत्र दर्जेदार 'अभिनव' (एलादरिस्ट) संस्थांत ज्यांची जोपासना झाली, त्यांनीच आपल्या देशाच्या विविध क्षेत्रांत उत्कर्ष घडवून आणला आहे."

समतेचा चुकीचा अर्थ कोणता व खरा अर्थ कोणता हे स्पष्ट करण्यासाठी दोन शिक्षकांचे उद्गार येथे उद्धृत केले आहेत. एक शिक्षिका म्हणाली, "तथाकथित बुद्धिमान मुलांना सर्वसामान्य मुलांपासून वेगळे काढून वेगळी वागणूक देणे ही गोष्ट मी लोकशाहीविरोधी मानते. माझ्या दृष्टीने सर्वच मुले हुशार 'गिफ्टेड' आहेत." दुसरा उद्गार शिक्षणशास्त्राच्या प्राध्यापकांचा आहे. ते म्हणाले, "प्रत्येक मुलाला आपल्या सुप्त शक्तीचा, क्षमतांचा विकास करून घेण्यास साह्य करावयाचे, त्याचा वंश संप्रदाय, सामाजिक स्थान वा आर्थिक दर्जा यांचा विचार करावयाचा नाही; हे अमेरिकन शिक्षणपद्धतीचे उद्दिष्ट आहे." पहिल्या उद्गाराचा अर्थ असा होतो की, सर्वांना एकच अभ्यासक्रम, एकच पाठ्यपुस्तके, एकच अध्ययन–अध्यापनपद्धती, सर्व बाबतीत समानता असावी. ती शिक्षिका खरोखरी हुशार असणाऱ्या मुलांना वेगळ्या वाटेने, वेगळ्या गतीने जाण्याची, त्यांच्या विकासाची संधी त्यांना द्यावयास तयार नाही. हा दृष्टिकोण लोकशाहीच्या मुळावर येणारा आहे. या उलट त्या प्राध्यापकाचा दृष्टिकोन हाच खरा लोकशाहीचा आहे. प्रत्येकाला त्याचा त्याचा कल, कुवत, क्षमता, आकलनशक्ती यांना अनुसरून वेगळी वेगळी वागणूक देणे; प्रगतीचे भिन्न मार्ग खुले ठेवणे हीच खरी लोकशाही आहे. या दोन्ही विचारसरणीचे लोक आपल्याकडे आहेत.

प्राज्ञ विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र संस्था व स्वतंत्र अभ्यासक्रम असावेत, उच्च शिक्षणात निवडक विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा, या गोष्टींना जो विरोध होतो तो केवळ समता व समानसंधी यांच्या विषयाच्या चुकीच्या कल्पनांमुळे नव्हे; तर त्या विरोधाच्या मुळाशी एक भीती दडलेली आहे. आणि त्या भीतीला वास्तवात दुर्दैवाने आधारही आहे. निवडीच्या तत्त्वामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना, मागासवर्गीयांना, शहरातील गलिच्छ वस्त्यांत राहणाऱ्यांना उच्च व कसदार शिक्षणाची संधी कधीच मिळणार नाही, अशी भीती बहुजनसमाजाच्या व मागासवर्गीयांच्या नेत्यांना वाटते. आपल्या मुलांना निकृष्ट दर्जाचे, कमी कसाचे (सबस्टँडर्ड), तुटपुंजे शिक्षण मिळत राहिले, तर त्यांना प्रगतीच्या, सामाजिक प्रतिष्ठेच्या व वरिष्ठ वर्गात प्रवेश करण्याच्या पायऱ्या कधीच चढता येणार

नाहीत; अंगी गुण असूनही नागरी, उच्चभ्रू वर्गातील विद्यार्थ्यांच्या स्पर्धेत मागेच राहावे लागेल. समाजाच्या तळाशीच खितपत पडावे लागेल, अशी भीती त्यांना वाटते.

## आजची स्थिती

आणि आजची परिस्थिती या भीतीचे समर्थन करणारी आहे. सध्या अखिल भारतीय स्वरूपाच्या इंजिनिअरींग महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न पाहिले की, ही गोष्ट स्पष्ट होते. पालकाचे मासिक उत्पन्न व विद्यार्थ्यांची टक्केवारी अशी आहे :—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | रु. | १५०/– | विद्यार्थी | ६.६ टक्के |
| २ | रु. | १५१–३०० | ,, | १२.८ ,, |
| ३ | रु. | ३०१-५०० | ,, | २०. ,, |
| ४ | रु. | ५००/च्यावर | ,, | ५८.७ ,, |

[ ही पाहणी २५७४ विद्यार्थ्यांची आहे. ]

अन्य स्थापत्यविद्यालये, वैद्यकीय महाविद्यालये यांच्याबाबतीतही जवळजवळ हीच परिस्थिती आहे. कमी उत्पन्नाच्या पालकांची मुले कृषिमहाविद्यालये व आय. टी. आय. सारख्या अन्य धंदेशिक्षणाच्या संस्थांत व मोठ्या प्रमाणात (शे. ५८ वा अधिक) आढळतात. उच्च शिक्षणाच्या संस्थांत प्रवेशाचे निकषही कडक असतात. ज्यांना माध्यमिक शिक्षण कसदार मिळाले आहे वा ज्यांचे घरातील, परिसरातील वातावरण महत्वाकांक्षेला पोषक आहे तीच मुले त्या निकषांना उतरतात. ही परिस्थिती बदलली पाहिजे याबद्दल मतभेद नाही; पण त्याला उपाय सगळ्यांना 'सबघोडे बारा टक्के' शिक्षण देणे, बुद्धिमंतांची प्रगती रोखणे हा नाही. प्राथमिक – माध्यमिक शिक्षणात राहिलेल्या त्रुटी भरून काढणे, उपचार कार्यक्रमांची ( रिमेडिअल ) सोय करणे, शिष्य-वृत्तीसारख्या आर्थिक साहाय्यांच्या योजना आखणे असे विविध मार्ग आहेत. विद्यार्थ्यांची निवड करताना सामाजिक न्याय दुर्लक्षित होऊ नये, असे सर्वांचेच मत आहे.

समान संधीच्या आग्रही पुरस्काराचा एक सुपरिणाम होईल, असा विचार प्रा. वैझे यांनी इंग्लंडच्या परिस्थितीच्या संदर्भात व्यक्त केला होता. तो आपल्याही परिस्थितीला लागू पडणार आहे. त्यांनी म्हटले आहे, समतेवर दिल्या जाणाऱ्या भरामुळे दुबळ्या व कमी क्षमतेच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अधिक अर्थिक तरतूद केली जाईल. त्यांची शिक्षणातील गळती थांबवण्याकडे लक्ष पुरवले जाईल. त्यांना चांगल्या इमारती व क्रीडांगणे मिळण्याची सोय होईल. शैक्षणिक साधने व चांगले

शिक्षक यांचा पुरवठा केला जाईल. आज त्यांची या सर्व बाबतींत दैना आहे. आपल्याकडेही आदिवासी, अनुसूचित जाती-जमाती व हरिजन यांच्यासाठी अब्जावधी रुपयांची तरतूद केली जात आहे, ते या दिशेनेच टाकलेले पाऊल आहे.

## समान बुद्धिमत्तेचे सुयोग्य संगोपन

बुद्धिमान मुलांची विशेष काळजी घेणे याचा अर्थ सामान्य मुलांची उपेक्षा करणे असा होत नाही. एक तर आजच्या यंत्रतंत्राच्या युगात सामान्य बुद्धीच्या व्यक्तींकडूनही त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात व मर्यादेत उत्कृष्ट व निर्दोष कामाची अपेक्षा आहे. कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळाप्रमाणेच अर्धकुशल व्यक्तींची मोठ्या संख्येने गरज आहे. त्यांनीही डोके चालवून दर्जेदार काम करावे अशी अपेक्षा आहे. व्यवसायाची विविध क्षेत्रे निर्माण होत आहेत. तेथे गुणवत्ता दाखविण्यास भरपूर वाव आहे, केवळ उच्च बौद्धिक वा व्यावसायिक क्षेत्रे एवढीच कर्तृत्वाची दालने नाहीत. काही व्यक्तींची बुद्धी रचनात्मक, यांत्रिक उद्योग यांतच विशेष चमकते.

बुद्धिमत्तेचे देणे केवळ उच्चभ्रू वा सुशिक्षित वर्गाला लाभले आहे आणि ग्रामीण वा मागासवर्गातील विद्यार्थ्यांत बुद्धिमत्ता नसते हा समज चुकीचा आहे. या वर्गातील मुलांचे गुणविशेष शोधून काढण्याचे तंत्र व निकष आता तयार झाले आहेत व होत आहेत. विज्ञान, कला, संगीत, चित्रकला, नाट्य इत्यादी क्षेत्रांत प्रगती करण्याची ज्यांची क्षमता आहे, ज्यांना रुची वा आस्था आहे, अशी मुले-मुली ही शोधून काढण्याचा प्रयत्न चालू आहे.

उच्च दर्जाच्या काही संस्था, शाळा, महाविद्यालये, प्रगत केन्द्रे उघडून तेथे बुद्धिमान विद्यार्थ्यांची सोय करण्याचा एक खास हेतू आहे, तो म्हणजे या संस्थांतील प्रयोग, शोध, नवरचना यांचा लाभ हळूहळू सर्वसामान्य संस्थांना, विद्यार्थ्यांना मिळावा. तेथे उपलब्ध झालेले ज्ञान व मिळालेले अनुभव समाजाच्या तळापर्यंत झिरपावेत आणि सर्वत्र समाजाचा स्तर उंच होत जावा. यालाच कोठारी शिक्षण आयोगाने ' एक्स्टेन्शन ऑफ एक्सलन्स ' ( ११–३४ ) म्हटले आहे.

संख्यात्मक विस्तार आणि गुणवत्तेचे संगोपन-संवर्धन या दोन्ही भारतीय शिक्षणाच्या निकडीच्या गरजा आहेत. भारतातील साक्षरतेचे अल्पप्रमाण ( शे. ३० ) लक्षात घेता निरक्षरतेचा केवढा डोंगर आपल्याला पार करावयाचा आहे याची कल्पना येते. शिक्षणाच्या विपुल संधी त्यासाठी उपलब्ध झाल्या पाहिजेत. हे संधीचे समानीकरण कसे साधावयाचे, याची दिशा कोठारी शिक्षण आयोगाने दाखविली आहे. ( प्र. ६ ) असमान संधींची कारणमीमांसाही आयोगाने केली आहे. आणि त्याबाबत विशेष चर्चा प्रा. दाभोळकर यांच्या ' शिक्षणाची समान संधी ' या पुस्तिकेत ( समाज प्रबोधन संस्था, पुणे ३० ) जिज्ञासूंना वाचावयास मिळेल. दारिद्र्य, शिक्षणसंस्थांचा अभाव, वेगवेगळ्या

शिक्षणसंस्थेतील गुणवत्तेचे भिन्न निकष आणि मुख्य म्हणजे गृहजीवनाचे स्वरूप हे फार मोठे अडथळे आहेत. सुसंस्कृत, सुशिक्षित व जाणत्या कुटुंबांतील मुलेच उच्च दर्जाचे शिक्षण घेताना आढळतात. बुद्धिमापनाचे आजचे निकषही एकांगी व सदोष आहेत. बुद्धीच्या ऐवजी मिळविलेले ज्ञान व प्रावीण्य ( अचिव्हमेंट ) यांचेच मापन होते. केवळ शाळा-कॉलेजे काढल्यानेही ही संधी उपलब्ध होत नाही. त्या संस्थांचा योग्य फायदाही घेता आला पाहिजे, घेतला गेला पाहिजे. आणि या संस्थांचा दर्जाही चढता राहिला पाहिजे.

पण त्याचबरोबर गुणात्मक दर्जा उंचावण्याचा व उत्कृष्टतेचा पाठपुरावा करण्याचा ध्यास घेतलेल्या युवक-युवतींची संख्याही वाढण्याची नितांत गरज आहे. शिक्षणाच्या क्षेत्रातच नव्हे, तर कृषी, कारखानदारी, विज्ञान, तंत्रविद्या, यांवर आधारित लहानमोठे उद्योग; व्यवस्थापन, कला नि मानवी संबंध अशा सर्वच क्षेत्रांत गुणोत्कर्ष साधण्याची जिद्द निर्माण झाली पाहिजे. पाश्चिमात्त्य देशात फेरफटका करून आलेले लोक तेथील नागरिकांच्या जीवनातील शिस्त, त्यांचा वक्तशीरपणा, त्यांची स्वावलंबनाची वृत्ती, त्यांची सौंदर्यदृष्टी, राष्ट्रनिष्ठा नि राष्ट्रीय कर्तव्याची जाण, आणि वागणुकीतील सौजन्य याची तोंड भरून वाखाणणी करतात. आपल्याकडील या गुणांचा अभाव दूर करणे; कौटुंबिक, सामाजिक, तसेच उत्पादन क्षेत्रात प्रसन्नतेचे, पुरुषार्थ केल्याच्या समाधानाचे वातावरण निर्माण करणे, हे आपल्याला एक आव्हान आहे.

‘ उत्कट भव्य तेचि घ्यावे। मिळमिळीत अवघे टाकावे ॥ ’ असा संदेश ३०० वर्षांपूर्वी समर्थ रामदासांनी दिला. हस्ताक्षरासारख्या अगदी लहान गोष्टींपासून राजकारण व परमार्थ या गोष्टींपर्यन्त सर्वत्र परिपूर्णता, परमोत्कर्ष, आंतरिक गुणांची सोय धरून साधण्याचा उपदेश त्यांनी केला. त्याची आज विशेष गरज आहे. गांधीजींनी अगदी सफाईपासून तो मोठ्या कामापर्यंत—त्यात चारित्र्यही आहे—सर्वत्र उत्कृष्टता साधण्यावर भर दिला आहे; पण त्याकडे दुर्लक्ष झाले आहे. जीवनावर आलेली मरगळ, आळस, अल्पसंतोषीपणा हे दुर्गुण झटकून टाकून पराक्रमाचे स्फुलिंग फुलवण्याच्या नव्या दृष्टीचा स्वीकार केल्यानेच व्यक्तिगत व सामाजिक जीवन कृतार्थ होणार आहे.

## समारोप

समारोपादाखल वरील सर्व चर्चेचे सार पुढीलप्रमाणे सांगता येतील.

व्यक्तीव्यक्तींमधील जी विषमता मानव निर्माण करीत आहे ती नाहीशी करून सर्वांना विकासाचे मार्ग मोकळे राहिले पाहिजेत. हे कार्य लहानसहान नाही व चटकन होणारेही नाही. निसर्गतः व्यक्तीव्यक्तींमध्ये बुद्धी, कल, क्षमता, अभिरुची इत्यादींचे जे भेद आढळतात ते समाजाला उपकाराचे आहेत. आणि या निसर्गदत्त शक्तींचा विकास करून घेऊन सामान्य व्यक्तीलाही आपल्या मर्यादित क्षेत्रात उत्कृष्टता व श्रेष्ठ

दर्जाचे प्रावीण्य दाखविता आले पाहिजे. तसे त्यांना प्रोत्साहनही मिळाले पाहिजे. ही प्रेरणा त्यांना मिळण्यासाठी एकंदर समाजाचेच वातावरण, उत्कर्षता गाठणाऱ्या व पौरुष प्रकट करणाऱ्या गोष्टींना पोषक असले पाहिजे. या दोन्ही गोष्टी बरोबरच साध्य करता येतील म्हणजे संख्यावाढ विरुद्ध गुणवत्ता व उत्कृष्टता असा वाद निर्माण होणार नाही. समतेच्या बाबतीत कोठारी शिक्षण आयोगाने मांडलेला एक विचार हाही ध्यानात घेण्याजोगा आहे. आयोगाने म्हटले आहे की, " समता ही एक आदर्श कल्पना आहे. ते एक उदात्त ध्येय आहे; पण त्याबरोबरच ते अप्राप्यही आहे. ते गाठण्याचा जिद्दीने व नेटाने अखंड प्रयत्न चालू राहायलाच हवा आणि परिस्थितीचा वरचेवर आढावा घेऊन मानवनिर्मित विषमतेची बीजे अंकुरत नाहीत ना, याचीही काळजी सतत घेतली पाहिजे. ३-४ शतकांची परंपरा असणाऱ्या व लोकशाहीला विशेष प्राधान्य व अग्रक्रम देणाऱ्या अमेरिकेलाही समतेचे स्वप्न अजून साकार करता आलेले नाही, याचे कारण ही ध्यानात घेतले पाहिजे. आपल्या राष्ट्रालाही तो आदर्श गाठण्यासाठी फार मोठा पल्ला मारावा लागणार आहे. या समस्येचा एक आर्थिक पैलूही आहे. जसजसे सामान्य जनतेचे राहणीमान उंचावेल व गृहसंस्कारांचा दर्जा सुधारेल, तसतशी विषमतेची दरी भरून निघेल. आर्थिक समतेचे व लोकशाहीचे ते काम आहे. ही समता प्रस्थापित करण्याला शिक्षणानेही हातभार लावायचा आहे; पण समाजाच्या विविध स्तरांतील अंतर भरून निघेपर्यंत थांबणेही इष्ट नाही. सर्वांना समान संधी उपलब्ध करून देतादेताच उत्कृष्टतेचा पाठपुरावा करीत राहणे हेच श्रेयस्कर आहे.

□ □

# आपण मनावर घेतले तर– !

## प्रभा श्रीनिवास

### शिक्षण म्हणजे काय ?

जन्मतः चिमुकल्या आणि असहाय असणाऱ्या बालकांतून पुढे प्रौढ व स्वतःच्या पायावर उभा राहणारा माणूस निर्माण होतो. विकासाच्या या प्रक्रियेला दोन घटक जबाबदार असतात. एक, निसर्गक्रमाने येणारी परिपक्वता व दोन, शिक्षण. आजच्या विशिष्ट अनुभवाचा परिपाक म्हणून उद्या वर्तनात बदल होणे म्हणजे शिक्षण. मानवी वर्तनाच्या आंतर आणि बाह्य अशा दोन बाजू असतात. या दोहोंमध्ये वा दोहोंपैकी कोणत्याही एकामध्ये अनुभवामुळे फरक पडला म्हणजे माणूस शिकला असे आपण म्हणतो.

### आपली आजची शिक्षणपद्धती

माणसाचे हे शिक्षण कधी पूर्वनियोजित पद्धतीने होते, तर कधी आपाततः घडते. पूर्वनियोजित वा औपचारिक शिक्षण हेच शिक्षण या नावाने प्रसिद्ध असते. म्हणून शिक्षण म्हटले की, शाळा-कॉलेजांतील शिक्षण डोळ्यांसमोर येते. या शिक्षणाचे उद्दिष्ट असते विशिष्ट ज्ञान व कौशल्ये प्राप्त करण्याचे, किंवा ती प्राप्त केली आहेत असे प्रशस्तिपत्रक मिळविण्याचे. आपल्या शिक्षणपद्धतीवर आज अनेक वर्षे टीका होत आहे. अनेक वेळा तिचे सांगोपांग विच्छेदन करून तिच्या सुधारासाठी तितकीच सविस्तर उपाय-योजनाही सुचविण्यात आली आहे. यांतील कित्येक उपाय अमलात आणण्याचेही प्रयत्न झाले; पण पिढ्यान्‌पिढ्या चालू असणाऱ्या या शिक्षणपद्धतीची वरवर काटछाट वा लिंपालिंपी होण्यापलीकडे काहीही घडू शकलेले नाही.

असे का ? ढोबळमानाने याला तीन कारणे आहेत, असे मला वाटते. एक म्हणजे शिक्षणाचे फार मोठ्या प्रमाणावर सरकारीकरण झाले आहे. समाजाचा गाडा ओढायला कार्यक्षम माणसे शिक्षणाने बनवावीत एवढीच अपेक्षा कोणतेही सरकार आपल्या हातांतील शिक्षणाकडून करते. म्हणून आहे ते शिक्षण व्यावहारिकदृष्ट्या अधिक उपयुक्त कसे होईल, याकडे लक्ष देऊन सरकार काय ते बदल घडवील; पण शिक्षणाची दिशा बदलणार नाही. दुसरे कारण म्हणजे पालक व विद्यार्थी यांच्या शिक्षणाकडून अपेक्षा. विद्यार्थ्यांच्या ज्या चळवळी गेल्या दशकभर झाल्या, त्यांत शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्याची मागणी अंतर्भूत नाही. मुलाने गुण मिळवावे, सर्टिफिकेट मिळवावे, आर्थिकदृष्ट्या त्याने कार्यक्षम

बनावे, एवढीच माफक अपेक्षा पालकांचीही असते. तिसरे कारण म्हणजे शिक्षकाची दुर्दशा. हळूहळू आपला शिक्षक अधिकाधिक अवाढव्य अशा यंत्रणेचा भाग बनत आहे. त्याने स्वतःच्या पुढाकाराने काही करावे, त्याला शिकविणे स्फुरावे, अशी त्याची स्वतःची घडण नाही. त्याच्या भोवतालची परिस्थितीही नाही. या तीन गोष्टींचा विचार करता आजच्या शिक्षणात काही मूलग्राही बदल होतील ही अपेक्षा नजिकच्या भविष्यकाळासाठी तरी अवास्तव ठरेल असे मला वाटते.

आजच्या शिक्षणातील नेमक्या कोणत्या त्रुटीबद्दल मी बोलत आहे ? ज्ञान–किमानपक्षी माहिती देण्याची योजना आजच्या शिक्षणात आहे. थोडीफार व्यवहारोपयोगी कौशल्येही देण्याची योजना त्यात आहे. ज्ञान आणि कौशल्ये ही साधने आहेत. त्यांच्या योगाने मुलांनी काय साधायचे याची कल्पना मुलाला येऊ शकेल अशी तरतूद आजच्या शिक्षणात नाही. म्हणजेच ज्याच्या अभावी व्यक्तिमत्त्व लंगडे पडते ते जीवनाचे सम्यक् दर्शन देण्याची कुवत शिक्षणात नाही. इतकेच काय, तर ज्या चौफेर विकासाने मुलांनी हे दर्शन कमवावे त्या चौफेर विकासाची योजनाच शिक्षणात नाही. या शिक्षणातून बुद्धीची थोडीफार सफाई जरूर होते; पण बुद्धीचा तरी सर्वांगीण विकास होतो का ? विकासाच्या बहुतेक महत्त्वाच्या पैलूंचे शिक्षण आज शाळेबाहेर निव्वळ अनौपचारिक पद्धतीने होत आहे. मुलांची स्मरणशक्ती, वाचनाचा वेग, सामाजिक कौशल्ये अशा मोजक्या काही बाबींचे प्रशिक्षण देणारे महागडे वर्ग मोठ्या शहरांतून कुठे कुठे चालू असतात; पण मुलांच्या आशाआकांक्षांना, जीवनमूल्यांना सुगठित स्वरूप प्राप्त करून देण्याची योजना तर कोठेच आढळत नाही. भोवतालच्या माणसांच्या धडपडीचे जे मर्म वाढत्या वयाच्या मुलांच्या मनावर आपाततः उमटते ते त्यांच्या चारित्र्याचे–जीवनपद्धतीचे केंद्रबिंदू बनते. मुलांच्या जीवनाला दिशा कित्येकदा काहीशा अपघातानेच मिळते.

या अनौपचारिक शिक्षणाचे काही गुण असतात, तसेच काही अवगुणही असतात. शिक्षण घेणाऱ्याचा मनापासूनचा सहभाग या शिक्षणप्रक्रियेत अनुस्यूत असतो, हा तिचा मुख्य गुण; पण चुका करीत शिकण्यामधील अपव्यय आणि नेमकेपणाचा अभाव हे या पद्धतीचे महत्त्वाचे अवगुण होत. म्हणून मुलाच्या विकासाचे अधिकाधिक भाग नियोजनबद्ध कार्यक्रमांच्या टप्प्यांत आणले पाहिजेत. त्यांतून मुलाचा विकास अधिक कार्यक्षमतेने होईल.

असे योजनाबद्ध कार्यक्रम शक्य आहेत का ? आणि असले तरी इष्ट आहेत का ? असे दोन प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतात. यासाठी विकासप्रक्रियेचे स्थूलमानाने काय स्वरूप असते ते आपण पाहिले पाहिजे.

## विकासप्रक्रिया

मूल वाढत असते. त्याच्या अंगच्या विविध मानसिक आणि शारीरिक शक्ती विकसत असतात. उदा० त्याची विचारशक्ती वाढते, तर्कबुद्धी प्रखर होते, संवेदनक्षमता

वाढते, कर्तृत्व वाढते. त्याचबरोबर त्याच्या भल्याबुऱ्याच्या कल्पनाही विकसित होत असतात. या कल्पनांच्या म्हणजेच सद्सद्विवेकबुद्धीच्या प्रकाशात आपल्या वागणुकीचे नियंत्रण करण्याचे बळ—संकल्पबळही त्याला प्राप्त होत असते. हा सगळा विकास कधी सामान्य प्रतीचा होतो, तर कधी विशेष जोमदार होतो. कधी वाढ खुंटते, तर कधी सदोष बनते.

विकासप्रक्रियेला मूल आणि त्याचे वातावरण यांमधील अनेक घटक जबाबदार असतात. मुलाचे निसर्गदत्त गुणावगुण आणि त्याच्या भोवतालच्या वातावरणांतून त्याला प्रोत्साहन देणारे वा अवरोध करणारे घटक यांची क्रियाप्रतिक्रिया घडत असते. वर्तन-वादाचा प्रवर्तक वॉटसन म्हणे, ' मला कोणतेही मूल द्या. मी त्याला अमेरिकेचा प्रेसिडेंट करून दाखवीन. ' इतका आत्यंतिक दावा सशास्त्र असल्याचे आजवर आढळलेले नाही. त्यामुळे वाढविकासाचे संपूर्ण नियंत्रण बाह्य वा परिस्थितीजन्य शक्तींकडून होऊ शकते, असे आज कोणी मानीत नाही.

## निसर्गाचा सहभाग

या उलट निसर्गक्रमाप्रमाणे विकास होणार, आपल्या हातात त्यातले काही नाही; अशी एक नियतीवादी भूमिका कित्येकदा घेतली जाते. निसर्गात कित्येक प्राण्यांना जगायची रीत इतकी आखून रेखून दिलेली असते की, त्याच्या पलीकडे रेसभरही त्यांना जाता येत नाही. नियतीवादी भूमिका त्यांच्या बाबतीत योग्य आहे; पण प्राणिजीवनाच्या उत्क्रांतीबरोबर हे चित्र बदलते. निसर्ग प्राणिमात्राला जगण्याचे अधिकाधिक विकल्प बहाल करीत जातो. सर्वांत जास्त विकल्प माणसाला मिळाले आहेत. ' जगावे कसे ? ' हे सर्वथा उपजतबुद्धीने माणसाला कळत नाही. अनुभवातून आणि अनुकरणातून शिकून माणूस आपल्या जीवनाची रीत रेखीत असतो. आपोआप जगता येणे माणसाच्या नशिबी नाही. त्याला जगणे शिकावे लागते.

त्याच्या अंगी असणाऱ्या विविध शक्तींचेही तसेच आहे. निसर्ग केवळ त्याच्या कमाल मर्यादा ठरवून देतो; पण त्याच्या शक्ती आपोआप विकसत नाहीत. त्यासाठी त्याला परिश्रम करावे लागतात.

याप्रमाणे शक्तिसंवर्धन काय, किंवा व्यक्तित्वबांधणी काय, मानवाला दोन्ही शिक्षणप्राप्तच आहेत. अनौपचारिकरीत्या आज हे शिक्षण होते. या शिक्षणाची कार्य-क्षमता वाढवायची असली तर, ते योजनाबद्ध करणे भाग आहे.

## योजनाबद्ध शिक्षण

आज शास्त्र या बाबतीत मार्गदर्शन करण्यास समर्थ आहे काय ? तीन शास्त्रे या विषयाशी संबंधित आहेत : विकास-मानसशास्त्र, मनोविकारशास्त्र आणि शिक्षणशास्त्र.

भौतिक शास्त्रांपेक्षा यांची बांधणी वेगळी आहे आणि त्यांची प्रगतीही भौतिक शास्त्रांइतक्या वेगाने झालेली नाही. शंभर टक्के खात्रीचे असे निष्कर्ष ही शास्त्रे आज काढू शकलेली नाहीत; पण तरीसुद्धा अनौपचारिक शिक्षणाच्या गोंधळाला काही शिस्त लावण्याची क्षमता त्यांच्यात आज आहे. शिवाय, शंभर टक्के खात्रीच्या ज्ञानासाठी व्यवहारोपयोगी शास्त्रांना थांबता येत नाही. कॅन्सरवर खात्रीचे उपाय आपणास सापडलेले नाहीत, म्हणून कॅन्सरच्या रोग्याला आपण टाकून जाऊ शकत नाही. विज्ञानाच्या परिपूर्णतेची वाट बघत जगायचे आपण थांबवू शकत नाही.

योजना बनवायला सुरुवात केली म्हणजे पहिला विचार करावा लागतो मूल्यांचा. अगदी शक्तिसंवर्धन म्हटले तरी ती शक्ती कोणत्या उद्दिष्टांसाठी वापरायची हा प्रश्न प्रथम सोडवावा लागतो. उदा., बुद्धीचा विकास करावयाचा म्हटले तर बुद्धी कशासाठी ? पांडित्य मिरवायला ? शिस्तपालनासाठी ? की स्वतंत्र विचार करून भल्याबुऱ्याचा निर्णय घेण्यास समर्थ होण्यासाठी ? हे आधी ठरवावे लागते. शिक्षणाच्या प्रांतात मूल्यविचार केल्याशिवाय पाऊलच टाकता येत नाही. तेव्हा मुलाने आपला विकास जो घडवून आणायचा तो कशासाठी ? व्यक्तित्वाचे गठन करताना कशाची परिपूर्ती करण्याकडे लक्ष ठेवायचे आहे, याचे व अशासारख्या प्रश्नांचे व्यापक आणि तपशिलवार दोन्ही प्रकारचे उत्तर शोधावे लागते.

## मानवप्रतिष्ठा : शिक्षणाचे प्रधान अंग

या बाबतीत रवींद्रनाथांची एक उक्ती मला उपयुक्त वाटते. ' सर्वांपेक्षा माणूस श्रेष्ठ आहे. त्याहून श्रेष्ठ दुसरे काही नाही. ' असे त्यांनी एका गीतात म्हटले आहे. माणूस आणि मानवी समाज हे परममूल्य मानले तर, वाढविकासाचे उद्दिष्ट तपशिलवार मांडायला सुरुवात करता येते. जे जे माणुसकी वाढवील ते ते ग्राह्य आणि जे जे माणूसकीला काट देईल ते ते त्याज्य, असा निकष त्यातून आपल्याला मिळतो. हा निकष लावायचा कोणी ? शिक्षकाने, पालकाने की स्वतः मुलाने ? माझ्या मते स्वतः मुलाने हा निकष लावायचा आहे. हा निकष लावण्यासाठी तो समर्थ होईल हे पाहणे, हे मार्गदर्शकांचे काम होय.

मुलाच्या या सामर्थ्याचे तीन आधार आहेत. बुद्धी, भावना आणि संकल्पशक्ती. मानवी बुद्धीची काही वैशिष्टये आहेत. स्थूलमानाने समोर असलेल्या वस्तूंच्या पलीकडे जाऊन वस्तूंचे सूक्ष्म रूप, त्यांचे इंद्रियांना न समजणारे संबंध मनुष्याला जाणता येतात. उदा०, समोर दिसणाऱ्या आंब्यापलीकडे जाऊन आंब्याचे ' आंबेपण ' त्याला जाणता येते. इतकेच नव्हे तर, ' आंबा हे एक फळ आहे. ' असा विचारही ग्रहण करता येतो. अमूर्त बोधाच्या या शक्तीच्या जोरावरच माणूस स्मरण करू शकतो, वाचन करू शकतो, तर्क करू शकतो, शब्द वापरू शकतो. ' जे न देखे रवि, ते देखे कवि ' असे म्हटले

तर प्रत्येक माणूस थोडाथोडा कवी असतो असे मानावे लागेल. अमूर्ताच्या साह्याने विहार करताना सामान्य माणसांना फार अडथळे येतात; कवीला ते येत नाहीत एवढेच. बुद्धीला अमूर्ताच्या साह्याने अप्रतिहत आणि बिनचूक विहार करता यावा हे बौद्धिक विकासाचे उद्दिष्ट. आपण त्याला 'स्वतंत्र बुद्धी' असे म्हणतो. वेगवेगळ्या रीतीने बुद्धी वापरत राहून, तर्कशास्त्राचे प्राथमिक ज्ञान पचवून विचाराचे आधारभूत जे ज्ञान ते शुद्ध कसे राहील यांचे तंत्र शिकून स्वतंत्र बुद्धीचा विकास मुलामध्ये होऊ शकतो.

## भावनेचे सामर्थ्य

बुद्धी हा मानवी जीवनाचा एकमेव मार्गदर्शक नाही. भावना ही दुसरी ताकद मनुष्याजवळ आहे. अगदी तान्हे मूलदेखील शेजारच्या तान्ह्या मुलाचे रडणे ऐकून अस्वस्थ होते. सह-अनुभूतींची ही ताकद ही मनुष्याला फार मोलाचे ज्ञान देते. ज्ञानाला एक वेगळे परिमाण प्राप्त होते. संवेदनक्षमता हा सद्‌सद्‌विवेकबुद्धीचा दुसरा आधार आहे. प्रत्यक्ष जीवनात भोवताली घडणाऱ्या घटनांशी तद्रूप व्हायला शिकून कलेद्वारे सादर केलेला जीवनानुभव भावनासंसर्पणाने ग्रहण करावयास शिकून, साहित्यांतील जीवनाविष्काराचे मर्मग्रहण करायला शिकून, इ. रीतीने मुलाच्या संवेदनक्षमतेची जोपासना होते.

## संकल्पाचे बळ

व्यक्तिमत्त्वाचा तिसरा आधार संकल्पबळ. आपणास जे योग्य वाटते त्याप्रमाणे आचरण करण्याची शक्ती असणे हे सर्वांत मोलाचे आहे. सॉक्रेटीस म्हणे, 'Knowing is doing'—खरे ज्ञान एवढे ज्वलंत असते की, आचरणाचे नियंत्रण केल्याशिवाय ते राहत नाही. बुद्धीला जे ग्राह्य वाटते, भावनेची ज्याने पकड घेतली जाते, ते कामा तरीही प्रत्यक्ष हातून घडत नाही असा अनुभव आपल्याला येतो. ज्ञान या शब्दाचा रूढ अर्थ आणि सॉक्रेटिसाने लावलेला अर्थ भिन्न आहे यात शंका नाही. 'कळते पण वळत नाही' ही दुबळ्या संकल्पाची कथा. छोटे छोटे संकल्प करून आणि स्वतःवर जागता पहारा देऊन ते पार पाडून संकल्पबळ वाढविता येते.

व्यक्तिमत्त्वसंवर्धन ही फार महत्त्वाची गोष्ट आहे—व्यक्तीच्या, समाजाच्या आणि आज झपाट्याने बदलणाऱ्या घडीच्या दृष्टीने. हे काम योगायोगावर सोडून देता कामा नये. या कामाचा सशास्त्र विचार होऊ शकतो. आजवर शिक्षणक्षेत्रातील अनेक महत्त्वाचे प्रयोग या दिशेने झाले आहेत. या प्रयोगांचा अनुभव जमेला धरून कार्यक्रम आखणे व पार पाडणे आणि व्यक्तिमत्त्वसंवर्धनाचे काम अधिकाधिक सशास्त्र बनविणे हे काम घडू शकते. पण केव्हा? जर आपण मनावर घेतले तर!

□ □

भौतिक शास्त्रांपेक्षा यांची बांधणी वेगळी आहे आणि त्यांची प्रगतीही भौतिक शास्त्रांइतक्या वेगाने झालेली नाही. शंभर टक्के खात्रीचे असे निष्कर्ष ही शास्त्रे आज काढू शकलेली नाहीत; पण तरीसुद्धा अनौपचारिक शिक्षणाच्या गोंधळाला काही शिस्त लावण्याची क्षमता त्यांच्यात आज आहे. शिवाय, शंभर टक्के खात्रीच्या ज्ञानासाठी व्यवहारोपयोगी शास्त्रांना थांबता येत नाही. कॅन्सरवर खात्रीचे उपाय आपणास सापडलेले नाहीत, म्हणून कॅन्सरच्या रोग्याला आपण टाकून जाऊ शकत नाही. विज्ञानाच्या परिपूर्णतेची वाट बघत जगायचे आपण थांबवू शकत नाही.

योजना बनवायला सुरुवात केली म्हणजे पहिला विचार करावा लागतो मूल्यांचा. अगदी शक्तिसंवर्धन म्हटले तरी ती शक्ती कोणत्या उद्दिष्टांसाठी वापरायची हा प्रश्न प्रथम सोडवावा लागतो. उदा., बुद्धीचा विकास करावयाचा म्हटले तर बुद्धी कशासाठी ? पांडित्य मिरवायला ? शिस्तपालनासाठी ? की स्वतंत्र विचार करून भल्याबुऱ्याचा निर्णय घेण्यास समर्थ होण्यासाठी ? हे आधी ठरवावे लागते. शिक्षणाच्या प्रांतात मूल्यविचार केल्याशिवाय पाऊलच टाकता येत नाही. तेव्हा मुलाने आपला विकास जो घडवून आणायचा तो कशासाठी ? व्यक्तित्वाचे गठन करताना कशाची परिपूर्ती करण्याकडे लक्ष ठेवायचे आहे, याचे व अशासारख्या प्रश्नांचे व्यापक आणि तपशिलवार दोन्ही प्रकारचे उत्तर शोधावे लागते.

## मानवप्रतिष्ठा : शिक्षणाचे प्रधान अंग

या बाबतीत रवींद्रनाथांची एक उक्ती मला उपयुक्त वाटते. ‘ सर्वांपेक्षा माणूस श्रेष्ठ आहे. त्याहून श्रेष्ठ दुसरे काही नाही. ’ असे त्यांनी एका गीतात म्हटले आहे. माणूस आणि मानवी समाज हे परममूल्य मानले तर, वाढविकासाचे उद्दिष्ट तपशिलवार मांडायला सुरुवात करता येते. जे जे माणुसकी वाढवील ते ते ग्राह्य आणि जे जे माणूसकीला काट देईल ते ते त्याज्य, असा निकष त्यातून आपल्याला मिळतो. हा निकष लावायचा कोणी ? शिक्षकाने, पालकाने की स्वतः मुलाने ? माझ्या मते स्वतः मुलाने हा निकष लावायचा आहे. हा निकष लावण्यासाठी तो समर्थ होईल हे पाहणे, हे मार्गदर्शकांचे काम होय.

मुलाच्या या सामर्थ्याचे तीन आधार आहेत. बुद्धी, भावना आणि संकल्पशक्ती. मानवी बुद्धीची काही वैशिष्ट्ये आहेत. स्थूलमानाने समोर असलेल्या वस्तूंच्या पलीकडे जाऊन वस्तूंचे सूक्ष्म रूप, त्यांचे इंद्रियांना न समजणारे संबंध मनुष्याला जाणता येतात. उदा०, समोर दिसणाऱ्या आंब्यापलीकडे जाऊन आंब्याचे ‘ आंबेपण ’ त्याला जाणता येते. इतकेच नव्हे तर, ‘ आंबा हे एक फळ आहे. ’ असा विचारही ग्रहण करता येतो. अमूर्त बोधाच्या या शक्तीच्या जोरावरच माणूस स्मरण करू शकतो, वाचन करू शकतो, तर्क करू शकतो, शब्द वापरू शकतो. ‘ जे न देखे रवि, ते देखे कवि ’ असे म्हटले

तर प्रत्येक माणूस थोडाथोडा कवी असतो असे मानावे लागेल. अमूर्ताच्या साह्याने विहार करताना सामान्य माणसांना फार अडथळे येतात; कवीला ते येत नाहीत एवढेच. बुद्धीला अमूर्ताच्या साह्याने अप्रतिहत आणि बिनचूक विहार करता यावा हे बौद्धिक विकासाचे उद्दिष्ट. आपण त्याला ‘ स्वतंत्र बुद्धी ’ असे म्हणतो. वेगवेगळ्या रीतीने बुद्धी वापरत राहून, तर्कशास्त्राचे प्राथमिक ज्ञान पचवून विचाराचे आधारभूत जे ज्ञान ते शुद्ध कसे राहील यांचे तंत्र शिकून स्वतंत्र बुद्धीचा विकास मुलामध्ये होऊ शकतो.

## भावनेचे सामर्थ्य

बुद्धी हा मानवी जीवनाचा एकमेव मार्गदर्शक नाही. भावना ही दुसरी ताकद मनुष्याजवळ आहे. अगदी तान्हे मूलदेखील शेजारच्या तान्ह्या मुलाचे रडणे ऐकून अस्वस्थ होते. सह-अनुभूतीची ही ताकद ही मनुष्याला फार मोलाचे ज्ञान देते. ज्ञानाला एक वेगळे परिमाण प्राप्त होते. संवेदनक्षमता हा सद्सद्विवेकबुद्धीचा दुसरा आधार आहे. प्रत्यक्ष जीवनात भोवताली घडणाऱ्या घटनांशी तद्रूप व्हायला शिकून कलेद्वारे सादर केलेला जीवनानुभव भावनासंसर्पणाने ग्रहण करावयास शिकून, साहित्यांतील जीवनाविष्काराचे मर्मग्रहण करायला शिकून, इ. रीतीने मुलाच्या संवेदनक्षमतेची जोपासना होते.

## संकल्पाचे बळ

व्यक्तिमत्त्वाचा तिसरा आधार संकल्पबळ. आपणास जे योग्य वाटते त्याप्रमाणे आचरण करण्याची शक्ती असणे हे सर्वांत मोलाचे आहे. सॉक्रेटीस म्हणे, ‘ Knowing is doing ’—खरे ज्ञान एवढे ज्वलंत असते की, आचरणाचे नियंत्रण केल्याशिवाय ते राहत नाही. बुद्धीला जे ग्राह्य वाटते, भावनेची ज्याने पकड घेतली जाते, ते कामा तरीही प्रत्यक्ष हातून घडत नाही असा अनुभव आपल्याला येतो. ज्ञान या शब्दाचा रूढ अर्थ आणि सॉक्रेटिसाने लावलेला अर्थ भिन्न आहे यात शंका नाही. ‘ कळते पण वळत नाही ’ ही दुबळ्या संकल्पाची कथा. छोटे छोटे संकल्प करून आणि स्वतःवर जागता पहारा देऊन ते पार पाडून संकल्पबळ वाढविता येते.

व्यक्तिमत्त्वसंवर्धन ही फार महत्त्वाची गोष्ट आहे—व्यक्तीच्या, समाजाच्या आणि आज झपाट्याने बदलणाऱ्या घडीच्या दृष्टीने. हे काम योगायोगावर सोडून देता कामा नये. या कामाचा सशास्त्र विचार होऊ शकतो. आजवर शिक्षणक्षेत्रातील अनेक महत्त्वाचे प्रयोग या दिशेने झाले आहेत. या प्रयोगांचा अनुभव जमेला धरून कार्यक्रम आखणे व पार पाडणे आणि व्यक्तिमत्त्वसंवर्धनाचे काम अधिकाधिक सशास्त्र बनविणे हे काम घडू शकते. पण केव्हा ? जर आपण मनावर घेतले तर !

□ □

# ‘ बिन भिंतीची अपुली शाळा ’

## प्रा. श्री. अ. दाभोलकर

### ज्ञान : विस्तार व वाटप

आज सारे जग एका नव्या शैक्षणिक क्रांतिपर्वाच्या उंबरठ्यावर उभे आहे. चालू शिक्षण पद्धतींना विविध स्तरांवर आज एकसुरी साचेबंदपणा आलेला आहे. विद्येच्या विविध क्षेत्रांत ज्ञान-विज्ञानाची व तंत्रविज्ञानाची आज हरघडी चौफेर वाढ होत आहे. उपलब्ध ज्ञान हे प्रत्येक नव्या क्षणाला दुप्पट होत चालले आहे, असे आज बोलले जाते; परंतु ज्ञानाचा हा अपार, अमृतमय वाढता साठा जनसामान्यांपर्यंत व आपणापैकी प्रत्येकाकडे, पण निखळ शुद्ध स्वरूपात पोहोचत नाही. चालू जगातील शिक्षणव्यवस्थेने या ज्ञान-विज्ञानाच्या मुक्त उपासनेवर व वापरावर अनेकविध बंधने घातली आहेत. आज ज्ञान ही एक ‘ विक्रीची वस्तू ’ बनलेली असून चालू शिक्षणपद्धतीने तिच्या विक्रीची, वितरणाची व वाटपाची बाजारी व्यवस्था उभी केली आहे.

आज समाजातील उपलब्ध ज्ञान-विज्ञानावर, तंत्र-विज्ञानावर व हरघडी प्रगत होणाऱ्या संशोधनावर, आपणापैकी प्रत्येक व्यक्तीस समान हक्क सांगता येत नाही व मुक्त वाटा पण हक्काने मागता येत नाही. ज्ञानाचे आदान-प्रदान, संशोधनाची पात्रता, तंत्रविज्ञानाचा व विविध विद्याशाखांच्या उपासनेचा अधिकार हे आज खास ‘ रक्षित ’ क्षेत्र आहे. ठराविक पूर्वशिक्षणावर, ठराविक वयोगटात असण्यावर, ठराविक अभ्यासक्रम व क्रमिक पुस्तके हाताळण्यावर, ठराविक उपस्थितीची अट पूर्ण करण्यावर, ठराविक कसोट्या विविध परीक्षापद्धतीने पार करण्यावर व विविध शिफारसपत्रे, पदवीपात्रता आदी सर्टिफिकिटे संपादित करण्यावर विद्येच्या विविध क्षेत्रांतील विद्यासंपादनाचे व वापराचे स्वातंत्र्य ठरविले जात असते.

### ज्ञानक्षेत्रातील नवे पाखंड

आज वैद्यकशास्त्र, स्थापत्यशास्त्र, शिल्पशास्त्र, उच्च रसायनशास्त्र, कृषिविद्या, विमानविद्या यांसारख्या उच्च ज्ञानशाखांतील प्रवेशाची दारे या शाखांच्या प्रवेशपूर्व परीक्षेत ७८ ते ८० टक्के मार्क मिळवणाऱ्या जिद्दीच्या व हुशारातील हुशार ठरलेल्या विद्यार्थ्यांना-देखील कायमची बंद ठरू लागली आहेत. याउलट पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक स्तरावर चाकोरीबद्ध अभ्यास व परीक्षापद्धती यांच्या जोरावर वर्गनिहाय कत्तल करीत,

नव्या पिढीतील मुक्त ज्ञानसंपादनाची उभारीच नष्ट केली जात आहे. या रीतीने अगदी बालवयातच त्यांना जीवनाच्या अनेक क्षेत्रांत डोकावण्यास बंदी घालून त्यांच्या जीवनाचा कायमचा चोळामोळा करून टाकला जातो. आज अशिक्षित, अर्धशिक्षित, शिक्षित, प्रशिक्षित, तज्ज्ञ, अज्ञ, या अनेक तऱ्हेच्या नव्या जातींचे व भेदाभेदांचे पाखंड, ज्ञान-संपादनाच्या पात्रतेचे कृत्रिम थोतांड उभे करून, आपण निर्माण केले आहे. यामुळे समाजजीवनाच्या उभ्या आडव्या चिरफळ्या पडल्या आहेत. अशा रीतीने समाज-जीवनात विशुद्ध स्वरूपाच्या ज्ञानाचा व विद्येचा प्रवाह खळखळता न राहता, त्याची ठिकठिकाणी तुंबलेली व संबंधित विद्येच्या क्षेत्रांतील तथाकथित अधिकारी व्यक्तींच्या स्वार्थाच्या शेवाळाने बुजबुजलेली डबकी बनली आहेत.

## नवे शैक्षणिक क्रांतिपर्व

वर पाहिल्याप्रमाणे चालू शिक्षणव्यवस्था ही मानवातील उभारी नष्ट करणारी, व्यक्तीची अस्मिता व आविष्कार यांना पायबंद घालणारी, दडपणारी व क्षीण करणारी, तसेच मानवामानवांत कृत्रिम भेदाभेद व पात्रापात्रतेचा दंडक निर्माण करून विविध. आर्थिक व सामाजिक अन्याय्य परंपरांची जपणूक करणारी अशी बनली आहे. या बांधिलकीविरुद्ध व बंदिस्तपणाविरुद्ध, तसेच कोणतेही ज्ञान व कौशल्य प्राप्त करून घेण्याच्या नैसर्गिक हक्कापासून मानवाला वंचित ठेवणाऱ्या या अन्याय्य व्यवस्थेविरुद्ध जागतिक क्षेत्रातील बंडखोर विचारवंतांनी व शिक्षणतज्ज्ञांनी आज प्रभावी आवाज उठवला आहे. व यातून एका नव्या शैक्षणिक क्रांतिपर्वाची मुहूर्तमेढ रोवली गेली आहे.

## नवा उद्घोष

शालेय व शैक्षणिक व्यवस्थेतील चालू कृत्रिम भिंती जमीनदोस्त करून, मुक्त-विद्या, मुक्त विद्यापीठे, अनौपचारिक शिक्षण या व यासारख्या कार्यपद्धतीने ज्ञान-प्राप्तीची सर्व बंदिस्त कवाडे सर्वांसाठी खुली करणे या नव्या शैक्षणिक क्रांतीचे सर्व-प्रथम साध्य करावयाचे ध्येयधोरण आहे. समाजातील कोणत्याही लहानथोर व्यक्तीला तिला वाटेल त्या ज्ञानशाखेत, तिला तिच्या जीवनातील प्रगतीला व मुक्त आविष्काराला, उपयुक्त वाटेल अशा स्वरूपात, तिला वाटेल त्या क्षणी व घरपोच ज्ञान संपादन करण्याचा, परस्परांना देण्या-घेण्याचा व सर्वांच्या हितासाठी व फायद्यासाठी नव्या स्वरूपाचे गुंत-वणूक भांडवल म्हणून वापरण्याचा; अनिर्बंध अधिकार मिळाला पाहिजे; हा या नव्या शैक्षणिक क्रांतीचा उद्घोष आहे. अशा रीतीने मुक्तपणे वाटचाल करीत, ज्ञान-विज्ञान संपादन करीत व प्रयोग यशातून ते प्रमाणित करीत मुक्तपणे सार्वत्रिक करणाऱ्या व ते ज्ञानच गुंतवणूक भांडवल म्हणून वापरणाऱ्या अनेक यशस्वी कार्यप्रयोगयंत्रणा आज

उदयाला येत आहेत. आपले सत्त्व व स्वातंत्र्य जोपासणाऱ्या व नवे आर्थिक यश संपादन करणाऱ्या या ‘ प्रयोग परिवार गटांचा ’ अभ्यास व त्यांच्या मर्यादांचे व यशापयशाचे मूल्यमापन ( अशा ‘ मुक्त विद्यापीठाच्या ’ भावी वाटचालीची दिशा ठरवण्याच्या नावे ) आज विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांकडून व विचारवंतांकडून चालू आहे. सुदैवाने आपल्या महाराष्ट्रातही कळत नकळत या दिशेने व दृष्टीने प्रयोगबुद्धीने धडपडणारे व अनेक अंगांनी यशस्वी ठरलेले अनेक स्वाश्रयी, स्वायत्त सहयोगी गट विकसित झालेले आहेत. त्यांच्या या रचनेचे, स्वयंभूत्वाचे व वैशिष्ट्यांचे चिकित्सकपणे मूल्यमापन करण्याने उद्याच्या पायाशुद्ध, मुक्त शिक्षणपद्धतीचे स्वरूप कोणत्या रीतीने विकसित होऊ शकेल त्याची दिशा बरीच स्पष्ट होऊ शकते.

## ‘ एका धवल क्रांतीची प्रयोगगाथा ’

‘ चुये दूध उत्पादन प्रयोग ’ म्हणून एक यशस्वी दूध उत्पादन प्रयोग आज चुये या हजारएक वस्तीच्या गावी उभा आहे. आज या गावातून वर्षाला पाच लाख रुपये किमतीचे दूध कोल्हापूरला पाठवले जाते. कोल्हापूर-गारगोटी रस्त्यावर, कोल्हापूरपासून सुमारे १२ मैलांवरील एका फाट्यावर हे गाव येते. कोणत्याही पुस्तकी व पढीक, दुग्ध-उत्पादन व्यवसाय अभ्यासक्रमाची पदवी न घेतलेले व आता त्या क्षेत्रातीत तज्ज्ञ म्हणून शिक्कामोर्तब असलेल्या व्यक्तींशी अधिकाराने व बरोबरीच्या नात्याने प्रतिवाद करणारे असे हे एक समर्थ यशस्वी दुग्ध उत्पादक प्रयोग कुल आहे. आज या प्रयोगकुलात सर्व थरांतील, सर्व उच्चनीच ( आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक ) दर्जांतील, सर्व वयांतील व्यक्ती सामावलेल्या आहेत. त्यांत ग्रॅज्युएट, डबल ग्रॅज्युएटही आहेत—की ज्यांनी नोकरी करण्याऐवजी स्वतंत्रपणे या व्यवसायाचीच नवी यशस्वी प्रयोगदीक्षा घेणे पसंत केलेले आहे. त्यांच्याच बरोबरीने त्यात अनेक अल्पशिक्षित, अशिक्षित तरुण पण आहेत. व काही छोटे काही मोठे शेतकरी पण आहेत. सामाजिक, आर्थिक व इतर दृष्ट्या दुर्बल घटकांतील हरिजन आदी व अगदी तळचे शेतमजूर वा चतुर्थ श्रेणीतील घटक पण यांत आहेत. एका सार्थ अर्थाने ही एक ‘ बिनभिंतीची दुग्ध विज्ञान प्रयोग शाळा ’च आहे. आपल्या गावाबरोबर जवळपासच्या व दूरच्या दूध उत्पादक क्षेत्रातील धडपड्या प्रयोग-वीरांनाही या प्रयोग कुलातून वेळोवेळी मुक्त व युक्त मार्गदर्शन मिळत असते. दुग्ध-व्यवसायातील बारकावे समजून घेणारे, समजणारे व समजून देणारे या प्रयोग साहसात बरोबरीच्या नात्याने गुरफटलेले आहेत. आज तेथील बहुतेक घरांत सहा हजार ते दहा-बारा हजार रुपये किमतीच्या जर्सी गायी आहेत व त्याचबरोबर विलायती जातीच्या गायी याही येथील भारतीय ग्रामीण परिस्थितीत व जीवनपद्धतीत समरस होऊन रुळलेल्या आहेत. ज्यावेळी, अगदी सुरुवातीस स्वतःच्या हिमतीवर व प्रयोगयशावर विसंबून येथील धडाडीच्या काही प्रयोगवीरांनी बेंगलोरहून या जातीच्या गाई आणल्या होत्या, तेव्हा

त्यांच्या या प्रयोग यशाचे व साहसाचे रहस्य माहीत नसलेल्या विकास व दुग्धविज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींनी ‘ तुम्ही विलायती अमेरिकन गाई आणल्या. पण अमेरिकन पद्धतीचे गोठे बांधलेले नाहीत. त्यामुळे थायलेरस आदी भयंकर रोगाने हे साहस अंगाशी येणार ’ अशी उग्रड धास्ती निर्माण केली होती. भारतीय ग्रामीण परिस्थितीत विलायती गायी पाळून यशस्वी करताना डोळे मिटून पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करण्याऐवजी आपल्या परिसराला युक्त व उपकारक असे गोपालनाबाबतचे ‘ आपले विज्ञान ’ प्रमाणित करता येते व केले पाहिजे ही प्रयोगदृष्टी व विचारसरणी चालू शिक्षणपद्धतीतून तज्ज्ञतेचा शिक्कामोर्तब घेऊन बाहेर पडलेल्या त्या अधिकारी तज्ज्ञ वर्गाला आलेली नव्हती. खऱ्या प्रगतीसाठी विज्ञानाची खोटी दहशत, खोटा दबदबा नाहीसा करीत त्या विज्ञानाचे ( Demystification ) प्राकृतिकरण करीत ते घरपोच उपकारी स्वरूपात पोहोचू शकते, असे दाखवणारी शिक्षणपद्धतीच हे कार्य यशस्वी करू शकेल.

## प्रयोग हीच पाठशाळा

चुये येथील या धवल क्रांतीचे व या प्रयोग कार्यकुलाचे अध्वर्यू आहेत पन्नाशीस पोहोचलेले श्री. माधवराव दळवी. सर्वोदयी कार्यपद्धतीची पकड असलेले, आध्यात्मिक व सात्त्विक प्रवृत्तीचे व ऐन तरुण वयात, तीस वर्षांपूर्वी, आचार्यकुलाचे चालू संयोजक श्री मामा क्षीरसागर, तत्त्वचिंतक कार्यकर्ते भाऊ धर्माधिकारी यांच्या संस्कार तालमीत पिंड पोसलेले, असे हे माधवराव दळवी आज या प्रयोगकुलात सर्वांचे ‘ दळवी मास्तर ’ बनलेले आहेत. कोणतेही खास शालेय शैक्षणिक सर्टिफिकेट गाठी नसताना त्यांनी हे यश मिळवले आहे. कोंबडी पालन, ऊस उत्पादन, म्हशी पाळून दुग्ध उत्पादन, इत्यादी अनेक क्षेत्रांत जिद्दीने धडपडत व अनुभव गाठी बांधत ते चुये या गावी राहत आहेत आणि गेली तीस वर्षे नवरचनेची स्वप्ने प्रत्यक्षात उतरवण्याची खटपट करीत आहेत. परक्या ठिकाणी, परक्या लोकांत या त्यांच्या धडपडीच्या यशापयशाची पाळेमुळे हळूहळू दृढ होत होती व त्यांचा या क्षेत्रातील अधिकार पण या ग्रामीण समाजात मानला जाऊ लागला होता. अशा परिस्थितीत सुमारे दहा वर्षांपूर्वी १९६८–६९ मध्ये दूध न देणारी, भाकड ठरवली गेलेली, नीट चार पावलेदेखील टाकता न येणारी अशी थकलेली एक गीर जातीची गाय त्यांना एका मित्राकडून भेट म्हणून मिळाली. ही भेट आपल्या नव्या प्रयोगाचे एक आव्हान म्हणूनच श्री माधवराव यांनी स्वीकारली. अखेर त्या गायीला सुधारून, गाभ घालून तिच्यापासून यशस्वीपणे भरपूर दूध मिळवण्यात ते यशस्वी झाले. या प्रयोगयशातून दुधाळ गाईच्या व दुधाळ म्हशीच्यातील अन्न खाण्याच्या व दूध देण्याच्या शक्तीतील तफावत त्यांच्या एकदम लक्षात आली. व त्यातूनच नवे प्रायोगिक साहस स्वीकारीत त्यांनी विलायती गाई पाळण्याचे नवे तंत्र, त्यांनी स्वत:चे आडाखे, शास्त्र व अनुभव यांतून हस्तगत केले. आपल्या प्राप्त परिस्थितीतील, ग्रामीण परिसरातील वास्तव मर्यादांच्या निकषावर, कसोटीला उतरलेले, प्रत्यक्ष प्रयोग–अनुभवाच्या मुशीतून

ओतून शुद्ध केलेले व युक्त कार्यकारणभावाच्या ऐरणीवर ठोकून घडवलेले असे हे गोपालनाचे एक नवे तंत्रविज्ञान चुये या गावी यामुळे उभे राहिले व विलायती गोपालनाचा एक नवा अभ्यासक्रम, नवा दृष्टिकोन, नवी प्रयोगधारा या भारतातील ग्रामीण परिसराला धरून साकार झाली.

## वैज्ञानिक साहस

खऱ्या ज्ञानाचे, प्रयोगयशाचे, मुख्य गमक म्हणजे ते व्यक्ती-व्यक्तीतील साहसी प्रवृत्तीला साद घालते, त्याची अस्मिता जागवते व त्याच्या निर्णयशक्तीला नव्या विधायक यशःसिद्धीसाठी प्रवृत्त करते. चुये येथील दुग्ध उत्पादनातील व्यक्तींना श्री. माधवराव यांच्या या प्रयोगयशाचे मर्म लगेच आत्मसात झाले. मुऱ्हा म्हशी पाळून दुग्ध उत्पादन करीत राहण्याऐवजी विलायती गोपालनाचे नवे साहस झेलून आपले दुग्ध उत्पादनाचे तंत्र बदलून टाकणे इष्ट आहे, हे त्या गावच्या उत्साही दुग्ध उत्पादकांना लगेच ध्यानात आले. अशा खात्रीच्या विलायती गाई पुरेशा संख्येने कोठे मिळतील याचा त्यांना तेव्हा काहीच अंदाज नव्हता. ज्ञानवापराच्या अशा व्यावसायिक साहसाच्या क्षणी जर कोणत्या गोष्टी मोलाच्या ठरत असतील, तर त्या ‘ संपूर्ण विश्वासार्हता ’ धोक्यापासून संरक्षण ( assurance and insurance ) व धडपड्यांना सावरा व यशस्वी करा. ( Amature must be protected ) ही परिवार वृत्ती. सुदैवाने अशाच परिवारवृत्तीचा लाभ या प्रयोगकुलाला होण्याचा योग प्रसंगोपात्त होणाऱ्या प्रयोगयश परिचय चर्चेतून मिळाला. १९७२ च्या सुमारास कणकवलीजवळील पू. अप्पासाहेब पटवर्धनांच्या गोपुरी येथे श्री. कोरगावकर ट्रस्टच्या वतीने एक परिवार संमेलन आयोजित केले होते. या परिसंवादास माधवराव दळवी, मामा क्षीरसागर, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, बाबा आमटे व इतर अनेक भिन्नभिन्न थरातील व्यक्ती, या ट्रस्ट परिवारातील व्यक्ती म्हणून हजर होत्या. तेथे माधवरावांनी आपल्या प्रयोगयशाचे सूत्र मांडले होते व अण्णासाहेब सहस्रबुद्ध्यांनी त्यांना खात्रीच्या विलायती गाई योग्य किंमतीत, त्यांच्या भावी प्रयोगविस्तारासाठी मिळवून देण्याची जबाबदारी आनंदाने स्वीकारली होती. नव्या शिक्षणपद्धतीचे स्वरूप ठरवताना व अशा शिक्षणातून पायाशुद्ध सार्वत्रिक आर्थिक विकासाची पायाभरणी करताना, भिन्नभिन्न पातळींवरील व कार्यक्षेत्रातील कार्यघटक एखाद्या गोफाप्रमाणे ( Network ) निरनिराळ्या धाग्यांच्या विणीतून कसे जोडावे लागतात व एखाद्या विद्युन्मंडळपूर्तीसारखा नवा विधायक कार्यप्रवाह त्यातून कसा उभा राहतो, त्याचा तपशील यावरील काही नोंदीतून लक्षात येऊ शकेल.

## स्वायत्त सहयोग व समसहबंध

कोणत्याही कार्यविस्ताराचे नव्या स्वरूपाचे संघटन हे शक्य तितके विकेंद्रित, आवश्यक तेवढेच केंद्रित व शिका, शिकवतो, शिकतो– याऐवजी अध्यापन हेच नित्य

नवे अध्ययन ठरणारे व बरोबरीच्या नात्याने मुक्त सहयोग ( Sharing ) देणारे, तसेच मुक्त समसहबंध ( Collaboration ) वाढवणारे असले तरच व्यक्तीच्या स्वायत्ततेची व स्वातंत्र्याची गळचेपी न होता कार्य करणे शक्य होते. चुये येथील प्रयोगविस्तारात ही नवी कार्यसंघटनदिशा प्रभावी होत आहे. प्रस्थापितातील व्यवस्था, तज्ज्ञ इत्यादींचा युक्त तो आदर व मान राखला जाईल; पण बँक कर्जे, जनावरांना योग्य काळात पुन्हा गाभ घडवण्याचा प्रश्न, जनावर गाभ गेलेले आहे किंवा नाही याची तपासणी, जनावरांना दूध ताप येऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी, जनावरांच्या आहारात परिस्थितीप्रमाणे करावयाचे बदल, यांसारख्या गोष्टींत शक्य तितके कमी परावलंबित्व राहील, हे सावधपणे पाहिले जाते. अंतर्गत युवक संघटना बनवून युवकांच्या मोकळ्या कार्यशक्तीचा नवे रोख भांडवली बळ म्हणून निर्माण करण्यासाठी उपयोग करणे काही नवी आर्थिक शक्ती परत आपल्याच परिवारातील दुर्बल घटकांस उपलब्ध करून देऊन त्याला सबळ करणे हे आणि यासारखे प्रयत्न या कुलात आज जाणीवपूर्वक जोपासले जात आहेत. तसेच एखाद्या गाईच्या जोपासनेत येणारी प्रश्नचिन्हे नवी आव्हाने म्हणून झेलून सोडवण्यात येत आहेत. विलायती गाईंना गाभ घालताना व त्यांच्या वाफेचा काल ठरवताना बरीच अडचण ग्रामीण पातळीवर सोसावी लागते. यासाठी युक्त ठरणारा गर्भाधानाचा काल हा फक्त सहा तासांचा असतो. अशा परिस्थितीत सरकारी कार्ययंत्रणेतर्फे असे एखादेच गर्भाधान करणारे देण्यात येणारे इंजेक्शन तांत्रिकदृष्ट्या सफल होऊ शकत नाही तेव्हा त्याच दिवशी किमान तीन वेळा अशी व्यवस्था सरकारी यंत्रणेद्वारे वा जरूर तर स्थानिक परिस्थितीत एखादा अस्सल जातीचा बैल पाळून करणे हितकारक ठरावे, असे नवे निरीक्षण प्रमाणित करीत आणले आहे. अशा रीतीने जनावर योग्य रीतीने वाफेवर येण्यासाठी त्याच्या खुराकात, पण योग्य तो बदल, चढउतार करून करावा लागतो ते पण अभ्यासले आहे.

## एक नवी अस्मिताजागृती

अशा रीतीने नवीन स्वरूपाचा हा दूधव्यवसाय किफायतशीर होऊ शकतो हे हे लक्षात आल्यावर या कुलाच्या पावलावर पाऊल टाकीत, ' उपलब्ध विज्ञान ' हे ' आपले विज्ञान ' बनवीत व त्याची वाढती गुंतवणूक करीत धडपडणारे धडाडीचे प्रयोगवीर ठिकठिकाणी नव्या संकल्पना व रचना घेऊन उभे राहू लागले.

अशाच रीतीने फिजिक्स विषय घेऊन बी. एस्सी पदवीधर झालेले गारगोटीचे प्रभाकर भागवत यांनी, विलायती गोपालन हा आपला नवा प्रयोगयशावर आधारित व्यवसाय बनवला; या दूधउत्पादनाचे विवरण करताना लहान शेतकरी बरोबर घेऊन सोसायटीचे नवे आदर्श निर्माण केले; अल्पभूधारक गटाला फक्त चार टक्के दराने मिळणारे व्याज उपलब्ध करून दिले; आणि आपली ' पत ' व आपले पाठबळ बँक

हमी नावे निर्माण करून एका नव्याच जाणिवेचे व अस्मितेचे शैक्षणिक प्रबोधन याच प्रयोगाच्या विस्तारयशाला सार्वत्रिक करीत प्रमाणित केले. सोसायटीला कमीतकमी नफा, उत्पादकाला जास्तीत जास्त दर, तसेच स्थिर पत व हमी व्यवस्था यामुळे या सोसायटीच्या कार्यक्षेत्राबाहेरील दूध उत्पादकदेखील आपण होऊन आपले 'उत्पादित वस्तूंचे' विक्री स्वातंत्र्य, प्रसंगी अशा बाबतच्या शासकीय नियमांच्या कृत्रिम बंधनाना यशस्वी तोंड देऊन बजावू लागले. थोडक्यात एका क्षेत्रातील कार्ययशाने जे नवे शैक्षणिक साहस जागृत झाले, त्यातून आपल्या हक्कांबाबत जास्त जागरूक राहणारा एक नवा घटक समाजाच्या दुर्बल घटकांतून उभा राहू लागला. कोणत्याही उपयुक्त व फायदेशीर ज्ञानाचे व विज्ञानाचे आकलन व वापर करण्याचे बळ, समाजातील घटकांस येऊ लागले की, त्या परिस्थितीत इतर बांधिलकीवर व ताण-तणावावर मात करीत त्या परिस्थितीत हितकारक असा बदल करण्याची व प्रसंगी संघर्ष करून आपली स्वायत्तता, आपले स्वातंत्र्य, आपले सत्त्व यांचे रक्षण करीत परिस्थितीला वळण लावण्याची धमक अशा घटकांत निर्माण होत असते.

## अभंग परिवारभावना

खऱ्या शैक्षणिक परिवर्तनाचे एक प्रमुख उद्दिष्ट हे मानवातील सहयोग, बंधुभाव यांत वाढ व्हावी हे असते. अशा रीतीने प्रायोगिक साहसातून आत्मसात केलेल्या यशाने स्थिर होत जाणारी प्रयोगकुले, ही त्या साहसात नव्याने येणाऱ्या व्यक्तींना एकाच परिवारातील एक नवी व्यक्ती या दृष्टीने अगत्याने समाविष्ट करून घेत असतात. कारण त्या व्यक्तीच्या वाढीत व अडीअडचणीत मदत करताना या सर्वांना आपल्या सुरुवातीच्या धडपडीचा पुनःप्रत्ययी आनंद मिळत असतो. व भिन्न भिन्न परिस्थितीतील नवनवी आव्हाने पण लक्षात आल्याने त्यांना सामोरे जात ती आव्हाने आपल्या ज्ञानविज्ञानाच्या नव्या आविष्काराने सोडवण्याचा आनंद मिळत असतो. अशा रीतीने प्रयोग हीच पाठशाळा व प्रचीती हीच परीक्षा या तत्त्वाने यशस्वीपणे दूध उत्पादनक्षेत्रात मजल दर मजल करीत आगेकूच करणाऱ्या या गटात आज काही दिवस ठरवून, ठिकठिकाणच्या, नव्याने या व्यवसायात येणाऱ्या चाळीसवर तरुण युवक व इतर व्यक्तींस घरटी दोनचार दिवस ठेवून घेऊन, आपले ज्ञान त्यांना मुक्तपणे अनुभवू देतात. तसेच गाईच्या सडातून धार कमीअधिक येणे, जनावरास ताप येणे, या सारखे निरीक्षणाचे बारकावे पण लक्षात आणून दिले जातात. या उलट उन्हाळ्यात जनावरासाठी सुलभ चारा मिळवण्यासाठी काही झाडपाला सर्वांच्या सहकार्याने कसा वाढवता येईल वा जनावरांचे खुराकाचे अन्न योग्य खर्चात स्वतःच्या मर्यादित व स्थानिक परिस्थितीत कसे बसवता येईल, याबाबतचे बाजारावरील आपले परावलंबित्व कसे कमी करता येईल, याचे पण एकत्रित चिंतन व संशोधन सुरू होते. थोडक्यात, या परिवारभावनेच्या बळावर अनेक अडचणींना व प्रसंगी साहसाला बिनदिक्कत सामोरे जाता येते. प्रसंगी प्रयोगातील अपयशाने खचून न

जाता, दुप्पट उमेदीने त्याची कार्यकारणमीमांसा करीत आपल्याला साधनसामग्रीत यशस्वी ठरेल व योग्य पडताळा देईल असे उत्तर शोधता येते.

## ' भाङ् रे भाङ्, भाङ् ही कारा । '

चुयाच्या प्रयोगातील तपशीलांची व "असीमित नवशिक्षण " ( open education ) विषयक कार्यकल्पनेची सविस्तर चर्चा या छोट्या लेखात करता येणे कठीण आहे; परंतु पारंपारिक शिक्षणव्यवस्थेच्या व विचारांच्या चाकोरीबाहेर पाऊल ठेवून, अखेर प्राचीनकालीन एकवलव्याचा आदर्श ठेवून, मुक्तमनाने हा प्रयोगबुद्धीने विद्येची उपासना करणारा एक नव्या स्वरूपाचा विद्याधारक समाज, ( ज्ञान-विज्ञानाशी समतेचे, सलगीचे नाते निर्माण करण्याची संधी उपलब्ध झाली तर ) अल्पशिक्षित म्हणणाऱ्या समाजातून स्वयंभू ताकदीनेच उभा राहतो व नव्या स्वरूपाचे आर्थिक परिवर्तन व जीवनातील विविध क्षेत्रातील अस्मिताजागृतीचे कार्य पण पार पाडू शकतो, असे या दाखल्यावरून दिसून येईल. आजच्या शिक्षणपद्धतीने अशा रीतीने प्राप्त परिस्थितीवर व प्रस्थापितातील बांधिलकीवर साहसी मात करण्याचे सामर्थ्य येत नसते ते या स्वरूपाच्या नव्या शिक्षणपद्धतीने खचित आणाता यावे. ' चित्त जिथे भीतिशून्य उंच जिथे माथा । ज्ञान जिथे मुक्त तिथे जागृत करि नाथा ॥ ' ही हाक कवींद्र रवींद्रांनी एके ठिकाणी दिलेली आहे. तसेच स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला साक्षात्कारी प्रतिभेचा व जीवनमूल्याचा स्पर्श होण्याच्या क्षणाचे पण **' भाङ्, रे भाङ् भा ङ् ही कारा । '** अशी **' निर्झरेर स्वप्न भंग् '** मध्ये वेधक वर्णन करताना ते आढळतात. मानवातील सर्जनशील प्रेरणा व साहसी वृत्ती खऱ्या अर्थाने उचंबळून कार्यप्रवण व्हावयाच्या असतील तर, चालू शिक्षणव्यवस्थेतील सर्व कृत्रिम भिंती जमीनदोस्त करूनच हे नवे शैक्षणिक परिवर्तन ' बिनभिंतीची अपुली शाळा ' अशा रीतीने उभे करता आले पाहिजे.

## युनेस्कोच्या शैक्षणिक आयोगातील इतिवृत्त

युनेस्कोच्या शैक्षणिक आयोगातील १९७२ मध्ये संपादित केलेल्या, ' शैक्षणिक विश्व आज व उद्या, या विस्तृत अहवालातील ' शिक्षण व मानवाचे भवितव्य : ' या उपोद्घाताच्या इतिवृत्तांत या आयोगाचे कार्याध्यक्ष एडगर फॉर यानी खऱ्या शिक्षणाचे उद्दिष्ट हे खालीलप्रमाणे ग्रथित केले आहे.

( अ ) माणसाला आपले सत्त्व प्राप्त करून घेता यावे व त्यास जीवनात सिद्धी मिळावी.

( ब ) एक व्यवसाय सोडून दुसरा व्यवसाय अवलंबणे शक्य व्हावे अशा सुविधा मिळाव्या.

(क) व्यक्तीच्या स्वयंशिक्षित, प्रशिक्षित व पूर्ण शिक्षित होण्याच्या इच्छेला वाव व सहयोग मिळावा.

(ड) तरुण व प्रौढ व्यक्तीला आयुष्यभर करावयाच्या व्यवसायासाठी तयार करावे, हे उद्दिष्ट नसावे.

व शिक्षण हा शुद्ध स्वतंत्र ( राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक तत्त्वावर अवलंबून नसलेला ) घटक व्हावा.

'बिनभिंतीची अपुली शाळा' या प्रस्तुत लेखात व्यक्त केलेल्या शैक्षणिक दृष्टिकोनाशी व दाखल्याशी या आयोगाच्या इतिवृत्तातील विचारांचे फार जवळचे साम्य आहे, हे जाणकारांच्या आता लक्षात येईल.

☐ ☐

# विज्ञानरुची वर्धन

## मधुकर ना. गोगटे

### जिज्ञासावृत्ती

अचानकपणे एखादा मित्र भेटला तर आपण म्हणतो 'कसे काय?' आणि त्यानंतरचा आपला संवाद बरेचदा उथळ प्रकारचा असतो. संवादाची सुरुवात 'कसे?' 'काय?' या जिज्ञासादर्शक प्रश्नांनी म्हणजे जणू काही वैज्ञानिक दृष्टिकोनाने होते; पण संवादाला विज्ञानाचा रंग चढत नाही. यातून नकळत आपली मनोवृत्ती प्रकट होत असते. आपल्या समाजाला वैज्ञानिक दृष्टिकोनाचे एकंदरीत वावडे आहे. तसा दृष्टिकोन असायला पाहिजे, ही आपली दर्शनी घोषणा असते; पण ती घोषणा मूर्त व्हावी म्हणून आपण फारसे कष्ट घेत नाही. इतकेच नव्हे, तर जे लोक असे कष्ट घेतात त्यांचा समाजाकडून उपहास होत असतो.

एखादी अभिनेत्री प्रत्येक सिनेमासाठी किती लाख रुपये घेते याची आपण चवदारपणे चर्चा करतो. क्रिकेटचा मोठा सामना चालू असताना कामधंदा सोडून, रेडिओला कान लावून काळजीपूर्वक 'चेंडू ते चेंडू' धावते समालोचन आपण ऐकत असतो. चमत्कार करणाऱ्या बाबाच्या आपण भजनी लागतो. राजकारणी मंडळींच्या कोलांट्या उड्यांची वर्णने वर्तमानपत्रांतून रकानेच्या रकाने येतात व त्यांचे समग्र वाचन केले जाते. याउलट शेअरबाजारातील उलाढालींसारखे आर्थिक प्रश्न व समुद्रातून तेल-वाहिनी नळाची रचना करताना अभियंत्यांनी काय काय केले, असले वैज्ञानिक प्रश्न यांच्यांत आपण जवळजवळ काहीच रस घेत नाही.

### जिज्ञासा विज्ञानाविषयी हवी

समाजाला विज्ञानाविषयी इतकी आपुलकी वाटत नाही हे तसे पाहिले तर अस्वाभाविक नाही. करमणुकीचे व श्रद्धेचे जे विषय असतात त्यांच्याकडे समाजाचे मन सहजपणे धावत असते. विज्ञानाची चर्चा करणे म्हणजे कसे, काय, का वगैरे प्रश्न विचारून कार्यकारणभाव समजून घेणे होय. येथे बुद्धीला शीण पडू शकतो. म्हणून समाजाला विज्ञानाची गोडी वाटत नाही. विज्ञानाची कित्येक साधने—खते, आगगाड्या, पंखे, रेडिओ इत्यादी—आपण वापरतो; पण त्यांची वैज्ञानिक उपपत्ती समजून घेण्याची आपणास आस्था वाटत नाही. याची कारणे दोन आहेत : पहिले कारण म्हणजे विज्ञान

हा हलकाफुलका विषय नाही आणि वर सांगितल्याप्रमाणे विज्ञानाचा अभ्यास हा बुद्धीला ताण देणारा खचित आहे. दुसरे कारण म्हणजे बरेचदा विज्ञानाची मांडणी निष्कारण कठीणपणे करण्यात येते व सामान्य मनुष्य विज्ञानाला बिचकतो. उदाहरणार्थ, २ रुपयांना ४ आंबे मिळतात तर १० रुपयांना किती आंबे मिळतील, असे सोपे गणित विचारले, जीवनाशी त्याचा संबंध लावला, तर त्या गणितात सामान्य मनुष्य रस घेतो व त्रैराशिक पद्धती समजून घेतो. याउलट २ रुपये १५ पैशांना ३४२ ग्रॅम मिश्रधातू मिळतो तर १० रुपयांना तो किती मिळेल, असे किचकट अपूर्णांक आणणारे, रुक्ष उदाहरण गणिताविषयी आस्था वाढवत नाही.

समाजात जिज्ञासावृत्ती वाढवायची असली तर, शक्य तितक्या रसाळपणे विज्ञान सामान्यजनांपर्यंत पोचवले पाहिजे. आपल्याकडे अशा प्रकारचे पण निराळे कार्य इतिहासकालात साधुसंतांनी तत्त्वज्ञानाच्या बाबतीत केले. गहन तत्त्वज्ञान, निराकार परब्रह्म याऐवजी सगुण उपासना, सहज तोंडात बसतील असे अभंग – ओव्या – श्लोक यांच्या द्वारा समाजाला काही प्रमाणात त्यांनी परमार्थाची गोडी लावली. सत्कार्याचे कित्येकदा विकृतीत पर्यवसान होते. विज्ञानसंशोधनाचा उपयोग भीषण मनुष्यसंहारासाठी केला जातो, त्याप्रमाणे परमार्थदृष्टी विकृत होऊन बुवाबाजी, दैववाद यांचे थैमान चालू होते; पण हा भाग वेगळा आहे. मूळ बोध असा आहे की, लोकांच्या भाषेत, लोकांपर्यंत सहजपणे पोचेल अशा रीतीने तत्त्वज्ञानाची रचना केली तर तत्त्वज्ञानाची रुची समाजात निर्माण होते. हे उदाहरण बोलके आहे.

## शासनाचे कर्तव्य

वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करण्यासाठी व्याख्याने, प्रदर्शने, कारखान्यांना सहली, चित्रपट अशी अनेक माध्यमे वापरायला हवीत. यांतून प्रभावीपणे दर्शन, श्रवण साध्य होते हे खरे; पण कोणताही विषय आत्मसात व्हायला मनन आवश्यक असते. त्यासाठी लोकांना समजेल अशा भाषेत लिहिलेली सचित्र पुस्तके आवश्यक आहेत. काही प्रमाणात लोकाभिमुख विज्ञानसाहित्य आपणाकडे निर्माण होत आहे हे खरे; पण त्याची मागणी अल्प आहे. येथे समाजाची आर्थिक स्थिती ध्यानात घ्यावी लागते. सचित्र कॉमिके प्रकाशित करणाऱ्या एका प्रकाशकाचा अनुभव असा की, इंग्रजी प्रती सहज खपतात, गुजराती प्रतीदेखील सहज खपतात, पण मराठी समाजाची क्रयशक्ती कमी असावी, म्हणून मराठी कॉमिकांना मागणी नाही. अशा प्रकारच्या समस्यांबाबत शासनाने मदतीचा हात पुढे केला पाहिजे. मराठी नाट्यकलेचा उत्कर्ष व्हावा म्हणून शासनाने नाटकांवरील करमणूक कर माफ केला व त्याचा सुपरिणाम झाला. त्याप्रमाणे लोकाभिमुख मराठी विज्ञानसाहित्यासाठी शासनाने मोठी सब्सिडी दिली पाहिजे. समाजाचा उत्कर्ष साधायचा असेल तर, समाजाच्या भाषेत विपुल साहित्य निर्माण व्हायलाच हवे.

## विज्ञानदृष्टीचे नेमके स्वरूप

वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे केवळ जिज्ञासावृत्ती, म्हणजे जाणून घेण्याची आवड, असा नाही. विज्ञानाची तत्त्वे जाणून घेतल्यावर त्यांचा व्यावहारिक उपयोग करणे, हे तंत्रज्ञान म्हणजे उपयोगात आणलेले विज्ञान, असे स्थूलपणाने म्हणता येईल. असा तंत्रज्ञानीय दृष्टिकोनदेखील वैज्ञानिक दृष्टिकोनात अभिप्रेत आहे. असा व्यावहारिक दृष्टिकोन समाजात येऊ लागला, तर श्रद्धांशी काही प्रमाणात मुकाबला करता येतो. उदाहरणार्थ, मराठी भाषेची पारंपरिक अंकप्रणाली आहे. ही अंकप्रणाली व हिंदीची अंकप्रणाली, गुजरातीची अंकप्रणाली यांत थोडे भेद आहेतच. भावनेच्या व श्रद्धेच्या दृष्टीने पाहिले तर आमची मूळ अंकप्रणाली ठेवलीच पाहिजे अशा घोषणा करता येतात; पण नाणी, नोटा, मापनसाधने, टेलिफोन तबकड्या, घड्याळे, फार काय सावे खेळायचे पत्ते, आणि आता सर्वत्र सुळसुळाट झालेले इलेक्ट्रॉनिक कॅलक्युलेटर यांवरची आंतरराष्ट्रीय अंकप्रणाली पाहिली की, आपणास काही विवेक सुचू लागतो, व्यावहारिक भान येते. पाश्चात्त्यांपुढे ही शरणागती नसून आपलीच सोय पाहणे यात अभिप्रेत आहे. आमच्या मूळ अंकप्रणालीत आमची श्रद्धा किती काळ अडकवून ठेवायची ? ते मूळ आकडे व आंतरराष्ट्रीय आकडे यांच्यात गफलती होत असल्यामुळे (उदाहरणार्थ, मराठीतील एकचा आकडा व आंतरराष्ट्रीय नऊचा आकडा समान दिसतात) आपलीच कुचंबणा किती काळ करायची, यावर वैचारिक चक्रे फिरू लागतात. मराठी विज्ञान परिषदेने आंतरराष्ट्रीय अंकप्रणाली सर्व साहित्यासाठी स्वीकारली आहे, याचा निर्देश येथे करावासा वाटतो.

इंग्रजीला जगात व भारतात विशिष्ट स्थान राहणारच आहे. ‘ इंग्रजी हटाओ ’ ऐवजी ‘ मराठी बढाओ ’ अशी आपण करणात्मक भूमिका घ्यावी. विविध साधनांद्वारा मराठीतून विज्ञानप्रसार व्हावा, विशेषतः विपुल प्रमाणात स्वस्त व रसाळ विज्ञानसाहित्य तयार व्हावे म्हणजे हलके हलके समाजाचे प्रबोधन होऊन जिज्ञासावृत्ती व श्रद्धातपासणी वाढू लागतील यात शंका नाही.

◻ ◻

# शेतीविकास आणि शिक्षण

## विलास साळुंखे

### आधुनिक शिक्षणपद्धतीचे अपयश

गेल्या तीस वर्षांत शिक्षणावर होणारा सरकारी खर्च हा राष्ट्रीय पातळीवर रु. २५०० कोटी आहे. संरक्षणानंतर खर्चाचा दुसरा क्रमांक शिक्षणाचा आहे. एवढा खर्च करूनही शिक्षणाचा पाया आपण सुरक्षित घडवू शकलो नाही. या उलट प्रस्थापित शिक्षणाच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाद्वारे सुशिक्षितांचे प्रश्न अधिकच बिकट झाले आहेत. तांत्रिक व व्यावसायीक शिक्षण घेतलेल्या थोड्या वर्गाचा प्रश्न कसा तरी थोड्या फार प्रमाणात सुटला जात आहे; पण बहुतांश सुशिक्षित समाज हा बहुसंख्य ग्रामीण जनतेला दिवसेंदिवस डोईजड होत आहे. आजचे शिक्षण सर्व समाजाला विकासात सामावून घेण्यात अपयशी ठरले आहे. कारण जीवनापासूनच त्याची फारकत झाली आहे.

### शेतीची उपेक्षा

या लेखात प्रामुख्याने शेतीविकासाच्या संदर्भात शिक्षणाची आवश्यकता व त्या बाबतचे काही विचार स्पष्ट करण्याची कल्पना आहे. दुर्दैवाने आज शेतीचे शिक्षण हे प्राथमिक अथवा दुय्यम शाळेत किंवा विश्वविद्यालयात शिक्षणाचे एक मुख्य अंग म्हणून कोठेच दिले जात नाही. विशेषतः ग्रामीण वातावरणात ज्या शैक्षणिक संस्था आहेत त्यांना ह्यात भाग घेण्याची उत्कृष्ट संधी असूनही कोठेही फारसा उपयुक्त प्रयोग केल्याचे दृष्टीला येत नाही. जे काही शेतीचे शिक्षण काही संस्थांमधून, विशेषतः विश्वविद्यालयात, दिले जाते त्या विश्वविद्यालयाच्या आसपासच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा व विद्यालयात दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा संबंध हा नैमित्तिक आहे, हे पाहून शेतीविकासाकडे आपण किती उपेक्षेने पाहतो याची कल्पना येते. 'भारत हा शेती प्रधान देश' असे आपण समजतो; पण शिक्षणाचा आणि शेतीचा संबंध जवळ जवळ नाहीच असे खेदाने म्हणावे लागते. औद्योगिक विकासाशिवाय आपल्या रोजगारीचे प्रश्न सुटणार नाहीत आणि शेतीत तरी पुरेसा रोजगार मिळणार नाही, असे आज सर्वत्र बोलले जाते व वरपासून सर्व नियोजन ह्या विचारावरती आधारित आहे. परिणामी सगळे नियोजनच गोत्यात आले आहे. आणि आता मात्र उद्योगधंद्यात पुरेसा रोजगार निर्माण करता येणार नाही, पण अपेक्षित एवढा रोजगार शेतीत देणे शक्य आहे, असा विचार प्रामुख्याने सहाव्या पंचवार्षिक

योजनेत आखण्यात येत आहे. ह्या उशीरा आलेल्या अनुभवाची मोठी किंमत राष्ट्राला द्यावी लागली आहे. त्याचे कारण टिळक, गांधीजी व इतर थोर नेत्यांचे विचार आपण लक्षात घेतले नाहीत. आधुनिक शास्त्रीय जगात हे विचार तग धरणार नाहीत अशा भ्रामक कल्पना आमच्या बुद्धिजीवी विचारवंतांनी मांडल्या, त्याचा स्वीकार राज्यकर्त्यांनी केला व त्याची शोकांतिका नोकरशाहीने केली. आणि अखेरी सर्व विकास म्हणजे सरकारच करणार, अशा विचाराने समाजात निष्क्रियता मूळ धरत गेली.

## शेती शिक्षणाचा विचार

शिक्षण व शेतीविकास यांच्या मूलभूत कल्पना जोपर्यंत आपण स्पष्ट करू शकणार नाही, त्यांचा स्वीकार कटोरपणे करणार नाही, तोपर्यंत औद्योगिक विकासाकडे निश्चितपणे आपली वाटचाल होऊच शकणार नाही, असे आम्हाला वाटते. विकसित शेतीचे अपत्य म्हणजेच उद्योग असे एका जपानी तत्त्वज्ञाने म्हटले आहे. ह्या विचाराची जाणीव स्वतः करून घेणे व ती समाजाला करवून देण्याचे काम आमचे विचारवंत व शिक्षणतज्ज्ञ करतील का ? कोणत्याही गोष्टीचा विकास करावयाचा म्हणजे अधिक भांडवलाची गरज आहे, असा एक ढोबळ समज आजच्या औद्योगिक विचारसरणीने सर्वजण करून घेतात. आणि त्याचाच अनुकार शिक्षणक्षेत्रात शिक्षणतज्ज्ञ करतात, त्या वेळी परमेश्वराला 'तू आम्हाला राजकीय स्वातंत्र्य दिलेस; पण वैचारिक स्वातंत्र्य केव्हा देणार ?' अशी पृच्छा करावीशी वाटते. भारतातील एक थोर शिक्षणतज्ज्ञ श्री. जे. पी. नाईक यांनी ग्रामगौरवच्या नायगाव येथील प्रकल्पाला भेट दिली असता काही प्रात्यक्षिकांतून आम्ही शिक्षणाविषयी जे विचार संग्रही केले होते त्याच्या आधारे आम्ही श्री. जे. पी. नाईकांना म्हणालो की, 'ग्रामीण शिक्षणावरती सरकारी पैसे मुळीच खर्च न करता खेड्यांची पुनर्रचना चांगल्या शिक्षणाधारे करता येईल !' या मुख्य विचाराचे अधिक स्पष्टीकरण खालील काही उदाहरणाद्वारे आपणाला समजावून घेता येईल. आमच्या कल्पनेप्रमाणे शिक्षक, विद्यार्थी, लोक व खेड्यातील शेती यांचा एकरूपतेनेच विचार झाला पाहिजे. आणि हे सहजतेने करणे शक्य आहे; पण त्याकरिता आम्ही प्रयत्न करीत असलेली कल्पना खेडे हे घटक धरून पाण्याचे नियोजन, त्याचे सामाजिक वाटप व त्याचा किफायतशीर वापर या त्रिसुत्रीत समाविष्ट आहे.

## आजचे खेड्यातील शिक्षण

आजचे खेड्यातील शिक्षण व शेती यांची अवस्था काय आहे, याचा बारकाईने सातत्याने आम्ही गेली पाच वर्षे अभ्यास करीत आहोत. काही काळ तर आम्ही प्राथमिक शाळेतही जाऊन बसत होतो. प्रयोगात उणीव राहू नये म्हणून आम्ही आमच्या मुलांनाही काही वर्षे प्राथमिक शाळेत घातले. शिक्षकांपासून गावातील इतर मंडळींपर्यंत सर्वांनी आम्हाला आमची मुले खेड्यातील प्राथमिक शाळेत घालू नयेत, म्हणून आपुलकीचा सल्ला

दिला; पण मुलांना शाळेत घातल्यामुळे दररोज शाळेच्या कामाच्या ताज्या बातम्या आम्हाला येऊ लागल्या. मुलांना सात तास कोंडवाड्यांत घालण्यापलीकडे आम्ही फारसे काही साध्य केले आहे असे वाटत नाही. दर जून महिन्यात वार्षिक अंदाज भरून दिला जातो. नायगावच्या शाळेत पहिलीच्या वर्गात शंभर मुले आहेत व सातवीच्या वर्गात दहा मुले आहेत. व पटावर एकंदर तीनशे मुले आहेत. प्रत्येक वर्षी हाच अहवाल! हा अहवाल अनेक वर्षे खालपासून वरपर्यंत जातो; पण त्याची जाणीव कोणाला होते का? तीस वर्षांनंतर साक्षरताप्रसाराची मोठी योजना राष्ट्रीय पातळीवर आखली जात आहे व त्याकरिता सहाव्या योजनेत सहाशे कोटी रुपये खर्च होणार आहेत. ही योजना अहवालाच्या अनुभवातून आली नसून, कोट्यवधी रुपये शिक्षणावरती पाण्यात गेल्यानंतर प्रत्यक्षात झालेल्या दुर्दशेतून आलेली आहे, असे आम्हाला वाटते. पर्यायी जर आम्ही अनुभवांतूनच नियोजन करीत आहोत, तर अनुभवांचे शिक्षण का देऊ नये?

## आमचा एक आशादायी प्रयोग

महाराष्ट्राचा एक तृतीयांश भाग हा दुष्काळी आहे; आणि महाराष्ट्राचे एक तृतीयांश लोक येथे राहतात. नायगाव हे दुष्काळी भागात येणाऱ्या सात हजार खेड्यांचे एक प्रतीक आहे. साधारण पाच ते सात टक्के जमीन ह्या भागात ओलीताखाली आहे. त्याचाही मुख्य फायदा मूठभर लोकच घेतात. जिराईत शेतीचे उत्पन्न हे सरासरी ऐंशी रुपये आहे. उत्पन्नाचा वा खर्चाचा हिशेब केला, तर खर्चाचे प्रमाण अधिक अशी स्थिती आहे. अशा ह्या सामाजिक व आर्थिक विषमतेत जखडल्या गेलेल्या व्यवस्थेत आम्ही चाळीस एकराच्या माळरान जमिनीवर जे शेतीचे प्रयोग केले त्याचे निष्कर्ष आशादायी आहेत. ज्या जमिनीत दहा क्विंटल धान्य पिकत नव्हते त्या ठिकाणी तिसऱ्याच वर्षांत दीडशे क्विंटल धान्य उत्पन्न झाले व लवकरच एक-दोन वर्षांत आम्ही तीनशे क्विंटलपर्यंतचे उद्दिष्ट गाठू! या चाळीस एकरांपैकी गायरान चार एकर जमिनीवरती आम्ही तीन हजार झाडे लावली आहेत. गावातील सर्व झाडांची संख्या एकत्र केली तरी ती इतकी होणार नाही. पंधरा माणसे कायमची कामाला लागली आहेत. चाळीस जनावरे या जमिनीवरती पोसली जात आहेत. दोन एकर उन्हाळ्यात, पंधरा एकर खरीपामध्ये व पंचवीस एकर रब्बीमध्ये जमीन संरक्षित पाण्याखाली आणली आहे. ह्या जमिनीला लागूनच शंभर एकर जमिनीतून वाहून जाणाऱ्या पावसाच्या पाण्याची साठवण मातीच्या बंधाऱ्यात केली आहे व त्याच्याच खाली विहीर खोदून उपसा जलसिंचनाने हे पाणी सत्तर फुटांवरती उचलून या जमिनीला पुरविले आहे. जमिनीची धूप थांबविल्यामुळे, त्याचबरोबर वाहून जाणाऱ्या पाण्याची साठवण करून त्या पाण्याचा उपयोग तेथेच केल्यामुळे, आज माळरानही फुललेले दिसते. दुष्काळी भागाच्या शेतीविकासाची गुरु-किल्ली या विचारात आहे. यामुळे शेतीच्या उत्पन्नात अनेक पटीने वाढ करता येणे शक्य झाले आहे व रोजगार निर्मिती उत्पन्नाच्या प्रमाणात वाढू शकते.

## आमच्या प्रयोगाचे फलित

नायगावच्या चार वर्षांच्या प्रयोगाच्या आधारे आम्ही दुष्काळी भागाच्या शेती-विकासाची कुंडली मांडली आणि असे आढळून आले की, गावपातळीवरती पाण्याचे नियोजन केले तर, प्रत्येक कुटुंबाला कमीत कमी अडीच एकर शेतीला पाणी पुरविणे शक्य आहे. व या पाण्यातून प्रत्येक कुटुंबांचे सरासरी शेतीचे उत्पादन हे सहा हजार रुपयेपर्यंत वाढविता येईल. प्रत्येक कुटुंबाचे उत्पादन जर रु. सहा हजार होऊ शकले तर, प्राथमिक शिक्षणाचा खर्च काही प्रमाणात मुलांनी शेतीत केलेल्या कामातून व इतर शेतीच्या उत्पन्नावरती बसविल्या जाणाऱ्या सरकारी करांतून भागविणे शक्य आहे.

आज खेड्यातील एका प्राथमिक शाळेवर सरकारला वर्षाला चाळीस हजार रुपये खर्च करावे लागतात. आजपर्यंतच्या तीस वर्षांतील खर्च एकत्र केला तर, सरासरी आठ लाख रुपये एका खेडयाच्या शिक्षणावर खर्च झाले आहेत. एवढे पैसे शेती विकासा-करिता, मुख्यत्वाने शेतीला लागणाऱ्या पाण्यावर खर्च केले असते व ह्या पाण्याचे वाटप समप्रमाणात केले असते तर, शेतीच्या विकासाला सामूहिक गती मिळाली असती व शिक्षणाच्या खर्चाचा प्रश्नही सुटला असता. तसेच शिक्षणावर वाढता खर्च करण्याची क्षमता समाजव्यवस्थेत निर्माण होऊ शकली असती. आलेला अनुभव लक्षात घेऊन तरी आपण ग्रामीण शिक्षणात काही मूलभूत बदल (काही पुरोगामी यशस्वी प्रयोगातून) करणार आहोत का? ज्यांना हा विचार उत्सुकतेने समजावून घेऊन टीकात्मक छाननी करावयाची असेल त्यांनी नायगावचा प्रयोग प्रत्यक्ष पाहून मगच करावी अशी आमची नम्र विनंती आहे.

## शेतीच्या शिक्षणाला सहयोग

गावपातळीवर पाण्याच्या नियोजनाचे व्यवस्थापन सुरू झाले तर गावातील शाळा ही वेगळी न राहता त्याचा एक भाग होते. मुलांना आठवड्यातून एक दिवस जरी शेतकऱ्याच्या शेतीत अथवा शेतीला पूरक अशा निरनिराळ्या कामात गुंतविले तर, आम्ही वर म्हटल्याप्रमाणे चाळीस टक्के शाळेचा खर्च या कामातून होईल. त्या कामा करिता शाळेला शेतजमिनीची आवश्यकता नाही अथवा भांडवलाची गरज नाही. परिस्थितीनुरूप निरनिराळी कामे काढता येतील. आमच्या नजरेपुढे जी कामे आहेत ती खालीलप्रमाणे :

(१) दरवर्षाला दोन हजार झाडांची नर्सरी तयार करणे (२) पाण्याची बचत व अधिक उत्पादनवाढीसाठी कपाशीच्या पिकाची नर्सरी तयार करणे. (३) ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात कपाशी गोळा करणे. (४) पाण्याखालच्या जमिनीत येणाऱ्या मशागतीत मदत करणे. मुख्यत्वाने दगड गोळा करणे. (५) माळरानात लावलेल्या झाडीला उन्हाळ्यात पाणी घालणे. (६) शेतातील बांधावर मारवेलसारखे गवत

लावणे व त्याची कापणी करणे. ( ७ ) जुलै महिन्याच्या दहा दिवसांत निंबोळ्या जमा करणे. ( ८ ) तंबाखूच्या झाडाला पाणी घालणे. ( ९ ) टोकण पेरणीने ज्वारी लावणे. ( १० ) सामुदायिक कडबाकुटी यंत्रावर काम करणे.

ही यादी बरीच वाढविता येईल; पण मुख्य उद्देश आजच्यापेक्षा अधिक चांगले शिक्षण मुलांच्या, फक्त आठवड्याच्या एका दिवसाच्या कामातून कसे आखायचे हा आहे. आणि याची आखणी करण्याचे शिक्षण जर आमच्या शिक्षकांनी आत्मसात केले तर भाराभर नियोजन करण्याची आवश्यकता नाही. एक एक शाळा प्रयोगार्थ घेऊन निष्कर्ष अजमावण्याचे आव्हान ग्रामगौरव प्रतिष्ठान घ्यायला तयार आहे; पण महाराष्ट्र सरकार ह्या प्रयोगाला कागदी घोडे न नाचविता संमती देईल काय ? संबंधितांनी नायगावला येऊन प्रत्यक्ष पाहणी करून व इथल्या लोकांशी चर्चा करूनच हे केले पाहिजे. यामुळे शिक्षणविचारात एक सामाजिक शस्त्रक्रिया होणार आहे. ग्रामगौरवाला असे कोणी आवाहन केल्यास आम्ही हा प्रयोग यशस्वी करण्याची खात्री देऊ इच्छितो.

□ □

# ग्रामीण शाळांच्या शैक्षणिक समस्या

## कृ. वा. तारे

### शिक्षणाचे अनेकांगी महत्त्व

कल्याणकारी राज्याचे एक आवश्यक कर्तव्य म्हणजे शिक्षणप्रसार. सामाजिक पुनर्रचनेचे एक प्रभावी साधन म्हणून शिक्षणाकडे जगातील बहुतेक अर्थशास्त्रज्ञांचे व शिक्षण शास्त्रज्ञांचे लक्ष आहे. मानवी शक्तींच्या उन्नयनाकरिता व नियोजनाकरिता करावयाचा भांडवली खर्च म्हणून राज्यांनी शिक्षणविस्ताराची जबाबदारी स्वीकारावयाची असते, असा दृष्टिकोन आता सर्वत्र दृढमूल होत आहे. शिक्षणाच्या विस्तार व प्रसाराबरोबरच शिक्षणाची गुणवत्ता आपोआप वाढत जात असते. संख्यात्मक वाढ हा गुणवत्ता सुधारणेचा विरोधी सिद्धान्त नाही. संपूर्ण सामाजिक संदर्भामध्ये शिक्षणाच्या प्रसाराबरोबर गुणात्मक दर्जा वाढत असतोच; परंतु गुणात्मक वाढीचा वेग बदलत्या सामाजिक समस्यांचा मुकाबला करण्यास समर्थ ठरला पाहिजे. म्हणून शिक्षणक्षेत्रातील प्रत्येक कार्यकर्त्याला सतत प्रयत्न करून ह्या गुणवत्तावाढीची काळजी घेतली पाहिजे. तशी काळजी न घेतल्यास शिक्षणसंस्थांच्या अस्तित्वाचा, संचलनाचा हेतूच नष्ट होऊन जनमानसात शिक्षणसंस्था व शिक्षणव्यवसाय ह्यांबद्दल एक प्रकारचा अविश्वास– क्वचित तिरस्कारही निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अनेक नागरी व ग्रामीण शाळांच्या बाबतीत अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याचे जाणवते आहे. वेळोवेळी तशी जाणीव वृत्तपत्रांतून किंवा खाजगी चर्चेतून व्यक्त होताना दिसते. वीस टक्क्यांच्या खाली निकाल लागणे व त्यावर कडक उपाय-योजना करण्याची पाळी शासनावर येणे याच्या मुळाशी जी भावना असते ती वरील प्रमाणेच असते.

न्यूनतम गुणवत्ता मिळविण्याकरिता व टिकवण्याकरिता ग्रामीण शाळांना जी ओढाताण करावी लागते, ज्या समस्यांना तोंड द्यावे लागते, त्याची थोडक्यात चर्चा करण्याचा प्रयत्न प्रस्तुत निबंधात केला आहे.

### व्यवस्थापकीय ध्येयदृष्टी

बहुतांश ग्रामीण विभागातील व्यवस्थापकांना आपण शाळा का चालवितो, हेच कळत नाही. ग्रामीण शाळांतील बहुसंख्य शाळा निश्चित ध्येयदृष्टीच्या अभावातच

चालतात. किंवा केवळ आजूबाजूच्या परिसरात चालू असलेल्या संस्थांच्या चढाओढीमुळे किंवा अनुकरणाकरिता चालतात. 'आपल्याही गावात शाळा पाहिजे' ह्याशिवाय शिक्षणाचा अर्थ, हेतू व प्रक्रिया ह्यांच्या प्रगाढ अज्ञानामुळे, दुसरा कोणताही उद्देश त्यामागे नसतो. शाळा राजकारणाकरिता चालतात किंवा पैसे खाण्याकरिताच चालतात, अशा पद्धतीची भरमसाट व सवंग विधाने करणे म्हणजे ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांच्या सद्हेतूचा उपमर्द करणे व त्यांच्या साधनविपन्नतेचा क्रूर उपहास करणे होय, असे मला वाटते. राजकारण किंवा भ्रष्टाचार घुसतो ह्याचे कारणही आपल्या कार्याची उद्दिष्टे, पद्धती नीट माहीत नसणे हेच होय, असे मला वाटते. खरे तर शिक्षणशास्त्रज्ञ, चांगले शाळाचालक व सामाजिक कार्यकर्ते यांनी ग्रामीण शाळाव्यवस्थापकांचे उद्बोधन करणे अत्यंत आवश्यक आहे व त्या दृष्टीने सातत्यपूर्ण असे प्रयत्न झाले पाहिजेत. योग्य दृष्टी असलेल्या अनेक चांगल्या शाळा ग्रामीण भागातही आढळून येतात. मुख्याध्यापक संघटनेच्या कार्यात असताना अशा चांगल्या शाळा मी पाहिल्या आहेत.

## मुख्याध्यापकाची गुणवत्ता

ग्रामीण शाळांची मोठी अडचण म्हणजे सुयोग्य मुख्याध्यापक न मिळणे. चांगले मुख्याध्यापक न मिळण्याची अनेक कारणे आहेत. आपल्या विश्वासाचा म्हणजे जातीचा, नात्याचा, गटाचा किंवा पक्षाचा माणूस मुख्याध्यापक म्हणून नियुक्त होतो. असे म्हटले जाते की, "मूर्ख चालेल, पण आपला पाहिजे." ह्यात अबाधित सत्तेचा व शिफारसीचा भाग आहे. तसाच, भविष्यकाळात संभाव्य भानगडी निर्माण होऊ नये अशा व्यवस्थापकीय दक्षतेचाही भाग असतो. तिजोरीच्या किल्ल्या परक्याच्या हातात कोण देईल ? ह्याचा अपरिहार्य परिणाम असा होतो की, चांगला मुख्याध्यापक संभाव्य धोका पत्करण्यास तयार नसतो व जो मुख्याध्यापक म्हणून जबाबदारी स्वीकारतो तो उपलब्ध संरक्षणामुळे स्थितिशील बनतो. क्वचित अशैक्षणिक क्षेत्रात लुडबूड करून राजकीय व सामाजिक प्रतिष्ठेच्या नादाला लागून आपल्या शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांना तो जाचकही बनतो.

ग्रामीण शाळांतील मुख्याध्यापकांची गुणवत्ता सामान्य गुणवत्तावाल्यांपेक्षा कितीतरी मोठी असावयास पाहिजे. समाजोन्नतीचे स्वीकृत आदर्श, शिक्षणक्षेत्राची सामाजिक पुनरुत्थानाच्या कार्यातील भूमिका, विद्यार्थी व दुर्बल समाजाबाबतची प्रगाढ सहानुभूती, शिक्षण व अभ्यासविषयांचे उत्कृष्ट ज्ञान व कौशल्य ह्या बाबतींत मुख्याध्यापक तज्ज्ञ मार्गदर्शक असावा.

असा मुख्याध्यापक ग्रामीण शाळांना मिळणे दुरापास्त आहे. कारण असे गुणवत्ताप्राप्त मुख्याध्यापक गांधी–विनोबांचे नाव घेत शहरी जीवनाकडे ह्या ना त्या कारणाने आकृष्ट होत असतात. एकतर असे मुख्याध्यापक ग्रामीण शाळांना उपलब्ध करून देण्याकरिता मूलभूत अशा निवास, आरोग्य व शिक्षणविषयक सोयी ग्रामीण भागात

राहणाऱ्या मुख्याध्यापकांच्या कुटुंबियांना उपलब्ध करून दिल्या पाहिजेत किंवा ग्रामीण शाळांतील उत्कृष्ट शिक्षकांचा शोध घेऊन त्यांना चांगले वेतन व प्रशिक्षण देऊन त्यांची नेमणूक केली पाहिजे. चांगल्या मुख्याध्यापकाशिवाय ग्रामीण शाळा दर्जेदार बनतील असे समजणे म्हणजे नवसासायासाने कन्या-पुत्र होतील असेच मानणे होय.

## अपरिपक्व शिक्षक

ग्रामीण शाळांतील शिक्षकाची कुवत हा एक अत्यंत जटील प्रश्न आहे. बऱ्याच ग्रामीण शाळांना तर विशिष्ट विषयात पदवीधर शिक्षकच नसतात. प्रत्येक विषयाचा पदवीधर अगर अपदवीधर शिक्षक असला तरी त्या त्या विषयांतील गती 'अगतिक' ( Retarded ) असते. स्वतःच्या विषयाची प्रकृतीच त्यांना माहीत नसते. त्यामुळे केवळ क्रमिक पुस्तके व मार्गदर्शिका ह्यांच्या भरवशयावर त्यांचा शैक्षणिक संसार चालत असतो. पुस्तकाशिवाय विषय हाताळणारा शिक्षक दिवसेंदिवस ग्रामीण शाळांतून अदृश्य होत आहे. विषयाचे बाबतीत जर ही अवस्था तर, शिक्षकांच्या इतर आवश्यक गुणांबाबत व इतर विषयांच्या ज्ञानाबाबत अपेक्षाच करणे चुकीचे ठरेल. नव्या सामाजिक जाणिवा, विद्यार्थ्यांबद्दल प्रगाढ सहानुभूती, शैक्षणिक उद्दिष्टे, अभ्यासक्रम व त्यामागील सामाजिक व मानसशास्त्रीय अधिष्ठान ह्यांचा वारादेखील या शिक्षकांना लागलेला नाही. व ह्या ( अ ) ज्ञानाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत सूक्ष्म अशा अध्यापन व मूल्यमापनतंत्राचा वापर केल्यावर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्राप्तीचे अत्यंत भेसूर व निराशात्मक चित्र दिसते, तेव्हा विचारी मनाला धक्का बसतो. त्यावरही मजा अशी आहे की, हा शिक्षक सर्व खापर विद्यार्थी व पालक ह्यांच्या अकर्मण्यतेवर, अभ्यासक्रमातील तथाकथित बोजडपणावर फोडीत असतो. हे सर्व तो त्यांच्या अनुपस्थितीचा व मूकतेचा फायदा घेऊन करीत असतो. अभ्यासक्रमातील उणीवा दाखविण्याकरता किंवा सुधारणा सुचविण्याकरिता पाचारण केले असता, संपूर्ण महाराष्ट्रातून १। लाख शिक्षकांपैकी फक्त १०० च्या आसपास शिक्षकांनी तीन स्मरणपत्रांनंतर प्रतिसाद दिला आहे ! हे प्रमाण शेकडा ( ·१ ) एक दशांशापेक्षाही कमी पडते. विद्यार्थी आणि पालकांना समजून घेऊन त्यांच्या अडचणीचा पाढा व्यापक सहानुभूतीने कमी करणारे किती शिक्षक मिळू शकतील ?

हे सर्व विवेचन करीत असताना शिक्षकांच्या अडचणींचा किंवा समस्यांचा विचार माझ्यासमोर नाही, असे नाही; पण त्या अडचणींचा निचरा करून स्वतःच्या स्वीकृत कार्याकरिता पूर्ण सामर्थ्यानिशी उभे राहण्याच्या निदान योजना तरी किती शिक्षकांनी तयार केल्या आहेत, असा माझा सवाल आहे. ग्रामीण शाळांतील शिक्षकांना शिकवण्या मिळत नाहीत व त्यामुळे त्यांना अतिरिक्त उत्पन्न नाही व खर्च मात्र अगदी नागरी शिक्षकासारखा आहे. खेड्यातील शिक्षकांना खूप सोयी व मदत ग्रामीण जनता करते असा भ्रम नागरी शिक्षकांमध्ये आहे तो चुकीचा आहे. उलट खेड्यातील शिक्ष-

कांना त्यांच्या मुलांचे शिक्षण, संगोपन, घर व आरोग्य ह्यांबाबतीत अपरिहार्य अशा अडचणी असतात. ऐपत असो वा नसो, प्रत्येक सामाजिक उपक्रमात, समारंभात त्याला शारीरिक व आर्थिक सहयोग द्यावाच लागतो. नागरी शिक्षकांपेक्षा ग्रामीण शिक्षकांच्या समोरची आव्हाने आणि अडचणी ह्यांचे स्वरूपच भिन्न आहे. तरीही ग्रामीण शाळांतील शिक्षकांना आपली सर्व शक्ती ग्रामीण जीवनात नवा आशय ओतण्याकरिता व नवे जीवन उभे करण्याकरिता खर्च करावी लागणार आहे. त्याशिवाय, ग्रामीण जीवनाचे व त्याचबरोबर तेथील शिक्षणसंस्थांचे अस्तित्व सार्थकी लागणार नाही. कोणत्याही तऱ्हेचा त्याग न करता व सर्व सोयींचा उपभोग घेऊनसुद्धा ग्रामीण शिक्षकांना पुढील गोष्टी करता येणे शक्य आहे.

(१) स्वतःच्या विषय व अध्यापनपद्धती ह्यांचा दर्जा सर्वसामान्य स्तरावर आणणे.

(२) स्वतः व्यसनाधीन न होणे व व्यसनाधीनांना स्वतः प्रतिष्ठा न देणे.

(३) दारिद्र्य निर्मूलनाकरिता बचत, काटकसर व सामूहिक उपक्रमांना चालना देणे.

(४) सामाजिक समारंभांत सौजन्यपूर्ण, धीरोदात्त वर्तणुकीने सामाजिक बांधिलकी निर्माण करणे.

(५) विद्यार्थी व पालक ह्यांच्याशी सतत संपर्क ठेवून त्यांच्या शैक्षणिक अडचणींचे निवारण करणे.

(६) सुजनशक्ती एकत्र आणून व नवनिर्माणाचे कार्यक्रम आखून यशस्वी करणे. इत्यादी.

## पालक-विद्यार्थी

ग्रामीण शाळांतील विद्यार्थी व त्यांचे पालक ह्यांच्या समस्या हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. ग्रामीण शाळांची गुणवत्ता अखेर विद्यार्थ्यांच्या विकासावर– अधिक स्पष्ट बोलायचे म्हणजे शालान्त परीक्षेच्या निकालावर जोखली जाते. विद्यार्थ्यांची प्रगती उपरोक्त शैक्षणिक नेतृत्त्वावर अवलंबून असली तरी, तो पूर्वार्ध होय. ते विद्यार्थी स्वतः शैक्षणिक कार्यक्रमात किती काळ व किती खोलवर गुंतवून घेतात ह्यावरच ती खरे पाहता अवलंबून असते. त्यांना शैक्षणिक अनुभव घेण्याकरिता उद्युक्त करणे, ही संचालक, मुख्याध्यापक व शिक्षक ह्यांची वेगवेगळ्या स्तरांवर जबाबदारी असली तरी, प्रत्यक्ष अनुभव ग्रहण करण्याची प्रक्रिया ज्याची त्यालाच पार पाडावी लागते. शिक्षण ही जैविक क्रिया ( Organic Process ) आहे; ती यांत्रिक ( Mechanical ) असू

नये. शैक्षणिक विकासाकरिता विद्यार्थी किमान पुढील अपेक्षा पूर्ण करणारा असला पाहिजे.

( १ ) उपस्थिती ( २ ) स्वच्छ पोशाख ( ३ ) पुस्तके व लेखनसाहित्य असणे व ( ४ ) नेमून दिलेले स्वाध्याय करणे.

वरील बाबतींतसुद्धा ग्रामीण शाळांच्या समस्या भयानक स्वरूपाच्या असतात.

साधारणपणे २४० दिवस शाळा भरते. त्यांपैकी प्रत्यक्ष अध्यापनकार्य १८०–१९० दिवस चालते. इतर दिवस परीक्षा, क्रीडास्पर्धा, समारंभ इत्यादींकरिता खर्च होतात. किमान ९० टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती जर सर्व उपक्रमांत असली, तर विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा वेग कायम राहावयास हरकत नसावी; परंतु ग्रामीण शाळा १ जुलै, कधी कधी १५ जुलैपर्यंत प्रत्यक्षात सुरूच होत नाहीत. कारण मुलांची प्राथमिक, शाळेची सवय आणि शेतकरी व शेतमजुरांची मुले बहुसंख्येने शेतीच्या कामांत गुंतलेली असतात. कास्तकारांची गरज व मजुरीचे दर चांगले असल्यामुळे मजूरांना तेवढेच साहाय्य होते. असे वर्षातून निदान तीनदा घडते. लागवडीची वेळ, ऑगस्ट–सप्टेंबरची पिके येण्याची वेळ व हंगामाची वेळ. परिणामतः अध्यापनाच्या १९० दिवसांपैकी कमीत कमी २५ ते ३० दिवस असे जातात. सणवार व ग्रामीण उत्सव–यात्रा ह्यामुळे, सुटीच्या दिवसाला लागून मागेपुढे असलेल्या दिवसाला प्रत्यक्षांत शाळेला सुटीच असते. आजारपण, कौटुंबिक कारणे व विवाहादी कार्ये ह्याकरिता घेतलेल्या सुट्या वेगळ्याच असतात. एकूण काय, तर जेमतेम १४०–१५० दिवस शाळेत उपस्थिती व त्याही बाबतीत वेळेवर येणे व सर्व तासांना उपस्थित राहणे म्हणजे अघटितच.

अभ्यासक्रमाची आखणी साधारणतः ३२ अध्यापन सप्ताह ( १९२ दिवस ) जमेस धरून केलेली असते. आठ सप्ताह जर विद्यार्थी अनुपस्थित असला तर, त्याचे १।४ अभ्यासक्रमाचे मार्गदर्शन तर गेलेच; पण त्यामुळे दोन घटकांत पोकळी राहते. त्याचा परिणाम विषयांचे ज्ञान अपूर्ण राहते व अधू बनते व हे वर्षानुवर्षे चालत राहिले की, तो विद्यार्थी शालान्त परीक्षेत उत्तीर्ण होणे कठीणच असते. साधारणपणे सुखवस्तू ग्रामीण कुटुंबांतील मुले अलीकडे तालुक्याच्या किंवा मोठ्या गावीच घरे करून शिकतात. यामुळे ग्रामीण शाळांचा निर्वाह मुख्यतः मजूरवर्गाच्याच मुलांवर चालतो.

शाळेचा पोशाख, क्रमिक पुस्तके व लेखनसाहित्याची उणीव ह्यांच्या बाबतीत ग्रामीण शाळांतील विद्यार्थी दुर्भागीच असतात. दारिद्र्यामुळे वरील आवश्यक साहित्य निदान १० टक्के विद्यार्थ्यांजवळ शेवटपर्यंत व इतरांजवळ कसेबसे पहिल्या सत्राच्या अखेरीपर्यंत प्राप्त होते. ह्याचा अर्थच असा की, ग्रामीण शाळांतील शैक्षणिक कार्यक्रम सुनियोजित चालणे शक्य नसते. स्वाध्याय व इतर लेखन कसेबसे रखडत चाललेले असते.

ह्यांत शिक्षकांच्या रजा वगैरेची बेरीज व वजाबाकी केली की, ग्रामीण शाळांतील शैक्षणिक जीवनाचे चित्र व त्यातील समस्यांचे प्रमाण किती दयनीय बनते, ह्याची जाणीव "जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे !"

आज ग्रामीण शाळांतील निकालाचा जो आलेख आहे तो खालच्या टोकाला प्रामाणिक व वरच्या टोकाला निश्चित अशैक्षणिक असावा असे वाटते. ज्या शाळांचे निकालाचे प्रमाण पार्श्वभूमीच्या संदर्भात प्रामाणिक आहे, त्यांचे शिक्षक शेवटच्या वर्गावर जे महत्प्रयास ( जादा तास, घोकंपट्टी, अपेक्षित प्रश्नोत्तरे इ. ) घेतात त्याचा परिणाम होय. विशुद्ध शैक्षणिक विकास किती झाला, हे एकटा विद्यार्थीच जाणू शकतो किंवा परमेश्वर!

हे चित्र बदलावयाचे असल्यास ह्या शाळांच्या शिक्षकांना स्वतःच शालेय संयोजनात बदल घडवावे लागतील व तशी सवलत त्यांना देण्यात आली पाहिजे.

## शासकीय अधिकाऱ्यांची जीवघेणी उदासीनता

ह्या ग्रामीण शाळांच्या बाबतीत शासकीय अधिकाऱ्यांचा दृष्टिकोन स्वातंत्र्योत्तर काळातही बदलला आहे असे वाटत नाही. वास्तविक अत्यंत सहानुभूतीने त्यांचे प्रश्न समजावून घेणे, त्यात मार्गदर्शन करणे, प्रसंगविशेषी चाकोरीबाहेर जाऊन प्रयोगशीलतेला चालना देणे हे आवश्यक ठरते; परंतु काही उच्चस्तरीय सन्मान्य अपवाद सोडल्यास अत्यंत बधिर व संवेदनशून्य अशा प्रशासनाचा भयंकर जाच व त्रास ग्रामीण शाळांना सोसावा लागतो. आधीच साधनविपन्न असलेल्या ह्या शाळांना, ऑफिसचे खेटे घालण्याची पाळी येणे, नियमांचा अर्थ शाळांना जाचक होईल असाच लावणे, अनुदान वेळेवर न देण्यात आपण फार उत्तम प्रशासक आहोत असा खोटा अभिमान बाळगणे, इ. अत्यंत बथ्थड व कालबाह्य प्रशासनाला बळी पडावे लागत आहे. परिणामतः ग्रामीण शाळा एका दुष्टचक्रात सापडल्या आहेत. ह्या दुष्टचक्राचा भेद करण्याचा एकच मार्ग आहे नि तो म्हणजे शाळा सर्वार्थाने स्वयंपूर्ण करणे.

## स्वयंपूर्ण शाळा

ग्रामीण शाळा स्वयंपूर्ण झाली असे केव्हा म्हणता येईल? ग्रामीण शाळांचे प्रशासकीय व शैक्षणिक नेतृत्व शुद्ध शैक्षणिक जीवनाचाच ध्यास घेतलेले आहे, मुख्याध्यापक व शिक्षक ह्यांची शैक्षणिक बिरादरी आहे व विद्यार्थी जगता जगता शिकत आहे आणि शिकता शिकता जगत आहे, असे जेव्हा दृश्य दिसेल तेव्हाच!

□ □

# शिक्षण सुधारणामार्गावरील अडसर

## दि. ह. सहस्रबुद्धे

### स्वातंत्र्याचे दृश्यफल

स्वतःच्या आकांक्षानुसार आपले जीवन घडविण्याचे स्वातंत्र्य आपणाला प्राप्त झाल्यानंतर आज तीस वर्षांत आपण कोणते जीवन फुलविले हा विचार मनात येताच शरमेने मान खाली झाल्याशिवाय राहत नाही. सामाजिक व आर्थिक न्याय, स्वातंत्र्य, बंधुता आणि समता या तत्त्वांवर समाजाची पुनर्निर्मिती करण्याची घोषणा आपण केली खरी; पण प्रत्यक्षात आपली वाटचाल कसलाही विधिनिषेध न बाळगता अवश्य ते सर्व करून व्यक्तिहित, गटाचे हित, संघटनेचे हित व पक्षहित साधण्याकडेच होत राहिली आहे. हे हित साधण्याकरता सत्याग्रह, निदर्शने, निरोधन आदी मार्ग केव्हाच संपले आहेत. घेराव, अटक, उपोषण, जबरदस्तीने संस्थेचा ताबा घेणे, या मार्गांची आज चलती आहे. भ्रष्टाचाराबरोबर हिंसाचार फोफावला आहे. रोजरोजच्या वृत्तपत्रांतील बातम्या वाचून अराजकतेच्या उंबरठ्यावर आपण उभे आहोत की काय, या चिंतेने आज सामाजिक मन ग्रासले आहे. समाजमन चिंताग्रस्त होण्याचे प्रमुख कारण, समाजजीवन या थरापर्यंत येण्याचे प्रमुख कारण, ज्या तत्त्वांवर भारतीय समाजाची पुनर्रचना करण्याचा आपण निर्धार व्यक्त केला, त्यांना प्रेरक व पोषक अशा शिक्षणाची रचना आपण आजपर्यंत करू शकलो नाही, हे होय. पण आता व्यक्तीची समाजातील वागणूक जसजशी समाजस्वास्थ्यविरोधी होत आहे, तसतशी शिक्षणातील बदलाची निकड अधिक तीव्रपणे भासत आहे. अशा वेळी हा बदल का घडून येऊ शकला नाही, हा शोध घेणे उचित होईल. तो घेणे हे या लेखाचे उद्दिष्ट.

### क्रांतिकारक बदल मंडळांनी सुचविलाच नाही !

तसे पाहू जाता या तीस वर्षांत शिक्षणात सुधारणा करण्याच्या उद्देशाने, त्या सुचविण्याकरता आपण कमी का मंडळे-महामंडळे नेमली ? ३० वर्षांपूर्वीच्या विद्यापीठ महामंडळांपासून आत्ता आत्ताच्या भारत शासनाने नेमलेल्या समीक्षक समितीपर्यंत (ईश्वरभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेली रिव्ह्यू कमिटी) आपण अनेक मंडळे व महामंडळे नियुक्त केली. त्यांनी अक्षरशः किलो–अर्धा किलो वजनाची प्रतिवृत्ते सादर केली; पण प्रत्यक्षात विभिन्न स्तरांवरील शिक्षणात काहीही फरक घडून आलेला नाही. याची जी अनेक कारणे आहेत त्यांपैकी या मंडळांनी व महामंडळांनी क्रांतिकारक बदल

सुचविलेच नाहीत, हेही एक प्रमुख कारण आहे. हे विधान धक्कादायक असले तरी पूर्ण सत्य आहे.

सध्या शिक्षणक्षेत्रात चर्चेचा विषय असलेली अ. भा. शिक्षण महामंडळाची व समीक्षण समितीच्या प्रतिवृत्तांचीच उदाहरणे घ्या.

## वास्तवाशी तडजोड

अ. भा. शि. महामंडळाच्या प्रतिवृत्ताचे पहिले प्रकरण व प्रत्येक प्रकरणाचा पहिला काही भाग वाचताना खरोखरच क्रांतिकारक शिफारसी हे महामंडळ करणार, असा विश्वास वाटू लागतो; पण प्रकरणाचा शेवट जवळ येऊ लागला म्हणजे प्रत्यक्ष शिफारसी क्रमशः अशा होत जातात की, त्यांतून वास्तवाशी तडजोड करण्याचीच महामंडळाची वृत्ती स्पष्ट होते. उदाहरणार्थ,

**कृषिशिक्षण** : भारत हा कृषिप्रधान देश आहे. या वस्तुस्थितीशी अनुरूप असे शिक्षण देशात नाही अशी आपली अनेक वर्षांपासूनची ओरड आहे. याचे जोरदार प्रतिपादन महामंडळाने परिच्छेद १·१२ आणि १·१३ मध्ये केले आहे. पुढे १४·५ परिच्छेदात 'एकूण राष्ट्रीय शिक्षण पद्धतीत कृषिशिक्षणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान असले पाहिजे', ('Education for agriculture must become a major concern of the entire national system of education...') असे महामंडळाने म्हटलेही आहे. पण पुढे १४·४४ ते १४·५१ पर्यंतचे परिच्छेद वाचले म्हणजे उपरोक्त वाक्याने उफाळलेल्या आशा पार धुळीस मिळतात !

**समाजसेवा** : जी कथा कृषिशिक्षणाची तीच महामंडळाने सुचविलेल्या समाजसेवा या विषयाची. परिच्छेद १·४० मध्ये महामंडळाने 'कोणत्यातरी प्रकारची समाजसेवा सर्व स्तरांवरील विद्यार्थ्यांना अनिवार्य केली पाहिजे,' असे जोरदार प्रतिपादन केले आहे; पण पुढे परिच्छेद ८·८२ ते ८·८७ वाचत गेले म्हणजे या प्रतिपादनातील जोर कमी होत जातो व शेवटी शिफारशी वाचल्या म्हणजे या विषयाला महामंडळाने स्पर्शच केला नसता तर, अधिक बरे झाले असते, असे वाटते.

महामंडळाचे प्रतिवृत्त प्रकाशित झाल्यानंतर प्रस्तुत लेखकाने या प्रकारच्या प्रतिवृत्ताचा सूक्ष्म अभ्यास Transforming Education System : a critical analysis या पुस्तिकेद्वारे प्रकाशित केला आहे. त्यात या प्रकारची अधिक उदाहरणे साधार दिली आहेत.

**श्रमशिक्षण** : अलीकडील समीक्षण समितीच्या विधानांबद्दल व शिफारसींबद्दल अगदी हेच सिद्ध करता येते. उदाहरणार्थ, या समितीच्या प्रतिवृत्तांतील पृ. १७ वरील पुढील विधान पाहा. 'आम्ही शिक्षण अधिक काम या तत्त्वाचा पुरस्कार करीत नसून, कामात व कामाद्वारे शिक्षण या तत्त्वाचा जोरदार पुरस्कार करीत आहो,' (We are

strongly recommending not education plus work but education through work.) या समितीने श्रमाद्वारे शिक्षण देण्याच्या कामाला ‘ समाजोपयोगी उत्पादक काम ’ असे नामाभिधान दिले आहे व त्याला ‘ शालेय अभ्यासक्रमात मध्यवर्ती स्थान असले पाहिजे, ’ ( Socially productive work must find a central place in school curriculum ’ ) असे म्हटले आहे.

## वास्तवाशी तडजोड करण्याच्या वृत्तीचा पुनःप्रत्यय

समितीच्या या विधानांना अनुसरून आणि शिफारसीबाबत केलेल्या अपेक्षा पूर्णपणे विफल होतात. महात्मा गांधींच्या मूलोद्योगी योजनेप्रमाणे कामाद्वारेच शिक्षण द्यायचे असेल तर, ‘ समाजोपयोगी उत्पादक कामाला ’ स्वतंत्र वेळ द्यायला नको; पण समितीने तो तसा दिला आहे व तोही ३२ शालेय तासांपैकी फक्त पाच तास! याला कामाद्वारे शिक्षण व कामाला शालेय अभ्यासक्रमात ‘ मध्यवर्ती स्थान ’ असे समितीचे मत असल्यास न कळे.

या शिफारसीवरून ही नवी समिती महामंडळाच्या कार्यानुभव व समाजसेवा या शिफारशीच नव्या नावाखाली तडजोड करते हे स्पष्ट होते.

शिक्षणात क्रांतिकारक बदल सोडाच, पण साध्या सुधारणाही होत नाहीत, याचे एक प्रमुख कारण खुद्द शिक्षणमंडळेच वास्तवाशी जुळवून घेऊ पाहतात, हे यावरून स्पष्ट होते.

## शिक्षणमंडळांचा भर कशावर ?

शिक्षणमंडळे व शिक्षण महामंडळे आपले सर्व लक्ष अभ्यासक्रमात ठेवावयाचे विषय, त्यांना द्यावयाचे कमी अधिक महत्त्व, त्यांची नावे, विषयांचे पाठ्यांश, त्यांची निवड, यांवरच केंद्रित करताना आढळतात. सुधारणेला अत्यंत आवश्यक अशा शिक्षकांतील वृत्तिनिर्मितीकडे मंडळे दुर्लक्ष करतात.

## शिक्षकांत नववृत्तिनिर्मितीकडे दुर्लक्ष

कोणत्याही शिक्षण सुधारणा अंमलात आणायच्या तर प्रमुखतः जे शिक्षक त्या कार्यवाहीत आगणार, ते शिक्षक सुधारणाविचारांनी भारलेले असले पाहिजेत; तसे ते भारले जातील असा दृढ प्रयत्न सर्वप्रथम केला पाहिजे; पण मंडळे यावर लक्ष केंद्रित करायला सांगत नाहीत. हे मंडळांच्या प्रतिवृत्तांबाबत आणखी एक दुर्दैवी सत्य आहे. त्यामुळे जे साधारण स्वरूपाचे बदल महामंडळे सुचवितात, त्यांच्या अंमलबजावणीकरता आवश्यक ती जिद्दच शिक्षकांत निर्माण होत नाही. ती निर्माण झाल्याशिवाय शिक्षणपद्धतीत बदल घडणे शक्य नाही; कारण म्हटलेच आहे की, ‘ कोणतीही शिक्षणपद्धती तिची कार्यवाही करणाऱ्या शिक्षकांपेक्षा अधिक श्रेष्ठ असूच शकत नाही. ’

## तरुण शिक्षकांना क्रांतीची हाक द्या

एकूण शिक्षणात नववृत्तिनिर्मितीचा प्रश्नच कठीण मानला जातो, पण तो सोडविल्याशिवाय शिक्षणात क्रांती होणे कठीण हे जाणून त्या क्रांतीची हाक या नवतरुण शिक्षकांनाच दिली पाहिजे. गेल्या काही वर्षांत भारतात शिक्षणप्रसार पुष्कळ झाला आहे. त्यामुळे या व्यवसायात अनेक तरुण आले आहेत. या नवतरुणांना क्रांतीची हाक पोहोचविल्यास त्यांचा प्रतिसाद मिळणे अशक्य नाही; पण ते शिक्षणाद्वारे करावयाच्या समाजक्रांतीचे अग्रदूत आहेत असे कोणी मानले नाही व त्यांना तशी हाकच कोणी दिली नाही. ती हाक दिली पाहिजे. कारण शिक्षणात क्रांती घडविण्याच्या अनेक साधनांपैकी शिक्षक– तरुण शिक्षक हेच एक जिवंत जागृत साधन आहे. खरी क्रांती करविण्याची क्षमता त्याच्यातच आहे.

## प्रशिक्षण : तेही ‘ ज्ञान ’ मर्यादित

शिक्षक तयार करण्याबाबत मंडळाचा भर शिक्षकाच्या केवळ प्रशिक्षणावर वृत्ती निर्मितीवर नव्हे–असतो. शिक्षणाचे पहिले उद्दिष्ट ‘ज्ञान’ असले तरी, आकलन, उपयोजन, कौशल्य या पायऱ्यांनी पुढे जाऊन शिक्षणाचे खरे उद्दिष्ट अभिरुची व वृत्तिनिर्मिती हेच असते; पण शिक्षणप्रक्रियेत जसा सारा भर ‘ ज्ञान ’ या पहिल्या उद्दिष्टावर असतो, तसा दुर्दैवाने तो प्रशिक्षणातही ‘ ज्ञान ’ यावरच असतो. प्रशिक्षण म्हणायचे, पण तेसुद्धा अभिरुची व वृत्तिनिर्मिती या उद्दिष्टाने द्यायचे नाही, ही भारतातील एकूण प्रशिक्षण योजनेतीलच कायम त्रुटी आहे. अमलात आणावयाच्या सुधारणा सुचवत असता शिक्षण मंडळे या त्रुटीवर बोट ठेवत नाहीत व प्रशिक्षण योजना करणारे व त्यांची कार्यवाही करणारेही त्रुटी भरून काढण्याचा प्रयत्न करीत नाहीत. हेही शिक्षणसुधारणांचे दुर्दैव आहे.

## सुधारणांच्या कार्यवाहीची घिसाडघाई

अमुक सुधारणा करावयाची असा निर्णय शासनाने एकदा घेतला रे घेतला की, त्यांची तत्काळ कार्यवाही करण्याची घाई शासनाला व सर्वच अधिकृतांना होते, हा सुधारणांच्या कार्यवाहीस मिळालेला आणखी एक शाप आहे. शिक्षकांच्या केवळ प्रशिक्षणाचा प्रश्न घेतला तरी आपले क्षेत्र व्यापण्याकरिता किती प्रशिक्षित शिक्षक लागतील ते निश्चित करून, ते निर्मिण्याकरता किती वेळ लागेल ते ठरवून, प्रशिक्षणाची योजना करून ती अंमलात आणून, मग पूर्ण तयारीनिशी सुधारणा अमलात आणणे हे आपल्या शासनाला माहीतच नाही. इतका काळ थांबायचे नसेल तर, ज्या मानाने शिक्षक प्रशिक्षित होतील त्या मानाने सुधारणा–कार्यवाहीचे क्षेत्र वाढविणे, एवढेही शासन व अधिकृत संस्था करीत नाहीत. सुधारणेचा निर्णय झाला की तिची झटपट कार्यवाही, यामुळे शिक्षण जुन्या चाकोऱ्यात रुतून राहते, हे आपण ओळखले पाहिजे.

## अल्पमुदतीचे प्रशिक्षण

सुधारणा अमलात आणण्याची घाई होत असल्यामुळे जे प्रशिक्षण द्यावयाचे तेही अल्प मुदतीचे असते. जास्तीत जास्त शिक्षकांना कमीत कमी वेळात प्रशिक्षित केल्याचे श्रेयसंपादन हे त्याचे उद्दिष्ट असते.– शिक्षकांच्या बौद्धिक ‘ वर्तना ’त बदल हे उद्दिष्ट नसते. त्यामुळे दिले जाणारे शिक्षण ‘ नामके वास्ते ’ असते, असे म्हणणे मुळीच अतिशयोक्तीचे होणार नाही.

## अल्पसंख्याकांचे शिक्षण

कितीही अल्पमुदतीचे ‘ नामके वास्ते ’ प्रशिक्षण दिले तरी ते सर्व शिक्षकांना देणे शक्य होत नाही. त्यामुळे साधारण १/१० शिक्षकांना ते दिले जाते व प्रशिक्षण कार्यक्रम झाला, असे मानण्यात येते. अधिकृत संस्था असे मानतात, याचा लेखी पुरावा प्रस्तुत लेखकाजवळ आहे.

## कोटी कोटी रुपये खर्चून चाकोरीबद्धता कायम

अशा प्रकारे १/१० अल्पप्रशिक्षित शिक्षक ९/१० अ-प्रशिक्षित शिक्षकांमध्ये गेले की, ते ९/१० अप्रशिक्षित शिक्षक या अल्प-प्रशिक्षितांना सहजी आपल्यात सामावून घेतात परिणामतः शिक्षण चाकोरीबद्धच राहते. प्रशिक्षण या शीर्षकाखाली महाराष्ट्रात गेल्या १० वर्षांत कोटी कोटी रुपये खर्च झाले; पण शिक्षणप्रभावात काडीचाही फरक झाला नाही, याचे हेच प्रमुख कारण आहे.

## प्रशिक्षितांच्या पाठपुराव्याची योजना नाही

शिक्षक प्रशिक्षित झाल्यावर मिळालेल्या शिक्षणानुसार तो अध्यापन करतो किंवा कसे हे पाहण्याची काहीच योजना नसते. त्याप्रमाणे अध्यापन केले तरच व्यवसायात टिकून राहता येईल, ‘ प्रमोशन ’ मिळेल, अशी समज प्रशिक्षिताला दिलेली नसते. तशी जाणीव प्रशिक्षितांना दिलेली असेल, त्याच्या अंमलबजावणीची योजना असेल तर, –पण हो, तिची कार्यवाहीही कडकपणे होत राहिली तर, प्रशिक्षण कार्यक्रमावर खर्च होत असलेल्या पैशाची उधळपट्टी होणार नाही व सतत नवीन प्रकारे शिक्षक अध्यापन करीत राहील. अशा स्थितीत शिक्षकाच्या मनोधारणेत बदल होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

## जुनी चाकोरी अधिक विस्तारित व अधिक पक्की

प्रशिक्षणाच्या या बाबीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शिक्षणाची जुनी चाकोरी अधिक विस्तारित व अधिक पक्की झाली आहे

## अ. भा. शिक्षण महामंडळाचा इशारा

नवतरुण शिक्षकांकडून, प्रशिक्षित शिक्षकांकडून जुन्या चाकोरीला धक्कासुद्धा गेल्या ३० वर्षांत लागलेला नाही. या संदर्भात अ. भा. शिक्षण महामंडळाने आपल्या १·१९ या क्रमांकाच्या परिच्छेदात परंपरागत पद्धतीने शिक्षणाचा अधिक प्रसार झाला तर ती पद्धती बदलणे पुढे अधिकच कठीण व अधिक खर्चाचे होते या इशाऱ्याचे पुनःस्मरण करून दिले आहे.

## अधिकृत व्यक्ती व संस्था यांमध्ये जाणिवेची गरज

केवळ शिक्षकांतच नववृत्ती निर्माण करून वा त्यांना प्रशिक्षण देऊन भागणार नाही. त्यांना प्रशिक्षण देणारे, अभ्यासक्रम व विषयांचे पाठ्यक्रम तयार करणारे, पाठ्य-पुस्तक लेखन करणारे यांची सर्वांची वृत्ती बदलास अनुकूल आहे किंवा नाही याकडेही लक्ष देणे जरूर आहे. ही बाबही शिक्षकांच्या वृत्तिनिर्मितीइतकीच किंबहुना त्यापेक्षाही अधिक महत्त्वाची आहे. या बाबीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे महाराष्ट्रात नव्या अभ्यासक्रमांच्या द्वारे होऊ घातलेला अल्प बदलही होऊ शकला नाहीच! उलट अलीकडील काळात त्यांचीच दृष्टी बदलास प्रतिकूल झालेली आढळत असल्यामुळे अपेक्षित बदल यापुढे होण्याची शक्यता राहिलेली नाही.

## पुच्छप्रगतीची उदाहरणे

महाराष्ट्राने किमान अभ्यासक्रम, पाठ्यक्रमरचना व त्यांची मांडणी या दृष्टीने प्रगतीची पावले टाकली होती. म. रा. मा. शिक्षण मंडळ व पा. पु. मंडळ या दोन्ही मंडळांद्वारे ती कशी मागे घेतली जात आहेत, याची अनेक उदाहरणे दिली जाऊ शकतात. वानगीदाखल एक-दोन देतो.

## नागरिकशास्त्र

या विषयाचा १९७२ साली पाठ्यक्रम तयार करण्यात आला त्या वेळी त्यात नागरिकत्वाच्या गुणांची जोपासना, लोकशाही : एक जीवनपद्धती, राजकीय व सामाजिक क्षेत्रे, संधींची समानता, समाजव्यवस्थेत लोकशाही तत्त्वांचा अंमल, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक समानता, धर्मनिरपेक्ष वृत्तीची जोपासना, लोकशाहीत लोकमताचे महत्त्व, ते बनविणारी साधने, लोकशाहीत नागरिकांच्या दक्षता, विचारस्वातंत्र्य, सामाजिक माल-मत्तेचे संरक्षण आदी लोकशाही प्रवृत्तींस प्रेरक व पोषक विषय होते. त्या सर्वांना आता अर्धचंद्र देण्यात आला आहे. इतिहासाच्या पाठ्यक्रमातही असेच घडले आहे. भारतीय शासनाने नेमलेल्या समीक्षण समितीने तर असल्या नवभारताच्या पुनर्रचनेस पोषक अशा पाठ्यांशांचा फडशाच पाडला आहे. केवळ बौद्धिक क्षेत्र म्हटले तरी त्यात जे इष्ट फेर-बदल केले त्यांची अशी वासलात लावण्यात आली आहे.

## घटनेचा सरनामा

नवभारताच्या निर्मितीची तत्त्वे भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात स्पष्ट केली आहेत. त्या सरनाम्याचे अध्यापन विद्यार्थ्यांना बौद्धिक व भावनिक विकासाच्या दृष्टीने होणे अवश्य आहे. पण जे म. रा. मा. शिक्षण मंडळ नागरिकत्वाच्या असलेल्या पाठ्यक्रमात वरील प्रकारचे बदल करते, त्यांचेकडून सरनाम्याचा समावेश पाठ्यक्रमात होईल असे का समजावे ?

## उद्दिष्ट कथन, पाठ्यक्रमांची मांडणी

म. रा. मा. शिक्षण मंडळाने १९७५ साली प्रकाशित केलेल्या अभ्यासक्रम पुस्तकात अनेक विषयांच्या उद्दिष्ट कथनात काटछाट केली आहे; तर विज्ञान, इतिहास या विषयांच्या पाठ्यक्रमांच्या मांडणीत अनुकूल बदल केले आहेत.

## मूल्यमापनपद्धती

म. रा. मा. शिक्षणमंडळाने स्वीकारलेली मूल्यमापनपद्धती ही पुनर्रचनेची उद्दिष्टे साध्य करण्यास पूर्णतः विरोधी आहे. महाराष्ट्रात नव्या अभ्यासक्रमाद्वारे शिक्षणात अपेक्षित बदल घडला नाही याला ही नवी मूल्यमापनपद्धती फार मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे.

## म. रा. पाठ्यपुस्तक मंडळ : प्रतिज्ञेचे उच्चाटन

या बाबतीत म. रा. पा. पुस्तक मंडळेही मागे नाही. महाराष्ट्राच्या सर्व पाठ्यपुस्तकात पुढील प्रतिज्ञा आहे. ( होती. )

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यातच माझे सौख्य सामावले आहे.

देशबांधवाशी निष्ठा राखण्याची व त्यांच्या कल्याणात स्वतःचे सौख्य मानण्याची शिकवण या प्रतिज्ञेत आहे. बहुसंख्य शाळा या प्रतिज्ञेचा उपयोग ती शिकवण भावनिक

विकासाच्या दृष्टीने तर राहोच, पण बौद्धिक विकासाच्या दृष्टीने देण्याकडे करीत नाहीत म्हणून म. रा. पा. पु. मंडळाने ती प्रतिज्ञा नवीन पहिल्या बालभारती पुस्तकातून उडवून लावली आहे.

## सर्वदूर प्रचार व दृढ आचार आवश्यक

वरील विवेचनावरून हे स्पष्ट आहे की, शिक्षणात क्रांतिकारक बदल राहोच; पण सुधारणा करावयाची म्हटली तरी तिचा सर्व स्तरांवर सर्वदूर प्रचार झाला पाहिजे व जे प्रत्यक्ष कार्यवाही करणार त्यांच्याकडून त्यानुसार आचाराची खात्री करून घेतली पाहिजे. अन्यथा हा सुधारणांचा सी-सॉ खेळ असाच चालू राहतो – राहील.

## शिक्षण सुधारणेला आणखी एक शाप

शिक्षण सुधारणेला भारतात आणखी एक शाप आहे. जी व्यक्ती एखाद्या सुधारणेचा पुरस्कार करते, त्या सुधारणेचा सर्वंकष विचार होऊन तिची अंमलबजावणी व्हायची वेळ येईपर्यंत ती व्यक्ती त्या पदावर राहिलेली नसते, हा तो शाप होय. श्री. चिं. द्वा. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एन्. एस्. एस्. समिती नेमली गेली. बॅ. छगला यांनी अ. भा. शिक्षणमहामंडळ नेमले; पण त्यांची प्रतिवृत्ते येईपर्यंत वा कार्यवाहीचा विचार होईपर्यंत या थोर व्यक्ती त्या त्या पदांवर राहिल्या नाहीत. अशी अनेक उदाहरणे देता येतील. काही वेळा सुधारणांच्या कार्यवाहीस सुरुवातही झाली; पण लगेच अधिकृत व्यक्ती बदलली व त्यामुळे तिच्या कार्यवाहीत थंडाई आली वा ती स्थगित झाली. नवा शिक्षणविचार व त्याची कार्यवाही याबाबत उच्चपदस्थ व्यक्तींच्या पदस्थानात बदल हाही शिक्षणसुधारणेस हानिकारक ठरला आहे.

शिक्षणमार्गावरील या खाचखळग्यांची नोंद घेतल्याशिवाय यापुढेही शिक्षण-सुधारणांची वाटचाल सुकर होणार नाही, हे निश्चित.

◻ ◻

# शैक्षणिक उत्पादकता

## प्रा. वि. उ. चांदुरकर

### शिक्षकांची सद्यःस्थिती

आचार्य कुलाच्या प्रचाराच्या निमित्ताने विविध शाळा–कॉलेजांतील शिक्षकांशी विचारविनिमय करताना पुष्कळदा जाणवते की, आपल्या शिक्षकाला आज एक प्रकारच्या वैफल्याने ग्रासले आहे. त्याने आपले काम निष्ठेने व मेहनतीने पार पाडले तरीही त्याला त्याचे पारिश्रमिक किंवा श्रेयही मिळत नाही. यामुळे कोणताही राष्ट्रीय ध्येयवाद हे त्याला केवळ स्वप्नरंजन वाटते. एका ज्येष्ठ शिक्षकाने मला एकदा परखडपणे सुनावले, " आजकाल कुठेही पाहा, प्रामाणिक, निष्ठावान शिक्षकाची परवड होत आहे. कारण आम्ही लोक संप करीत नाही; गोंधळ घालीत नाही; किंवा शाळेच्या कामात कसलाही व्यत्यय आणीत नाही. यामुळे आमच्या कामाची कदरच होत नाही. वस्तुतः आजच्या समाजधुरीणांना व्यत्यय–मूल्याची ( Nuisance Value ) किंमत वाटते. यामुळे शाळेत कमी शिकवून खाजगी शिकवणीचे वर्ग भरविणारे, संप करून नारेबाजी करणारे, मुलांना परीक्षांत कॉप्या करायला प्रोत्साहन देऊन आपले निकाल वाढवून घेणारे, हांजीखोर शिक्षकच अधिक हुशार व प्रतिष्ठेच्या पदासाठी योग्य मानण्यात येतात. " आजच्या विद्यालयाचे हे चित्रण अतिरंजित असले तरी वस्तुनिष्ठ नाही, असे म्हणता येत नाही. शाळाचालकांना फक्त निकालाचे फुगलेले आकडे हवे असतात. ते कसे फुगविण्यात आले आहेत याबद्दल त्यांना कसलाही विधिनिषेध नसतो. चालकांच्या अशा वृत्तीमुळे काही ध्येयवादी मुख्याध्यापकही इतके हतोत्साहित झाले आहेत की, शाळा खऱ्या अर्थाने आदर्श करण्यासाठी अहोरात्र मेहनत करून रक्ताचे पाणी करण्यात त्यांना काही अर्थ वाटत नाही. आजच्या शैक्षणिक वातावरणात प्रामाणिक शिक्षकाची अशी विकृत प्रतिक्रिया का होत आहे, हा आजचा एक ज्वलंत प्रश्न आहे.

यासंबंधी सामान्य शिक्षक विचार करतो की, शिक्षकाचा पेशा निष्ठेने व मेहनतीने करणाऱ्यालाही बेजबाबदार व आळशी शिक्षकाइतकेच वेतन व प्रतिष्ठा मिळत असेल, तर त्याने निष्ठावान का व्हावे ? असाच प्रश्न कारखान्यातील कामगार पूर्वी विचारीत असत. खूप खपून भरपूर उत्पादन देणाऱ्या कामगारालाही आळशी व मंद कामगारा-इतकेच वेतन मिळत असल्यास त्याने उत्पादन वाढविण्यासाठी इतकी मरमर का करावी ! प्रश्न अगदी रास्त आहे. यामुळे आधुनिक कारखान्यात या प्रश्नाकडे अधिक जिव्हाळ्याने

पाहण्यात येते. तेथे श्रमिकाचे वेतन व वेतनेतर सवलती त्याच्या उत्पादकतेशी प्रत्यक्षपणे निगडित ठेवण्यात येतात. यामुळे श्रमिक आपली उत्पादकता जसजशी वाढवीत जातो, तसतसे त्याचे वेतनमान व भविष्यात बढतीच्या संधीही वाढत जातात. यामुळे गुणवान व गुणहीन कामगारांतील अंतर त्याच्या पगारपत्रकावरून सहज कळून येते. येथे प्रश्न असा उद्भवतो की, शैक्षणिक क्षेत्रातही पगारमान अशाच प्रकारे गुणवत्तेशी किंवा उत्पादकतेशी निगडित का असू नये ?

## उत्पादकतेची संकल्पना ( Concept of Productivity )

ही उत्पादकतेची संकल्पना मुळात उत्पादक व्यवसायांशी संबंधित आहे. दोन कारखान्यांत समप्रमाणात भांडवलगुंतवणूक झाल्यास उत्पादनही समान होईल असे सांगता येत नाही. प्रत्येक कारखान्याची उत्पादकता भिन्न असू शकते नि उत्पादननियोजनाचे कौशल्य, अनुपयोजित क्षमता ( Idle capacity ), श्रमसंघर्षाची अवस्था, इ. अन्य कारणांव्यतिरिक्त श्रमिकांचे मनोबल ( Morale ) व उत्पादकता यांवर मुख्यत्वे अवलंबित असते. कर्मचारी प्रबंधनात ( Personnel Management ) श्रमिकांच्या मनोबलाची म्हणजे उत्पादक कार्यक्रमाशी श्रमिकांनी एकरूप होण्याची जितकी काळजी घेतली जाते तितकीच त्यांची वैयक्तिक उत्पादकता वाढवण्यासाठीही घेण्यात येते. त्यासाठी शीण-अभ्यास ( Fatigue Study ), श्रम अभ्यास ( Motion Study ) यांचा उपयोग करून श्रमिकांना उत्पादकता वाढविण्यासाठी मौद्रिक व मौद्रिकेतर प्रेरणा ( Incentives ) देण्यात येतात. या प्रयोगांची यशस्विता मोजण्यासाठी श्रमिकांचे व अधिकाऱ्यांचे गुण-मूल्यांकन ( Merit Rating ) करून श्रेष्ठ गुणवत्तेसाठी अतिरिक्त वेतन देण्यात येते. यामुळे समान प्रकारचे काम करणाऱ्या दोन श्रमिकांच्या वेतनात त्यांच्या उत्पादकतेनुसार फरक पडत जातो. परिणामतः आपला अभ्युदय करू इच्छिणाऱ्या महत्त्वाकांक्षी कामगारांना आपली उत्पादकता महत्तम वाढण्यासाठी आपोआप प्रेरणा मिळत जाते.

उत्पादकतेचा प्रश्न कामगारांच्या वैयक्तिक हिताचाच आहे असे नव्हे, तर कामगारांच्या सामुदायिक कल्याणाचाही असल्यामुळे तो श्रमसंघाच्याही जिव्हाळ्याचा झाला आहे. श्रमकल्याणाच्या दृष्टीनेही प्रत्येक कामगाराने तो जितका पगार घेतो त्यापेक्षा जास्त मूल्याचे उत्पादन केले नाही, तर कारखाना लवकरच बंद पडल्याशिवाय राहणार नाही, याची श्रमिक नेत्यांनाही जाणीव असते. यामुळे श्रमिकांची उत्पादकता वाढविण्याच्या योजनेशी हे नेतेही सहकार्य करतात. तद्वतच, शिक्षकांनीही विचार करायला हवा की, समाजापासून त्यांनी जी राष्ट्रवर्धिष्णू मूल्ये जितकी घेतली आहेत, त्यापेक्षा जास्त त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांत संक्रमित केली नाहीत तर राष्ट्राची अवनती झाल्याशिवाय राहणार नाही. वैयक्तिक दृष्टीनेही शिक्षक जितका पगार घेतो त्यामानाने संस्थेला व समाजाला उपयुक्त सेवा देतो काय, याचा विचारही प्रत्येक प्रामाणिक शिक्षकाने करणे आवश्यक आहे;

परंतु आज शिक्षकसंघटनांच्या मागण्या पाहिल्या तर पगारवाढ भरपूर द्या, कामाचे तास कमी करा आणि सुट्ट्या व आराम भरपूर द्या, अशा प्रकारच्या आढळतात. पगारवाढीसाठी या संघटनांचे प्रयत्न गैर आहेत असे म्हणता येत नाही. उलट ते प्रस्तुत परिस्थितीत अत्यावश्यकच आहेत; परंतु त्याचबरोबर पगारवाढीच्या मोबदल्यात शिक्षकसंघटना शाळांना किंवा समाजाला किती व कोणत्या रूपात मोबदला देऊ इच्छितात याबद्दलही त्यांनी तितकीच स्पष्ट अभिवचने द्यावयास हवी. इतकेच नव्हे, तर शिक्षकांची गुणवत्ता वाढविण्यासाठीही त्यांनी संघटितपणे प्रयत्न करायला हवे. तसेच गुणवान व व्यासंगी शिक्षकांना त्यांच्या कष्टांचे व प्रयत्नांचे अतिरिक्त पारिश्रमिक मिळाले पाहिजे. यासाठीही त्यांनी प्रयत्नशील असायला हवे. आणि आळशी, कामचुकार शिक्षकांना योग्य शासन झाले पाहिजे, यासाठीही संघटनेचे वजन खर्च करायला हवे; पण आजच्या शिक्षकसंघटना शिक्षकांच्या लायकीचा मुळीही विचार करीत नाहीत, ती वाढविण्यासाठी त्यांच्याजवळ कोणतीही योजना नाही. उलट नालायक शिक्षकांना शाळेने शासन केल्यास त्यांचा पक्ष घेऊन संघर्षाला तयार होतात. यामुळे अकार्यक्षमतेला प्रोत्साहन मिळते.

## शिक्षण उत्पादक प्रयत्न आहे काय ?

कारखान्यात मालाचे व सेवांचे उत्पादन होत असल्यामुळे त्यांचे प्रयत्न उत्पादक आहेत असे मानण्यात येते. याविरुद्ध शाळा व महाविद्यालये कोणत्याही प्रकारच्या मालाची किंवा सेवांची निर्मिती करीत नसल्यामुळे या संस्थांचे कार्य उत्पादक प्रयत्नात ( Productive effort ) समाविष्ट करावे किंवा नाही याबद्दल संभ्रम निर्माण होतो; परंतु बारकाईने विचार केला तर शिक्षण हादेखील उत्पादक प्रयत्नच होय हे दिसून येईल. नफा कमावणे हा विद्यालयांचा उद्देश नसल्यामुळे त्यांना ‘ व्यवसाय ’ (Business) म्हणता येत नाही. तरीही विद्यार्थ्यांत उत्पादक पात्रता व सामाजिक मनोबल ( Social morale ) निर्माण करणे हा शिक्षणाचा एक प्रमुख उद्देश असल्यामुळे शिक्षणालाही उत्पादकप्रयत्न म्हणायला प्रत्यवाय असू नये. राष्ट्राच्या उभारणीकरिता उत्पादकप्रयत्नांची नितांत गरज असते. त्यासाठी आवश्यक असलेली उत्पादक पात्रता शिक्षणामुळेच निर्माण होते. अशिक्षित कामगारापेक्षा सुशिक्षित किंवा प्रशिक्षित कामगार जास्त उत्पादन करू शकतात. उत्पादनकार्यात शिक्षणाचे हे महत्त्व ओळखून आधुनिक व्यवसाय स्वतःच्या प्रशिक्षणशाळा चालवीत असतात व त्यावरील खर्चही ‘ उत्पादक खर्च ’ मानला जातो. यामुळे आर्थिक नियोजनाच्या कक्षेत शिक्षणावरील खर्चही उत्पादक खर्च मानण्यात आला पाहिजे. शिक्षण हादेखील एक उत्पादक प्रयत्न आहे असे मानले तर उत्पादकतेची व्यावसायिक संकल्पना शिक्षणकार्यालाही आपोआप लागू होते.

## उत्पादकता म्हणजे काय ?

श्रमिकांची उत्पादकता म्हणजे त्याने केलेले प्रत्यक्ष उत्पादन नसून, आपल्या

वेळेचा, विचारशक्तीचा व श्रमाचा संस्थेसाठी व पर्यायाने समाजासाठी जास्तीत जास्त सदुपयोग करण्याची त्याची प्रवृत्ती वा क्षमता होय. माणसाचा वेळ, विचार व श्रम म्हणजे शारीरिक हालचाल एखाद्या बिनतोटीच्या नळाप्रमाणे अखंड वाहत असतात. प्रयत्न करूनही या तीन गोष्टी साठवून ठेवता येत नाहीत. माणसाला पर्याय फक्त इतकाच असतो की, त्याने या तिन्ही गोष्टींचा सदुपयोग करावा की दुरुपयोग ? शिक्षकाच्या बाबतीत, तो आपल्या वेळेचा उपयोग ज्ञानार्जनासाठी किंवा ज्ञानदानासाठी करू शकतो किंवा कादंबऱ्या वाचण्यासाठी व चकाट्या पिटण्यासाठी करू शकतो. तो आपल्या विचारांचा उपयोग विधायक कार्यासाठी किंवा विघातक कार्यासाठीही करू शकतो. तसेच आपल्या शारीरिक हालचालीचा उपयोग कोणत्यातरी मूल्यांच्या निर्मितीसाठी करू शकतो किंवा आराम घेण्यासाठी वा झोपा काढण्यासाठी करू शकतो. या तिन्ही बाबी शिक्षकाचे भांडवल होय. त्यांचा संस्थेसाठी व समाजासाठी जास्तीत जास्त सदुपयोग करण्याच्या प्रवृत्तीला शैक्षणिक उत्पादकता म्हणता येईल. प्रा. रामन यांच्या मते उत्पादकता ही अशी जीवनदृष्टी व मानसिक अवस्था होय की, ज्यात आपल्या संसाधनांचा महत्तम उपयोग करून अपव्यय व निष्क्रियतेविरुद्ध सतत संग्राम चालू असतो. आपल्या भोवतालची परिस्थिती सुधारविण्यासाठी सतत प्रयत्न चालू ठेवून, इतरांना आपापली कामे अधिक चांगली करण्यासाठी अभिप्रेरण करण्यात येते.

( "Productivity is a war on waste and inefficiency; a craze for utilisation of resources effectively; it is a way of life and an attitude of mind; it is a constant and continuous effort at improving things; it means motivating people to do things better."

— Shri **M. V. V. Raman**

in 'Productivity & Economic Growth' )

यावरून दिसून येईल की, उत्पादकता म्हणजे केवळ वस्तूंचे किंवा सेवांचे महत्तम उत्पादन नव्हे; तर प्रस्तुत परिस्थितीत सतत सुधारणा करण्याची ती एक जिद्द होय. यामुळे उत्पादक शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांचे, संस्थेचे व समाजाचे अधिकाधिक कल्याण कसे साधता येईल, यासाठी सतत चिंतनशील असतो. त्यासाठी तो नेहमी नवनवे प्रयोग करीत जातो व आपल्याबरोबर इतर सहशिक्षकांनाही या दिशेने प्रोत्साहित करीत जातो. जेम्स लंडीच्या मते उत्पादकतेची जाणीव समाजाच्या महत्तम कल्याणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न करण्यास प्रेरित करते.

" It follows therefore that, if there is to be maximization of social welfare through productivity consciousness, each individual must contribute his most effective effort."

— **James Lundy** in ' Industrial Management '

वरील विवेचनावरून दिसून येईल की, उत्पादकतेचा संबंध मालाच्या व सेवांच्या उत्पादनाशी जितका आहे त्यापेक्षाही आपल्या गृहीत कार्यासाठी कायावाचामने वाहून घेण्याशी अधिक आहे. शिक्षणक्षेत्रात तो उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा विद्यार्थी, संस्था व समाजाच्या हितासाठी शिक्षकांना असलेल्या कळकळीशी अधिक निकट आहे. कारण उत्पादकता ही समाजाभिमुख विधायक प्रवृत्ती आहे; ती वाढल्यास स्वार्थी संकुचित विचारांचा आपोआप लय होतो.

## उत्पन्न व उत्पादकता

माणूस कशासाठी कष्ट करतो ? या प्रश्नाचे उत्तर 'पैशासाठी!' असे चटकन देण्यात येते. पैसा ही माणसाला कष्टाला प्रवृत्त करणारी आर्थिक प्रेरणा होय, यात शंका नाही; पण माणसाच्या कष्टप्रवृत्तीची ही समग्र मीमांसा झाली काय ? एका शिक्षकाला मी एकदा विचारले, " तुमचे उत्पादन किती आहे ? " तो चटकन म्हणाला " ४५० रुपये! पण मी लवकरच शिकवण्याचे वर्ग सुरू करून ते १००० रुपयापर्यंत वाढविणार आहे. " असे शिक्षक आपले उत्पन्न व उत्पादन यांत फरक करीत नाहीत. सामान्य शिक्षक आपल्या कष्टाची उन्नती फक्त उत्पन्नातच पाहतो; आपण विद्यार्थी किती व कसे तयार करतो याचा तो विचारच करीत नाही. पैसा ही माणसाला कष्ट करायला लावणारी एकमेव प्रेरणा आहे ही जीवनाची एकात्मक चिकित्सा ( Monistic Theory ) आधुनिक समाजशास्त्रज्ञांनी फेटाळली आहे. माणसाला आपल्या व्यवसायाबद्दल आत्मीयता, सर्व संबंधितांकडून चांगली वागणूक, जनसेवेचे श्रेय, इ. अनेक प्रकारचे समाधान हवे असते. तस्करीच्या व्यवसायात उत्पन्न भरपूर मिळेल, पण समाधान मिळणार नाही. यामुळे दुसरी कमी उत्पन्नाची नोकरी मिळाली तरी तो तस्करी सोडून देईल. कारण आपण आपल्या कष्टामुळे समाजाला किती लाभ देतो व त्याचा मोबदला म्हणून आपण किती पगार घेतो, या दोहोंच्या सम्यक् संतुलनावरच माणसाचे व्यावसायिक समाधान अवलंबित असते.

असे असले तरी काही शिक्षक आपल्या उत्पन्नालाच आपली उत्पादकता मानतात. विनोबा म्हणतात, " केवळ पगारासाठीच काम करणारे ' पगारबंद शिक्षक ' खरे शिक्षकच नव्हेत. कारण त्यांची बुद्धी समाजपुरुषाला सोडून देहाच्या दारची बटीक बनलेली असते. अशी बुद्धी व्यभिचारिणी होय. असे शिक्षक आपले उत्पन्न वाढविण्यासाठी शाळेत कमी

शिकवून शिकवण्या मिळविण्यासाठी तऱ्हेतऱ्हेच्या लांड्यालबाड्या करतात. मुलांना कॉप्या करण्यात मदत करून परीक्षेत उत्तीर्ण करून घेतात. शैक्षणिक क्षेत्रातील ह व्यभिचार म्हणजे शिक्षणाचे बीभत्स रूप होय. शिकवण्यावर जगणाऱ्या अशा शिक्षकांना मनूने ' मृतकाध्यापक ' म्हटले आहे. कारण अज्ञान, गरिबी, परपीडा, इ. सामाजिक दोषांबद्दल त्यांचे मन मेलेले असते."

## पगारवाढ ही उत्पादक प्रेरणा आहे काय ?

वरील विवेचनाचा अर्थ शिक्षकाने प्रतिष्ठित जीवनासाठी आवश्यक इतका पगार मिळविण्यात प्रयत्नशील असू नये असा होत नाही. वस्तुतः समाजात प्रतिष्ठित जीवनमान हा शिक्षकाचा अग्रहक्क आहे. घरी खाण्यापिण्याची विवंचना असलेला शिक्षक समाजासाठी कायावाचामने झटू शकत नाहीं. यामुळेच शिक्षकांचे पगारमान व्यवस्थित असावे याबद्दल वाद नाही. तरीही केवळ वेतनवाढ दिल्यानेच शिक्षकांची उत्पादकता वाढत जाईल असेही म्हणता येत नाही. याबद्दल मार्च व सायमन या शास्त्रज्ञांनी म्हटले आहे की, उत्पादकता वाढण्यासाठी सेवकाला प्रस्तुत व भविष्यकालीन परिस्थितीबद्दल किमान असंतोष वाटायला पाहिजे आणि तो दूर करण्यासाठी करावयाच्या प्रयत्नातून अपेक्षित समाधान मिळेलच, हा विश्वासही असायला हवा.

" Motivation to produce stems from a present or anticipated state of discontent and a perception of a direct connection between individual effort and a new state of satisfaction "

— March & Simon

याचा अर्थ असा की, ज्याला आपल्या उत्पन्नाबद्दल मुळीही असमाधान नाही असा माणूस अतिरिक्त श्रम करण्यासाठी प्रवृत्त होणार नाही. यामुळे भरपूर पगारवाढ दिल्याने उत्पादकतेऐवजी आलस्य निर्माण होण्याची शक्यता अधिक असते. प्रा. हाइन्स व मॅसी यांनीही या मताला पुष्टी दिली आहे.

" A good situation of productivity is one, in which the workers are slightly restless with their present status and therefore are seeking ways of improving it through their own effort. "

**W. Warren Haynes &**
**Joseph L. Massie**

तात्पर्य, शिक्षकांचे केवळ पगार भरपूर वाढविल्याने त्यांची उत्पादकता वाढेलच असे सांगता येत नाही. नुकतेच महाविद्यालयीन शिक्षकांना यू. जी. सी.चे रु. ७०० ते रु. १६०० हे नवे पगारमान लागू करण्यात आले आहे. यामुळे प्रत्येक प्राध्यापकाला सुमारे रु. २०० ते रु. ३०० इतकी पगारवाढ मिळाली आहे. आता यामुळे हा प्राध्यापकवर्ग अधिक तळमळीने शिकवू लागेल काय ? किंवा खाजगी शिकवण्या करण्याची त्यांची लालसा कमी होईल काय ? खरे म्हणजे या अतिरिक्त धनप्राप्तीचा समाजाला आपण कोणता अतिरिक्त मोबदला देणार आहोत, याचा प्राध्यापकांनी व त्यांच्या संघटनांनी विचार करायला हवा. त्यासाठी प्रथम त्यांना स्वतःच्या प्रयत्नातील, महाविद्यालयाच्या परिस्थितीतील व समाजाच्या अवस्थेतील न्यूनत्त्वाची तीव्र जाण असली पाहिजे. अशा सामाजिक जाणिवेच्या पोटीच शिक्षक विधायक प्रयत्न करून आपली उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतो.

## कशाची उत्पादकता ?

कारखान्यातील कामगारांना कोणता माल उत्पन्न करावयाचा; किंवा रेल्वे, बँका, व्यापारिक इ. संस्थांत कामे करणाऱ्या सेवकांना कोणत्या सेवा समाजाला द्यावयाच्या, याची सुस्पष्ट कल्पना असते; परंतु शाळा-कॉलेजातील शिक्षकांना आपण कोणत्या मूल्यांची उत्पत्ती विद्यार्थ्यांत करावयाची आहे याची सुस्पष्ट कल्पना असलेली दिसून येत नाही. बहुसंख्य शिक्षकांना अभ्यासक्रम शिकविण्याच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना वर्गात गुंतवून ठेवण्यासाठीच आपल्याला पगार मिळतो असे वाटते. वस्तुतः शिक्षकांनी विद्यार्थ्यांत समाजोपयोगी उत्पादक पात्रता व गुणवत्ता यांची निर्मिती करावयाची असते. विद्यार्थी लहानाचे मोठे आपोआप होतात; परंतु त्यांच्यात बौद्धिक विकास, अंतःकरणाची विशालता, समाजऋणाची परतफेड करण्याची तळमळ, व्यापक राष्ट्रीय भावना आदी गुणांची वाढ आपोआप होत नाही. हे गुण विद्यार्थ्यांत निर्माण करून जोपासावे लागतात. सामान्य विद्यार्थ्यांतून समाजोपयोगी असामान्य व्यक्तिमत्त्व निर्माण करण्याची किमया शिक्षकाने करून दाखवायची असते. विनोबा म्हणतात, ‘ आवळयाएवढ्या पूज्यातून भोपळयाएवढे पूज्य निर्माण करणे म्हणजे शिक्षण होय. एका पूर्णातून दुसरे पूर्ण काढावयाचे असते. ‘ पूर्णात्पूर्णमुदच्यते ! ’

हे मोठे ‘ पूर्ण ’ काढण्यासाठी शिक्षकाने प्रथम स्वतःत पूर्णत्व आणले पाहिजे. विनोबांच्या मते शिक्षकांत पूर्णत्व येण्यासाठी योग, उद्योग व सहयोग या तीन मूल्यांचा परिपोष झाला पाहिजे. योग म्हणजे चित्तशुद्धी व स्थितप्रज्ञता. त्यासाठी स्वतःचे शरीर, मन व आत्मा यांचा संतुलित विकास साधणे आवश्यक असते. येथे आत्म्याचा विकास म्हणजे आत्मज्ञान असा घ्यावा. उद्योग म्हणजे निसर्गाशी एकचित्त होणे. निसर्गाने जी भौतिक सुखाची साधने दिली आहेत त्यातून समाजोपयोगी वस्तू व सेवा निर्माण करण्याची धडपड म्हणजे उद्योग होय. अशा धडपडीतूनच निसर्गाशी एकचित्त होता

येते. अर्थशास्त्रातही निसर्ग ( Land ) हा उत्पादनाचा प्राथमिक घटक मानण्यात आला आहे. तिसरे मूल्य सहयोग. याचा अर्थ विनोबांनी सर्वांप्रती समभाव असा केला आहे. येथे समभावाचा अर्थ सामाजिक भावना असा घेतला पाहिजे. आपण केवळ स्वतःसाठी जगत नसून समाजासाठीही जगत असतो. कारण त्याच्याशिवाय आपण सुखी जीवन जगू शकत नाही. ज्या समाजाने आपल्याला घडविले आहे त्या समाजाचे ऋण फेडण्यासाठी तळमळ म्हणजे समभाव. व्यापक दृष्टया हा अर्थ समाजवादापर्यंत जाऊन पोहोचतो.

विद्यार्थ्यांत अशा प्रकारे योग, उद्योग व सहयोगाची बीजे प्रभावीपणे रुजविण्याचे महत्त्वाचे कार्य शिक्षकांना करावयाचे असते. माध्यमिक मंडळाने किंवा विद्यापीठाने नेमलेला अभ्यासक्रम व पुस्तके ही केवळ निमित्तमात्र असतात. या क्रमिक अभ्यासाच्या निमित्ताने शिक्षकाचा विद्यार्थ्यांशी जो दैनंदिन संपर्क प्रस्थापित होतो त्यातून ही जीवनदायी मूल्ये शिक्षकाने विद्यार्थ्यांत संक्रमित करावयाची असतात. शिक्षकाची उत्पादकता अशा प्रकारच्या जीवनदायी मूल्यांनी भारलेल्या जिवंत मूर्ती घडविण्यावर अवलंबित असते.

## उत्पादकताधिष्ठित वेतनपद्धती

शैक्षणिक उत्पादकतेची संकल्पना वर विशद केल्याप्रमाणे स्पष्ट केल्यावर अशा उत्पादकतेशी निगडित वेतनप्रणाली कशी ठरविली जावी याचा विचार केला जाऊ शकतो. प्रथमतः हे मान्य केले पाहिजे की, समाजविकासासाठी समर्पित जीवन जगणाऱ्या उत्पादक शिक्षकांना न्यून उत्पादक किंवा अनुत्पादक शिक्षकांच्या बरोबरीचेच वेतन मिळत असेल तर, आपली उत्पादकता वाढविण्यासाठी जीवाचा आटापिटा करण्याची त्यांना पुरेशी प्रेरणा मिळणार नाही. म्हणून शिक्षकाचे वेतन ठरविताना त्यांच्या श्रेष्ठ-कनिष्ठतेचा विचार होणे आवश्यक आहे. शिक्षकांचे वेतन त्यांच्या गुणवत्तेशी बांधलेले असावे, असा आग्रह शिक्षकसंघटनांनीही धरायला हवा व आवश्यक असेल तर त्यासाठी विधायक आंदोलनही करायला हवे.

शैक्षणिक उत्पादकतेची ही संकल्पना बऱ्याच अंशी गुणात्मक असल्यामुळे तिचे मूल्यमापन कसे व्हावे, ही अडचण निर्माण केली जाऊ शकेल; परंतु आजच्या विज्ञाननिष्ठ युगात गुणमूल्यांकनाचा प्रश्न फारसा अवघड वाटू नये. ज्या शिक्षकाने ही जीवनमूल्ये आत्मसात करून आचार्यपद मिळविले आहे, त्याच्या दैनंदिन जीवनातच त्याची विद्यार्थीनिष्ठा, ज्ञाननिष्ठा व समाजनिष्ठा आपोआप प्रकट होतील. आईच्या मातृप्रेमाचे मोजमाप न करताही मुलाला अनंत लहानमोठ्या प्रसंगांतून ते आपोआप कळून येते. तसेच या निष्ठांचा प्रत्यय विद्यार्थ्यांना, शाळाचालकांना व गावालाही पदोपदी येत जातो.

हे तिन्ही गुण स्वभावात्मक असले तरी आधुनिक गणन पद्धतीने त्यांचे मोजमापही केले जाऊ शकते. आधुनिक व्यवसायप्रबंधनात अशाच प्रकारे वेतनस्तर ठरविण्यात येतात. तेथे प्रत्येक कामाचे कार्यमूल्यांकन ( Job-evaluation ) करून ते कार्य सामान्य

क्षमतेने पार पाडल्यास त्याचे वेतन किती असावे, हे प्रथम कामगाराच्या त्या कामासाठी आवश्यक गुणसमुच्चयावरून ठरविण्यात येते. तितके वेतन तर प्रत्येकाला मिळालेच पाहिजे; परंतु प्रत्यक्षात प्रत्येक कामगाराची उत्पादकता वैयक्तिक गुणानुसार वेगवेगळी राहू शकते. या गुणांचे मात्रीकरण ( Quantification ) करून त्याचा गुणनिर्देशांक ( Quality Index Number ) काढण्यात येतो व त्यानुसार अतिरिक्त गुणवत्तेसाठी अतिरिक्त वाढावा देण्यात येतो. आजकाल प्रामाणिकपणा, प्रयोगक्षमता, स्वयंप्रेरणा ( Initiative ), आत्मीयता इ. गुणांचे मात्रीकरण करण्याची अनेक मनोवैज्ञानिक तंत्रे विकसित झाली आहेत. त्यासाठी अनेक मनोवैज्ञानिक सल्लागार ( Consultant Psychologists ) विदेशाप्रमाणेच मुंबई–कलकत्त्यातही अत्यंत उपयुक्त मार्गदर्शन करीत आहेत. त्यांचे तंत्र अनुसरून शिक्षकांच्या उत्पादकतेचेही मूल्यमापन चालकांना व शिक्षक संघटनांना करून घेणे सहज शक्य आहे. या दोन्ही पक्षांतील सहकार्याने शिक्षकांचे गुणवत्ता निर्देशांक काढण्यात आल्यास त्यांच्या मदतीने शैक्षणिक उत्पादकता वाढविण्यासाठी प्रोत्साहक अभिप्रेरणा सहज देता येतील. त्या मौद्रिक व अमौद्रिक ( Nonmonetary ) रूपांत कोणत्या व किती प्रमाणात देणे इष्ट आहे हे सहज ठरविता येईल.

आजचे शिक्षकांचे वेतनमान ‘ सब गधे घोडे साडेबारा टक्के ’ अशा प्रकारचे असल्यामुळे गुणवत्ता वाढविण्याला प्रोत्साहन मिळत नाही; परंतु वरीलप्रमाणे गुणवत्ता निर्देशांक मोजून श्रेष्ठ दर्जाच्या शिक्षकाला मूळ वेतनाव्यतिरिक्त सढळ प्रमाणात गुणवत्ता वाढ ( Productivity payrise ) देण्यात आल्यास शिक्षकांतही आपली उत्पादकता वाढविण्यासाठी अहमहमिका सुरू होईल. वरिष्ठ उत्पादकतेला संस्थेत व समाजातही योग्य सन्मान लाभल्यास समाजाभिमुख कार्याबद्दल नवा उत्साह शिक्षकांत निर्माण होईल व आज सर्वत्र दिसून येणारे शैथिल्य, वैफल्य, स्वार्थांधता हळूहळू पण निश्चितपणे लोप पावू लागेल. असा उत्पादकताधिष्ठित ( Productivity oriented ) दृष्टिकोन शिक्षकाच्या, विद्यालयाच्या व समाजाच्याही फायद्याचा असल्यामुळे अशा वेतनपद्धतीसाठी सरकारही सढळपणे अनुदान देऊ शकेल. शिक्षकवर्ग अशा प्रोत्साहनामुळे आचार्यपदास पात्र ठरल्यास समाजपरिवर्तनासाठी योग्य पिढी निर्माण करण्याचे शैक्षणिक कार्य अधिक प्रभावीपणे होऊ लागेल.

□ □

# विकासवाडीचे विकसते कमळ

## अनुताई वाघ

आदरणीय श्री. मामासाहेब क्षीरसागर यांच्या गौरवानिमित्त एक ग्रंथ प्रकाशित होतो आहे, ही गोष्ट उचितच आहे. सद्विचारांचा प्रचार व सत्कार्याच्या प्रेरणा देणे, हे मामासाहेबांचे जीवनकार्य आहे. अनेकांना त्यांनी प्रेरणा दिलेली आहे आणि त्यांचे हे मार्गदर्शन दीर्घकाळपर्यंत मिळो, अशी सदिच्छा आहे.

मामासाहेबांप्रमाणेच कै. पूज्य श्रीमती ताराबाई मोडक यांनीही आपल्या आवडत्या क्षेत्रास वाहून घेतले होते– ते म्हणजे शिक्षणक्षेत्र. कै. ताराबाई जातिवंत शिक्षिका होत्या. कोणतीही गोष्ट कोणासही कशा रीतीने दाखवावी, शिकवावी, हे त्यांना चांगलेच माहीत होते. म्हणून कोणत्याही स्तरावरील शिक्षणकार्याविषयी त्या मार्गदर्शन करू शकत होत्या; पण त्यांनी आपले कार्यक्षेत्र बालशिक्षणापुरते मर्यादित करून घेतले. पूर्वप्राथमिक शिक्षणाची आपल्या देशात अत्यंत गरज आहे, हे त्यांना पटले होते. आणि म्हणून प्रथम भावनगर येथे श्री. गिजुभाई बधेका यांच्याबरोबर ९ वर्षे त्यांनी या क्षेत्रात प्रयोगात्मक काम केले. भारतीय परिस्थितीस मिळतेजुळते आणि प्रगती करणारे असे पूर्वप्राथमिक शिक्षणाचे तंत्र त्यांनी येथे प्रस्थापित केले. पुढे मुंबई येथे शिशुविहार मंडळामार्फत ' शिशुविहार ' हे बालमंदिर काढले. यात गुजराती व मराठी दोन्ही भाषी मुले होती. येथेच पूर्वप्राथमिक अध्यापनाचेही तंत्र प्रस्थापित झाले. शहरातील सुसंस्कृत आणि श्रीमंत परिस्थितीतील बालकांनाही पूर्वप्राथमिक शाळांची आवश्यकता आहे, तसेच मध्यमवर्गीय बालकांसाठीही बालशाळांची आवश्यकता आहेच आणि मागासवर्गीय बालकांसाठीही अशा शाळांची आवश्यकता आहेच. मनुष्याच्या आयुष्यातील अडीच ते सहा वर्षे हे वय अत्यंत महत्त्वाचे आहे. या वयात होणाऱ्या विशिष्ट मानसिक व शारीरिक विकासाच्या दृष्टीने मुलांना जरूर त्या सोयी व संधी उपलब्ध करून देणे, हे पालकांचे, समाजाचे व शासकांचे कर्तव्य आहे. ही गोष्ट वेगवेगळ्या घरांतून शक्य होणार नाही, त्यासाठी सामुदायिक सोय असणे जरूर आहे. प्रत्येक गावात या वयाच्या मुलांसाठी ' बालशाळा ' असायलाच हवी. गावाच्या लोकसंख्येप्रमाणे त्या कमी–अधिकही असायला हव्या.

श्रीमती ताराबाई, ही गोष्ट आरंभी लेख, व्याख्याने, प्रदर्शने इत्यादी साधनांद्वारे जनतेस पटवून देत होत्या. त्याच वेळी खेडेगावात प्रत्यक्ष बालवाडी चालवून दाख-

विण्याचेही त्यांनी ठरविले. आणि १९४५ साली बोर्डी, जि. ठाणे, येथे त्यांनी प्रथम ग्रामीण बालवाडी सुरू केली. तेव्हापासून मी त्यांच्याबरोबर आहे.

बोर्डी हे गाव समुद्रकिनारी आहे. शांत, सुंदर असा परिसर, सुसंस्कृत ग्रामस्थ, आणि ऋषितुल्य आचार्य भिसे गुरुजी, चित्रे गुरुजी यांचे सत्प्रवृत्त करणारे कणखर वैचारिक प्रभुत्व, यामुळे बोर्डी गावाची मानसिक वृत्ती नव्या चांगल्या कामाचे सतत स्वागतच करीत असते.

ताराबाईंच्या बोर्डीच्या बालवाडीसही असेच ग्रामस्थांकडून सहकार्य मिळाले; पण खेडेगावात, कमी खर्चात, परिसरातील वस्तूंच्या साहाय्याने बालमंदिर चालविण्याचा हा त्यांचा प्रयोग होता. त्यामध्ये अनेक अपेक्षित व अनपेक्षित अडचणी आल्या. लहानशा गावात हरिजनवाडा पण आहे. तेथे बुरुडकाम चालते. पुरुष मंडळी बहुधा मुंबईस कामाला जातात. बायकामंडळी विक्रीसाठी करंड्या, टोपल्या, सुपे वगैरे विणण्याचे काम करतात. बालवाडीला लागूनच ही वस्ती असल्यामुळे ही हरिजनांची मुले बालवाडीत मोठ्या संख्येने येत होती; पण म्हणूनच गावातील सवर्णांची मुले येत नव्हती. त्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागले. प्रत्येक घरी जाऊन लोकांची समजूत घालावी लागली. गावात निरनिराळ्या गल्ल्यांतून, एखाद्याच्या प्रशस्त ओटीवर, त्या विभागापुरती मुले गोळा करून गाणी, गोष्टी सांगण्याचा परिपाठ ठेवला. या आमच्या प्रचारवाड्या. त्यामुळे गावातील मंडळींना बालवाडीचे महत्त्व पटले. मग गावाच्या मध्यवर्ती जागेत एक सात दिवसांचे बालशिक्षणनगर भरविले. मुलांनी बालवाडीत खेळायचे व पालकांनी लांब उभे राहून पाहायचे, अशी व्यवस्था होती. गावातील व हरिजनवाड्यातील मुले एकत्र खेळतील, बसतील, खातील–पितील अशासाठी वरीलप्रमाणे अनेक प्रयत्न झाले आणि ७–८ वर्षांनी आम्हाला यश मिळाले.

हरिजनांच्या मुलांना स्वच्छ करून घ्यावे लागले. मुलांची स्वच्छता करून घेणे हा खेडेगावातील व मागास वस्तीतील बालवाडीचा एक प्रमुख कार्यक्रम आहे; हे यामुळेच प्रस्थापित झाले.

खेडेगावात बालवाडी कशी चालवावी, हे एक काम घेऊन श्रीमती ताराबाई बोर्डीस आल्या; पण तेथे एका कामातून दुसरे काम निघत गेले. एका समस्येतून दुसरी समस्या निघत गेली. आणि त्यांची पूर्ती करताकरता आजची विकासवाडी विकसली, विकसते आहे. म्हणून ग्रामीण–शिक्षण–सरोवरातील विकासवाडी हे हळूहळू एकेका पाकळीने उमलत जाणारे कमळ आहे, असे मी मानते.

बोर्डीला गावातील सर्व जाती-जमातींची व समाजातील सर्व थरांची बालके बालवाडीत येऊ लागली. यशाचा हा पहिला टप्पा होता; पण यात अजून एक उणीव होती. जवळपास आदिवासींची वस्ती होती. गावात निरनिराळ्या कामासाठी आदिवासी येत असत. त्यांची मुलेही पुष्कळदा गावात येत होती. 'बालवाडीत पाठवा' म्हटले, तर 'क्या नाही!' म्हणजे 'का नाही' असे म्हणत. मुले बालवाडीत येतील असा

याचा भावार्थ होता; पण प्रत्यक्षात मात्र मुले आली नाहीत. मग आम्ही त्यांच्या वस्तीत जायला सुरुवात केली. ही आमची '**अंगणवाडी.**' एक पाकळी उमलली. आदिवासींच्या वस्तीत एखाद्या मोठ्या झाडाखाली आम्ही मुले गोळा करीत असू. गाणी, गोष्टी, खेळ, थोडा हस्तव्यवसाय, लहानशा सहली इत्यादी कार्यक्रम येथे होत असत. स्वच्छता तर सर्वप्रथम व्हायची. पाण्याची अडचण! मग आम्ही मुलांची अंगे ओल्या रुमालाने पुसून घेत असू. खरजेवर कडू लिंबाचा पाला वाटून लावायचा. कधी कधी त्यातल्या त्यात जवळपासच्या विहिरीवर नेऊन मुलांना आंघोळी पण घालायच्या.

या आमच्या अंगणवाडीमुळे आम्हाला खूप काही नवे शिकायला मिळाले. आदिवासी मुले बालवाडीत येत नाहीत. कारण (१) त्यांना त्यांची लहान भावंडे संभाळण्यासाठी घरी राहावे लागते. (२) त्यांना गुरे चारण्यासाठी जावे लागते. (३) थोड्याशा कमाईसाठी पण त्यांना कामाच्या पाठीमागे धावावे लागते. या त्यांच्या परिस्थितीस धरून योग्य अशी शाळा असायला हवी. यावर श्रीमती ताराबाईंनी चिंतन केले व अशी नवी शाळा म्हणजेच—'विकासवाडी.' जेथे तान्ह्या बाळांसाठी पाळणाघर, मधल्या मुलांसाठी बालवाडी व मोठ्या मुलांसाठी प्राथमिक शाळा असे तीनही विभाग एकत्र चालतात, ती '**विकासवाडी.**' ही आणखी एक पाकळी उमलली. अंगणवाडी चालविताना आणखीही काही गोष्टी आमच्या लक्षात आल्या. आदिवासी लोक कष्टाळू आहेत, प्रामाणिक आहेत, त्यांना संस्कृती आहे. अनेक वर्षे डोंगरकपारीत राहिल्यामुळे ही मंडळी सुधारित जगापासून दूर राहिली आहेत. म्हणून त्यांच्यातील अस्मिता निद्रिस्त आहे इतकेच.

आदिवासी मुले ही बुद्धिमान, चपळ, काटक आणि पडल्या प्रसंगास तोंड देणारी आहेत. त्यांचे डोळे तीक्ष्ण आहेत. नेम अचुक आहेत. विनोदवृत्ती, नृत्य आणि अभिनय त्यांच्यात भरपूर आहे. आदिवासींतील मंदबुद्धी अगर प्रश्नार्थी असे एकही मूल या वीस वर्षांत मला अजून आढळले नाही. खाणीत पडलेल्या या हिऱ्यांना वेचले पाहिजे—पैलू पाडले पाहिजेत. आमच्या भारताची ही चमकती रत्ने आहेत.

बोर्डीलाच १९५४ साली आम्ही एक लहानशी प्रयोगात्मक विकासवाडी चालवली. ती अनेकांना आवडली. 'सर्व भारतभर आदिवासी बालकांच्या शिक्षणाबाबत हीच समस्या आहे. तरी हा प्रयोग तुम्ही मोठ्या प्रमाणावर करा!' असा श्रीमती ताराबाईंना मंडळी आग्रह करू लागली. म्हणून मग जरा मोठ्या प्रमाणावर 'विकासवाडी योजना' त्यांनी तयार केली. विकासवाडी कमळाची ही आणखी एक पाकळी उमलली.

विकासवाडी योजनेमध्ये-पाळणाघर, बालवाडी व प्राथमिक शाळा, खालचे वर्ग मिळून एकत्र चालणारी विकासवाडी, या विकासवाड्यांचे तंत्र समजून घेऊन त्या यशस्वीपणे चालविण्यासाठी शिक्षक हवे म्हणून प्राथमिक शिक्षक ट्रेनिंग कॉलेज इतक्या गोष्टींचा अंतर्भाव होतो.

विकासवाडी योजनेद्वारा आदिवासी बालकांच्या शिक्षणाची समस्या सोडवायची होती. म्हणून जेथे आदिवासींची भरपूर वस्ती आहे, अशा ठिकाणी काम करावे, असे श्रीमती ताराबाईंनी ठरविले. श्री. हरिश्चंद्र पाटील– माजी कुलगुरू, राहुरी कृषि-विद्यापीठ यांनी कोसबाडला आग्रहाने बोलावले. आणि १९५७ साली बोर्डीची संस्था कोसबाडला आली. त्या वेळी समस्या होती– ( १ ) आदिवासी मुले शाळेत नियमितपणे येती कशी होतील ? ( २ ) ती शिकती कशी होतील ? ( ३ ) कोणत्या प्रकारचे शिक्षण त्यांच्या जीवनास उपयोगी ठरेल ?

या तीनही समस्या सोडविताना येथे विकासवाडी कमळाच्या आणखी पाकळ्या उमलल्या.

मुलांना गुरे चारायला जावे लागते. म्हणून तेथे कुरणात शिक्षकांनी जावयाचे, तेथे भुरभुरत्या पावसात, झाडांच्या छायेखाली शाळा भरवायची. गुरे इकडे तिकडे चरत असतात. मुलांची तिरपी नजर त्यांच्याकडे असते. तेथे या कुरणात गुरुजी मुलांचा गोष्टी, नाटके, अभिनयगीते, गप्पा गोष्टी इत्यादीं द्वारा भाषा, विज्ञान, भूगोल, आरोग्य, नागरिकशास्त्र इत्यादी विषयांमध्ये प्रवेश करून देतात. पाने, फुले, पिसे, काटक्या, अंडी, शंख, शिंपले आदी द्वारा गणित होते. निसर्गात विपुल शैक्षणिक साधने पडली आहेत. विनामूल्य मिळतात. फक्त आमची दृष्टी हवी. तेव्हा अशी ही '**कुरणशाळा**' ही एक नवी पाकळी उमलली.

मुलांना काम करावे लागते. म्हणून शाळेस जोडून छोटे छोटे व्यवसाय सुरू करण्यात आले. '**बालउद्योगालय**' ही एक आणखी पाकळी उमलली.

इतके करूनही कित्येक मुले शाळेत येत नाहीत. त्यांच्यासाठी '**रात्रीची शाळा**' आणखी एक नवी पाकळी उमलली. मुली शाळेत येत नव्हत्या. त्यासाठी स्त्रीशिक्षिका नेमल्या. आता सध्या मुलांच्या बरोबरीने मुलीही शाळेत येत आहेत.

अनेक खटपटी करून मुलांना शाळेत आणले तरी त्यांचे शिकण्याकडे लक्ष लागत नव्हते. त्यासाठी अध्यापन पद्धतीत फरक केले. आदिवासी जीवनातून, त्यांच्या परिसरात घडणाऱ्या घटना लक्षात घेऊन, निरनिराळ्या विषयांची मांडणी करणे, वाचन धडे, उदाहरणे, गाणी, गोष्टी, गप्पा-गोष्टी, या सर्वांमध्ये त्यांच्या जीवनाची संगती लावणे; याकडे कटाक्ष होता. ही मुले रानात भटकतात तर त्यांना 'भटका, पण शाळेत ती वस्तू घेऊन या !' असे सांगितले. त्यातून एक छान वस्तुसंग्रहालय तयार झाले. या संग्रहालयात मारलेले साप, मुंग्यांचे वारूळ, माणसाची कवटी, माशाचा दात, शेंगा, बिया, घरटी, पिसे अशा अनेक वस्तू आहेत. या वस्तूंवरूनच गप्पा-गोष्टी, उदाहरणे, चित्रकला, वाचन धडे असे अनेक विषय घेतले जातात. स्वाभाविकपणे मुलांचे लक्ष विषयाकडे लागते. आता वीस वर्षांनंतर इतकी खटपट करावी लागत नाही. कारण ऐकणे, लक्षात ठेवणे व पुन्हा प्रकट करणे या गोष्टींची आता मुलांना सवय लागली आहे. वीस

वर्षांपूर्वी तशी सवय मुळीच नव्हती. तेव्हा वस्तुसंग्रहालय हाही एक विकासवाडीचा महत्त्वाचा भाग आहे.

पाड्यापाड्यावर जाऊन मुलांचे रंजन कार्यक्रम करणे, पालकांना वेळोवेळी शाळेत बोलावणे, पावसाळ्याशिवाय इतर वेळीं जवळजवळच्या पाड्यांवरून अंगणवाड्या चालविणे वगैरे कार्यक्रमांमुळे मनी धरलेला हेतू बराच सिद्ध होत होता. आता वीस वर्षांनंतर प्राथमिक शाळेतील इ. १ ली मध्ये ५ ते ६ वर्षे वयाची ४०-५० मुले नेहमी उपस्थित असतात. म्हणून इ. ४ थी पर्यंत ती सरळ जातात. फारच कमी गळती होते. इ. ५ वी पासून पुन्हा गळती होण्यास सुरुवात होते. कारण आता १०-१२ वर्षे वयाची झालेली मुले पालकांना घरकामाला अगर थोडी कमाई करायला हवी असतात. शिवाय इ. ७ वी पर्यंतचे सध्याचे पुस्तकी शिक्षण घेऊन पुढे मुलांना भवितव्य काय ? सगळ्यांना आठवीत जाता यावयाचे नाही, ७ वी पर्यंत शिकलेल्या मुलाला काम मिळायचे नाही; आणि हा शाळेत शिकलेला मुलगा शेणात हात घालायला तयार व्हायचा नाही. पालकांच्या या समस्या काही अंशाने सोडविण्यासाठी प्राथमिक शाळेच्या ५ ते ७ इयत्तांमधून '**कार्यानुभव प्रकल्प**' सुरू केला आहे. विकासवाडीची ही आणखी एक नवी पाकळी उमलली आहे. सुतारीकाम, फ्रेटवर्क, शिवणकाम व शेतीकाम असे तीन व्यवसाय जोडले आहेत. शाळेव्यतिरिक्त रोज दोन तास मुलांनी काम करावयाचे आहे. कच्च्या मालाचा खर्च वजा जाता उरलेली रक्कम शिष्यवृत्ती म्हणून मुलांना मिळते.

या नवीन उपक्रमामुळे– (१) तीन वर्षे व्यवसाय प्रत्यक्ष हातून गेल्यामुळे मुलांच्या हातात काही कौशल्य येते. (२) आत्मविश्वास वाढतो. (३) श्रमप्रतिष्ठा वाढते. (४) थोड्याशा का होईना शिष्यवृत्तीमुळे पाट्या, पेन्सिली, पुस्तके, वह्या व गणवेश यांचा प्रश्न सुटतो.

गेली तीन वर्षे ५ ते ७ इयत्तांमध्ये गळती नाही. अनेक उपायांनी साक्षर झालेल्या मंडळींची साक्षरता टिकून राहावी म्हणून कित्येक अडचणींना तोंड देत देत संस्थेने एक 'छापखाना' चालवला आहे. श्रीमती ताराबाईंची ही अंतिम इच्छा होती. या छापखान्यात आदिवासी, अगदी कमी शिकलेली मुलेच काम करीत आहेत. त्यात तीन मुली आहेत. जुळवणे, छापणे, कापणे, बांधणी करणे वगैरे सगळी कामे ही मंडळी करतात. तेव्हा आमचा हा '**छापखाना**' म्हणजे कमळाच्या गाभ्यातील एक पाकळी आहे.

आणि आता नुकतीच उमललेली एक पाकळी म्हणजे '**डोंगरीपाडा येथील विकासवाडी**' अगदी आदिवासींच्या वस्तीत, आदिवासींच्या मागणीवरून, कुडाच्या झोपडीत चाललेले पाळणाघर, बालवाडी व प्राथमिक शाळेची पहिली-दुसरी. ही झोपडी बांधण्यासाठी जमीन आदिवासी ग्रामस्थाने दिली आहे व स्वतः देखरेख करून झोपडी बांधून घेतली आहे. झोपडीचे बरेचसे सामान जिल्हा परिषदेने दिलेले आहे.

या विकासवाडीची प्रमुख शिक्षिका आदिवासीच आहे. ती कोसबाडच्या आमच्या बालवाडीत, नंतर रात्रीच्या शाळेत व नंतर बालसेविका प्रशिक्षणवर्गात शिकून तयार झाली आहे. अशा आणखी तिघी तयार झाल्या असून, त्या स्वतंत्रपणे बालवाड्या चालवीत आहेत.

एक समस्या सुटत असताना दुसरी उभी राहते. एक काम वाढते. पुनः नवी समस्या उभी. ती आणखी एका समस्येला उभी करून सुटते. अशा रीतीने विकासवाडीचे काम वाढत आहे. आज कोसबाडला आमच्या संस्थेच्या ११ बालवाड्या, तीन पाळणाघरे, एक पूर्ण प्राथमिक शाळा, ट्रेनिंग कॉलेज, बालसेविका प्रशिक्षणवर्ग, तीन किसानशाळा, एक बालउद्योगालय, कार्यानुभव प्रकल्प आदी शिक्षणविभाग चालू आहेत.

विकासवाडीचे हे कमळ फुलविण्यात कै. पू. ताराबाईंचे प्रेरक विचार, चिंतन, जिद्दीचे खंबीर प्रयत्न कारण आहेत. त्याबरोबरच त्यांच्या सुदैवाने त्यांचे विचार समजून घेऊन निष्ठेने काम करणारे तज्ज्ञ कार्यकर्ते त्यांना लाभले आहेत.

आदरणीय श्री. मामासाहेब यांना श्रीमती ताराबाईंचे काम माहीत आहे. तथापि ते अधिक तपशीलवार कळल्यामुळे त्यांना निश्चित आनंद वाटेल.

□ □

# ‘ मेळवुनि हात ’

## शांता किर्लोस्कर

### शेवंताबाईची कथा

शेवंताबाईंना कामाला यायला उशीर झाला. सहसा कधी त्या न कळवता खाडा करीत नाहीत. वेळेवर येणं, स्वच्छ काम, तोंडाळपणा नाही, म्हणून त्यांची मदत सर्वांना हवी-हवीशी वाटते. ‘ आज का बरं उशीर झाला असेल ? ’ असं मनाशी म्हणते; तोवर त्या आल्या. चेहरा सुमारलेला, कुंकू फिस्कटलेलं, डोळे लाल, अगदी पाहवत नव्हता चेहरा. “ का हो शेवंताबाई, बरं नाही का ? ” असं नुसतं म्हणायचा अवकाश, त्या डोळ्याला पदर लावून रडायला लागल्या. त्यांच्या पाठीवरून हात फिरवत मी विचार करीत होते, “ काय झालं असेल बिचारीला ? किती खस्ता खाते. पाच पोरांचा संसार ओढून नेण्यासाठी थंडी, उन्हाळा की पाऊसपाणी कशाचीच पर्वा करीत नाही. चार घरी दोनदा फेऱ्या टाकेतो दमून जाते. ‘ एवढी कशाला कामं करता शेवंताबाई ’ असं म्हटलं तर म्हणायच्या, ‘ न करून कसं करू बाई ? पोरं एवढी मार्गाला लागाय नको का ? ’ ‘ नवरा मिळवता आहे ना तुमचा ? ’ असं मी एकदा विचारलं तर नेहमीच्या शांत शेवंताबाई उसळून म्हणाल्या, ‘ काय तेचं मिळवणं आमच्या उपेगाचं हाय का ? दारू अन् तीन पानातनं उरलं तर घरी पैसं दिसायचं ना ? अन् असल्या गुणानं काम तरी कुठं टिकतय ? आज आहे अन् उद्या नाही, अशी परवड. ’ तिच्या गृहस्थितीची ही परवड ऐकून मी सुन्नच झाले होते. मला जमेल तेवढे मुलांचे कपडे-पुस्तके देत असे. शेवंताबाई पोरांना शाळेला धाडायच्या; पण ती तेथे जेमतेम वर्ष दोन वर्ष टिकायची. भोवतीच्या मुलांच्या नादाने शाळा बुडवायची. बापाचा मुळीच धाक नाही– लक्षच नाही घरात. तरी आशा धरून शेवंताबाई एक ना एक पोर तरी शहाण व्हावं म्हणून कधी पोरं आपल्या बरोबर घेऊन यायची. आपलं काम होईतो ‘ हित बस अन् लिव तुझा अभियास ’ म्हणून पोतं अंथरुन द्यायची. अशा कष्टाळू, चिकाटीच्या शेवंताबाईंचा धीर आज का बरं खचला ? ”

“ बाई, आज पोराला पोलिसांनी पकडून नेलं. ”

“ अगबाई ! का ? ”

“ त्याच्या बापानं त्याला हातभट्टीवर काम लावलं बगा. मी कामामागं धावते. मला म्हाईतच नाय अन् आज सापडलं पोरगं. बाई, आता गुन्हेगारीतच जलम जायाचा ना त्येचा. कशाला वो मी एवढं राडे उपसते.” त्यांना पुन्हा रडू येऊ लागलं.

## — आणि ही वामनच्या वडिलांची.

काय समजूत घालावी शेवंताबाईंची ? तिच्यासारख्या किती जणी उद्या बरे दिवस येतील, या आशेवर पोरांसाठी कष्ट उपसतात. मरणापेक्षाही भयंकर अशा दारिद्र्याने त्यांना आधीच रंजीस आणलेले, त्यातून मुले तरी वर यावी, तर तीही आशा खोटी ठरते. प्रत्यक्ष जन्म देणारा बापच बेजबाबदार होतो. व्यसनी बनतो. मुलांच्या वाढीकडे, बायकोच्या कष्टाकडे, प्रेमाने, सहानुभूतीने पाहण्याची दृष्टी त्याला उरत नाही. नवरा–बायकोचा एक विचार, जबाबदारीची जाणीव, मुलांवर प्रेम असेल तर गरीबीतही मुलांना शिकवून, वळण लावून मोठी करणारी कुटुंबे असतातच ना ? आमच्या घरी वर्तमानपत्रे टाकणाऱ्या वामनचे वडील लहानपणापासून स्वतः हे काम करीत. आता आपल्या मुलाबरोबर दहा पंधरा मुलांना काम देतात. अनेक वृत्तपत्रे, मासिके यांची एजन्सी घेऊन नवरा-बायको वाचनालय चालवतात. तयार कपडे, घरगुती जिन्नस करून विकतात. नवरा-बायकोचे एकमेळाने काम करणे पाहून फार बरे वाटते. साहजिकच त्यांची मुले सुसंस्कारी, कष्टाळू व चुणचुणीत आहेत.

## पहिली गरज : प्रेमळ व समाधानी घर.

मुलांच्या विकासासाठी पहिली गरज समाधानी कुटुंबाची असते. स्वतःच्या गरजाची जाणीव प्राणिमात्राला नैसर्गिक असते. भूक लागली की खायला हवेच; पण आपल्या साठी खोळंबून जेवणाची वाट पाहणारी आई, खाण्याच्या पलीकडे असणाऱ्या प्रेमाची सुखाची ओळख मुलाला करून देते. आई-वडील, आजी-आजोबा, आत्या-मावशी सारी एकमेकांची देखभाल करतात. हे पाहताना मुलांची माणसांच्या परस्परसंबंधांची, जिव्हाळ्याची जाण वाढते. मुलाचे माणूस होत राहते.

## दुसरी गरज : जाणते, समजूतदार शिक्षक.

मुलांचे माणूसपण अधिक विकसित व्हावे म्हणून पुढे मुलाला शाळेत पाठविले जाते. या शाळांत लेखन, वाचन, अंकगणित यांचे किमान कौशल्य त्याला मिळून पुरेसे नसते तर ज्ञान-विज्ञानाच्या विविध शाखांची तोंडओळखही व्हावी लागते. स्पर्धात्मक झालेल्या जगामध्ये विविध व्यवसायांत कार्यक्षम व्हायचे असेल तर, नुसते घरातील शिक्षण पुरे पडत नाही. त्यासाठी शाळांचा, औपचारिक शिक्षणसंस्थांचा जन्म झाला. त्या त्या विषयातील तज्ज्ञता शिक्षकांना यावी, त्याचबरोबर कसे शिकवावे याचे तंत्रही समजावे म्हणून शिक्षकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था केलेली असते. या तंत्राच्या व शास्त्राच्या अभ्यासाने शिक्षकांना अध्यापनाच्या कामात काही उपयोग होत असतो खराच; परंतु खरा शिक्षक मुलांना विषय समजावून देण्यापेक्षा– मुलांना समजावून घेण्यातच रमलेला असतो. आपण मोठी माणसेही परक्या माणसापेक्षा ओळखीच्या

माणसावर जास्त विश्वास ठेवतो ना ? मुलांनाही शिक्षकांची ओळख होणे किंवा शिक्षक आपल्याला ओळखतात हा विश्वास वाटणे ही पुढील विद्या देण्याघेण्याची प्रारंभिक अवस्था नाही का ?

"का रे अजय, आज चेहरा मलूल दिसतो ? तब्येत ठीक आहे ना ?" असे शिक्षकांनी विचारले तर मुलाला येणाऱ्या मनाच्या हुरूपाने तो आजाराच्या त्रासावरही क्षणभर विजय मिळवतो. लहान वर्गातील मुले रोज आपल्या बाईंच्यावर फुलांचा वर्षाव करतात, असा कित्येक शिक्षिकांचा अनुभव आहे. पुरेशा प्रतिसादाअभावी मुलांचा हा उत्साह पुढे कमी कमी होत नाहीसा होत जातो. "आमच्या घरी या ना," असा हट्टही मुले शिक्षकांजवळ धरतात. माझ्या ओळखीचे एक शिक्षक आठवड्यातून एक संध्याकाळ एकेका मुलांच्या घरी जात असत. आपल्या वर्गातील हा विद्यार्थी राहतो कुठे, त्याचे घरचे वातावरण कसे आहे, पालक कसे आहेत, हे डोळ्याने पाहिले तर, मुलाला समजावून घेणे जास्त सोपे होते, मुलाचा प्रतिसाद सुधारतो, असे ते म्हणत. शिकण्याचे काम मुलांनीच करायचे असते. त्यासाठी त्यांची मने उत्सुक व्हावी; कष्ट करण्यास, प्रयत्न करण्यास त्यांनी प्रेरित व्हावे; हे शिक्षणातील पहिले काम आहे. वर्गात नुसती समोर बसलेली; पण ज्यांची मने हरवून अन्य कोठेतरी भिरभिरत आहेत अशा मुलांना कसे शिकविता येणार ? स्वतःच्या व्यवसायाच्या यशासाठीसुद्धा शिक्षकांना असा मुलांचा वैयक्तिक जिव्हाळा संपादन करावा लागतो. कोणत्याही विशेष उपक्रमांसाठी जी मुले निवडली जातात त्यांचा मार्गदर्शक शिक्षकांशी विशेष परिचय होतो व त्याचा परिणाम त्यांच्या **व्यक्तिमत्त्वाच्या** विकासावर खचित होतो, हा नेहमीचा अनुभव आहे.

## तिसरी गरज : शिक्षक–पालक सौहार्द.

मुलांना जाणून घेण्याची पुढची पायरी मुलांच्या पालकांशी संपर्क जोडणे ही आहे. पुष्कळदा मुलाची अडचण ही पालकांच्या अज्ञानातून निर्माण होते. रोज पहिला गणिताचा तास बुडविणाऱ्या एका मुलीला बोलणी बसत, रोज शिक्षा होई, तरी तेच चालू. मुलगी बोलेना. तेव्हा घरी जाऊन नीट तपास करता कळले की, तिच्या आईला सकाळी कामावरून परत येण्यास उशीर होई व तोवर धाकटे भावंड संभाळण्यासाठी तिला थांबावे लागे. तिच्या भावंडाला मधल्या वेळात संभाळण्यासाठी अन्य सोय करण्याबद्दल त्या आईला समजवावे लागले–मदत करावी लागली.

माझ्या मुलाने इंजीनिअर झालेच पाहिजे असा एका वडिलांचा हट्ट होता. त्यांच्या सारख्या धाकाने, त्राग्याने मुलगा मुळीच अभ्यास करीना. त्याचा बुद्ध्यांक काढणे, त्याला इतर व्यवसायांची माहिती देणे, त्याला स्वतःला कोण व्हावसं वाटतं, त्यासाठी तरी प्रथम दहावी पास होण्याची गरज पटवून देऊन त्याचे मन अभ्यासाकडे वळवणे, अशा किती तरी खटपटी त्याच्या मार्गदर्शक शिक्षकांना कराव्या लागल्या. आपल्या

मुलांवर आपला अधिकार आहे व आपण म्हणू ते त्याने बनावे असा पालकांचा हट्ट दूर करण्यास शिक्षकांची फार मदत लागते. एकटे मूल प्रौढांपुढे असहाय होते.

एक आई तक्रार करीत होती की, माझ्या मुलीचा आवाज चांगला आहे; पण तिला कधीच स्वागतपद्यात, नाटकात घेत नाहीत. बाईंनी त्यांना गाण्याच्या वर्गात बोलाविले, तेव्हा आपल्या मुलीपेक्षाही ज्यांचे आवाज अधिक चांगले आ ेत अशा अनेक मुली त्यांना तेथे दिसल्या.

शिक्षकांसमोर अनेक मुले असल्याने वस्तुनिष्ठ दृष्टीने त्यांना मुलांचा विचार करता येतो व तो पालकांना कळणे आवश्यक असते. मायेपोटी, स्वतःच्या महत्त्वाकांक्षेपोटी, पालक मुलावर आपल्या इच्छा लादतात. त्यांना शिक्षकच नीट समजावून सांगू शकतात. मुलांना, त्यांच्या पालकांना समजावून घेणारे, मुलांवर प्रेम करणारे, अनेक शिक्षक आजही आहेत, हे आमचे भाग्य होय. पण वाढत जाणारे शहरीकरण, वर्गातील विद्यार्थ्यांची मोठी संख्या, स्पर्धात्मक समाजरचनेने गुणवत्तेपेक्षा प्रमाणपत्रांना दिलेले महत्त्व, पैसा आणि सत्ता या दोन निकषांवरच सर्व गोष्टी मोजण्याचे सार्वत्रिक धोरण, यामुळे शाळांची यंत्रे बनण्याकडे कल वाढतो आहे. त्यामध्ये पालक, विद्यार्थी आणि शिक्षक यांचेमधील संबंधाचे स्थान नष्ट होत आहे. आई–वडिलांच्या सहकार्याअभावी शेवंताबाईंचा मुलगा उन्मार्गी झाला. पालक-शिक्षकांच्या परस्पर उपेक्षेमुळे पुढील पिढी उन्मार्गी होण्याच्या धोक्यात तर येणार नाही ना ?

अशा कोलाहलात आपली मुले सापडू नयेत. यासाठी शिक्षकांचे विद्यार्थ्यांविषयीचे वात्सल्य जागे राहावे व पालकांना विद्यार्जनाच्या गरजांची डोळस जाग यावी, यासाठी शिक्षक आणि पालक यांचा साद–प्रतिसाद वाढायला हवा आहे. जागरूक पालकांच्या मदतीने शाळासुधाराचे कितीतरी प्रकल्प शिक्षकांना करता येतील. दोघांनी मिळून मुलांच्या भोवताली सहकार्याचे, विकासाचे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. मुले नुसती घरात वाढत नाहीत किंवा शाळेत शिकत नाहीत. शिकणे–वाढणे शाळेतही चालते, घरातही चालते व समाजजीवनातही चालते. म्हणूनच पालक–शिक्षकांच्या सहयोगाचे "सुखी घरे, प्रगत शाळा आणि निरामय समाजजीवन निर्माण करणे–" हे ध्येय असते. आपल्यामधील दुवा जो बालक त्याचेमुळे आपली सामाजिक बांधीलकी आपणांस पूर्ण करावयाची आहे. त्याचबरोबर स्वतःच्या खऱ्या समाधानासाठी ही गरज पालकांची आहे, तशीच शिक्षकांचीही आहे. ती जाणवून दोघे सहकार्याने, एकजुटीने काम करतील तर मुलांचे भवितव्य का नाही उजळणार ?

◻ ◻

# विज्ञानाचे अध्यापन

## प्रा. डॉ. ना. वि. करबेलकर

### विज्ञानाची महत्ता

विज्ञानाचे शिक्षण. अधिक परिणामकारक व्हावे व विज्ञान शिकवण्याची उद्दिष्टे पदरात पडावी, म्हणून विज्ञानशिक्षकांशी हितगूज करण्याचा प्रपंच करीत आहे. विद्यार्थ्याला वैज्ञानिक दृष्टी देणे व वैज्ञानिक पद्धती प्रात्यक्षिकातून त्याच्या अंगी बाणवणे, ही विज्ञान शिकवण्याची प्राथमिक उद्दिष्टे होत. विद्यार्थ्यांतील सुप्त वैज्ञानिक साकार करणे, हे नंतरचे उद्दिष्ट म्हणता येईल. मनुष्याचे दुःख व दैन्य कमी करणे आणि त्याचे जीवन समृद्ध व सुखी करणे, यांतच सगळ्या ज्ञानविज्ञानाची प्रेरणा आहे. या सामाजिक उद्दिष्टासाठी वस्तुनिष्ठ जगातील प्रश्नांची सोडवणूक करील, असा वैज्ञानिक, विज्ञानशिक्षणातून निर्मिता आला पाहिजे. ज्याच्याजवळ उपजत वैज्ञानिक प्रवृत्ती असेल, त्याचा वैज्ञानिक घडवता येईल; जेथे त्याची कमतरता असेल तेथे समाजधारणेसाठी चाललेल्या वैज्ञानिक साधनेबद्दल समंजस, सहानुभूतीचे वातावरण निर्मिता येईल. सामान्य माणूस, वैज्ञानिक व तत्त्वज्ञ या सर्वांच्या ज्ञान मिळवण्याच्या पद्धतींचे मूलतः स्वरूप एकच आहे. विज्ञान अधिक सूक्ष्म, अधिक बिनचूक, अधिक काटेकोर निरीक्षण करते,आणि नियंत्रित प्रयोगाद्वारे वस्तुनिष्ठ जगाचे चिकित्सक विश्लेषण करून ज्ञानेंद्रिय-गम्य जगाची रहस्ये उलगडण्याचा प्रयत्न करते. सामान्य माणूस व्यावहारिक जगात जगतो. तत्त्वज्ञ सर्व विज्ञानाच्या साधनेची मीमांसा करून विश्वाचे अंतिमतः एकात्म दर्शन मिळवण्याच्या प्रयत्नात असतो. सर्वांची भिस्त निरीक्षणांवर असली तरी, वैज्ञानिकाला आपले निरीक्षण अधिकात अधिक वस्तुनिष्ठ व निःसंदिग्ध असण्याची दक्षता घेण्यासाठी विशेष प्रशिक्षण घ्यावे लागते. प्रयोगशीलता प्रत्येकात थोडीफार असतेच; पण वैज्ञानिकाचे प्रयोग अधिक कडकपणे, दक्षपणे, सुनियंत्रित व नेमकेपणाचे असावे लागतात. वस्तुनिष्ठ साक्षीपुराव्याशिवाय कोणतेही तथ्य स्वीकारण्यास संशयात्म्याच्या-वर्गात-मोडणारा-चिकित्सक वैज्ञानिक तयार नसतो.

### विज्ञानशिक्षक कसा हवा ?

विज्ञानशिक्षकाने त्याच्या विचार, उच्चार व आचारात वैज्ञानिकता आणली नाही तर, तो प्रभावी विज्ञानशिक्षक होऊ शकणार नाही. वस्तुनिष्ठ जग ज्ञेय आहे; ज्ञानेंद्रिये व त्यांना साहाय्यक उपकरणी यांच्या साहाय्याने वस्तुनिष्ठ जग जाणता येते; निसर्गाची रहस्ये प्रयोगाद्वारा व तर्कशुद्ध मागोवा घेऊन जाणता येतात; भौतिक जगावर विज्ञानाने

स्वामित्व मिळवता येते; व वैज्ञानिक सत्ये वापरून समृद्ध जीवन निर्मिता येते; या सर्व श्रद्धा वैज्ञानिकाजवळ असतात. भौतिक जीवनाच्या संदर्भाने मनुष्यच त्याच्या जीवनाचा शिल्पकार आहे, असा वैज्ञानिकाचा दृढ विश्वास असतो. दैववादाचा तो निषेध करतो. तो प्रयत्नवादाचा पुरस्कर्ता असतो. अंधश्रद्धा त्याला अमान्य असतात. शिक्षकाला ही सगळी पथ्ये पाळावी लागतात. संस्कारक्षम विद्यार्थ्यांवर शिक्षकाच्या व्यक्ति-मत्त्वाचा ठसा उमटत असतो. शिक्षकाची दृष्टी व जीवन निष्ठा ही अध्यापनात बरेच काही करून जातात. वैज्ञानिक दृष्टीचे व पद्धतीचे संक्रमण विद्यार्थ्यावर होण्यासाठी विज्ञान शिक्षकाने स्वतः वैज्ञानिक असणे म्हणूनच फार महत्त्वाचे आहे. वैज्ञानिक चमत्कार स्वीकारीत नाही, त्याचा वास्तवाच्या पातळीवर जगण्याचा प्रयत्न असतो. विद्यार्थ्यांचा दैववाद, अंधश्रद्धा, शकुनापशकुन, भाबडेपणा घालवण्यासाठी तो प्रयत्नशील असतो. वैज्ञानिक शोधामुळे भंग पावलेल्या गतार्थ अंधश्रद्धा व भाबड्या समजुती यांचा समाचार घेतल्याशिवाय त्याला राहवत नाही.

आपली जिज्ञासा जागी ठेवणे व प्रयोगशरणतेने जिज्ञासेचे समाधान करण्याच्या प्रयत्नात असणे, हे वैज्ञानिकाचे खडतर जीवनव्रत असते. शैशवात व बाल्यकाळात मुलाच्या जिज्ञासेच्या समाधानासाठी सामान्य माणूस फारच अपुरा पडतो व म्हणून पालक या नात्याने मुलाची जिज्ञासा दाबण्याचा व कधी कधी ती मारण्याचा प्रयत्न कळत नकळत होत असतो. त्याच्या विचारातील व आचारातील अंधश्रद्धा व गतार्थ परंपरा मात्र संस्कार-रूपात पालक पाल्यावर अव्याहत लादत असतो. अवेळी कोमेजलेली मुलाची जिज्ञासा जागवण्याचे, तिला खतपाणी देऊन विकसित करण्याचे काम विज्ञानशिक्षकाने जिव्हाळ्याने व जिद्दीने स्वीकारले पाहिजे. विज्ञान ही सृष्टीकडे पाहण्याची एक बुद्धिवादी दृष्टी आहे, हे आपल्या तर्कसंगत प्रतिपादनाने पटवून देण्याचा प्रयत्न विज्ञानशिक्षकाने केला पाहिजे. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची नुसती मुभा देऊन भागणार नाही. त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. जेवढ्या प्रमाणात विद्यार्थी व शिक्षक यांत चर्चा, प्रश्नोत्तरे घडून येतील तेवढे चांगले. शिक्षणाच्या प्रक्रियेत अधिक जिवंतपणा आणण्यासाठी, विद्यार्थ्याला शिकण्यात सतत सहभागी असण्याचे समाधान देण्यासाठी, व आपल्या अध्यापनाचा प्रतिसाद मिळवण्यासाठी, असे विचारप्रवर्तन होत गेले तर विद्यार्थ्यांची जिज्ञासा सतत जागृत व धारदार ठेवता येईल. यामुळे अध्यापनही अधिक वेधक व प्रभावी होईल. विद्यार्थ्यांच्या जिवंतपणाची व त्यांच्या मनाच्या गतिशीलतेची सतत जाणीव ठेवून शिकण्यावर प्रा. व्हाइटहेड यांचा विशेष कटाक्ष यासाठीच होता.

## विज्ञानाचे सामर्थ्य

जीवनाच्या आवश्यकता भागवण्यास व अपुरेपणाच्या समस्या सोडवण्यास विज्ञान समर्थ आहे व त्याची ही क्षमता वाढत आहे. ऑस्ट्रेलियात कृत्रिम पाऊस पाडला जातो. देवी, हिवताप आदी रोग अनेक देशांतून हद्दपार झाले आहेत. इस्राइलने वाळवंटात

हरितक्रांती साकार केली आहे. चीनमधून माशी हद्दपार झाली आहे. प्रतिदिवशी मणभर दूध देणारी संकरजन्य कामधेनू डेन्मार्कात गावोगावी दिसेल. छप्परावर फळबागा आणि उथळ समुद्रात मत्स्योत्पादन बारमहा शेतीसारखे जपानात पराकोटीला पोचले आहे. नायलॉन, टेरेलीन, पॉलीथीन या कृत्रिम वस्त्रतंतूंमुळे संभाव्य वस्त्रदुर्भिक्ष्य टळले आहे. आपणाला विज्ञानाची कास धरल्याशिवाय गत्यंतर नाही. वैज्ञानिक शोधांचा आकर्षक सारांश वार्ताफलकावर वेळोवेळी लावून विज्ञानशिक्षकाने विद्यार्थ्यांची जिज्ञासा पेटती ठेवली पाहिजे.

## ज्ञानेंद्रिये : सामर्थ्य व मर्यादा

विज्ञान ज्ञानेंद्रियांच्या साहाय्याने जगाकडे पाहते. वैज्ञानिक पद्धतीची तांत्रिक आणि तार्किक अशी दोन अंगे आहेत. ज्ञानेंद्रिये अव्यंग, निर्दोष व समर्थ असली, व काळजी घेऊन आपण ती तशी ठेवली तर, वस्तुनिष्ठ जगाचे ज्ञान मिळवण्यास त्यांचा उपयोग करता येईल; पण ज्ञानेंद्रियांच्या दोन प्रकारच्या मर्यादांची आपणाला स्पष्ट जाणीव हवी. उजवा हात बऱ्याच पण सह्य उष्ण पाण्यात व डावा हात थंड पाण्यात धरल्यानंतर दोन्ही हात एकदम एका गंगाळातील कोमट पाण्यात बुडवा; उजव्या हाताला ते पाणी थंड, पण डाव्या हाताला तेच पाणी गरम वाटते, असा अनुभव तुम्हाला येईल! तापमापक वापरूनच त्या तीन प्रकारच्या पाण्याचे सापेक्ष तपमान जाणणे अधिक युक्त नव्हे का? तीन सारख्या लांबीच्या समांतर रेषा (कागदावर) फळ्यावर काढा. उजव्या रेषेच्या दोन्ही टोकाला V व Λ असे या अक्षराचे निमुळते टोक अग्रावर ठेवून काढा. डाव्या रेषेची दोन्ही टोके Λ च्या टोप्यांनी झाका. केवळ दृष्टिभ्रमाने मधल्या रेषेच्या तुलनेने उजवीकडील रेषा अधिक लांब व डावीकडील रेषा कमी लांब झाल्याचे भासते! म्हणून मोजपट्टी वापरणे अधिक श्रेयस्कर नाही का? आपली ज्ञानेंद्रिये विद्युत्-चुंबकीय लहरींच्या संपर्कात येऊन त्या लहरी लांबट असल्यास त्यांना उष्णता म्हणून, मध्यम असल्यास प्रकाश म्हणून व बऱ्याच अरुंद असल्यास क्ष-किरण म्हणून (अप्रत्यक्षतः) त्यांची नोंद घेतात. ज्ञानेंद्रियांना मर्यादा आहेत. विशिष्ट आवाक्यात त्यांची संवेद्यता सीमित असल्याचे प्रत्ययास येते, ही ज्ञानेंद्रियांची दुसरी मर्यादा आहे! प्रत्येक ज्ञानेंद्रियाची मर्यादा वाढवणे, त्यात सूक्ष्मता व बिनचूकपणा आणणे यासाठी वैज्ञानिक उपकरणांचे साहाय्य घेतो. दुर्बिणीने दूरचे दिसते, सूक्ष्मदर्शकाने सूक्ष्म तपशील विस्तारीत करून दाखवता येतो. एका शक्तीप्रकाराचे दुसऱ्या प्रकारात रूपांतर करून व तिची प्रखरता कमी-अधिक करण्यास उपकरणी वापरतात. वैज्ञानिक पद्धतीचे तार्किक अंगही विद्यार्थ्यांना चांगले अवगत होण्यासाठी निगमन व आगमन तर्कसंगतीने निरीक्षणावरून अनुमान काढण्याचे कार्य विज्ञानाच्या सिद्धान्ताचा इतिहास सांगताना व प्रयोगाचा मागोवा घेऊन निष्कर्ष काढताना, दाखवून दिले पाहिजे. विज्ञान सामान्यतः विशेष गोष्टीवरून सामान्य सिद्धान्त काढण्याची आगमन (inductive) किंवा

उपपादन पद्धती वापरते, व अधिकाधिक व्यापक सिद्धान्त क्रमशः शोधून काढते. केप्लरने ग्रह सूर्याभोवती फिरतात व त्यांच्या गतीचे नियम सांगितले. (ग्रह सूर्याभोवती लंब-वर्तुळात्मक मार्गाने फिरतात; सूर्य लंबवर्तुळाच्या एका केंद्राच्या ठिकाणी असून ग्रह व सूर्य यांना जोडणारी रेषा सारख्या वेळात कक्षासीमित क्षेत्राचे समान क्षेत्र पार करते. ग्रहाला सूर्यप्रदक्षिणेस लागणाऱ्या काळाचा वर्ग ग्रह-सूर्यातील अंतराच्या घनाच्या प्रमाणात असतो. ग्रहगोलाची आकर्षणे मूलतः द्रव्यकणांच्या आकर्षणाचेच रूप होय, असा याच्या मूळाशी असणारा गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त न्यूटनने शोधून काढला. सर्व आकर्षण-अपकर्षण मूलतः स्थलकाल चौकटीच्या संदर्भाने एकात्म असावे, हे दाखवण्याचा आइन्स्टाईनचा प्रयत्न होता. एखाद्या कीटकाचे निरीक्षण करून त्याबद्दल काही सामान्यत्व दाखवणे व मग ते त्या वर्गाच्या सर्व कीटकांना लागू असल्याचे दाखवणे; हळूहळू अधिक व्यापक प्राणीवर्गाचे सामान्यत्वही सांगणे. सजीव-निर्जीवाचे भेद सांगणे. याउलट गणितात अवनयन ( deduction ) वा निगमन तर्कसंगती आपण वापरतो. ज्ञानें-द्रियाच्या अनुभवांचे मापन, विश्लेषण, वर्गीकरण, त्याच्या मुळाशी असणाऱ्या कारणाबद्दल अनेक पर्याय कल्पणे; त्यांची नव्या नियोजनपूर्वक प्रयोगांनी तपासणी करणे व शेवटी कार्य-कारण यांना जोडणारा तर्काधिष्ठित सिद्धान्त शोधणे; अशी पद्धती विज्ञान वापरते. सिद्धान्त काही नवी भाकिते करू शकतो. त्यांचा पडताळा पाहून सिद्धान्ताला बळकटी येते; पण तसे अनुभवाला न आल्यास सिद्धान्ताला योग्य मुरड घालावी लागते; कधी तो टाकून द्यावा लागतो.

## आजचे ढोकळेबाज शिक्षण

विज्ञान शिकवताना सिद्धान्ताचा इतिहास अशा तर्कसूत्राच्या आधारे सांगितला पाहिजे, तसा तो सांगितला जात नाही. म्हणून विज्ञानशिक्षणाने अपेक्षित तर्कबुद्धीचा विकास व त्यात घ्यावयाच्या दक्षता, सामान्यतः घडणारे तर्कदोष यांचे प्रात्यक्षिक ऐका-वयाला व करावयाला विद्यार्थ्याला फारशी संधी मिळत नाही. विद्यार्थी व शिक्षक दोघेही परीक्षार्थी बनून जातात. डोक्यात माहिती कोंबणे, स्मरणशक्तीने ती उत्तरपत्रिकांत लिहिणे याच गोष्टीने ते भारावून गेलेले असतात. म्हणून त्यांच्या तार्किकतेचा विकास होत नाही. अतार्किक व अर्धतार्किक पद्धती बुद्धीला चिकटून राहते, ती पुष्कळदा फसगत करते व शेवटी जिज्ञासेलाही ती मारक ठरते. तीव्र व अदम्य जिज्ञासा, सूक्ष्म व बिनचूक निरीक्षण व निरीक्षणावरून तर्कसंगत मूलगामी मागोव्यातून कारण वा सिद्धान्तप्राप्ती या विज्ञानाच्या प्रस्थानत्रयीतून एकही अविकसित ठेवून चालत नाही. वर्गातील विज्ञानपाठाच्या प्रति-पादनात व प्रयोग शाळेतील मार्गदर्शनात याच तिवईवर विज्ञान-शिक्षकाचे अधिष्ठान असले पाहिजे. मगच आपले निरीक्षण, उपकरणांची सूक्ष्मता, साहाय्यक गणिताची व गणकयंत्राची समर्थता वाढत जातात, म्हणून विज्ञानाचे सिद्धान्त कधीच अंतिम व अबाधित नसतात. त्यांचे परिष्करण सतत होत असते, सूक्ष्मता व व्यापकता वाढत असते.

वास्तवाचे, सत्याचे जवळात जवळून घेतलेले दर्शन, असे विज्ञानसिद्धान्ताचे स्वरूप विद्यार्थ्यांला कळले पाहिजे. विज्ञान सिद्धान्त खोटे नसतात. ते ठोकळमानाचे असू शकतात.

## विज्ञानशिक्षणाचा गुरुमंत्र

म्हणून ज्या जिज्ञासेतून विज्ञानशोधांचे स्फुरण होते, ज्या निरीक्षणावर त्यांची इमारत रचली जाते व ज्या तर्कामुळे निरीक्षणातून निघणाऱ्या अनुमानांची सांधणी होते, त्या सगळ्यांची उपासना विज्ञानाच्या विद्यार्थ्याकडून घडली पाहिजे. वैज्ञानिक छंदाला उत्तेजन देण्यासाठी विज्ञानसाधना मडळे ( science club ) चालवली पाहिजेत. म्हणजे विशेष वैज्ञानिक प्रवृत्ती असणाऱ्या विद्यार्थ्यांतून वैज्ञानिक निर्मिता येतील. अनुमान काढण्यात तर्कशृंखलेतील संभाव्य दोष पाहण्याचा व ते स्पष्ट करण्याचा सराव विज्ञान-शिक्षकाने ठेवला पाहिजे. 'अ'चा परिणाम 'ब' आहे, असे म्हणताना, जेथे 'अ' तेथेच 'ब' उद्भवतो, 'अ' आणि 'ब'चे क्रमिक साहचर्य नेहमी आढळते, 'अ' नसताना 'ब'चा आढळ होत नाही, अशा भिन्न तर्कसेतूंचा उपयोग आपण करीत असतो. मिलच्या प्रायोगिक अन्वेषणात वापरावयाच्या या तर्कपद्धतीचा परिचय तर्कशास्त्रावरील विज्ञानपद्धतीच्या सोदाहरण चर्चेतून विज्ञानशिक्षकाने आत्मसात करून प्रात्यक्षिकवर्गात तो विद्यार्थ्यांकडून घटवून घ्यावा, पण तर्काचा उपयोग बिनचूक निरीक्षणे हाती आल्यावरच करावयाचा आहे. व्याकरण वाक्यरचना निर्दोष असल्याचे सांगू शकेल, पण वाक्याचा अर्थ खरा आहे असे सांगू शकणार नाही. ह्या निरीक्षणातून हे अनुमान असे तर्काने समजेल; पण निरीक्षणाच्या बिनचूकपणावर अनुमानाची सत्या-सत्यता ठरेल. विधान केवळ तर्कशुद्ध आहे म्हणून ते खरे ठरत नाही; विधानातील गृहीते खरी असण्यावर त्याचे सत्यत्त्व आधारित असते.

( १ ) **जिज्ञासा जागवणे टिकवणे व धारदार करणे** : यासाठी वार्ता-फलकावर विज्ञान शोधांची वेधक माहिती देणे; ग्रंथालयात विज्ञानाची गोडी उत्पन्न करणारी आकर्षक, आव्हानक पुस्तके ठेवणे; वैज्ञानिकांनी शोधाचा मागोवा घेताना केलेल्या चिकाटीच्या प्रयत्नांचा, प्रातिभ पावलांचा प्रेरक इतिहास सांगणे; वैज्ञानिक छंदासाठी विज्ञानमंडळाद्वारे व्यवस्था करणे; सहल काढताना पक्षी, वृक्ष, पिके, नाले, खनिजे, पहाड यांना बोलके करणे; वर्गात शक्य तेव्हा चर्चात्मक पद्धती वापरणे; प्रश्न विचारू देणे व प्रश्नांची आज नाही तर उद्यातरी उत्तरे देणे व तत्संबंधी साहित्य उपलब्ध करून देणे; या गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे.

( २ ) छंदातून शोधक बुद्धी, नवीन काहीतरी करून पाहण्याची बुद्धीही वाढेल.

( ३ ) छंदमंदिर व प्रयोगशाळेत पुरेसे साहित्य ठेवल्यास हस्तकौशल्यही वाढेल. उपकरणी दक्षतेने हाताळण्याचे कसब येईल.

( ४ ) यंत्रे, गणकयंत्रे यांचा उपयोग यथाक्रम शिकता येईल.

(५) सैद्धान्तिक पाठ देताना व प्रयोग दाखवताना प्रत्येक विधानाचे वा कृतीचे, त्यापूर्वीच्या व त्यानंतरच्या गोष्टींचे संबंध तर्कपद्धतीची जणू ती प्रात्यक्षिके आहेत, अशा प्रकारे सांगितले जावे.

(६) स्वतंत्रबुद्धी वापरण्याची पुरेशी संधी हळूहळू उपलब्ध करून दिली पाहिजे. प्रयोगाद्वारे अमुक गोष्ट दाखवण्यासाठी प्रयोगाची आखणी करणे, त्यासाठी सामग्री व उपकरणी जमवणे, ती योग्य व संवेदनशील आहेत हे पाहणे, त्यांची जुळणी करणे, प्रयोगाचा आराखडा शिक्षकाला दाखवून मग त्यानुसार प्रयोग करणे, अशी क्रमशः प्रयोगबुद्धीची वाढ विद्यार्थ्यांत करता आली पाहिजे.

(७) निर्दोष, बिनचूक निरीक्षणाचे बाळकडू तर अगदी प्रारंभीच वर्गात प्रयोग दाखवण्यापासूनच पाजले गेले पाहिजे. घरी, प्रयोगशाळेत, शेतात, सहलीत, प्रदर्शनात, कारखान्यात, प्रत्येक नव्या घटिताच्या वेळी ही निरीक्षणाची सवय राबवली पाहिजे.

(८) प्रयोगात काय करावयाचे, कोणत्या क्रमाने करावयाचे, कसे करावयाचे, कोणती दक्षता घेऊन करावयाचे ते सांगा; पण काय काय दिसेल, व त्यावरून काय अनुमान काढावयाचे ते कधीही सांगू नका.

(९) कोणते उपकरण वापरावयाचे, ते कसे दक्षतेने हाताळावयाचे, त्याची वाचने कशी घ्यावयाची, ते सर्व सांगा; पण वाचने काय असतील, त्यात परिवर्तने काय घडतील व ती का घडतील, हे मात्र कधीही सांगू नका.

(१०) बिनचूक निरीक्षण म्हणजे काय, ते कसे घ्यावयाचे, त्याची बिनचूकता कोणत्या दर्जाची आहे, हे स्पष्ट करून सांगा. यंत्राची व उपकरणाची वाचने व हाताळणी प्रत्यक्ष नजरेखाली करून घ्या. निरीक्षणाचे स्वरूप त्यानंतर विद्यार्थ्याला सांगू द्या. सूचक प्रश्न विचारून निरीक्षण अधिक सूक्ष्म, सर्वांगीण करवून घ्या. कोणत्या गोष्टी नोंदल्या ते विचारा. निरीक्षणाचा वेधक भाग कोणता ते विचारा.

(११) निरीक्षणात अपेक्षिताचा अधिक्षेप होऊ देऊ नका. ते वास्तव ठेवा. ते अपेक्षांप्रमाणे असू शकेल; पण असलेच पाहिजे असे नव्हे व अपेक्षेप्रमाणे करून घेणे तर वैज्ञानिकतेला अनीतीमूलक.

(१२) उपकरणाची व निरीक्षणाची विश्वसनीयता कशी ठरवावी ते शक्य तेथे सांगा. संदर्भ (दर्जेदार) तापमापकाबरोबर सामान्यतः वापरावयाचे तापमापक जोडीने वापरून हे दाखवा. वैज्ञानिक तराजूतील वजने संदर्भ वजनाबरोबर पारखून त्यातील घटवाढीचे एक कोष्टक प्रयोगाद्वारे तयार करवून घ्या.

(१३) निरीक्षण केवळ गुणात्मक केले की परिमाणात्मक त्याचे भान हवे. परिमाणात्मक निरीक्षणे हा विज्ञानाचा आत्मा आहे. तोच आंतरिक रहस्य उलगडून दाखवू शकतो.

(१४) निरीक्षण एकदाच केले की पुनःपुन्हा ? प्रयोगस्थिती बदलून पुन्हा पूर्वस्थिती आणल्यास वाचन बदलते का ? प्रयोगाच्या अगदी थोड्याशा बदलाने वाचनात

फरक पडतो की पडत नाही ? विजेच्या मंडलात रोधकाच्या रोधकत्वात अल्पसा बदल केल्याने प्रवाहाच्या मात्रेत संवादी फरक पडतो की नाही ? यंत्राची वा उपकरणाची संवेदनशीलता किती आहे ? दोन सूक्ष्मदर्शकांत विस्तारणक्षमतेत काय फरक आहे ? उपकरणाच्या विश्वसनीयतेबद्दल काय चौकशी केली ?

( १५ ) अवलोकनात कोणत्या ज्ञानेंद्रियांचा उपयोग केला ? केवळ डोळ्यांचा ? ऐकण्याचा ? कसले मापन केले ? उष्णतेचे, तपमानाचे, विजेच्या दाबाचे, प्रवाहाचे, ध्वनीचे, ध्वनिकंपनाचे, ध्वनिकंपनातील भेदसंख्येचे ? वाचने वेळानुसार बदलतात का ? त्यांच्या बदलांचा आलेख काढता येईल का ? त्याचे विवरण लिहिता येईल का ? सांगता येईल का ?

( १६ ) निरीक्षणाचे वैशिष्ट्य कोणते ? वेधक गुण कोणता ? निरीक्षणावरून काय अनुमान निघते ? ते एकचएक अनुमान निघते का ? अवलोकन व अनुमान यांचा तर्कसंबंध तुम्ही कसा जोडला ?

( १७ ) प्रयोग कशासाठी केला ? त्यासाठी साहित्य काय वापरले ? उपकरणी कशी मांडली ? प्रयोगाच्या कृती व त्यांचा क्रम कोणता ? कोणती निरीक्षणे केली ? ती कशी नोंदली ? त्यावरून अनुमान कसे काढले ? एखादे सूत्र वापरले का ? त्या सूत्राचाच का वापर केला ? त्या सूत्राच्या प्रत्येक घटकाचा अर्थ काय ? त्यात अज्ञात घटक कोणते होते ? ते प्रयोगाने कसे मोजले ? त्यातील काही गृहीत धरले का ? वापरलेले सर्व ‘ एकक ’ नीट ओळखीचे आहेत का ? प्रयोगापासून काय शिकला ? प्रयोग सफल झाला का ? पुन्हा आत्मविश्वासाने, स्वतंत्रपणे करता येईल का ? पुन्हा करताना आज केला त्याहून निराळ्या रीतीने कराल का ?

( १८ ) तुमचा प्रयोग पूर्ण फसला का ? कोणाला करता आला ? त्याने अधिक चांगले व निराळे काय केले ? तुमचा प्रयोग कशामुळे फसला ? आता तो यशस्वीपणे तुम्ही करू शकाल का ? तुम्हाला कोणत्या अडचणी आल्या ? त्याचे निराकरण कसे करून घेतले ? नेमके निराकरण कसे होऊ शकले ?

नव्या प्रदेशात नवे अनुभव घेण्याचा; आपले कौशल्य, कल्पकता, वापरण्याचा प्रेरक अनुभव विद्यार्थ्याला घेता आला पाहिजे. त्याचे आकर्षण व आव्हान वाटले पाहिजे. जिज्ञासा, अवलोकनशक्ती, अनुमानशक्ती यांचे वाढते क्षितिज विद्यार्थ्यांसमोर उकलत राहिले पाहिजे. तरच ते विज्ञान शिक्षणोपयोगी.

□ □

# आंतरभारतीची मनोभूमी

## प्र. द. पुराणिक

### आपल्या देशाचा थोर वारसा

आपल्या देशाचा वारसा थोर, उदात्त व व्यापक आहे. तत्त्वे श्रेष्ठ व सुंदर आहेत; पण आपल्या देशात विचार आणि आचार यांत जितकी विसंगती आहे, तितकी इतरत्र क्वचितच आढळेल.

**‘ सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयः ।**
**सर्वे भद्राणी पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात ॥ ’**

असे आपण वेदकालापासून घोषित आलो आहोत. तत्त्वे किती उदात्त व सर्वोत्कृष्ट आहेत; पण त्याप्रमाणे आचरण करायचा प्रयत्न आढळतो का ?

**‘ अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च । ’**

हा घोष गीतेच्या जन्मापासून सुरूच आहे. संतवर ज्ञानेश्वर माऊलींनी आपल्या पसायदानात ...... ‘ भूतां परस्परे जडो मैत्र जीवाचें ॥ ... जो जे वांछील, तो तें लाहो प्राणिजात ॥, असे म्हटले. पसायदान व त्यातील वरील ओळी गेल्या सात-आठ शतकांपासून आपण भक्तिभावाने आळवीत आलो आहोत; पण प्रत्येक भूताचे ठायी (प्राणीमात्र) मित्रत्वाच्या नात्याचा लेशही आचरणात येत नाही. रोज नित्यपाठाचे अभंग म्हणताना ‘ सर्वां घटीं राम, देहा देही एक!...’ असे म्हणायचे आणि आपण स्वतःच तेवढे पवित्र व श्रेष्ठ आणि अन्य लोक अपवित्र व कनिष्ठ मानायचे, ही केवढी विसंगती आहे! ज्या संत एकनाथ महाराजांनी आपल्या घरी श्राद्धाच्या दिवशी भुकेलेल्या अस्पृश्यांना जेवायला घातले आणि ‘ सर्वांभूती परमेश्वर ’ तत्व हे आचरणात आणले, त्या एकनाथ महाराजांच्या कृतीचे यत्किंचितही अनुकरण करायचे नाही; अस्पृश्यांना विहिरी-वर साधे पाणीही घेऊ द्यायचे नाही. हा दांभिकपणाचा कळसच नाही का ?

### ठायी ठायी विसंगती

संत नामदेव श्वानाच्या मागे, त्याने पळवलेली कोरडी पोळी खाल्ली तर त्याच्या पोटात दुखेल या व्यथेने, त्याच्या पोळीला तूप लावण्याकरिता तुपाची वाटी घेऊन पळाल्याचा दृष्टान्त अद्वैतवाद सिद्ध करण्याकरिता जमेल त्या प्रवचनात व कीर्तनात

मिटक्या मारीत वर्णन करून सांगायचा आणि माणसाला माणुसकी न दाखवता वागवायचे.

ही विसंगतीची जुनी उदाहरणे झाली, पण सद्यःस्थितीतली मासलेवाईक उदाहरणेही भरपूर आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात ज्यांनी आपल्या भौतिक सुखाची व भविष्याची यत्किंचितही पर्वा न करता दारूबंदीसाठी सत्याग्रह करून देशसेवेचे व्रत घेतले; तीच मंडळी आज तत्वच्युत होऊन दारूच्या दुकानाचे परमिट मिळावे म्हणून कुत्र्यासारखे शेपूट हालवीत रांगेत तासन्तास उभे राहतात व नेत्यांचा वशीला लावतात, याला काय म्हणावे ? त्यागाचा व सेवेचा टेंभा मिरवीत सत्ता केंद्रीभूत करायची व स्वतःभोवती आवळून धरायची; देशाचे कोट्यवधी रुपये लंपास करायचे, याला कमालीचे ढोंग व असत्यच म्हणता येईल. अशा विसंगतीला जगात तोड नाही.

अशी विसंगतीची अनेक उदाहरणे देता येतील; पण पदोपदी दिसणाऱ्या विसंगतीचा परिणाम बालमनावर काय होतो, याचा विचारच गंभीरपणे कुणी केलेला दिसत नाही.

## विसंगतीचे भयानक परिणाम

या विसंगतीचे अत्यंत भयानक परिणाम होतात. बालवयात बालमनाला असे वाटते की, पुस्तकात ज्या उद्देश्यांनी पाठ दिलेले असतात त्याप्रमाणे आचरण किंवा कृती करायची नसते. परीक्षेसाठी त्या आदर्श पाठातील केवळ उत्तरे घोकायची असतात. सिद्धांताप्रमाणे कृती व आचरण न करायचा संस्कार शिक्षणक्रमात सतत चालू असतो. विद्यालयात जे आदर्श म्हणून सांगितले जाते त्याच्या नेमके उलटे समाजात, शाळेत दिसत असते. सिगरेट पिण्याने कॅन्सर होतो असे सांगणारा शिक्षक स्वतःच सिगारेटची पाकिटे रिकामी करीत असतो. त्यामुळे मुलांची, युवकांची, युवतींची संवेदनशीलताच हळूहळू कमी होत जाते, आणि प्रौढ वयातही तेच होते. आपल्याला इतरांच्या गरिबीचे, व्यथेचे काहीही वाटेनासे होते. ही संख्या वाढली की सारा देश सुन्न होतो व दुसऱ्यांच्या पोटात जायला अन्नाचा कण नसला तरी आपण मात्र निर्लज्जपणे अन्न वाया घालवतो. शे. ७० % लोक अर्धपोटी तडफडत राहत असताना अन्नाची नासाडी करताना आम्हाला लाज वाटत नाही. उपाशी पोटी राहणारे लोक पापी आहेत व मागच्या जन्माच्या पापामुळे त्यांना अर्धपोटी राहावे लागते, असा सोयीस्कर दैववाद निर्माण करून आपण वाटेल तसे आचरण करायला मोकळेच होतो.

## संवेदनशील मनाची आवश्यकता

म्हणून आजच्या शिक्षणाने अत्यंत संवेदनशील मन कसे घडविता येईल याचा सतत प्रयत्न झाला पाहिजे.

जेव्हा आपल्याला दुसऱ्याविषयी थोडी फार सहानुभूती वाटत असते तेव्हाच संवेदना निर्माण होते. करुणेचा भाव जागृत असला तर संवेदनेचे प्रमाण थोडे अधिक असते. सहानुभूतिशून्य व्यक्तीच्या मनात भावनांचा ओलावा शून्य असतो. मग त्याला इतरांच्या दुःखाची जाणीव होत नाही. ती व्यक्ती अत्यंत आत्मकेंद्री होते. आत्मकेंद्री व्यक्तीला जे जे आपले स्वतःचे असेल, तेवढेच चांगले दिसते. आपली भाषा, आपला राज्यभाग, आपल्याच राज्याची संस्कृती, आपली जात, आपला धर्म या विषयीच तो अभिमान बाळगतो व त्या अभिमानाचा अतिरेक झाला की त्याचे दुरभिमानात रूपांतर होते.

अशा दुरभिमानी व्यक्तीचे मनही संकुचित होते आणि त्याला उदारतेचा स्पर्श होत नाही. अशी व्यक्ती शेजाऱ्याची भाषा, शेजारचे राज्य, शेजारच्या राज्यातील संस्कृती, आदीविषयी द्वेष करते. अशा अनुदार व संकुचित मनाच्या व्यक्तींचा समूह झाला की ते इतर राज्यांना; त्यातील भाषा, संस्कृती, राहणी आदींना तुच्छ लेखतात. आपल्या स्वार्थासाठी व नेतृत्वासाठी या समूहाचा पुढारी देशाचा विचार न करता भाषावाद, सीमावाद, जातीयवाद, धर्मवाद, आदींच्या आधारे द्वेष पसरवतो. त्यामुळे देशाचे छोटे छोटे गट तयार होतात व संपूर्ण देशाचा विचार करायचा उदारपणा, दूर-दृष्टी, त्यांच्यात राहत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात अशा प्रकारची परिस्थिती अधिकच निर्माण झाली. कारण सत्तेचे आमीष सर्वत्र दिसू लागले.

असे छोटे गट झाले म्हणजे देशाला परचक्राची, अक्रमणाची व दुर्बलतेची सतत भीती असते. अनेक वादामुळे देश पोखरून निघतो. बेबंदशाही माजते व मूठभर राजकारणी लोकांच्या हाती सत्ता केंद्रित होते. लोकशाही नावापुरती व दिखाऊ असते. याचे प्रत्यंतर आपणास नुकतेच आले आहे. मग असंख्य लोकांची नाना तऱ्हेने उपासमार होत राहते.

## आंतरभारतीचे स्वप्न

अशा तऱ्हेची देशाची दुर्दशा कधीही होऊ नये व अखंड भारतात भ्रातृभाव निर्माण व्हावा म्हणून पूज्य साने गुरुजी आंतरभारतीचे स्वप्न पाहत होते. आपला हा भारत देश किती विविधतेने नटलेला आहे ! यातील विभिन्न राज्ये त्यांना कमल पुष्पाच्या पाकळ्यांप्रमाणे वाटत. त्या डौलदार पाकळ्या विभिन्न दिसत असतात; पण केंद्रापाशी त्या मजबुत सूत्राने बांधलेल्या असतात. त्यांना जीवनरस केंद्रातूनच मिळत असतो. राज्याराज्यातल्या भाषा आपापल्या परीने समृद्ध आहेत; पण त्यातील साहित्याचा, सुंदर काव्याचा, उद्बोधक कथा-कादंबऱ्यांचा कधी आपुलकीने इतर राज्यातील लोकांनी विचार केला आहे का ? प्रत्येक राज्यात संस्कृतीच्या उदात्त परंपरा व अनेक आकर्षक सांस्कृतिक प्रकार आहेत, पण त्यांची आपण कधी वास्तपुस्त केलीच नाही. आपण

नेहमी ‘ मी ’ आणि ‘ माझे ’ याच संकुचित शब्दद्वयांच्या वर्तुळात अडकून पडलो आहोत. माझे मत असे आहे, याचा अर्थ वैचारिक निष्कर्ष असा आहे; पण विचार कधी बदलत नाहीत कां ? विचार हे प्रवाही असतात. प्रवाह गतिमान असतो म्हणजे विचारही गतिमान असू शकतात. म्हणजे मत ही परिवर्तनशील असते, पण या परिवर्तनासाठी दुराग्रही वृत्ती चालत नाही. जे जे चांगले, देशाला पोषक, तारक ते ते विशाल, प्रेमळ मनाने घ्यायची वृत्ती असावी. लागते. आणि म्हणूनच पूज्य साने गुरुजींनी एका विशिष्ट धर्माचे आचरण करायला आर्जवून सांगितले आहे. कोणता धर्म आहे ? तो– ‘ **खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे** ’ हा प्रेमधर्म सर्वांनी आचरला पाहिजे.

## प्रेमधर्माची जोपासना

पण हे होणार कसे ?

परस्परांत प्रेम तरी कसे निर्माण होते ? प्रेमासाठी थोडातरी सहवास वा परिचय आवश्यक असतो. सहवास वा परिचय झाला नाही तर एकमेकांची मने, भावना, व्यवहार समजणार तरी कसे ? आपण स्वतःला आत्मकेंद्री करून अनेक बंधने निर्माण करीत असतो. माझीच भाषा चांगली, माझंच गाणं चागलं, माझंच नृत्य वाखाणण्यासारखं, माझ्याच भाषेत केवळ सौंदर्य आहे, असे म्हटल्यावर दुसऱ्याच्या भाषेतलं हे सारं सौंदर्य, भाषेतला चांगूलपणा, गाण्यातला गोडवा, नृत्यातलं वैशिष्ट्य कळणार तरी कसं ? आत्मकेंद्री करणारी ही बंधने बाजूला सारल्याशिवाय परराज्यातील भाषेचं, चालीरीतीचं, सांस्कृतिक गोष्टींचं सौंदर्य कळणार कसं ? त्यात प्रवेश केल्याशिवाय त्या अवगत होणार कशा ?

## बालकांची संवेदनशील मने

बालकांच्या—मुलांच्या स्वार्थाच्या कक्षा अत्यंत सीमित असतात. त्यामुळे ती परस्परांच्या सहवासात आल्यावर चटकन मिसळतात. त्यामानाने प्रौढ व्यक्ती तितक्या लवकर मनाने जवळ येत नाहीत. कारण त्यांच्यात अहंकार केंद्रीभूत झालेला असतो.

म्हणूनच ‘ आंतरभारती ’ची संकल्पना प्रौढांच्या पेक्षा तरुणांच्या, त्याहीपेक्षा बालांच्या मनात लवकर रुजते. कारण ती अनेक ठिकाणी अनेक वेळा परस्परांच्या सहवासात येतात. ती परस्परांची भाषाही चटकन आत्मसात करतात. कारण सहवासामुळे ती बोलत असतात. त्यांच्या विचारांची देवाण-घेवाण होते. भिन्न भिन्न संदर्भातील शब्द, वाक्य, भाषाशैली यांचा परिचय होत जातो. मुले अत्यंत अनुकरणशील असतात. त्यामुळे ती भाषाही चटकन शिकतात. कारण त्यांच्या मनात भाषेचा दुरभिमान नसतो. त्यांना भाषावाद निर्माण करून पुढारीपण मिळवायचे नसते, व टिकवायचेही नसते; तसेच राजकारणही खेळायचे नसते.

## विद्यार्थीदशेचे महत्त्व

तेव्हा विद्यार्थीदशेतच विद्यार्थी बहुभाषी व्हायचा प्रयत्न करतील असे वातावरण निर्माण केले पाहिजे आणि हे आंतरभारतीच्या उदात्त कल्पनेमुळेच शक्य होते. म्हणून आंतर भारतीची जाणीव असलेल्या प्रत्येक व्यक्तीने किंवा शिक्षकाने विद्यार्थ्यांना हा दृष्टिकोन सहजगत्या समजेल अशी स्थिती निर्माण करावी. अशा तऱ्हेने त्यांना बहुभाषी, निदान द्विभाषी तरी करायचा प्रयत्न केलाच पाहिजे.

कोणतीही गोष्ट लादल्याने त्यांतील प्राण व आत्मीयताच नष्ट होते. म्हणून भाषाच नव्हे तर, इतर सांस्कृतिक बाबींचीही देवाण-घेवाण व्हावी. त्यामुळे संकुचित मन काही प्रमाणात तरी व्यापक होते. त्या भाषेतील साहित्याचाही आनंद मिळतो. इडली-डोसा, वडा-सांबार, परोठे-तंदुरी रोटी खाऊन भौतिक आनंदच केवळ मिळवू नये, तर मनाच्या खाद्यासाठी त्या त्या भाषेतील साहित्याचेही उच्च रसास्वादनही केले पाहिजे. सामान्य जनांच्या मनात भाषेचा दुरभिमान कधीच नसतो. स्वार्थी नेते सामान्य व भोळ्या जनातील तो दुरभिमान जागृत करतात, फुलवतात व मग भाषिक दंगे व वादंग माजवतात.

विद्यार्थीदशेतच या मुलांची मने विविध भाषांच्या अल्पपरिचयाने उदार, विशाल करायच्या हेतूने अभिमंत्रित केलेली असली तर, ती युवावस्थेत व प्रौढावस्थेत संकुचित, स्वार्थी नेतृत्वाला सहजासहजी बळी पडणार नाहीत.

## संस्कृती म्हणजे काय ?

आपण जिला 'संस्कृती' 'संस्कृती' म्हणतो ती संस्कृती म्हणजे तरी शेवटी काय ? भारतीय संस्कृती जगात थोर आहे असे आपण अभिमानाने सांगतो; पण या संस्कृतीविषयी अभिमान बाळगण्यासारखे होते ते आपण जपण्याचा प्रयत्न करतो काय ? की आपला हा अभिमानच वृथा आहे ? तर्कशुद्ध विचाराने जर आपण सिंहावलोकन केले तर, कोणत्याही समंजस नागरिकाला हे पटेल की, आपण भारतीय संस्कृतीचे बहुतेक सारे आदर्श गुंडाळून ठेवले आहेत. संस्कृतीविषयी थोडक्यात असे म्हणता येईल— समाजातील सर्व घटकांच्या धारणेकरिता, पोषणाकरिता, संवर्धनाकरिता, जीवन सुखी करण्याकरिता जे लहान मोठे चांगले नियम, विचार व आचार सांगितले आहेत त्यांचे आचरण करणे. आपण बहुतांशी हे चांगले नियम, विचार व आचार सोयीस्करपणे विसरलो आहोत आणि स्वतःच्या सुखाकरिता जे हवे तेवढे घेऊन समाजाच्या इतर घटकांना बाजूला सारले आहे. याच वृत्तीचे दुसरे नाव स्वार्थ असे आहे.

व्यक्तींची मने बालवयातच–विशेषतः विद्यार्थीदशेतच घडवली जातात. त्यांच्या मनाच्या अंकुरांना याच वेळी वळण लावले जाते. सामुदायिक जीवनाचा अभाव हे आजच्या शिक्षणप्रणालीतले मोठे दोष–लक्षण आहे. त्यामुळे सामाजिक वृत्तीसाठी

आवश्यक त्या गुणांची वाढ क्वचितच होते. सहिष्णू वृत्ती, सहकार्य, समाजाच्या अन्य घटकांसाठी त्याग, इतरांच्या प्रगतीने आनंदित होणे आदी वृत्ती सामुदायिक जीवन नसल्यामुळे जोपासल्या जात नाहीत. त्यामुळे भारतातील एका भागातील लोक पुराच्या तडाख्यात सापडून तडफडत असताना बहुतांशी भारतीय आपले दैनंदिन जीवन चैनीने घालवत असतात. त्यात त्यांना यत्किंचितही संकोच वाटत नाही. सर्व राज्यांतील भारतीयांत बंधुत्वभाव निर्माण करायचा असेल तर, बालवयातच विद्यार्थ्यांवर विशाल दृष्टीचे, उदार मनाचे 'वसुधैव कुटुंबकम्' वृत्तीचे संस्कार घडवले पाहिजेत. स्वतः पंजाबी नसताना पंजाबच्या निवासियांविषयी आपल्याला कळकळ, प्रेम, जिव्हाळा व आत्मीयता वाटली पाहिजे आणि हे सारे आंतरभारतीनेच शक्य होईल. हिंदी हायस्कूलने गेली १५ वर्षे हेच कार्य जोपासायची प्रामाणिकपणे धडपड केली.

## आंतरभारतीच्या संस्काराचा समय

म्हणून आंतरभारतीच्या संस्कारासाठी बालमन ही सर्वांत उत्तम भूमी आहे. प्रत्येक विद्यालयात आंतरभारतीच्या संस्कारासाठी स्वतंत्र यंत्रणा राबवली तर फारच उत्तम; पण ते नच जमले तर निदान शिक्षकांनी यांत थोडा रस घेऊन धर्मांधता, जातीयता, उच्च-नीचता, स्पृश्यास्पृश्यता, प्रांतीयता, भाषिक कूपमंडूकता यांच्याविरुद्ध विद्यार्थ्यांना मौलिक व तात्त्विक मार्गदर्शन करून समानतेच्या भावना जोपासल्याच पाहिजेत आणि हे सातत्याने निश्चित शक्य होते.

कुणी विविध भाषा शिकायला प्रारंभ करावा; कुणी इतर राज्यांतील उत्तमोत्तम ऐतिहासिक, भौगोलिक, प्राकृतिक रमणीय स्थळांची माहिती मिळवावी; औद्योगिक प्रकल्पांचा अद्ययावत विकास जाणून घ्यावा; साहित्यिकांची, सांस्कृतिक बाबींची, नृत्यांची, दैनंदिन जीवनाची सांगोपांग माहिती करून घ्यावी. असे केले तर आपल्याला असे आढळून येईल की, आपला देश अतिविशाल असल्यामुळे हे भिन्नत्व वरपांगी आहे. आंतरिक संस्कृतीचे स्नेहरज्जू एकच आहेत आणि भाषाभिन्नत्वामुळे ते आपल्याला माहीत नाहीत.

अद्वैतवादाचा वारसा सांगणाऱ्यांनी तर हे प्रथम आचरले पाहिजे. हे सारे केले तर भारतीय बंधू मनाने खूप जवळ येतील, जवळीक झाली की स्नेह निर्माण होईल. त्यासाठी जिद्द, तळमळ, उदारमन, विशाल दृष्टी व प्रेमळ स्वभाव हवा. तोच आपण अंगी बाणवू या.

□ □

# ' आहुतीचे आव्हान '

## मु. श्री. पंधे गुरुजी

आचार्य कुळाचा मी एक नम्र साधक, आणि गेली ५५ वर्षे राष्ट्रीय शिक्षणाचा सातत्याने स्वतंत्र प्रयोग करणारा एक कर्मनिष्ठ शिक्षक, या नात्याने जेव्हा आजची भारतातील शिक्षणपद्धती व शिक्षण, मग ते प्राथमिक असो, माध्यमिक असो किंवा महाविद्यालयीन असो, मी लक्ष्यात घेतो, तेव्हा याला शिक्षण व शिक्षगपद्धती तरी म्हणावे काय ? असे एक मोठे प्रश्नचिन्ह माझ्यासमोर उभे राहते.

गेल्या ६० वर्षांच्या शिक्षणक्षेत्राचा प्रत्यक्ष अभ्यास व अनुभवांतून परिपूर्ण शिक्षण-विषयक जी योजना लक्षात आली, ती सूत्रात्मक आणि प्रतीकदर्शक अशा पाच शब्दांनी मांडता येईल.

Head, Heart, Hand, Health, Humanity. बुद्धी, हृदय, हात, शरीरारोग्य व मानवता. सृष्टीची निर्मिती जशी पंच महाभूतांच्या समन्वयावर उभी आहे. तशीच शिक्षगपद्धतीत देखील वरील पाच सूत्रात्मक प्रतीकतत्त्वांचा समन्वय साधणारी असावी. ही पाच सूत्रे शिक्षणक्षेत्रात जगन्मान्य झाली आहेत. प्रचलित शिक्षगपद्धतीत यांचा पूर्णतः अभाव आहे. त्यामुळे या शिक्षणातून बहुतांशी शोषक, शासक व आक्रमक निर्माण होत आहेत.

भारत स्वतंत्र झाल्यावर शिक्षगक्षेत्रातील अनेकांना मोठी आशा वाटत होती की, जसा हा देश राजकिय पारतंत्र्यातून मुक्त झाला, तसाच आता तो बौद्धिक व मानसिक गुलामीतूनही भावी पिढीची मुक्तता करील. नव्या पिढीला ज्ञानामृत पाजून तिला बलवान, स्वायत्त व समर्थ नागरिक बनवील आणि ते नागरीक देशाच्या भीषण दारिद्र्याचे व गुलामी मनोवृत्तीचे उच्चाटण करतील; पण ही अपेक्षा धुळीत मिळाली. आणि ज्ञानामृताऐवजी विषप्राशन करण्याची पाळी नव्या पिढीवर आली. भारतीय सार्वभौम प्रजासत्ताक राजवटीच्या भावी इतिहासात कधीही न पुसणारा, प्रचलित शिक्षगपद्धतीच्या अपयशाचा लाजिरवाणा कलंक म्हणून याची नोंद केली जाईल. कारण या अपयशाने राष्ट्राच्या सुमारे दोन पिढ्या बेकारीत व निष्प्राण जीवनाच्या खाईत लोटल्या.

स्वातंत्र्यापूर्वीच्या जाणत्या महापुरुषांनी भारतात परकीय सत्तेने रूढ केलेल्या शिक्षणात अनेक प्रकारचे परिवर्तन करणारे प्रयोग केले; परंतु ब्रिटिश राजवटीच्या अगदी प्रारंभाला लॉर्ड मेकॉले यांनी अशी एक जबरदस्त ग्यानबाची मेख शिक्षणक्षेत्रात ठोकली

की, ती सुमारे दीडशे वर्षांचा काल ओलांडून आल्यावरही नुसती ढिलीदेखील करता आली नाही. उलट ती हालवून अधिक बळकटच झाली. डझनावारी कमिशने बसली. अभ्यासक्रमाच्या व शिक्षणकालाच्या उलथापालथी झाल्या, तरीही परिणामतः काहीही घडले नाही. फक्त कमिशनांच्या पंचपक्वानांच्या पंक्ती मात्र उठल्या.

आता ह्या ध्येयशून्य, विकृत व विस्कळीत झालेल्या चालू शिक्षणपद्धतीमुळे देशातील कोट्यवधी पालकांचा बुद्धिभ्रंश होण्याची वेळ आली आहे. आपल्या मुला-मुलींना आता काय शिकवावे, व कोणत्या शिक्षणाने त्यांना समर्थ व संपन्न बनवावे हेच त्यांना उमजेनासे झाले आहे. शिकणाऱ्याला आपले भवितव्य जाणण्याची आरंभी तरी पात्रता नसतेच. पालक, शिक्षक व शासक हेच त्याचा उद्धार करणारे असतात; पण बिचारा पालक भांबावलेला आहे. कुटुंबपरिवाराच्या आर्थिक ओढाताणीचा गळफास लागलेला आहे. अशा भ्रमिष्ट स्थितीत, तो आपल्या पाल्याच्या भवितव्याची व्यवस्था करू शकत नाही. शिक्षक तर जाणून-बुजून शासकाचा पगारी नोकर. त्याने आपल्या बुद्धीचा यथाक्रम विक्रय केला आहे. स्वतंत्र बुद्धी शिल्लक नाही. ती असली तरी तिचा तो उपयोग करू शकत नाही. रूढ शिक्षणपद्धतीच्या जुनाट मोडक्या टांग्याला त्याला जुंपलेले आहे. तो ओढताना इकडे तिकडे त्याचे लक्ष जाऊ नये म्हणून डोळ्याच्या दोन्ही बाजूला शिक्षणाच्या ठराविक तांत्रिक पद्धतीच्या व नियंत्रणाच्या झापडी लावूनच त्याने कुरकुर न करता धावले पाहिजे. नाहीतर उद्या त्याची मुलेबाळे उपाशी राहतील. अशा स्थितीत हा शिक्षक भारताचे भवितव्य घडविणारी नवी पिढी कशी निर्माण करणार ?

या देशातील प्राचीन परंपरेप्रमाणे शिक्षकाची चार जीवनसूत्रे होती. यजन, याजन, अध्ययन व अध्यापन या सूत्रांच्या आधारे अध्यापकाचे जीवन चालत होते; परंतु ह्या प्राचीन परंपरेचा आता पूर्णतः लोप झाला आहे. इतकेच नव्हे तर, 'आचार्य' या शब्दप्रयोगाची शिक्षकाला धास्ती वाटते. अर्थात तो आचार्य व अध्ययन करणारा अध्यापकही होऊ इच्छित नाही; तर 'सर', 'मास्तर' होऊ इच्छितो. म्हणजे हा एक बिनभांडवली धंदा आहे. या प्रकारच्या शिक्षणव्यवसायातील अवान्तर मार्गाने धनकोष बाळगणारा धनिक तो बनू इच्छितो. त्यात काही अडथळा आला तर, तो संप करून पालक, बालक व शासक यांना कात्रीत पकडतो. हे एक नवे भयभीत करणारे तंत्र शिक्षणक्षेत्रात रूढ झाले आहे. नाक मुठीत धरून पालकाला, शासकाला व संबंधित सर्वांना शरण जावे लागते. याप्रमाणे शिक्षणक्षेत्रातील शिक्षक या घटकानेही बिकट परिस्थिती निर्माण करण्यात भाग घेतला आहे.

आता शिक्षणक्षेत्रातील सर्वांत प्रबल घटक सत्ताधीश शासक असतो. याच्या समोर शिक्षणसंस्थाचालकांना व अन्य सर्व संबंधितांना दीन गोगलगाय बनण्यापलिकडे अन्य मार्ग नसतो. शासकाचा व्यवहार पाहावा तर, सत्ता राजकारणाच्या आखाड्यात सुंदोपसुंदी करण्यात तो मग्न असतो. प्रसंगी शिक्षणक्षेत्रात अधिक ओढाताण उद्भवली, की

भुकेलेल्या कुत्र्याला जसा भाकरीचा तुकडा टाकून त्याचे भुंकणे बंद करावे, तशी एखादी सवलत जाहीर करून शासक आपले सत्तास्थान अधिक बळकट करतो. शिक्षणाचा प्रश्न यामुळे अधांतरीच लोंबकळत पडतो.

अशी ही परिस्थिती केवळ पाहत राहणे व ' हरि करील ते खरे, व्यथा या मनात भ्रम संचरे ' असे म्हणणे ही मोठी चूक होईल. त्याचप्रमाणे जे चालले आहे, ते खांद्यावरील जूं मानून ओढीत राहणे हेही शिक्षकाला, शिक्षणसंस्थांना व शासनाला अंती अयोग्य ठरेल. हा एक सामाजिक गुन्हा करण्यासारखे आहे. यातून प्राप्त होणारे धन ही अप्रस्तुत वस्तू मानली पाहिजे. यास्तव ज्याप्रमाणे पारतंत्र्य घालविण्यासाठी आपण स्वातंत्र्यसंग्राम लढविला त्याचप्रमाणे बौद्धिक व मानसिक गुलामी पूर्णपणे नाहीशी करण्यासाठी व दारिद्र्य दूर करण्यासाठी जाणत्या शिक्षित नागरिकांनी आणि शिकणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांनी शांततेच्या मार्गाने प्रतिकारार्थ लढा उभारणे आज अगत्याचे झाले आहे. लोकनायक जयप्रकाशजी यांच्या समग्र क्रांतीचा प्रारंभ शिक्षणक्षेत्रापासून झाला पाहिजे.

ज्यांनी शिक्षणक्षेत्रात प्राण निर्माण करण्यासाठी स्वतःची संपूर्ण हयात घालविली आहे अशी जुनी माणसे बोटांवर मोजण्याइतकी उरली आहेत. जी राहिली आहेत त्यांनी पंचाहत्तरी ओलांडली आहे, त्यांना देह साथ देत नाही, त्यांची दृष्टी अधू झाली आहे. अशा स्थितीत त्यांच्या जीवनाचा होम तरुण पिढीला ' आहुतीचे आवाहन ' ठरेल. हे आवाहन तरुणांना ऐकू जावो, हीच या वयोवृद्ध आचार्यांची प्रार्थना. त्यांची ही जिव्हाळ्याची हाक मानून तरुणांनी शैक्षणिक क्रांतीचा संकल्प का करू नये ?

□ □

# उच्च शिक्षणातील परभाषांच्या साहित्याचे अध्ययन व अध्यापन

## प्र. वा. ऊर्ध्वरेषे

[ इंग्रजी साहित्याच्या अभ्यासाच्या अनुषंगाने समोर येणाऱ्या समस्या व त्यावरील काही उपाय. ]

' एक डिफिकल्टी आहे सर, विचारू ? '

' विचारा की. त्यात एवढं हेझिटेशन कशाला ? '

' प्रश्न असा आहे सर, की ही जी डॉल्स हाउसमधली नोरा आहे— '

' जरा थांबा. तुम्ही इंग्रजीतच प्रश्न विचारा ना. म्हणजे तुम्ही मराठीत विचारलात तरी मी समजावून देणार नाही असं नाही; पण इंग्लिशमध्ये विचारलात, तर तुमच्याच दृष्टीने अधिक चांगलं. '

' पण इंग्रजीत क्वेश्चन फ्रेम करणं फार कठीण जातं सर. म्हणून तर आम्ही बहुतेकजण प्रश्न विचारायचं टाळतो. काही पोर्शन समजला नाही तरी. '

' नो नो नो नो ! दॅट्स नॉट करेक्ट. असं करता कामा नये तुम्ही. अहो, इंग्रजीच्या वर्गात इंग्रजीचा सराव करायचा नाही तर कुठे ? त्यातून तुम्ही इंग्लिश लिटरेचरचे विद्यार्थी. एम्. ए. झाल्यावर तुमच्यापैकी काही जण तरी इंग्रजीचे प्राध्यापक होणार. निदान ज्युनिअर कॉलेजात. तिथे तुम्हाला इंग्रजी भाषाच शिकवावी लागणार. तुमची स्वतःचीच इंग्रजी बोलण्याबाबत ही अडचण असेल, तर तुम्ही चांगलं इंग्रजी कसं शिकवणार ? पण ते नंतरचं नंतर पाहता येईल. हा आत्ताच तुम्हाला जो प्रश्न विचारायचाय, डॉल्स हाउसच्या नोराचा, त्यासंबंधी परीक्षेतली उत्तरं तर तुम्हाला इंग्रजीत लिहावी लागणार ना ? मग तिथे कसं कराल ? '

' तेच म्हणतोय मी सर. एक असं वाटतं, की इंग्लिश लिटरेचरचे पेपरच मराठीतून लिहिले तर काय होईल ? माझा एक मित्र तिकडे संस्कृतमध्ये एम्. ए. करतोय. त्यांना अलौड असतं मराठीतून पेपर लिहिणं. कालिदास, भवभूती, बाणभट्ट या सगळ्यांचं साहित्य ते वाचतात मूळ संस्कृतातून; पण त्यांच्यावरच्या प्रश्नांची उत्तरं मराठीत. ते फार सोपं जातं म्हणे त्यांना. '

‘सोपं जात असेल; पण ते संस्कृतला ठीक आहे. ती आहे डेड लँग्वेज. व्यवहारात कुठे संस्कृत बोलणं किंवा लिहिण्याचं काम पडत नाही म्हणून ठीक आहे. नुसतं लिटरेचर समजलं, अ‍ॅप्रीसिएट करता आलं की चालतं. तो नियम इंग्रजीला लावून कसा चालेल ? इथे तर या अभ्यासक्रमाचा एक उद्देशच मुळात इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवता यावं हा आहे. शिवाय, इंग्रजी ही काही संस्कृतसारखी, किंवा युरोपमधल्या लॅटिन वा एन्शन्ट ग्रीकसारखी डेड लँग्वेज नाही. इंग्लिश लिटरेचरचं अ‍ॅप्रीसिएशन इंग्रजीतूनच करायला हवं. ते सुद्धा उत्तम, शैलीदार इंग्रजीतून. नुसते सायन्सचे किंवा इकॉनामिक्स–पोलिटिकल सायन्सचे पेपर लिहितात तशा मॅटर-ऑफ फॅक्ट किंवा फंक्शनल इंग्लिशमध्ये लिहून चालणार नाही. इंग्लिश हे स्पेशलायझेशन ना तुमचं ?’

‘पण इंग्रजी भाषेवरचं प्रभुत्व मिळवणं हा जर प्रमुख उद्देश असेल. तर मग हा लिटरेचरचा एवढा जड अभ्यासक्रम कशाला ? ही इतकी मोठी टेक्स्ट्स अन् वर क्रिटिसिझम् ? एकेका पेपरला बारा ते पंधरा पुस्तकं ! त्यातली काही चारचारशे, पाचपाचशे पानांची ! नुसती नजरेखालून घालू म्हटलं तरी शक्य नाही. मग नीट समजणं, त्यावर काही प्रश्न लिहून काढणं हे तर दूरच !’

‘म्हणून तुम्ही नोट्स अन् गाइड्सवरून घोकंपट्टी करता ! असंच ना ?’

‘आपल्याला राग येईल सर; पण नोट्स अन् गाइड्सचा फार आधार वाटतो हे खरंय. तो नसता तर आम्ही नव्वद टक्के विद्यार्थी हमखास गचकलो असतो परीक्षेत—’

‘वा ! चांगला कबुलीजबाब आहे, तुमचा. आम्हा प्रोफेसरांना ते ठाऊक नाही असं नाही म्हणा. तुमचे पेपर तपासताना सहज लक्षात येतंच की ते. तरीसुद्धा आम्ही तिकडे काणाडोळा करतो, इंग्रजी कच्चं आहे हे सुद्धा फारसं पाहत नाही. म्हणूनच तर चाळीस-पन्नास टक्के तरी रिझल्ट लागतो. आम्ही परीक्षक जर खरोखर स्ट्रिक्ट राहिलो ना, तर दहा टक्केसुद्धा रिझल्ट लागायचा नाही !’

‘आपण म्हणता ते अगदी खरंय, सर. माझ्या भावानं इंग्लिश लिटरेचरमध्ये एम्. ए. केलन् या आपल्याच डिपार्टमेंटमधून. अन् तो आता इंग्लिशचा लेक्चरर आहे एका कॉलेजात. तो सुद्धा हेच म्हणतो. अगदी प्री–युनिव्हर्सिटी, बी. ए. सगळीकडे हीच बोंब ! पोरांना इंग्रजी येत नाही अन् निदान चाळीस टक्के तरी पास करायलाच हवे. मग चालते ढकलगाडी ! त्यातलेच कोणी मग शिक्षक होऊन शाळेत इंग्रजी शिकवतात, अन् काही आमच्यासारखे एम्. ए. करून कॉलेजात प्राध्यापक बनण्याची स्वप्नं बघू लागतात ! काही जण होतातही !’

‘बरं ही अवांतर चर्चा पुरे झाली. फार कॉम्प्लिकेटेड प्रश्न गुंतलेले आहेत त्यात. तुमचा तो इब्सेनच्या नोरासंबंधीचा प्रश्न विचारा—’

'खरंच त्या इब्सेनबद्दलच म्हणायचं होतं. म्हणजे असं, की इब्सेन हा मुळात इंग्लिश नव्हता ना सर?'

'अहो इब्सेन कसा इंग्लिश असेल? तो होता नॉर्वेजिअन. एवढं तर माहीत असायलाच हवं तुम्हाला.'

'आहे ना माहीत. म्हणूनच विचारायचं, की त्याने मूळ 'डॉल्स हाउस' लिहिलंन् ते इंग्रजीतून की त्याच्या नॉर्वेजिअन भाषेतून?'

'अर्थात नॉर्वेजिअन भाषेत. अहो क्रिएटिव लिटरेचर जगात सर्वच जण आपापल्या भाषेत निर्माण करतात. क्वचित कुठे कॉनरॅडसारखा एखादा अपवाद असेल तेवढा. किंवा आपल्याकडे इंडो-अँग्लिअन रायटर आहेत, इंग्रजीतून कथाकादंबऱ्या अन काव्य लिहिणारे. मुल्कराज आनंद, मळगावकर, वगैरे. पण एकतर हे इंडियन रायटर्स म्हणजे अपवाद हे तर खरंच; पण त्यांनासुद्धा इंग्लिश लिटरेचरमध्ये फारसं स्थान नाही. आपलं एक इंडियन लाइफचं चित्रण इंग्रजीसारख्या जागतिक भाषेतून करतात म्हणून त्यांना महत्त्व. शिवाय पैसा चिक्कार! बरं ते जाऊ द्या. इब्सेनबद्दल काय म्हणत होता तुम्ही?'

'सर, आपण जे लिटरेचरच्या भाषेबद्दल म्हणालात ना, तोच मुद्दा होता माझा.'

'इब्सेनच्या बाबतीत?'

'हो. मला असं म्हणायचंय, की इब्सेन हा नॉर्वेजिअन. त्याने मूळ नॉर्वेजिअन भाषेत नाटकं लिहिली. आपण त्यांचे इंग्रजी अनुवाद वाचतो. मग त्यावरच्या प्रश्नांची उत्तरं मराठीतून, किंवा हिंदी, बंगाली, कानडी वगैरे आपल्या भारतीय भाषांतून लिहिली, तर काय बिघडलं?'

'छे छे! तसं कसं करता येईल? अहो, इंग्लिश लिटरेचरच्या परीक्षेत सगळी उत्तरं इंग्रजीतच हवीत. अगदी सरळ लॉजिक आहे हे.'

'सरळ लॉजिक? मला तर सगळीच फॅलसी दिसतेय् त्यात! पण ते राहू द्या. ग्रीक येतं सर तुम्हाला?'

'ग्रीक? नाही बुवा– पण त्याचा काय संबंध?'

'ग्रीक! ग्रीक येत नाही सर? बरं मग लॅटिन, हिब्रू? निदान फ्रेंच, रशियन, स्पॅनिश, इटालियन–'

'काय चालवलंय काय, तुम्ही हे? मी इंग्रजीचा प्राध्यापक आहे, ग्रीक-लॅटिनचा किंवा फ्रेंच-जर्मनचा नव्हे—'

'राइट! तेच म्हणतो मी सर. तुम्हाला या भाषा येत नाहीत.–तरी तुम्ही होमरबद्दल सांगता, व्हर्जिलचा संदर्भ देता, ॲरिस्टॉटल अन् प्लेटो तर तपशीलात जाऊन

शिकवता, ओल्ड न् न्यू टेस्टॅमेंटमधील गोष्टी सांगता, शेक्सपिअर–मिल्टनबरोबरच मोलिएर, सार्त्र, टॉलस्टॉय, डोस्टोवस्की, सर्वेंटिस, डांटे अशा अनेक प्राचीन अन् अर्वाचीन युरोपिय ग्रंथकारांच्या अभिजात साहित्याबद्दल एवढं सांगता — '

'मग त्यात काय झालं ? हे सगळं वाचलंय मी. आता तर यंदापासून कॉंटिनेंटल लिटरेचरचा एक नवा पेपर ठेवलाय् एम्. ए. पार्ट २ ला. मीच शिकवणारय तो.'

'मग तर माझा मुद्दा सिद्ध झालाच की! सर, तुम्ही सगळं हे निरनिराळ्या भाषांतलं साहित्य वाचलंत इंग्रजी अनुवादांवरून. अन् आता तो पेपर शिकवणार इंग्रजीच्या एम्. ए.च्या वर्गाला, इंग्रजीतून!'

'मग त्यात एवढं आ वासून पाहायला काय झालं ? मी इंग्लंडमध्ये असता कॉंटिनेंटल लिटरेचरचे दोन पेपर केले त्यातसुद्धा वाचन, लेखन सगळं इंग्रजीतच केलं की. दोन-तीन पेपरही लिहिले मी डोस्टोवस्कीच्या क्राइम अँड पनिशमेंट न् ब्रद्रर्स कारामोझोववर. तेही इंग्रजीतच होते. फार 'ॲप्रीसिएट झाले होते ते आमच्या सेमिनारमध्ये.'

'थँक्यू यू व्हेरी मच. सर, तुम्ही जे सांगितलंत ते माझ्या म्हणण्याला पुष्टी देणारंच आहे की!'

'कसं ? मी म्हणतोय मी ते सगळं इंग्रजीतून वाचलं न् लिहिलं. अन तुम्ही म्हणताय मराठीत! उद्या म्हणाल, हिंदी, तमीळ, तेलुगू, गुजराती, बंगाली, सगळ्या भाषांतून लिहिलं तरी काय बिघडेल ?'

'उद्या कशाला' आजच म्हणतोय की ते सगळं! अन् जे तुम्ही इंग्लंडमध्ये केलं तेच. सर, तुम्हाला इंग्रजीशिवाय दुसरी कोणती युरोपिअन भाषा येत नाही. तरी तुम्ही ग्रीक, लॅटीन, रशियन, फ्रेंच, अशा अनेक भाषांतील साहित्याचा आस्वाद घेतला, रसग्रहण केलं, त्यावर पेपरसुद्धा लिहिले म्हणता. अन् हे सगळं इंग्रजीत ग्रंथकारांच्या मूळ भाषांमध्ये नव्हे. मग माझं म्हणणं असं इंग्लंडमध्ये सगळ्या इतर भाषांच्या साहित्याचा अभ्यास जर इंग्रजी अनुवादावरून केलेला चालतो व त्यावर पेपर लिहायचे, पुस्तकं लिहायची, ती जर इंग्रजीत, तर मग भारतातही इंग्रजी साहित्याचं रसग्रहण भारतीय भाषांतून केलं तर काय बिघडलं ? खरं तर रशियन, फ्रेंच वगैरे साहित्याशी आपला परिचय आहे तो केवळ इंग्रजी अनुवाद उपलब्ध आहेत म्हणून. तसं नसतं तर टॉलस्टॉय, पुश्किन, डोस्टोवस्की, गॉर्की, सार्त्र, इब्सेन, ही नावंसुद्धा आपल्या कानावर आली नसती. अन् तुमचा क्राइम अँड पनिशमेंटवर पेपरही झाला नसता.

'ठीक आहे, पण पुढे म्हणायचं काय तुम्हाला ?'

'म्हणायचं हेच की, सर आपण इंग्लंडमधे असताना इंग्रजीत पेपर लिहिला ते ठीक; पण आता भारतात आल्यावर डोस्टोवस्कीवर अन् शेक्सपिअरवर सुद्धा मराठीत किंवा हिंदीत का लिहू नये ?

'रशियन ऑथरवर न् शेक्सपिअरवर मराठीत लिहायचं? कसंसच वाटतं ते!'

'वा! रशियन ऑथरवर इंग्रजीत चालतं! मग मराठीत का चालू नये? याचं माझ्या माहितीचं एक उदाहरण सांगतो सर. एका इंग्रजीच्या प्राध्यापक बाईंना पीएच. डी. करायचं होतं. यु. जी. सी.ची फेलोशिप हवी होती. त्यांचे यजमान त्या वेळी रशियात होते. त्यांनी सुचवलं, पुश्किनवर प्रबंध लिही, म्हणजे त्या निमित्ताने रशियात येऊन जाता येईल. गाइड म्हणून काम करण्याला संमती देणाऱ्या विद्वान प्राध्यापकांना बाईंनी विचारलं, 'पुश्किन हा रशियन लेखक म्हणून त्यांच्यावर पीएच. डी. केलं तर ती पदवी इंग्रजी विषयात मानली जाईल?' प्राध्यापकांनी उत्तर दिलं, 'त्यात काय झालं? तुम्ही वाचणार इंग्रजीतले अनुवाद, प्रबंधही इंग्रजीत, म्हणजे पीएच्. डी. इंग्रजीतली अगदी इंग्लिश लिटरेचरमधली!' प्राध्यापकांनी हो म्हटल्यावर बोर्डात सगळ्यांनी माना डोलावल्या. इतकंच नव्हे तर, यु. जी. सी. च्या कमिटीने विषय मान्य करून शिष्यवृत्ती पण दिली! पुढे कोणत्या तरी कारणांनी बहुधा बाईंची पीएच्. डी. राहिली. तो भाग निराळा! पण मला सांगायचं असं की, पुश्किनवरचा किंवा इब्सेनवरचा अभ्यास हा इंग्लिश लिटरेचरचा अभ्यास मानायचा, या शुद्ध फसवणुकीपेक्षा शेक्सपिअरवर मराठीत प्रबंध लिहिला तर तो इंग्रजी वाङ्मयाचा अन् टागोरांच्या किंवा शरदबाबूंच्या साहित्याच्या मराठी अनुवादांचा अभ्यास करून मराठीत प्रबंध लिहिला तर तो बंगाली वाङ्मयाचा अभ्यास आहे, असं मान्य करायला काय हरकत आहे?'

'हरकत नाही तशी; पण ते कसंसंच वाटतं. निदान इंग्लिश लिटरेचरपुरतं इंग्रजीच पाहिजे—'

'कसंसं कां वाटाव सर? तो परिणाम आहे आपल्या सवयीचा. इंग्रजीच्या मगरमिठीचा. मी असं विचारतो सर, इंग्लिश लिटरेचरच्या परीक्षांमध्ये इंग्रजी माध्यमाची सक्ती करण्याचं तुमच्या हातात आहे; पण आमच्यापैकी कोणी, समजा मीच, शेक्सपिअरवर मराठीत एक प्रबंध लिहून तो पुस्तकरूपाने प्रसिद्ध केला तर मान्य कराल आपण?'

'मान्य करण्याचा काय प्रश्न आहे? पुस्तक चांगलं असेल तर चांगलं म्हणू—'

'तेवढंच नाही. पीएचू. डी. साठी मान्य कराल तो प्रबंध? अर्थात संशोधनाच्या कसोट्यांना उतरला तर!'

'शेक्सपिअरवर पुस्तक ठीक, पण संशोधनप्रबंध मराठीत? कोण ॲक्सेप्ट करील असली खुळचट आयडिया?'

'खुळचट कल्पना वाटते सर तुम्हाला ही? फक्त एकच उदाहरण देतो आणखी. फ्रान्स, जर्मनी, रशिया, वगैरे अनेक देशांत, जगात सगळीकडेच शेक्सपिअरचा खूप

अभ्यास होतो हे तर मान्य आहेच आपल्याला; किंबहुना आपणच वर्गात अनेक देशांतील शेक्सपिरिअन स्कॉलर्सची नावं सांगितल्याचं आठवतंय मला. '

' बरोबरच आहे ते. आहेच मुळी शेक्सपिअर हा वर्ल्डचा ग्रेटेस्ट ड्रॅमॅटिस्ट ! त्याचा अभ्यास व्हायला हवाच जगभर. म्हणूनच तर सगळा शेक्सपिअर ओरिजिनल वाचा, अशी उरस्फोड करतो आम्ही तुमच्या उराशी ! पण तुम्हाला कुठं पटतंय् ते ! '

' पुन्हा यात एक फॅलसी आहे सर. सगळ्या देशांत शेक्सपिअरचा अभ्यास होतो, त्यावर संशोधन होतं; पण ते आपापल्या भाषांतून, इंग्रजीतून नव्हे. किंबहुना शेक्सपिअर, टॉलस्टॉय वगैरेंचे ग्रंथ जगभर वाचले जातात ते म्हणजे त्यांचे अनुवाद. मुळातून वाचण्याइतका इंग्रजी न् रशियनचा अभ्यास करणारे फार थोडे; नाही विरळाच ! अन परभाषेतील साहित्यासंबंधीचे सगळे लेखन ते आपापल्या भाषांतून करतात म्हणूनच त्याचा उपयोग आहे ! '

' तुमच्या म्हणण्यात तथ्य दिसतंय्; पण भारतात इंग्रजीचा इतका प्रभाव असताना कशाला आपापल्या भाषांतून लिहायचं ? उलट इंग्रजीतून प्रबंध लिहिले तर त्याला सगळ्या हिंदुस्थानातच नव्हे, तर जगभर मान्यता मिळेल हा केवढा मोठा फायदा आहे ? '

' माफ करा सर, लहान तोंडी मोठा घास घेऊ नये म्हणतात; पण स्पष्ट सांगायचं म्हणजे या आपल्याकडल्या इंग्रजीच्या विद्वानांच्या संशोधनाला जगभरच काय, देशातल्या इतर भागांतही कोणी किंमत देत नाही. मी स्वतः त्याबद्दल अधिकारवाणीनं सांगू शकत नाही; पण माझा भाऊ सध्या पीएच्. डी. करतोय, तो सांगतो, या असल्या सगळ्या यूस्लेस संशोधनाची गंमत ! कुठला तरी अमेरिकेतला नाहीतर इंग्लंडमधला सतराव्या अठराव्या शतकातला मायनर कवी ! त्याच्या काव्यातून व्यक्त झालेलं त्याचं भावजीवन, नाही तर निसर्गदर्शन ! कोणी पाहिलाय् अमेरिका न् इंग्लंडचा निसर्ग ? इथे वर्ड्स्वर्थची डॅफोडिल्स कविता वाचली तरी ते फूल कोणी पाहिलेलं नसतं ! अन् हे प्रबंध लिहायचे इंग्रजीत. उपयोग काय ? तर विद्यापीठाने पीएच्. डी. दिली की सुंदर बाईंडिंग केलेल्या दोन प्रती लायब्ररीत न् एकदोन प्रती घरी काही दिवस सर्वांना अलंकार म्हणून दाखवण्यासाठी ? '

' फारच कटू बोलताय तुम्ही या आमच्या संशोधनाविषयी; त्यातलं काही खरंच तुम्ही म्हणता तसं इरेलेव्हन्ट असलं, तरी काही खरंच चांगलं असतं की — '

' असेल, सर. पण मी म्हणतो हे सगळं आपापल्या भाषांतून लिहिलं, तर ती खरी कॉन्ट्रिब्युशन नाही का ? उदाहरणार्थ, आपणच किती इंग्लिश न् युरोपिअन ऑथर्सचा स्पेशल स्टडी केलाय्. त्यांच्यासंबधी मराठीतून लिहिलंत तर कितीतरी मराठी

वाचक ते वाचतील. फार काय, मराठीच्या बी. ए.-एम्. ए. च्या विद्यार्थ्यांना ते लावलं, तर मराठी साहित्याच्या अभ्यासाला सुद्धा एक निराळं डायमेन्शन येईल— '.

' असं म्हणता ? मी मराठीत लिहिलं तर त्याचा अधिक उपयोग होईल, हा विचारच सुचला नव्हता आजवर ! '

' आजवर नसला तरी अजून करा सर. इंग्रजीन् युरोपिअन ऑथर्सवर लिहा, इंग्रजी साहित्याचा इतिहास लिहा, फार काय, जागतिक वाङ्मयांचा इतिहास सुद्धा वाचायला आवडेल आम्हाला मराठीतून ! '

' अहो पण मी सगळा कसा लिहिणार एकटा ? '

' एकटे ? एकटे कशाला ? इंग्रजी साहित्याचा व्यासंग असलेले न् चांगलं लिहू शकणारे अन् प्राध्यापक आहेत की. शिवाय, आमच्यासारख्या विद्यार्थ्यांना मराठीत लिहायची परवानगी द्याल व उत्तेजन द्याल तर आम्ही सुद्धा लिहू पुढे— '

' ही आयडिया बरी दिसतेय तुमची. यावरून मला आठवलं की, माझे एक कानडी मित्र आहेत. इंग्रजीचे प्राध्यापक. अत्यंत हुशार. त्यांनी इंग्रजीत पुष्कळ पेपर लिहिले, पुस्तकंही लिहिली. त्याला डिमांड फार थोडा. उलट कानडीत त्यांनी मिल्टनवर पुस्तक लिहिलं. कन्नड साहित्य अकादमीने प्रसिद्ध केले ते. दोन वर्षांत त्याची दुसरी आवृत्ती निघाली म्हणून सांगत होते ते. '

' आता तुम्हीच सांगा सर. मिल्टनवर कानडीत लिहिलंन म्हणून इंग्लिश लिटरेचरचा अभ्यास करणाऱ्या कानडी लोकांची सोय झाली न् या प्रोफेसरांच्या लिहिण्याचंही सार्थक झालं ! असं उत्तेजन मिळालं तर इंग्लिश लिटरेचरला हल्ली विद्यार्थी मिळण्याची मारामार पडते ती पडणार नाही. फार काय, मराठी, हिंदी, कानडी, बंगाली वगैरे शिकणाऱ्यांना सुद्धा इंग्रजी वाङ्मयाचे एक-दोन पेपर ठेवले न् आपापल्या भाषेतून लिहिण्याची परवानगी दिली तर, इंग्रजी वाङ्मयाची लोकप्रियता खूप वाढेल— '

' नक्कीच तुमचं म्हणणं बरोबर वाटू लागलंय मला. पण हे फक्त इंग्रजीपुरतंच कशाला ? '

' नाही ना. इंग्रजीचा विषय चालला होता म्हणून ते उदाहरण. शिवाय इंग्रजांचं राज्य होतं म्हणून नव्हे तर जगातलं एक श्रेष्ठ वाङ्मय म्हणून इंग्रजी साहित्याचा अभ्यास करायला हवा हे बरोबर असलं तरी फ्रेंच, रशियन, जर्मन, स्पॅनिश, चिनी, अरेबिक, अशा अनेक भाषांतील साहित्याचाही अभ्यास करण्याची सोय करायला हवी. सुरुवातीला इंग्रजी अनुवादावरून, पुढे आपल्याच भाषांत चांगले अनुवाद की त्यावरून—'

'खरंच, पुष्कळ विचार केलेला दिसतो तुम्ही या प्रश्नाचा. आम्हा इंग्रजीच्या बोर्डातल्या कोणी सुचवलं नाही असं कधी!'

'कसं सुचवणार? तुमची बोर्ड न् विद्यापीठं म्हणजे ठराविक चाकोरीतनं जाणार. नवं काही कोणी मांडलं तरी विरोध! परंपरा, वारसा – म्हणजेच गतानुगतिकत्व हाच त्यांचा स्थायीभाव. आपण स्वतःच तर अशी टीका करता सर—'

'ते जाऊ दे. मीच पुढाकार घेतो असं सुचवण्यात. मान्य होवो अगर न होवो. प्रचार करायचा या नव्या कल्पनांचा. अन् काही निष्पन्न झालंच, तर मी त्याचं श्रेय तुम्हाला देण्याला विसरणार नाही.'

'थँक्यू सर. पण आता आपल्याला हे पटून करायचंच ठरवलं आहेत, म्हणून एक सुचवतो.'

'वा! जरूर सुचवा की! 'बालादपि सुभाषितम् ग्राह्यम्!' हे आतापर्यंत आम्हाला न सुचलेलं पुष्कळ नवं शहाणपण शिकलो की तुमच्याकडून!'

'मग मला असं वाटतं, विद्यापीठात ही लढाई करायची ती इंग्रजी बोर्डात करूच नये. तिथे बहुतेक सगळी इंग्रजीची खोटी घमेंड असलेली जुनी मंडळी अन् त्यांची मर्जी सांभाळून असणारे काही ज्युनिअर्स! माझ्यासारख्या विद्यार्थ्यांचं ऐकून चर्चा करणारी अन् मन खुलं ठेवून नवीन पटलं, तर मान्य करणारी सीनिअर प्राध्यापक मंडळी फारच विरळा!'

'अरे पण इंग्लिश बोर्डाने नाही म्हटलं, तर मग ते करणार कोण? मराठी अभ्यासमंडळ?'

'अगदी तेच म्हणतोय सर मी. मराठी अभ्यासमंडळाकडूनच सुरुवात करायला हवी. मराठी, हिंदी, उर्दू, संस्कृत, पर्शिअन, अरेबिक, कन्नड, बंगाली वगैरे विषयांच्या अभ्यासमंडळांच्या लोकांनाच लवकर पटतील हे विचार. नाहीतरी हे इंग्रजीवाले कमीच लेखतात त्यांना. अन् आपलं इंग्लिश कमी पडतं या अहंगंडामुळे हे बाकीच्या भाषांचे लोक निष्कारण मागे राहतात अन् इंग्रजीवाल्यांपुढे पडतं घेतात—'

'खरं दिसतंय तुमचं म्हणणं. अन् ही भारतीय भाषावाल्यांचं सहकार्य घेण्याची कल्पना फारच चांगली आहे. खरं तर स्वतंत्र भारतात या आपल्या भाषांचं व साहित्याचं महत्त्व कितीतरी वाढलं पाहिजे, अन् आपणसुद्धा नुसत्या इंग्रजी साहित्याच्या मागे न लागता फ्रेंच, रशियन वगैरे भाषांच्या साहित्याचा व त्याच्याबरोबरच हिंदी, उर्दू, तमीळ, तेलुगू, बंगाली, उडिया, गुजराती वगैरे आपल्या भाषांच्या साहित्याच्या देवाण घेवाणीवर अधिक भर द्यायला पाहिजे. त्यासाठी संस्कृत, पाली, अर्धमागधी, पर्शियन या क्लासिकल लँग्वेजेसच्या साहित्याचाही अर्वाचीन भाषांतून परिचय करून द्यायला हवा आपण. तेच खरं साहित्याचं अध्यापन अन् संशोधन—'

'म्हणजे पटलं सर माझं म्हणणं तुम्हाला—अन् मी नुसत्या आपल्या अनुभवातून काही शंका उपस्थित केल्या तर, आपण त्यावर चांगल्या थिएरेटिकल लेवलवर जाऊन सुसंगत विचार मांडले, अन् उपाय सुचवलेत.'

'अरे, त्याचं असं झालं की मुळात हे इंग्रजीचं ओझं—न् खरं म्हणजे खोटा अहंकार— इतकं स्वार झालं होतं डोक्यावर, की काही बदल व्हायला पाहिजे हे पटतंच नव्हतं. एकदा ते पटल्यावर मग उपाय सुचले. आणखीही सुचतील—'

इंग्रजीच्या एम्. ए. च्या वर्गातील एक बुद्धिमान विद्यार्थी व एक नामवंत प्राध्यापक यांच्यातील हा संवाद. विद्यार्थ्यांशी मोकळेपणाने व बरोबरीच्या नात्याने चर्चा करावी, मतभेद झाले तरी ऐकून घ्यावे, विद्यार्थ्यांचे मुद्दे पटले तर प्रांजळपणे कबूल करावे, असे मानणारे प्राध्यापक असले तरच अशी चर्चा शक्य होऊ शकते हे उघड आहे. या चर्चेत विद्यार्थ्याने प्राध्यापक महाशयांच्या पारंपरिक विचारसरणीला मोठाच धक्का दिला; पण या संवादात विद्यार्थ्याने उपस्थित केलेले प्रश्न व त्याने केलेल्या सूचना वस्तुतः इतक्या सहज सुचणाऱ्या आहेत, की आजपर्यंत कोणी ते प्रश्न का उपस्थित केले नाहीत, हाच खरा प्रश्न आहे.

तर असे हे प्रश्न— आणि त्या अनुषंगाने केलेल्या काही सूचना. इंग्रजी साहित्याच्या अभ्यासाच्या निमित्ताने पुढे आलेले प्रश्न खरे पाहता सर्वच परभाषांच्या साहित्याच्या बाबतीत लागू आहेत. म्हणूनच त्यासंबंधी विचार करावयाचा तो एकत्रच होणे आवश्यक आहे* यासंबंधी काही व्यवहार्य सूचना पुढील प्रमाणे :—

( १ ) परभाषांपैकी इंग्रजी ही एक आंतरराष्ट्रीय महत्त्वाची भाषा म्हणून व इंग्रजी साहित्य हे जगातील एक श्रेष्ठ साहित्य म्हणून इंग्रजी **साहित्याचे** अध्ययन-अध्यापन पदवीपरीक्षांच्या व स्नातकोत्तर पातळीवर अवश्य चालू ठेवावे; परंतु इंग्रजी **भाषेच्या** अध्यापनाशी त्यांची सांगड घालू नये. इंग्रजी भाषेचे स्वतंत्र अभ्यासक्रम असावे व त्यात विद्यार्थ्यांचा इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न करण्यावर भर असावा.

( २ ) इंग्रजी भाषा व इंग्रजी साहित्य यांचे वेगळे अभ्यासक्रम केल्यानंतर इंग्रजी **साहित्याच्या** अभ्यासक्रमाची संपूर्ण पुनर्रचना करण्यात यावी. सध्या भारतातील

---

* **मातृभाषेतील** साहित्याचा अभ्यास हा सर्वस्वी निराळा विषय आहे व त्याची उद्दिष्टे, अभ्यासक्रम, अध्यापनपद्धती, माध्यम वगैरे प्रश्नही परभाषांच्या साहित्याच्या अभ्यासापेक्षा भिन्न आहेत. तसेच इंग्रजीसंबंधी विचार करताना त्या **भाषेच्या** अभ्यासाची उद्दिष्टे, अध्यापनपद्धती, माध्यम वगैरे प्रश्नांचाही येथे ऊहापोह केलेला नाही.

विद्यार्थ्यांचा इंग्रजी साहित्याशी पदवी परीक्षेच्या वेळी प्रथमच संबंध येतो. नंतर एम्. ए.च्या अभ्यासक्रमाचा टप्पा. या दोन टप्प्यांतील अंतर फार मोठे असते व एम्. ए.च्या अभ्यासक्रमाची उडी फार कठीण जाते. यासाठी दहावीनंतर ज्युनिअर कॉलेजच्या स्तरावरच इंग्रजी साहित्याचा परिचय असा ऐच्छिक विषय ठेवला, तर पूर्वतयारी चांगली होईल. सध्याच्या बी. ए.च्या दर्जाचा अभ्यासक्रम उच्च माध्यमिक अवस्थेत ठेवला, की बी. ए.च्या अभ्यासक्रमाचा दर्जा वाढविता येईल व मग एम्. ए.चा अभ्यासक्रम जड जाणार नाही.

( ३ ) एम्. ए.च्या पातळीवरील इंग्रजी **साहित्याच्या** अभ्यासक्रमाच्या पुनर्रचनेचाही स्वतंत्रपणे विचार करण्यात आला पाहिजे. एकूण दोन वर्षांत किती पुस्तके मुळातून वाचून त्यांचा सखोल अभ्यास होणे शक्य आहे, याचा विचार झाला पाहिजे. याशिवाय, क्लासिकल लिटरेचर, युरोपिअन लिटरेचर, कॉमनवेल्थ लिटरेचर, अमेरिकन लिटरेचर, इंडो-अँग्लिअन लिटरेचर वगैरे ऐच्छिक प्रश्नपत्रिकांचा वाटा किती असावा व त्यांची मूळ इंग्रजी ( ब्रिटिश ) साहित्याशी सांगड कशी घालण्यात यावी, याचाही नीट विचार झाला पाहिजे.

( ४ ) इंग्रजी साहित्याचा अभ्यास हा कोणत्याही परभाषेतील साहित्याचा अभ्यास जगात सर्वत्र होतो त्याप्रमाणे झाला पाहिजे. म्हणजे असे, की हे साहित्य मूळ इंग्रजीतून वाचले तरी त्या विषयाच्या प्रश्नपत्रिका इंग्रजीतूनच लिहिल्या पाहिजेत, ही सक्ती काढून टाकून भारतीय प्रादेशिक भाषांतून लिहिण्याचा पर्याय ठेवला पाहिजे. भारताच्या सध्याच्या विशिष्ट परिस्थितीत प्रत्येक राज्यात इंग्रजीचे प्राध्यापक हे त्या राज्याची प्रादेशिक भाषा जाणणारे असतीलच असे नाही, म्हणून वर्गातील अध्यापनाचे माध्यम सामान्यतः इंग्रजी भाषेचे ठेवण्याला हरकत नसावी; परंतु विद्यार्थ्यांच्या शंका व अडचणी दूर करण्यासाठी सोईप्रमाणे प्रादेशिक भाषा वा हिंदीचा वापर करण्याला प्रत्यवाय नसावा. काही विवक्षित कालमर्यादेनंतर सर्व शाखांतील सर्व विषयांच्या अध्यापनाचे व परीक्षेचे प्रमुख माध्यम प्रादेशिक भाषा होईल ( अशी आशा करू या ! ) व हिंदी अथवा इंग्रजी या पर्यायी माध्यमभाषा म्हणून मान्य होतील, त्या वेळी इंग्रजी साहित्य या विषयालाही तोच नियम लागू करण्यात यावा.*

---

* इंग्रजी साहित्याच्या अध्यापनाचे व विशेषतः परीक्षेचे इंग्रजी हे एकमेव माध्यम न ठेवता प्रादेशिक भाषा किंवा हिंदीचे पर्याय ठेवावे, हा विचार विस्ताराने मांडणारा एक प्रबंध प्रस्तुत लेखकाने १९६८ साली बंगलोर येथे भरलेल्या अ. भा. इंग्रजी प्राध्यापक परिषदेत सादर केला होता. तसेच इंग्रजी साहित्याच्या अभ्यासासंबंधी येथे केलेल्या काही सूचनांची चर्चा करणारा एक प्रबंध १९७५ साली भरलेल्या नागपूर

[ पुढील पान पहा

(५) इंग्रजी साहित्य हे परभाषांपैकी, विशेषतः पाश्चिमात्य भाषांच्या साहित्यांपैकी, प्रमुख साहित्य म्हणून त्याचे महत्त्वाचे स्थान भारतात दीर्घकालपर्यंत राहणे अपरिहार्य आहे. तसे ते राहण्याला हरकत नाही; परंतु इंग्रजी साहित्याच्या जोडीला फ्रेंच, जर्मन, रशियन, स्पॅनिश, चिनी, जपानी, अरेबिक वगैरे भाषांतील **साहित्याच्या** अभ्यासाचीही सोय काही प्रमुख विद्यापीठांतून करण्यात यावी. आज या भाषा शिकण्याची सोय फक्त महाविद्यालयीन किंवा विद्यापीठ पातळीवर काही विद्यापीठांतून आहे, त्याऐवजी या भाषांपैकी निदान काही भाषांचा प्राथमिक अभ्यास शालान्त परीक्षेच्या पातळीपासूनच (हिंदी वा इंग्रजीला पर्याय असा ऐच्छिक विषय) करण्याची व्यवस्था असावी. नंतर उच्च माध्यमिक अवस्थेत व पदवी परीक्षेच्या अवस्थेत या भाषांच्या अभ्यासक्रमाचा दर्जा वाढविण्यात यावा व त्यात त्या भाषांमधील साहित्याचा परिचय करून देण्याची सोय असावी.

(६) परभाषांच्या अध्ययनात आज बराचसा भर फ्रेंच, जर्मन व रशियन या भाषांवर असतो व त्या भाषांच्या अध्यापनाची व्यवस्था अनेक विद्यापीठांत आहे. काही थोड्या ठिकाणी आता चिनी, जपानी, स्पॅनिश व अरेबिक शिकविण्याच्या सोयी उपलब्ध झाल्या आहेत; परंतु भारताचे ज्यांच्याशी निकटचे व स्नेहाचे संबंध आहेत किंवा नव्याने होत आहेत अशा अनेक आशियायी व आफ्रिकी राष्ट्रांच्या, भाषांच्या अध्ययनाची व त्यांच्या साहित्याचा (व अर्थातच साहित्याच्या द्वारे त्यांच्या संस्कृतींचा) परिचय करून घेण्याच्या उपक्रमांची अजून फारशी वाढ झालेली नाही. या दृष्टीने इराण, इराक व इतर अरब राष्ट्रे; अफ़गाणिस्तान, नेपाळ, तिबेट, ब्रह्मदेश, श्रीलंका, इंडोनेशिया, मलेशिया, विएतनाम, कोरिआ, थायलंड, कंबोडिया वगैरे आशियायी व आफ्रिकेतील राष्ट्रांच्या भाषांचा सखोल अभ्यास करण्यासाठी काही थोड्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देऊन त्या देशांत पाठविले पाहिजे. त्या त्या देशांशी असलेले राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक संबंध दृढ करण्याच्या दृष्टीने त्यांच्या भाषा शिकून आलेल्या या विद्यार्थ्यांचा निश्चितच उपयोग होईल. दूतावासातील अधिकारी, दुभाषी वगैरेंसाठी तर त्यांचा उपयोग होईलच; पण त्याचबरोबर आफ्रिकन देशातील लोकांचा, भाषांचा, साहित्याचा, संस्कृतीचा

.........................................

मागील पानावरून ]

विद्यापीठातील इंग्रजी प्राध्यापक परिषदेतही सादर केला होता. दोन वर्षे लागोपाठ माध्यमाच्या प्रश्नासंबंधी एक ठराव नागपूर व मराठवाडा विद्यापीठांच्या अभ्यासमंडळांनाही सादर केला होता. निष्पत्ती शून्य. नागपूर विद्यापीठ अभ्यासमंडळात एक वर्षी अध्यक्षांनी परवानगी नाकारली, नंतर चर्चेला अगदी थोडा वेळ मिळाला व ठराव नापास झाला. मराठवाडा विद्यापीठ अभ्यासमंडळाच्या अध्यक्षाने विषय पुढे ढकलला!

परिचय भारतीयांना करून देण्याची महत्त्वाची कामगिरी बजावण्यातही या मंडळींना सहभागी होता येईल.

(७) पूर्णपणे विदेशी असलेल्या परभाषा व त्यांतील साहित्य यांच्या जोडीलाच आणखी एका निराळ्या प्रकारच्या परभाषांचाही या संदर्भात विचार करणे जरूर आहे. त्या म्हणजे खुद्द भारतातील भाषा. आपली स्वतःची (उदा. महाराष्ट्रातील बहुसंख्य लोकांच्या बाबतीत मराठी) भाषा सोडली, तर बाकीच्या भाषा परभाषाच असतात. वस्तुतः या सर्व भारतीय भाषा व त्यांचे साहित्य निदान संस्कृतीच्या दृष्टीने आपण जवळचे मानतो. ही जाणीव हा भारताच्या राष्ट्रीय ऐक्याचा मोठा आधार आहे. आंतरभारतीच्या चळवळीची हीच भूमिका आहे. प्रत्यक्ष व्यवहारात मात्र आपल्याला, सुशिक्षितांना सुद्धा, इतर भाषा व त्यांचे साहित्य यासंबंधी फारच थोडी माहिती असते. दक्षिण भारतात तमीळ, तेलुगू, मल्याळी व कन्नड या चार प्रमुख प्रादेशिक भाषा आहेत. नुसती माहिती म्हणून ही चार नावे पुष्कळांना ठाऊक असतात. काहींना तेवढीही माहिती नसते; आणि माहिती असलेल्यांच्या जाणिवेची पातळी इतकी, की बहुतेकजण दाक्षिणात्य लोक व त्यांच्या भाषा या सगळ्यांचा सरसकट 'मद्रासी' म्हणून उल्लेख करतात. साहित्याची माहिती इतकी, की अखिलन् किंवा कारंथ यांना ज्ञानपीठ पारितोषिके मिळाली म्हणून त्यांच्याविषयी वृत्तपत्रांत वाचले म्हणजे–१५ दिवस ती आठवण असते; पण नंतर या दोघांची नावे किंवा त्यांच्या भाषा स्मरणात राहिलेल्या नसतात व साहित्यकृतींची नावे तर बातमीचे वाचन संपण्यापूर्वीच विसरलेली असतात! वि. स. खांडेकरांना हेच पारितोषिक मिळाले म्हणून मराठी माणसाला तो आपला गौरव वाटतो व खांडेकरांच्या कथा-कादंबऱ्यांचे अनेक भाषांतून अनुवाद झाले आहेत याचाही अभिमान वाटतो; परंतु तेवढ्याच मोठ्या दर्जाच्या इतर भाषांतील लेखकांची नावेही आपल्याला माहीत नसावीत, याची खंत वाटत नाही!

तर ही परिस्थिती बदलण्याच्या दृष्टीने निव्वळ इंग्रजी साहित्याच्या अभ्यासावर भर देण्याऐवजी इतर विदेशी भाषांबरोबरच, किंबहुना त्याहून अधिक महत्त्व भारतीय भाषा व त्यांच्या साहित्याला देणे जरूर आहे. त्यासाठी जास्तीत जास्त सोई उपलब्ध करून देणे व प्रोत्साहन देणे ही विद्यापीठांची, माध्यमिक शिक्षणसंस्थांची व शासनाची जबाबदारी आहे. त्या दृष्टीने या 'परभाषां'च्या प्राथमिक अध्ययनाची सोय शालेय पातळीवर, भाषेचे उच्चस्तरीय अध्ययन उच्च माध्यमिक पातळीवर व साहित्याचे अध्ययन महाविद्यालयीन व विद्यापीठ पातळीवर, करण्याची विद्यार्थ्यांना संधी मिळाली पाहिजे. इतकेच नव्हे, तर शिक्षणसंस्थांत नसलेल्यांना–किंवा तेथे विज्ञान, तंत्र वगैरे शाखांमध्ये शिकणाऱ्यांना–अनौपचारिक शिक्षण म्हणून या भाषा व त्यांचे साहित्य यांचा अभ्यास करण्याला उत्तेजन दिले पाहिजे.

(८) भारतीय 'परभाषां'च्या अभ्यासाच्या योजनेत हिंदी भाषा व साहित्य यांच्या अभ्यासाला सहाजिकच महत्त्वाचे स्थान राहील; परंतु त्यात सुद्धा इंग्रजीप्रमाणेच हिंदी भाषा व साहित्य यांच्या अभ्यासाची गल्लत करता कामा नये. केंद्र शासनाची भाषा व संपर्क भाषा म्हणून हिंदीचा वापर व्हायला हवा हा प्रश्न वादग्रस्त आहे व तो अजून दीर्घकाळपर्यंत अनिर्णित राहणार आहे असे दिसते; परंतु राजकीय कारणांनी हा प्रश्न अनिर्णित राहिला, तरी हिंदी साहित्याचा अभ्यास वाढविण्याला कोणतीही अडचण नाही. आणि बिगर हिंदी-भाषिकांमध्ये सुद्धा जास्तीत जास्त लोकांना समजणारी भाषा हिंदी हीच आहे. त्यामुळे सर्व भारतीय भाषांना साहित्याच्या क्षेत्रात देवाणघेवाण करण्याला हिंदीचाच उपयोग होऊ शकेल. विविध भाषांतील साहित्य हिंदीतून उपलब्ध झाले, तर अनेक लोक ते हिंदीतूनच वाचू शकतील व निरनिराळ्या भाषांमध्ये हिंदीतून अनुवाद करणे सहज शक्य होईल.

[ अर्थात भारतीय परभाषांच्या साहित्याचा अभ्यास करतानाही त्या त्या भाषांच्या माध्यमाचा आग्रह असता कामा नये. स्वभाषा हेच विशेषतः अभिव्यक्तीचे माध्यम असावे. ]

(९) पाश्चिमात्य व भारतीय परभाषांच्या व त्यांच्या साहित्याचा फार मोठा उपयोग अनुवादांच्या द्वारे आपल्या भाषा समृद्ध करण्यासाठी करणे, हा या उपक्रमाचा एक उद्देश असला पाहिजे. इंग्रजी भाषेस जागतिक महत्त्व प्राप्त होण्याचे एक प्रमुख कारण असे आहे की, जगातील सर्व भाषातील उत्तमोत्तम ग्रंथ (साहित्य विषयक व इतरही ज्ञानशाखातील) अनुवाद रूपाने इंग्रजीत उपलब्ध होतात. (त्या दृष्टीनेही भारतात इंग्रजीचा अभ्यास चालू राहणे महत्त्वाचे आहे.) हे कार्य भारतात समग्र राष्ट्राची संपर्क भाषा असलेल्या हिंदीकडून होणार असेल, तर बिगर हिंदी भाषा लेखकांना त्यासाठी मोठ्या प्रमाणावर योगदान करावे लागेल.

[ सध्या साहित्य अकादमी व राज्य पातळीवरील साहित्य संस्कृती मंडळासारख्या संस्था हे कार्य काही प्रमाणात करतात. त्याची व्याप्ती वाढली पाहिजे व विद्यापीठांनी त्यांच्याशी अधिक सहकार्य करून त्या कार्याची गती वाढविली पाहिजे. ]

(१०) साहित्याच्या अभ्यासाच्या संबंधाने विचार करताना भारतीय परिस्थितीत संस्कृत साहित्याचा अभ्यास ही एक महत्त्वाची गरज आहे. अर्वाचीन भाषा व संस्कृती यांची त्याशिवाय नीट जाण येऊ शकत नाही. त्यांचप्रमाणे पाली व अर्धमागधी आणि पर्शिअन या प्राचीन भाषांतील साहित्याचाही परिचय असणे अगत्याचे आहे. त्या दृष्टीने अर्वाचीन भाषांच्या साहित्याच्या अभ्यासक्रमात या प्राचीन भाषांतील साहित्याचा परिचय आपापल्या भाषांतील अनुवाद, सारग्रंथ, वगैरेंच्या द्वारे करून देण्याची तरतूद केली पाहिजे.

(११) एक महत्त्वाचा प्रश्न साहित्याच्या क्षेत्रातील संशोधनाचा. संशोधनाचे महत्त्व हल्ली पुष्कळ वाढलेले आहे. विशेषतः महाविद्यालये व विद्यापीठे यातील प्राध्यापकाच्या नोकऱ्यांसाठी पीएच. डी.ची पदवी आवश्यक झाल्यामुळे हे प्रमाण अनेक पटींनी वाढणार आहे. यांपैकी बरेचसे संशोधन हे उथळ व सामाजिक दृष्ट्या निरुपयोगी असते, असे मत वारंवार कानी येते; पण त्याचा दर्जा व सामाजिक उपयुक्तता हे प्रश्न बाजूला ठेवले तरीसुद्धा एक गोष्ट स्पष्ट आहे. ती अशी की, परभाषांच्या साहित्याचा परिचय, अभिजात साहित्याचे अनुवाद, वगैरेंना यात स्थान नसते. किंबहुना त्या कार्याला संशोधन म्हणून मान्यता मिळण्याची शक्यताही फार कमी; परंतु साहित्याच्या अभ्यासाची पुनर्रचना करण्यासंबंधी वर ज्या सूचना केल्या आहेत त्यांतील आशय स्थूल मानाने मान्य झाला, तर संशोधनाचा अर्थ अशा प्रकारे व्यापक करता येईल. उदाहरणार्थ इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन, स्पॅनिश, चिनी, अरेबिक वगैरे विदेशी व तमीळ, तेलुगू बंगाली, गुजराती वगैरे भारतीय 'परभाषां'तील श्रेष्ठ साहित्याचा व साहित्यिकांचा परिचय करून देणारे किंवा त्या भाषा व साहित्याचा इतिहास सांगणारे ग्रंथ लिहिणे किंवा त्या भाषांतील अभिजात साहित्यकृतींचे अनुवाद करणे, हेही मौलिक कार्य आहे हे मान्य करून त्याला संशोधन म्हणून मान्यता दिली तर (अर्थात या कार्याचा दर्जा उत्कृष्ट असेल तर) परभाषांच्या साहित्याच्या सखोल अभ्यासाला निश्चितच उत्तेजन मिळेल.

इंग्रजीच्या संदर्भात त्या विषयाचे नामवंत प्राध्यापक डॉ. वि. कृ. गोकाक यांनी १९६० सालीच दिल्ली अखिल भारतीय इंग्रजी प्राध्यापक परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात अशा प्रकारच्या काही सूचना केल्या होत्या. भारतीय भाषांतील, (संस्कृत धरून) अभिजात वाङ्मयाचा इंग्रजीत अनुवाद करणे, त्या वाङ्मयाचा परिचय इंग्रजीद्वारे जगाला करून देणे वगैरे कार्यही नुसतेच महत्त्वाचे नाही, तर मौलिक स्वरूपाचे आहे व इंग्रजीच्या अध्ययन अध्यापनाचे ते एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे; म्हणून तशा स्वरूपाच्या कार्याला संशोधन म्हणून मान्यता मिळणे इष्ट व उचित होईल, अशी प्रा. गोकाक यांची एक सूचना होती; परंतु इतर अनेक मौलिक सूचनांप्रमाणेच पारंपरिक पद्धतीने विचार करणाऱ्या विद्यापीठांतील विद्वानांनी त्या सूचनेचा विचार करण्याचेही नाकारले.

(प्रा. गोकाक यांच्यासारख्या अधिकारी व्यक्तीच्या सूचनाही जिथे विद्यापीठांच्या चाकोरीतील दलदलीत रुतून बसतात व कालांतराने अदृश्य होतात, तिथे प्रस्तुत लेखकासारख्याच्या विचारांचे व कल्पनांचे स्वागत होण्याची शक्यता नाही हे उघडच आहे; परंतु इंग्रजी साहित्याच्या अभ्यासक्रमाची दिशा बदलण्याचा हा प्रश्न एकूण सर्वच भाषांच्या साहित्याच्या अभ्यासाविषयी आस्था असणाऱ्या विचारवंतांसमोर मांडल्या, तर कदाचित काही जणांना त्या विचार करण्याजोग्या वाटतील, या (भोळ्या!) आशेने काहीशा विस्ताराने या सूचना येथे मांडल्या आहेत.)

भारतातील इंग्रजी साहित्याच्या अभ्यासाबाबत असलेल्या सद्यःस्थितीचा विचार करताना सुचलेले काही विचार व काही सूचना येथे दिल्या आहेत. या संदर्भात आणखीही बरेच विचार व सूचना पुढे मांडता येतील. त्यासाठी सर्व प्रकारच्या व सर्व भाषांच्या साहित्याच्या अभ्यासकांनी, अध्यापकांनी आणि साहित्याविषयी प्रेम व आस्था असलेल्या इतर सर्वांनी या विचारमंथनाच्या प्रक्रियेत सहभागी झाले पाहिजे. आपापल्या भाषांच्या साहित्याच्या अभ्यासक्रमातही इंग्रजी, हिंदी, संस्कृत, पाली, पर्शिअन वगैरे प्रमुख भाषांच्या साहित्याच्या परिचयाला स्थान कशा प्रकारे देता येईल याचाही या अनुषंगाने विचार करणे शक्य आहे. आज विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात प्रत्येक भाषा व साहित्य यांचा स्वतंत्र विभाग असतो, त्या विभागांचे परस्परांशी (वैयक्तिक संबंधाच्या पलीकडे) दळणवळण नसते. या पार्टिशनच्या भिंती पाडून निरनिराळ्या भाषांच्या अभ्यासक्रमाची एकमेकांशी सांगड घालण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. तसे केले तर माणसांना परस्परांच्या जवळ आणण्याचा व मने सांधण्याचा जो साहित्याचा मूल हेतू आहे, तो साध्य करण्याच्या दिशेने अधिक वेगाने वाटचाल करणे शक्य होईल.

□ □

# नवी स्त्री

## सुगंधा शेंडे

वर्तमानकाळ हा जसा भूतकाळाच्या खांद्यावर उभा असतो तसा भविष्यकाळ हाही वर्तमानकाळाच्या खांद्यावर उभा आहे. याचाच अर्थ वर्तमानकाळात, क्षितिजापलीकडील भविष्यकाळाकडे आपली नजर वळलेली असली तरी, ज्या अधिष्ठानावर वर्तमानकाळ वावरतो आहे, त्याला भूतकाळाच्या वस्तुस्थितीचा संक्षेपाने का होईना, विचार करणे अपरिहार्य आहे.

एकंदर मानवी सांस्कृतिक विकासाचे अवलोकन करताना (१) वन्य संस्कृती (२) कृषिसंस्कृती व (३) उद्योगसंस्कृती असे तीन भाग स्थूलमानाने कल्पावे लागतील. कृषिपूर्व संस्कृती म्हणजे वन्य अवस्था. या अवस्थेला स्त्रीकर्तृत्वप्रधान संस्कृती असे संबोधावे लागेल. एकदा पुरुषाने पशू ठार मारला की, तो त्या स्थानापासून वस्तीपर्यंत आणणे, त्यावर सर्व प्रकारच्या प्रक्रिया करून खाण्याइतपत तयारी करण्याचे काम स्त्रीचे. त्याशिवाय तत्कालीन संसाराला लागणाऱ्या वस्तू– जसे भांडी तयार करणे, टोपल्या करणे, कातडी कमाविणे, नक्षी काढणे–ही सारी कामे स्त्रीलाच करावी लागत. विल् ड्यूरांटने एक मजेदार उदाहरण दिले–गोरे लोक जेव्हा ऑस्ट्रेलियात घोड्यासारख्या जनावरावरून इकडून तिकडे सामान नेऊ लागत तेव्हा तेथील वन्य लोकांस आश्चर्य वाटे. ते म्हणत, यांच्याजवळ बायका असताना यांना घोडे-खेचरे लागतात कशाला ? अर्थ हा की, एकूण समाजजीवनाचा केंद्रबिंदू ‘ स्त्री ’ होती.

कृषिसंस्कृतीमुळे मानवी जीवनाचा फार मोठा टप्पा गाठता आला असला, तरी स्त्रीच्या विकासाच्या दृष्टीने हा निराशेचा काळ म्हटला पाहिजे. कारण याच काळात, स्त्रीला होत असलेल्या बालकाचे जन्मदाते आपणच आहोत ही जाणीव पुरुषामध्ये निर्माण झाली. परिणामी अहंत्वाचा साक्षात्कार पुरुषात प्रथमतःच झाला. आणि मातृसावर्ण्य पद्धतीला ओहोटी लागून पितृसावर्ण्य पद्धती सर्वत्र रूढ झाली. स्त्रीचे कार्यक्षेत्र ‘ चूल आणि मूल ’ निश्चित झाले. शेतीला आवश्यक अशी अधिकात अधिक संतती निर्माण करणे यावर पुरुषाचा दर्जा ठरू लागला. स्त्रीने कुरकूर करू नये म्हणून ती वात्सल्य-विनयाची मूर्ती ठरविली गेली. स्त्रीचे शरीर तिचे भांडवल ठरले. साजशृंगार करून आकर्षकता वाढविणे यातच ती रमू लागली. ‘ यत्र नार्यस्तु पूज्यते रमन्ते तत्र देवता ’ अशी वचने मनूंनी लिहिली. पातिव्रत्य आणि शील हे अतीव महत्त्वपूर्ण गुण मानले जाऊ लागले.

याच काळात ' मालमत्ता ' म्हणून स्त्रीचा समावेश होऊ लागला. गुलामगिरी याच काळात प्रसृत झाली. स्त्रियांची खरेदी-विक्री सर्रास सर्वत्र चालू असे, पेशवाईत तर ती राजरोसपणे होई. जमीन-जुमल्याच्या विक्रीपत्राप्रमाणे, खरेदीखताप्रमाणे आपली पत्नी दुसऱ्यास विकून खरेदीखत करून दिले जाई. कालच वर्तमानपत्रात वार्ता आली— काश्मीरमधल्या एका स्त्रीच्या विक्रीसंबंधी. एकूण कृषिसंस्कृती काळात स्त्रियांचे स्थान कनिष्ठ गणले गेले. तिच्या नशिबी मेलेल्या मनाचे दास्यत्व आले. मुमुक्षूंना तर स्त्रिया या केवळ दुर्गुणांच्या, लोभ-मोहाच्या पुतळ्या दिसल्या. ही अवस्था जवळजवळ अठराव्या शतकापर्यंत टिकली. Man's problem is his relationship to the Universe; Woman's they suggest her relationship to man. ही विचारसरणी म्हणजे तथाकथित सटवीचा अभिलेख ठरला.

यानंतर प्रारंभ होतो उद्योग प्रधान संस्कृतीला ( Industrial civilisation ). नवे शोध लागले. परिस्थितीत बदल घडून येऊ लागले. ऐहिक जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. या काळापर्यंत परमेश्वरलिखित समजले जाणारे धर्मग्रंथ सर्वत्र प्रमाणभूत मानले जात. आता या समजुतीला फार मोठा धक्का बसला. राजा आणि धर्म ह्या कल्पना दास्यत्वाच्या म्हणून कालबाह्य ठरू लागल्या आणि व्यक्तिस्वातंत्र्यादी नवमूल्यांचा उदय होऊ लागला. शोषक सरंजामशाहीतून शोषकांना सोडविण्याची चळवळ फोफावली. फ्रेंच राज्यक्रांती म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याच्या विशाल चळवळीचे एक पर्व पूर्ण झाले. स्त्रियांच्या चळवळीचे बीजारोपण याच काळात झाले. इ. स. १७९० मध्ये मेरी वल्हस्टन क्रॅफ्ट या बाईनी आपले क्रांतिकारी पुस्तक Vindication of Rights of women प्रसिद्ध केले. हे पुस्तक म्हणजे स्त्रियांच्या विविध प्रकारच्या हक्कांचा जाहिरनामाच होय. १७८९ च्या सुमारास सुरू झालेल्या या चळवळीचा पहिला टप्पा १९१८ च्या सुमारास संपतो. म्हणजे त्या वर्षी ब्रिटिश पार्लमेंटने कायदा करून स्त्रियांना सर्रास मतदानाचा अधिकार दिला. तेव्हापासून स्त्री-पुरुष हे दोघेही व्यक्ती, नागरिक या नात्याने समान भूमिकेवर आलेले आहेत.

भारताच्या दृष्टीने विचार करता स्त्रीविषयक सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न पुरुषांनीच सुरू केले. इतकेच काय, पण ' स्त्री ' ही शांतिदूत आहे असे गांधीजींनी प्रतिपादिले; परंतु जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी आजवर स्त्री पुढे का आली नाही, याचे गांधीजींना आश्चर्य वाटे. या काळात स्वातंत्र्यलढ्यात कितीतरी स्त्रिया भाग घेऊ लागल्या. हे सर्व खरे असले तरी मनूच्या विचाराचा जनमानसात इतका जबरदस्त पगडा होता की, घाणीत लोळणाऱ्यांना सवयीने घाणीचे काही वाटेनासे व्हावे — उलट तोच स्वर्ग वाटावा, अशी स्थिती स्त्रियांची झाली. साजशृंगार, स्त्रीचे शरीर हेच तिचे भांडवल, मातृत्वाचा गौरव होत होता. वांझोटी स्त्री अभिशापित ठरत होती. विवाहित स्त्री प्रतिष्ठेस पात्र होती तर अविवाहिता अप्रतिष्ठित गणली जात होती.

नवी समाजरचना यथार्थ समानतेवर आधारली जावी हा विचार दृढमूल होत गेला. स्त्रियांची चळवळ ही मूटभर मध्यमवर्गीय स्त्रियांची न राहता ती सर्वसामान्य स्त्रीची, तिच्या न्याय्य हक्कासाठी कार्यप्रवण झाली. उद्योग संस्कृतीमध्ये, समाजरचनेचा प्राथमिक घटक व्यक्ती होय असे मानले जाऊ लागले. आणि स्त्री आता केवळ स्त्री दबलेली स्त्री न राहता ती व्यक्ती आहे, हे सर्वदूर गृहितच धरले गेले. त्यामुळे उद्योग संस्कृती म्हणजे मुक्त स्त्रीजीवनाचा उषःकाल मानावा लागेल.

स्त्रीदास्यविमोचनाच्या चळवळीत प्रारंभी पुरुषद्वेष्टेपण दिसून येई, त्याचे कारण स्त्रियांना मातृत्वामुळे दास्य आलेले आहे हे कळून चुकले होते. म्हणून बऱ्याच स्वातंत्र्य-वादिनींनी अविवाहित राहण्याचे ठरविले होते. समानतेचे वारे वाहत असताना, मातृत्व-प्रधान समाजाने स्त्रियांना पुरुषाप्रमाणे अखंड नोकरी करता यावयाची नाही हे गृहीत धरले होते. परिणाम मात्र उलट झालेला दिसतो. पुरुषांच्या बरोबरीने गृहेतर कार्यात प्रवेश करावा लागल्याने तिला जबाबदारीदेखील हिरिरीने स्वीकारावी लागली. शिवाय निसर्गवत मातृत्वाची जबाबदारी आहेच. तेव्हा समतेची जाणीव वा समतेचा विचार कितपत दृढमूल होईल ही शंकाच आहे असे काहींना वाटते; परंतु असे विचार विज्ञान-सूर्यामुळे दिवाभिताप्रमाणे नाहीसे होणार आहेत.

ज्ञान आणि विज्ञानाची चांद्रझेप एवढी की, निसर्गावर मात करण्याचा जणू मानवाने विडाच उचलला आहे. यामधून उदयित झालेली संततीसंयोजनाची कल्पना स्त्री जीवनाला प्रकाशमान करणारी आहे. संततीसंयोजनाची कल्पना ही स्त्रीला आता अभि-शापित करणारी न राहता ‘ मातृत्व ’ हे वरदान ठरणार आहे. लोकसंख्यावाढ, आर्थिक, चणचण आदी राष्ट्रीय कार्याच्या दृष्टीने महत्त्वाचे प्रश्न असले तरी या ठिकाणी स्त्रीविषयक जाणिवांचाच प्रामुख्याने विचार केला जात आहे. म्हणून संततीचे संयोजन करता येणे शक्य आहे हा विचार स्त्रीच्या दृष्टीने फारच मोलाचा आहे. स्त्रीदास्याचे स्वरूप या नव्या शक्यतेने आमूलाग्र बदलले जावे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. स्त्रीच्या कर्तृत्वाच्या आड यापुढे मातृत्व येणार नाही, असे साधार वाटावयास लागले. त्यायोगे स्त्री-पुरुषां-मधील समता अधिक चिरंजीव ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

Equality before low किंवा No discrimination between creed and sex अशी विधाने भारतीय घटनेत समाविष्ट झालेली आहेत. याचाच वापर करून आपणास समाजातील सर्वच क्षेत्रांत समानता प्रस्थापित करावयाची आहे हे निश्चित; परंतु हे निश्चित करतेवेळी काही गृहिते मान्यच करावयाची आहेत. परि-वर्तनाच्या कार्याला मुळापासून प्रारंभ व्हावा. आशीर्वाद देतेवेळी विवाहित स्त्रीला ‘ अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ’ असे म्हटले जाई. आता या शब्दाची जागा ‘ इष्टपुत्राभव ’ अशा शब्दांनी करावी लागणार हे निश्चित झाले.

( १ ) सर्वांत प्रथम बाब ही की स्त्रीला एक ' मानव ' म्हणून तिच्याकडे बघितले जावे, मानवी दृष्टिकोनातून समाजात वागणूक मिळावी. स्त्रीची ध्येये वेगळी आणि पुरुषांची वेगळी असे आता होणार नाही. पुरुषी दृष्टिकोनातून पाहिले असता स्त्री अबला आहे. त्यासाठी निसर्गाने दिलेले दुबळे शरीर असे दर्शविले जाते. ही समजूत म्हणजे पूर्वकालीन समाजातील स्त्रीजीवनाचा वैचारिक परिपाक होय. " स्त्रीचा दुबळेपणा नैसर्गिक आहे... पण ती स्त्रीची प्रकृती नव्हे. हा परंपरागत संस्कार आहे. त्यात निसर्गाला बोल लावणे चुकीचे आहे. दुबळेपणा हा शरीराचा धर्म असला तरी मनाचा धर्म होता कामा नये. एरवी काडी पहेलवान गांधीजी गामा पहिलवानापेक्षा श्रेष्ठ ठरते ना. "

स्त्री आता ' अबला ' नसून महिला आहे. महिला म्हणजे महान, महान शक्तिशाली !

परवाचीच घटना, मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बी. आर उर्फ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासंबंधीच्या चळवळीने विकृत स्वरूप धारण केले. मराठवाड्यात जाळपोळ झाली. त्याचे पडसाद नागपूर शहरी उमटले, गोळीबार झाला. अजाण निरपराधी जखमी झाले. परिस्थिती काबूत येईना. अखेर गोळीबार झालेल्या भागातल्या काही स्त्रिया समोर उभ्या ठाकल्या. म्हणाल्या ' आमच्यावर गोळ्या झाडा. ' तंग वातावरण निवळले. हीच ती स्त्रियांची महान शक्ती. केवळ सहानुभूती, कणव हे शब्द स्त्रियांच्या दृष्टीने बासनात गुंडाळून ठेवण्याच्या स्थितीस येऊन पोचले आहेत.

( २ ) मानवसमाजाच्या वृद्धीसाठी केवळ स्त्रीच्या प्रयत्नाने भागणार आहे किंवा केवळ पुरुषाच्या पराक्रमाने भागणार आहे असे नाही. मानवी जीवनाची संपन्नता, पूर्णता म्हणजे सहजीवन. सहजीवन याचा अर्थ स्त्री आणि पुरुष यांच्या परस्परपूरक व निर्भय प्रेमावर आणि सर्वांगीण समानतेवर आधारित असे जीवन.

( ३ ) आजवर असे दिसून येत असे की, स्त्रियांना एका प्रकारची नीतितत्त्वे लावणे व पुरुषांना दुसरी. असे यापुढे चालणार नाही ! कित्येकजण नेमके याच गोष्टीवर बोट ठेवून स्वैराचारी वृत्ती बळावेल असे म्हणतील. पुरुषावर बंधने कमी आहेत म्हणून ते दुराचारी आहेत काय ? तेव्हा स्त्रियांच्या बाबतींतही असा अविश्वास दाखविण्याचे कारण नाही. शॉचे म्हणणे असे होते की, राष्ट्रातील किंवा जगातील सार्वजनिक जीवनाच्या महत्त्वाच्या जागा वा अधिकारपदे असतात, त्या ठिकाणी आज एकच व्यक्ती असते. ( स्त्री वा पुरुष. ) तसे न होता, एक स्त्री व एक पुरुष या दोघांनी ती जागा विभूषित केलेली असावी. दोघांनी विचार विनिमय करून निर्णय घ्यावेत. ही प्रक्रिया इतकी पुढे न्यावी की, मते देतानाही, एक स्त्री व एक पुरुष असे मिळून एक संयुक्त मत ( Couple vote ) द्यावे. या कल्पनेचा प्रयोग करून निष्कर्ष काढणे जरुरीचे आहे.

त्यायोगे जगातील– विशेषेकरून भारतात सर्वत्र बोकाळलेला भ्रष्टाचार नष्ट करण्यास साहाय्य होईल, असा विश्वास वाटतो.

(४) स्त्रीचे नैसर्गिक मनोधर्म पुरुषाहून भिन्न असतात, ही एक अशीच असत्य समजूत आहे. कृषिसंस्कृतीमध्ये स्त्री-पुरुषांच्या जीवनात जी भिन्नता आली तिला शास्त्रीय (मनोवैज्ञानिक) स्वरूप देण्याचा हा एक केवळ विफल प्रयत्न होय. वस्तुतः एकाच माणसाची ही दोन अंगे आहेत. त्यांच्यातील परस्परपूरकता ही प्रायः शारीरिक आहे. केवळ पुरुष तरी पूर्ण आहे काय ? मिसेस् व्हायोला क्लीन यांनी Feminine character या प्रबंधात शास्त्रीय विवेचन करून दोघांचे मनोधर्म, आशा-आकांक्षा इ. समान असतात, असा निष्कर्ष काढला आहे. एका स्त्रीने काढलेला निष्कर्ष म्हणून त्याला अधिक मौलिकता आहे. स्त्रीत्व सापेक्ष तर पुरुषत्व निरपेक्ष आहे. पुरुषाचे जीवन स्वायत्त, स्वयंपूर्ण आहे. स्त्रीचे जीवन अपूर्ण. तिचे सत्त्व, तिची प्रतिष्ठा विवाहाकांक्षेत झाली आहे. स्त्रीच्या ब्रह्मचर्याला सामाजिक प्रतिष्ठा नाही. सांस्कृतिक मूल्य नाही. ही विचारसरणी, म्हणजे परंपरेने वाहत आणलेले कलेवरच मानावे लागेल.

(५) मातृत्वाबरोबर शिशुसंगोपन आणि शिशुशिक्षण ही मनुष्याने मोठ्या प्रमाणात स्त्रीवर सोपविलेली कामे होत. विचार करता ही कामे एकट्या स्त्रीवर सोपविणे चूक आहे. बालकांची मने संस्कारित करणे, विविध प्रकारच्या उदात्त भावनांचे त्यांना शिक्षण देणे यांत पुरुषाचाही वाटा असायला हवा.

(६) आपण सांस्कृतिक परिवर्तनाच्या काळासंबंधीं चर्चा करीत आहोत. मानवी समूह ज्याला कालावश्यक गृहिते मानीत आला त्या गृहिताची इमारत आता खेड्यातल्या पाटलाच्या गढीसारखी आहे. धरणीकंप झाला म्हणजे डोंगराच्या जागी दरी आणि दरीच्या जागी डोंगर निर्माण होतो, तसा आता आपल्या सामाजिक जीवनात बदल घडून आला आहे. तेव्हा प्रचलित चालीरीती, रुढी, समज, अपसमज या सर्वांना मूठमाती देऊन नवमूल्यावर अधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी एकट्या स्त्रीचे वा एकट्या पुरूषाचे प्रयत्न पुरेसे नाहीत, तर स्त्री-पुरुषांचे सम्यक् प्रयत्न हवेत. आजवर पुरुष शोषक आणि स्त्री शोषित अशी स्थिती होती, नवसमाज रचनेत शोषितांनी कितीही प्रयत्न केले तरी उपयोग नसतो. शोषकांना ते पटले पाहिजे, रुचले पाहिजे आणि पचनी पडल्यानंतर असे परिवर्तन करण्यास त्यांनी कटिबद्ध व्हावयला पाहिजे. एकटा शोषक नव्हे, तर शोषक आणि शोषित यांनी एकमताने एकदिलाने परिवर्तनास सज्ज झाले पाहिजे. अशी स्थिती आल्यावरच शोषक आणि शोषित ही विभागणी वितळून जाईल. समानता प्रस्थापित होईल ! स्त्री अनुगामी न राहता सहगामी ठरेल !

कोणत्याही वर्तुळाला केंद्रबिंदू एकच असतो- आज राष्ट्रातील स्त्रियांचे मानवीकरण करणे, त्यांना परंपरागत पुरुषी संस्कृतीमधून मुक्त करणे हाच एक केंद्रबिंदू होईल. मग

२०८९
२२७८४
निबंध

परिवर्तनाच्या या परिघावर कुठेही उभे राहिले तरी, सारे मार्ग केंद्र बिंदूकडेच जातील. तेंव्हा स्त्रीजीवनात निकराचे प्रयत्न करून खऱ्या अर्थाने तिच्यात अनुस्यूत असलेल्या जास्तीत जास्त शक्तींचा उपयोग करून जनमानसात नव्या जाणिवांचे विचार प्रसृत करणे व स्त्रीची नवी प्रतिमा निर्माण करणे हे तसे पाहिले तर प्रत्येक राष्ट्राचे काम; पण राष्ट्राचा शकट चालविणारे लोकशाहीचे पुरस्कर्ते भारतापुरते बोलायचे झाल्यास आज पुरुषी संस्कृतीने अंतर्बाह्य लिप्त झालेले आहेत; परंतु हे विधान पूर्णांशाने बरोबर आहे. असे कुणी मानणार नाही. भारतातील स्त्रीची अवस्था सुधारण्यासाठी भगवान बुद्धांनी भिक्षुणी संघाची स्थापना करून समानता प्रस्थापित केली. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सारख्या आणि आगरकर–कर्वे यांच्यासारख्या सामाजिक नेत्यांनीही खूप प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदूकोड बील पास करून स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य दिले सतीची चाल बंद करणाऱ्या राजा राममोहन रॉय यांना कसे विसरता येईल ? परंतु आजची स्थिती पाहता केवळ समान अधिकार मिळून स्त्रीला काय फायदा ? त्याप्रमाणे अंमलबजावणी होत नसेल तर ? अंमलबजावणी कुणी आणि कशी करावी, त्याचे स्वरूप काय असावे, याचाही ऊहापोह होणे जरुरीचे वाटते.

पहिली पायरी म्हणजे कुटुंब ! घरात मुलीचा जन्म झाला की, स्त्रीच्या आरोग्याचा विचार करण्याऐवजी मुलगी जन्माला आली म्हणून घरातले उत्सुकतेचे वातावरण काळवंडते. .जन्मदात्री आईदेखील आपल्या प्रसूतिवेदना विसरून मुलीला जन्म दिल्या-बद्दल स्वतः दुःखी कष्टी होते. मुलीच्या जन्माचा हा पारंपरिक अपसमज ! इथून तिच्या करुण कहाणीचा प्रारंभ होतो. घरात मुलगा आणि मुलगी आहेत, पण त्या दोघा बहीण भावंडांत, मुलीला वेगळी वागणूक आणि मुलाला वेगळी असे वारंवार घडू लागते. ‘ तू मुलगी आहेस, तुला अमुक करायला नको, तमुक आले पाहिजे. मुलीच्या जातीने असे करू नये, तसे करून नये ’ अशा प्रकारचा भेद प्रारंभापासून निर्माण केला जातो. मुलगी परंपरागत संस्काराची पुतळी कशी बनेल, असाच प्रयत्न घरातील प्रत्येक व्यक्तीचा असतो. स्त्री-पुरुष भेदाभेदाची भावना घरातच वाढीला लागते. हे सर्व दूर करण्यासाठी घरातील माणसांच्या मनात जाणीवपूर्वक परिवर्तन व्हावयास हवे. हे कार्य स्त्री एकटी करू शकत नाही. हा प्रश्न समाजाचा आणि राष्ट्राचा आहे. समाजशिक्षणाचे किंवा लोक-शिक्षणाचे काम ज्या संस्था करीत आहेत, त्यांनी हे लोकांचे जाणीवपूर्वक परिवर्तन करण्याचे कार्य प्रथम हाती घ्यावे. वर्तमानपत्रे, मासिके, ग्रंथ, साहित्यसंस्था, आकाश-वाणी आणि चित्रपट या सर्वांतून स्त्रीचा जन्म म्हणजे शाप नसून ‘ वरदान ’ आहे, पुरुषाइतकाच स्त्रीचाही राष्ट्राला व्यक्ती म्हणून उपयोग आहे, या विचाराचा जनमानसात प्रचार व्हावा. आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने नैनिताल येथे भरलेल्या राष्ट्रीय लेखिका संमेलनात असा एक विचार निघाला होता की, स्त्रीविषयक एकच प्रश्न एकेवेळीं, पूर्व-पश्चिम व उत्तर-दक्षिण अशा भारताच्या चारही भागांत, वर्तमानपत्रापासून हाताळला

जावा. जेणेकरून भारतातील सर्व जनता एकाच वेळी एकाच प्रश्नावर विचार करू लागेल, त्यावर उलट सुलट विचारांचे आदानप्रदान होईल आणि तो विशिष्ट प्रश्न नेटाने धसाला लागेल, असाच प्रयत्न व्हावा.

याशिवाय सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांनी सभा-संमेलने व शिबिरे, घ्यावीत. स्त्री विषयक परंपरागत दृष्टिकोन कसा चुकीचा आहे, तो बदलणे किती अगत्याचे आहे, त्यामुळे आपल्या कुळाला, कुळाचाराला, सामाजिक प्रतिष्ठेला धोका कसा पोहचणार नाही, असे विचार त्या शिबिरात चर्चिले जावे. म्हणजे मुलीचा साजशृंगार, शिक्षण, हुंडा आणि ती आयुष्यभर दुसऱ्याच्या घरी गेली तरी तिच्या दुखण्या-खुपण्यानं माहेरच्या माणसाच्या काळजाला चरे! अशी खुळी वृत्ती समाजातून नष्ट होईल. विशेषेकरून महिलामंडळे हे काम धडाडीने करू शकतील.

शिक्षणाची ज्ञानगंगा आता सर्वत्र पोहोचलेली आहे. या सार्वजनिक सक्तीच्या शिक्षणाचा पहिला परिणाम असा की, मुलं-मुली शाळेत जाऊ लागली. आतातर शिशुगृहे, बालकमंदिरेसुद्धा निघाली आहे. ‘ तू मुलगी आहेस, मग असं ओरडायचं नाही. मुलीच्या जातीनं कसं शांत बसावं, तो मुलगा आहे ना चढू दे वर, बाळी, तू चढशील तर तुझे हातपाय मोडतील, ’ अशी भाषा आता बालकमंदिरांतून वापरता कामा नये. तसेच, वरच्या वर्गातूनसुद्धा मुला-मुलींसमोर स्त्री-पुरुष विषयक परंपरागत भेदभाव व्यक्त करणारे धडे नकोत. अर्थात आता पहिल्या वर्षापासून तहत मॅट्रिकपर्यंतची पुस्तके शासकीय यंत्रणाच तयार करीत असते. एकदा शासनाने हे धोरण स्वीकारले तर, अभ्यासक्रमामधून असा बदल घडून येणे अशक्य नाही.

काही लोक असा विचार समोर ठेवतील की, परंपरेने चालत आलेले सारेच विचार टाकाऊ नाहीत. या ठिकाणी आवर्जून सांगावेसे वाटते की, स्त्रीच्या बाबतीत तरी परंपरेने चालत आलेले विचार अतिशय बुरसटलेले व नासलेल्या लोणच्यासारखे आहेत; ते फेकून-भिरकावून देणार नसाल तर समाजाच्या प्रकृतीस्वास्थाला ते अपायकारक व हानीकारक ठरल्याविना राहणार नाहीत. आजच्या राजवटीत जे काही दोषयुक्त शिक्षण मिळते, ते समान संधी, समान दर्जा या नात्याने दिले जात आहे. ‘ मुले शिकतात, मुली शिकतात. मुलांची जशी विचारशक्ती प्रगल्भ होते तशी मुलींचीही. त्यादेखील साकल्याने आणि सम्यक दृष्टीने विचार करू लागल्या आहेत. स्त्री-पुरुषांमधील आपपरभाव त्यांच्या लक्षात आला आहे. नोकरीच्या, व्यवसायाच्या निमित्ताने बाहेर पडल्याने त्यांच्याही अनुभवाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. पुरुषाचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व (Personality) जसे अनुभव घेऊन तयार होत असते, तसे ते स्त्रीचेही होत असते. परंतु पारंपरिकतेच्या जोखडामुळे ती मुक्तपणे वावरू शकत नाही. तिला आत्मसंरक्षण करता येत नाही, असा समज दृढमूल झाला आहे. कुणापासून संरक्षण, तर

पुरुषापासून. म्हणजे भीतीदायक कोण तर पुरुष! एकटी दुकटी स्त्री असली तरी तिच्यावर पुरुष तुटून पडतील ही भीती स्त्रीलाच काय म्हणून? स्त्रियांचे अपहरण, निर्घृण बलात्कार अशी स्त्रियांची विटंबना पुरुषच करतात. या गोष्टी निंद्य-निषेधार्ह आहेत, ही शिकवण स्त्रियांना नको; पुरुषांना हवी. काही स्त्रियांनाही न्यूनगंडाच्या भावनेने पछाडलेले आहे. तेव्हा पुरुषापेक्षा मी कमी नाही' ही भावना स्त्रियांमध्ये वाढीस लावणे जरुरीचे आहे. काहींना तर आपले सौंदर्य वाढीस लावण्याचे जणू वेड लागलेले दिसते. त्यासाठी Beauty Parlour सारख्या सौंदर्य प्रसाधनाने सौंदर्य वाढविण्याच्या संस्था मोठमोठ्या शहरांत दिसून येतात. हे कशासाठी? व्यक्तिमत्त्वाचे सौंदर्य हेच खरे सौंदर्य ही भावना जोपासली गेली पाहिजे.

हल्लीच्या महागाईच्या काळात आपण घेतलेल्या ज्ञानाचा उपयोग व्हावा म्हणून बऱ्याच स्त्रिया घराबाहेर पडल्या; पण त्यांचे परंपरेच्या भोवऱ्यात अडकलेले मन, बाहेरचे आणि घरातले काम तितक्याच क्षमतेने करण्यासाठी धडपडत असते. याच तणावात ती दडपली जाते. घरातील ठराविक कामेच पुरुषांनी करायची आणि ठराविक कामेच स्त्रियांनी करायची असा आजवर अलिखित नियम होता. तो आता बदलला पाहिजे. जो पुरुष घरात स्त्रीने करावयाच्या कामात मदतीचा हात पुढे करीत असेल त्याला समाजात नावे ठेवली जातात. काही विशिष्ट वर्गाच्या स्त्रिया नेहमीच बाहेर अर्थार्जनासाठी जात असतात. स्त्री व पुरुष दोघेही कामावरून थकून भागून आले तरी घरातली कामे स्त्रीनेच करायची, पुरुषाने मात्र निवांत बसून राहायचे, हीदेखील परं-परागत प्रथा; परंतु आता ती पुरुषाने बुध्दयाच सोडली पाहिजे. आता तर घरकामाचे विशेषेकरून स्वयंपाकघराचे यांत्रिकीकरण झाले आहे. पुरुषाला तशी कामे करण्यास खंत वाटू नये.

भविष्यात स्त्री-पुरुष यांच्यामध्ये समानस्तरीय, सर्वांगपरिपूर्ण, व्यक्तिमत्त्वसंपन्न असे वातावरण निर्माण झालेले दिसेल. त्यात प्रेम आणि प्रसन्नता यांचे सुसंवादित्व साधलेले असेल. प्रख्यात विद्यमान विचारवंत दादा धर्माधिकारी अशा स्वरूपास 'नारीनरेश्वर' या नावाने संबोधतात. भविष्याचा पडदा शीघ्रातिशीघ्र बाजूला सारून नवी स्त्री समोर उभी ठाकावी, तिच्या अस्तित्वाने सारा आसमंत आल्हाददायी व्हावा, हीच अनावर उत्सुकता.

□ □

# शिक्षणात गीतेचे स्थान

## डॉ. गजानन श्री. खैर

### अध्यापकांना उपयुक्त

भगवद्गीता हा शिक्षणाच्या क्षेत्रातला आणि शिक्षणशास्त्रातला एक महत्त्वाचा ग्रंथ आहे याची जाणीव अद्याप या क्षेत्रातील कार्यकर्त्यांना व विचारवंतांना झालेली नाही. अध्यापक महाविद्यालयातील पदवीच्या आणि पदवीनंतरच्या अभ्यासक्रमात जे विषय आहेत त्यांतील १७ विषयांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष उल्लेख गीतेमध्ये आहे. अशा एका महाविद्यालयातील विद्यार्थीशिक्षकापुढे 'गीता व शिक्षण' या विषयावर व्याख्यान देऊन मी जेव्हा व्यासपीठावरून खाली उतरलो, तेव्हा तेथील एक प्राध्यापक मला म्हणाले,

"आमच्या अभ्यासक्रमातील एका प्रश्नपत्रिकेची (पेपरची) उजळणीच तुम्ही करून घेतली." या अभ्यासक्रमात मुलांचे भावनात्मक विश्व (The affective domain) असा एक विषय आहे. त्या विषयावर मी एकदा गीतेच्या साहाय्याने तास दीडतास व्याख्यान दिले. आणि या विषयावरील भारतीय दृष्टिकोन उलगडून सांगितला. मला शिक्षणाच्या क्षेत्रात जे थोडेफार यश मिळाले आहे त्याचे एक महत्त्वाचे कारण गीतेतील विचारांचा माझ्या शिक्षणविषयक आणि जीवनविषयक दृष्टीवर झालेला परिणाम हे आहे. या नवीन दृष्टिकोनातून शिक्षणक्षेत्रातील सर्व लहानमोठ्या कार्यकर्त्यांनी या ग्रंथाकडे पाहावे अशी माझी त्यांना विनंती आहे. गीतेमध्ये अध्यात्म आहे, कारण मोक्ष हा भारतीय मानवाचा अंतिम पुरुषार्थ आहे; परंतु त्याकरता आवश्यक असलेले मानसशास्त्र, नीतिशास्त्र आणि सदाचारशास्त्र यांना गीतेत अतिशय महत्त्वाचे स्थान आहे, त्याचा शिक्षकांना फार उपयोग आहे.

### मनोवृत्ती व वर्तनाचे महत्त्व

आधुनिक शिक्षणाचा अभ्यासक्रम आखताना अलीकडे आपण प्रत्येक विषयातून आणि त्यातील उपविभागातून कोणत्या प्रवृत्ती आणि कोणते वर्तन (ॲटिट्यूड् अँड बिहेव्हिअर) मुलांच्या ठिकाणी रुजवू पाहतो त्याचा विचार करावा लागतो. ज्ञान देणे हा जसा एक उद्देश आहे, तसाच मनाच्या प्रवृत्ती आणि व्यवहारातील आचरण यांत परिवर्तन घडवून आणणे हा आपल्या अभ्यासक्रमाचा उद्देश आहे. या दृष्टीने गीतेत

फार महत्त्वाचे विचार मांडले आहेत. विद्यार्थीजीवनात आणि त्यानंतरच्या व्यावसायिक जीवनात माणसापुढे जे वैयक्तिक व सामाजिक प्रश्न उभे राहतात त्यांकडे कोणत्या भावनेने व विचाराने पाहावे आणि त्या त्या परिस्थितीत सदाचाराच्या दृष्टीने कसे वर्तन करावे याचे दिग्दर्शन गीतेने फार चांगले केलेले आहे. आपण आज शाळेत शिकवीत असलेले गणित, विज्ञान, इतिहास इत्यादी विषय त्यांत होणाऱ्या शीघ्र प्रगतीमुळे कालबाह्य होऊन जातील, परंतु गीतेतील विचार विद्यार्थीदशेत आणि प्रौढ अवस्थेत असे जन्मभर उपयोगी पडतील. पाश्चिमात्य शिक्षणाच्या अनुकरणाने आपला शिक्षणाचा कार्यक्रम ज्ञानप्रधान झालेला आहे. मनोवृत्ती, भावना, आचार, या गोष्टींचा विचार आपल्या शैक्षणिक कार्यक्रमात फारसा केलेला नाही. त्यामुळे ज्ञानाने संपन्न, परंतु मनोवृत्तींनी विकृत आणि आचाराने भ्रष्टाचारी अशा प्रकारचा समाज गेल्या ३०–४० वर्षांत आपण निर्माण केलेला आहे. गुन्हेगारीमध्ये सापडणाऱ्या व्यक्तींत १८ ते ३८ या वयाच्या तरुणांचा, सुशिक्षित तरुणांचाही, अंतर्भाव असतो, ही वस्तुस्थिती शिक्षणक्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना आत्मनिरीक्षण करण्याला प्रवृत्त करावी अशी नाही काय ?

## प्रश्न तेच परिभाषा निराळी

गीतेमध्ये मानवाच्या जीवनविषयक प्रश्नांना प्राधान्य आहे. ईश्वरभक्ती आणि अध्यात्म या गोष्टी साधन आणि अंतिम साध्य म्हणून आहेत. ऐहिक दृष्टिकोनातून गीतेचे वाचन केल्यास आपल्या दैनंदिन जीवनात तिचे किती मोलाचे मार्गदर्शन होऊ शकते हे आपल्या लक्षात येईल. विद्यार्थ्यांना आणि समाजाला गीतेतील विचार सांगताना आजची परिभाषा वापरली पाहिजे आणि आजच्या जीवनातील उदाहरणे दिली पाहिजेत. अडीच-तीन हजार वर्षांपूर्वी मानवी जीवनाचे जे प्रश्न होते; आणि त्या प्रश्नांची जी उत्तरे होती, तेच प्रश्न आणि तीच उत्तरे आजही प्रस्तुत आणि उपयुक्त आहेत; परंतु गीतेतील परिभाषेचा उपयोग केल्यामुळे सर्वसामान्य माणसांना तिचे विचार आपल्या जीवनापासून फार लांब आणि उंचावर आहेत असे वाटते. योग, कर्मयोग, ज्ञानयोग, ध्यानयोग इत्यादी परिभाषेमुळे हे सर्व उच्च, उदात्त पण आपल्या आटोक्याबाहेरचे आहे असे भासते; पण याच संकल्पना आजच्या भाषेत मांडल्या तर, त्या आपल्या जीवनाशी संबद्ध आहेत याची जाणीव श्रोत्यांना होते आणि आपणही गीता वाचावी अशी उत्सुकता त्यांच्यात निर्माण होते, असा माझा अनुभव आहे.

## ऐहिक जीवनाला उपयुक्त

आज प्राथमिक, माध्यमिक किंवा उच्च शिक्षणातील शेकडा दोन-तीन शिक्षकांनाही गीतेतील विचारसरणीचे ज्ञान नाही. काही व्यक्तींनी काही अध्याय तोंडपाठ केलेले असतात; परंतु मौखिक पाठांतरापलीकडे त्यांची मजल फारशी गेलेली नसते. न्यायालयात, विधिमंडळात, लोकसभेत किंवा अन्यत्र गीता हातात घेऊन सत्य भाषणाचा संकल्प केला

जातो; पण त्या गीतेतील अर्थ शेकडा एक–दोन व्यक्तींनाही माहीत नसतो. गीतेचे तत्त्वज्ञान आकलन झाल्याशिवाय माणूस सुसंस्कृत व सुशिक्षित होऊ शकत नाही आणि शिक्षकही संपूर्ण जीवनाचा शिक्षक होऊ शकत नाही. गीता हा अध्यात्माचा ग्रंथ आहे; असा समज आजपर्यंतच्या प्रवचनकारांनी व भाष्यकारांनी निर्माण केलेला आहे. गीतेच्या प्रचारात ही फार मोठी अडचण आहे. ऐहिक जीवनाला गीतेचा फार मोठा उपयोग आहे हे स्वतःच्या अभ्यासाने समजून घेणारे आणि तसे इतरांना सांगणारे अनेक शिक्षक आज पाहिजे आहेत. सेवानिवृत्त शिक्षकांनी हे सामाजिक शिक्षण करण्यासारखे आहे.

## गीतेचा आशय व विषय

ज्या गीतेची मी आतापर्यंत स्तुती केली त्या ग्रंथात कोणत्या प्रश्नांचा खल केलेला आहे, त्याची विचारसरणी काय आहे, आणि आजच्या जीवनात त्याची उपयुक्तता कशी आहे, हे अगदी संक्षिप्त रीतीने या ठिकाणी सांगतो. त्यामुळे या ग्रंथाशी ज्यांचा परिचय नाही त्यांचे गैरसमज नाहीसे होतील. सुख आणि दुःख हे जीवनातील महत्त्वाचे प्रश्न आहेत. गौतम बुद्धाने दुःखाचा परिहार हा विषय घेऊन त्यावर आपल्या धर्माची उभारणी केली. दुसरा प्रश्न आहे पाप आणि पुण्य किंवा सदाचार आणि दुराचार. पाप हा विषय घेऊन येशू खिस्ताने त्यावर आपल्या धर्माची उभारणी केली. गीतेने सुखदुःख आणि सदाचार दुराचार हे दोन्ही विषय घेऊन मानवाने दुःखाचा परिहार आणि दुराचारापासून अलिप्तता कशी प्राप्त करून घ्यावी व त्याकरता योग्य-अयोग्य कर्म निर्णय कसा करावा याचे फार सुंदर मार्गदर्शन केले आहे. कोणत्याही व्यवसायात मनुष्य पडला म्हणजे त्याच्यापुढे हे दोन प्रश्न प्रामुख्याने उभे राहतात, म्हणून सर्व व्यवसायांचे तत्त्वज्ञान गीतेमध्ये तत्त्वरूपाने सांगितलेले आहे. माणसाने आपला उद्योग समाजहितार्थ करावा आणि स्वार्थाला गौण स्थान द्यावे; आपले काम हा आपला धर्म ( मिशन ) आहे असे मानून ते कसे करावे असा उपदेश केलेला आहे. आपल्या व्यावसायिक किंवा सार्वजनिक व वैयक्तिक जीवनात अनेक बरेवाईट प्रसंग येतात आणि त्यामुळे आपल्या मनामध्ये किंवा चित्तवृत्तीमध्ये अनेक चढ-उतार होत असतात. अनेक चिंता, अनेक संघर्ष, अनेक ताण ( anxiety, conflicts, tensions ) आपल्या चित्तवृत्तीत निर्माण होतात. हा आज जागतिक प्रश्न निर्माण झालेला आहे. या सर्व चित्तवृत्तींचे नियमन करून कोणत्याही परिस्थितीत आपले मन शांत, समतोल, समाधानी कसे ठेवावे याचे शिक्षण गीता देते. मानवाच्या स्वभावात किती विविधता आहे याचे विचारपूर्वक वर्णन गीतेमध्ये केलेले आहे. या स्वभावातील दोषांमुळे माणूस दुःखात पडतो आणि दुराचार करतो हे वारंवार सांगितले आहे; पण त्याचबरोबर आपला स्वभाव कसा सुधारावा याचेही दिग्दर्शन गीतेने करून ठेवलेले आहे. चांगले वागावे असे सांगणारे अनेक धर्मग्रंथ आहेत; परंतु गीतेमध्ये चांगले का वागावे, मनोवृत्ती शांत व समतोल

का ठेवावी, याचे तर्कशुद्ध विवरण केलेले आहे. निव्वळ आज्ञार्थक शब्दप्रयोग केलेले नाहीत. बुद्धीला आणि श्रद्धेला समाधान देऊ शकेल अशा प्रकारचे बुद्धिवादी आणि श्रद्धावादी दोन्ही प्रकारचे विवेचन गीतेत आहे. कोणी धर्मनिष्ठ आणि ईश्वर मानणारा असला तर, त्याच्याकरता ईश्वरप्रधान व भक्तिप्रधान तत्त्वज्ञान गीतेत आहे; परंतु कोणी बुद्धिवादी, निरीश्वरवादी, मार्क्सिस्ट, जडवादी, चार्वाकपंथीय असला तरी, त्याच्याकरताही गीतेमध्ये प्रकृतिप्रधान म्हणजे निसर्गाच्या नियमावर आधारलेले तत्त्वज्ञानही गीतेत आहे. दुःखातून मुक्ती आणि पापापासून परावृत्ती हा गीतेचा मुख्य विषय आहे. तो मार्ग माणसाला सापडला म्हणजे मुक्ती, मोक्ष किंवा ईश्वर हा त्याच्या जवळचआहे. त्याला अन्यत्र कोठे जायला नको असा गीतेचा उपदेश आहे. हे सर्व विवेचन सहज आकलन व्हावे म्हणून गीतेचे तत्त्वज्ञान आचरणारी व्यक्ती आणि तिची दृष्टी कशी असते याची वर्णने किंवा चित्रे अधूनमधून सर्वत्र दिलेली आहेत. वरील तत्त्वज्ञानात फार कठीण किंवा न समजण्यासारखे असे काही नाही. समज आलेल्या कोणत्याही व्यक्तीला त्याचे सहज आकलन होऊ शकेल. शिक्षकांना तर सहज समजू शकेल. आजच्या परिभाषेत ते सांगितले पाहिजे ही गोष्ट लक्षात ठेवणे जरूर आहे.

## शिक्षणोपयोगी भाग

शैक्षणिक कार्यक्रमात गीतेचा अंतर्भाव करताना त्या ग्रंथातील आजच्या काळाला उपयुक्त असे विषय घेऊन त्याचा एक सुसंगत अभ्यासक्रम आखता येईल. त्या विषयांना गीतेच्या कालखंडात महत्त्व होते. परंतु आज ज्यांची गरज नाही असेही अनेक विषय आहेत. ते अभ्यासक्रमात न घेतले तरी चालतील. संन्यास व यज्ञपद्धती, इत्यादी विषय त्यावेळेला महत्त्वाचे होते. आज ते गाळले तरी चालतील. गीतेतील मानसशास्त्र, नीतिशास्त्र, मानवतावाद, समतावाद, सद्‌गुणांची साधना, स्वभावसुधारणा, सदाचार-साधना व्यवसायनीती हे विषय आजही अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांचा आपल्या शैक्षणिक अभ्यासक्रमात समावेश करता येईल. हे विषय गीतेव्यतिरिक्तही स्वतंत्र रीतीने शिकवता येतील. तसे अवश्य करावे; परंतु गीता या ग्रंथाला भारतीयच नव्हे तर, जागतिक दृष्टीने अतिशय महत्त्व आहे; आणि गीतेच्या वाणीला परंपरेने प्राप्त झालेला अधिकार आहे. त्याचा उपयोग करून घेणे आवश्यक आहे.

शिक्षणातील अभ्यासक्रमाच्या दृष्टीने गीतेतील महत्त्वाचे विषय घेऊन त्याचे पाच मुख्य भाग पाडता येतील –

(१) मानवी जीवनाचे प्रश्न व त्यांची उत्तरे.
(२) आदर्श मानवाची वर्णने व जगाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी.
(३) सदाचार व दुराचार आणि व्यवसायात समाजहिताची दृष्टी.
(४) मानवाचा स्वभाव व तो सुधारण्याचा मार्ग.

(५) या विचारसरणीमागील काही तत्त्वज्ञान, प्रकृतीप्रधान तत्त्वज्ञान व ईश्वर-प्रधान तत्त्वज्ञान.

## कार्यक्रमात समावेश

या पाच विषयांची विभागणी इयत्ता ५ पासून ११ पर्यंत करता येईल. प्रत्येक विषयाला धरून सामान्यपणे गीतेतील ८० ते १०० श्लोक उपयोगी पडतील. हे विषय प्रत्येक इयत्तेला वाटून द्यायचे का, सर्व विषय सर्व वर्गांना एकाच वेळी शिकवावयाचे, हे त्या त्या शाळांचे मुख्याध्यापक आणि गीतेचा अभ्यास केलेले शिक्षक यांनी ठरवावे. दहावी किंवा अकरावी इयत्ता पूर्ण होऊन विद्यार्थी बाहेर पडेल तोपर्यंत या पाचही विषयांचे ज्ञान त्याला आधुनिक दृष्टिकोनातून व आजच्या भाषेत व चालू जीवनाच्या संदर्भात जर करून देता आले तर ते त्याला जन्मभर उपयोगी पडेल. माझ्या शाळेने व शिक्षकांनी मला निव्वळ बौद्धिक ज्ञानच दिले असे नसून, त्या ज्ञानाबरोबर जीवनाकडे, कामाकडे व समाजाकडे पाहण्याचा भारतीय दृष्टिकोनही दिला, अशा प्रकारचे श्रेय तो आपल्या शाळेला व शिक्षकांना देईल. वरील पाच विषयांत गीतेतील कोणत्या कोणत्या भागाचा समावेश होतो त्याचे दिग्दर्शन करणे आवश्यक आहे. त्याकरता निरनिराळ्या अध्यायांतील उपयुक्त असे परिच्छेद प्रत्येक विषयाकरता निवडावे लागतील. गीतेची मांडणी थोडी बदलावी लागेल. समान विचार एकत्र आणावे लागतील. अध्यायांच्या क्रमाने हे विषय आलेले नसून, संवादांच्या रूपाने प्रत्येक विषय गीतेतील अनेक अध्यायांतून विखुरलेला आहे; म्हणून प्रत्येक विषयाला धरून कोणते अध्याय आणि त्यातील कोणते परिच्छेद उययोगी पडतील, याची स्थूल कल्पना पुढील विवरणात दिली आहे.

### (१) मानवी जीवनाचे प्रश्न व त्यांची उत्तरे

पहिल्या अध्यायातील १ ते ४७ हे श्लोक व दुसऱ्या अध्यायातील १ ते १० हे श्लोक, यांत अर्जुनापुढील प्रश्नांच्या निमित्ताने सुखदुःख, पापपुण्य, आणि कर्मनिर्णय हे महत्त्वाचे प्रश्न आलेले आहेत. अर्जुनाच्या तात्कालिक प्रसंगाच्या निमित्ताने या प्रश्नांची उत्तरे अध्याय दोन मध्ये ११ ते ५३ या श्लोकांत आलेली आहेत. त्यात असे सांगितले आहे की, प्रत्येक व्यक्तीने आपल्या व्यवसायाचे काम करताना प्रामुख्याने समाजाच्या हिताची दृष्टी ठेवावी, स्वतःच्या हिताला गौणस्थान द्यावे. एखाद्या आणीबाणीच्या प्रसंगी काय करावे किंवा काय करू नये, असा पेचप्रसंग उभा राहतो त्यावेळी स्वार्थ, अहंकार, भीती, द्वेष, मत्सर या विकारांना बळी न पडता मन शुद्ध ठेवावे, हेतू शुद्ध ठेवावा आपले कर्तव्य हा एक धर्म आहे या दृष्टीने त्याकडे पाहावे; आणि अनुकूल किंवा प्रतिकूल असे जे कोणते परिणाम होतील ते स्वीकारण्याची तयारी ठेवावी. हेतू, काम आणि परिणाम यांची योजना करताना मन विकाररहित, शुद्ध, संयमित व शांत ठेवावे.

हे सर्व मिळून ११० श्लोक होतील. यांतील अर्जुनाच्या प्रश्नांचा भाग हा अत्यंत नाट्यपूर्ण, ओजस्वी शैलीचा, मानसशास्त्रयुक्त, विविध स्वभाव दर्शविणारा, आणि प्रश्न व उत्तर यांचा सूचक अशा प्रकारचा आहे. शाळेतील संमेलनात एक लहान नाट्यप्रवेश म्हणून तो सादर करता येईल. पाचवी ते सातवी मधील विद्यार्थ्यांकडून या भागाचे पाठांतर अवश्य करवून घ्यावे.

## (२) आदर्श मानवाची वर्णने आणि त्याची जगाकडे पाहण्याची दृष्टी

या विषयाला धरून साठ ते सत्तर श्लोक आहेत. गीताकारांच्या कल्पनेप्रमाणे गीतेचे तत्त्वज्ञान आचरणात आणणारा मानव कसा असतो, त्याची वर्णने दुसऱ्या अध्यायापासून अठराव्या अध्यायापर्यंत मधूनमधून दिलेली आहेत. सर्वांच्या पुढे कर्मयोगी, नीतिशास्त्रज्ञ, समाजसेवक, योगेश्वर श्रीकृष्णाचे उदाहरण ठेवलेले आहे. अध्याय दोन मध्ये स्थितप्रज्ञाचे उदाहरण ( १९ श्लोक ), त्रिगुणातीत पुरुषाचे वर्णन ( अध्याय १४ मधील ६ श्लोक ), १२ व्या अध्यायातील ईश्वरभक्ताचे वर्णन ( ८ श्लोक ), अशा एकूण ३४ श्लोकांमध्ये गीतेतील आदर्श मानवाचे वर्णन केलेले आहे. यातील स्थितप्रज्ञ, गुणातीत, भगवद्भक्त इत्यादी शब्द हे त्या त्या काळाला व त्या त्या परिस्थितीला अनुलक्षून आहेत. त्या वर्णनामध्ये ज्या मनोवृत्ती दिलेल्या आहेत त्या सगळ्या एकत्र केल्या तर, आजच्या काळाला अनुरूप असे आदर्श व्यक्तिमत्त्वाचे चित्र ( Complete Personality ) आपल्या डोळ्यापुढे उभे राहते. भगवद्भक्ताचे वर्णनच घ्या— यातील ‘ भक्त ’ हा शब्द काढून टाकून त्या ठिकाणी ‘ शिष्य ’ हा शब्द घाला आणि मग हा आदर्श विद्यार्थी किंवा तरूण किंवा नागरीक डोळ्यापुढे कसा उभा राहतो ते पहा. त्याच्या ठिकाणी द्वेष, अहंकार, सूडबुद्धी, भीती, विषाद, स्वार्थ, दुःख, सामाजिक पक्षपात, सुख-लोलुप वृत्ती, असमाधान चंचलपणा, या वृत्तींचा अभाव आहे. उलट मैत्री, दया, क्षमा, शांती, दृढनिश्चय, आत्मसंयमन, आनंदी वृत्ती, समर्पण वृत्ती, समाजहित-बुद्धी निस्वार्थ वृत्ती, सदाचार, संतोष, समत्त्वदृष्टी, ध्येयवाद हे गुण त्याच्या ठिकाणी आहेत. या वर्णनात ज्या इष्ट मनोवृत्तींचे संगोपन आणि अनिष्ट वृत्तींचे निराकरण दिलेले आहे ते विद्यार्थ्यांना जन्मभर उपयोगी पडेल. विद्यार्थ्यांच्या मनोवृत्ती बदलणे आणि त्यांच्या वर्तनात परिवर्तन घडवून आणणे हा आपल्या अभ्यासक्रमाचा प्रधान हेतू आहे. त्याला धरूनच गीतेतील हा भाग अत्यंत उपयुक्त असा आहे.

या आदर्श मानवाची जगाकडे, स्वतःकडे व समाजाकडे पाहण्याची दृष्टी कशी असते. केवळ स्वतःचा विचार न करता तो इतरांच्या सुखदुःखाशी समरस कसा होतो आणि समत्त्वबुद्धीने कसा वागतो, त्याची काही वर्णने गीतेत आहेत. सुशिक्षित ज्ञानी मनुष्य कसा असावा त्याचे वर्णन १३ व्या अध्यायात केवळ ५ श्लोकांत दिले आहे ( श्लोक ७ ते १४ ) हे श्लोक पाठांतर योग्य आहेत. पाचव्या अध्यायात २१ ते २६ या ६

श्लोकांत ब्रह्मज्ञानी पुरुष कसा असतो, याचे वर्णन आहे. ब्रह्मज्ञानी म्हणजे पूर्ण विकसित सुसंस्कृत मानव असा अर्थ घेतला म्हणजे ब्रह्म या शब्दाला बिचकण्याचे काहीही कारण नाही. अध्याय ६ मधील ७ ते ९ या तीन श्लोकांत आत्मसंयमी पुरुषाचे वर्णन दिले आहे. अध्याय ५ मध्ये १८ ते २० या तीन श्लोकांत सामाजिक आणि मानसिक समत्व-बुद्धी कशी असते तिचे वर्णन आहे. अध्याय १३ मध्ये २४ ते ३० या श्लोकांत खरा आत्मज्ञानी सर्व जगातील प्राणिमात्रांकडे समत्ववृत्तीने पाहतो या दृष्टीचे सुंदर वर्णन आहे. ( २४ ते ३० श्लोक ). आणि शेवटी मी व सर्व जग एकच आहोत, जगाचे जे सुखदुःख ते माझेच सुखदुःख आहे, या मनोवृत्तीचे वर्णन अध्याय ६ मधील २९ ते ३२ या श्लोकांत दिले आहे. ते उत्कृष्ट आहे. मानवतावाद, बंधुभाव, आंतरराष्ट्रीय मनोवृत्ती, समाजप्रेम, भूतदया इत्यादी सर्व मनोवृत्तींचा संगम या सर्व श्लोकांमधून झालेला आहे. गीताकारांच्या दृष्टीने आदर्श मानवाची जगाकडे पाहण्याची ही दृष्टी आहे. ती आजच्या काळालाच उपयोगी आहे असे नव्हे तर, यापुढेही अनंत शतके ती उपयोगी पडेल.

## ( ३ ) सदाचार, दुराचार व व्यवसायाचे तत्त्वज्ञान

गीतेतील कर्मयोग या विषयाला धरून असलेले सर्व श्लोक या विषयांत अंतर्भूत करता येतील. अध्याय ४ मधील कर्म-अकर्म विचार ( १६ ते २३ ), अध्याय ५ मधील ब्रह्मार्पण वृत्तीचे कर्म ( १० ते १३ श्लोक ), अध्याय १८ मधील कर्मयोगाची वैचारिक भूमिका ( १८ ते २२ श्लोक ), अध्याय १८ मधील आदर्श कर्ता व कर्म यांचे वर्णन ( श्लोक २३ ते २८ ); त्याच अध्यायातील यशाचे घटक ( श्लोक १२ ते १७ ) हे सर्व परिच्छेद कर्मयोगाचे विवेचन करणारे आहेत. माणसाच्या हातून दुराचार का घडतो, त्याचे वर्णन अध्याय ३ मध्ये ( ३६ ते ४३ श्लोक ) आणि अध्याय १६ मध्ये ( श्लोक २१ ते २४ ) आहे. कर्मयोगाचे तत्त्वज्ञान सात्त्विक, राजस आणि तामस अशा भाषेत पुन्हा सांगून त्याचा प्रत्यक्ष व्यवहारात कसा उपयोग होतो, ते अध्याय १७ मध्ये १ ते २२ या श्लोकांत सांगितले आहे. याच विषयाला धरून अध्याय १८ मध्ये २९ ते ४० आणि अध्याय १७ मध्ये २३ ते २८ हे श्लोक आहेत. आपला व्यवसाय किंवा कोणतेही सामाजिक काम करताना समाजहितदृष्टी ठेवावी, समाजाची धारणा प्रत्येक व्यक्तीच्या कर्तव्यनिष्ठेवर अवलंबून आहे, हे तत्त्व मनावर बिंबवण्याकरता श्रीकृष्णाच्या स्वार्थनिरपेक्ष कर्मयोगाचा आदर्श वाचकांपुढे ठेवलेला आहे. तो भाग अध्याय ४ मध्ये ( श्लोक १ ते २६ ) आहे.

सर्वसामान्य लोकांकरता कर्मयोग म्हणजे ईश्वराला अर्पण केलेले कर्म अशा सोप्या भाषेत तेच तत्त्वज्ञान सांगितलेले आहे. त्याला धरून अध्याय तीन मधील ३० ते ३५ हे श्लोक, अध्याय ९ मधील २७ ते २८ हे श्लोक आणि अध्याय १८ मधील ४१ ते ४८ हे श्लोक अभ्यास करण्याला योग्य आहेत. अशा रीतीने गीतेतील कर्मयोगाचे तत्त्वज्ञान

निरनिराळ्या परिभाषेत १०० ते १२० श्लोकांत सांगितले आहे. ते सर्व मिळून एक विषय पूर्ण होईल.

## (४) मानवाचा स्वभाव व तो सुधारण्याचा मार्ग

मानसशास्त्राच्या विभागात मानवी प्रवृत्तींचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने आणि आपल्या स्वभावात योग्य असे परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. आधुनिक शिक्षणामध्ये वैयक्तिक भिन्नता ( Individual differences ) असा एक विषय आहे. त्याचाच विस्तार गीतेमध्ये निराळ्या भाषेत केलेला आहे. हे वर्णन दोन प्रकारचे आहे. मानवाच्या स्वभावात सात्त्विक, राजस आणि तामस असे तीन प्रकार आहेत. प्रत्येक स्वभावात प्रत्येक प्रसंगी या गुणांचे निरनिराळ्या प्रमाणात मिश्रण असते. त्याचा परिणाम माणसाच्या मनोवृत्तीवर व त्याच्या कृतीवर होतो. हे सर्व तत्त्वज्ञान अध्याय १४ मध्ये ५ ते २० या श्लोकांत दिलेले आहे. जरा निराळ्या भाषेत दैवी आणि आसुरी असे दोन प्रकार पाडून असेच वर्णन अध्याय १६ मध्ये १ ते २४ या श्लोकांत दिलेले आहे. जगात काही माणसे चांगली कां वागतात व काही वाईट का वागतात, याची चिकित्सा अध्याय १८ व १६ मध्ये केलेली आहे. मानवी स्वभावाकडे पाहण्याची ही भारतीय दृष्टी आणि हे भारतीय मानसशास्त्र प्रत्येक शिक्षकाला आणि विद्यार्थ्याला अवगत असणे अत्यंत आवश्यक आहे. स्वभाव वर्गीकरणाच्या दृष्टीने ते समावेशक व व्यावहारिक आहे. स्वभावाचे वर्णन देऊन काम भागत नाही, आपला स्वभाव इष्ट दिशेने सुधारावा कसा आणि नराचे नारायणात, मानवाचे ईश्वरात, दुष्ट माणसाचे सज्जनात, अनिष्ट वृत्तींचे इष्ट वृत्तीत परिवर्तन कसे घडवून आणावे, हा भागही अत्यंत महत्त्वाचा आहे. या भागाला गीतेने ध्यानयोग असे नाव दिलेले आहे. ध्यानयोग हा स्वभाव सुधारण्याचा स्वावलंबी असा राजमार्ग आहे. प्रत्येकाने स्वप्रयत्नाने आपापला स्वभाव सुधारला पाहिजे, त्याला बाहेरच्या मानसशास्त्रज्ञाची गरज पडू नये, अशी गीतेची योजना आहे (अध्याय ३ श्लोक ५–६ ). गीतेमध्ये हे ध्यानयोगश्लोक निरनिराळ्या अध्यायांतून विखुरले गेले आहेत. त्यांची संख्या ३० ते ४० इतकी होईल. अध्याय ६ मध्ये ५ ते २८ हे श्लोक ध्यानयोगाचे सविस्तर वर्णन करणारे आहेत. त्याशिवाय, अध्याय ५ ( २७ ते २८ ), अध्याय ८ ( ६ ते २८ ) हे व्यापक अर्थाने ध्यानयोगाला धरूनच आहेत. भारतीय तत्त्वज्ञानामध्ये मानवाचे अंतिम ध्येय मुक्ती किंवा ईश्वरप्राप्ती हे आहे. आजच्या भाषेत मुक्ती किंवा ईश्वरप्राप्ती म्हणजे जीवनाची पूर्ण विकसित अवस्था असा सांगता येईल; ही स्थिती प्राप्त होण्याकरता माणसाच्या मनाचा विकास झाला पाहिजे. त्याच्या मनातील सर्व अनिष्ट प्रवृत्ती नष्ट होऊन चांगल्या प्रवृत्ती व चांगल्या मनोवृत्तीचे संगोपन झाले पाहिजे, हा महत्त्वाचा हेतू आहे. या दृष्टीने ध्यानयोगाकडे पाहिले म्हणजे व्यक्तिविकासात त्याचे स्थान किती महत्त्वाचे आहे, ते आपल्या लक्षात येईल.

## (५) गीतेतील प्रकृतिप्रधान आणि ईश्वरप्रधान विचारसरणी

यापूर्वीच्या प्रकरणांतून गीतेतील नीतिशास्त्र आणि मानसशास्त्र हे विषय मुख्यतः आलेले आहेत. यांना पायाभूत असे जे तत्त्वज्ञान गीतेमध्ये आहे त्याचे दोन प्रकाराने वर्णन करता येईल. एक प्रकृतिप्रधान सांख्य तत्त्वज्ञान व दुसरे ईश्वरप्रधान वेदान्त तत्त्वज्ञान. हा भाग समजण्याला जरा अवघड आहे; परंतु तो सोपा करून सांगणे शक्य आहे. माणसाने विशिष्ट मनोवृत्ती का ठेवावी, जगाकडे विशिष्ट दृष्टिकोनांतून का पाहावे, विशिष्ट प्रकारचे आचरण का करावे, या सगळ्याचे उत्तर गीतेतील तत्त्वज्ञानात आहे. प्रकृतिप्रधान तत्त्वज्ञान हे निसर्गाच्या नियमांवर आधारलेले आहे. ईश्वरप्रधान तत्त्वज्ञान हे ईश्वराच्या इच्छेवर व त्याच्या सामर्थ्यावर अवलंबून ठेवलेले आहे. गीतेतील मूळ तत्त्वज्ञान प्रकृतिप्रधान असून, त्याचा वेदान्त तत्त्वज्ञानाशी समन्वय घातलेला आहे; पण ही दोन्ही तत्त्वज्ञाने आपापल्या पायावरही उभी राहू शकतात आणि त्यांचा समन्वयही होऊ शकतो. हा सर्व भाग अनेक अध्यायांतून विभागलेला आहे; पण ईश्वरी तत्त्वज्ञान मुख्यतः ७ ते १२ या अध्यायांत आहे आणि सांख्य तत्त्वज्ञान २ ते ६ अध्यायांत इतस्ततः विखुरलेले आणि १३ ते १८ या अध्यायांत एकत्र केलेले असे आढळून येते. या सर्व श्लोकांची संख्या ७० ते ८० इतकी होईल. हा भाग वरच्या इयत्तांना उपयोगी पडण्यासारखा आहे; परंतु सर्व शिक्षकांनी तो आत्मसात करणे आवश्यक आहे. गीतेतील भक्तिमार्ग हा ईश्वरप्रधान व वेदान्तप्रधान तत्त्वज्ञानावर आधारलेला आहे.

### अपेक्षित फलश्रुती

वर वर्णन केल्याप्रमाणे पाच प्रमुख अशा विभागांत गीतेची विभागणी करून तिचा समावेश शिक्षणाच्या अभ्यासक्रमात केला तर, शिक्षणातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना भारतीय विचारसरणी आणि जीवनाकडे पाहण्याची दृष्टी काय आहे ते समजेल. तो आत्मनिरीक्षण करू लागेल. आपल्या ठिकाणी कोणत्या मनोवृत्ती आणि प्रवृत्ती आहेत, त्यांतील इष्ट मनोवृत्तींचे संगोपन कसे करावे आणि अनिष्ट विकारांवर नियंत्रण कसे ठेवावे याची जाणीव त्यांच्या ठिकाणी निर्माण होईल. आपल्या स्वभावात, वर्तनात परिवर्तन घडवून आणण्याच्या प्रक्रियेला तो समर्थ होईल. शिक्षणाचे व संस्कारांचे हेच महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. आपल्या ज्ञानप्रधान अशा शिक्षणाला गीतेतील या शिक्षणाची जोड मिळेल तेव्हाच ते परिपूर्ण होईल आणि शिक्षणातून बाहेर पडलेला नागरिक हा खरा नागरीक होईल.

### आधुनिक ग्रंथाप्रमाणे मांडणी

१९१५–१६ सालापासून गेली ६०–६२ वर्षे श्रवण, वाचन, चिंतन, मनन, आचरण, लेखन, प्रवचन इत्यादी अनेक मार्गांनी भगवद्गीता माझ्या जीवनात आलेली आहे. सामाजिक अवनतीच्या आजच्या कालखंडात तिचा उपयोग कशा रीतीने करता

करता येईल या दृष्टीने विचार करून, गीतेवर संशोधन करून, गीतेच्या अभ्यासकांना उपयुक्त असे वाङ्मय मी निर्माण केलेले आहे. व्याख्याने व प्रवचने करता करता आणि वाचक व श्रोते यांच्या अडीअडचणी समजून घेताना माझ्या असे लक्षात आले की, गीतेतील संवादरूपी मिश्र रचना गीतेच्या सुसंगत आकलनाला अत्यंत प्रतिकूल आहे. कितीही व्याख्याने-प्रवचने ऐकली आणि कितीही विवरणे वाचली तरी पुन्हा गीता ग्रंथ वाचताना त्यातील विषयांचा परस्पर संबंध सहज आकलन होऊ शकत नाही. ही सर्व अडचण ध्यानात घेऊन गीतेतील सर्व श्लोकांची व अध्यायांची रचना विषयांच्या अनुरोधाने मांडून, आधुनिक ग्रंथाप्रमाणे तिची पुनर्रचना करून "**गीतेचा दृष्टिकोन : स्वभाव सुधारण्याचा मार्ग**" हा ग्रंथ मी माझ्या ८० व्या वाढदिवशी (१५ जून १९७८) प्रसिद्ध केला. या लेखात प्रत्येक विषयाला धरून जे श्लोक सुचवले आहेत ते माझ्या या पुस्तकात एकेका प्रकरणात एकत्र केलेले आढळून येतील. शिक्षकांना व शाळांना या पुस्तकाचा अत्यंत उपयोग होईल. महाराष्ट्रात व बाहेर शंभरपेक्षा अधिक गावी मी ४००–४५० व्याख्याने दिली व अनेक श्रोत्यांशी व वाचकांशी जी चर्चा केली तिच्यातून या ग्रंथाची निष्पत्ती झालेली आहे.

## प्रत्येक संस्थेला व व्यक्तीला शक्य

गीता विद्यार्थ्यांना आवडेल का, अशी शंका काहीजणांना येईल. माझ्या शाळेतील गेल्या २५ वर्षांतील अनुभवावरून मी सांगतो की शिक्षक, मुख्याध्यापक, पालक, या सर्वांच्यापेक्षा विद्यार्थ्यांनाच गीतेतील विचार त्यांच्या जीवनाला बहुमोल वाटतात.

संस्कृत गीता मुलांना समजणार नाही. तिचे पाठांतर केले तरीही मराठी अनुवाद वाचणे व पाठ करणे आवश्यक आहे. त्याकरता आचार्य विनोबांची 'गीताई' किंवा डॉ. खेर यांची 'सर्वबोध पद्यगीता' ही दोन पुस्तके अत्यंत उपयोगी पडतील.

प्रत्येक शिक्षकाला व मुख्याध्यापकाला गीतेचे तत्त्वज्ञान अवगत होणे जरूर आहे; पण त्याशिवाय प्रत्येक संस्थेत गीतेचा परिपूर्ण अभ्यास केलेले दोन-तीन शिक्षक असणे आवश्यक आहे. अशा अभ्यासाकरता लागणाऱ्या वाङ्मयाची माहिती शेवटी दिली आहे.

आज मुख्याध्यापक व प्राचार्य आपापल्या संस्थेतील शैक्षणिक कार्यक्रम ठरवू शकतात. प्रत्येक वर्गाला एकेक तास किंवा सर्व विद्यार्थ्यांना मिळून एक तास असा या विषयाला देता येईल. रोज ५–१० मिनिटांत एखादा विचार दिला तरी चालेल, पण विद्या खाते आदेश देईल आणि त्यानंतर आपण काही करू, अशी वाट पाहू नका. तुमच्या अधिकारात असेल ते सुरू करा. संस्थेचे वातावरण बदलल्याशिवाय राहणार नाही याची प्रचीती येईल.

## संदर्भ ग्रंथ

आचार्य विनोबा भावे– १. गीताई, २. गीता प्रवचने, ३. इतर गीता वाङ्मय.

डॉ. ग. श्री. खैर–१. सर्वबोध पद्यगीता. २. गीतेचा दृष्टिकोन : स्वभाव सुधारण्याचा मार्ग. ३. गीताविषयक इतर ग्रंथ.

## लेखकाचा परिचय

जन्म १५ जून १८९८. मधुकरी, वस्तु विक्री इ. मार्गाने शिक्षण. पुणे अनाथ विद्यार्थी गृहाचे निवृत्त आजीव सेवक व तेथील महाराष्ट्र विद्यालयाचे निवृत्त मुख्याध्यापक. अनेक शैक्षणिक समित्या, मंडळे, विद्यापीठे, चौकशी समित्या यांचे सभासद. अमेरिका, युरोप, जपान इ. भागांतील समाजाचे व शिक्षणाचे निरीक्षण व प्रवास. समाजशास्त्रविषयक ग्रंथ, शैक्षणिक ग्रंथ, मासिके, इ. चे लेखक व संपादक. १९१५ पासून गीतेशी परिचय. गीतेवर संशोधन, ग्रंथलेखन, व्याख्याने, प्रवचने इ. मार्गाने कार्य. मूळ गीतेचा शोध, मराठी गीता विवरण, गीताविकास, समतोल जीवनाचे दर्शन, पद्यगीता, गीतेचा दृष्टिकोण, क्वेस्ट फॉर दि ओरिजिनल गीता, शिक्षण शील संस्कार, सदाचार चिंतनी : भाग १ ते ४, विद्यार्थी व गीताई, गीतेतील मुख्य विचार, इ. ग्रंथ लेखन महाराष्ट्रात व बाहेर गीताप्रचारार्थ प्रवास, व्याख्याने व वाङ्मय प्रचार चालू.

□ □

# भारतीय शिक्षणपद्धतीचे लोकशाहीकरण

वि. मा. कुलकर्णी

भारतात आज जी शिक्षणपद्धती आहे तिची स्थापना गेल्या शतकाच्या पूर्वार्धात इंग्रज राज्यकर्त्यांकरवी झाली. प्रामुख्याने ब्रिटिश साम्राज्याचा गाडा ओढायला साह्यभूत होईल असा 'प्रजाजनां'चा साक्षर वर्ग तयार करणे हे त्या पद्धतीचे उद्दिष्ट होते. इंग्रजी आले व सांगितले, काम करण्याची सवय अंगी बाणली म्हणजे पुरे होते! पण ह्यातूनच पाश्चात्त्य संस्कृतीशी भारतीय अधिक परिचित झाले. काही शिक्षितांनी पाश्चात्त्य विद्याविभूषित होऊनही निराळाच मार्ग चोखाळला! ते स्वतंत्र प्रज्ञेने काम करू लागले. शिक्षण घेतले, पण शिक्षणपद्धतीची सरकारप्रणित उद्दिष्टे या मंडळींनी झुगारून दिली. ही मंडळी अपवाद स्वरूप आणि अल्पसंख्येची होती. त्यांच्याकडे तसे पाहणेच बरोबर. ही माणसे अशी निर्माण झाली म्हणून काही योजनेची उद्दिष्टे बदललेली नव्हती, नाहीत. त्या पद्धतीवर काळाच्या गरजांच्या दडपणानेही फारसा मूलभूत परिणाम झाला नाही. तेव्हा ह्या पद्धतीने बहुसंख्य आजचे भारतीय नागरिक फारसे निराळे घडवले नाहीत!

## मौलिकता व संदर्भ ह्यांचा अभाव

शिक्षणपद्धतीच्या मूळ उद्देशात बदल न झाल्याने पूर्वीप्रमाणेच शिक्षित निर्माण होत राहिले. स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या विकासाच्या बदललेल्या संदर्भातही ह्या शिक्षणपद्धतीत मूलगामी बदल झाले नाहीत. तिच्या अंगच्या गुणात्मकतेत जी वाढ झाली, तीही पाश्चिमात्य जीवनाच्या विविध शाखांत जी शास्त्रीय व तंत्रज्ञानीय वाढ झाली, तिच्या बव्हंशी अनुकरणाने! प्रारंभी ह्या शिक्षणपद्धतीला भारतीय संदर्भ नव्हता आणि तो तिला आजवरही कधी आवश्यक त्या प्रमाणात लाभला नाही. अणुशास्त्रज्ञ डॉ. सेठना ह्यांनी काही वर्षांपूर्वी कानपूर येथे केलेल्या एका दीक्षांत समारंभाच्या भाषणात भारतातील शिक्षणपद्धतीतील भारतीय संदर्भाच्या अभावाचा आवर्जून उल्लेख करून शिक्षणतज्ज्ञांचे लक्ष वेधले होते. आजच्या भारतातील शिक्षणपद्धतीला भारतातील काही वरिष्ठ सामाजिक थरातील मंडळींना लाभदायक ठरणारा व सोयिस्कर असा जागतिक संदर्भ आहे असे म्हणता येईल, पण भारताच्या सम्यक् विकासाला उपकारक, बहुसंख्य नागरिकांना हितकारक असा भारतीय संदर्भ नाही असे विधान करावेसे वाटते.

## इंग्रजप्रणित मख्ख शिक्षणपद्धती

भारतातील शिक्षणपद्धतींतील ही उणीव स्वातंत्र्यपूर्व काळातही काहींना जाणवत होती, खुपत होती. राष्ट्रीय शिक्षणाचे प्रयोग झाले. शिक्षणातील विषय व अध्यापनादर्श ह्यांद्वारा भारतीय समाजाच्या विकासाला व नागरिकत्वाला आवश्यक असे गुण जोपासले जावेत म्हणून यत्न झाले. आर्थिक व सामाजिक विकासाची ओढ लावणारी मनस्थिती व दृष्टी, प्रेरणा, सामर्थ्ये शिक्षितांत वाढीला लागावीत असेही वाटत राहिले. १९३९ च्या सुमारास गांधीजींनी शिक्षणाच्या पुनर्रचनेच्या प्रश्नाला हात घातला. मूलोद्योग शिक्षण पद्धती, जीवन शिक्षण ह्या अनुषंगाने काही विचार पुढे मांडले. काँग्रेस सरकारे सत्तेवर आली व जिथे जिथे सत्तेवर राहिली तिथे मूलोद्योग शिक्षण योजना राबवण्याचा सरकारी यत्न झाला, पण हा सारा प्रयत्न एक 'वेडगळपणा' आहे अशीच ह्या प्रयोगात गुरफटलेल्या बहुसंख्यांची धारणा होती. मुलांची काही जीवनवर्षे वाया घालवण्याचा पुष्कळांना तो उद्योग वाटला! त्यामागचे मुख्य सूत्र लोकांना व लोकनेत्यांना फार मोठ्या प्रमाणावर परिणामकारकपणे पटल्याचा प्रत्यय आला नाही. त्यामुळे यथाकाळ हा प्रयोग कोलमडला! त्याचे काही अवशेष इतस्ततः शैक्षणिक विचारात, कार्यपद्धतीत राहिले, पण एकूण हे सारे नगण्यच. इंग्रजप्रणित शिक्षणपद्धती चिवटपणे, मख्खपणे तशीच चालू राहिली. तिच्या भजनी-पूजनीं रमलेल्या संस्था हजारोंनी होत्या त्या लाखांनी झाल्या. त्यांनी दिलेल्या शिक्षणाने पुनीत झालेल्यांची संख्या कोटींच्या घरात गेली आणि ह्यातूनच शिक्षणाच्या प्रस्थापित पद्धतीत मूलगामी परिवर्तन करण्यास विरोध करणाऱ्या शक्ती निर्माण झाल्या. ह्याच शक्तींनी शिक्षणपद्धतीस आधुनिक असा भारतीय संदर्भ देण्यासही अडथळा निर्माण केला. स्वतंत्र भारतातील सर्व राष्ट्रपतींनी, मुख्यमंत्र्यांनी, शिक्षणमंत्र्यांनी, विद्या विशारदांनी सध्याच्या शिक्षणपद्धतीतील अमर्याद मर्यादांवर भाषणे केली आहेत; पण शिक्षणपद्धतीत मूलगामी परिवर्तन झाले नाही!

## आजची गरज : मूलगामी परिवर्तन

पशूचा वारसा घेऊन आलेला जीव शिक्षणाने माणूस व्हावा; त्याला समाजातील अन्य जीवांबरोबर विधायक, परस्पर आनंददायी संबंध जोडता यावेत; व नागरिक म्हणून समाजाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रांत आपली भूमिका परिणामकारकपणे निभावण्याची सतत वाढती क्षमता यावी, ह्यासाठी अनौपचारिक आणि औपचारिक शिक्षणाची आवश्यकता आहे. हे शिक्षण घरात, शाळेत व समाजात लाभायचे असते. घराचे व आमसमाजाचे हे शिक्षण देण्याचे सामर्थ्य फार कमी झाले आहे. कारणे अनेक आहेत क्वचित ती निरनिराळी आहेत. त्यांची यादी देऊन परिस्थितीचे समर्थन करण्यात किंवा तिची अपरिहार्यता दाखविण्यात फार वेळ गेलेला आहे. आज गरज आहे ती तातडीने शिक्षणपद्धतीत इष्ट ते मूलभूत परिवर्तन घडवून आणण्याची. ही

जबाबदारी औपचारिक शिक्षणाच्या क्षेत्रातील व्यावसायिक व राजकीय नेतृत्वावर येऊन पडली आहे. तिथेही धैर्याने, नेटाने हे कार्य पार पाडण्यासारख्या काही घटना घडण्याची शक्यता दिसत नाही. भर असायला हवा आहे तो वर उल्लेखलेली उद्दिष्टे बहुसंख्याक नागरिकांच्या हाती देईल अशी भारतीय संदर्भाची जाणीव ठेवून घडविलेल्या सार्वत्रिक व पायाभूत शिक्षणपद्धतीची. शिक्षणाचे हे अनन्य साधारण महत्त्व ओळखून राज्य-घटनेचा स्वीकार केल्यापासून १० वर्षांच्या आत १४ वर्षांआतील सर्व मुलांना सार्वत्रिक शिक्षण उपलब्ध व्हावे असे घटना समितीने ठरविले. मार्गदर्शक तत्त्वांची जी आबाळ झाली, जे महत्त्वाचे प्रश्न अडगळीत पडले त्यातला 'शिक्षण पद्धतीची पुनर्रचना' हा एक प्रश्न झाला.

## बेसुमार अपव्यय

शिक्षणाच्या संदर्भात, उद्दिष्टांत परिवर्तन व्हायला हवे होते ते झाले नाही. जुनी पद्धतीच चालू राहिली. पुनर्रचनेची जबाबदारी हिमतीने स्वीकारण्याऐवजी विद्यार्थ्यांची संख्या, शिक्षणासाठीचा प्रस्थापित वेतनमानानुरुपचा अवाढव्य संभाव्य खर्च ह्या गोष्टी पुढे आल्या! व्यवहार्य काय ते पाहा, असे सांगण्यात येऊ लागले. १४ वर्षांपर्यंतचे म्हणजे ६ ते १४ वर्षांतले शिक्षण असा श्लेष निघाला. एक ते सहा वर्षे वयोगटातील मुले योग्य काळजीतून लाभणाऱ्या शिक्षणाला जीवनाच्या महत्त्वाच्या काल-खंडात आचवली! शिक्षणपद्धतीची उपयुक्तता बहुसंख्यासाठी मर्यादित राहिली आणि थोड्या साधन-संपन्न वर्गातील मुलांसाठीच तिचा उपयोग होत राहिला! माध्यमिक, उच्च माध्यमिक, विश्वविद्यालयीन शिक्षणावर खर्च वाढला. प्राथमिक शिक्षणाला अग्रक्रम मिळाला नाही. सुमारे ६० टक्के भारतीय आजही निरक्षर आहेत. मोठ्या प्रमाणावर प्राथमिक शिक्षणासाठी विद्यार्थ्यांची नोंदणी होत असल्याचे सांगण्यात आले. शाळांची शिक्षकांची, संख्या वाढली. पण विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण भरमसाट झाले. १०० विद्यार्थी प्राथमिक शाळेत दाखल झाले तर ५ वी पर्यंत ६५ विद्यार्थी गळतात. आणखी १० टक्के आठवी पर्यंत गळतात. जेमतेम १०० विद्यार्थ्यांपैकी २५ जण ८ वी पर्यंत म्हणजे १४ वर्षांपर्यंत' तथाकथित शिक्षणपद्धतीच्या संपर्कात येतात! ह्या २५ टक्क्यांच्या शैक्षणिक दर्जाची, पात्रतेची चौकशी पुढे रेटल्यास वाया गेलेल्या साहित्याची, साधनांची जी कल्पना येते तिने शहाण्यांना अमाप खेद व्हावा!

## एकसंघ शिक्षणपद्धतीची वाट

शिक्षणाचा संदर्भ, उद्दिष्टे न बदलता सध्याच्या चौकटीत ही विद्यार्थ्यांची गळती कशी थांबवावी ह्यावर वर्षानुवर्षे चर्चा व संशोधन चालू आहे. हे सारे थांबवून नवी शैक्षणिक उद्दिष्टे निश्चित करण्याची, आधुनिक असा नवा संदर्भ शिक्षणाला देण्याची आणि त्यावर कणखरपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.

एक ते सहा वर्षांच्या मुलांना वगळून नव्हे तर १ ते १४ वर्षांच्या मुलांना समाजाचा उपयुक्त नागरिक होता येण्यासारखे भारतीय संदर्भाचे पायाभूत शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचे व्हायला हवे आहे. त्यासाठी आवश्यक तो खर्च कळ सोसून अग्रक्रमाने करायला हवा. त्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करायला हवे. देशातील सर्व सेवक वर्गाच्या वेतनश्रेणींची पुनर्रचना झाली तर शिक्षणाच्या क्षेत्रातील खर्चाला राष्ट्रीय खर्चात एक निराळे संतुलित स्थान प्राप्त होईल. माध्यमिक, उच्च माध्यमिक, विश्वविद्यालयीन शिक्षणासाठी करावयाच्या खर्चाला नवी व निराळी मर्यादा येईल आणि सर्व देशासाठी इष्ट उद्दिष्टांची, आधुनिक असूनही भारतीय संदर्भाची, अशी एकसंघ शिक्षणपद्धती, ह्या वाटेने जाताना तयार होईल.

## दुय्यम नागरिकत्वाला मान्यता ?

पण हा विचार मान्य करून शैक्षणिक पुनर्रचनेच्या कामाला लागण्याऐवजी थराथरांतून विखुरलेल्या भारतीय समाजाला एकजीव करील अशी शिक्षणपद्धती स्थापण्याऐवजी, समाजातील थराथरांगणिक सोयीची शिक्षणपद्धती अमलात येत आहेसे दिसते. शहरवासियांची शिक्षणपद्धती ग्रामीण भागास उपयुक्त नाही असे बोलले जाते. ह्या देशात श्रीमंतांचा व गरीबांचा असे दोन प्रमुख देश आहेत. त्यांच्यासाठी निरनिराळ्या शिक्षणपद्धती असाव्यात असा विचार डोकावतो आहे. शहरी, ग्रामीण, सधन, गरीब ह्यांच्यासाठी सारे अलग अलग असायला हवे आहे का ? पब्लिक स्कूल्स, इंग्रजी माध्यमाच्या शाळा, उत्कृष्ठ शाळा, खाजगी शाळा, जिल्हापरिषदांच्या व नगरपालिकांच्या शाळा ह्यांतील विविध थरांवरील शैक्षणिक दर्जाचे हीनक्षीण वितरण होत आहे. स्थानिक शाळा ( कम्युनिटी स्कूल ) ही कोठारी आयोगाने पुरस्कारिलेली कल्पना कुठेही, कुणीही उचलून धरलेली आढळत नाही ! पूर्वीही मूलोद्योग ग्रामीण भागात कदाचित ठीक असेलही असा सूर निघाला होताच. एकूण ग्रामीण भागासाठी निराळी आरोग्य सेवा, निराळी शिक्षण पद्धती, निराळी न्याय पद्धती, निराळी कायदा व सुव्यवस्था पद्धती, जीवनावश्यक गरजापूर्तीचा निराळा दर्जा, निराळी करमणूक असे सगळे निराळे निराळे होत राहणार आहे की काय, अशी शंका येते. देशाच्या एकात्मतेच्या दिशेने ही वाटचाल ठीक ठरणार नाही. ग्रामीण भागात राहणाऱ्या नागरिकांना दुय्यम नागरिकत्व अभिप्रेत आहे काय ?

## सर्व देशांसाठी पायाभूत शिक्षण

भारतीय नागरिक भारतात कुठेही राहो–शहरातल्या स्वच्छ वस्तीत वा गलिच्छ वस्तीत, ग्रामीण भागात वा, गिरिकुहरात–भारतीय समाजाला अधिक एकसंघ बनवणारे, नागरिकांना कार्यक्षम बनवणारे शिक्षण त्याला उपलब्ध झाले पाहिजे. शोषणरहित समाजाला पोषक असे शिक्षण नागरिकांना देणारी नवी शिक्षणव्यवस्था भारतात प्रस्थापित झाली पाहिजे. लोकशाही, समता, स्वातंत्र्य, समाजाचे आधुनिकीकरण ह्यासाठी नवी शिक्षण

व्यवस्था आवश्यक आहे. एकात्म भारताला आवश्यक अशी शैक्षणिक बैठक तयार झाली, कोणती मूल्ये जोपासायची हे नव्या संदर्भात निश्चित झाले म्हणजे स्थानिक, प्रादेशिक व राष्ट्रीय भौतिक विकासाला आवश्यक त्या ज्ञानाचे, कौशल्यांचे कलम त्यावर बांधावे. सर्व देशासाठी एक पायाभूत शिक्षणपद्धती असावी. ग्रामीण भागासाठी निराळी शिक्षणपद्धती देण्याचा विचार सोडून द्यायला पाहिजे.

## असे व्हावे

आज ग्रामीण भागातून शहरांकडे रीघ लागली आहे. शहरे समृद्धीची रोगट बेटे झाली आहेत. सध्याची शिक्षणपद्धती चालू राहिली तर ही रीघ वाढतच राहणार आहे. शहरे व ग्रामीण भाग ह्यातले अंतर वाढत जाईल. ह्यातून राष्ट्रहिताला विघातक परि-स्थिती निर्माण होईल. गावांपासून शहरांपर्यंत एक संतुलित सामाजिक-आरोग्यसंपन्न असे समाजजीवन उपलब्ध व्हायला हवे आहे. ह्या व्यवस्थेत कुणालाही आपल्या यत्नाने कुठवरही आडवे-उभे जाता यावे व जीवनसाफल्य अनुभवता यावे. शेती व उद्योग-प्रधान संस्कृतींचा सुखद समन्वय भारतीय समाजात निर्माण व्हावा. कुठेही-ग्रामीण व शहरी भागात–समाधानदायक जीवन जगण्यात आनंद व्हायला हवा.

## नवनिर्मिती इष्ट

शिक्षणाची उपेक्षा थांबवून त्याच्याकडे आस्थेने लक्ष द्यायला हवे. आधुनिक परिस्थितीवर नजर ठेवून शिक्षणपद्धतीचा भारतीय संदर्भ निश्चित करायला हवा. ग्रामीण व शहरी; सधन व गरीब ह्यांच्यासाठी भिन्नभिन्न शिक्षणपद्धती घडवण्याचा किंवा सध्याच्याच शिक्षण पद्धतीची डागडुजी करून निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या अंशाने जोर देऊन तीच वापरण्याचा प्रयत्नही सोडून दिला पाहिजे. पुष्कळदा एखादी पद्धती दुरुस्त करण्याच्या पलीकडे नादुरुस्त होते. अशा वेळी नवनिर्माण आवश्यक होते. शिक्षणशास्त्रज्ञ व अन्य प्रबुद्ध नागरिकांनी दूरदृष्टीने व द्रष्टेपणाने नवी पद्धती सुचवली पाहिजे. राजकीय नेत्यांनी धैर्याने, शिक्षणक्षेत्रातील कार्यकर्त्यांनी समाजाचे नव्या पद्धतीच्या स्वीकारासाठी, सुप्रबोधन करायला हवे. बदलातून येऊ शकणाऱ्या नव्या समाजजीवनातील आनंद, समाधान व नवी सामर्थ्ये ह्यांवर नजर केंद्रीत करून पालक, शिक्षक व विद्यार्थी यांनी अडचणी सोसून शिक्षण क्षेत्रात खऱ्या अर्थाने नवे युग निर्माण होण्यासाठी ह्या प्रयोगात सहभागी झाले पाहिजे. भारतातील शिक्षण व्यवस्था, पद्धती आणि शिक्षणोद्देश सर्वांच्या कल्याणासाठी असावेत, काही मर्यादित नागरिक संख्येसाठी नसावेत. सत्ता व संपत्ती जशी मूठभर लोकांच्या हातांत असणे समाजाच्या, म्हणजेच सर्वांच्या, हिताला अपायकारक होते त्याचप्रमाणे शिक्षणपद्धतीने काही मूठभर लोकांनाच संधी देणे समाजकल्याणास अनिष्ट होय.

□ □

# दास्यमुक्तीसाठी शिक्षण

## वासू देशपांडे

काही कष्ट करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती मी काही दिवसांपूर्वी आकाशवाणी-साठी घेतल्या. एका विद्यार्थ्याशी बोलताना सहजपणे त्याच्या आर्थिक स्थितीचीपण चौकशी केली, तेव्हा लक्षात आले की त्या विद्यार्थ्यासारखे अनेक विद्यार्थी किती कष्टाने शिकत असतात ! ज्या वयात मुलांनी भरपूर खेळावे, उंडगावे, सामने पाहावेत, सहलीला जावे व मनसोक्त वाचावे त्या वयात अवेळी प्रौढ होऊन मुले जीवन कलहाला सामोरी जातात आणि आपल्या दुबळ्या हाताने संसार शकट ओढतात, हे पाहून मन चकित होते. आणि तितकेच खिन्नही होते. ही मुले शिकतात हेच खूप आश्वासक वाटते.

त्या विद्यार्थ्याच्या घरी नऊ मंडळी आहेत. वडील हयात नाहीत. दहावीत शिकतो हा विद्यार्थी. सकाळी दुधाच्या बाटल्या पोचत्या करतो. सायंकाळी तीन तास वाचनालयात काम करतो, मग अभ्यास केव्हा ? वेळ मिळेल तेव्हा. इतके अपार कष्ट करून मिळतात केवळ ६५ रुपड्या ! त्याने आपल्या परीक्षेची फी भरण्यासाठी रु. ४० कर्जाऊ घेतले आहेत. व्याज आहे एका रुपयाला १२ पैसे. वर्षाला नव्हे, प्रत्येक महिन्याला ! म्हणजे या मुलाला प्रत्येक महिन्याला केवळ व्याज म्हणून रु. ४-८० भरावे लागतात. म्हणजे ४० रुपयाला एका वर्षाला रु. ५७–६० व्याज ! त्याशिवाय मुद्दल वेगळे फेडावयाचे ! या १८ वर्षांच्या मुलाची जिद्द आहे की मी कॉमर्सला जाईन, आणि या माझ्या घराला वर आणीन !

ही मुले शिकतात, पण किती विपरीत अवस्थेत ! कोणतीही सोय नाही, नुसते कष्ट उपसावयाचे ! ओठ पिळले तर दूध यावे या वयात मुले करपली तर जाणार नाहीत, अशी अभद्र शंका आल्याशिवाय राहत नाही.

संस्कृतमध्ये एक सुप्रसिद्ध वचन आहेः सा विद्या या विमुक्तये। विद्या माणसाला मुक्त करते. पूर्वी मुक्ततेचा अर्थ संसाराच्या फेऱ्यातून जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त, असा घेतला जात असे. सर्व कृती जीवनमुक्ततेसाठीच असे. स्वर्गप्राप्ती व्हावी, चौऱ्याऐंशी योनीतून जावे लागते ते जावे लागू नये म्हणून मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्न केले जात. सारे शिक्षण याचसाठी तेव्हा दिले जात असे. काव्य व अन्य लेखन या मुक्तीचे स्तोत्र गाण्यासाठीच असे. पण आज जीवनाचा संदर्भच बदलला आहे. मोक्षप्राप्ती होवो न

होवो, हे जीवन आपण जे जगतो ते निदान किमान सुसह्य होणे आवश्यक आहे. यासाठी सारी शैक्षणिक धडपड चालू असते.

या नव्या संदर्भात ‘ सा विद्या या विमुक्तये ’चा अधिक वेगळा अर्थ घेता येतो. विद्या माणसाला मुक्त करते. दैन्य, दारिद्र्य, अवहेलना या दुःखातून विद्या मुक्त करते काय? असा प्रश्न स्वाभाविकच उभा राहतो. इंग्रजी सत्ता भारतात स्थिर झाल्यानंतर सर्व सुधारकांनी शिक्षणाचीच कास धरली. हे वाघिणीचे दूध घ्यावयाचा आग्रह धरला. समाजाच्या अपमानीत वर्गाला सुद्धा शिक्षणाचाच आग्रह धरावा लागला. महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या आसुडातून शिक्षणाचाच पाठपुरावा केला. डॉ. आंबेडकरांसारख्या तत्त्वचिंतकाला विद्या मोक्षदायिनी आहे असा अनुभव आला. महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी स्त्री शिक्षणाचाच पुरस्कार केला. यापाठीमागे या सर्वांचीच ही दृष्टी होती की विद्येने माणसाला आपल्या पायांवर उभे राहवयास शिकवता येते. या विश्वासाच्या आधारावरच सर्व समाज सुधारकांचे कार्य उभे होते.

विद्येच्या प्राप्तीने धनाचे भांडार प्राप्त करता येते, त्यांच्याबद्दल न लिहिणे बरे. याचे प्रमुख कारण असे की ज्यांच्या घरात गेली शेकडो वर्षे या ना त्या स्वरूपात शिक्षण आहे, त्यांची दृष्टी अधिक ऐश्वर्य प्राप्त व्हावे, अधिक सुखसाधने प्राप्त व्हावीत अशी असते. परंतु ज्यांच्या घरी कधीच विद्या नव्हती, ‘ कालाअक्षर भैंस बराबर ’ अशी ज्यांची अवस्था होती त्यांच्या शिक्षणाची चिंता ही लोकशाहीची खरी चिंता होय. ज्यांना शिक्षण नाकारले गेले त्यांची शिक्षणाची सोय हाच खरा प्रश्न आहे. कर्दमात, चिखलात जे रुतलेले आहेत त्यांच्या मुक्तीचा हा खरा प्रश्न आहे.

अशिक्षित समाजात अज्ञान केवळ शिक्षणापुरते मर्यादित असत नाही तर जीवनातील प्रत्येक क्षेत्रात ते अज्ञान असते, इतकेच नव्हे तर साऱ्या जीवनाला ते व्यापून राहते. अंधश्रद्धा रूढी, परंपरा या जीवाला केवळ कोंडून टाकणाऱ्या नसून त्या शिक्षण विरोधीही आहेत.

शिक्षणाने मुक्ती याचा अर्थ या सर्वांगीण मुक्ती असा आहे. मागासलेपण केवळ आर्थिक स्वरूपाचे नसून ते सामाजिकही असते. म्हणजेच सांस्कृतिकही असते. सांस्कृतिक विषमता ही अन्य विषमतेइतकीच भयानक व तापदायक असते. जीवन असह्य व्हावयास ती कारणीभूत होते. याला शिक्षण हा एक पर्याय आहे. महात्मा फुले यांना तीव्रतेने ते जाणवले होते. म्हणून शिक्षणाचा ते अतिशय आग्रह धरीत. मनाची कवाडे उघडल्याशिवाय सत्याचे शोधनच होऊ शकत नाही, याची जाणीव त्यांना होती. म्हणून आपल्या पत्नी सावित्रीबाई यांना शिकवून, स्त्रियांना शिकवण्यासाठी त्यांना प्रवृत्त केले. त्याच्या मागे हीच भूमिका होती.

माझ्या शाळेत पहिल्या इयत्तेत शिकणारा एक विद्यार्थी, ६–७ वर्षांचा असेल तो, एक दिवस दारू पिऊनच शाळेत आला होता! शिक्षकांनी तक्रार केली. मी त्याच्या

वडलांना बोलावून घेतले. त्यांनी मला सरळपणे सांगितले, " मी घेतली आणि मुलाला थाईच थोडी दिली " त्या मुलाची आई तर अती व्यथित होती. तिच्या डोळ्यांतून अश्रू, वेदना ओघळत होत्या पण तोंडात आग होती. निखारा होता. तिने आपल्या नवऱ्याची अभद्र शब्दांत हजेरी घेतली. शेलक्या शब्दात त्याचा उद्धार केला. ती महा कष्टाने मुलाला शिकवीत होती आणि हा त्याला दारू प्यायला शिकवीत होता! त्याचा फायदा घेऊन मुलाच्या बापाला समजावले, त्याने शपथ घेऊन पुन्हा मुलाला दारू पाजणार नाही असे सांगितले. तेव्हा त्या माऊलीच्या डोळ्यांतील आनंदही मी पाहिला. त्या आईला मी सांगितले, " बाई हा नवरा पिणारच, पण वाटेल ते करून तुमचे हे पिलू पिणार नाही हे पाहा! "

माझे एक स्नेही एका शहरी शाळेचे मुख्याध्यापक आहेत. त्यांनाही असा विलक्षण अनुभव आला आहे. दहावीपर्यंत अतिशय नियमित असणारी एक विद्यार्थिनी अकरावीत अनियमित येऊ लागली. वर्गात पेंगू लागली, अभ्यासातही नियमितपणा राहिला नाही. म्हणून माझ्या मुख्याध्यापक मित्राने त्या मुलीला बोलावून घेतले आणि चौकशी सुरू केली. तेव्हा त्या मुलीने विदारक सत्य सांगितले, " सातवीपर्यंत मी वयात आले नव्हते, तरी १२ वाजेपर्यंत व्यवसाय करावा लागे. आता मी वयात आले आहे. म्हणून दररोज दोन तीन वाजेपर्यंत शरीर विक्रयाचा व्यवसाय मला करावा लागतो! पण मला एस्. एस्. सी. व्हावयाचे आहे. मी वेश्येची मुलगी आहे. या घाणीतून मला मुक्त व्हावयाचे आहे. मला नर्स व्हावयाचे आहे. " विद्या विमुक्त करते ती अशा मंडळींना. नरकातून ती सोडवू शकेल अशी त्यांची श्रद्धा असते. शिक्षणाशी संबंधित मंडळींनी त्यांच्या या श्रद्धेचे जतन केले पाहिजे.

अगदी वार्षिक परीक्षेच्या वेळीही असाच अनुभव अनेक वेळा येतो. नवव्या इयत्तेत शिकणारी एक मुलगी सकाळी परीक्षेला आली नाही. ती का आली नाही, म्हणून त्या मुलीच्या घरी सेवकाला पाठवण्यात आले. तेव्हा ती मुलगी व तिची आई घराबाहेर बसलेल्या होत्या. चौकशी केली तेव्हा त्या मुलीच्या बापाने त्यांना बाहेर बसवून ठेवले होते. कारण एकच त्यांनी त्याला दारू पिण्याला विरोध केला होता. म्हणून मुलीला, तिच्या आईला झोडपून काढून त्याने घराबाहेर घालवले होते. त्या सेवकाने दरवाजावर लाथा मारून दरवाजा उघडावयास लावला. मग ती मुलगी एकदाची कपडे बदलून शाळेत परीक्षेला आली!

अशा विपरीत अवस्थेत मुले-मुली शिकतात. त्यांना आशा असते आपण शिकू, घराला वर आणू. सारी धडपड त्यासाठीच चालू असते, जीवन संघर्षाची तीव्रता त्यांनाच सर्वात जास्त जाणवते, अगदी अवेळी जाणवते. जीवनातील आनंद त्यांना फारसा उपभोगता येत नाही. पण उद्याच्या पिढीला तो उपभोगता येईल, त्यांना खेळता येईल, बागडता येईल, या विश्वासाने ही कष्ट करत, झगडत शिकत असतात.

मुले शिकावीत, दारिद्र्यातून, घाणीतून, अवहेलनेतून, भयानक कष्टातून थोडे तरी मुक्त व्हावे असे अनेक माऊलींना वाटत असते, एक वेळचे जेवण मिळते, ते दोन वेळचे मिळावे, एवढी माफक अपेक्षा त्यांची असते. उपाशीतापाशी येणारी शाळेतील ही मुले पाहून आतडे तुटते. त्या मुलांना आपण शिकवतो, विद्या देतो, ती विद्या त्यांना मुक्त करण्यासाठीच हवी असते.

'दास्य मुक्तीसाठी विद्या' याचा जुना अर्थ मोक्षप्राप्तीचा असेल, पण आज मृत्यूनंतरच्या मुक्तीपेक्षा या ऐहिक जीवनात सुसह्यपणे जगता येणार की नाही, हाच यक्ष प्रश्न आहे. पारमार्थिक जीवनाचे आकर्षण सर्व सामान्य जनतेला असू शकतच नाही. महात्मा गांधी नेहमी म्हणावयाचे, भुकेलेल्याला दोन घास अन्न देणे हे सर्वात मोठे संस्कृतिक कार्य आहे." भुकेलेल्या माणसाला संस्कृती, आध्यात्मिक ज्ञान आदी न पेलणाऱ्या बाबी आहेत. त्याच्या जीवन कलहात त्याला मदत हवी असते. आश्वासन हवे असते आणि सर्वात अधिक सहानुभूती हवी असते. शिक्षणातून असे आश्वासन, मदत, सहानुभूती मुलांना मिळावयासच हवी. आणि शिक्षणही त्याला या सर्व दुःखांतून मुक्त होण्यासाठीच हवे असते. हा नवा संदर्भच 'सा विद्या या विमुक्तये' यातून व्यक्त झाला पाहिजे.

□ □

# बालांच्या आनंद-प्रवृत्ती

## राजा मंगळवेढेकर

मुलांना गोष्ट सांगायला मी जेव्हा जातो तेव्हा त्यांच्याशी हृदय-संवाद साधण्याचा प्रयत्न करतो. हा संवाद मी गप्पांच्या मार्फत साधीत असतो. अशा संवादाशिवाय किंवा गप्पांशिवाय 'मुलांची गोष्ट' ही गोष्ट सिद्ध होत नसते. गोष्ट ही तर मुलांची आवडतीच गोष्ट असते. तरीदेखील या गप्पांच्या ओघात मी त्यांना, "गोष्ट आवडते ना रे?" असे विचारतो आणि गोष्ट ऐकण्यासाठी उत्सुक होऊन समोर बसलेली मुले एकदम एका आवाजात "होऽऽ" म्हणून सांगतात. हाच त्यांच्या आवडीचा धागा धरून मी पुढे जातो आणि त्यांना विचारतो, "गोष्ट तुम्हाला आवडते हे कळलं, पण गोष्टी-प्रमाणेच तुम्हाला आणखी काय काय आवडतं सांगा बरं!"

त्याबरोबर कुणी सांगतो, 'गाणं,' कुणी म्हणतो, 'नाटक,' कुणी सांगतो, 'नाच,' कुणी म्हणतो, 'चित्र'...यातून माझ्या असं लक्षात येतं की, मुलांना आवडणाऱ्या गोष्टी म्हणजे गाणी, गोष्टी, खेळ, नृत्य, संगीत, नाट्य, चित्र, छंद...या आहेत. ह्या प्रिय गोष्टींसाठी ती उत्सुकलेली असतात. पण त्यांची ही उत्सुकता किंवा भूक आपण मोठी माणसं कितीशा प्रमाणात भागवीत असतो, अथवा भागविण्याचा प्रयत्न करतो? असा प्रश्न जर आपण आपल्यालाच विचारला, तर त्याचे समाधानकारक उत्तर आपणा बहुतेकांना देता येणार नाही. याचे एक कारण, साधनांचा अभाव हे जरी असले, तरी खरेखुरे कारण म्हणजे 'मूल' हे त्याच्या वास्तविक अर्थाने आपल्याला कळलेलेच नसते. आपल्यातला प्रौढ अहंकार हे मानण्यास सहजासहजी तयार होणार नाही, परंतु ही वस्तुस्थिती आहे. आपण त्यांच्याकडे 'मूल' म्हणून पाहण्याऐवजी एक न कळते अज्ञानी 'पोर' म्हणूनच पाहातो. आणि त्यांच्या प्रत्येक क्रियेला 'पोरकट' ठरवीत असतो. परंतु मुलांना त्यांचे स्वतःचे असे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते, हे आपण कधी लक्षातच घेत नाही. किंवा आपणाला अशा त्यांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची जाणही अजून पुरेशी झालेली नाही. घरातील एखाद्या मूल्यवान वस्तूची जेवढी काळजी आपण घेतो आणि जेवढी प्रतिष्ठा ठेवतो, तेवढी काळजी आणि प्रतिष्ठा घरातल्या मुलांचीही आपण ठेवीत नसतो. याचे कारण वस्तूचे मूल्य आपल्याला ठाऊक असते, आपण ते मोजलेले असते, पण मुलांचे असे मूल्य करण्याचा प्रसंग कधी आपल्यावर

आलेला नसतो. म्हणून बाजारातल्या वस्तूला आपल्या घरात जेवढी प्रतिष्ठा असते, तेवढी घरातल्या मुलांना नसते.

पालक म्हणून आपण आपल्या मुलांची जी काळजी वाहातो ती त्याच्या शरीराची. मुलांच्या शरीराची, त्यांच्या भरण पोषणाची व्यवस्था करणे, हे आवश्यकच आहे. त्यांची तहान-भूकेची मागणी पुरविणे हे महत्त्वाचे आहेच, परंतु या शारीरिक मागणीच्या पलीकडे त्यांची अशी काही ' मानसिक मागणी ' देखील असते, याकडे मात्र आपण लक्ष देत नाही. मुलांना आपण केवळ एक ' शरीरधारी ' व्यक्ती म्हणूनच ओळखतो आणि त्याच्या खाण्यापिण्याची, कपड्यालत्त्याची वा औषधपाण्याची व्यवस्था करीत असतो. पण हे पुरेसे नसून मुलांच्या मानसिक व्यक्तित्वाची दखल घेऊन त्याच्या मानसिक गरजाही पुरविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. मुलाचे आरोग्य त्याच्या शरीरा-इतकेच त्याच्या मनावरही अवलंबून असते. इतकेच नव्हे तर शारीरिक अस्वास्थ्याहून मानसिक अस्वास्थ्य हे अधिक त्रासदायक असते. मुलांचे मानसिक अस्वास्थ्य तर त्यांचे निर्मळ, सुंदर, निरागस, फुलते-उमलते असे मूलपणच हिरावून घेत असते. म्हणून मुलांना ' मूल ' म्हणून घरात प्रतिष्ठित करण्याची नितान्त आवश्यकता आहे. मूल हे पालकांच्या हातातील खेळणे बनता उपयोगी नाही. पुष्कळसे पालक तसे समजतात आणि तथाकथित प्रेमाने व लाडाने तसे संबोधतातही, वागवितातही. खेळण्यातल्या राजा-राणीला, बाहुला-बाहुलीला तेवढीच किंमत असते आणि अधिकार तर काहीच नसतात. सर्व अधिकार पालकांच्या हातीच केंद्रित झालेले असतात. त्याचे खाणे-पिणे, कपडेलत्ते, नटणे-सजवणे, खेळणे-बागडणे, बोलणे-चालणे इत्यादी सर्व पालकांच्या इच्छे-नुसारच चाललेले असते. याला ते मुलांविषयीचे प्रेम समजतात, परंतु मुलांचे व्यक्तित्व हिरावून घेणारे हे बालकप्रेम नसून प्रेमाचे फक्त प्रदर्शन असते.

मुलांना आपल्या गरजा आपणच भागवाव्यात अशी एक अनिवार अंतःप्रेरणा असते, हौस असते. अशा स्व-क्रियेमधूनच ( Self Activities ) मुलांचा मानसिक विकास होत असतो. यातूनच मुलांचे मन निरोगी आणि सुदृढ बनत असते. म्हणून शारीरिक विकासाबरोबरच मानसिक विकासाचीही काळजी वाहिली पाहिजे. शरीर आणि मन यांचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. दोन्हींचाही तेवढाच आदर राखला गेला पाहिजे.

मुलांचे मन निरोगी, सुदृढ राखून त्यांचे व्यक्तिमत्त्व संपन्न करण्यासाठी त्यांच्या आवडीनिवडीकडे लक्ष पुरविले पाहिजे. आपले प्रौढ आदर्श, प्रतिष्ठितपणाच्या किंवा नीतिमत्तेच्या कल्पना, त्यांच्यावर लादता कामा नयेत. आपल्या आदर्श-पूर्तीचे एक साधन म्हणून आपल्या मुलांकडे पाहाता कामा नये, किंवा त्यांना तसे वापरून चालणार नाही. म्हणून शिक्षण, संस्कार, धर्म, नीती या संदर्भातील आपले जुनाट विचारही बदलत्या कालमानानुसार आपल्याला बदलून घेतले पाहिजेत. वस्तुतः मुलांना शिकवू पाहाणाऱ्यांनी आधी स्वतःला ' मुलांचा विद्यार्थी ' म्हणवून घेतले पाहिजे. असे मुलांचे विद्यार्थीपण स्वीकारले, तरच मुलांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची दखल घेता येईल.

'फाऊस्ट' या आपल्या काव्यात एके ठिकाणी महाकवी गटे यांनी असे म्हटले आहे की,

**तुम्हाला वाटते की तुम्ही नेतृत्व करीत आहात,**
**पण तुम्ही असता केवळ अनुयायी !**

मुलांचे अनुयायित्व पत्करून त्यांच्या विकासाचा विचार केला तर शिक्षण ही एक आनंद-प्रक्रिया बनेल. विनोबांनीदेखील 'लहानांनी मोठे होणे व मोठ्यांनी लहान होणे म्हणजेच शिक्षण.' अशी शिक्षणाची सहजसुंदर व्याख्या करून 'शिक्षकाचा चेहरा बदलला म्हणजे शिक्षणाचाही चेहरा बदलेल' अशी शिक्षणाच्या प्रक्रियेतली अत्यंत मर्माची गोष्ट अत्यंत सुलभ भाषेत सांगून टाकलेली आहे.

शिक्षणाचाही विचार आपण अन्य गोष्टींप्रमाणेच फारच साचेबंद स्वरुपात करीत असतो. लिहिणे, वाचणे, पाठ करणे आणि परीक्षा देऊन पदवी मिळविणे यालाच आपण शिक्षण असे म्हणतो आणि याचदृष्टीने मुलांच्या शिक्षणाची काळजी वाहातो व व्यवस्थाही करतो. परंतु शिक्षणाचे खरे स्वरूप एवढेच नसून ते याहूनही कितीतरी व्यापक, विशाल आणि सुंदर आहे. ज्याला आपण शिक्षण म्हणतो ते वस्तुतः लहानपणी आपल्यालाही कधी मनःपूर्वक रुचलेले नसते आणि मुलांनाही ते आवडत नसते. पण मोठ्यांनी केवळ लादल्यामुळेच ते हे शिक्षण शिकत असतात. लादलेल्या कुठल्याच गोष्टीत जशी गोडी नसते, आनंद नसतो तशी गोडी व आनंद या शिकण्यातही नसतो. मग मुलांना कशात गोडी वाटते व कशात आनंद वाटतो ? तर सुरुवातीला सांगितल्या-प्रमाणे आमच्या गप्पाटप्पांमधून मुलांनीच ते सांगून टाकलेले असते.

गाणे, गोष्ट, खेळ, नृत्य, संगीत, नाट्य, चित्र, छंद...ह्या गोष्टी मुलांना अगदी उपजतपणेच आवडत असतात. प्रिय असतात. इतक्या प्रिय असतात की त्यांच्यापुढे ती आपली तहान-भूकदेखील विसरून जातात. आनंदात रममाण झालेली असतात. यातली प्रत्येक प्रवृत्ती ही मुलांच्या दृष्टीने आनंददायिनी असल्यामुळेच मी त्यांना 'बालांच्या आनंदप्रवृत्ती' असेच म्हणतो.

यातल्या एकाही प्रवृत्तीसाठी मुलाला 'अमूक कर' म्हणून त्याच्या पाठीशी लागावे लागत नाही की, त्याच्यावर ती शालेय शिक्षणाप्रमाणे लादावीही लागत नाही. मूल अगदी बाळ असते तेव्हापासूनच खुळखुळ्यातल्या नादाने किंवा 'अडगुळं मडगुळं सोन्याचं कडगुळं' सारख्या बाल गीतातल्या तालाने त्याचे कान टवकारले जातात. 'एक होती चिऊ, एक होता काऊ' हे शब्द कानी पडताच चिऊ-काऊची पुढची गोष्ट ऐकायला ते अधीर बनते, बालपणी चिमुकल्या हाती आलेल्या रंगीबेरंगी खेळण्यापासून ते पुढे मैदानावर जाऊन विविध तऱ्हेचे खेळ खेळण्यात त्याच्यामधली क्रिडाप्रवृत्ती विकास पावत असते. आजीने 'एक पाय नाचिवरे गोविंदा, घागरियाच्या छंदा' असे लहानग्या बाळाला उभे धरून म्हणताच ते बाळ पदन्यासाप्रमाणे पावलेही हलवायला लागते. म्हणजे नृत्याची प्रेरणा त्याच्यात दिसते. दोन-अडीच वर्षांचे मूल 'आजी कसे

खोकते ', ' आजोबा कसे चालतात ', याची नक्कल करून दाखवते. या नकलेतूनच अभिनयाकडची वाट जात असते. याचाच अर्थ असा की, नाट्याभिनयाची प्रेरणा किंवा आवड इतक्या बालवयातच मुलांमध्ये असते. आणखी थोडी मोठी मुले चोरशिपाई, गिऱ्हाईक आणि दुकानंदार, शिक्षक आणि मुले, असे खेळ मांडून त्या त्या भूमिका तन्मयतेने वठवीत असतात. त्यांचे हे चिमुकले खेळ म्हणजे एक चिमुकले नाटकच असते. मुलांना छंद तर नानाप्रकारचे असतात. रंगीबेरंगी काचांचे तुकडे, लोलक, मणी, खडू, पेन्सिली, मोराचे पीस, इत्यादी वस्तूंनी त्यांचा खजिना भरलेला असतो. एखादा खडू किंवा पेन्सिल हाती पडताच कागदावर किंवा पाटीवर त्यांचे चित्रांकन सुरू होते. ते पाहून आपण प्रौढ म्हणतो की, ' काय या रेघोट्या ! ' ' कसली ही गिचमीड ! ' परंतु त्या मुलाच्या दृष्टीने त्या रेघोट्या नसतात किंवा गिचमीडही नसते; तर त्यांना भावलेला चंद्र, दिसलेली चिमणी किंवा झाड असे काही तरी रेखण्याची त्यांची ती धडपड असते. त्यांची ही सर्जनशील धडपड तेवढ्याच सहृदयतेने व सहजतेने मूल होऊन जाणून घेता आली पाहिजे.

थोडे कळू लागताच मुलांना स्वतःला अभिव्यक्त करावे, असे वाटू लागते. आणि स्वतःला अभिव्यक्त करण्यासाठी, प्रकट करण्यासाठी, संधीची व माध्यमांची त्यांना आवश्यकता असते. वर उल्लेखिलेल्या सर्व आनंदप्रवृत्ती त्यांना स्वतःच्या अभिव्यक्ती-साठी ( To expose ourself ) माध्यम म्हणून उपयोगी पडत असतात. आणि या माध्यमांमधून स्वतःला अभिव्यक्त करण्यासाठी ती धडपडत असतात. तसे पाहिले तर सर्व ललितकलांचा जन्मही माणसाच्या स्वतःला अभिव्यक्त करण्याच्या गरजेतूनच झालेला आहे. ही सांस्कृतिक भूक किंवा गरज आणि तिच्या परिपूर्तीसाठी धडपड, हे माणसाचे माणूस म्हणून वैशिष्ट्य आहे. संस्कार किंवा संस्कृती ही एक मूलवर्धक प्रक्रिया आहे. सांस्कृतिक भूक ललितकलांच्या द्वारा भागवितानाच माणसामधील कल्पकता, सर्जन-शीलता पल्लवीत होते आणि आणखी नवनिर्मिती होत जाते. निर्मितीची किंवा कोणत्याही नवसर्जनाची प्रक्रिया ही मूलतः आनंददायिनीच आहे. म्हणूनच बालकांनादेखील या प्रवृत्ती आनंदाचा ठेवा उपलब्ध करून देत असतात. मुलांना प्रत्येक कृती ही खेळासारखी ( Play activity ) क्रिडानंदांनी ओतप्रोत वाटली पाहिजे. अशा कृतींमधूनच त्याच्या संवेदना तरल-जागृत बनतात आणि ती उदंड आनंदाचा आस्वाद घेऊ शकतात. म्हणून मुलांच्या ठायीच्या या आनंदप्रवृत्तींना जेवढा वाव देता येईल तेवढा दिला पाहिजे. त्यासाठी त्यांना तशी संधीही उपलब्ध करून दिली पाहिजे. त्यांच्या या आनंद–आस्वादनाच्या कार्यात आपल्या कसल्याही अडचणी अथवा अडथळे येणार नाहीत, याची दक्षता घेतली पाहिजे.

या अडचणींचे स्वरूप केवळ आर्थिकच असते असे नाही, तर आपल्या काही कल्पना व संस्कारही अडथळारूप ठरू शकतात. मूल जसे जगात येते आणि असते तसेच आपण त्याला वाढू देत नाही. त्याच्या भोवती रक्षणाच्या नावाखाली भयाची, प्रतिष्ठेच्या

नावाखाली संस्काराची, समाज व्यवस्थेच्या नावाखाली नीतीची, आणि शहाणपणाच्या नावाखाली शिक्षणाची...अशा विविध तऱ्हेच्या भिंतीच भिंती आपण त्याच्याभोवती उभ्या करीत जातो. या निर्बंधामुळे आपल्या स्वभाविक अशा स्वभावानुसार मुलांना वाढता येत नाही आणि मग एकप्रकारचे कृत्रिम असे व्यक्तिमत्त्व त्यांना लाभते. मुलांचे 'मूलपण' गुदमरून जाते. हे टाळावयाचे असेल आणि खऱ्याखुऱ्या अर्थाने मुलांचे व्यक्तिमत्त्व समृद्ध व्हावे असे वाटत असेल, तर समृद्धिच्या सर्व वाटा त्यांच्यासाठी मुक्त असायला हव्यात. आपल्या भोवतालचे विश्व त्यांना एक प्रकारचे 'मुक्तद्वार' असे 'मुक्तांगण' वाटले पाहिजे.

महर्षी टॉलस्टॉय यांनी खेडयातील मुलांसाठी अशा 'मुक्तद्वार' शाळेचा प्रयोग केला होता. या प्रयोगात ते गढले असताना त्यांनी आपल्या मित्राला लिहिलेल्या एका पत्रात म्हटले आहे की, "सध्या मी एका अशा सुंदर नि काव्यमय विश्वात रमून गेलो आहे की, त्यातून स्वतःला बाजूला करणे अशक्यच आहे. ते सुंदर विश्व म्हणजे माझी शाळा. संध्याकाळी मुलांना घेऊन मी लांब लांब फिरायला जातो. कोणीही कंटाळत नाही...आता इमारतीचे बांधकाम पूर्ण होत आले असून तीन मोठ्या खोल्या बांधल्या आहेत. एक गुलाबी व दोन निळ्या. एका खोलीत वस्तुसंग्रहालय आहे. यातील वस्तूदेखील मुलांनीच जमवलेल्या आहेत. त्यात वेगवेळ्या प्रकारचे दगड, फुलपाखरे, गवताचे कितीतरी प्रकार आणि पुष्कळ तऱ्हेची फुले, इत्यादी वस्तू आहेत. आठवड्यातून एकदा वनस्पती शास्त्राचा वस्तुपाठ घेतला जातो, पण त्यासाठीही आम्ही सर्वजण रानात भटकायला जातो. गवत, फुले, कुत्र्याच्या छत्र्या इत्यादी निरनिराळ्या झाडाझुडपांचे तपशीलवार निरीक्षण करतो. आठवड्यातून चार वेळा गायन शिकायची सोय आहे आणि सहा वेळा चित्रकला शिकवली जाते..." अशाप्रकारे निसर्गसान्निध्यात आनंद-प्रवृत्तींची जोपासना करीत सर्व शिक्षणच आनंदमय व्हायला हवे.

पू. साने गुरुजींची शिक्षणाविषयीची कल्पना अशीच भव्य, व्यापक आणि सुंदर होती. शाळेच्या चार भिंतींत मिळणाऱ्या सात-आठ विषयांच्या शिक्षणालाच गुरुजी केवळ शिक्षण मानीत नसत; तर जीवन फुलविणाऱ्या, खुलविणाऱ्या, आनंदमय करणाऱ्या साऱ्या प्रवृत्ती आणि कला यांचाही त्यांच्या शिक्षण-विचारात समावेश होता. उघड्या सृष्टीत मुलांनी फुल-पाखरांसारखे स्वच्छंदपणाने बागडावे, विहरावे, लहरावे आणि झाडे-झुडे, लता-फुले, पशु-पक्षी, नदी-नाले, डोंगर-दरी, शेत-मळे, समुद्र-आकाश या सकल सृष्टीशी त्यांचा परिचय व्हावा आणि मैत्र जुळावेत, निसर्गाशी मुलांना हृदय संवाद साधता यावा, गुजगोष्टी करता याव्यात अशी त्यांची शिक्षणदृष्टी होती. ते म्हणत असत, "मी लहान मुलांच्या शाळेत राहिलो, तर साऱ्या सृष्टीत त्यांना नेईन, त्यांच्याबरोबर खेळेन."

गुरुजींचीच एक आठवण आहे. अमळनेर शाळेत ते शिक्षक होते. एकदा ते वर्गात इतिहास शिकवीत होते आणि त्याचवेळी बाहेर धो धो पाऊस कोसळू लागला.

गुरुजींनी खिडकीतून पाहिले आणि इतिहासाचे पुस्तक मिटवून टेबलावर ठेवले. सगळा वर्ग घेऊन मोकळ्या आवारात आले आणि पावसात चिंब भिजले आणि म्हणाले, "प्रभूचे हजारो-लाखो हात आपल्याला कुरवाळायला खाली येत असताना आपण का करंट्यासारखं वर्गात बसून राहायचं!"–ही अशी मुलांची निसर्गाशी संगत सोबत जोडून दिली पाहिजे. माथ्यावरच्या विशाल आभाळाशी दोस्ती करायला, वाहात्या झऱ्यांशी आणि नदी-नाल्यांशी गुणगुणायला, आजूबाजूच्या वृक्ष-वेलींशी आणि कळ्या-फुलांशी गप्पा-गोष्टी करायला, पशु-पक्ष्यांशी हितगूज करायला आजचे शिक्षण शिकवीत नाही पण हे काम हसत-खेळत मुलांमध्ये मूल होऊन त्यांच्याशी दोस्ती करून, त्यांच्या खांद्यावर हात ठेवून, मित्र-भावाने शिक्षक आणि पालक यांनी केले पाहिजे.

यासाठी साहित्याचेही साहाय्य घेता येईल. केवळ माणसांवरच नव्हे तर मानवेतर सृष्टीवरही प्रेम करण्याची भव्य-दिव्य दृष्टी शिक्षणाने आणि साहित्याने मुलांना दिली पाहिजे. निसर्गाविषयी जवळीक वाटेल, प्रेम वाटेल असा आप्त भावनेचा स्पर्श बाल-हृदयाला कसा घडेल याची काळजी शिक्षणाने आणि साहित्याने वाहिली पाहिजे. परंतु हा स्पर्श केवळ पुस्तकीच राहता कामा नये किंवा प्रतिकरूपच राहाता कामा नये तर प्रतिकाकडून प्रत्यक्षाकडे जाण्याची दुर्दम्य प्रेरणा आणि स्फूर्ती बालांना मिळाली पाहिजे. पावसाची वर्णने वाचून त्यांचे समाधान होता कामा नये, तर पावसाची वर्णने वाचून प्रत्यक्ष पावसात चिंब भिजण्याची प्रेरणा त्यांच्याठायी उत्पन्न झाली पाहीजे. निसर्ग आणि मूल यांच्यामध्ये संवाद साधून देण्याचे दोहोमधील दळणवळणाचे कम्युनिकेशनचे काम शिक्षक आणि पालक यांना करावयाचे आहे. मुलांना त्यांना त्यांचे स्वतःचे मन निरंतर खुले ठेवण्याची संधी देऊन त्यांना स्वतःचाच शोध ( Discovery of his own-self ) घेण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. म्हणून त्यांना आपण आपल्या इच्छापूर्तीसाठी कसल्याही स्पर्धेत उतरवण्याची गरज नाही. आजच्या स्पर्धामय समाजामध्ये ( Compititive Society ) हे खूपच अवघड असले तरी आपला प्रयत्न मात्र, बालकाने दुसऱ्याशी स्पर्धा करण्याऐवजी ती स्वतःशीच करावी असा असायला हवा. यातून त्याला त्याच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा शोध आणि वेध घेता येईल.

अशा मुक्त मोकळ्या वातावरणातील मुलांचे व्यक्तिमत्त्व त्यांची तीच सर्वार्थाने समृद्ध सौंदर्यशाली आणि कलात्मक असे घडवतील त्यासाठी आपण हेही लक्षात ठेवले पाहिजे की आपण कोणी 'घडविणारे' नाहीत. मुलांच्या संदर्भात घडवण्याची भाषा आपण सोडली पाहिजे आणि त्यांनाच त्यांचे व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी ज्या ज्या गोष्टींची साधनांची, वातावरणाची आवश्यकता असेल ते ते सर्व उपलब्ध करून देण्याचीच फक्त आपली जबाबदारी मानली पाहिजे. त्यांच्या ठायीच्या सर्व आनंदप्रवृत्तींना विकासाची सर्व दालने मोकळी ठेवली पाहिजेत. आणि हे जीवन व ही सृष्टी–सर्वच आनंदमय आहे याची प्रचीती, व अनुभव त्यांना सहजपणे मिळवता आला पाहिजे.

□ □

# शिक्षण आणि संस्कृती

## प्रा. नरहर कुरुंदकर

शिक्षण आणि संस्कृती असा एकत्र विचार करणे एका मर्यादेपर्यंत समर्थनीय आहे असे मला वाटते. कारण ज्याला आपण संस्कृती म्हणतो त्यातही समाजमनाच्या एका विशिष्ट पद्धतीने विचार व वर्तन करण्याचा भाग असतो आणि हा भाग निसर्ग-क्रमाने येणारा नसून जन्मल्यानंतर भोवतालच्या सामाजिक प्रभावातून निर्माण होणारा भाग आहे. म्हणून संस्कृती हे मानवी मनाचे एक प्रकारचे शिक्षण असते. एका मर्यादे-पर्यंत शिक्षण आणि संस्कृती यांचा असा एकत्र विचार करणे याला अर्थ असतो. एक तर शिक्षण हा शब्द अर्थाच्या वेगवेगळ्या छटा दाखवणारा आहे. आणि संस्कृती हा शब्दही अशाच भिन्न भिन्न छटा दाखवणारा आहे. म्हणून एक मर्यादा संपली की, शिक्षण आणि संस्कृती यांचा एकत्र विचार करण्यात अर्थ नसतो. भारतासारख्या जुन्या जगातून नव्या जगाकडे वाटचाल करीत असलेल्या देशात तर संस्कृती निर्माण करणे, संस्कृती जतन करणे आणि संस्कृती नष्ट करणे ही तिन्ही कामे शिक्षणाला एकदाच करावी लागत असतात.

प्राचीन इतिहासाच्या काळात भारत हे कधी एक राष्ट्र होते काय हा विवाद्य प्रश्न आपण बाजूला ठेवू. आज भारत म्हणून जो भू-भाग आपणाला दिसतो, या भू-भागातील माणसांना काही हजार वर्षांचा इतिहास व परंपरा आहे याविषयी वाद करण्याचे काही कारण नाही. या परंपरांच्यामध्ये अभिमान बाळगण्याजोगे पुष्कळ आहे. त्याचप्रमाणे नष्ट करण्याजोगे, तिरस्कार करण्याजोगेही पुष्कळ आहे. कलांच्या परंपरा आहेत. चित्र, संगीत, नृत्य यांचा वैभवशाली विकास आहे. इतिहासातील पराक्रमाच्या आठवणी आहेत. काही नीतिमूल्ये व अध्यात्माचे चिंतन आहे. हा सगळा आपणच निर्माण केलेला आजही आपल्याला मानसिक समृद्धीसाठी उपयोगी पडणारा असा भाग आहे. हा भाग जतन करणे, त्याचा विकास करणे हे शिक्षणाचे काम आहे. या अर्थाने शिक्षण पिढ्यान्‌पिढ्या सांस्कृतिक वारशाचे जतन व संगोपन करीत असते. पण याच आपल्या इतिहासात धर्माने पाठिंबा दिलेला आणि परंपरेने बलवान झालेला असा विषमतेचा, अंधश्रद्धेचा आणि भेदाचाही भाग आहे. ही विषमता नानाविध प्रकारची आहे. ती स्त्री-पुरुषांत आहे, जाती-जातींत आहे, एका जातीतील पोटजातीत आहे. या विषमतेला अंत नाही.

समाजामध्ये लवकर सांधता न येणारी अशी प्रचंड फुटीर वृत्ती या परंपरेने निर्माण केलेली आहे. गुलामगिरी हा तिचा कायमचा घटक राहिलेला आहे. यापुढे असल्या प्रकारची समाजरचना आणि तिला सांभाळून धरणारा सामाजिक व मानसिक परंपरावाद सहन करता येणे अशक्य आहे. म्हणून हा सगळा भाग जरी परंपरागत संस्कृतीचा भाग असला तरी शिक्षणाला तो नष्ट करण्याचा कार्यक्रम हाती घेणे भाग आहे. आणि नव्या जगात आपण काही नवी मूल्ये स्वीकारणे, या मूल्यांच्यामुळे नव्या संस्कृतीची निर्मिती होते. ही क्रमाने सर्वांगीण व संपूर्ण अशा स्वातंत्र्याकडे सगळया समाजाला घेऊन जाण्याची प्रक्रिया असते. ती प्रक्रिया गतिमान ठेवणे हे शिक्षणाचे एक प्रधान कार्य आहे. या अर्थाने शिक्षणाला संस्कृती निर्माण करायची असते.

एंगल्सने समाजवादाचे वर्णन करताना एके ठिकाणी अतिशय काव्यमय विधान केलेले आहे. तो म्हणतो समाजवाद म्हणजे काय ? It is great leap into realm of freedom from the realm of necessity ज्याने त्याने आपापल्या गरजा आणि त्यांची पूर्तता यांचाच विचार करीत राहावा व ज्याला जमेल त्याने आपल्या गरजांना सोयिस्कर होईल अशा रचनेचा पुरस्कार करावा व तिचे समर्थन करावे. या अवस्थेतील समाजरचनांच्यापासून किती तरी पुढे जाणारे एक उड्डाण आपण मारले पाहिजे. आणि एका अशा रचनेपर्यंत गेले पाहिजे, जी सर्वांच्या स्वातंत्र्यावर आधारलेली आहे. ही एक नव्या संस्कृतीचीच घडण असणार. स्वातंत्र्याचा सर्वांगीण आशय समजावून देणे आणि त्याची तीव्र ओढ निर्माण करणे हे शिक्षणाचे एक कार्य असतेच.

या सगळ्या तात्त्विक पातळीवरच्या चर्चा झाल्या. या जागेपासून आपण थोडे खाली व्यवहाराच्या पातळीवर उतरायला पाहिजे. जन्माला आलेल्या माणसाला गरजा असतातच. या गरजांची पूर्तता भोवतालच्या वातावरणावर अवलंबून असते. काही प्रमाणात माणूस या वातावरणाला अनुसरून स्वतःला बदलून घेण्यास शिकतो. काही प्रमाणात तो आपल्या गरजांना अनुसरून भोवतालचे वातावरण कसे बदलावे हे शिकतो. असे हे दुहेरी काम हे शिक्षणाचे कामच असते. आणि जिवंत माणसाचे हे शिक्षण सारखे चालूच असते. हा शिक्षणाचा व्यापक अर्थ झाला. समाजाच्या एकूण हिताचा विचार करता योजनापूर्वक समाजाला शिक्षण देण्याची एक रचना प्रत्येक राष्ट्राला असावी लागते. हे योजनापूर्वक शिक्षण देण्याचे कार्य शाळांच्यामधून चालू असते. शिक्षणाचा हा थोडा मर्यादित अर्थ आहे. मर्यादित या अर्थाने की येथे शिकणाऱ्याच्या गरजा दुय्यम असून शिक्षणक्रमाची रचना पुरस्कारणाऱ्या यंत्रणेच्या गरजा महत्त्वाच्या ठरतात. शासनाच्या वतीने जो शिक्षणाचा विचार होतो तो या जातीचा असतो. या मर्यादित अर्थाने ज्यावेळी आपण शिक्षणाचा विचार करतो त्यावेळी या शिक्षणाच्या हेतूचा विचार करणे भाग आहे. कारण शासनाच्या वतीने चालणारे शिक्षण म्हणजे प्रचंड भांडवली गुंतवणुकीची प्रक्रिया असते. वर्षाकाठी कैक अब्ज रुपये या क्षेत्रात राष्ट्राला गुंतवावे लागत

असतात. अब्जावधी रुपये जर गुंतवायचे असतील तर त्या गुंतवणुकीचे हेतू हे स्पष्ट असायला हवेत.

आमच्या देशात शिक्षणाचे काही हेतू अगदी स्पष्ट आहेत. कारण आपला देश हा एक अविकसित देश आहे. अविकसित देशात वस्तूंचे उत्पादन आणि माणसांच्या गरजा यात प्रचंड अशी तफावत असते. ही तफावत कमी करायची असेल तर प्रचंड प्रमाणात उत्पादन वाढवणे भागच असते. ही जी उत्पादनवाढीची प्रक्रिया हिला साहाय्य-भूत होणे हा आमच्या शिक्षणाचा एक हेतू आहे. मी जर असे म्हणालो की, हा शिक्षणक्षेत्राचा सर्वात प्रमुख असणारा हेतू आहे तर ते सहजासहजी कुणी कबूल करणार नाही.

व्यक्तिशः माझ्या मते हा सर्वात प्रमुख हेतू आहे. पण या मुद्यावर निष्कारण वाद नको म्हणून तो क्रमांक तीनचा प्रमुख हेतू आहे असे तूर्त गृहीत धरायला मला हरकत वाटत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणक्षेत्रात जी मूलभूत विसंगती क्रमाने दिसू लागली आहे आणि जी येथून दिवसेंदिवस उग्र स्वरूप धारण करीत जाणार आहे ती विसंगतीच या ठिकाणी आहे. उत्पादनाची प्रक्रिया आणि शिक्षण यांचा समन्वय साधण्याची शिक्षणक्रम आखणाऱ्यांची प्रामाणिक इच्छा दिसत नाही. परिणामी, सुशिक्षितांच्या बेकारीचा प्रश्न निर्माण होतो. ज्या देशात आधीच शिक्षणाचे प्रमाण कमी आहे म्हणून शिक्षण कसे वाढवावे हा विचाराधीन प्रश्न आहे त्या देशात शिक्षणावर खर्चिला जाणारा पैसा जर वाढलेल्या आकांक्षांचा नवा बेकार निर्माण करीत असेल तर ही परिस्थिती नव्या अनिष्टांना जन्म देणारी ठरेल.

बर्ट्रांड रसेलने शिक्षणाचे दोन प्रमुख हेतू सांगितलेले आहेत.

त्यांच्या मते उपयोगी नागरिक निर्माण करणे आणि चांगला माणूस निर्माण करणे हे शिक्षणाचे दोन प्रमुख हेतू आहेत.

ज्या इंग्लंडमध्ये बसून रसेल शिक्षणशास्त्राचा विचार करीत आहे ते इंग्लंड औद्योगिक दृष्टीने समृद्ध व पुढारलेले इंग्लंड त्यामुळे उत्पादनवाढीचा प्रश्न रसेलेसारख्या मंडळींच्या समोर अग्रक्रमाने येण्याचा संभव नव्हता. समाजाला उपयोगी नागरिक जर शिक्षणातून निर्माण झाला तर तो उपयोगी उद्योगात म्हणजे उचित उत्पादनात गढलेला असणारच. आणि जर माणसे उद्योगात गढलेली असतील तर समाजाच्या गरजेपुरते त्यातून निर्माण होणारच असे रसेलला वाटत असले तर त्यात नवल वाटण्याचे काहीच कारण नाही. कारण रसेल हा एका समाजात वाढलेला आणि मुक्त समाजव्यवस्थेने प्रभावित झालेले मन धारण करणारा विचारवंत आहे. इ. स. १९३० सालच्या जागतिक मंदीचा फटका बसण्यापूर्वीच्या काळातील बिगर समाजवादी उत्पादनाचा जसा विचार करतील तसा रसेल करतो. आपण मागासलेल्या देशातले लोक असल्यामुळे आपल्याला उत्पादनाचा

अग्रहक्काने विचार करणे भाग आहे. तरीही उपयोगी नागरिक निर्माण करण्याचा प्रश्न आपल्याहीसमोर आहेच. आपल्या दृष्टीने लोकशाही, जातिधर्मातीत समाजरचना, समता, स्वातंत्र्य आणि न्याय या कल्पना स्वीकारणारा आणि या कल्पना मनात मुरलेला माणूस हा चांगला नागरिक आहे.

असा चांगला नागरिक निर्माण करणे या लोकशाहीच्या शरीराला आत्मा देण्यासाठीही आवश्यक आहे. प्रत्येकाला क्षमतेइतका विकास करून घेण्याची पूर्ण संधी देणारी निकोप समाजरचना निर्माण करण्यासाठीही आवश्यक आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे लिंगभेद, प्रांतभेद, भाषाभेद असे फुटीरपणाचे सर्व प्रकार अंधारात ढकलून समता व स्वातंत्र्य यांवर आधारलेल्या नव्या राष्ट्रीय एकात्मतेच्या उदयासाठीसुद्धा हे घडणे आवश्यक आहे. हा उपयोगी नागरिक निर्माण करणे हे शिक्षणाचे क्रमांक दोनचे प्रमुख ध्येय आहे. यावर सर्वांचे एकमत आहे.

पण या भूमिकेचा अर्थ असा होतो की, समाजातील वेगवेगळ्या गटांना वेग-वेगळे शिक्षण नसते तसे दलितांना वेगळे शिक्षण नसते. दलितांच्या शिक्षणाचा पृथक विचार जो केला जातो त्याचे स्वरूप इतकेच असले पाहिजे की, सामाजिक व आर्थिक मागासलेपणामुळे या शिक्षणात सहभागी होणे दलितांना कठीण जाते म्हणून त्यांना शिक्षणात सहभागी होण्याच्या सोयी अग्रहक्काने उपलब्ध करून देण्याचा विचार करावा लागतो. समाजगटाच्या अवस्था निराळ्या असतात म्हणून विशेष सोयी उपलब्ध करून देण्याची गरज असते. पण दलितांनासुद्धा सोयी निराळ्या उपलब्ध करून दिल्या जातात, त्यांना निराळे शिक्षण दिले जात नाही. शिक्षणाचा हेतू असलेले फुटीरपण टिकवून ठेवणे हा नसतो. फुटीरपणा नाहीसा करून एकात्मता अस्तित्वात आणण्यासाठी शिक्षण असते.

सामाजिक रचना मोठी गुंतागुंतीची असते. तुम्ही जर न्याय्य हक्कासाठी भांडला नाहीत तर मग अन्यायग्रस्त गटांच्यावर अन्याय तसेच चालू राहतात. कारण सामाजिक अन्याय चुकूनमाकून झालेले नसतात. या अन्यायात हजारोंचा घात होत असेल तर शेकडोंचा फायदा होत असतो. ही फायदा घेणारी मंडळी आपले लाभ सहजासहजी सोडून द्यायला तयार नसतात. म्हणून अन्यायाच्याविरुद्ध लढावेच लागते.

या अन्यायाविरुद्ध लढण्याच्या परंपरा नव्याने गटवार विचार करणारे असहिष्णु फुटीर मन तयार करीत असतात. ही लढ्याची स्वाभाविक प्रक्रिया असते. ती जाणीव-पूर्वक प्रयत्न करून मोडून काढावी लागते आणि त्यासाठी एका व्यापक, उदार व समंजस भूमिकेची गरज असते. ही समंजस आणि उदार भूमिका एका बाजूला तयार करणे आणि या भूमिकेशी एकरूप होऊ शकतील अशा नेताने अन्यायाविरुद्धचे लढे संघटित करणे हे एक महत्त्वाचे काम आहे. अनेकांना हे वाक्य उलटून घ्यावेसे वाटेल. ते उलटून घेऊन अन्यायाविरुद्ध लढे संघटित करणे हे पहिले काम आणि हे लढे एका-त्मता निर्माण करण्याच्या समंजस धोरणाविरुद्ध जाणार नाहीत याची दक्षता घेणे

हे दुसरे कान, अशी मांडणी कुणाला हवी असल्यास त्याला हरकत नाही. शब्दाची मांडणी कशीही केली तरी आशय तोच राहतो.

शिक्षणाच्यामधून परंपरावादाला विरोध करणारे, नव्या मूल्यांचा स्वीकार करणारे मन कसे सिद्ध करावे, हा जसा एक प्रश्न आहे तसाच शिकणाऱ्या पिढीचा दृष्टिकोन अखिल भारतीय कसा निर्माण करावा हाही एक प्रश्नच आहे. कारण स्वाभाविकरीत्या आपण सर्व प्रश्नांचा जातिनिष्ठ, धर्मनिष्ठ, प्रांतनिष्ठ विचार करतो. कोणत्याही मुद्यावर आपल्या जातीचे काही चुकले असेल असे आपल्याला वाटतच नाही. जातिभेद दूर करण्याचे काम हे जाती नष्ट करण्याचे काम आहे. आपापली जात अभिमानाने घट्ट धरून, इतरांच्यावर टीका करून जाती नष्ट होतील या भ्रमात कुणी राहू नये. जाती नष्ट व्हायच्या असतील तर प्रत्येकाला आपल्या जातीच्या विरुद्ध लढण्यास सिद्ध व्हावे लागेल. समाजाच्या पटावरून आपली जात पुसून टाकण्याचा कार्यक्रम घ्यावा लागेल. हा कार्यक्रम जातींची नावे बदलण्याइतका सोपा नाही.

या सर्वांच्याबरोबरच चांगल्या नागरिकाच्या ठिकाणी समाजाविषयीची एक लिप्तता म्हणजे Sense of belonging असावा लागतो. हा एकूण राष्ट्राविषयी, सर्व सार्वजनिक कार्याविषयी, आणि सगळ्या समाजाविषयीच लागतो. हा Sense of belonging कसा निर्माण करता येईल ? हाही प्रश्न चांगला नागरिक निर्माण करण्याचाच प्रश्न आहे. हा प्रश्न आणि चांगला माणूस निर्माण करण्याचा प्रश्न हे दोन प्रश्न एक नव्हेत.

काही विचारवंत असे मानतात की, समाजासमोर चारित्र्याच्या ऱ्हासाचा प्रश्न उग्रपणे उभा आहे. हे चारित्र्य निर्माण करायचे असेल तर माणूस नैतिक झाला पाहिजे. नीतिमान आणि चारित्र्यवान झाल्याशिवाय तो सामाजिक दृष्टीने चांगला नागरिक ठरणार नाही. विचार करण्याच्या पद्धतीत दोन कच्च्या जागा दडलेल्या आहेत. पाश्चिमात्य देशांत माणसे फार नीतिमान आहेत असे दिसत नाही. व्यभिचाराचे प्रमाण तिथे जास्तच आहे. पण या गुन्हेगाराच्या ठिकाणीसुद्धा सामाजिक नीतिनियम पाळण्याची प्रवृत्तीही बलवान आहे. आपल्या सहकाऱ्याचा विश्वासघात करणारा माणूस कुणी नीतिमान म्हणणार नाही पण हाही माणूस तिकीट काढून बसमधून जाईल. पैसे टाकून वर्तमानपत्र उचलील. सामाजिक नीतिनियम पाळण्याची प्रवृत्तीही निर्माणच करावी लागते. ती शुद्ध नैतिकतेहून निराळी असते. आणि नीतिमान माणूस फार तर स्वतः गुन्हा करणार नाही. सामाजिक गुन्हेगाराविरुद्ध संघटितपणे उभे राहाण्याची प्रेरणा सामान्य नीतिशास्त्रातून येत नाही. म्हणून चारित्र्य-ऱ्हासाच्या प्रश्नापेक्षा हा प्रश्न निराळा आहे.

उपयोगी नागरिकाला गरजेपुरत्या भाषा आल्या पाहिजेत. त्याला सामान्य व्यवहारासाठी आवश्यक असणारे सर्वसाधारण ज्ञान असले पाहिजे. इतिहास व राज-

कारण त्याच्या कानांवर गेले पाहिजे. हे सगळे गृहितच असते. त्याची अभ्यासक्रमात सोय केलेली असते.

याखेरीज शिक्षणाचा चांगला माणूस तयार करणे म्हणजे नीतिमान माणूस तयार करणे हा एक हेतू रसेल नोंदवतो. अनेकांच्या मते हा शिक्षणाचा आद्य हेतू आहे. म्हणजे क्रमांक एकचा प्रमुख हेतू आहे. शिक्षणामुळे माणूस अधिक नीतिमान, अधिक चारित्र्यवान झाला पाहिजे अशी अपेक्षा आहे. सामुदायिक प्रार्थना करून किंवा नीतिमत्तेवर व्याख्याने देऊन पगारी माणसांच्याकडून चारित्र्य तयार करून घेता येईल असे मला वाटत नाही. नीतिमत्ता आणि चारित्र्य हे अभ्यासक्रमाचे राष्ट्रीय नियोजन करून साध्य होणारे विषय आहेत असे मला वाटत नाही. नीतीच्या निर्मितीला शालेय शिक्षणाचा उपयोग आनुषंगिक असतो. म्हणून मी चांगला माणूस तयार करणे हे शिक्षणाचे प्रमुख प्रयोजन जरी मानले तरी क्रमांक तीनचे मानतो, क्रमांक एकचे मानत नाही. ज्या मंडळींना ते क्रमांक एकचे प्रयोजन मानायचे असेल त्यांच्याशी कोणताही वाद करण्याची मला इच्छा नाही. नीतिमत्ता आणि चारित्र्य यांचे महत्त्व मीही मानतो. फक्त तो शालेय नियोजनाच्या कक्षेतला भाग आहे काय ? इतकाच वाद आहे. मला तो नाही असे वाटते.

स्वातंत्र्योत्तर काळात आपण लोकशाहीचे ध्येय स्वीकारलेले आहे. नागरिक अशिक्षित आणि अडाणी असताना सामर्थ्यवान लोकशाहीची उभारणी अशक्यच असते. आपण सर्वांना समता, स्वातंत्र्य आणि न्यायाचे आश्वासन दिलेले आहे. अशिक्षित आणि दरिद्री माणसांना शिक्षण दिल्याशिवाय या आश्वासनाला काही अर्थच नाही. जागतिक स्पर्धेत एक बलवान राष्ट्र म्हणून उभे राहणे ही आपली गरज आहे. ती शुद्ध राष्ट्रवादाचीसुद्धा गरज आहे. कारण शत्रू सरहद्दीवर उभे आहेत आणि राजकारणात मित्रसुद्धा गैरफायदा घेत असतात. हे आधुनिक बलवान राष्ट्र उभे करण्यासाठी शिक्षणाचा विकास मोठ्या प्रमाणावर करणे आपल्याला भाग आहे. यामुळेच सक्तीच्या सार्वत्रिक मोफत शिक्षणाची भूमिका आपण मान्य केली आहे. या प्राथमिक शाळांच्यामध्ये गेलेल्या कोट्यवधी मुलांचे करायचे काय? म्हणून आपण प्राथमिक शाळांच्या वाढीशी सुसंगत माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे काढून ठेवलेली आहेत. या सर्व उद्योगातून उत्पादनाची वाढ फारशी झालेली नाही. कोट्यवधी रुपयांचा खर्च मात्र झालेला आहे व फलनिष्पत्ती म्हणून सुशिक्षित बेकारांचे थवे राष्ट्राच्या पदरी पडलेले आहेत. या मंडळींना आपण नोकऱ्या देऊ शकणार आहोत काय ?

लोकसभेतील आकडेवारी असे सांगते की, सध्या शासकीय, अर्धशासकीय मिळून सुमारे, दीड टक्का लोकसंख्या नोकरीवर आहे. तिचा पगार अंदाजपत्रकाचा ४९ टक्के भाग खाऊन टाकतो. उरलेली सर्व कामे नाहीशी करून शासनाने फक्त नोकरांना पगार देणे एवढे एकमेव कार्य जरी स्वीकारले तरी ३ टक्क्यांच्यापेक्षा जास्त लोकांची सोय त्यात होऊ शकणार नाही. इतक्यात शंभर टक्के बजेट संपून जाणार आहे. शिक्षणाने निर्माण

होणारा प्रश्न नोकऱ्या देऊन सुटत नसतो आणि वस्तूंच्या टंचाईमुळे निर्माण होणारा प्रश्न पगारवाढ करून संपत नसतो. सगळ्याच बाबी उत्पादनवाढीशी जोडाव्या लागत असतात. फार मोठे समृद्ध जीवन आपण तयार करू शकू अगर तयार करू शकणार नाही. अधिक लोकसंख्या आणि कमी जमीन असणाऱ्या मागासलेल्या देशांनी समृद्ध जीवनाची अपेक्षा मर्यादित प्रमाणातच केली पाहिजे. पण जनतेच्या किमान गरजा भागवण्याइतके उत्पादन तर आपल्याला करणेच भाग आहे. या किमान गरजांच्यामध्ये अन्न हा आद्य प्रश्न आहे. ५५ कोटी लोकांना खाण्यासाठी पोटभर अन्न आणि ते पुरेसे सकस आणि संतुलित आहार देणारे अन्न उपलब्ध करून देणे हे लहान काम नसून एक प्रचंड काम आहे.

आजही आपल्या देशातील ७५ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या ग्रामीण भागात राहते आणि नजिकच्या भविष्यकाळात आपण विकासाचे कोणतेही लोभसवाणे चित्र डोळ्यांसमोर ठेवले तरी एक गोष्ट उघड आहे की, देशातील किमान ६० टक्के लोकसंख्या शेती आणि शेतीसंलग्न उद्योगात राबणार आहे. है शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे शेती या विषयाशी जोडून है नवा विद्यार्थीवर्ग सारखा शेतीत आत्मसात केला जाईल आणि शिक्षणात गुंतवलेला पैसा उत्पादनवाढीत रूपांतरित झालेला दाखवता येईल. अशी रचना जर आपण स्वीकारू शकलो नाही, तर या देशातील शिक्षणाचा लोकशाहीचा आणि राष्ट्रवादाचा सगळा प्रपंचच धोक्यात येईल हे समजून घ्यावे लागते. शिक्षणासमोरचा सर्वात दुर्लक्षित आणि सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे तो हा आहे.

सबंध शिक्षणव्यवस्था उत्पादनप्रक्रियेशी जोडणे ही गोष्ट सहजासहजी घडणार नाही. पाचवे-सहावे वर्षी शाळेत येणारे मूल विसावे, एकविसावे वर्षी पूर्णपणे उत्पादन करू लागेल. पुढच्या वीस वर्षांचे संपूर्ण गरजा व शक्यतांचे चित्र डोळ्यांसमोर उभे असल्याशिवाय मुलाच्या वृत्ती आणि देशाच्या गरजा यांचा समन्वय साधणारी, उत्पादनाच्या प्रक्रियेत एकरूप होणारी शिक्षणव्यवस्थाच उभारता येणे शक्य नाही.

सार्वजनिक शिक्षणाचे ध्येय सर्व जग आपल्या हितासाठी लुटून फस्त करण्याची राक्षसी महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्यांना तरी पूर्ण करता येत असते आणि हे जर शक्यतेच्या कोटीतले नसेल तर संपूर्ण नियोजनावर आधारलेल्या समाजरचनेलाच हे ध्येय साकार करता येत असते. म्हणून शिक्षण आणि संस्कृती, स्वातंत्र्य, लोकशाही आणि न्याय अशा सर्व कल्पनांचा समन्वय एका पूर्ण नियोजनाला वाहिलेल्या समाजवादी रचनेत व्हावा लागत असतो. समाजवाद ही नुसती आर्थिक रचना नसते. ती एक नव्या संस्कृतीची उभारणी असते. ज्ञानाचे दरवाजे सर्वांना मोकळे करायचे असतील तर या संस्कृतीची उपासना करणे भाग आहे. एरव्ही सर्व ध्येये व्यासपीठावर शब्दांतून सांगावी आणि व्यवहारात दारिद्र्य, विषमता व अन्याय जतन करावा. या वांझ उद्योगाला दुसरी गती नसते. नेत्यांच्याविषयीच्या अहंता आणि संघटनांचे जयजयकार हे चित्र फारसे बदलू शकतील असे मला वाटत नाही. ☐ ☐

# भाषा आणि शिक्षण

## भालचन्द्र फडके

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, संघटित व्हा आणि नवजागरणासाठी आंदोलन करा असा आदेश अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम सुरू केला तेव्हा दिला होता. नवा माणूस निर्माण करावयाचा म्हणजे अज्ञान, दारिद्र्य आणि विषमता व अंधश्रद्धा यांविरुद्ध लढा पुकारावयाचा. म्हणून ज्या ज्या धर्मसुधारकांनी किंवा समाजसुधारकांनी नवा विचार मांडला त्या त्या सर्वांनी लोकभाषांचा आग्रह धरला. भाषा ही केवळ विचार-विनिमयाचे साधन नाही तर भाषा माणसाच्या आंतरिक जीवनाला, त्याचे अनुभवविश्व आणि त्याच्या आचरणाच्या प्रेरणांचे विश्व यांना आकार देत असते. भाषा आत्मसात झाली म्हणजे ज्ञान-विज्ञानाची दारे खुली होतात. ज्ञानसंग्रह, ज्ञानप्रसार करण्यासाठी भाषा हाच आधार! लोकभाषेशिवाय लोकशिक्षण नाही आणि लोकशिक्षणाशिवाय लोक-शाहीला अर्थ नाही.

आजच्या विज्ञाननिष्ठ युगात प्रत्येक व्यक्तीला जगायचे असेल तर आवश्यक ते ज्ञान हवे, अर्थार्जनासाठी विशिष्ट कौशल्ये हवीत आणि मुख्य म्हणजे जीवनमूल्ये हवीत. यासाठी शिक्षण हवे. शिक्षण कोणत्याही विषयाचे असो ते देण्यासाठी भाषा हवीच. आपली सुख-दुःखे, आपल्या आशा-आकांक्षा व्यक्त करण्यासाठी भाषा हवीच. पण आमची कर्ती-सवरती मंडळी शिक्षणक्रमात 'भाषेची ओझी' काढून टाका असा पुकारा करीत आहेत. ज्ञानभाषा म्हणून त्यांना इंग्रजी भाषा हवी. मग मातृभाषा व संपर्कभाषा म्हणून राष्ट्रभाषा हिन्दी याबद्दल उपेक्षावृत्ती बाळगली तरी चालते. अशी दृष्टी स्वीकारणाऱ्या विद्वान मंडळींबद्दल काय म्हणावे तेच कळत नाही. विशेषतः विज्ञान, वाणिज्य, मानव्य-विद्या, स्थापत्य, कृषी, वैद्यक इ. शाखांचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना व विशेषतः अध्यापकांना वाटते की मातृभाषेच्या वा राष्ट्रभाषेच्या अभ्यासाचे ओझे कशाला? वस्तुतः शिक्षणाचे माध्यम भाषा आणि त्या भाषेवर प्रभुत्व नसेल तर ज्ञान संपादन करता येणार नाही. इंग्रजी भाषा श्रीमंत आहे म्हणून तिचाच माध्यम म्हणून स्वीकार केला तर स्वभाषा कशी विकसित होईल?

इंग्रजीचा आश्रय आपण किती दिवस घेणार? इंग्रजी राज्य आले आणि इंग्रजीला प्रतिष्ठा मिळाली पण भारतीय भाषा मात्र उपेक्षित राहिल्या. संस्कृत भाषेच्या वर्चस्वामुळे

ज्ञानाची गंगा समाजाच्या सर्व थरांत पोचू शकली नाही. त्यामुळे मूटभर शिक्षित आणि लक्षावधी ज्ञानाला वंचित अशी स्थिती होती. इंग्रजी भाषेचे आगमन झाले आणि ही स्थिती पालटली नाही. स्वातंत्र्य मिळून तीस वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला, भाषावार प्रांतरचना झाली तरी अद्याप भारतीय भाषांची उपेक्षा चालूच आहे. अजून इंग्रजीचा अमल जारीच आहे. हरिभाऊ आपटे यांनी अकोल्याच्या साहित्यसंमेलनाच्या व्यास-पीठावरून अध्यक्ष म्हणून भाषण करताना सांगितले होते, "आपण मातृभाषेचा अभिमान धरिला पाहिजे. तो ज्यांनी धरला, त्यांच्या अभिमानामुळेच मराठी भाषेला अर्थसमर्थता आली. इतकी की वाटेल ते शिक्षण तिच्याद्वारे देता येईल, वाटेल तो विचार तिच्याद्वारे उच्चारता येईल, वाटेल तो विकार तिच्याद्वारे जागृत करता येईल व वाटेल तसे मनोरंजनही तिच्याद्वारे करता येईल" (१९१२) म्हणून स्वभाषा समर्थन आवश्यक होते. "आपणास जे जे ठावे। ते ते स्वभाषेत लिहावे। शहाणे करून सोडावे। सकळ जन" या वृत्तीने स्वभाषा समर्थ झाल्या असत्या. पण इंग्रजी ही ज्ञानभाषा आहे, इंग्रजी ही श्रीमंत भाषा आहे असा पुकारा करीत सर्व स्तरांवर आम्ही इंग्रजीचा अमल तेवढा स्वीकारला. स्वभाषेच्या शास्त्रोक्त अभ्यासास बाल्यातली चार किंवा पाच वर्षे आणि बाकी सर्व आयुष्य इंग्रजीच्या अध्ययनास वाहिलेले. ज्यांनी इंग्रजी भाषेचे अध्ययन केले त्यांना इंग्रजीत ग्रंथनिर्मिती करता आली नाही किंवा इंग्रजी भाषेतील ज्ञानाचा ओघ स्वभाषेत वळवता आला नाही. केवळ इंग्रजी भाषेचे गोडवे गात या विद्वानांनी आपले आयुष्य घालवले. त्यामुळे स्वतंत्र भारतात देशी भाषा शिक्षणाचे माध्यम म्हणून प्रतिष्ठा पावल्या पाहिजेत असा जेव्हा आग्रह सुरू झाला तेव्हा या इंग्रजाळलेल्या विद्वानांनी देशी भाषा दरिद्री आहेत, देशी भाषेत ग्रंथसंपत्ती नाही असा युक्तिवाद आरंभिला आणि इंग्रजीला निदान उच्चशिक्षणात तरी मानाचे स्थान पाहिजे असे ध्रुपद धरले. शब्द नाहीत, परिभाषा नाही, ग्रंथ नाहीत, अध्यापक नाहीत अशा तक्रारी लोकांनी मांडल्या पण या तक्रारी दूर करण्यासाठी विद्यापीठे व शासन यांनी पाऊल उचलले नाही. उलट त्यांची उदासीनता, अकार्यक्षमता स्वभाषांच्या मागासलेपणाला उपकारक ठरली. स्वभाषा दुबळ्या राहिल्यामुळे शिक्षणाच्या प्रसाराला गती आली नाही.

मला तर वाटते की ज्ञानाचा लाभ समाजाच्या सर्व थरांत झपाट्याने होऊ नये असेच शहाण्या माणसांना मनातून वाटत असावे. कारण बहुसंख्य लोकांच्या अज्ञाना-वरच यांना सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा लुटता येते. स्वातंत्र्य मिळून तीस वर्षे झाली तरी स्वभाषेतून सर्व तऱ्हेचे शिक्षण देता येत नाही. त्यामुळे ज्ञानापासून वंचित झालेले किती-तरी गट मागासलेले आहेत. त्यांच्यापर्यंत ज्ञानाची गंगा पोचलेलीच नाही. प्रौढ शिक्षणाचे कार्यक्रम व योजना जे आखत आहेत त्यांना जनमनाच्या भाषेचे ज्ञान आहे असे म्हणता येत नाही. योजना तयार होत आहेत, घोषणा लिहिल्या जात आहेत, विद्वान भाड्याने घेतले जात आहेत पण शिक्षणाचा फैलाव दलित जाती-जमातींत, आदिवासी-गिरिजनांत होत नाही. शिक्षणाच्या या सर्व योजनांपासून हे दडपले गेलेले गट फार दूर आहेत.

कारण जे योजना तयार करतात व त्या राबवू इच्छितात ते अप्रामाणिक तर आहेतच पण त्यांना या समूहांची भुकेची भाषा कळलेली नाही. ' भुकेलेल्या माणसाला मासे देऊ नका. त्याला जाळे द्या ' अशी एक चिनी म्हण आहे. याचा अर्थ त्याला आयते जगू देऊ नका त्याला उत्पादक श्रम करण्यासाठी साधन द्या. पण आमचे योजनाकार भुकेलेल्या माणसाला मासे देऊ शकत नाहीत आणि जाळे देण्याचे तर त्यांच्या मनातही येत नाही, ते भुकेलेल्या माणसाला उपदेशाचे डोस पाजतात. त्यांची भाषा, त्यांच्या वेदना ज्या शिक्षणतज्ज्ञांना जाणता आलेल्या नाहीत ते, प्रौढ शिक्षणाच्या नावावर कोट्यवधी रुपये उधळतील.

भाषा हा मानवी जीवनाचा जिवंत आविष्कार आहे. तसे भाषा म्हणजे संस्कृतीचे वास्तव रूप ! ही भाषा सर्व थरांत ज्ञान नेऊ शकते आणि पर्यायाने समाजपरिवर्तनाच्या चक्राला गती देऊ शकते. आज दुर्दैवाने महाराष्ट्राचा सर्व व्यवहार मराठी भाषेत नाही. मग मराठी भाषेला विकसित भाषेचा दर्जा तरी कसा लाभेल ? म्हणून उच्च शिक्षण, उच्च न्यायालयातले कामकाज, कायदेमंडळातले, विद्यापीठातले, सचिवालयातले – नव्हे सर्वच क्षेत्रांतले काम मराठीतून चालले पाहिजे. म्हणजे मराठी भाषा समृद्ध होईल व त्यातून शिक्षण घेण्याची प्रक्रिया सुरू होईल.

मध्ययुगीन कालखंडात ' अध्यात्म विद्येचा सुकाळु ' करण्यासाठी ज्ञानदेवांनी लोकभाषेचा आश्रय घेतला. महानुभावीयांनी मराठी भाषेतच रचना करण्याचा प्रयत्न केला याचे कारण समाजशिक्षण सुलभ होईल म्हणून. पण दुर्दैवाने या पंथात ज्ञान बंदिस्त ठेवण्याची आपल्या पंथीयांपुरते ठेवण्याची अपप्रवृत्ती उदयाला आली. शके १२७५ च्या सुमारास सकळ लिपी रवळोव्यासांनी कल्पिली आणि या सकळ वा नागर लिपीत विचार बद्ध करून ठेवण्याचा महानुभाव पंथातील पंडितांचा प्रयत्न घातक ठरला. " नाथपंथ इ. इतर पंथीयांकडून या महानुभाव पंथास उपसर्ग होत असावा व या किंवा इतर दुसऱ्या काही कारणांमुळे आपली ब्रह्मविद्या, आपली मते आणि धर्ममते इतरापांसून गुप्त ठेवण्याची आवश्यकता या पंथीयास नागदेवाचार्यानंतर ५० वर्षांच्या आतच भासू लागली. " असे श्री. य. खु. देशपांडे यांनी म्हटले. महानुभाव पंथीयांच्या सांकेतिक लिपीच्या निर्मितीची मीमांसा करताना अनेक कारणे दिली गेली. लिपीच्या निर्मितीची प्रेरणा चक्रधर वचनात आहे असा एक शोध डॉ. वि. भि. कोलते यांनी ' हां गा : हे तुमचे रहस्य की : मा आपुले रहस्य ते आणिकाप्रती प्रकटिजे ना की : ' या ' सिद्धान्त-सूत्र पाठा 'तील वचनाधारे लावला आहे. मला वाटते की डॉ. कोलते यांची, असा शोध लावण्यात चूक होत असावी. खरी गोष्ट अशी आहे की चक्रधराचा हा संप्रदाय या संप्रदायात शिरलेल्या विद्वान पंडितांनी नीट जाणला नाही. पंथाचे तत्त्वज्ञान समाजाच्या सर्व थरांपर्यंत जावे म्हणून लोकभाषेचा मराठीचा आग्रह धरणारे पंथाचे प्रणेते अंतर्धान पावल्याबरोबर ज्ञान बंदिस्त करून ठेवण्याची परंपरागत पद्धत सुरू झाली. विद्वान

माणसांना विशेषतः ब्राह्मण पंडितांना ज्ञानाचा प्रवाह सर्वत्र वाहात जावा असे मनापासून वाटत नाही. कारण ज्ञान संपादणे, ज्ञानप्रसार करणे ही विशिष्ट वर्गाची मिरास आहे हे मत या विद्वानांनी सोडलेले नसावे. पंथीय तत्त्वज्ञान लिपीबद्ध करून सार्वत्रिक ज्ञान-प्रसाराची वाट आपण बंद केली हे खळोवासादी विद्वानांच्या लक्षात आले नाही. आणि डॉ. तुळपुळे, डॉ. पठाण इत्यादी आधुनिक विद्वान लिपीचे नाव ती कोणी शोधून काढली, ती लिपीशास्त्राच्या इतिहासातील एक लक्षवेधी घटना आहे काय इ. संबंधी तीच ती चर्चा करीत राहिले. लोकभाषेतून समाजाचे शिक्षण करता येते हे न जाणता ज्ञान बंदिस्त करणे त्यांना महत्त्वाचे वाटावे यासारखे दुसरे दुर्दैव नाही!

किंबहुना शिक्षणाचा प्रसार मूठभर वर्गातच व्हावा म्हणून भाषा विशिष्टच असली पाहिजे असा आग्रह आमचे विद्वान धरीत आले आहेत. प्राचीन काळी संस्कृतचे महात्म्य सांगून प्राकृत भाषांना कमी लेखत तर इंग्रजांचे राज्य आल्यावर इंग्रजी भाषेचे स्तुतिपाठक देशी भाषांची अवहेलना करीत. इंग्रजी भाषा हे आरंभी शिक्षणाचे माध्यम असल्यामुळे मूठभर सुशिक्षितांचा अल्पसंतुष्ट वर्ग निर्माण झाला आणि बहुजनसमाज प्रगत ज्ञानापासून वंचित राहिला. शिक्षणाच्या अभावी त्यांच्या मनात अज्ञान, अंधश्रद्धा वाढत राहिल्या. बहुजनसमाज जितका अशिक्षित तितके मूठभर इंग्रजीशिक्षित अधिक सुखी! कारण तुटपुंज्या इंग्रजी शिक्षणाच्या आधारावर मानसन्मान मिळत होता, बऱ्यापैकी पैसा गाठीला बांधता येत होता. स्वतंत्र देशातदेखील परभाषांचे स्थान कायमच राहिले. शिक्षणाच्या सर्व शाखांत इंग्रजी भाषेचा अंमल जारीच राहिला. मोठमोठ्या पगाराच्या नोकऱ्या परभाषेच्या अध्ययनाने मिळत असतील, प्रगत तंत्रज्ञान, विज्ञान हस्तगत करणे परभाषेतूनच शक्य असेल तर बुद्धिमान तरुण परभाषेकडे—इंग्रजीकडेच-वळतील. शिक्षणाचा प्रसार सार्वत्रिक होत चालला आहे. लिहिणे व बोलणे हे व्यवसाय एका विशिष्ट वर्गाची मिरास आहे असे मानले जात नाहीत. त्यामुळे नव्याने जाग्या झालेल्या वर्गातील लोक लिहिते व बोलते होत आहे पण तरीही इंग्रजीतून शिक्षण घेणारे आणि मराठीतून शिक्षण घेणारे अशी दोन गटांत विभागणी झाली आहे आणि इंग्रजीतून शिक्षण घेणाऱ्याला प्रतिष्ठा आहे, विकासाची संधी हवी तेवढी उपलब्ध आहे हे मराठीतून शिक्षण घेणाऱ्यांच्या लक्षात आल्यामुळे त्यांचाही मोहरा इंग्रजीच्या अध्य-यनाकडे अपरिहार्यपणे वळू लागला आहे. सांस्कृतिक दृष्ट्या सर्वभक्षक अशा इंग्रजी भाषेपुढे मराठी भाषेने नामोहरम व्हावे हा मोठा धोका आहे.

स्वभाषेतून शिक्षण मिळावे हा स्वतंत्र देशातील व्यक्तीचा हक्क आहे. पण आमचे शिक्षणतज्ज्ञ मात्र इंग्रजीतून शिक्षण दिले पाहिजे असा अजूनही आग्रह धरीत आहेत. उपलब्ध ज्ञानाचा सर्व थरांत प्रसार कसा होईल या चिंतेपेक्षा इंग्रजीचे आसन बळकट कसे होईल त्याची चिंता आमच्या शिक्षण मंडळांना, शासनासमोर मुजरे करणाऱ्या विद्वानांना लागलेली दिसते. म्हणून दरवेळी इंग्रजीशिवाय आम्ही कसे जगणार?

असा रडका सूर ते काढतात. या संदर्भात महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार म्हणाले ते चिंतनीय आहे. ते म्हणतात, "जगातील सर्वोच्च शास्त्रज्ञान मराठीत आणण्याचे काम एकांगी संस्कृत पंडित किंवा एकांगी इंग्रजी पंडित कधीच करू शकणार नाहीत. ही एकाक्ष मंडळी निव्वळ आंधळ्यापेक्षा बरी असली तरी आमच्या कामाची नाहीत. आम्हास सर्व इत्थंभूत शास्त्ररचना मराठीत करावयाची आहे. तेव्हा संस्कृताचे प्रगाढ पांडित्य, नव्या शास्त्रांचे उच्च व अनुभविक ज्ञान आणि मराठीचा दीर्घ व्यासंग ही तीन सामर्थ्ये एकवटलेले काही समर्थ पुरुष आम्हाला पाहिजे आहेत." पण आमचा सुशिक्षित वर्ग मराठी भाषेला प्रतिष्ठा देऊ इच्छित नाही. अशा रीतीने आपल्या भाषांच्या विकासाबाबत सुशिक्षित वर्ग जर उदासीन राहिला तर हळूहळू या भाषा दरिद्री होतील आणि शिक्षण देण्याच्या दृष्टीने कुचकामी ठरतील. म्हणून शिक्षणाचा कस वाढवण्यासाठी भाषांच्या अभ्यासाचा कस वाढवला पाहिजे.

विज्ञाननिष्ठ समाजात उपयुक्त शिक्षणाची महती वाढत राहते. विज्ञान व तंत्रज्ञान याचे अध्ययन व्हावे असे एकाबाजूने म्हणत असताना भाषाभ्यासाची उपेक्षा का व कशासाठी ? आज सर्वत्र विज्ञान, वाणिज्य, वैद्यक इ. शाखांतून भाषाभ्यासाला पदभ्रष्ट करण्याची सतत धडपड केली जाते. भाषाध्ययनाची उपेक्षा भारतात नव्हे तर परदेशातही चालू आहे. इंग्लंडमध्ये भाषाभ्यासाचा दर्जा घसरत चालल्याबद्दल चिंता व्यक्त केली जाते तर भारतात शिक्षणक्रमातून भाषाभ्यासाचे उच्चाटन झाले तर हवेच असते. वस्तुतः विज्ञानादी सर्व शास्त्रांच्या अध्ययनासाठी भाषाप्रभुत्व आवश्यक आहे. अर्थात आपल्याकडे भाषाप्रभू म्हणजे जो सामान्य लोकांना न समजेल अशा संस्कृतप्रचुर भाषेत बोलतो वा लिहितो तो अशी एक चमत्कारिक समजूत झाली आहे. तसेच परिभाषा म्हणजे संस्कृताचा अतिरेक हवाच. शासनाच्या कोशातून अशा सहज आकलन न होऊ शकणाऱ्या शब्दांची रेलचेल असते. 'सीड फार्म' म्हटले की कळते पण शासन म्हणणार की 'बीज-गुणन प्रक्षेत्र' इंजिनिअरला भेटू या असे सहज कुणी म्हणेल पण शासन सांगणार की अभियंत्याला भेटू या असे म्हणावे. प्रचलित सोप्या शब्दांऐवजी मुद्दाम घडवलेले संस्कृतप्रचुर शब्द योजून आपण 'ज्ञानप्रसारा'ला अडथळा निर्माण करीत आहोत हे लक्षात घेतले पाहिजे. भाषेवर प्रभुत्व लाभते ते माणूस जे लिहितो, जे निरंतर वाचतो, जे बोलतो त्यामुळे! आणि आपण जे लिहितो वा बोलतो ते अधिकात अधिक लोकांपर्यंत पोचू शकले तर लोकशिक्षण होईल.

आज प्रौढशिक्षण कार्यक्रमात जे लेखन-वाचन साहित्य असते ते कोणत्या भाषेत असते ? ते सर्व साहित्य प्रमाणभाषेत असते. वस्तुतः शिक्षण जर सर्व थरांत जायचे असेल तर प्रथम त्या त्या गटाच्या बोलीतून लिहिलेले साहित्य निर्माण केले पाहिजे. आदिवासी-गिरिजनांसाठी प्रमाण भाषेतील साहित्य आरंभी कुचकामी ठरेल. त्यांच्या बोलीचा उपयोग करून हळूहळू प्रमाण भाषेच्या रूपाकडे लक्ष वेधले तर शिकण्यात

आनंद वाटेल. माणसाला आपल्या भाषेत लिहिता-वाचता-बोलता आले की त्याची अस्मिता जागी होते आणि जेथून जेथून ज्ञान मिळेल तेथून तेथून ते मिळवले पाहिजे अशी उर्मी जागी होते. याबरोबरच त्याची अस्मिता जागी होते, मग आजवर ज्यांचे आवाज दबलेले होते, ज्यांना दडपले गेले होते ते अन्यायाविरुद्ध लढू लागतात. आपल्या न्याय्य हक्काची मागणी करण्यासाठी त्यांना शिक्षणच प्रेरणा देते. मात्र शिक्षण त्यांच्याच भाषेतून मिळाले पाहिजे. जनमनाची भाषा समजावून घेतल्याशिवाय शिक्षणाच्या प्रक्रियेला आरंभ होत नाही आणि शिक्षण फैलावल्याशिवाय क्रान्तीची आग भडकत नाही.

गोदावरी परूळेकरांनी वारली मुलुखात ठाण मांडले. त्यांना जाणवले की साऱ्या भावना मारून आदिवासी जगत होते. जीव घेतला, उपाशी ठेवले, बायको पळवली तरी मुकाट्याने सारे सहन करून येईल त्या प्रसंगाला मान तुकवीत होते. वेठ बिगार करीत एकेक दिवस संपून जात होता. पण त्यांच्या मनात असमाधान धगधगत होते. चीड धुमसत होती. वारल्यांच्या मनाची भाषा गोदावरीबाई आदी कार्यकर्त्यांना कळली. त्यामुळे मरगळून निपचित पडलेला वारली समाज खडबडून जागा झाला. वारल्यांना संघर्षाची भाषा समजली आणि त्यांच्यातला माणूस जागा झाला. अशा छोट्या छोट्या गटांना ज्ञानाच्या स्पर्शाने जागवले पाहिजे. जे शिकवायचे ते त्यांच्या भाषेतच मांडले पाहिजे. प्रदूषित भाषेत दिलेले शिक्षण निष्फळ ठरते.

स्वातंत्र्य मिळून तीस वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला तरी शिक्षण क्षेत्रातले अराजक वाढते आहे. संरक्षणाखालोखाल शिक्षणावर अफाट पैसा ओतूनही त्याचे फळ दिसत नाही. शिक्षणामुळे माणूस घडेल, शिक्षणामुळे चारित्र्यसंवर्धन होईल, शिक्षणामुळे स्वत्वाची जाणीव होईल, शिक्षणामुळे मन खंबीर होईल– अशा कितीतरी भाबड्या कल्पना आपण केल्या होत्या. या कल्पना, मूर्तस्वरूपात आल्या नाहीत. उलट, स्वातंत्र्यानंतर दोन नव्या भाषांचा जन्म झाला. या भाषांतून जनतेला सहज, शिक्षण मिळत गेले. या दोन भाषा म्हणजे भ्रष्टाचाराची भाषा व दुसरी हिंसाचाराची. सत्य व अहिंसा या दोन तत्त्वांसाठी आयुष्य वेचणाऱ्या गांधीजींच्या देशात भ्रष्टाचाराची, लाचखोरीची आणि हिंसाचाराची भाषा समृद्ध होत आहे याचे दुःख वाटते. समाजाचे असे एकही क्षेत्र नाही की जेथे भ्रष्टाचाराची भाषा योजली जात नाही. विद्यापीठे, न्यायालये, शिक्षणसंस्था, शासकीय कार्यालये, मंत्रालये, उद्योगधंदे, व्यापार इ. सर्व ठिकाणी भ्रष्टाचाराची भाषा एकमेकाला समजते. भ्रष्टाचाराचे शिक्षण घराघरांतून दिले जाते. भ्रष्टाचार समाजाला अधःपाताला नेतो आणि व्यक्तिमत्त्व उद्ध्वस्त करतो याची जाणीव भारतातून लुप्त होत चाललेली आहे. राज्यकर्ते आणि प्रजाजन, मालक व मजूर, विद्यापीठे व विद्यार्थी यांच्यांत सतत संघर्ष चालू आहे. कोणत्याही प्रश्नाचा निर्णय रस्त्यावर उग्र हिंसक भाषेचे तांडव सुरू झाल्याशिवाय लागत नाही. वस्तुतः उपवास हा आत्मशुद्धीचा मार्ग, सत्यासाठी लढण्याचे साधन! पण उपवास केला की कुलगुरूसुद्धा

होता येते आणि आत्मकल्याण करून घेता येते. स्वराज्य आले पण सुराज्याचा सूर्य उगवल्याचे जाणवत नाही. उपवास, मोर्चे, संप, निदर्शने, घेराओ, धरणे इ. नव्या साधनांची बेसुमार वाढ झाली आहे. कारण जनतेची ठाम समजूत आहे की हिंसाचाराची भाषाच चलनात आहे. अत्याचार, पाहून घेऊ– या नव्या भाषेच्या जोरावर सत्तापदे मिळवता येतात, संपत्ती गोळा करता येते आणि उपभोग घेत घेत धुंद होता येते. आम्हाला मिळणारे शिक्षण इतके दुबळे आहे की ते या भाषांची वाढ थांबवू शकत नाही. प्रश्न कोणताही असो तत्त्वे ठरवून ठाम निर्णय घ्यायचा व त्वरित अंमलबजावणी करावयाची, ही वृत्ती नेतृत्व स्वीकारीत नाही. प्रत्येक प्रश्न चिघळीत न्यायचा आणि हिंसक चळवळींपुढे नमावयाचे ही रीत प्रत्येक क्षेत्रात अवलंबली जाते. त्यामुळे जनतेला वाटते की शासनाला वा अन्य नेतृत्वाला ही एवढीच भाषा समजते. या भाषेतून होणारे लोकशिक्षण या देशाला अराजकाकडे नेल्याशिवाय राहणार नाही.

भारतीय मन आधुनिक अर्थाने सामाजिक आहेच कुठे ? ते आत्मकेंद्रित आहे पूर्वी ते ' मोक्षा 'च्या चिंतनात गढले होते आता ते ऐहिक ऐश्वर्य भोगण्यात गढले आहे. या मनाची भाषा भोगाची आहे. भारतीय मन अद्याप परंपरांना चिकटून आहे. ते विवेकवादी नाही. या भारतीय मनाची बैठक धड धार्मिक नाही, धड वैज्ञानिक नाही. असे हे मन बदलण्यासाठी माणुसकीच्या प्रतिष्ठेचे नवे मूल्य प्रथम स्वीकारले पाहिजे. यासाठी नव्या माणुसकीच्या भाषेचा अंगीकार करून शिक्षणाच्या प्रक्रियेला आरंभ केला. शिक्षणाने माणूस माणसापासून तुटता कामा नये; तो त्याचा मित्र बनला पाहिजे. अंधानुकरण, अनियंत्रित सुखलोलुपता, हिंसाचार, भ्रष्टाचार, इ. अनेक पाशवी प्रवृत्तींशी लढण्यासाठी सर्वंकष क्रान्तीची नवी भाषा स्वीकारली पाहिजे आणि केशवसुतांच्या शब्दात आवाहन केले पाहिजे—

**गत शतकांची पापे घोरे**
**क्षालायाला तुमची रुधिरे**
**पाहिजेत रे**

□ □

# मनोरंजनाची नवीन क्षितिजे

## हरी बारपुते

पूज्य मामांना मुलांचे खेळ व मनोरंजन याची अगदी मनापासून आवड आहे. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व फुलवण्यासाठी व त्यांच्या सर्व निष्ठा दृढ होण्यासाठी खेळ हे अप्रतिम प्रभावी साधन आहे, हे त्यांनी अनुभवले आहे.

आमच्या आचार्यकुलाच्या, शिक्षकवृंदाच्या प्रशिक्षण शिबिरात, महाविद्यालयात खेळांचा व मनोरंजनाचा कार्यक्रम अनिवार्य असतो. खेळ व मनोरंजन हे फक्त मुलांच्याच सर्वांगीण विकासास आवश्यक आहेत असे नाही, तर ती माणसाची मूलभूत गरज आहे व अन्न–वस्त्र–घराइतकीच ती प्राथमिक आहे, असे मनोवैज्ञानिक व शिक्षण-तज्ज्ञ आपणास सांगतात व हे आपण आपल्या दैनंदिन जीवनातही अनुभवतो.

पूज्य मामांनी मला आज सदतीस वर्षांपासून त्यांच्या दर्यापूरच्या प्रबोधन विद्यालयात काम करण्यास उत्तेजन दिले. प्रबोधन विद्यालयातील क्रीडांगण प्रयोगशाळेत निरनिराळे प्रयोग करण्यास मला त्यांचे नेहमी मार्गदर्शन मिळते व माझे कौतुकही होते. हे प्रयोग चांगले यशस्वी होत आहेत हे लिहिण्यास मला आनंद वाटतो.

### सामूहिक मनोरंजनाची नवीन क्षितिजे व नवीन दृष्टिकोन

(१) मनोरंजन हे लोकसंख्या विस्फोट थांबवू शकते.

(२) मनोरंजन हे प्रत्येक व्यक्तीला जास्त उत्पादनाभिमुख व कार्यक्षम बनवते.

(३) मनोरंजनामुळे समाजातील बालगुन्हेगार व असामाजिक प्रवृत्ती कमी होतात.

(४) मनोरंजन हे समाजपरिवर्तनाचे एक महत्त्वाचे साधन आहे. जात, वर्ग, वर्ण ह्या घातक प्रवृत्ती नाहीशा करते.

(५) विश्वबंधुत्व, विश्वशांती व समता जगात आणण्यास मनोरंजनाचे योगदान फार मोठे आहे.

(६) मनोरंजन हे राष्ट्राचे आत्मबल विकसित करते. लढाईच्या अथवा शांततेच्या

कालखंडात सैन्यात व नागरिकांत जितके आत्ममनोबल मनोरंजन वाढवते, तितके अणुशास्त्राचा साठा वाढवू शकत नाही.

(७) मनोरंजनाची पद्धती अथवा तंत्र प्रत्यक्ष करून पाहा. Learning by Doing कृती करून शिकणे त्यामुळे ते पुस्तकी ज्ञान अथवा Theoretical राहात नसून जीवनात कार्यान्वित होत असते.

(८) मनोरंजन हा एक खेळ अथवा Activity व्यवसाय नसून कोणत्याही गोष्टीकडे पाहण्याचा दृष्टिकोन असून जीवन जगण्याची एक पद्धत अथवा शैली आहे. Way of life or life style.

(९) मनोरंजनात स्पर्धेपेक्षा सहकार्याला जास्त महत्त्व असते.

(१०) मनोरंजन म्हणजे जीवन समृद्धी.

(११) मनोरंजन हे फावल्यावेळेस आपल्या सर्जनतेला विकसित करण्याचे एक उत्कृष्ट माध्यम.

(१२) जगातील निरनिराळ्या संस्कृतींचा मूलभूत आधार मनोरंजन हाच आहे. रिकाम्या वेळी माणसाने केलेले विचार, काव्य, अध्यात्म, कला, नृत्य, गायन, लेखन, वाचन, चिंतन, मनन, अध्ययन व विज्ञान संशोधन व आत्म्याचा परमात्म्याकडे जाण्याचा शोध म्हणजे संस्कृती.

(१३) मनोरंजन हे नागरिकत्व व नेतृत्व विकासाचे शिक्षण असूनही आपल्या भारतात त्यासाठी कुठल्याच शाळेत, महाविद्यालयात अथवा विश्वविद्यालयात हा विषय अभ्यासास ठेवलेला नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

(१४) आजच्या धकाधकी व तणावी जगात (Tension Ridden World मनोरंजन हे तणाव निवारण ( Tension Reduction ) करते.

(१५) विकसित राष्ट्रे आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाचा पाचवा हिस्सा मनोरंजनासाठी खर्च करतात; कारण त्यामुळे राष्ट्राचे ऐक्य, बळकटी व सामर्थ्य वाढते, हा त्यांचा दृढ विश्वास आहे.

(१६) राष्ट्रीय व भावनात्मक एकतेचे, एकमेव कृतिशील प्रभावी माध्यम या दृष्टीने मनोरंजनाच्या बाबतीत आपणापैकी प्रत्येक व्यक्ती, व्यक्तिगत अथवा सामूहिक मनोरंजनासाठी काय करणार आहे ? भारताच्या भावनात्मक ऐक्यासाठी स्वतः आपण काय करणार आहात ? ह्याचे उत्तर प्रत्येकाने स्वतःलाच द्यावयाचे आहे. आपल्या सूचना पाठवल्यास आम्ही आभारी होऊ.

खेळांचे मुख्य विभाग तेरा आहेत, ते येणेप्रमाणे :–

(१) मनोरंजनात्मक पी. टी. रिक्रिएटिव्ह.
(२) तालबद्ध व्यायाम ( ऱ्हिदमिक्स )
(३) जोडीने करण्याचे व्यायामाचे प्रकार– द्वंद्व हालचाली, कुस्ती, बॉक्सिंग, कराटे, जुडो, फरीगदगा, लाठीकाठी, बनेटी इ.

(४) मेजर गेम्स– कबड्डी, खो-खो, आट्यापाट्या, हॉकी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बास्केट बॉल, रकबी, सॉकर, क्रिकेट इ.

(५) मायनॉर गेम्स

(१) शिवाशिवीचे खेळ
(२) लपाछपीचे खेळ
(३) वर्तुळात खेळण्याचे खेळ
(४) साधनांसहित खेळ
(५) साधनांविरहित खेळ
(६) रिलेज
(७) ब्रेक्स

(६) ॲथलेटिक्स– मैदानी खेळ अथवा बंदिस्त जागेतील ॲथलेटिक्स–
(१) धावण्याचे प्रकार– ५० मीटर, १०० मीटर, ४०० मीटर्स, हर्डल्स इ.
(२) उडी मारण्याचे प्रकार– लांब उडी, उंच उडी व लंगड उडी इ.
(३) फेकण्याचे प्रकार– बॉल, थाळी, गोळा, भालाफेक.

(७) फॅन्सी ड्रील्स, रुमाल, बांबू, हुप-ड्रील, चमचा-बशी, जपानीज ड्रील
(८) सहली
(९) बैठे खेळ : क्रीडांगणावर
(१०) शर्यतीचे खेळ ( कॉन्टेस्ट्स )
(११) इनडोअर गेम्स, कॅरम, बुद्धिबळ, गंजीफा, चौपट, टेबल टेनिस इ.
(१२) जिम्नॅस्टिक्स, मनोरे, मॅटवर्क
(१३) मेकॅनिकल टॉइज, टॉय लायब्ररी, सायन्स गेम्स इ.

## मनोरंजनाचे अकरा मुख्य विभाग

(१) गेम्स, स्पोर्टस, ॲथलेटिक्स.
(२) साहित्य व वाङ्मय ( लिटररी ॲक्टिव्हिटी )
(३) कला–पेटिंग्ज, फाइन आर्ट्स, स्कल्पचर्स, कारागिरी, छंद.

(४) नृत्य
(५) गायन-वादन
(६) निसर्ग सौंदर्य – फुले-झाडे, प्राणी व पक्षी, तारका निरीक्षण
(७) सामाजिक उत्सव– राष्ट्रीय उत्सव, सण.
(८) शिबिरे
(९) कमर्शिअल रिक्रिएशन.
(१०) नाट्य
(११) प्रवास, शैक्षणिक सहली.

## प्रशिक्षणाची आवश्यकता

मनोरंजनाच्या या वरील विभागांत अनेक पोटविभाग आहेत. यांपैकी नऊ विभाग आपण बंदिस्त जागेत आयोजित करू शकतो; परंतु या सर्व गोष्टींसाठी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रशिक्षणाची आवश्यकता – हे प्रशिक्षण पाच दिवसांपासून पाच वर्षांपर्यंतही घेण्याची व्यवस्था आपल्या भारतात व परदेशातही आहे.

खेळ अथवा मनोरंजनाचे कार्यक्रम नियोजित करण्यासाठी खालील प्रश्न विचारा म्हणजे कार्यक्रम यशस्वी होतील. (इंग्रजीत '7 Ws' सेव्हन डब्ल्यूज)

खेळांचे व्यवस्थापन–

(1) What मनोरंजन म्हणजे काय ?
(2) Why मनोरंजन का ?
(3) Whom मनोरंजन कोणासाठी ? Age/sex/mixed groups/when where.
(4) Who मनोरंजन कोण करणार ? Skilled, leadership
(5) What's the programme ? मनोरंजनाचा कालावधी. / a day or a year.
(6) What are the equipments necessary for the programme ? मनोरंजनाची साधने.
(7) Organization and administration of recreation.

या प्रश्नांची सविस्तर उत्तरे देऊन कार्यक्रम आखल्यास नक्कीच कार्यक्रम यशस्वी होतील.

## खेळांची पुस्तके

मनोरंजनावर व खेळांवर बरेच साहित्य लिहिले गेले आहे; परंतु हिंदीत अथवा मराठीत फारच थोडी पुस्तके उपलब्ध आहेत. विशेषतः इंग्रजीत भरपूर पुस्तके

मनोरंजनावर व खेळावर उपलब्ध आहेत. पाश्चात्त्य देशात–विशेषतः अमेरिका, रशिया व युरोपमध्ये या विषयावर संशोधन करणाऱ्या संस्थाही 'Institutes for research in recreation, physical education and sports' बऱ्याच आहेत.

## मनोरंजनाच्या काही पुस्तकांची यादी

(१) मुलांचे खेळ भाग ३ : मोडक
(२) हिंदी ४१ खेळ
(३) खेल : श्री सुजातसिंग
(४) क्रीडा व मनोरंजन : प्रा. खाचनीस
(५) सहलीचा आनंद : प्रा. खाचनीस
(६) Encyclopedia of fun : E. O. HERBIN
(७) Games, contests and Relays – S. C. STALEY
(८) Active games and contests – Mithue
(९) Party games
(१०) Our physical activities : OLD Students Association, Collage of Physical Education, Kandivali

## मायनॉर गेम्स MINOR GAMES

खेळातील दहा विभागांपैकी शहरात अथवा खेड्यांत सामाजिक परिवर्तनासाठी मुला-मुलींना, तरुणांना एकदम आकर्षित करण्यासाठी ह्या खेळांचा फार उपयोग होतो. हे एक बिनखर्चाचे उत्कृष्ट साधन आहे; पण त्यासाठी प्रशिक्षणही अनिवार्य आहे.

## मायनॉर गेम्सची व्याख्या

(१) ज्या खेळांना जागा कमी लागते.
(२) साधने असली अथवा नसली तरी हे खेळ खेळू शकतो. व
(३) खेळाचे नियमही थोडे असतात. (ह्या खेळात टॅग गेम्स, सर्कल गेम्स येतात.)

खेळ शिकवण्याची पद्धती Technique अथवा तंत्र शिकवणाऱ्याने—

(१) प्रथम खेळाचे नाव सांगावे.
(२) थोडक्यात खेळाचे वर्णन करीत असतानाच प्रात्यक्षिक द्यावे व त्याचे नियम सांगावे.
(३) जेथे आवश्यक असेल तेथे चुन्याच्या पावडरने किंवा राखेने अथवा खिळ्याने ग्राऊंडवर लागतील त्याप्रमाणे मार्किंग-रेषा ओढाव्या.

(४) खेळणाऱ्या गटाला या बाबतीत शंका अथवा प्रश्न असल्यास त्या-निवारण कराव्यात.

(५) खेळ १५ ते २० मिनिटांपेक्षा जास्त लांबवू नये. खेळाचा रस संपण्या-पूर्वीच तो संपुष्टात आणावा. ' Kill the games before it dies'

(६) खेळशिक्षकानेही खेळात सामील व्हावे.

(७) शिट्टीचा योग्य उपयोग करावा.

(८) खेळशिक्षकाचा ड्रेस-युनिफॉर्म सुटसुटीत असावा.

बंदिस्त जागेतील खेळ TAG Games– शिवाशिवीचे खेळ.

(१) जागेची मर्यादा ठरवावी.

(२) एकावर राज्य द्यावे ( ' It ' ) त्याला इट् म्हणावे.

(३) शिट्टी वाजवल्याबरोबर ज्याच्यावर राज्य आहे त्याने इतर कोणालाही, दवडून शिवण्याचा प्रयत्न करावा.

(४) इतर खेळाडूंनी आपण सुरक्षित राहण्यासाठी एकमेकांच्या पाठीशी पाठ लावून व हातात हात घालून उभे राहिल्यास तुम्ही सुरक्षित आहात. तुमच्यावर राज्य येणार नाही.

(५) राज्य असणाऱ्याने सर्वांना एकएकटे पळताना शिवावे. जोड्या नेहमी बदलत असाव्या.

(६) ज्याला जोडीशिवाय It ने स्पर्श केला असेल त्यावर राज्य येते. तो नवीन It बनतो.

## १. भिडू–शोध सर्कल गेम्स




आकृती नं. १

(१) खेळणाऱ्यांनी वर्तुळात उभे राहावे. आकृती नं. १ पाहा.

(२) खेळशिक्षकांनी उभ्या असलेल्या खेळाडूंच्या १–२ म्हणून जोड्या लावाव्यात.

( ३ ) खेळणारे दोन वर्तुळात— नं. १ पहिले वर्तुळ. नं. २ दुसरे मोठे वर्तुळ. नं. २ नं. १ च्या पाठीमागे उभे राहतील.

( ४ ) खेळशिक्षकाने नं. १ ला उजवीकडे वळण्यास सांगून नं. २ ला डावीकडे वळण्यास सांगावे.

( ५ ) शिट्टी वाजल्याबरोबर नं. १ ने अँटी क्लॉक वाइज घड्याळाच्या काट्याच्या उलट दिशेने दवडावयाचे आहे.

सर्व नं. २ ने ' क्लॉक वाइज ' घड्याळाच्या काट्याच्या दिशेने दवडावयाचे आहे.

( ६ ) खेळ सुरू करण्यासाठी शिट्टी वाजवावी व खेळाडूंनी दवडावे.

( ७ ) खेळशिक्षकाने लांब शिट्टी वाजवल्याबरोबर वर्तुळ मोडून प्रत्येक नं. १ व २ नी जोडीने आपापल्या भिडूला शोधून एकदम खाली बसावयाचे आहे. म्हणजे जोड्या तयार होतील.

जी जोडी शेवटून खाली बसेल तिला सर्वांनी शिक्षा ठरवावयाची आहे.

अशा प्रकारे हा खेळ दोन-तीन वेळा घेऊन प्रथम शिट्टीस दवडणे व दुसऱ्या शिट्टीस जोडीदार पकडून खाली बसणे.

## २. विषम मनुष्य

ह्याच खेळाचा दुसरा नमुना म्हणजे जोडी ठराविक भिडू शोधण्याऐवजी दुसऱ्या शिट्टीला खेळाडूंनी कोणालाही पकडून जोडी बनवावी. ह्या खेळात एक माणूस जादा म्हणजे संख्या विषम असते. पूर्वीच्या भिडू शोधामध्ये सर्व जोड्या होत्या म्हणजे एकूण संख्या सम होती.

ज्या खेळाडूस जोडीदार मिळणार नाही; कारण खेळशिक्षक हा विषम मनुष्य कोणालाही पकडून जोडी बनवील. अर्थात कोणीतरी एक विषम व्यक्ती जोडीशिवाय राहील. त्याला गट शिक्षा देईल.

## ३. कोळी व मासे खेळाचे सर्कल ( फॉर्मेशन )

एकूण एकात एक पाठीमागे एक अशी तीन वर्तुळे बनवावी. खेळशिक्षकाने मधे उभे राहावे. नं. १ व ३ यांनी एकमेकांसमोर तोंड करून उभे राहावे व एकमेकांचे हात धरता येतील इतक्या एकमेकांजवळ उभे राहावे.



आकृती नं. २

नं. १ व ३ × फुली हे कोळी अथवा कोळीणी.

नं. २ ० शून्य हे मासे अथवा मासोळ्या.

नं. १ व नं. ३ नी हे एकमेकाचे हात सहज धरता येतील म्हणजे अंदाजे २ फूट लांबीवर एकमेकासमोर तोंड करून उभे राहावे.

नं. १ व ३ कोळी आहेत.

नं. २ हे मासे आहेत. नं. २ नी उजवीकडे तोंड करून उभे राहावे.

खेळशिक्षकाने मधे उभे राहावे व १ ली शिट्टी वाजवावी. शिट्टी वाजल्याबरोबर नं. १ व नं. ३ कोळी जिथल्या तिथेच सावधानच्या स्थितीत उभे राहतील व त्याचबरोबर नं. २ हे नं. १ व ३ च्या वर्तुळात घड्याळाच्या काट्याच्या उलट दिशेने पळतील.

खेळशिक्षकाने अनपेक्षित वेळी लांब शिट्टी वाजवावी. दुसरी शिट्टी वाजवल्याबरोबर नं. १ व ३ यांनी एकमेकांचे हात धरावे. लांब शिट्टी झाल्याबरोबर नं. २ नी एकदम पळणे थांबवून जिथल्या तिथे उभे राहाणे. नं. २ जे मासे झाले आहेत त्यांपैकी ह्या नं. १ व ३ च्या हातात जाळ्यात पकडले गेल्यास त्यांनी सुटून जाण्याचा प्रयत्न करू नये.

किती कोळ्यांनी किती मासे ( मुले ) अथवा मासोळ्या ( मुली ) पकडल्या गेल्या हे खेळशिक्षकांनी पाहावे.

दोन-तीन वेळा ह्या मासोळ्यांना नं. २ ला पळवून Running or Skipping करवून नंतर त्यांची बदली नं. १ चे जागी करावी. म्हणजे नं. १ मधे उभे राहातील व नं. २ व ३ कोळी होतील. दोन तीन वेळा त्यांना पळवून व शिट्टी वाजताच पकडलेल्या माशांची नोंद घ्यावी व नं. ३ ला मधे उभे राहण्यास म्हणजे मासे बनण्यास सांगावे.

त्यांनाही २–३ वेळा पळण्याचा व पकडले जाण्याचा अथवा सुटण्याचा मोका देऊन खेळ संपवावा.

## ४. तोबा–Whip Tag

२० ते ३० मुले अथवा मुली.

साधने– ( १ ) रुमाल ( २ ) तोबा.

- सर्व खेळाडूंनी वर्तुळांत उभे राहावे.
- खेळशिक्षकाने प्रात्यक्षिकासहित खेळाचे नियम समजावून सांगावे.
- प्रत्येक खेळाडूने आपले हात पाठीमागे ठेवून मुठी उघड्या ठेवाव्यात.
- एका खेळाडूने सर्वांच्या पाठीमागे पळत जाऊन, कोणाएका खेळाडूच्या हातात टॉवेल अथवा तोबा द्यावा.
- ज्याला तोबा दिला त्याच्या जागी आपण उभे राहावे.
- ज्या मुलाचे हाती तोबा असेल त्याने आपल्या शेजारच्या उजव्या बाजूच्या

  मुलास टॉवेलाने पाठीवर मारण्यास सुरवात करावी.

ज्या मुलाच्या हाती तोबा असेल त्याने व त्याच्या उजव्या बाजूच्या शेजारच्या मुलाने एकदम वर्तुळाबाहेरून पळण्यास सुरवात करावी व आपली जागा घ्यावी. असा हा खेळ १५ मिनिटे चालू ठेवून निरनिराळ्या मुलांवर पळण्याची व टॉवेलने वा तोबाने मारण्याची पाळी द्यावी.

२ × ३ फूट आकाराच्या कापडाच्या पिशवीत काथ्या अथवा कापूस घालून शिवून तोबा तयार करावा व तो नेहमीच उपयोगी पडेल.

## ५. तळ्यात व मळ्यात

हा खेळ बहुधा सर्वांना माहीत असावा.

- खेळाडूने एक रेघ जमिनीवर ओढावी अथवा वर्तुळ काढावे.
- त्यावर उभे असल्याप्रमाणे खेळाडूंनी उभे राहावे.
- खेळशिक्षकाने ऑन दी बँक अथवा इन दी पॉंड. तळ्यात-मळ्यात ह्या दोनपैकी एक हुकूम द्यावयाचा आहे. त्या हुकमाबरोबर रेघेच्या आत वा बाहेर उडी घ्यावयाची. तळ्यात म्हणजे आत व मळ्यात म्हणजे बाहेर.
- खेळशिक्षक खेळाडूंसमोर ८ फूटांवरून हुकूम देईल.
- अनपेक्षित रीतीने हुकूम दिल्यास पुष्कळ खेळाडू हुकमाची अमलबजावणी करण्यास चुकतात. शेवटी जी व्यक्ती शिल्लक राहाते ती चँपियन म्हणून सांगावे.

हा खेळ " शिवाजी " अथवा " ओग्राडी " म्हणतो, असाही खेळावा. जोपर्यंत शिक्षक ओग्राडी अथवा शिवाजीचे नाव हुकमाआधी सोडत नाही, तोपर्यंत खेळाडूने तो

हुकूम मानू नये. थोडीही हालचाल केल्यास खेळाडूला बाद करावे. खेळशिक्षकाने निरनिराळे हुकूम द्यावे. ओग्राडी सेज सिट डाउन म्हणजे सर्वांनी खाली बसावे. स्टँड अप हुकूम मिळाल्याबरोबर काही मुले उभी राहतील, त्यांना बाद करावे. ओग्राडी सेज स्टँड अप उभे राहा म्हणजे सर्वांनी उभे राहावे जो राहणार नाही तो बाद करावा. लवकर लवकर अनपेक्षित हुकूम देऊन शेवटी जो मुलगा–मुलगी राहील, ती जिंकली म्हणून जाहीर करावे.

( ६ ) Buzz **बैठा खेळ** : सर्व मंडळींनी वर्तुळात बसावे. गट २५ ते ३०.

खेळशिक्षकाने शिट्टी वाजवल्याबरोबर खेळास सुरुवात करावी व १ ते १०० पर्यंत आकडे-एकामागून एक प्रत्येकाने गिनती करावी. सात अथवा सातचा गुणाकार मल्टिपल अथवा पॉवर ऑफ सेव्हन ज्या व्यक्तीवर येईल तेथे त्याने तो आकडा न म्हणता त्याऐवजी ‘ बझ ’ म्हणावे. ही प्रतिक्रिया तात्काळ, वेळ न घेता झाली पाहिजे, विचार करण्यास वेळ देऊ नये. सात, चौदा, एकवीस, सत्तर, सत्त्याहत्तर इ० आकडे म्हणण्याची पाळी ज्याच्यावर येईल त्यानी बझ म्हटले नाही व आकडा म्हटला तर त्याला गटाने गमतीदार शिक्षा करावी.

## ७. पार्टी गेम्स

वाढदिवसानिमित्त, घरी मित्र अथवा पाहुणे–चहा अथवा जेवणास किंवा कोणत्याही सणानिमित्त एके ठिकाणी जमले असता चहापान अथवा जेवण ( खाणे-पिणे ) झाल्यावर गप्पागोष्टी अथवा टिवल्याबावल्या Criticism, Scandle-mongering शिवाय अथवा आजकाल राजकारण गप्पा फारच जिथे तिथे बोकाळलेल्या आहेत. त्याऐवजी रचनात्मक, सर्जनशील अर्थपूर्ण, आकर्षक असे कितीतरी खेळ खेळून मनोरंजन आपण करू शकतो. ह्या खेळांना साधनांचा विशेष खर्च न लागता आपल्या बुद्धीला, कल्पनाशक्तीला, सर्जनशीलतेला व संघकलेला, नेतृत्व कौशल्याला खूप वाव असतो.

Party Games ( पार्टी गेम्स ) Mixed Groups, Ice Breakers ( आइस ब्रेकर्स. )

आपल्या समाजरचनेत स्त्री-पुरुष विशेषतः युवायुवती सहसा लवकर समरस होत नाहीत. विशेषतः ओळख नसलेल्या व्यक्ती समारंभास अथवा काही कार्यक्रमास एकत्रित आल्यावर अनौपचारिकरीतीने एकमेकांशी सहज बोलणे व ओळख करून घेणे अवघड जाते व कित्येक वेळा परिस्थिती अवघडल्यासारखी होते. अशा परिस्थितीत ठराविक मनोरंजनाच्या पद्धतीने गट बनवून एकदम गटामध्ये एकमेकांचा परिचय होण्यास वातावरण अनुकूल होते व संकोच, लाजाळूपणा अथवा भीती सहजगत्या नाहीशी होते व सर्व गटच्या गट एकत्रित येऊन कार्यक्रमात उत्स्फूर्ततेने भाग घेतात.

शब्द बनवणे. Word Making मनोरंजन शिक्षकाने आपल्या नोटबुकमध्ये ६ अथवा ७ शब्द जे फार कठीण अथवा फार सोपेही नाहीत, इंग्रजीत ते लिहून ठेवावे व प्रत्येक शब्दाचे Spelling ( स्पेलिंग ) Alphabet नेहमीच्या शब्दाच्या Spelling प्रमाणे न लिहिता विस्कळीत करून ही मुळाक्षरे अथवा Alphabets चा आर्डर उलटासुलटा करून खेळाडूंना कागदावर लिहून घेण्यास सांगणे.

एका शब्दाचे अल्फाबेट दोनपेक्षा जास्त वेळा उच्चारू नये.

हा खेळ लहान लहान गटाने ५ अथवा ६ माणसांनी मिळून विचार-विनिमय Group–Thinking करून Spelling जुळवावे. ज्या गटाचे सर्वात लवकर होईल त्यांच्यापैकी एका प्रतिनिधीने उभे राहावे.

दहा मिनिटांनंतर किती गटांनी बरोबर शब्द जोडले हे जाहीर करावे.

साधने– पेन्सिल व प्रत्येकी कोरा कागद.

( १ ) कागदावर कोणतीही सुंदर रांगोळी काढणे–१० मिनिटे

( २ ) कोणतेही चित्र काढणे– १० मिनिटे.

( ३ ) $\frac{१}{१६}$ कागदाच्या आकारात बाहुली अथवा उंदीर, कुत्रा, मांजर, हत्ती, ससा, माकड हातानेच कापून व पेन्सिलीने रंगवा.

## आगपेट्यांच्या काड्यांचे खेळ

हे कितीतरी प्रकाराने खेळता येतात; परंतु जागेच्या अडचणीमुळे फक्त सहाच खेळ देत आहे.

### **गट पाडणे** Group formation

( १ ) आगकाड्यांनी जास्तीतजास्त मुळाक्षरे बनवणे– वेळ ७ मिनिटे.
( २ ) आगपेटीच्या काड्यांनी शब्द बनवणे.
( ३ ) वाक्य बनवणे.
( ४ ) रांगोळी, डिझाइन, घर.
( ५ ) जहाज.
( ६ ) विमान, इ.

हे खेळ व्यक्तिगत रीतीनेसुद्धा खेळता येतात. पण सामूहिक रीतीने खेळताना आपणास जितके गट करावयाचे असतील त्याप्रमाणे गट पाडावे. गट पाडतानासुद्धा त्यात ज्या संदर्भात आपली पार्टी असेल त्या पार्टीचा मुख्य उद्देश लक्षात घेऊन त्यावर आधारित गट पाडावे म्हणजे मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे एक विशिष्ट वातावरण तयार होण्यास मदत होते.

१५ ऑगस्ट अथवा २६ जानेवारीची स्वातंत्र्य अथवा गणतंत्र दिन मेळावा, दिवाळी, दसरा अथवा ईद, रमझान किंवा पार्शी झॉरेस्टर मसाईचा वाढदिवस अथवा खिस्मस पार्टी.

त्या त्या संदर्भात पार्टी-निमंत्रणे पाठविण्यातही कल्पनाशक्ती व कलेला खूप वाव मिळतो व सर्जनशीलता अथवा सर्जनशक्तीलाही वाव मिळतो व नावीन्यपूर्ण कार्यक्रम होतात. उदाहरणार्थ, आपण शाळा-कॉलेजात, गणतंत्र दिनानिमित्त ठरलेल्या चाकोरी-प्रमाणे झेंडावंदन, PT. Demonstration, मुख्य पाहुण्यांचे भाषण आभार-प्रदर्शन, फारतर गावातील ८–१० शाळा मिळून असलाच कार्यक्रम, गावातील एका शालेय पटांगणावर अथवा पोलिस ग्राऊंडवर करतो. तो एक औपचारिक समारंभ शासनाकडून हुकूम आला म्हणून व त्याच पद्धतीने हा उत्सव साजरा केला जातो.

स्वातंत्र्य मिळाल्याचा आनंद अथवा गणराज्यतंत्र दिवस याच्यात 'आनंदाला' केव्हाच 'खो' मिळालेला असतो व प्रेक्षकांचा अथवा शासनाचा हुकूम न पाळल्यास आपल्या शाळेस शिक्षा होईल या भीतीनेच, मुख्याध्यापक, शारीरिक शिक्षक व सर्वांत वाईट म्हणजे मुले पिळली जातात. प्रत्येक शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमात तेच तेच ठराविक चाकोरीचे कार्यक्रम घेतले जातात. त्याऐवजी नावीन्यपूर्ण कार्यक्रम जेथे Originality, Creativity, Novelty, Community या सर्वांना प्राधान्य मिळेल असे कार्यक्रम केले पाहिजे. त्यासाठी अर्थात ह्या मनोरंजनाच्या प्रशिक्षणाची नितान्त आवश्यकता आहे.

## सामूहिक मनोरंजनाचे कार्यक्रम आखण्याचे तंत्र

(१) सात प्रश्न विचारावे 7ws व त्यांची उत्तरे तयार असावी.

(२) मनोरंजनाच्या कार्यक्रमाची Theme अथवा विषय ठरवावा व तसे डेकोरेशन करावे.

(३) पार्श्वभूमीवर तरल Soft गायन तरंग, Tape Recording अथवा Radio गीते, भावगीते, क्लासिकल म्यूझिक इ. आयोजित करावे.

(४) ठरलेल्या वेळी कार्यक्रम सुरू करावा व पार्श्वसंगीत, म्यूझिक बंद करावे.

(५) जसजसे लोक येतील त्याप्रमाणे सुरवातीच्या कार्यक्रमात त्यांना प्रेक्षक म्हणून बसू द्यावे, बैठकीची व्यवस्था असावी.

(६) पार्टीचा टेंपो वाढत जाईल असे खेळांचे नियोजन असावे.

(७) ह्या कार्यक्रमात विविधता, वैचित्र्य, शारीरिक, बौद्धिक, सामूहिक प्रकारचे

खेळ, गमतीदार रिलेज, नाट्यछटा, नृत्य, वैयक्तिक गायन, सामूहिक गीते, चुटके, कथाकथन इत्यादी गोष्टींचा समावेश व्हावा.

( ८ ) एक कार्यक्रम दुसऱ्या कार्यक्रमात सहजरीतीने फुलांच्या माळेप्रमाणे गोवला गेला जावा.

Transition from one Item to another should be smooth.

( ९ ) आभार प्रदर्शन शेवटच्या कार्यक्रमापूर्वी करावे. शेवटी सामूहिक गीताने ( राष्ट्रगीत प्रत्येक ठिकाणी म्हणू नये ) कार्यक्रम संपवावा.

(१०) शक्य असल्यास प्रत्येकास फुले व मुलांना स्वस्त ( Fancy Presents ) पेपरमिंट अथवा टॉफीज द्याव्यात. प्रौढांना देणे शक्य असल्यास उत्तमच. कारण तेही प्रौढ बालकच असतात.

(११) सर्व कार्यक्रमाचे आयोजन एकाच माणसाने करू नये. निरनिराळ्या Items साठी ३–४ व्यक्तींनी मार्गदर्शन करावे.

(१२) From New Groups on the basis of ( 1 ) Seasons ( 2 ) Colours ( 3 ) Name of flowers ( 4 ) Cinema Stars ( 5 ) Popular Song 1st line ( 6 ) Day's of the week ( 7 ) The month in which you are born ( 8 ) Phases of the moon ( 9 ) Countries ( 10 ) States.

प्रथम सुरवातीचे कार्यक्रम ' Ice Brakers ' आइस ब्रेकर्सच्या प्रकारचे असावे. उदाहरणार्थ– सम अथवा विषम : एकी का बेकी हा खेळ–

( १ ) प्रत्येकास २० वाटाणे अथवा चणे द्यावे.

( २ ) ह्या मुद्दलावर प्रत्येक व्यक्ती या खेळात व्यापार करणार आहे.

( ३ ) प्रथमतः ज्याची आपली ओळख नाही अशा माणसांना भेटून आपल्या मुठीत सम अथवा विषम म्हणजे २, ४, ६, ८, १०, सम अथवा १, ३, ५, ७, ९, ११, १३, १५, १७, १९ विषम आकड्याचे वाटाणे आपल्या हातात घेऊन मूठ दाबून दुसऱ्या व्यक्तीस विचारील ' एकी का बेकी ? '

( ४ ) ज्या माणसास आपण विचारले व त्याने सांगितल्याप्रमाणे म्हणजे तो जर विषम म्हणून म्हणाला व तुमच्याजवळ विषम संख्येपैकी जर वाटाणे असतील, ते जितके तुमच्या मुठीत असतील ते सर्व त्याला देणे.

(५) विषमच्याऐवजी सम आकड्याचे वाटाणे २, ४, ६, ८, १० पैकी जर तुमच्या मुठीत तुम्ही ठेवले असतील तर मुठीत असलेल्या सम संख्येइतकेच म्हणजे २, ४, ६, ८, १०, १२, १४, १६, १८, २० तितके वाटाणे त्या व्यक्तीने तुम्हास द्यावे. म्हणजे तो ती शर्यत हरला.

(६) असे प्रत्येकाने प्रत्येकाला 'सम अथवा विषम' म्हणून विचारावे व नवीन नवीन व्यक्तींशी संपर्क साधावा.

(७) ८ अथवा १० मिनिटांनी शिट्टी वाजवावी व वाटाणे मोजण्यास सांगून खेळ संपवावा.

(८) कोणत्या व्यक्तीने सर्वांत जास्त वाटाणे मिळवले त्याप्रमाणे क्रमशः आकडे जाहीर करावे. ज्या व्यक्तीकडे सर्वांत जास्त वाटाणे असतील तिला फॅन्सी बक्षीस रंगीत कागदात बांधून द्यावे. हे बक्षीस हास्यस्फोट होईल असे असावे. उदाहरणार्थ, प्लॅस्टिकचा उंदीर अथवा गाढव किंवा ढेबरपोट्या शेटजी अथवा बाहुली इत्यादी.

बंदिस्त जागी सामूहिक मनोरंजनाच्या कार्यक्रमाचा एक नमुना :

(१) एकी का बेकी अथवा हॅलो How do you do ?
(२) गट पाडणे (आवश्यकतेप्रमाणे ४ ते १२ गट)
(३) शब्द बनवणे word making Alphabets assembling
(४) Match Box, Match Sticks Games – आगपेट्या व आगकाड्यांचे खेळ.

ज्या पद्धतीने व विशिष्ट विषयाबद्दल हा मनोरंजनाचा कार्यक्रम आयोजित करावयाचा असेल त्याला अनुसरून व सुसंगत असेल, अशी गट पाडण्याची पद्धती लक्षात घेऊन गट पाडल्यास पार्टीला उठाव येतो. उदाहरणार्थ, गणतंत्र दिनानिमित्त सामूहिक मनोरंजन पार्टी असल्यास गट पाडण्याच्या वेळीं राष्ट्रीय निशाणाचे रंग लक्षात घेऊन विभाग करावे. ह्यापैकी कोणताही एक रंग प्रत्येकाने मनात ठेवावा व शिट्टी वाजवल्यानंतर आपापले गट झेंड्याच्या रंगाप्रमाणे गट बनवून खाली गोल करून बसावे.

- दुसरी शिट्टी झाल्यानंतर (पुढच्या सूचना व कार्यक्रम ऐकण्यासाठी) शांतता राखावी.
- कागदावर नाट्यछटाद्वारे अथवा कृती पद्धतीनुसार जे कार्यक्रम घेणे असेल तो विषय लिहावा व प्रत्येक गटातून एकेक प्रतिनिधी गटनायक म्हणून (खेळशिक्षकाकडे) निवडून पाठवावा.

- ¤ चिठ्या टाकाव्या Draws, lots व त्या चिठ्यांवर नंबर पण टाकावे.
- ¤ खेळशिक्षकाने चिठ्यांच्या अनुक्रमांकाप्रमाणे सर्वांना काय कार्यक्रम Item आहे हे जाहीर करावे.
- ¤ गणतंत्र राज्यदिनानिमित्त या चिठ्यांवर —

(१) ऐतिहासिक घडामोडी वा प्रसंग (कोणताही)
(२) आपली राज्यघटना
(३) आदिवासींचे लोकनृत्य
(४) देशभक्तीपर सामूहिक गीते.
(५) राजपथावरच्या दिल्लीच्या देखाव्याची नाट्यछटा.
(६) धक्काबुक्कीचा कार्यक्रम, भीड इत्यादी.

## पेपर-पेन्सिल गेम्स

**प्रश्न व उत्तरे :** हा खेळ दोन गटांमध्ये. प्रत्येक गटात– साधारणतः १० ते १२ व्यक्ती– मुले-मुली मिश्र, स्त्री-पुरुष अथवा युवा व प्रौढ. असे मिश्र गट असावेत.

(१) प्रश्न विचारणाऱ्यांचा एक गट– त्यांना एका रांगेत बसवावे.
(२) उत्तर देणाऱ्यांचा दुसरा गट– त्यांना पहिल्या गटासमोर बसवावे.

**गट १ ला :** अशा प्रकारे प्रश्न विचारावेत. उदा०– प्रश्न : जर मी तुम्हाला ………… तर तुम्ही काय कराल ?

रिकामी जागा योग्य वाटतील त्या शब्दांनी भरून प्रश्न पूर्ण करावा. प्रश्न विचारल्यावर– लिहून कागदाची घडी करून आपल्या उजवीकडच्या व्यक्तीला द्यावी. नं. १ चा कागद नं. २ कडे नंबर २ चा ३ कडे याप्रमाणे शेवटचा नं. १० चा कागद नंबर १९ कडे येईल. शिट्टी वाजवल्याखेरीज कागद उघडायचे नाहीत.

उत्तर देणाऱ्या गटानेदेखील,

मी तुम्हाला……………… असे योग्य वाटेल ते उत्तर लिहून रिकाम्या जागेत शब्द लिहून वाक्य पूर्ण करून उजव्या बाजूला आपल्या शेजारच्या व्यक्तीकडे, त्याने त्याच्या शेजारच्या असे करत करत शेवटच्या १० नंबरने १ नंबरकडे चिठ्ठी द्यावी.

आता प्रश्न व उत्तरे मोठ्याने वाचावयाची आहेत.
गट नं. १ मधील १ ने प्रश्न मोठ्याने वाचावा.
गट नं. २ मधील उत्तर देणाऱ्या नंबर एकने त्याच्याकडे असलेली चिठ्ठी वाचावी.
अशा रीतीने गट १ मधला नंबर दोन प्रश्न वाचेल गट नं. २ मधला नंबर २

आपल्याकडे असलेली चिठ्ठी वाचून उत्तर देईल. अशा रीतीने हा खेळ शेवटच्या नंबरापर्यंत चालेल.

कित्येक वेळा प्रश्न मजेदार असतात. त्यांची उत्तरे तर त्यापेक्षा आणखी मजेदार, गमतीदार व हास्यस्फोट करणारी असतात. पुष्कळदा त्याचा काहीच अर्थ निघत नाही. पण पुष्कळशी प्रश्नोत्तरे मनोरंजक व हास्यास्पद असतात.

**खेळ क्र. २ :** १५ ते २० खेळाडू ( वर्तुळाकार बैटक ) ½ कागद प्रत्येकाला देणे. प्रत्येकाने खालील रिकाम्या जागा भरून आपण लिहिलेल्या शब्दाचा कागद दुमडून ( बाहेरच्या बाजूस ) शेजाऱ्याला द्यावा.

( १ ) श्री. / कुमार ········· हे
( २ ) कु. / श्रीमती ········· यांना
( ३ ) स्थळाचे ( कोणत्याही ठिकाणाचे / गावाचे नाव )—
( ४ ) वेळ ( किती वाजता ) ········· भेटले.
( ५ ) ते म्हणाले.
( ६ ) त्या म्हणाल्या.

सामूहिक मनोरंजनाचा कार्यक्रम इतका वैचित्र्यपूर्ण व सर्जनशील असावा, की त्याचा आनंद प्रत्येकाला तीन वेळा उपभोगता येईल.

ज्या मनोरंजनाच्या कार्यक्रमामुळे आपला वेळ उदात्त रीतीने घालवला गेला असा अनुभव प्रत्येक व्यक्तीला वाटतो तो खरा मनोरंजनाचा कार्यक्रम होय. हा आनंद जीवनात संजीवनी ओतल्यावाचून राहणार नाही. तसेच हा आनंद इतरांनीही लुटावा असे वाटत असेल तरच ते खरे मनोरंजन होईल. मनोरंजनाचे महान कार्य म्हणजे सर्वस्पर्शी जीवनाला संजीवन करणे हे होय.

□ □

# भाषेच्या पाठ्यपुस्तकांची निर्मिती : अनुभव व अपेक्षा

## शंकर पाटील

महाराष्ट्रात पाठ्यपुस्तकमंडळ अस्तित्वात येण्यापूर्वी म्हणजे एका तपापूर्वी महाराष्ट्रातील भाषेच्या पाठ्यपुस्तकांची ज्या प्रकारे निर्मिती होत होती तो प्रकार आणि आता निर्माण होणारी पाठ्यपुस्तके यांच्यात मोठाच तफावत आहे. पाठ्यपुस्तकमंडळ अस्तित्वात येण्यापूर्वी प्राथमिक व माध्यमिक शाळांतील पाठ्यपुस्तके ही खाजगी प्रकाशकांच्या स्वाधीन होती. ज्या प्रकाशकांचे लागेबांधे वरपर्यंत पोचत असत त्यांना आपली पुस्तके आपापल्या जिल्ह्यांतील वेगवेगळ्या शिक्षण संस्थांच्या शाळांतून लावून घेणे जमत असे. ज्या शिक्षणसंस्थांचा व्याप मोठा असे अशा संस्थांच्या शाळांतून आपली पुस्तके लावली जावीत यासाठी अन्य युक्त्याही हे प्रकाशक लढवीत असत. कधी अशा शिक्षणसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांची वर्णी पुस्तकाच्या संपादकमंडळावर लावली जात असे. मग त्या पदाधिकाऱ्याचा त्या पाठ्यपुस्तकाच्या विषयाशी काही संबंध असो वा नसो! वस्तुतः पाठ्यपुस्तकाचा विषय आणि संपादक हे नाते लक्षात घेता पाठ्यविषयाला जरूर तो न्याय देणारी, जाणती अधिकारी व्यक्तीच संपादक म्हणून निवडणे हे प्रकाशकांचे आद्य कर्तव्य होय. पण पाठ्यपुस्तकांचा पूर्वेतिहास पाहिला तर प्रकाशकांच्या कुशल व्यवहारी दृष्टीने संपादकीय दृष्टीवर नेहमी कुरघोडी केलेली आढळते. त्यामुळे पुस्तके निर्दोष स्वरूपात प्रकाशित होत नसत. त्यांच्या गुणवत्तेवर अनिष्ट परिणाम होई. कधीकधी तर संपादकमंडळ नेमताना जशा मोठ्या शिक्षणसंस्था विचारात घेतल्या जात असत, तशीच संपादकांची जातपातही लक्षात घेतली जात असे. मोठ्या शिक्षणसंस्थेने आपली पुस्तके लावावीत म्हणून पैशाची लाळूचही दिली जात असे, ही वस्तुस्थिती होती. अर्थात पुराव्याने ती सिद्ध होऊ नये याची चाणाक्षपणे आवश्यक ती काळजी घेतली जाई. विशेषतः प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांचे नशीब हे अशा प्रकाशकांच्या हाती दिले गेले होते. आता ही परिस्थिती बदललेली आहे.

२७ जानेवारी १९६७ रोजी पाठ्यपुस्तकमंडळ अस्तित्वात आले आणि शासनमान्य सुधारित अभ्यासक्रमानुसार इ. १ ते ७ च्या भाषा व भाषेतर अशा सर्वच पाठ्यपुस्तकांचे संपादन आणि त्यांचे वितरण हे काम या मंडळाकडे आले. एका अर्थाने पाठ्यपुस्तकांचे राष्ट्रीयीकरण १९६८ पासून सुरू झाले. कारण इयत्ता पहिलीची भाषापुस्तके ही याच साली मंडळाने संपादून प्रकाशित केली. मंडळ एकूण सात भाषांची पुस्तके

तयार करीत आहे. मराठी, उर्दू, हिंदी, गुजराती, कन्नड, इंग्रजी आणि सिंधी (देवनागरी व अरेबिक अशा दोन्ही लिप्यांत) या सात भाषांत ही पाठ्यपुस्तके तयार करून ती आपल्या राज्यांत उपलब्ध करून देण्याची ही पहिलीच वेळ म्हणावी लागेल. कारण खाजगी प्रकाशकांचा डोळा हा नेहमी खपाऊ पुस्तकांवर असल्यामुळे सिंधी, कन्नड अशा न खपणाऱ्या पुस्तकांकडे कोणाही खाजगी प्रकाशकाने लक्ष दिले नव्हते. मंडळाने मात्र या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या पाठ्यपुस्तकांची गरज आवर्जून लक्षात घेऊन आणि तोटा सहन करूनही त्यांच्यासाठी पाठ्यपुस्तके तयार करून ती त्यांना उपलब्ध करून दिली. यातही एक विशेष हा, की सातही भाषांतील बालभारतीवाचनमालेच्या पुस्तकांची किंमत एकच ठेवली आहे. बालभारती मराठीचे पुस्तक ज्या किंमतीत मराठी विद्यार्थ्यांना मिळू शकते त्याच किंमतीत मराठीशिवाय अन्य भाषांतील बालभारती अल्पसंख्याकांना उपलब्ध करून दिली आहे.

## भाषा-पुस्तकांचे संपादन कसे केले जाते?

प्रत्येक भाषापुस्तकांच्या मालेसाठी एक अशा एकूण सात स्वतंत्र भाषासमित्या नियुक्त करण्यात आल्या आहेत. त्या त्या भाषांच्या समित्यांवर त्या भाषांतील तज्ज्ञ अधिकारी व्यक्तींची सदस्य म्हणून नियुक्ती केली जाते. ही नियुक्ती करताना प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन, प्रशैक्षणिक व विद्यापीठीय अशा सर्व स्तरांतून सदस्यांना प्रतिनिधित्व दिले जाते. तसेच, पुरोगामी व सामाजिक दृष्टी असणाऱ्या व्यक्तींचीही निवड यासाठी केली जाते. अशा या समित्या भाषेच्या पाठ्यपुस्तकांचे संपादन करतात. मंडळाचे तज्ज्ञ अधिकारी या समित्यांचे सदस्य-सचिव या नात्याने आवश्यक ते सर्व काम पाहतात. कामानुसार या समित्यांच्या सभा आयोजित केल्या जातात. अशा सभांतून उताऱ्यांची निवड करणे, गरजेनुसार निवडलेल्या उताऱ्यांवर संस्कार करणे, अशा संस्कारित पाठांवर स्वाध्याय व प्रश्न तयार करणे ही व यांसारखी अन्य संपादकीय कामे या अशा सभा घेऊन पार पाडल्या जातात.

मंडळनिर्मित सातही भाषांतील पाठ्यपुस्तकांत एक समान धोरण असावे आणि त्यामध्ये सुसूत्रता असावी यांसाठी 'भाषासुसूत्रीकरण समिती' नावाची एक समिती असते. मराठी, उर्दू, हिंदी, गुजराती, कन्नड, सिंधी आणि इंग्रजी अशा सातही भाषासमित्यांचे अध्यक्ष हे या भाषासुसूत्रीकरणसमितीचे सदस्य म्हणून काम पाहतात. मराठी भाषा समितीचे अध्यक्ष हे या समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतात आणि मराठी भाषासमितीचे सदस्यसचिव हे याही समितीचे सदस्यसचिव म्हणून काम पाहतात. मराठी ही राज्यातील प्रमुख भाषा असल्याने भाषाविषयक पाठ्यपुस्तकांचे सर्वसाधारण धोरण हे प्रथम मराठी भाषासमितीच्या सभेत चर्चिले जाते, आणि या सर्व धोरणविषयक बाबी पुन्हा भाषासुसूत्रीकरण समितीपुढे ठेवल्या जाऊन त्यावर चर्चा होते. अशी चर्चा होऊन एक समान धोरण निश्चित केले जाते. विशेषतः इ. १ ते ७ च्या सातही भाषांतील

पाठ्यपुस्तकांचे स्थूल आराखडे या समितीत तयार होतात. या समितीवर सातही भाषा-समित्यांचे प्रतिनिधी असल्याने त्या सर्वांच्या शैक्षणिक विचारांचा लाभ घेता येतो आणि त्यांचे विचार या आराखड्यांत प्रतिबिंबित होतात.

भाषेच्या अभ्यासक्रमावर अधिष्ठित असे हे आराखडे एकदा तयार झाले म्हणजे ते डोळ्यांपुढे ठेवून या सातही समित्या आपापल्या पाठ्यपुस्तकांच्या संपादकीय कामाला सुरुवात करतात. मंडळनिर्मित भाषापुस्तकांना या समितीचे डोळस मार्गदर्शन मिळते. अशा तऱ्हेच्या मार्गदर्शनाला पूर्वीची पाठ्यपुस्तके पारखी असत. या मंडळनिर्मित पाठ्यपुस्तकांचा हा एक विशेष होय.

## पाठ्यपुस्तकांचे संपादन करताना आलेले काही अनुभव

जास्तीत जास्त लेखकांना पाठ्यपुस्तकात वाव मिळावा व अधिकाधिक व्यक्तींचा त्यात सहभाग असावा ही दृष्टी ठेवून मंडळाने इ. १ ते ७ च्या पाठ्यपुस्तकांसाठी कविता व गद्यपाठ राज्या ील प्रमुख वर्तमानपत्रांतून जाहिरात देऊन मागवण्याचा एक उपक्रम सुरुवा ीला करून पाहिला. या उपक्रमाला महाराष्ट्रातील हजारो व्यक्तींनी आपल्या कविता व गद्यपाठ पाठवून संख्येच्या दृष्टीने मोठाच प्रतिसाद दिला. या सर्व व्यक्तींना सोयीचे व्हावे म्हणून मंडळाने अभ्यासक्रमाच्या प्र ी व पाठ्यपुस्तकांचे आराखडे विनामूल्य पुरविले हो े. हेतू हा की कोणत्या पुस्तकासाठी कोणत्या पाठाची आवश्यकता आहे हे त्यांच्या लक्षात यावे, विषय कोण े निवडावे हे त्यांना कळावे, त्यातून कोणता संस्कार अपेक्षित आहे हेही समजावे, अभ्यासक्रमाची उद्दिष्टे डोळ्यां ुढे ठेवून ती साध्य होण्याच्या दृष्टीने जरूर ते पाठ मंडळाला पाठविणे त्यांना सुलभ जावे म्हणून पुस्तकांचे आराखडेही उपलब्ध करून दिले. परंतु मंडळाला जो प्रतिसाद मिळाला तो तितकासा समाधानकारक आढळला नाही. एवढा डोंगर पोखरून उंदीरही हा ी आला नाही. मंडळाने भाषा पुस्तकांसाठी कविता व गद्य पाठ लेखकांनी पाठवावेत म्हणून वर्तमानपत्रांतून जाहिरात दिल्यावर हस्तलिखितांची रीघ लागली. अगदी शाळकरी मुलांनीसुद्धा साहित्य पाठवले. कविता तर ‘ गवताऐशी उदंड ’ याचा अनुभव आला. पाठ्यपुस्तकासाठी लेखन करू पाहणारी शेकडो नव्हे, तर हजारो व्यक्ती महाराष्ट्रात आहेत याचे नवल वाटले. बारेमाप साहित्य मंडळाकडे आले; पण त्यातून हाती मात्र काही लागले नाही. झाले असे, की ज्यांच्यापासून अपेक्षा होती अशा नामवंत लेखकांनी या जाहीर आवाहनाला फारसा प्रतिसाद दिला नाही. हा अनुभव लक्षात घेऊन पुढे जाहीररीत्या पाठ मागविण्याचा उपक्रम सोडून द्यावा लागला. सध्या मंडळाची सर्व भिस्त मराठीत उपलब्ध अशा साहित्यावर असून उताऱ्यांची निवड ही प्रामुख्याने प्रकाशित पुस्तकांतूनच केली जाते. मात्र अभ्यासक्रमातील एखाद्या विषयावर जेव्हा योग्य असा उतारा उपलब्ध साहित्यातून पुष्कळ शोधूनही मिळाला नाही तर योग्य लेखकांकडून अशा विषयांवर पाठ लिहून घेतले जातात.

यातून एक गोष्ट जाणवली ती ही की नामवंत जाणकार अशा लेखकांचे पाठ्य-पुस्तकासाठी लेखनसाह्य घ्यायचे तर ते असे दुरून घेता येत नाही. त्यासाठी आपुलकीचे नाते जोडावे लागते. नव्या पिढीसाठी आपणही लेखनसाह्य देत आहोत ही त्यांची अस्मिता जागी करावी लागते. प्रतिभावंतांच्या लेखणीचा लाभ घ्यायचा तर ती एक कला हस्तगत करावी लागते. मग ही मंडळीसुद्धा आपण देऊ त्या विषयावर आनंदाने लिहायला तयार होतात. पण खरी किमया पुढेच असते. प्रथितयश लेखकाचे सहकार्य मिळवणे हे एका दृष्टीने सोपे असते, पण अशा लेखकांनी लिहिलेल्या पाठावर समितीने काही सूचना दिल्या आणि त्या सूचनांच्या संदर्भात त्या पाठांचे त्यांच्याकडून पुनर्लेखन करून घेण्याची वेळ आली म्हणजे तेथे अगदी कसोटी लागते. बरे, आपण आग्रह करून त्यांना लिहिते केले असल्यामुळे त्यांचा पाठ तसाच बाजूलाही ठेवता येत नसतो किंवा आपण त्याचे पुनर्लेखन केले तर तेही चालत नसते. अशी वेळ आली म्हणजे लेखकाला समक्ष भेटून हे सगळे नीट समजावून देऊन गोडीगुलाबीने त्यांच्याकडून पुनर्लेखन करून घ्यावे लागते.

समितीच्या सदस्यसचिवाची ही अगदी कसोटी असते. अशा वेळी या सर्व प्रति-भावंत मंडळींशी आपली आजवर जोपासलेली नातीच फक्त उपयोगी पडतात, तीच कामी येतात. गेल्या काही वर्षांतला माझा अनुभव लक्षात घेता ही एक मोठी अवघड कामगिरी आहे असे मला म्हणावेसे वाटते. पण साहित्य क्षेत्रातील माझी थोडी पुण्याई आणि या मंडळींशी असलेली माझी नाती यांनी मला सतत हात दिला आणि म्हणूनच वि. स. खांडेकर, वि. द. घाटे, ग. दि. माडगूळकर, श्री. ना. ग. गोरे अशा श्रेष्ठांच्या-कडूनही मला सहकार्य लाभले.

भाषेच्या पुस्तकातील गद्य वा पद्य उतारा ही एक स्वतंत्र कलाकृती असते. तिचा घाट हा जन्माला यावा लागतो. तो एक नैसर्गिक आविष्कार असतो. अशा कलाकृतीवर पाठ्यपुस्तकांसाठी आणखी काही पैलू पाडून द्या किंवा काही काटछाट करून द्या असे सांगणे हेही जिवावर येते आणि संपादकांच्या अपेक्षेप्रमाणे आपल्या कलाकृतींवर केवळ पाठ्यपुस्तकाच्या सोयीसाठी असे आघात करणे हे त्या कलाकृतीच्या कर्त्याच्याही जिवावर येते. हे काम किती नाजूक असते याचे एक ताजे उदाहरण सांगण्यासारखे आहे. १९७९–८० या शालेय वर्षी इयत्ता दुसरीचे 'बालभारती-मराठी' हे नवे पुस्तक येणार आहे. या पुस्तकाचे संपादन करत असताना अगदी नुकतीच घडलेली गोष्ट आहे. या पुस्तकासाठी 'सांग ना आई' या नावाची मंगेश पाडगावकर यांची एक कविता आम्ही निवडली. लहान मुलांना निसर्गातल्या अनेक गोष्टींचे कसे कुतूहल असते हा आशय मोठ्या खेळकरपणाने या कवितेत आला आहे. मुलांना ती निश्चित आवडेल असा विश्वास आहे. पण ही कविता तीनच कडव्यांची असल्याने आणखी एक दोन कडवी कवींकडून वाढवून घ्यावीत असे समितीला वाटले. आता पाडगावकरांच्याकडून हे

करवून घेण्याची जोखीम माझ्यावर आली. मी त्यांना पत्र लिहिले. त्या पत्रात असेही लिहिले :–

'या कवितेत आणखी दोन कडव्यांची भर पडल्यास ती शिकवण्याच्या दृष्टीने सोईची होईल. अगदी शेवटच्या कडव्यात कवितेतील मुलगा दिवसभर काम करणाऱ्या आपल्या आईला तू थकत कशी नाहीस? असे कुतूहलाने विचारतो असा आशय त्यात यावा अशी आमची अपेक्षा आहे. त्यामुळे तुमच्याच भाषेत बोलायचे तर कवितेला टोक येईल.'

हे पत्र मी लिहिले आणि केवळ यावरच विसंबून न राहता समितीचे एक सदस्य सुप्रसिद्ध कवी श्री. नारायण सुर्वे हे मुंबईत असल्यामुळे त्यांच्याकडूनही त्यांच्यामागे लकडा लावला.

आमच्या आग्रहामुळे श्री. पाडगावकर यांनी आवश्यक ते सहकार्य दिले. मुलांना एक चांगली कविता मिळाली. पण त्यांनी मला जे पत्र लिहिले ते फार बोलके आहे. त्यावर भाष्य करण्याची मुळीच गरज नाही. ते मी जसेच्या तसे उद्धृत करत आहे. ते लिहितात :—

प्रिय शंकर पाटील यांस,
सप्रेम नमस्कार.

नारायण सुर्वे आणि तुम्ही अशा दोघा बलदंडांनी माझा गळा पकडल्यानंतर मी काय करणार? पुस्तकात छापलेल्या माझ्या कवितेला समितीचा चाकू घेऊन टोक काढण्याची तुमची कल्पना ग्रेट आहे! पुढील दोन कडवी अशी चालतील?—

**समितीवर असूनसुद्धा**
**सांग ना आई,**
**सुर्व्यांचे डोके कसे**
**फिरत नाही?**

**कवितांना टोके काढून**
**सांग ना आई,**
**पाटलांचा चाकू कसा**
**झिजत नाही?**

वरील दोन कडवी ही माझी तुम्हांला 'पर्सनल भेट' आहे. या कडव्यांचे मानधन नको!

आता मूळ मुद्दा : तुमच्या १८ मेच्या पत्राप्रमाणे आणि सुर्व्यांनी केलेल्या टेलिफोन-प्रमाणे मूळ कवितेत शेवटी दोन कडवी add करून कविता या पत्रासोबत पाठवीत आहे. हे काम केवळ तुम्ही दोघांनी गळ घातल्यामुळे केले आहे! माझी वाङ्मयीन

आत्मनिष्ठा की काय म्हणतात ती अवघड जागी गळू झाल्याप्रमाणे दुखू लागली आहे! कवितेची पोच न विसरता द्यावी.

तुमचा

**मंगेश पाडगावकर**

भाषेच्या पाठ्यपुस्तकांचे संपादन करताना अशी नाजूक कामे किती कौशल्याने करावी लागतात हे यावरून दिसून येईल. अशा वेळी संपादकांची साहित्य क्षेत्रातील या मंडळींशी असलेली नातीच उपयोगी पडतात.

## पुस्तक जास्तीत जास्त निर्दोष होण्याच्या दृष्टीने मंडळ कोणती काळजी घेते?

अभ्यासक्रमातील उद्दिष्टे साध्य होण्याच्या दृष्टीने अनुरूप अशा उताऱ्यांचीच कसोशीने निवड केली जाते. ही निवड करताना मुलांचा वयोगट, त्यांचे पूर्वज्ञान, त्यांची आकलनशक्ती, त्यांचे भावविश्व ही व अन्य सर्व संबंधित बाबी विचारात घेऊन उतारे निवडले जातात. क्लिष्ट शब्दयोजना, दुर्बोध वाक्प्रचार, अवघड संबोध किंवा संकल्पना बदलण्याची आवश्यकता असल्यास तेही बदलले जातात. इयत्ता १ ते ४ च्या पाठ्य-पुस्तकांची रचना करताना भाषिक कौशल्यावर (Language skills) भर दिला जातो. शब्दयोजना, वाक्यरचना या काळजीपूर्वक विचारात घेतल्या जातात आणि श्रेणीबद्ध शब्दरचनेकडे लक्ष पुरवले जाते– विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती इयत्तावार वाढत जाईल हेही पाहिले जाते. तसेच, खालच्या इयत्तांतील मुलांसाठी कवितांची निवड करताना ज्या कविता त्यांच्या तोंडी घोळत राहतील अशा नादमाधुर्य असलेल्या गेय कविता अधिक निवडल्या जातात.

## चाचणी : एक नवा उपक्रम

हस्तलिखित तयार झाल्यानंतर ते लगेच त्या स्वरूपातच निर्मितीसाठी सादर केले जात नाही. त्याला चाचणी दिली जाते. चाचणीच्या प्रती या अनुभवी शिक्षक, लेखक, संपादक, शिक्षणतज्ज्ञ, प्रशिक्षणसंस्था इत्यादींकडे पाठवून त्यांच्या प्रतिक्रिया मागविल्या जातात. त्यासाठी त्यांना एक प्रश्नावली दिली जाते. त्यांच्याकडून आलेल्या प्रतिक्रियांचा विचार संबंधित समित्या करतात. त्या संदर्भात आवश्यक ते सर्व संस्कार व सोपस्कार या हस्तलिखितावर केले जातात; व त्यानंतरच अंतिम मुद्रणप्रत तयार केली जाते.

चाचणीप्रत आणि चाचणी झाल्यानंतर त्यावर येणाऱ्या सूचना आणि अभिप्राय यांच्या संदर्भात सर्वंकष विचार करून समितीने तयार केलेली ही अंतिम मुद्रणप्रत यांत डोळ्यांत भरण्यासारखा बदल झालेला आढळून येतो. गेल्या दहा-अकरा वर्षांच्या माझ्या

संपादकीय अनुभवावरून मला असे ठामपणे म्हणावेसे वाटते की पाठ्यपुस्तकांची चाचणी हे एक वरदानच होय. चाचणीपूर्वी तज्ज्ञांनी कितीही विचार करून आणि जरूर ती सर्व काळजी घेऊन अगदी साक्षेपाने नेटके संपादन केले तरीही चाचणीप्रतीवर येणाऱ्या प्रतिक्रिया या अतिशय मोलाच्या असतात. वेगवेगळ्या स्तरांवरील वेगवेगळ्या व्यक्ती आणि संस्था यांच्याकडून येणाऱ्या सूचना या काही वेळा इतक्या नवीन असतात की त्या पाहिल्यावर आपणच थक्क होतो! सतत महिनोमहिने हस्तलिखितातील उताऱ्यांचा पुनःपुन्हा विचार करून जे अंतिम रूप आपण दिलेले असते ते अंतिम मुळीच नसते याची जाणीव प्रकर्षाने या चाचणीमुळे होते. जे कधी आपल्या ध्यानीमनीही नसते अशा अगदी वेगळ्या प्रतिक्रियाही येऊ शकतात, आणि त्यांचा विचार अगत्याने करणे हे आवश्यक होऊन बसते. अगदी अलिकडचे एक ताजे उदाहरण द्यायचे तर इयत्ता दुसरीच्या नव्या बालभारती मराठी पुस्तकाला आम्ही चाचणी दिली. या पुस्तकाच्या हस्तलिखितात ‘ गोगलबाई बारशाला जातात ’ या नावाचा एक पाठ आहे. या वयोगटाच्या मुलांना तो निश्चित आवडेल असे त्यांचे स्वरूप आहे. मंद चालीच्या गोगलबाई बारशाला म्हणून निघतात खऱ्या; पण त्या जाऊन पोचतात त्या वेळी लग्नसमारंभ चालू असतो. बारसे केव्हाच होऊन गेलेले असते! असा या पाठाचा शेवट आहे.

गोगलबाईच्या मंद चालीवरील ही एक कविकल्पना आहे. पाठाच्या शेवटी जो लग्नसमारंभ चालू असतो त्या वर्णनात थोडा थाटमाट आला आहे. या पाठाच्या उताऱ्यात कुणाला काही खटकेल असे आम्हा कोणाच्या मनात सुतराम आले नव्हते. पण यावरही एक प्रतिक्रिया अशी आली की तिचा विचार करणे अगत्याचे झाले. एका प्रतिसादकाने आम्हांला कळवले.

‘ बदलत्या आधुनिक काळाचा विचार करता थाटामाटाचे लग्न म्हणजे निव्वळ अनाठायी खर्च. भारतासारख्या गरीब देशाला तो न परवडणारा आणि म्हणून लग्नसोहळा हा थाटामाटाचा दाखवू नये. बदलत्या परिस्थितीचा कल लक्षात घेऊन त्यात साधेपणा यावा. बालमनावर होणारा परिणाम लक्षात घेतला पाहिजे आणि काळाशी अनुरूप असा त्यांचा कल जोपासला पाहिजे. ’

हे केवळ एक वानगीदाखल उदाहरण दिले. अशी कितीतरी उदाहरणे देता येण्यासारखी आहेत. पाठ्यपुस्तकांना चाचणी देण्याची प्रथा आपल्याकडे पूर्वी नव्हती. मंडळनिर्मित पाठ्यपुस्तकांना हा एक मोठा लाभ झाला आहे. या अशा चाचणीतून अनेकांचे विचार कळतात. हस्तलिखितात कितीतरी दुरुस्त्या सुचवल्या जातात. त्या कधी भाषादोषांच्या असतात; कधी चुकीचे संदर्भ लक्षात आणून देणाऱ्या असतात; तर कधी वस्तुनिष्ठ चुकाही दाखवल्या जातात. आणि म्हणून पाठ्यपुस्तकांची चाचणी हे एक मला वरदान वाटते.

पुढे हे पुस्तक निर्मितीच्या अवस्थेत असतानासुद्धा गॅली प्रुफांपासून मशीन प्रुफांपर्यंत मंडळाचे संबंधित अधिकारी डोळ्यांत तेल घालून काम पाहतात. प्रुफांच्या अवस्थेतही

काही दोष आढळले तर त्या वेळीदेखील ते दुरुस्त करण्यात येतात. हे करत असताना कधीकधी पाठातील अनावश्यक भाग गाळला जातो. पण अनवधानाने त्या भागावर विचारलेला प्रश्न त्या पाठाच्या शेवटी विचारलेल्या प्रश्नांत राहून जातो; व पुस्तक छापून बाहेर पडल्यानंतर ते कळून येते. म्हणून संपादन करताना सर्व बारीकसारीक गोष्टींकडे विशेष लक्ष पुरवावे लागते. इतके करूनही व आवश्यक ती काळजी घेऊनही काही दोष नकळत राहूनही जातात. या संदर्भात एक अनुभव सांगण्यासारखा आहे.

बालभारती मराठी इ. ६ वी, या पुस्तकाची अंतिम मुद्रिते मुद्रणालयातच पाहत असताना अगदी शेवटच्या क्षणी एका पाठातील मजकुरात बदल करणे मला अगत्याचे वाटले. आसाममधील 'काझीरंगा' या अभयारण्याचे वर्णन या पाठात आहे. पाठाच्या शेवटी कालिदासाच्या मेघदूतातील दोन ओळी लेखकाने उद्धृत केल्या होत्या. त्या संस्कृतात असल्यामुळे आणि संस्कृत या विषयाचा या इयत्तेतील मुलांना अद्यापि परिचयही न झाल्याने त्या ओळी पाठात राहू देणे मला योग्य वाटले नाही. त्यावर टीका होण्याचाही संभव जाणवला. वस्तुतः छपाईच्या या टप्प्यापर्यंत हे पुस्तक येईतोवर अनेक वेळा या पाठाचे समितीनेही वाचन केले होते. संपादकीय सर्व सोपस्कारही त्यावर झाले होते. या पुस्तकाच्या हस्तलिखिताला चाचणीही दिली होती. या चाचणीच्या निमित्ताने चारपाचशे व्यक्तींच्या नजरेखालून हा पाठ गेला होता. परंतु या सर्व अवस्थांतून या दोन ओळी सहीसलामत शेवटपर्यंत कशा नजरेतून सुटल्या होत्या हे एक आश्चर्यच म्हणायला हवे! पण पाठ्यपुस्तकांच्या संपादनात अशी आश्चर्ये ही अपरिचित नसतात. म्हणूनच कोणतेही पाठ्यपुस्तक हे अगदी निर्दोष व परिपूर्ण असू शकत नाही याचे कारण हेच. मला हा दोष आढळल्याबरोबर मी माझ्या अधिकारात संस्कृतातल्या त्या दोन ओळी काढून टाकल्या. पुस्तक निर्दोष होण्याच्या दृष्टीने त्या ओळी काढल्या हे चांगले झाले आणि ऐन वेळी हा दोष दिसून आला याच आनंदात मी होतो. परंतु पुस्तकाची छपाई झाली. ते बाजारात आले. महाराष्ट्रातील शाळांतून ते शिकवले जाऊ लागले. काही काळ लोटला आणि एक दिवस एका शिक्षकांचे एक पत्र आले. त्यांनी लिहिले होते :

इयत्ता सहावीच्या बालभारती मराठी पुस्तकात 'काझीरंगा' या पाठावरील 'अभ्यास' या सदराखाली काही प्रश्न आहेत. त्यांत एका प्रश्नाचे उत्तर सबंध पाठ पुनःपुन्हा काळजीपूर्वक वाचूनही आढळत नाही. प्रश्न असा आहे :

'मेघदूत काव्य कुणी रचले? लेखकाला मेघदूताची आठवण का झाली?'

शिक्षकाने विचारलेली ही शंका वाचताक्षणीच डोक्यात एकदम लख्खकन् प्रकाश पडला! अगदी शेवटच्या क्षणी मशीनप्रुफामध्ये पाठातील जो मजकूर आपण गाळला त्यावर विचारलेला प्रश्न तसाच अनवधानाने राहून गेला. एक चूक दुरुस्त केली. ती दुरुस्त करताना दुसरी चूक करून ठेवली. पाठ्यपुस्तकांचे संपादन करीत असताना अगदी शेवटची यंत्रमुद्रिते तपासेपर्यंत किती जागरूक असावे लागते आणि डोळ्यांत तेल

घालून सदैव कशी सावधपणे पाहणी करावी लागते याचे वानगीदाखल दिलेले हे एक उदाहरण.

याच संदर्भात आणखी एक उदाहरण देण्यासारखे आहे. ही आठवण आहे इयत्ता पाचवीच्या बालभारती मराठी या पुस्तकाच्या संपादनावेळची. 'मोती' नावाची एक कथा या पुस्तकात समाविष्ट केली होती. कुत्रा हा मुलांचा आवडता प्राणी आहे हे लक्षात घेऊन, मुद्दाम या पाठाची योजना केली होती. कथेतील हा मोती घरच्या सगळ्यांचा आवडता असतो. त्याचा सगळ्यांना लळा लागलेला असतो; परंतु एक दिवस अचानक तो नाहीसा होतो. खूप शोध करूनही तो सापडत नाही. घरच्या सगळ्यांनाच फार वाईट वाटते. आणि पुढे काळाच्या ओघात हे दुःख विसरूनही जाते. असेच एक वर्ष लोटते आणि पुन्हा एक दिवस अचानक एका भटक्या जमातीच्या पाली गावा-शेजारच्या माळावर येतात आणि एक मरतुकडे कुत्रे आपले घर शोधत येते. त्याची शेपटी तोडलेली असते. कानही कातरलेले असतात. अंगावर काही ठिकाणी डागल्याच्या खुणा दिसत असतात. असे विद्रूप झालेले हे कुत्रे हक्काच्या घरात यावे तसे या घरात येते. प्रेमाने सगळ्यांना चाटू लागते. पहिल्यांदा त्याची ओळख पटत नाही. पण लगेच थोड्या वेळात सर्वांच्या लक्षात येते की आपला हरवलेला 'मोती' तो हाच. मग ते त्याला प्रेमाने जवळ घेतात, कुरवाळतात.

असा कथाभाग असलेली ही कथा या पुस्तकात घेतली होती. विषय मुलांच्या आवडीचा होता; आणि त्यातून होणारा संस्कारही बालमनावर ठसण्यासारखा होता. कुत्रा हा प्राणी किती इमानी असतो; आपल्या धन्याला तो कधीच कसा विसरू शकत नाही, हे न सांगताही भागण्यासारखे होते. एक चांगला पाठ संपादल्याचा आनंद आम्हा सर्वांना वाटत होता. पण हे पुस्तक छापून बाहेर आले. शाळांतून ते शिकवले जाऊ लागले. आणि एक दिवस अचानक एका गावच्या ग्रामपंचायतीने या पुस्तकातील या पाठाचा निषेध करणारा एक ठराव मंडळाकडे रजिस्टर पोस्टाने पाठवला. निषेधाचा तो ठराव वाचून आम्ही अगदी सर्द झालो. या निषेधाचे कारण म्हणजे या पाठात एका विशिष्ट भटक्या जमातीचा आलेला उल्लेख आणि त्या जमातीतील लोकांनी हे कुत्रे चोरून नेले व त्यास विद्रूप केले हे सूचित करणारा जो मजकूर होता, तो त्यांच्या भावना दुखावणारा होता. ज्या भटक्या जमातीचा उल्लेख पाठात करण्यात आला होता त्या जमातीतील बहुसंख्य लोक त्या गावी स्थायिक झाले होते. या पाठाने त्या समाजाची नालस्ती व बदनामी होत असल्याने तो संदर्भ पाठातून काढून टाकण्याची त्यांनी मागणी केली होती.

पुढे पुस्तकाच्या पुनर्मुद्रणात आवश्यक ती दुरुस्ती करण्यात आली, पण या आणि या तऱ्हेच्या प्रतिक्रिया पाहून असे वाटते, की कोणाच्या भावना कशा दुखावल्या जातील हे कळणे सोपे नाही. त्यासाठी भाषेचे पाठ्यपुस्तक संपादताना संपादक मंडळास उताऱ्यांची निवड करताना फार काळजी घ्यावी लागते. —नव्हे, घ्यावी तितकी काळजी ही थोडीच

असते. अनुभवानेच हे शहाणपण येऊ शकते असे आता अनुभवानेच मी अनुमान काढले आहे. उतारा निवडताना केवळ त्याची वाङ्मयीन गुणवत्ता विचारात घेऊन चालत नाही. केवळ अभ्यासक्रमातील उद्दिष्टे तो सफल करणारा आहे एवढे बघून भागत नाही. शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्या कसोट्यांवरच केवळ गद्य वा पद्य उताऱ्यांची निवड करणे चुकीचे ठरते. ते सर्व निकष तर उतारा निवडीच्या वेळी लावावे लागतात; पण त्याशिवाय अन्य अनेक कसोट्यांवरही तो उतारा पारखून घ्यावा लागतो. गेल्या काही वर्षांचा भाषेच्या पाठ्यपुस्तकांचा माझा अनुभव लक्षात घेता मला असे वाटते, की आपल्या देशातील राजकीय जागृतीबरोबर आपल्या हक्कांची, अधिकारांची एक नवी जागृती दिसून येते. सामाजिक जाणिवाही कल्पनेपेक्षा हळव्या झालेल्या दिसतात. कसल्याही तऱ्हेचा जातिवाचक शब्द तो कोणत्याही कारणासाठी आला तरी एखाद्याच्या मनाला तो चावा घेऊ शकतो. अस्पृश्यता निवारण्यासाठी पंढरपूरच्या विठ्ठलमंदिरापुढे प्राणांतिक उपोषणाला बसून आत्मार्पण करण्यास सिद्ध झालेल्या साने गुरुजींच्या पाठातील जातिवाचक शब्दही आज लोकांना झोंबतात, व त्यामागील हेतूही लक्षात घेतला जात नाही असे दिसून येते.

काळ किती बदलला आहे याचे आणखी एक उदाहरण देण्यासारखे आहे. इ. ५ वी च्या बालभारतीत श्री. वा. भा. पाठक यांची 'शिवराय आणि बालवीर' ही एक जुनी सुप्रसिद्ध कविता समाविष्ट केली आहे. कित्येक मराठी वाचनपाठमालांतून ती आजवर घेण्यात आली आहे. गेली तीस-चाळीस वर्षे महाराष्ट्रात ती शिकवली गेली आहे. अनेक पिढ्यांना ती मुखोद्गतही असेल. नुसते 'खबरदार, जर टाच मारुनी जाल पुढे चिंधड्या, उडविन राइराइएवढ्या!' एवढे म्हटले तरी या कवितेची आठवण अनेकांना सहजी होण्यासारखी आहे. कर्तव्यनिष्ठ सावळ्याचे व गुणग्राहक शिवरायाचे या कवितेत बहारदार वर्णन केलेले आहे. परवा-परवापर्यंत या कवितेत काही खटकण्यासारखे आहे हे कुणाच्या ध्यानीमनी कधीच आले नसावे. आम्हीसुद्धा ही कविता अगदी डोळे झाकूनच निवडली. हे पुस्तक १९७० साली प्रथम प्रसिद्ध झाले. त्यानंतर परवा म्हणजे जवळजवळ आठ वर्षांनी एका प्राथमिक शिक्षकांनी आम्हांला पुढीलप्रमाणे पत्र लिहून कळवले :

"या कवितेतील 'आपण मोठे दाढीवाले आहा वीर बायकी, किती ते आम्हांला टाउकी' या ओळींतील 'वीर बायकी' हा शब्द खटकतो. विशेषतः वर्गातील मुली नाराज होतात व त्यांच्यात मनोगंड निर्माण होतो. हा शब्द मुलींना अपमानकारक वाटतो. स्त्रिया वीर नाहीत का? पुरुषांनाही लाजवणाऱ्या वीर स्त्रिया भारतात झाल्या आहेत. 'वीर बायकी' या शब्दामुळे स्त्रियांचा आदर्श नष्ट होतो. तरी सदरहू शब्दांबद्दल दुसरा शब्द उपयोगात आणावा किंवा सदर कविता रद्द करावी ही विनंती आहे."

हे पत्र वाचूनही आम्ही सर्द झालो. हे व वर दिलेली उदाहरणे केवळ एवढ्याचसाठी दिली की त्यावरून अलीकडे काळ किती बदलला आहे. अनेक नव्या गोष्टींच्या

जाणिवा कशा आता निर्माण झाल्या आहेत हे लक्षात यावे. कुणाच्या कशाने आणि कशा भावना दुखावल्या जातील त्याचा अंदाज करणे फार अवघड होऊन बसले आहे. म्हणून भाषेच्या पाठ्यपुस्तकांचे संपादन ही एक तारेवरची कसरत आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. उतारे निवडताना या सगळ्या गोष्टींचा विचार मनाच्या कुठल्या तरी कप्प्यात सतत चालू ठेवावा लागतो. कपड्याच्या अस्तरासारखा तो त्याला चिकट-लेलाच असावा लागतो.

जातिवाचक शब्दांप्रमाणेच देवदेवतांची नावेसुद्धा अनेकांना हल्ली बोचू लागली आहेत. पाचवीच्या बालभारती मराठी पुस्तकात ' माझ्या भाग्यरेषा ' या नावाचा महाराष्ट्रातील थोर शिल्पकार नानासाहेब करमरकर यांचा एक पाठ आम्ही दिला आहे. या पाठात आपल्या बालपणच्या आठवणी त्यांनी सांगितल्या आहेत. शिल्पकार म्हणून आपल्या उत्तर आयुष्यात ते नावारूपाला आले. याची बीजे त्यांच्या बालपणातच कशी रुजलेली दिसतात, शिल्पकार होण्यासाठी त्यांनी कशी वाटचाल केली हे त्या आठवणींतून दिसून येते.

मुलांना या त्यांच्या आठवणीतून स्फूर्ती घेता यावी असे या पाठाचे स्वरूप आहे. या दृष्टीने या पाठाकडे पाहिले तर या पाठाची निवड केल्याबद्दल समाधान वाटते. पण या पाठात आपण सुरुवातीला गणपती करायला शिकलो हे सांगत असताना ' गणपती ' हा शब्द सात-आठ वेळा आला आहे. ही गोष्ट काही पुरोगामी दृष्टी असणाऱ्या व्यक्तींना आवडली नाही. ' गणपती ' हा शब्द किती वेळा आला आहे याची त्यांनी खानेसुमारी केली आणि पाठाचा हेतू लक्षात न घेता या पाठावर कडक टीका करण्यात आली. ' तुम्ही बाल-मनावर कोणते संस्कार करणार आहात ? ' असा जाब विचारण्यात आला. वस्तुतः पाठाचा उद्देश स्पष्ट होता.

एका कलावंताच्या बालपणाच्या आठवणी मुलांच्या मनावर अन्य कोणता संस्कार करणार ? पण मूळ हेतू लक्षात न घेता व ज्या संदर्भात शब्द उपयोगात आणले आहेत ते संदर्भ डोळ्याआड करून असा विपर्यासही केला जातो. इतकी पराकोटीची एकांतिक भूमिकाही घेतली जाते.

अशा वेळी आपण कोणती भूमिका घ्यायची, केवळ अशा टीकेला घाबरून मुलांना अशा चांगल्या पाठांपासून वंचित करायचे का, याचा साकल्याने विचार करून संपादकीय धोरण कणखर ठेवण्याची वेळ आली आहे हे मी जाता जाता सुचवू इच्छितो. योग्य टीकेचा जरूर आदर करावा पण अयोग्य टीका असेल तर अशा टीकेची कितपत कदर करावी हेही ठरवावे लागेल. भाषेच्या पाठ्यपुस्तकांचे संपादन हे भावी कालात आणखी जोखमीचे होईल याची चाहूल यातून मला लागते आणि म्हणूनच अशा वेळी काही बाबतींत कणखर राहिले पाहिजे हा इशाराही द्यावासा वाटतो.

पाठ्यपुस्तके सर्वंकष होण्याच्या दृष्टीने संपादकांना अद्ययावत साहित्याशी परिचय ठेवावा लागतो. पाठांची निवड ही केवळ मुद्रित ग्रंथांतूनच न करता मासिके, साप्ताहिके

इत्यादी नियतकालिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या योग्य अशा लिखाणांतूनही केली जाते. विद्यार्थ्यांना भाषिक ज्ञान अधिक मिळावे म्हणून स्वाध्यायांमध्ये अमुक पुस्तक वा लेख वाचा असे सांगितले जाते. या सर्व गोष्टींसाठी विपुल व अद्ययावत वाचनाची नितान्त आवश्यकता असते. शिक्षकांसाठी मार्गदर्शिका प्रसिद्ध केल्या जातात. त्यांत विविध उपक्रम सुचवले जातात. हे सारे तयार करणे म्हणजे संपादकांच्या कल्पनाशक्तीला एक आव्हानच असते.

आपण भाषेची पुस्तके तयार करतो खरे. पण ती महाराष्ट्रांच्या विविध विभागांत राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मातृभाषेची असतात का ? ती तर प्रमाणित मराठी भाषेची असतात. यांतील कितीतरी शब्द त्या त्या विभागातील मुलांना अपरिचित असतात. अशा परिस्थितीत शिक्षकांना कितीतरी शब्दांचे अर्थ त्या त्या मुलांच्या मातृभाषेतील किंवा बोलीतील पर्यायी शब्द देऊन स्पष्ट करण्याची जरुरी भासते.

मातृभाषेशिवाय आम्ही प्रादेशिक भाषेची पुस्तकेही तयार करतो. पण त्या त्या भाषिकांच्या अडचणींचा अभ्यास करून शास्त्रशुद्ध पद्धतीने ती तयार केली जात नाहीत. याबाबत आवश्यक ते संशोधन झाले नसल्यामुळे अशा पुस्तकांच्या रचनेत बरेच दोष आढळून येतात. त्या त्या भाषिकांच्या मराठी भाषा शिकण्याच्या अडचणींच्या संदर्भात या पुस्तकांची मांडणी होणे जरूर आहे. आज केवळ अनुभव व कल्पनाशक्ती यांच्या पायावरच अशा पुस्तकांची उभारणी होते.

पाठ्यपुस्तकांची सजावट कलात्मक व आकर्षक असावी लागते. विषयाला पोषक, पूरक व आकर्षक चित्रे ही भाषाभ्यासाला मदतच करतात. वस्तुतः शिक्षकांनी या चित्रांचे वाचन करावे, त्यांतील सौंदर्य समजावून सांगावे व त्या मार्गाने विषयाकडे वळावे ही अपेक्षा असते. यासाठी अनेक रंगांची चित्रे पाठ्यपुस्तकात घातलेली असतात. या चित्रांची छपाई करताना विशेष काळजी घ्यावी लागते. विविध रंगांतील चित्र छापताना एकावर एक रंग चढवावे लागतात. यात थोडी जरी चूक झाली, रजिस्ट्रेशन योग्य रीतीने जमले नाही, की चित्रे विद्रूप दिसतात; व चित्रे घालण्याचा मूळ हेतू बाजूस राहून ती टीकेचा विषय होऊन बसतात. सौंदर्याकडे लक्ष पुरवावे तर खर्च वाढतो व पर्यायाने पुस्तकाची किंमत वाढते. त्यात काटकसर करावी तर नीरसता व अनाकर्षकता पदरी येते. अशी ही तारेवरील कसरत आहे. छपाई करणाऱ्या तंत्रज्ञाला ज्या भाषेत ते पुस्तक छापले जाते त्या भाषेचे ज्ञानही आवश्यक ठरते. भाषेच्या ज्ञानाभावी उर्दू भाषेतील एका पुस्तकातल्या चित्रातील चंद्र चुकीच्या जागी छापल्याचे मागाहून आढळून आले. मजकुरातील जागेच्या उपलब्धतेप्रमाणे काही पुढाऱ्यांची चित्रे लहानमोठी होताच आपल्या पुढाऱ्याच्या चित्राला योग्य स्थान न मिळाल्याच्या तक्रारी येऊ लागतात. यामुळे लोकांचा विनाकारण गैरसमज होतो. पाठ्यपुस्तकाच्या सजावटीची अशी आहे चित्तरकथा !

### अपेक्षा

पाठ्यपुस्तके तयार करताना नेमली जाणारी समिती ही प्रत्येक इयत्ते-

प्रमाणे बदलती नसावी. पाठ्यपुस्तकांचे १ ते ४ व ५ ते ७ असे किमान दोन टप्पे असावेत. यामुळे पाठांच्या व लेखकांच्या निवडीत एकसूत्रता राहते व पुनरावृत्ती टळते. निवडी-बाबतचे धोरण सातत्याने राहते; व इ. १ ते ७ पर्यंत मराठी साहित्याचा एक स्थूल आलेख विद्यार्थ्यांच्या नजरेसमोर राहायला मदत होते.

अभ्यासक्रमाच्या बाबतीत कवितेच्यासंबंधी आखून दिलेली ओळींची मर्यादा माझ्या दृष्टीने योग्य नाही. यामुळे चांगल्या कवितांची निवड करताना अनेक बंधने पडतात. शिवाय मुलांना भाषेचा प्रवाह समजावा म्हणून संतांची, पंडित कवींची काव्ये निवडली जातात. मुलांसाठी सुरुवातीला अवघड शब्द असलेल्या कविता निवडू नयेत. मुलांना आवडतील अशा सोप्या, सहज समजणाऱ्या, नादमधुर व गेय कविता त्या त्या वर्गाच्या स्तरप्रमाणे निवडाव्या. निरनिराळ्या संप्रदायांतील कवींना त्यात प्रतिनिधित्व असावे. भाषाभ्यास एवढीच एक दृष्टी समोर ठेवून निवडलेली संस्कृतप्रचुर, संधी व समासाने युक्त अशा शब्दांनी भरलेली रचना मुलांना कंटाळवाणी वाटते व कवितेबद्दल नकळत अढी निर्माण होते. तसेच सामुदायिक रीत्या म्हणता व गाता याव्या अशा कविता निवडल्यास भाषिक एकात्मकतेच्या दृष्टीने ते उपयुक्त ठरते. या कविता विद्यार्थ्यांना सुरावर म्हणता येण्यासाठी जरूर तेथे नोटेशन देता आले तर योग्यच ठरेल.

महाराष्ट्र हा विशाल भाग आहे. एकाच शब्दाचे उच्चार वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या रीतीने केले जातात. अशा वेळी प्रमाणित उच्चार मुलांना समजावेत म्हणून जरूर त्या ठिकाणी उच्चारदर्शन करता आल्यास ते उपयुक्त ठरेल. तसेच उच्चाराचे योग्य मार्गदर्शन होण्यासाठी काही पाठांची चांगल्या व प्रमाणित उच्चारातील ध्वनिमुद्रणे करून ती विद्यार्थ्यांना ऐकवावी. या ध्वनिमुद्रितांच्या टेप्स भाषेच्या योग्य उच्चारदर्शनाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरतील.

आपण शब्दांचे अर्थ देतो ते प्रमाण भाषेतील शब्दांचा वापर करून. पण त्याच-बरोबर त्या त्या विभागांतील बोली भाषांचा वापर करून शब्दार्थ देता आले तर अर्थबोध सहजपणे होण्यास मदत होईल.

आज आपण भाषेचे एकच पुस्तक तयार करून ते महाराष्ट्राच्या सर्व विभागांत लावतो. अशा प्रकारचे एकच पुस्तक उपलब्ध करून न देता दोन-तीन माला उपलब्ध करून देता आल्या तर निवडीला वाव राहील. विभागीय जनतेची गरज लक्षात घेऊन तशा त्या तयार करता आल्या तर अधिक उपयुक्त ठरेल. यांतील कोणतीही माला लावण्याचे स्वातंत्र्य त्या त्या विभागातील जनतेस दिले तर भाषाशिक्षणाचे कार्य अधिक उत्साहाने व चांगल्या रीतीने होण्यास मदतच होईल, अशी माझी धारणा आहे.

मातृभाषेची पाठ्यपुस्तके ही खऱ्या अर्थाने प्रमाणित भाषेची पाठ्यपुस्तके असतात; परंतु मराठीतील ज्या अनेक बोली भाषा आहेत त्यांना विसरून चालणार नाही. कारण या बोलींतून कथासाहित्य आज लिहिले जात आहे. गेल्या वीस-पंचवीस वर्षांत वैदर्भी बोलीतून कितीतरी कथा व कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. कोकणी

भाषेतही साहित्य रसवले गेले. अहिराणी भाषेतील बहिणाबाईच्या कवितांचा तर अनेकांना परिचय आहे. नंदुरबार-धुळ्यापासून जळगाव-भुसावळपर्यंत लाखो लोक ही भाषा बोलतात. उद्या या अहिराणी भाषेतही कथाकादंबऱ्या लिहिल्या जातील. या अशा बोलीतील साहित्याचा आस्वाद घ्यायला शिकवायचे तर या बोलींबद्दल मुलांच्या मनात प्रीती निर्माण होईल याकडे आवर्जून लक्ष दिले पाहिजे. आणि पाठ्यपुस्तकांत या बोली-भाषांना साहित्यात स्थान मिळाले पाहिजे. निदान या अशा बोलीभाषेबद्दल मुलांच्या मनात हेटाळणीचा भाव राहणार नाही, हे पाहणे भाषापुस्तकांच्या संपादकांचे काम आहे असे वाटते.

महाराष्ट्रासारख्या विस्तीर्ण राज्यात डोंगर-कपारीत राहणाऱ्या अनेक आदिवासी जमाती आहेत. त्यांच्या अनेक बोली आहेत. मराठीपासून त्या कितीतरी वेगळ्या आहेत. त्यांच्यासाठी मातृभाषेची पुस्तके तयार करणे ही फार मोठी गरज आहे. प्रमाणित मराठी भाषा ही त्यांना मुळींच माहीत नसल्याने या भाषेतील पुस्तके त्यांना चालणार नाहीत. निदान इ. १ ते ४ पर्यंतची भाषापुस्तके आदिवासींच्या बोलीत तयार करावीत आणि शब्दार्थ देताना ते प्रमाणभाषेत द्यावेत. आणि हळूहळू ही प्रमाणित भाषा त्यांना अवगत होईल असे या पुस्तकांचे स्वरूप असावे. आदिवासींच्या-साठी अशी भाषापुस्तके तयार करावयाची तर हे एक प्रचंड मोठे आव्हान आहे ते आपण स्वीकारणार की नाही हा प्रश्न आहे व ते आपण स्वीकारणार असू तर ते केव्हा ? यासाठी भाषापुस्तकांच्या एक नव्हे अनेक माला तयार कराव्या लागतील. त्यासाठी प्रचंड मनुष्यबळ लागेल. आर्थिक तरतूद केल्याने तेही शक्य होईल. पण या सर्व बोली उत्तम रीतीने जाणणारे, त्यांचे व्याकरण माहीत करून घेणारे आणि उत्तम संपादकीय दृष्टी असणारे तज्ज्ञ अधिकारी व्यक्ती शोधाव्या लागतील. त्यांना हाताशी धरून मुळापासून सगळी आखणी करावी लागेल. हे केवळ एक शासन करू शकणार नाही. कार्यकर्त्यांच्या संघटना, सेवाभावाने चालविलेल्या काही संस्था, आणि मनापासून तळमळ असणाऱ्या तज्ज्ञ व्यक्ती यांच्या सहकार्यानेच हा सेतू बांधला जाईल.

मला मनापासून एक रुखरुख वाटते ती ही की महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विभागां-तील लोकांचे शब्दांचे उच्चार वेगवेगळे आहेत. त्यांचा बोलण्याचा ढंगही निराळा आहे. हेलही निराळा आहे. त्यांना प्रमाणित भाषेचे शब्दोच्चार आणि प्रमाणित भाषेचा हेल ही आपली पाठ्यपुस्तके समजावून देण्यास पुरेशी पडतात का ? याचे उत्तर नाही असे आहे. शब्दांचे उच्चार दर्शविणारा एकही कोश मराठीत उपलब्ध नाही. आपल्या भाषापुस्तकात त्या दृष्टीने अद्यापिही कोणी प्रयत्न केला नाही. तो करणे अगत्याचे वाटते. भावी काळात आपली भाषापुस्तके या दृष्टीने प्रयत्नशील राहिली पाहिजेत, अर्थात, पुस्तकांनाही स्वतःच्या मर्यादा आहेत. त्या लक्षात घेता पाठ्यपुस्तकांना ध्वनिमुद्रित आवृत्त्यांची जोड द्यायला हवी असे मला वाटते. या दृष्टीने आधुनिक उपकरणांचाही उपयोग केला पाहिजे, विशेषतः आदिवासी आणि ग्रामीण विभागातील मुलांसाठीच नव्हे तर त्यांच्या

शिक्षकांसाठीही यांची नितान्त गरज आहे. या दृष्टीने विचार नजिकच्या काळात केला जाईल का ?

या आणि अशा कितीतरी अपेक्षा मी मनी बाळगून आहे. आणखी एक रुखरुख वाटते ती अशी की आपली भाषापुस्तके ही अनेक गोष्टींच्या दडपणाखाली दबल्या-सारखी वाटतात. एका वेगळ्या अर्थाने ती सोवळी होत चालली आहेत; मोकळी नाहीत. अवघडल्या मनाने ती बाहेर पडतात. कसल्यातरी न्यूनगंडाने ती पछाडल्यासारखी दिसतात. हे यांचे स्वरूप असेच किती दिवस राहणार ? भाषेची पाठ्यपुस्तके ही मुलांना निरामय आनंद देणारी झाली पाहिजेत. या पुस्तकांचा अंतिम हेतू कोणता ? भाषाकौशल्ये मुलांना आत्मसात करता आली पाहिजेत, बदलत्या आधुनिक काळाचे प्रतिबिंब त्यांत उमटले पाहिजे, मुलांच्या मनांवर त्यांतून संस्कार व्हायला पाहिजेत; आणि या भाषा-पुस्तकांच्या परिचयाने एकूण साहित्याबद्दलचे प्रेम मुलांच्या मनात निर्माण झाले पाहिजे. ही आवड निर्माण होऊन साहित्यिक उपक्रमात भाग घ्यायला ती उत्सुक व्हायला हवीत. हे झाले तर आवश्यक तो वर्तनबदल होऊ शकेल आणि भाषापुस्तकांचा अंतिम हेतू साध्य होईल.

□ □

# वाचिकतेच्या शापातून शिक्षणाची सुटका

## यदुनाथ थत्ते

शिक्षणाबाबतच्या आपल्या सर्व कल्पना एकदा मुळातून तपासून घेण्याची नितान्त आवश्यकता आहे.

वाचिकतेचा आपल्या शिक्षणाला शाप आहे, आणि ही पोपटी विद्याच आमच्या पायांतील शृंखला बनली आहे.

महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दोघे पाश्चात्त्य विद्याविभूषित होते.

समजावण्याने सर्व परिवर्तन सुलभ रीतीने घडून येईल असे त्यांना वाटत होते.

इंग्लीश लोक लोकशाहीचे थोर उपासक आहेत, भारताला स्वातंत्र्य देणे किती आवश्यक आहे ते त्यांना एकदा नीटपणे पटवून देण्याचाच काय तो अवकाश की ते ताबडतोब स्वराज्य देऊन मोकळे होतील, असे गांधीजींना किती मनापासून वाटत होते!

इंग्लंडमध्ये गेल्यानंतर समजूतदार इंग्लीश लोक आणि आपण यांत कुठलाही अंतराय निर्माण होऊ नये म्हणून इंग्लीश भाषा चांगल्या रीतीने आत्मसात करावी, इंग्लीश अदब शिकून घ्यावी म्हणून केवढे प्रयत्न गांधींनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते, 'बालादपि सुभाषितं ग्राह्यम्—लहान मुलापासूनही शिकण्याला माणसाने तत्पर असावे.' असे शिकवणारा हा भारत देश. ह्या देशात अस्पृश्यता आहे, जातीयता आहे, कारण लोकांना नीट कोणी समजावलेले नाही. त्यांना एकदा समजून सांगितले की झाले, मग अस्पृश्यतेचा काही प्रश्नच उरणार नाही.

आपले सारे कौशल्य त्यांनी यासाठी पणाला लावले, पण त्यांना अनुभव चमत्कारिक आला!

ज्यांच्यांत समजण्याची कुवत असते त्यांचे हितसंबंध समजून न घेण्यात गुंतलेले असतात आणि ज्यांचे हितसंबंध समजण्यात गुंतलेले असतात त्यांच्यात समजून घेण्याची भाषिक क्षमताच नसते.

शब्द सर्वगामी असले तरीदेखील त्यांना फार मर्यादा असतात आणि शब्दांवर अतिरिक्त विसंबणारा समाज जड आणि गतिहीन बनतो. शब्दांच्या मायेतच समाज गुरफटून जातो आणि त्याची विचारशक्ती थिजून जाते. शिकल्यासवरलेल्यांची स्वार्थामुळे थिजते, अशिक्षितांची गतानुगतिकतेने थिजते.

त्यामुळेच भारतीय संस्कृतीला 'गप्प बसा संस्कृती' असे अभिधान देण्यात आले आहे! परंपरागत पोपटपंचीपलीकडचे शब्द कोणी उच्चारू लागला की लगेच इथे 'गप्प बसा, देवासारखे गप्प बसा' असा आदेश सुटतो. ज्यांचा देवच मुळी गप्प बसण्याचा आदर्श घालून देतो तो समाज अज्ञान, अन्याय, गुलामी, विषमता आणि वैर यांच्या सैतानी अमलाखाली न गेला तरच ते आश्चर्य समजायचे!

थिजलेले मेंदू वितळण्याची प्रक्रिया म्हणजे प्रबोधन. वाचिक शिक्षणाहून प्रबोधन वेगळे असते. आपल्या शिक्षणाला प्रबोधनाची कळा कशी आणता येईल, हा आपल्या शिक्षणापुढचा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे.

शिक्षणाला प्रबोधनाची मजल मारता आली की नाही, त्याची कसोटी परीक्षांतील मूल्यमापनाने कधीच लागत नाही. कारण वाचिक शिक्षणाचे मूल्यमापन करण्याची पद्धतही त्याच्याशी सुसंगत अशीच आपण निर्माण केली आहे. शाब्दिक शिक्षण आणि शाब्दिक मूल्यमापन! त्यामुळे शब्दांत कितीही थोर विचार असले तरी जीवनातला कंगालपणा काही त्यातून नाहीसा होत नाही.

'सर्वेऽत्र सुखिनः सन्तु', 'सहना भवतु', 'समानीव आकूतिः' असे भव्य मंत्र ज्यांना स्फुरले ती माणसे थोर होती, पण त्या शब्दांच्या पुनरुच्चाराने जे धन्यता पावले आणि तशी परिस्थिती निर्माण व्हावी यासाठी ज्यांनी काहीच केले नाही, त्यांना काय म्हणावे? कर्तृत्वाची प्रेरणा दिल्यावाचून शब्द कृतार्थ कसे होणार?

म्हणून शिक्षणाला प्रबोधनाची कळा आली की नाही ते अजमावण्याचे माप रचना हेच असते. रचनेमुळे शब्दाचे इमान कळते. शब्दक्षमता असणारी माणसे रचना परिवर्तन करण्यासाठी धडपडताना दिसू लागली की त्या शब्दांत विलक्षण अशी नवी समनुयोगक्षमता संचारते. याच दृष्टीने गांधीजींनी स्वराज्याची जी सूत्रे सांगितली होती त्यात 'रचनात्मक कामातून लोकसंपर्क' या एका सूत्राचाही अंतर्भाव केला होता.

रचनाबदलाची शक्यता नसेल तोपर्यंत चांगले शब्द उच्चारायला कोणाचीच ना नसते, पण रचना बदलाचा खरोखरच संभव दिसू लागला की माना डोलावणारेदेखील माना फिरवतात आणि हात उभारणारेच हात उगारतात.

रचनेबद्दलची आस्था निखालस आहे की नाही ते अशा वेळी ठरते. संघर्षाकडे पाठ फिरवणारे रचनेबद्दलची दाखवीत असलेली आस्था तोंडदेखली होती, निखालस नव्हती, असे समजायला प्रत्यवाय नाही.

रचनाबदलाला हितसंबंधी मंडळींचा स्वार्थामुळे आणि रचनाबदलात ज्यांचे कल्याण आहे त्यांचा अज्ञान व भीती यामुळे विरोध सुरू झाला की संघर्षासाठी मैदानात उतरण्याची पाळी येते. अशा संघर्षाच्या वेळीं जे कच खातात किंवा पाठ फिरवतात त्यांची रचना बोलघेवडी होती, लटकी होती असा अर्थ निघतो.

परंतु प्रदर्शन म्हणजे संघर्ष नव्हे. दिखावटी संघर्षांनाही कोणाची ना नसते.

कारण त्यामुळे एका बाजूला संघर्ष केल्याचे लटके अध्यात्मिक समाधान मिळते आणि दुसऱ्या बाजूला संघर्ष होऊनही बदल झाला नाही तो नाहीच, याचे समाधान लाभते.

संघर्ष दिखावटी नसेल तर तोही तीन पातळींवर करावा लागतो. पहिली संघर्षाची आघाडी 'स्वजन' ही असते. लढवैय्यी माणसेही स्वजनांशी लढण्याची पाळी आली म्हणजे कचरतात असे आपला इतिहास सांगतो. समोर स्वजन पाहून अर्जुनासारखा महान योद्धाही 'गात्रेचि गळतीं माझी, होतसे तोंड कोरडे, शरीरी सुटतो कंप, उभे रोमांच राहती' असे म्हणू लागतो.

स्वजनांशी लढाई करायची तर त्याची साधने जीवनोच्छेदक असून चालत नाही, जीवनपरिवर्तनकारी असावी लागतील. परंपरागत साधनांनी स्वजनांशी लढले तर त्याचे फार भीषण परिणाम होतात. स्वजनाशी आत्मक्लेषाच्या शांततामय सत्याग्रही मार्गानेच संघर्ष करावा लागतो, कारण स्वजन आपल्याला हवाच असतो, पण बदललेला स्वजन आपल्याला हवा असतो.

स्वजनांबरोबरची लढाई जिंकून यशस्वी व्हायचे तर स्वकामनांशीही संघर्ष करणे क्रमप्राप्तच असते.

जयप्रकाशजींनी याच दृष्टीने आपल्या त्या कारावासातील चिंतनात ग्वाही दिली आहे की…

**निज कामना कुछ भी नहीं, है सब समर्पण ईशको।**

ज्याला स्वतःच्या कामना म्हणून काही राहात नाहीत, जनताजनार्दनाच्या कामनांशीच ज्याच्या कामना एकरूप झालेल्या असतात, त्यांचा स्वकामनांशी संघर्ष राहतच नाही.

संघर्षाचा तिसरा मोर्चा 'स्व' हा असतो. हा संघर्ष सर्वात बिकट असतो, कारण तो दिखाऊ असूच शकत नाही. 'स्व'ची काहीही जडणघडण परिस्थितीपायी झालेली असते. त्या घडणीला 'स्व' सरावलेला असतो. ती घडण बदलायची म्हणजे 'स्व'शी संघर्ष आलाच. गांधीजी म्हणत असत की शरीर दुबळे आहे, पण प्राणशक्ती जबरदस्त आहे. पण ही प्राणशक्ती शरीरामुळेच सगुण-साकार झालेली असते. त्यामुळे हा 'स्व'शी होणारा संघर्ष फार विलक्षण असतो.

शिक्षणाने संपूर्ण क्रांती घडून यावी, असे बोलले तरी खूप जाते. जयप्रकाश हे एक महान लोकशिक्षक असल्याने त्यांनी 'संपूर्ण क्रांति यह नारा है, भावी इतिहास हमारा है' असा घोष केला. जयप्रकाश हे लोकशिक्षक असल्यानेच लोकनायक होऊ शकले. जुन्या इतिहासाची चिवडाचिवड करणारे इतिहास घडवू शकत नाहीत. जुना इतिहास आधीच घडून चुकलेला असतो. त्यात फेरफार करता येत नाही, त्याचा अभिमान बाळगणेच फक्त शक्य असते! मग 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांचा भव्य भावी काळ' अशा तोऱ्यात आपली कर्तृत्वहीनता झाकून टाकता येते. याच दृष्टीने जयप्रकाश 'भावी इतिहास

हमारा है ' असे म्हणाले. भावी इतिहास म्हटले म्हणजे तो घडवण्याची जबाबदारी आपल्यावर येते.

इतिहासाचा अभ्यास हा एवढ्याच दृष्टीने करायचा की त्याचे पुनरावर्तन होता कामा नये. इतिहासाचे पुनरावर्तन होते याचा अर्थ इतिहासापासून माणूस काही शिकत नाही असाही आहे. अन्यथा स्थळ-काळाचा तोच संदर्भ कधीही पुन्हा निर्माण करता येत नाही. स्थळ-काळ-पात्राचा संदर्भ बदलला म्हणजे जुन्याचे पुनरावर्तन शक्यच नाही.

आव्हाने नवी येणार तर त्यांचा मुकाबला करण्याचे मार्गही वेगळेच असावे लागतील आणि त्या दृष्टीने पुस्तकी पाठान्तर विद्या पुरेशी पडणार नाही.

सर्जनशील विद्या लोकांना द्यावी लागली. परंतु आपली विद्या ही स्मृतिप्रधान आहे, सर्जनशील नाही. आजची प्रस्थापित विद्या पुस्तके वाचायला शिकवते, पण स्वतःच्या डोळ्यांनी जीवन पाहायला शिकवत नाही, स्वतःच्या कानांनी स्वतंत्रपणे ऐकायला शिकवत नाही, स्वतःच्या पायांनी स्वतंत्र मार्ग चोखाळायला शिकवत नाही, स्वतःच्या हाताने काही रचना करण्याचे कर्तृत्व फुलवीत नाही, स्वतःचे शब्द उच्चारायची हिंमत निर्माण करीत नाही, स्वतःच्या हृदयाने स्पंदने टिपू देत नाही, स्वतःच्या बुद्धीने निर्णय घेण्याची कुवत निर्माण करीत नाही.

ही पुस्तकी विद्या प्रतीकाकडून प्रत्यक्षाकडे जाण्याची ओढ लावीत नाही, उलट प्रतीकाकडून प्रत्यक्षाला खो द्यायला शिकवते.

शाळेच्या भिंतीआडून बिनभिंतीच्या शाळेकडे जायला ती प्रवृत्त करीत नाही.

म्हणून वाचेने सर्व शिक्षण होते ही समजूत एकदा डोक्यातून काढून टाकली पाहिजे. वाचिक शिक्षणाला प्रबोधनाची कळा आली पाहिजे. प्रबोधनाची परिणती रचनेत झाली पाहिजे आणि रचनेने संघर्षात उतरण्याची तयारी ठेवली पाहिजे. शिक्षण परिपूर्ण व्हायचे तर हे अटळ आहे.

□ □

# शिक्षक-प्रशिक्षणाची नवी दृष्टी

## वसंत दत्ताराम देसाई

स्वातंत्र्योत्तर. कालामध्ये शिक्षणाचा प्रसार फार झपाट्याने होत आहे. आजवर ज्यांना शिक्षणाचा लाभ मिळू शकलेला नव्हता त्यांच्या दारापर्यंत शिक्षणाचा प्रवाह जाऊन पोचलेला आहे. ज्यांच्या कुटुंबातील पहिलीच पिढी शिक्षण घेऊ निघालेली आहे अशा कुटुंबातील लक्षावधी मुले पाटी, पेन्सिल, वह्या, पुस्तके घेऊन विद्यामंदिरांमधून मोठ्या आशेने आणि थोर अपेक्षेने प्रवेश घेऊ लागलेली आहेत. शिक्षकांच्या सान्निध्या-मध्ये राहून ज्ञानोपासना करू लागलेली आहेत. ज्या गावी शालागृहे नव्हती त्या गावी शालागृहे दिसू लागली आहेत; ज्या गावी शालागृहे होती त्या गावी प्रशाला उभ्या राहिल्या आहेत; जेथे प्रशाला होत्या त्या परिसरामध्ये महाविद्यालये काम करू लागलेली आहेत. अनेक ठिकाणी विद्यापीठे स्थापन होऊन ती आपला शैक्षणिक कार्यभार सांभाळू लागलेली आहेत. या सर्व ज्ञानमंदिरांतून सहस्रावधी शिक्षक आणि लक्षावधी मुले ज्ञानोपासना करीत आहेत. हे दृश्य खरोखरच आशादायक आहे. शिक्षणातून अपेक्षित सामाजिक परिवर्तन घडून यायला मदत होईल या हेतूने हा सर्व खटाटोप, प्रचंड प्रमाणामध्ये आर्थिक भार सहन करून केला जात आहे. शिक्षणातून एक लोकहितैषी सामाजिकतेची जाण असलेला जागृत समाज या देशामध्ये निर्माण होईल अशी या मागची प्रमुख धारणा आहे.

राष्ट्रीय ध्येय-धोरणानुसार, आशा, आकांक्षा, स्वप्ने यांनुसार एकंदर शिक्षणाची योजना केली तर कालांतराने अपेक्षित परिवर्तनासाठी आवश्यक असलेला समाज निर्माण होऊ शकेल या भावनेने राष्ट्रीय शिक्षणाची योजना विचारपूर्वक तयार करून, तदनुसार विविध स्तरांवरील शिक्षणक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तके आणि अनेक प्रकारची शैक्षणिक साधने निर्माण केली जातात आणि अध्ययन अध्यापनाच्या पद्धती निश्चित केल्या जातात. आपल्याकडे होत असलेले काम या दिशेनेच चालू असल्याचे आढळून येते. राष्ट्रीय शिक्षण आयोगाने या दृष्टीने तयार केलेली राष्ट्रीय शिक्षण योजना निश्चितच चांगली आहे.

शैक्षणिक कार्याच्या दृष्टीने मनाला दिलासा प्राप्त करून देणाऱ्या या घटना असल्या तरी आपल्याकडे शिक्षणाचे जे प्रत्यक्ष कार्य आज चाललेले आहे त्याबाबत एकंदर समाज फारसा समाधानी नाही, किंबहुना तो बऱ्याच अंशी नाराजच आहे.

आपले हे असमाधान आणि नाराजी समाज आता भिन्न भिन्न मार्गांनी, रीतींनी आणि पद्धतींनी कधी सौम्य तर कधी कठोर भाषेत, कधी शांततेने तर कधी आततायीपणाने व्यक्त करू लागलेला आहे. शक्य असलेले सर्व प्रयत्न करून; जमतील तेवढे सगळे मार्ग हाताळून आणि आर्थिक भार सहन करून चालवलेला हा शैक्षणिक व्यवहार अपेक्षित फलप्राप्तीच्यादृष्टीने असफल ठरू लागलेला आहे की काय अशी शंका मनामध्ये निर्माण व्हावी अशा स्वरूपात शिक्षणाविषयीचे हे सामाजिक असमाधान आणि नाराजी सध्या व्यक्त होत आहे.

शैक्षणिक कार्याबाबतचे हे अपयश लक्षात येऊ लागताच आपण सर्वजण अपयशाचे खापर, एकंदर शैक्षणिक धोरणावर, योजनेवर, शिक्षणक्रमांवर आणि शिक्षण पद्धतींवर फोडून चटकन मोकळे होतो. शैक्षणिक कार्यातील अपयशाला हे घटक कारणीभूत ठरतात याबद्दल दुमत नाही. अपयश टाळायचे असेल तर या घटकांमध्ये योग्य ते बदल करून सुधारणा घडवून आणायला हवी यात शंकाच नाही. त्या दृष्टीने आपल्याकडे प्रयत्नही होत असतात. परंतु शैक्षणिक यशापयशाला फार मोठ्या प्रमाणामध्ये कारणीभूत ठरणाऱ्या एका प्रभावी घटकाकडे आपण द्यावे तितके लक्ष देत नाही किंवा त्या घटकामध्ये बदल घडवून सुधारणा करण्याच्या कार्यक्रमांउपक्रमांना जेवढे महत्त्व देऊन अग्रक्रम द्यावयाला हवा तेवढा तो आपण देत नाही असे वाटते.

एकंदर शिक्षण योजनेमध्ये शिक्षक हा अत्यंत महत्त्वाचा असा प्रभावी घटक आहे. हा घटक जितका सबल, समर्थ, सक्षम, कुशल, दक्ष आणि कर्तव्यपरायण असेल तितके शिक्षण सकस, गुणवत्ताप्रधान, प्रभावी आणि म्हणूनच सर्वार्थाने कल्याणमयी ठरू शकेल. माजी शिक्षणमंत्री श्रीयुत मधुकरराव चौधरी एकदा म्हणाले होते, ‘कोणताही समाज हा तेथील शिक्षणपद्धतीपेक्षा गतिमान असू शकत नाही आणि कोणतीही शिक्षणपद्धती शिक्षकाहून गतिमान बनू शकत नाही.’ हे खरे आहे. गतिमान शिक्षण-विचार आणि आचार समाजाला गतिशील राखू शकतो आणि गतिशील समाजच प्रगतीची विविध शिखरे गाठू शकतो. शिक्षण विचाराला आणि आचाराला सतत गतिमान राखण्याचे काम शिक्षकाला पार पाडावयाचे असते. त्या दृष्टीने शिक्षकाला समर्थ बनवण्याचे कार्य केल्याखेरीज शिक्षणक्षेत्रातले अपयश धुऊन काढता येईल असे वाटत नाही.

शिक्षकांना प्रशिक्षित करण्याचे; व्यावसायिकदृष्ट्या त्यांना शहाणे आणि कुशल बनवण्याचे कार्य आपल्याकडील अध्यापक विद्यालयांतून आणि अध्यापक महाविद्यालयांतून; सेवांतर्गत प्रशिक्षणवर्गांमधून वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षणक्रमांच्याद्वारे गेली अनेक वर्षे चालू आहे. आजच्या शिक्षण कार्यातील अपयश लक्षात घेतले म्हणजे शिक्षक-प्रशिक्षणाच्या या कार्यामध्येच काही कमतरता राहून गेलेली आहे का, असा विचार साहजिकच मनामध्ये येऊन जातो. आजच्या समाजाच्या शिक्षणविषयक गरजा भागवू शकेल अशा प्रकारच्या शिक्षकाची निर्मिती या अध्यापक विद्यालयांतून, अध्यापक महाविद्यालयांतून,

प्रशिक्षणवर्गातून होत आहे का, याचा आपण जाणीवपूर्वक शोध घ्यावयाला हवा असे मग वाटू लागते.

शिक्षक-प्रशिक्षणाचे आजवरचे शिक्षणक्रम तपासून पाहिले तर आपण शिक्षक-प्रशिक्षणाचा विचार अगदी चाकोरीबद्ध पद्धतीने करीत आलो आहोत; करीत आहोत, असे दिसते. कालमानानुसार जे फेरबदल झालेले आहेत ते अगदी वरवरचे, मामुली स्वरूपाचे आहेत. देश परतंत्र असताना ज्या पद्धतीने शिक्षक-प्रशिक्षणाचे शिक्षणक्रम रचले जात होते त्याच प्रकारचे शिक्षक-प्रशिक्षण शिक्षणक्रम आज देश स्वतंत्र होऊन तीस वर्षे होऊन गेलेली असली तरी आमच्याकडून आखले जात आहेत! हे शिक्षणक्रम आणि या शिक्षणक्रमांद्वारे शिक्षकांची करून घेण्यात येत असलेली तयारी अगदीच कुचकामी आहे असे मला म्हणायचे नाही, या शिक्षणक्रमांतून शिक्षकांना देण्यात येत असलेले प्रशिक्षण अगदी टाकाऊ आहे, कालबाह्य आहे असेदेखील मला म्हणावयाचे नाही, परंतु स्वातंत्र्योत्तर कालामध्ये ज्या प्रकारच्या शिक्षणाचा आपण विचार करीत आहोत; ज्या प्रकारच्या मुलांच्या विकासाचा प्रश्न आपण हाताळीत आहोत; ज्या परिस्थितीमध्ये शिक्षण देण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत; ज्या साहित्य-साधनांचा अवलंब करून आपल्याला मुलांना शिक्षण द्यावे लागणार आहे त्याचे प्रतिबिंब शिक्षक-प्रशिक्षणाच्या शिक्षणक्रमामध्ये उमटलेले दिसत नाही, ही मोठी उणीव या एकंदर व्यवहारामध्ये प्रकर्षाने आढळून येते.

विकसित देशांमध्ये प्रभावी आणि यशस्वी ठरलेला शिक्षणविचार, शिक्षण-आचार आणि पद्धती जशाच्या तशा माहीत करून देऊन आपण जे समाधान आजवर मानीत आलो आणि अजूनही मानीत आहोत; त्याने शिक्षणविषयक अपयश निपटून काढण्याचा आपला प्रयत्न फलद्रूप होईल असे वाटत नाही. सुशिक्षित, सुसंस्कृत सुखवस्तू अशा मध्यमवर्गीय कुटुंबांतून शिकण्यासाठी विद्यालया-महाविद्यालयांत येणाऱ्या मुलांच्या शिक्षणासाठी आपण एकेकाळी जो विचार मानला आणि आचार ठरवला तोच विचार आणि आचार आपण आजही योग्य मानून पुढे चालवीत आहोत. वास्तविक पाहता, आज आपल्या शाळा-शाळांतून शिकायला येणारी मुले ही फार मोठ्या प्रमाणामध्ये आजवर शैक्षणिकदृष्ट्या वंचित असलेल्या, आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या अशा समाज थरांमधून येत आहेत. शतकानुशतकांच्या कालावधीमध्ये ज्यांच्या मनावर शैक्षणिक संस्कार होऊच शकलेला नाही; आर्थिक मागासलेपणामुळे ज्यांच्या मनाची आणि बुद्धीची उभारीच मरगळून पडलेली आहे; सामाजिकदृष्ट्या वंचित असल्यामुळे ज्यांच्या कर्तृत्वाची खुमारीच खुरटून गेलेली आहे, अशा पालकांच्या पोटी झोपडीझोपडींमधून, दऱ्याखोऱ्यांमधून, माती चिखलामधून दरिद्री अवस्थेमध्ये, उपास-मारीच्या अवकळेमध्ये आणि अवमानित परिस्थितीमध्ये जन्म घेतलेली अजाण मुले बहुसंख्येने आज शाळेत शिरत आहेत. शिक्षण म्हणजे काय? शिक्षणाने काय मिळते? शिक्षण घ्यायचे कसे? त्यासाठी काय करावे लागते? कोणते कष्ट घ्यावे लागतात? कोणते

मार्ग अनुसरावे लागतात ? काय सोडावे लागते आणि त्यासाठी काय धरावे लागते ? त्याकरता किती वेळ द्यावा लागतो ?... एक ना दोन, अनेक गोष्टी. यांपैकी काहीदेखील त्या मुलांना माहीत नाही; त्यांच्या पालकांना ठाऊक नाही; अवतीभोवतीच्या समाजाला ज्ञात नाही आणि आपण तयार करून पाठवीत असलेल्या शिक्षकालादेखील याची पुरेशी जाण नाही.

आपल्या शाळेमध्ये ज्या सामाजिक थरांमधून बहुसंख्येने मुले येतात त्यांच्या शैक्षणिक अडचणी कोणत्या आहेत ? त्यांच्या विकासाबाबतचे प्रश्न कोणते आहेत ? एखादी गोष्ट समजून घेण्याआड त्यांच्याबाबतीत कोणत्या समस्या येतात ? एखाद्या कामाबाबतचे कौशल्य संपादन करायचे असेल तर त्यांना नडणाऱ्या नेमक्या बाबी कोणत्या ? एखादा प्रश्न अगर विचार समजून घेण्याच्या त्यांच्या पद्धती व मार्ग कोणते ? विनिमयांची त्यांची साधने आणि रीती कोणत्या ? त्यांचे समज, गैरसमज, श्रद्धा-निष्ठा, स्वप्ने, कल्पना, भावना कोणत्या ?...असे कितीतरी प्रश्न आहेत की ज्यांचा विचार आता त्यांच्या दृष्टिकोणातून व्हावयाला हवा. एखाद्या सुखवस्तू, मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलाचा विचार करून त्यानुसार यासारख्या प्रश्नांच्या सोडवणुकीसंबंधी बांधलेले आडाखे आणि तयार केलेल्या योजना या कामी उपयोगी पडणार नाहीत, हे आपण आत समजून घ्यायला हवे, तरच आपल्याला, आपण ज्या शिक्षणाचा विस्तार करीत गेलो आहोत आणि करीत राहणार आहोत त्या शिक्षणामध्ये गुणवत्ता आणता येईल. ' येरे माझ्या मागल्या ' या पद्धतीने वागून आता भागणार नाही.

म्हणून वाटते ते असे,–आपण शिक्षणाचा हा प्रचंड उपद्व्याप कोणाच्या गरजा प्राधान्येकरून भागवण्यासाठी करीत आहोत याचे उत्तर आधी दिले पाहिजे. शिक्षणावर खर्च होणारा समाजाचा पैसा आपण मध्यमवर्गीय, सुखवस्तू आणि सुशिक्षित मुलांच्या विकासाला पोषक ठरलेल्या पद्धतींचाच अवलंब करून, दरिद्री मागासलेल्या, अशिक्षित समाजांतील मुलांना शिक्षण देण्याच्या कामासाठी खर्च करणार आहोत का ? हेच जर आपण करणार असू तर याहून भयानक अशा शैक्षणिक अपयशाला आपल्याला तोंड द्यावे लागेल आणि त्या वेळी ' आम्हाला तुमचे शिक्षणच नको ' असे जोरजोराने म्हटले जात असल्याचे आपल्याला ऐकावे लागेल. शिक्षण-क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचा तो दारुण पराभव मानावा लागेल. असे काही घडू नये, शिक्षण कार्यामध्ये आपण अपेशी ठरू नये, मोठ्या आशेने शाळेमध्ये येणाऱ्या मुलांचा शैक्षणिक विकास पुरेशाप्रमाणामध्ये व्हावा, कोटीकोटी गरीब मुलांचे जन्माचे कल्याण व्हावे, बहुजनसमाज सुखी आणि संपन्न व्हावा असे आपणास वाटत असेल तर बहुजनसमाजासाठी म्हणून कार्यवाहीत आणल्या जाणाऱ्या शिक्षण विचारांचा, शैक्षणिक कार्यक्रमांचा, शिक्षणक्रमांचा, पाठ्यपुस्तकांचा शिक्षणपद्धतींचा कालमानानुसार, सामाजिक परिस्थितीनुसार नव्याने विचार व्हावयाला हवा.

हा नवा विचार शिक्षकांनी करायला हवा. आपण देत असलेल्या शिक्षणातून,

करीत असलेल्या कार्यातून उद्याचा सुखी, समाधानी, समृद्ध आणि कल्याणमयी समाज विकास पावत आहे, अशी भावना मनीमानसी बाळगून प्रत्येक शिक्षकाने हा विचार करायला हवा. शिक्षणातील आशय आणि तदनुषंगाने विषय यांची जशी कालानुरूप, समाजानुरूप फेररचना करायला हवी त्याचप्रमाणे ज्या समाजासाठी हा आशय आणि विषय आहेत त्या समाजानुरूप शिक्षण देण्याच्या पद्धतींचा, रीतींचा, गतीचा, कालावधीचा आणि वेळेचाही विचार व्हायला हवा. यासाठी प्रत्येक शिक्षकाच्या ठिकाणी शोधकाची, संशोधकाची वृत्ती निर्माण व्हावयाला हवी. विनोबाजी म्हणतात, शिक्षक हा गातुवित् आहे; मार्ग शोधणारा आहे; पाथ फायंडर आहे. आपल्या मुलांसाठी, आपल्या मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी, पर्यायाने आपल्या समाजाच्या कल्याणासाठी नवे नवे मार्ग शोधून काढणारा; संशोधक तळमळीचा, कळकळीचा, निष्ठेचा आणि सामाजिक कल्याणाच्या जाणिवेने रसरसून निघालेला एक कार्यकर्ता या स्वरूपात आजचा शिक्षक दिसायला हवा. तरच आपली शिक्षणयोजना, मग ती कोणतीही असो, कितीही नवीन असो, आधुनिक असो, जटिल असो वा कठीण असो– यशस्वी झाल्याखेरीज राहणार नाही. या वृत्तीने गतिमान झालेला शिक्षक फत्तरातून फुले आणि पाषाणांतून दैवते निर्माण करील, शिक्षणक्रमातील काठिण्य आणि पाठ्यक्रमातील जडत्व व पद्धतीतील निरसत्व तो घालवून देईल. एकंदर शिक्षणयोजना जिवंत, रसरशीत करून दाखवील; शाळा–महाशाळांना चैतन्याची प्रेरणा मंदिरे बनवून सोडील.

आजच्या शिक्षक-प्रशिक्षणाचे ध्येय अशा शिक्षकाची निर्मिती हे असायला हवे. आजचे शिक्षक-प्रशिक्षण पारंपरिक पद्धतीने एक व्यावसायिक शिक्षक निर्माण करण्यात गढलेले आहे. आजचे शिक्षक-प्रशिक्षण एक धंदेवाईक शिक्षक निर्मिण्यात मशगूल झालेले आहे. हे काम या शिक्षक-प्रशिक्षण विद्यालयांतून आणि महाविद्यालयांतून चांगले घडते आहे. परंतु त्यातून आमच्या शिक्षणाच्या पदरी मात्र दिवसेंदिवस अधिकाधिक अपयश पडत चाललेले आहे. शिक्षक-प्रशिक्षणाच्या विचारातील आणि आचारातील या उणिवेमुळे शिक्षणाला अपयशाचे धनी व्हावे लागत आहे.

आजचे शिक्षक आपल्या कार्याचा या नव्या जाणिवेतून विचार करू लागतील; नवे मार्ग शोधू लागतील तर काही आशा राखता येईल. आजची शिक्षक-प्रशिक्षण विद्यालये आणि महाविद्यालये या दृष्टीने काही सुधारणा करण्याची हिंमत दाखवतील तर उमेद बाळगायला काही जागा आहे. नाहीतर शिक्षणयोजना नव्या येतील, नवे शिक्षणक्रम रचले जातील, त्यानुसार पाठ्यक्रम निश्चित केले जातील, पाठ्यपुस्तके प्रकाशित होतील, नव्या नव्या ठिकाणी लहानमोठी विद्यालये उभी राहतील, लक्षालक्षांनी शिक्षकांची संख्या वाढेल...सगळे काही यथास्थित घडेल, पण 'शिक्षण' मात्र 'अपेशी'च राहील! म्हणून एकंदर शिक्षणयोजनेइतकाच शिक्षक-प्रशिक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा मानून शिक्षक–प्रशिक्षणाच्या कार्यक्रमामध्ये सुधारणा घडवून आणण्यात, शिक्षणक्षेत्रातील विचारवंतांनी अविलंबाने पुढाकार घेतला पाहिजे. □ □

# व्यक्तिमत्त्व-विचार

# माझे खरे मामा

## लीलावती भागवत

ॐ मित्राय नमः
ॐ रवये नमः
ॐ सूर्याय नमः
ॐ भानवे नमः

नमस्कारांचा घोष चालू होता आणि त्याचबरोबर श्वास घुमत होते. मुंजीत भिक्षावळींच्या वेळी बटू नेसतो तसे मानेवर गाठ बांधून पंचे नेसलेले सात-आठजण सूर्यनमस्कार घालीत होते.

पुण्याच्या शनिवार पेठेतल्या पेंडशांच्या वाड्यात आम्ही राहात होतो. समाईक माजघर, मोठं अंगण, माळ्यावरची उतरती पाख्याची खोली अशा त्या वाड्यात आम्हा लहान मुलांमुलींचा गट नेहमीच कशात तरी रंगलेला असे. खूप खेळून, दमून झोपी गेल्यानंतर एवढ्या तेवढ्या आवाजाने जाग येण्याइतकी आम्हा मुलांची झोप सावध नव्हती; पण त्या दिवशी या नमस्कारांच्या घोषाने आम्ही सगळीं मुलं ताडकन् उठलो.

'कुणाचा हा आवाज ? कसला ?' आईला विचारलं तेव्हा ती म्हणाली, "अग, आपल्या तात्याच्या आश्रमातील मंडळी नाही का आली काल ? त्यांचे नमस्कार चालले आहेत वर!"

इतर सर्व समाज ज्यांना 'मामा' म्हणून ओळखतो ते आमचे खरे मामा असूनही आम्ही भाचरं मात्र त्यांना 'तात्या' म्हणतो. कारण आमची आई त्यांना तात्या म्हणते. माझे वडील म्हणायचे "शंकर," पूर्वी तर आम्ही 'ए तात्याच' म्हणत असू. पण नंतर 'ए' चं 'अहो' मधे केव्हा रूपांतर झालं ते समजलं नाही. कदाचित तात्या मोठे झाले, दूर गेले हेही कारण असेल, पण हा दुरावा फक्त सहवासाचा. मनाने अजूनही आम्ही तितकेच जवळ आहोत; कदाचित वयपरत्वे आलेली समज आणि अनुभव यामुळे जास्तीच जवळीक साधली गेली आहे असं हल्ली कधीकधी मला जाणवतं. अशा वेळी खूप बरं वाटतं.

त्यावेळी तात्या मसूराश्रमात होते. मसूराश्रमाबद्दल आम्हाला एकप्रकारचा भीतियुक्त आदर वाटे. तात्यांबरोबर आश्रमातली कितीतरी मंडळी आमच्याकडे येत व

राहात. माळ्यावरची पाख्याची खोली पुष्कळदा त्यांच्यासाठी मोकळी करून ठेवलेली असे. त्यातली काही मंडळी आम्हाला खूप आवडत; पण काही मंडळींवर आम्हा मुलांचा राग असे. हे ब्रह्मचारी लोक आमच्याशी इतके कठोरपणे का वागतात ? इतके फटकारून कां बोलतात ? असं काय असतं यांच्या खोलीत की, आम्ही तिथे गेलेलं त्यांना आवडू नये ? या सगळ्या प्रश्नांचं आवर्त पुरं व्हायचं एका शेवटच्या प्रश्नाने–

"मग ही मंडळी तात्यांची मित्रमंडळी कशी ?"

कारण या सर्वांचं तात्यांच्या स्वभावाशी कुठेही साम्य नसे. तात्यांचं घरी येणं ही त्यावेळी आम्हाला एक आनंदपर्वणी असे. ते आले की आम्हा सर्व मुलांना जवळ बोलावून घेत. त्या लहान वयात फारसा कार्यकारणभाव किंवा तात्त्विक भाग कधीकधी कळला नाही, तरीही तात्यांच्या तोंडून स्वातंत्र्यवीरांच्या कथा आणि स्वातंत्र्यसमराचा इतिहास व हकीकती ऐकताना आम्ही रोमांचित होत असू. देशभक्तीचा आणि स्वातंत्र्यप्रेमाचा अंकुर आमच्या मनात जो काही रुजला, तो रुजवला तात्यांनी.

त्यांच्या वागण्यात कधीही अवडंबर नसे. इतर आश्रमवासियांसारखे ते येत. आम्हाला जवळ बसवून प्रार्थना म्हणवून घेत.

**प्रभू मेरे दिलमें सदा याद आना।**
**दया करके दरसन अपना दिलाना।**
**किया काम कोई न तेरी खुषीका।**
**मुझे दीनबंधो न दिलसे भुलाना॥**

तात्यांचा खडा आणि तरीही दुसऱ्याच्या अंतःकरणाला भिडणारा आवाज आमच्यावर मोहिनीमंत्र टाकीत असे. आज इतक्या वर्षांनंतरही त्यांच्या आवाजातल्या प्रार्थनेचे सूर मी विसरले नाही. आम्हां मुलांपैकी कुणीही ते विसरूच शकणार नाही.

तात्यांनी आम्हाला सूर्यनमस्काराची आणि गीतापठणाची सवय लावली. तात्या एकेक श्लोक सांगत. आम्ही तो पाठ करायचा. वयाच्या बाराव्या वर्षी संपूर्ण अठरा अध्यायी गीता तात्यांनी माझ्याकडून पाठ करवून घेतली. शब्दोच्चारांसाठी या पठणाचा मला किती उपयोग झाला हे पुढच्या आयुष्यात मला क्षणोक्षणी प्रत्ययाला आलं आहे. मला आठवतो एक प्रसंग. श्री. कन्नमवारांची अंत्ययात्रा होती त्या प्रसंगाचं धावतं वर्णन आकाशवाणीवरून देण्यात येत होतं; परंतु यात्रा एका ठिकाणाहून सरकत सरकत पुढे दुसरीकडे जाताना त्या गद्य वर्णनात मधेच खंड पडे. तो मधला वेळ स्टुडिओतून भरून काढायचा होता. मी स्टुडिओत बसले होते. दोनचार मिनिटंच भरावी लागतील असं सांगितलं होतं. पहिल्या वेळी काही संस्कृत श्लोक आणि सुभाषितं म्हटली; पण नंतरचा खंड पडला बारा-तेरा मिनिटांचा. त्यावेळी तात्यांनी पाठ करून घेतलेले गीतेचे अठरा अध्यायच माझ्या मदतीला धावले.

१९३० सालची गोष्ट. वडाखालच्या प्राथमिक शाळेतलं शिक्षण संपवून मी हायस्कूलमधे जाणार होते. माझी मोठी बहीण हुजूरपागेत शिकत होती. वास्तविक मी पण तिच्या मागोमाग त्याच शाळेत जाणार होते, पण तात्या माझ्या वडिलांना म्हणाले,

" मास्तरकाका (माझे वडील शिक्षक होते. तात्या वगैरे सगळीजणं त्यांना मास्तर काका म्हणत), उषाचं राहू दे पण आता लीलाला तरी अण्णा कर्व्यांच्या शाळेत घाला. त्या शाळेत तिची राष्ट्रीय वृत्ती जोपासली जाईल."

माझ्या वडिलांचं आणि तात्यांचं पुष्कळ बाबतीत जमत असे. मी कन्याशाळेत जाऊ लागले. त्याचवर्षी भगतसिंग–राजगुरू वगैरेंना फाशी दिलं गेलं. आम्ही लहान मुलींनीदेखील शाळेत हरताळ पाळला. मिरवणूक काढली. इतर जल्लोषात हे आपण करतो आहोत ते तात्यांना नक्की आवडेल हा विचार सतत मनात होता. तात्यांना आवडेल असं काहीतरी करून दाखवावं ही ऊर्मी नेहमीच माझ्या मनात लहरून येत असे. माझा पराक्रम मी त्यानंतर तात्या आले तेव्हा त्यांना सांगितला. त्यांनी नुसती मूकपणे पाठ थोपटली आणि मी कृतकृत्य झाले.

अशीच एक दिवस शाळेतून घरी आले, तर आई खिन्नपणे बसली होती. डोळ्यांत पाणी तरारलं होतं.

" काय झालं ग माई ? "

" अग, तात्याला खूप मारलंय ग ! "

" तात्यांना ? कुणी मारलं ? का ? " मला समजेना–तात्यांना कुणी आणि का मारावं ? तात्यावर कुणालाही हात उगारावासा वाटेलच कसा ?

" तो तिकडे गोमंतकात शुद्धीकरणाचं काम करतो आहे ना, तिकडे मारलंय त्याला कुणीतरी " माईला (माझ्या आईला) रडू अनावर झालं. मीही गलबलले. विहिरीविहिरींमधून पाव टाकून सामुदायिकरीत्या हिंदूंना बाटवण्याचं काम ख्रिश्चनांनी सुरू केलं होतं आणि त्यावर प्रतिटोला म्हणून तात्यांनी मसूराश्रमाच्या वतीने त्या सर्व बाटलेल्यांना हिंदु करून घेण्याचं काम चालवलं होतं. त्यावेळी तात्यांवर दोनतीनदा प्राणांतिक हल्ले झाले, पण तात्या त्यातून सुखरूप बचावून परत आले.

ते त्यानंतर घरी आले तेव्हा मी त्यांना विचारलं.

" तात्या, तुम्हाला भीती नाही वाटली मारलं तेव्हा ? दोनतीनदा मारलं तरी तुम्ही पुन्हा कसे गेलात तिकडेच ? "

तात्यांनी सांगितलं ते आयुष्यभर मीही घोकीत आले. ते म्हणाले,

" आपण चांगलं काम करीत असलो ना बाळ, की–भीती वाटतच नाही कशाची, मरणाचीसुद्धा ! "

आमच्या लहानपणी हिंदुमुसलमानांच्या दंग्याची नेहमीच भीती असे. स्त्रियांनी

स्वसंरक्षणासाठी शारीरिक शिक्षण घेतलंच पाहिजे यावर तात्यांचा कटाक्ष होता. पुण्यात-नातूबागेत असे शिक्षणवर्ग चालत. मीही तिथे लाठी-लेझीम सगळ्याचं शिक्षण घेतलं.

त्यानंतर तात्या एकदा मला म्हणाले, "हे बघ, देवास संस्थानातल्या मुली गोषात असतात. त्यांना तर या शिक्षणाची फारच गरज आहे. तू एक महिनाभर त्यांचा वर्ग चालव."

आणि मी देवासला जायला निघाले.

एकटीच निघाले होते. इंदूरहून पुढे निघाले. बऱ्हाणपूरला गाडी पहाटे दोन वाजता पोचली. पुढची गाडी सकाळी ७ वाजता. स्टेशनवर थांबावे लागणार होते. आसपास मुसलमानांची वस्ती. मी जेमतेम १६ वर्षांची होते. सगळ्या दाढ्या आणि लाल टोप्या पाहून तशी थोडी हबकलेच. कारण वेळही तशी अवेळच म्हणायची. पण मी आल्या प्रसंगाला सामोरी जाऊ शकेन ही माझ्या मनाची धारणा मला मिळालेल्या स्वसंरक्षणाच्या शिक्षणामुळेच होती. मी प्लॅटफॉर्मवरच्या एका बाकावर बसले होते. गोंडे हालवीत लाल टोपीवाला समोरून गेला की, मी मनातल्या मनात तात्यांशी बोलू लागे. असे दोन-चारदा झाले आणि माझी भीती कुठल्याकुठे पळाली. अर्थात नऊवारी साडीमध्ये जंबिया लपविलेला होता ती गोष्ट वेगळी.

त्या तेवढ्या चार-पाच तासांत तात्यांनी आम्हा मुलींना काय दिले ते प्रकर्षाने जाणवले. स्वसंरक्षणाचे साधन आणि मनाची निर्भयता यांच्या आधारावर तर मी तो वेळ बाकावर काढून सहीसलामत सुटले होते.

मी नंतर हे तात्यांना सांगितले तेव्हा ते म्हणाले.

"अग, पण तुला स्टेशनवर घ्यायला मी एका मुलाला पाठवले होते. अशी कशी चुकामूक झाली तुझी!"

आणि काही झाले असते तर, या काळजीने ते नंतर देखील हवालदील झाले.

"अहो पण तात्या, जंबिया होता की माझ्याजवळ. शिवाय..." पण त्यांच्या-बद्दलचे मी काहीच बोलले नाही. त्यांनी पाठवलेल्या मुलाची चुकामूक झाली हे मला बरेच वाटले. त्यामुळे स्वतःला जोखता आले आणि तात्यांनी काय दिलंय त्याची किंमतही समजली.

माझ्या मोठ्या बहिणीच्या यजमानांना अपघात झाला आणि दोन्ही पाय लुळे होऊन ते अपंग झाले. तिचे लग्नही खूप लौकर म्हणजे वयाच्या तेराव्या वर्षी झाले आणि हा प्रसंगही तसा लौकरच ओढवला. एरव्ही देखील वर्षातून दोनदा चुलत मामे, सासूबाईंच्या बाळंतपणासाठी माझ्या ताईला हक्काने बोलावणे जात असे. आणि आता तर!

ताईचे शिक्षण अर्धवटच झालेले. मुले लहान, आता तिने काय करायचे ? स्वावलंबनाने स्वतःच्या पायांवर उभं राहून मुलांना मोठं करायचं तर तसे हाती साधन नाही. तिने पुढे शिकून स्वतःचा संसार चालवावा ही माझ्या वडिलांची तीव्र इच्छा. पैशाचे फारसे पाठबळ नसतानाही तिला शिकवून स्वतंत्रपणे जगात उभी करण्याची माझ्या वडिलांनी जिद्द धरली होती. तिच्या सासरच्या बहुतेकांचा आणि माझ्या मोठ्या काकांचाही याला प्रखर विरोध.

पण यावेळीं माझ्या वडिलांच्या पाठीशी कणखरपणे उभे राहिले तात्या. वयाने लहान असूनही त्यावेळी तात्यांचा सल्ला आणि आधार माझ्या वडिलांना किती मोलाचा वाटला होता ते त्यांनी मला एकदा बोलून दाखवलं होतं. या दोघांच्या आधारावरच माझी ताई फायनलपासून सुरुवात करून ट्रेनिंग कॉलेजचे शिक्षण पूर्ण करू शकली. स्त्रीमुक्ती आणि स्त्रीस्वातंत्र्याच्या तत्त्वाचे पालन त्यांचं घरापासून असे.

तात्या म्हणजे आम्हा कुटुंबीयांना अडचणीच्या वेळीं नेहमीच आधार वाटत आलेले आहेत. एखाद्या गोष्टीचा निर्णय घेता येत नसेल तर, तात्यांचा सल्ला मिळवण्यासाठी धाव घेणे हे जसे आमचे ठरून गेलेले असे.

एका संस्थानातल्या सरदार घराण्यातल्या मुलाने मला लग्नाची मागणी घातली होती. तात्यांच्या खूप परिचयातली मंडळी होती. आमच्या आर्थिक परिस्थितीत असे स्थळ म्हणजे घरी चालत आलेले सुदैव !

तात्यांबरोबरच ती सर्व कुटुंबीय मंडळी आमच्या घरी आली होती. आणि माझे त्यांच्याबद्दल जे मत झाले त्यामुळे मला हा लग्नाचा प्रस्ताव पटेना. सर्वांना माझे म्हणणे वेडेपणाचं वाटत होते. अशा वेळी सल्ला घ्यायचा तात्यांचा. पण त्यांच्या परिचयातली मंडळी म्हणून तर ही मागणी आलेली.

काय करावे कळेना; पण मी स्पष्टपणे तात्यांना म्हटलं, " तात्या, मला ती मंडळी फक्त पैशाने आयुष्य मोजणारी वाटतात. तुमचे त्यांचे स्नेहसंबंध असले तरी ती गोष्ट वेगळी पण या नात्याने मला नाही त्या घरी जावेसे वाटत. "

दुसऱ्याकरता सतत झटत आलेल्या माणसांनी कितीही निरपेक्षपणे काम केलं तरी त्या निरपेक्षतेचाच एक विकल्प त्यांच्या मनात निर्माण होतो. आपण नेहमीच दुसऱ्याच्या भल्याकरता हे करतो आहोत अशीही मनोधारणा होत जाते. मग अशा वेळी " तुम्ही करताय पण त्याने माझं भलं होणार नाही " असे एखाद्याने म्हटले की अशा माणसांना राग येतो. ती दुखावतात. तात्यांना तो मुलगा आवडत असे म्हणूनच त्यांनी तो माझ्याकरता सुचवला होता; पण माझे मत ऐकल्याबरोबर ते तितक्याच निर्विकल्पपणाने म्हणाले,

" तुला नाही ना योग्य वाटत ? मग नकार दे. "

" पण तात्या, तुम्ही सुचवलंत, शिवाय ती मंडळी तुमच्या इतक्या परिचयातली. त्यांना काय वाटेल ? "

" हे बघ, त्याची काळजी तुला नको. माझ्यावर ती रागावली तर माझे मी पाहीन, पण तुझ्या आयुष्याचा प्रश्न आहे. मी कळवतो त्यांना तुझा नकार. "

मनाचं इतकं निरिच्छ संतुलन तात्यांजवळ आहे म्हणून तर मी नेहमी त्यांचा सल्ला घ्यायला धावत असते. अगदी अलीकडे मी सेवानिवृत्त झाल्यानंतर आम्ही पुण्यात नवं घर बांधलं. भागवतांचं घरही तसं सुधारकीचं. त्यामुळे परंपरागत होमहवन वगैरे करण्याकडे आमचा कुणाचाच कल नाही. पण काहीतरी मंगल, पवित्र वातावरण निर्माण करावं त्यावेळी, ही इच्छा.

तात्यांनी ही वास्तुशांतीची पूजा करावी असं आम्ही सुचवलं, त्याचबरोबर हा समारंभ कसा करावा ते कळवा, सुचवा असंही सांगितलं. बरेच दिवस विचार करूनही सुचत नसलेला मार्ग तात्यांनी दाखवला, " तुम्ही आयुष्यभर बालवाङ्मयाची सेवा केली. तेव्हा बाळरूप बाळकृष्णाच्या चंदनी मूर्तीची तुमच्या नातीच्या हस्ते पूजा करा. "

तात्यांची ही सूचना म्हणजे आम्हाला मनातून जे हवे होते पण जे सुचत, समजत नव्हते त्या कोड्याचेच उत्तर होतं. आम्हाला सूचना खूप आवडली, खूप बरे वाटले. तात्या आले, दोनतीन दिवस राहिले, आमचे कौतुक खूप केलं त्यांनी.

त्यांच्याकडून असं कौतुक करून घेण्यासाठीच ते त्यांनी करावे या इच्छेपायी तर पुष्कळदा त्यांना कित्येक समारंभांना बोलावतात, त्यांचे हे घरगुती समारंभांना, लग्न वगैरे सोहोळ्यांना जाणे काही मंडळींना अनाठायी वाटते.

" कशाला हे जातात इतके धडपडून ? " असं म्हटले जातं.

पण तात्या जातात ते बोलावणारांसाठी. स्वतःसाठी नव्हे. स्वतःच्या मिरवण्याच्या हौसेसाठी गेले असते तर, लोकांच्या डोळ्यांसमोर राहण्याची त्यांनी धडपड केली असती. त्यांचा वेष इतरांपेक्षा वेगळा, तेव्हा आपल्याभोवती एक वेगळं वलय निर्माण करणे अशा प्रसंगी तरी त्यांना सहज शक्य झाले असते; पण तात्या अशा प्रसंगी येतात ते त्यांचं आगमन त्यांना बोलावणारी, त्यांचं येणं अत्यंत आवश्यक मानणारी, त्यांच्या येण्यामुळे सुखावणारी, फुलून येणारी मंडळी सोडली तर इतरांना कधी कळत, जाणवतही नाही. बोलावणारांच्या मनातल्या खऱ्या आंतरिक ओढीने खेचूनच ते येतात. उत्सवमूर्ती म्हणून कुठेही जाणं त्यांच्या स्वभावातच नाही. आपण गेलो नाही तर बोलावणाराचं मन दुखावेल; तसं होऊ नये एवढाच हेतू असतो त्यांचा अशा प्रसंगी. ते निमंत्रण त्यांच्या मनाला पटलेलं असतं.

आणि मनाला पटलेलीच गोष्ट करायची, न पटेल तेव्हा दूर व्हायचे हे गणित आहे त्यांच्या आयुष्याचे. म्हणूनच मसूराश्रमातले बदललेले आणि एकेकाळी काही अंशी बिघडलेले वातावरण त्यांना पटेना तेव्हा ते त्यापासून दूर झाले. आणीबाणीच्या

काळात विनोबांनी इंदिराजींना पाठिंबा दिला तो त्यांना मुळीच पटला नाही, ते पवनारहून बाजूला झाले. त्यांचं आवडतं शिक्षणाचं काम करण्यासाठी आचार्यकुलाची चळवळ त्यांनी हाती घेतली.

स्वतःला पटलेलं काम जिद्दीने आणि तळमळीने करण्यात तात्यांचा हात धरणारे थोडेच! त्यांचं दर्यापूरचं प्रबोधन विद्यालय हे त्याचं मूर्तिमंत प्रतीक. पण जिद्दीने काम करणारांमध्ये एकप्रकारचा कठोरपणा आणि मोठेपणाची भावना निर्माण होते ती तात्यांमधे लवमात्र नाही. म्हणूनच दर्यापूरची शाळा त्यांनी अगदी साधेपणाने, माधुकरी मागून, सात विद्यार्थी घेऊन झोपडीत सुरू केली आणि ती इतकी भरभराटीला आली तरी हे अजूनही झोपडीवासीच राहिले आहेत

त्यांच्या या प्रेमळपणाचा आणि साधेपणाचा ठसा त्यांच्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींवर आणि त्यांच्याबरोबर राहणाऱ्या सर्वच व्यक्तींवर झाला असणं शक्य आहे.

बाबा रेडीकर त्यांच्याबरोबर नेहमी सावलीसारखे राहणारे. तात्या मसूराश्रमात होते तेव्हापासूनच हे मी पाहिलेलं आहे. तात्यांनी मसूराश्रम सोडला आणि त्यांच्याचबरोबर बाबाही तिथून बाहेर पडले. ‘ जिथे मामा तिथे बाबा ’ असं म्हणून त्यांना लोक रामलक्ष्मणाची उपमा देतात; पण माझ्या मनावर त्या दोघांच्या जोडीचा जो ठसा उमटला आहे तो ‘ राम–हनुमान ’ असा आहे. तात्यांनी शारीरिक कष्ट खूपच सोसले– आश्रमाच्या कामासाठी, देशभक्तीसाठी; पण त्यांची कुडी आणि प्रकृती तशी नाजूकच आणि बाबा त्यांच्यापुढे रांगडे मल्लच वाटायचे. बाबांची त्यांच्यावर फार भक्ती, त्यामुळे जणू काही त्यांच्या रक्षणाची जबाबदारी आपल्यावर आहे अशा तऱ्हेने बाबा वागतसं आम्हाला वाटे. आम्ही लहानपणी त्यांना तात्यांचे बॉडीगार्ड म्हणत असू; पण बाबा दिसतात तसे स्वभावाने रांगडे नाहीत. भावनांचा विलक्षण ओलावा आहे त्यांच्याजवळ. त्यामुळेच तात्यांवरची त्यांची भक्तीही अशीच विलक्षण आहे. त्याचा परिपाक म्हणजे तात्यांची कुटुंबीय मंडळी तीच बाबांची कुटुंबीय.

माझा वाढदिवस गणेशचतुर्थीला असतो. तात्या मुंबईत असले की नेहमी येत त्या दिवशी मला भेटायला. बाबाही क्वचित त्यांच्याबरोबर असत.

एका वर्षी सकाळी उजाडताच बाबा गणेशचतुर्थीला आमच्या घरी हजर. हातात एक लाल कमळ. आले, उभ्याउभ्याच न बोलता त्यांनी ते कमळ माझ्या हातात ठेवलं- आणि क्षणभरही न थांबता तडक जिना उतरून खाली गेले. त्यांना तात्यांनी पाठवलं नव्हतं खास. ते स्वतःच्याच मनाने आले होते. कारण पुन्हा भेटले एकदा तेव्हा विचारलं, तर म्हणाले, ‘ तुमचा वाढदिवस असतो ना त्या दिवशी लीलाताई ? मामांबरोबर मी आलो होतो की दोन-चारदा. त्या दिवशी होतो मुंबईत. म्हटलं जावं ! ’

तात्यांची सर्व मंडळी आम्हाला आमची का वाटतात त्या रहस्याचा मला उलगडा झाला. त्याचबरोबर आम्हीही सर्व मंडळी तात्यांच्या संबंधीतांना आपली का

वाटतो याचंही उत्तर मिळालं. आपण ज्यांच्यावर प्रेम करतो त्यांच्यावर इतरांनाही प्रेम करायला लावण्याची अशी एक विलक्षण अपरोक्ष प्रेमारोपणाची शक्ती तात्यांच्या वागण्यात, स्वभावात आहे.

बाबा किंवा इतर मंडळी नेहमी तरी त्यांच्या सहवासात असतात. त्यांच्यावर असा परिणाम झाला तर नवल नाही; पण त्यांच्या सहवासात काही काही काळ येणाऱ्या कुणावरही त्यांच्या प्रेमळ सावेपणाचा परिणाम होतो.

प्रबोधन विद्यालयाला दहा वर्षं पूर्ण झाली होती. त्या निमित्त एक सोहळा आयोजित केला होता. आम्ही सर्व मंडळीं दर्यापूरला गेलो होतो. माझा मोठा मुलगा रवींद्र त्यावेळी चार वर्षांचा असेल, शाळेच्या नेहमीच्याच झोपड्या बांधलेल्या होत्या. इतर वेळीं तिथे वर्ग भरत; आमची जेवणं खाणंही तिथेच होत. एक दिवस जेवताना रवींद्र एकदम म्हणाला, " आई, आपल्या बंगल्याची झोपडी केव्हा करायची ? "

केवळ झोपडीचं नावीन्य म्हणून नव्हे, तर सर्वच वातावरणचा त्या बालमनावर झालेल्या परिणामाचा तो प्रकट आविष्कार होता.

सर्वसामान्य संसारी माणसांप्रमाणे न राहणाऱ्या तात्यांचं येणं हे आम्हा कुटुंबियांना कधीच अडचणीचं वाटत नाही. मला तर कधीच वाटलं नाही; पण त्यांचा पोशाख, त्यांचं कार्य, यावरून इतरेजनांचा मात्र उगीच गैरसमज होतो.

एकदा मुंबईला एका शेजारणीने मला विचारलं, " आज तुम्ही ऑफिसमध्ये जाणार नसाल ? "

" का हो ? "

" अहो ते गुरुजी आले आहेत ना तुमच्याकडे. शिवाय खादीधारी दिसताहेत, म्हंजे जेवणाखाणाच्या अटीतटीच असणार ! काय खातात हो ते ? "

माझ्या डोळ्यांसमोर एकदम पु. लं. च्या ' तुझं आहे तुजपाशी ' मधले आचार्य उभे राहिले. आणि त्यांच्या तुलनेत तात्यांच्या सवयी आठवून मी म्हटलं.

" अहो ते ना ? काहीही खातात. म्हंजे असेल ते आणि नसेल तेही ! "

मी चेष्टा करते म्हणून शेजारीणबाई रागावल्या. पण मी म्हटलं ते अक्षरशः खरं होतं. कारण मी, तात्या आले तरी नेहमीसारखी ऑफिसमध्ये जात असे. आमच्या घरी आम्हीही तिखट खात नसल्यामुळे प्रकृतीच्या विकारांमुळे तात्यांना न सोसण्यासारखा सैंपाक नसेच. पण घाईघाईत एकाद-दोन पदार्थ केलेले असत तेवढेच. मुंबईचं खरं जेवण रात्रीचंच, पण अचानकपणे तात्या आले म्हणून काही करण्यासाठी थांबून ऑफिसला उशीर करणं तात्यांना पटायचं नाही. ते म्हणायचे, " तू जा आपली कामाला जे असेल ते पुरेल आम्हाला. "

आणि आल्यावर विचारलं की, " तात्या, पुरेसं झालं ना होतं ते ? "

" अग, होतं ते अन् नव्हतं ते सगळं खाल्लं. मग पुरेसं न व्हायला काय झालं ?"

इतकी त्यांची बिनतक्रार तृप्ती माझ्या अनुभवाला येत असताना मी माझ्या शेजारणीला जे सांगितलं त्यात काय चूक होतं ?

सर्वांच्या अडचणींना धावून जायचं, पण आपली अडचण मात्र कुणाला होऊ द्यायची नाही या त्यांच्या अप्राप्य गुणांमुळेच ते सर्वांना हवेहवेसे वाटतात. घरच्यांना आणि बाहेरच्यांनाही. गरीब, श्रीमंत, शिक्षित, अशिक्षित, जातपात, कसलाच भेद त्यांच्याजवळ नाही. परंपरावाद्यांचा हटवादीपणा नाही किंवा सुधारणावाद्यांची निष्प्रेम तर्ककठोरताही नाही. तर्कनिष्ठता आणि समजुतीचा सुसंवाद यांचे एक विलक्षण सामंजस्य तात्यांच्या स्वभावात आढळतं.

ही स्वभाववैशिष्ट्यं त्यांच्या आईकडून, म्हणजे माझ्या आजीकडून तर त्यांनी उचलली नसतील ?

तात्यांचं आपल्या आईवर विलक्षण प्रेम होतं. अपार भक्ती होती. मला आठवत नाही, पण कुठल्याही प्रसंगी विकल न झालेले तात्या आजीच्या मृत्यूने नक्कीच विव्हल झाले असतील. नव्हे झालेच. मातृप्रेमाबद्दल ते बोलायला लागले की याची प्रचीती येते.

तत्त्वाचरणाची जिद्द, दुसऱ्याचं मन समजून घेणं, सारासार विचार, तारतम्य, कमालीचा सोशिकपणा, दुसऱ्याचं दुःख आणि अडचण दूर करण्याची आंतरिक ओढ, वृत्तीचा शांतपणा आणि मनाची ऋजुता हे सारे गुण माझ्या आजीच्या ठायी होते. तिचं व्यक्तिचित्र " पांढरा चाफा " नावाच्या माझ्या पुस्तकात मी रेखाटलं आहे. ते लिहिताना कित्येकदा मला आजीबरोबर तात्यांचीही आठवण होत असे.

मसूराश्रमात त्यांना ' शांतमूर्ती ' म्हणत. ते नावच होतं तिथलं त्यांचं. आईच्या रक्तातले असे हे आगळे गुण या शांतमूर्तींमधे उतरले असले पाहिजेत. म्हणूनच तर सर्वांना दिलासा देणारी, आधार वाटणारी, सांभाळून समजून घेणारी, आनंद देणारी, ओढ लावणारी मातृवत्सल ऋजुता तात्यांच्या स्वभावात आली असेल का ? त्यांच्या वागण्यात उमटत असेल का ?

पहिला ' हुंकार तो असेल; पण नंतरचा सारा स्वभावाविष्कार त्यांचा स्वतःचा; स्वतःच्या प्रयत्नाने, मेहनतीने, अनुभवाने आणि विचाराने जोपासलेला आहे. आचरणात प्रत्यक्ष आणलेला आहे. त्यांच्या सहवासाचा, या गुणांच्या प्रकट रूपाचा मला लाभ झालेला आहे. अगदी कित्येक वर्षं न कळत्या लहानपणापासून. आता साठीच्या घरात पोचेपर्यंत जगात इतरांपेक्षा अभिमान बाळगायला ही एक गोष्टदेखील पुरेशी आहे. म्हणूनच जेव्हा कुणी विचारतात—

" मामा क्षीरसागर तुमचे कोण ? " तेव्हा निश्चित कोणत्या भावनेने कोण जाणे, पण अत्यंत तृप्ततेने मी उत्तर देते—

" तुम्ही त्यांना मामा म्हणता; पण ते माझे खरे खरे मामा आहेत. "

☐ ☐

# आचार्यकुलाचा आशावाद व आशीर्वाद

## कृ. द. बेदरकर

### एक आठवण

मामांच्याबद्दल हा लेख लिहिताना मला आचार्यकुलाचे सुरवातीचे अ. भा. अध्यक्ष कै. श्री. वंशीधर श्रीवास्तव यांची आठवण होते. १९७२ मध्ये पवनारला भरलेल्या आचार्यकुलाच्या महाराष्ट्राच्या मेळाव्याला ते हजर होते. कै. श्रीवास्तव 'नई तालीम' मासिकाचे संपादक होते. या मेळाव्यात त्यांना मामांच्या व्यक्तिमत्त्वाचे जे दर्शन घडले, त्याने ते इतके भारावून गेले की, 'नई तालीम'च्या संपादकीय लेखात त्यांनी पुढील उद्गार काढले; "महाराष्ट्राप्रमाणे प्रत्येक प्रांताला जर असा एकेक मामा मिळाला तर, अखिल भारतात आचार्यकुलाचा एक प्रचंड वटवृक्ष निर्माण होण्यास विलंब लागणार नाही."

### आमची दोन दैवते

बाबा (विनोबा) आणि मामा ही आम्ही आचार्यकुलाची दोन दैवते मानतो. बाबांनी आम्हाला आचार्यकुलाचा विचार दिला आणि मामांनी आम्हाला या विचाराकडे आकर्षून घेतले. महाराष्ट्रात आचार्यकुलाला मामांचा जर सहवास लाभला नसता तर, आचार्यकुलाचा विचार फक्त मस्तकातच राहिला असता. या मार्गावर यथाशक्ती वाटचाल करण्याची प्रेरणा आम्हाला मामांनीच दिली, हे मामांचे श्रेय कोणीही नाकबूल करू शकणार नाही.

### आचार्यकुलाची बिकट वाट

विनोबांनी भारताला ज्या अनेक थोर देणग्या दिल्या आहेत, त्यांपैकी आचार्यकुलाचा विचार ही आपली सर्वांत थोर देणगी आहे असे खुद्द विनोबांना पण वाटते. नई तालीमच्या विचाराबद्दल देखील गांधीजींचा अभिप्राय असाच होता. या दोन महामानवांनी शिक्षणाप्रमाणे जीवनाच्या अन्य क्षेत्रांसाठी पण अशा अनेक देणग्या दिलेल्या आहेत. तथापि सर्वसामान्यपणे प्रत्येक क्रांतिकारक महापुरुषाच्या कर्तृत्वाचा योग असा विचित्र असतो की, त्याच्या क्रान्तिकारक विचारांचे यश त्याच्या हयातीत त्याला पाहावयास मिळत नाही. त्याच्या वाट्याला कौतुकापेक्षा हेटाळणीच जास्त आलेली

असते. पुढे हजार.पाचशे वर्षांनी लोकांना त्याचे मोठेपण उमगते आणि इतिहास त्यांची दखल घेऊ लागतो. **सारांश इतकाच की द्रष्टे म्हणविले जाणारे महापुरुष काळाच्या आधी जन्माला येतात आणि त्यांच्या विचारांना अनुकूलता निर्माण करणारा काळ त्यांच्या पश्चात शतकानुशतकानंतर जन्माला येतो.**

आचार्यकुलाच्या प्रचलित सेवकांनी काळाच्या अनुकूलतेचे हे मर्म अन्तर्यामी जर ओळखून घेतले तर त्यांच्या उत्साहाला निराशेची किंवा न्यूनगंडाची बाधा होणार नाही. हे मर्म आमच्या मामासाहेबांनी अचूकपणे हेरलेले असावे असे त्यांच्या कार्य-पद्धतीवरून वाटते. आचार्यकुलाची बिकट वाट ते जाणून आहेत. म्हणूनच आचार्य-कुलाच्या वाटचालीत एकेका पावलाचा प्रदेश धीराने व धीमेपणाने काबीज करण्याच्या निर्धाराला ते अगदी चिवटपणाने चिकटून आहेत. **विनोबांच्या परिवारातील ते निष्ठावंत परिव्राजक आहेत.** विनोबांच्या प्रेरणेने आचार्यकुलाच्या सेवकांसाठी पहिली वाटचाल तयार करण्याचे काम त्यांनी पत्करले आहे. त्यांच्या परिश्रमामुळे आमच्यासमोर काही प्रकाश निर्माण झाला आहे आणि दिशा दिसू लागल्या आहेत. अंधारात चाचपडण्याची अवस्था संपुष्टात येईल अशी आशा आता वाटू लागली आहे.

## मृदू, मृदूतर, मृदूतम

शिक्षकांच्या सभेत विनोबांचा आचार्यकुलाबद्दलचा एक मुद्दा मामा फार आग्रह-पूर्वक प्रतिपादन करीत असतात. हा मुद्दा जितका वादग्रस्त आहे तितकाच तो मूलभूत स्वरूपाचा आहे. विनोबांना असे वाटते की, "आचार्यकुलाची स्थापना शिक्षकांच्या हक्कांची प्रतिष्ठापना करण्यासाठी झालेली नाही. अधिकारप्राप्तीसाठी दुसऱ्या अनेक संस्था आहेत. आचार्यकुल ही संस्था कर्तव्यजागृती आणि प्रयत्नशीलता या गुणांच्या वाढीसाठी निर्माण झाली आहे. **आचार्यकुलामुळे शिक्षकांचा गमावलेला दर्जा त्यांना पूर्ववत प्राप्त होईल.** आज शिक्षक अगदीच सामान्य पातळीवर आला आहे. ज्या क्षणी शिक्षकाला या अवनतीचे भान होईल त्या क्षणी त्याची त्यातून सुटका होईल." हल्ली शिक्षकांच्या आंदोलनाचा एकमेव भर हक्क आणि अधिकारप्राप्ती यावर असल्या-मुळे कालमानाला अनुसरून त्यांनी संघर्षवाद्यांची भूमिका धारण केली आहे. अशा परिस्थितीत कर्तव्यजागृतीची आचार्यकुलाची भूमिका शिक्षकांसमोर मांडणे ही कामगिरी जितकी अवघड आहे तितकीच ती फार नाजूक आहे; परंतु ही कामगिरी मामा फार जबाबदारीने हाताळतात. या महत्त्वाच्या मुद्द्याबद्दल मामांच्या मनात विनोबांच्या इतकाच स्पष्टपणा असला तरी हा मुद्दा मांडण्याची त्यांची शैली अनाग्रही वृत्तीची आहे. त्यांच्या प्रतिपादनात अभिनिवेशाचा अथवा प्रतिस्पर्धेचा लवलेश देखील जाणवत नाही. भाषणाच्या आरंभी ते मृदू असतात, प्रतिपादनात ते मृदूतर होतात आणि भाषणाच्या शेवटी ते मृदूतम वाटतात. मामांच्या या शब्दशक्तीचे रहस्य त्यांच्या चारित्र्यसंपन्नतेत

दिसते. म्हणून आचार्यकुलाच्या आपल्या अनुयायांच्या मनावर मामांचा पहिला संस्कार त्यांच्या चारित्र्यसंपन्नतेचा होतो.

## मामांचे आचार्यत्व

समोरची परिस्थिती इतकी प्रतिकुल असताना देखील आचार्यकुलाच्या भवितव्या-बद्दल मामा इतके आशावादी का दिसतात, याची आणखी काही कारणे शोधण्यासारखी आहेत. याचे एक कारण असे की, **मामांच्या व्यक्तिमत्त्वाचा खरा पिंड आचार्यत्वाचा आहे, शिक्षकाचा नाही.** चालू परिस्थितीच्या संदर्भात शिक्षक आणि आचार्य या दोन संकल्पना भिन्न वाटतात. फक्त शाळा हेच आपले जग मानतो तो शिक्षक आणि शाळेच्या बाहेरचा परिसर हेही आपले जग जो मानतो तो आचार्य. या संकल्पनेतील आचार्यां-बद्दल काही मौलिक संकेत विनोबांनी आमच्या मनावर फार पक्के बिंबविले आहेत. मामांच्या आचार्यत्वाच्या संदर्भात आम्ही हे संकेत नीट जाणून घेतले पाहिजेत. विनोबांच्या संकल्पनेप्रमाणे आचार्य म्हणजे–

( १ ) जो सतत फिरत असतो व आपले विचार दुसऱ्यांना सांगत राहतो,
( २ ) जो बोलण्याप्रमाणे नेहमी आचरण करतो,
( ३ ) जो इतरांपेक्षा काळाची पावले आधी ओळखतो आणि म्हणून जो समाजाचे मार्गदर्शन करू शकतो,

( ४ ) जो नित्य अध्ययनशील असतो,
( ५ ) जो परिश्रम व निष्ठा हेच आपले ब्रीद मानतो,
( ६ ) ज्याच्या मनात विद्यार्थ्यांबद्दल नितांत प्रेम आणि वात्सल्य असते,
( ७ ) लहान–मोठी लोकसेवा करण्यात ज्याला धन्यता वाटते.
( ८ ) आणि राजकारणाच्या बाबतीत जो सर्वथा पक्षमुक्त असतो, तो आचार्य.

## सर्व पक्ष समभाव

तात्त्विक दृष्टया आचार्यकुलाच्या संदर्भात राजकारणाचा विचार करण्याची वास्तविक काहीच आवश्यकता नाही; परंतु देशातील प्रचलित राजकीय परिस्थितीने राजकारणाच्या विचारांचे ओझे आचार्यकुलावर निष्कारण लादले आहे. या बाबतीत विनोबांनी आचार्य-कुलाची भूमिका अगदी निःसंदिग्धपणे पुढीलप्रमाणे विशद केली आहे :

" याकरता आपण स्वतःला राजकारणापासून नेहमी अलिप्त ठेवले पाहिजे. आपण राजकारणाचे अध्ययन करू नये असे माझे म्हणणे नाही. या विषयाचे आपले अध्ययन अवश्य असले पाहिजे; परंतु मुख्य चिंता असली पाहिजे जयजगतची, **साऱ्या जगाचे भले करू इच्छिणारे एक राजकारण आहे.** त्यात आपण सहभागी झाले पाहिजे. आपण त्याचे मनन, चिंतन व अध्ययन केले पाहिजे; परंतु आजचे जे सत्तारूढ आणि

पक्षनिष्ठ राजकारण आहे, त्यापासून आपल्याला दूर राहिले पाहिजे. संकुचित राजकारणात डुबक्या मारणे हा आपला गौरव नसून पराभव आहे. राजकारणाच्या वरती उठून त्यापासून मुक्त होण्यात आपला खरा गौरव आहे. ”

आचार्यकुलाच्या ध्येयवादाच्या दृष्टीने शिक्षण आणि शिक्षक दोन्ही शासनमुक्त आणि पक्षमुक्त असले पाहिजेत; पण शिक्षकांच्या चित्तशुद्धीच्या दृष्टीने पक्षमुक्तीचा विचार अधिक जवळचा आणि निकडीचा आहे. **पक्षमुक्तीची समस्या हाताळण्याची मामांची हातोटी अभ्यासण्यासारखी आहे.** पक्षमुक्तीच्या भावनेने वागण्याचे मामांचे धोरण निधर्मी तत्त्वाच्या धोरणाच्या धर्तीचे आहे. सर्वधर्मसमभावाच्या पद्धतीप्रमाणे मामांचे पक्षमुक्तीचे धोरण सर्वपक्षसमभावाचे आहे. सर्वपक्षसमभावाचा मामांचा आशय असा की, आम्ही जरी कोणत्याही पक्षाचे नसलो तरी आमचे कोणत्याही पक्षाशी वैर नाही. कोणत्याही पक्षामध्ये आम्ही भेदभाव करीत नाही. आमचे मित्र सर्व पक्षांत असतात; म्हणून आम्हाला सर्व पक्ष सारखेच वाटतात. विविध पक्षांतील मामांच्या मित्रपरिवाराचे या दृष्टीने अवलोकन केल्यास मामांचे सर्वपक्षसमभावाचे हे धोरण सहज लक्षात येईल. मामांच्या या धोरणाचा एक फायदा फार महत्त्वाचा आहे. या धोरणामुळे सर्व पक्षांमध्ये आचार्यकुलाबद्दल आपुलकीची भावना वाढीस लागते. या बाबतीत विनोबांचा सल्लासुद्धा फार मोलाचा आहे. ते म्हणतात, ‘आचार्यकुलाच्या सदस्याने कोणत्याही राजकीय पक्षात असू नये हे जरी खरे असले तरी राजकीय पक्षांत आपले जे मित्र असतील त्यांना आपण दूर ठेवू नये. त्यांना जवळ करावे. आचार्यकुलाच्या चर्चेसाठी त्यांना बोलवावे. आपण त्यांचा सल्ला घ्यावा. मतदान होईल तेव्हा त्यांना मत देता येणार नाही; पण त्यात गैर वाटण्यासारखे काहीच नाही.’

## आमच्या आशावादाचा दीपस्तंभ

येथपर्यंत मी केलेल्या विवेचनात माझे मुख्य सूत्र एवढेच आहे की, आचार्यकुलाच्या सामान्य कार्यकर्त्यांना साधारणपणे ज्या समस्या कठीण वाटतात त्यांची उकल करण्याचे काही उपाय मामांच्या व्यक्तिमत्त्वात आणि त्यांच्या कार्यपद्धतीत आढळून येतात. अशा आणखी काही समस्या असू शकतील; परंतु मामा हा आमच्या आशावादाचा दीपस्तंभ असल्यामुळे त्याच्या प्रकाशात आमचे तारू आता फारसे कोठे अडणार नाही किंवा फुटणार नाही. तरीसुद्धा एक मूलगामी समस्या वाचकांपुढे ठेवावी असे वाटते.

माझा प्रश्न असा आहे की, आम्ही कार्यकर्त्यांनी, शिक्षकांच्या मनावर आचार्यकुलाचा संस्कार करताना, मुख्य भर कोणकोणत्या संस्कारांवर दिला पाहिजे? **प्रधान संस्कार कोणते, सामान्य संस्कार कोणते** या बाबतीत कोठेतरी एकवाक्यता होण्याची फार आवश्यकता आहे. या एकवाक्यतेची आज निकड नसली तरी गरज आहे.

हे विसरून चालणार नाही. शिक्षकांनी शाळेत वेळेवर यावे, खोट्या रजा घेऊ नये. मुलांना मन लावून शिकवावे, अध्यापनाची प्रामाणिकपणे तयारी करावी, आपल्या चुकीच्या किंवा अपूर्ण तयारीमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ देऊ नये, शाळेच्या कामात चुकारपणा करू नये, आपल्या कामात कोठेही खोटेपणा किंवा लबाडी करू नये, इत्यादी आदेश आम्ही सामान्यपणे आमच्या भाषणात अथवा संभाषणात विद्यार्थ्यांना देतो.

अशा या आदेशांना आपण शिक्षकांचे नागरिकत्व असे म्हणू या.

विनोबांनी एके ठिकाणी शिक्षकांचे नागरिकत्व व त्यांचे आचार्यत्व असे शब्द वापरले आहेत. या दोन शब्दांचा भावार्थ आचार्यकुलाच्या कार्यकर्त्यांनी मनाशी नीट उमगून घेतला पाहिजे. **विनोबांनी नागरिकत्वापेक्षा आचार्यत्व श्रेष्ठ मानले आहे.**

यावेळी काही विचित्र अनुभवांची आठवण होते. एका मित्राने एकदा मला ताकाला जाताना भांडे लपविण्याचा सल्ला दिला होता. ते म्हणाले की, ‘ शिक्षकांपुढे आचार्यकुलाचा विचार मांडताना विनोबा आणि सर्वोदय या दोन शब्दांचा उल्लेख टाळून तुम्हाला काय सांगायचे असेल ते सांगा ’ एका नामांकित शिक्षकाच्या शाळेत मला आणखी एक विचित्र अनुभव आला. आचार्यकुलाच्या संदर्भात मी शिक्षकांना म्हणालो की, सर्वोदय विचार हा आचार्यकुलाच्या विचारांचा गाभा असल्यामुळे, शिक्षकांनी सर्वोदयाचा विचार समजून घेतला पाहिजे. आश्चर्य असे की, महाशय नामांकित शिक्षकांनी सर्वोदय विचारांच्या अध्ययनाची माझी सूचना धुडकावून लावली. कधी कधी खुद्द आचार्यकुलाच्या सभेत मला असाच अनुभव आला. नागरिकत्वापेक्षा आचार्यत्व श्रेष्ठ आहे हे लक्षात घेऊन आचार्यकुलाच्या सेवकांनी शिक्षकांच्या मनावर करावयाच्या संस्काराची नीट केव्हा तरी जुळणी केली पाहिजे. **आचार्यत्व ही दृष्टी आहे आणि नागरिकत्व हे वर्तन आहे.** दृष्टी आली की वर्तनाला आपोआप वळण लागेल. वर्तनाला वळण लावण्यासाठी वेगळे प्रयत्न करावे लागणार नाहीत.

## अभिवादन

या लेखाच्या शेवटी मी मामांना वंदन करतो. आचार्यकुलाच्या आशावादाचे आणि आशीर्वादाचे पाझर मामांच्या व्यक्तिमत्वातून आमच्या सामान्यत्वात लहानमोठ्या प्रमाणात वाहात आले आहेत. आमचे चारित्र्य आणि सामर्थ्य ज्या प्रमाणात असेल त्या प्रमाणात आमचे सेवकत्व टिकेल अथवा टिकणार नाही. न जाणो एखाद्यावर आंधळ्या मिल्टनप्रमाणे पुढील उद्गार काढण्याचीदेखील पाळी येईल.

“ They also serve who stand and wait ”

□ □

# ‘ जरि माझेरें श्रीमंते होंति । तुम्हां ऐसी ’

## प्रा. मनू गंगाधर नातू

एक ऑगस्ट १९२०. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी उभे आयुष्य होमून टाकलेल्या लोकमान्यांचे प्राणोत्क्रमण. आबालवृद्धांच्या अंतःकरणात उठलेला दुःखाचा कल्लोळ! स्वराज्याचा महामंत्र देणाऱ्या या थोर नेत्याच्या अंत्यदर्शनासाठी चौपाटीवर जमलेला अफाट शोकाकुल जनसागर! आपल्या प्राणप्रिय पुढाऱ्याची चिता पेटलेली पाहताच कोवळ्या तरुणांनी फोडलेला टाहो! या तरुणांपैकीच एक तरुण होते एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये शिकत असलेले स्कॉलर शंकर धोंडो क्षीरसागर! या दारुण घटनेने ते इतके भारावून गेले की, त्यांनी तत्क्षणी देशासाठी आजन्म ब्रह्मचारी राहून फकिरीचे व्रत घेण्याचे मनोमनी ठरवले. त्यानंतर एका वर्षाच्या आतच गांधीजींनी असहकाराची चळवळ पुकारली. हजारो तरुणांनी गांधीजींच्या आवाहनास अहमहमिकेने प्रतिसाद दिला; पण अल्पकाळच. त्यांचा आदेश आमरण पाळणारे हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच होते. अशा अपवादात्मक व्यक्तींपैकी मामा एक होते. त्यांनी कॉलेजला व घराला रामराम ठोकला तो कायमचा. त्यानंतरची सव्वीस वर्षे स्वराज्यासाठी व त्यानंतर आजपावेतो एकतीस वर्षे सुराज्यासाठी ते सर्वस्वाने झटले व अजून झटत आहेत. या प्रदीर्घ काळात त्यांनी किती शारीरिक व मानसिक हालअपेष्टा सहन कराव्या ? प्रकृतीने त्यांना कधीच साथ दिली नाही. रामदासांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी अनेक वर्षे आपला उदरनिर्वाह भिक्षेवर केला. त्यामुळे स्वाभाविकच खाण्यापिण्याची सतत फार आबाळ झाली. सातपुड्यात भिल्लांच्या शिक्षणाचे कार्य करीत असताना मलेरियाने त्यांचा अनेक वर्षे पिच्छा पुरवला. नेहमी तिसऱ्या वर्गाच्या डब्याने प्रवास, कपडे धुण्यापासून आपली सर्व कामे आपणच करणे, सतत जागरणे, आणि आता वृद्धापकाळ यामुळे त्यांची प्रकृती सतत खालावतच आहे. अलीकडे तर त्यांची दृष्टीही इतकी मंदावली आहे की, त्यांना अंधत्व येते की काय अशी भीती डॉक्टरांना वाटते; परंतु मामांच्या कामात क्षणभरही खंड पडलेला नाही. थोडीथोडकी नव्हे, तर गेली अठ्ठावन्न वर्षे देशसेवेच्या अनेकविध कार्यात ते इतके मग्न आहेत की, आपल्या वयाने पंच्याहत्तरी गाठल्याचेही भान त्यांना नाही. ज्ञानदेवांच्या शब्दांत म्हणजे मामांच्या जीवनात–‘ भीतरी ज्ञाने उजळिला । बाहेरी कर्मे क्षाळिला । ’ असा अंतर्बाह्य चोखाळ आढळतो. कर्माचरणाने बाह्य इंद्रिये पवित्र करून निर्मळ ज्ञानाने अंतरंग उजळ केलेले त्यांचे जीवन म्हणजे गंगामृताने भरलेला चकचकीत सुवर्णकलशच होय.

'निर्वाळूनि कनके। भरला गांगे पीयूखे।'

देशोद्धारासाठी अहर्निश झटणाऱ्या मामांच्या असंख्य कार्यांची मोजदाद कोण करू शकेल? अंधेरीच्या साधकाश्रमाचे काही वर्षे व्यवस्थापक, गोमांतक शुद्धिकरणातील प्रमुख कार्यकर्ते, 'श्री. दासबोध' मासिकाचे संपादक, 'गोमांतकशुद्धीचा इतिहास' या ग्रंथाचे लेखक, सातपुड्यातील भिल्लांच्या उन्नतीसाठी झटणारे लोकशिक्षक, दर्यापूर येथील प्रबोधन विद्यालयाचे संस्थापक, कोल्हापूरच्या ग्रामसेवाश्रमाचे चालक, गोवामुक्ती-संग्रामातील सैनिक, भूदान, ग्रामदान व नंतर आचार्यकुल या विनोबाजींच्या कार्याचे महाराष्ट्रातील संयोजक; अशी त्यांची किती म्हणून कामे सांगावी? त्याच्या जोडीस देश-सेवेचे व्रत घेतलेल्या ज्या संस्था त्यांना बोलावतात तेथे मामा आवर्जून जातात व आपल्याला शक्य तेवढे साहाय्य करतात. या सर्व कार्यात ते पुढारी म्हणून कधीही वावरत नाहीत. याशिवाय शाळा व कॉलेजे यांतील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी गावोगावी शिबिरे घेतली व असंख्य तरुणांच्या अंतःकरणात देशप्रेमाची, ज्ञानलालसेची व सदाचाराची ज्योत पेटवण्याचे महान कार्य केले. १९३७ साली अकोल्याच्या अशाच एका शिबिरात मला त्यांच्या भेटीचे व मार्गदर्शनाचे भाग्य लाभले. मामा हे उत्कृष्ट वक्ते व खंदे लेखक आहेत. स्वातंत्र्यसंग्रामावरील त्यांची भाषणे तर श्रोत्यांना देहभान विसरा-वयास लावतात. त्यांचे लेखनही त्यांच्या वाणीसारखेच रसाळ, मृदुमधुर, प्रवाही व प्रभावी आहे. त्यांचे साधे पत्रही त्यांच्यातील लेखनसामर्थ्य जाणवून देण्यास पुरेसे ठरते.

पृथ्वी ज्याप्रमाणे सूर्याभोवती फिरता फिरता स्वतःभोवतीही फिरते त्याप्रमाणे वरील अनेक कार्ये करीत असतानाच मामा आमच्यासारख्या अनेक मुलांमुलींच्या जीवनातील वैयक्तिक अडीअडचणी अतिशय जिव्हाभावाने सोडवतात, आमचे दुखले–खुपले पाहतात. म्हणून अनेकांच्या तोंडून 'पाळिले पोसिले लावियला लळा। सांभाळिले आम्हा सर्वस्वाने॥' असे कृतज्ञतेचे उद्गार बाहेर पडतात. जनाबाईचे दळण दळण्यास विठ्ठल जात होता की नाही, हे त्याचे त्याला माहीत; पण मामा मात्र अनेक जनाबाईंच्या मदतीस धावून जातात. त्यांची शांत, शीतल व अमृतमधुर जीवनसरिता माझ्यासारख्या अनेकांची जीवने उमलवीत, फुलवीत व कृतार्थ करीत वाहात आहे. मात्र या सरितेला त्याची मुळीच जाणीव नाही. उलट तिला वाटते की, आम्हीच तिच्या प्रवाहास मदत करीत आहोत!

मामांचे असे असाधारणत्व आणखी अनेक बाबतींत व्यक्त होते. थोर व्यक्ती म्हटली की, तिच्याभोवती जमणारी मंडळी बहुधा तिचे भक्त म्हणूनच वावरत असतात. त्यातच त्यांना व त्या व्यक्तीलाही धन्यता वाटते. एवढेच नव्हे तर, त्या भक्तांपैकी जे सर्वांत जास्त निष्ठावान असतील त्यांना त्यांच्या मगदुराप्रमाणे त्या थोर व्यक्तीची कामे वाटून दिली जातात किंवा अनुयायी उत्स्फूर्तपणे स्वतःच ती स्वीकारतात. कोणी त्या व्यक्तीचे खाणे, पिणे, झोपणे इत्यादी शारिरीक स्वास्थ्य सांभाळण्यात आपली आयुष्ये

वेचतात; कोणी तिची बौद्धिक कामे करीत राहतात, तर कोणी तिच्या तत्त्वांचा किंवा मोठेपणाचा प्रसार करीत हिंडतात. कोणत्याही मोठ्या व्यक्तीची अशी कामे करण्यात सकृद्दर्शनी काही गैर दिसत नाही; परंतु थोडा विचार करताच त्यात एक फार मोठा दोष असल्याचे आपल्या लक्षात येते. हा दोष म्हणजे हे अनुयायी आपल्या पुढाऱ्याची केवळ साधने बनतात. त्यामुळे त्यांच्या स्वत्त्वाचा, अस्मितेचा विकास होण्यास वाव राहत नाही. त्यांच्यातील आंतरिक सुप्त शक्ती जागच्याजागीच गोठून जातात व कालांतराने नाहीशा होतात. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे याची जाणीव त्या अनुयायांना तर नसतेच, पण त्या पुढाऱ्यालाही नसते! मामांचा विशेष हा की, माझ्यासारख्या असंख्य व्यक्ती त्यांच्याभोवती जमल्या, पण त्यांपैकी कोणालाही त्यांनी आपले साधन बनवले नाही. त्यांनी स्वतःचे कोणतेही काम तर कोणाला करू दिले नाहीच; पण आपले कार्य, तत्त्वे, विचारप्रणालीही त्यांच्यावर लादली नाही. त्यांनी ती पाळली पाहिजेत असा यत्किंचितही आग्रह धरला नाही. त्यांनी प्रत्येकातील सुप्त सामर्थ्य जाणून घेऊन त्याची जोपासना व वाढ केली. त्याच्यातील स्वत्वाचा विकास करून त्याला प्रतिष्ठेने जगण्यास व समाजात स्वतंत्र स्थान मिळवण्यास समर्थ केले. त्यासाठी ते सर्वस्वाने राबले, "मी तुमच्यामुळे ओळखला जावा." असे ते म्हणतात. त्यातच त्यांना धन्यता वाटते. त्यांच्या 'मी'पणाचा असा पूर्ण निरास झालेला पाहून ज्ञानदेवांच्या पुढील पंक्तीचे मला स्मरण होते.

**'आणि मी हे भाष नेणें। माझें काहिंचि न म्हणें।**
**सुखदुःख जाणणें। नाहि जेया॥'**

मामांनी आमची जी शारीरिक, मानसिक व बौद्धिक वाढ केली तिला खरोखरीच तोड नाही. आई, गुरू व पालक या त्रिविध नात्यांनी त्यांनी अनेक मुला-मुलींचे, उपेक्षितांचे व गरजूंचे संगोपन व संवर्धन केले. कोणी आजारी असल्यास त्यांच्या डोळ्यांत आधी पाणी येते. आलोचन जागरण करून ते त्यांची सेवा करतात. मी महिन्याची असतानाच माझी आई गेली म्हणून अनेकांना फार हळहळ वाटते. मी जेव्हा त्यांना सांगते की "अहो मला आई नाही, पण तिच्याहून खूप मोठे असे मामा आहेत ना!" तेव्हा ते म्हणतात की, "आईची बरोबरी जगात कोणीच करू शकत नाही." परंतु त्यांच्यापैकी काहींना जेव्हा मामांच्या भेटीचे भाग्य लाभते तेव्हा त्यांची खात्री पटते. आमच्यासाठी एवढे करूनही मामांची आमच्याकडून काहीही अपेक्षा नाही. मात्र आम्ही कोणाच्या विरुद्ध बोललो तर त्यांना फार वाईट वाटते. कोणाची निंदा तर त्यांना विलक्षण असह्य होते. लोक कृतघ्न आहेत, आमच्याशी वाईट वागतात अशा तक्रारींनी ते बेचैन होतात व अतिशय तळमळीने आम्हाला सांगतात की, "बाळ, लोकांना दोष देणे बरोबर नाही. तुम्ही आत्मपरीक्षण करा, स्वतःमध्ये सुधारणा करा, निरपेक्ष वृत्ती अंगी बाणवा, कोणी काय केले नाही ह्याऐवजी काय केले याकडे लक्ष द्या,

' निर्वाळूनि कनके । भरला गांगे पीयूखे । '

देशोद्धारासाठी अहर्निश झटणाऱ्या मामांच्या असंख्य कार्याची मोजदाद कोण करू शकेल ? अंबेरीच्या साधकाश्रमाचे काही वर्षे व्यवस्थापक, गोमांतक शुद्धिकरणातील प्रमुख कार्यकर्ते, ' श्री. दासबोध ' मासिकाचे संपादक, ' गोमांतकशुद्धीचा इतिहास ' या ग्रंथाचे लेखक, सातपुड्यातील भिल्लांच्या उन्नतीसाठी झटणारे लोकशिक्षक, दर्यापूर येथील प्रबोधन विद्यालयाचे संस्थापक, कोल्हापूरच्या ग्रामसेवाश्रमाचे चालक, गोवामुक्ती-संग्रामातील सैनिक, भूदान, ग्रामदान व नंतर आचार्यकुल या विनोबाजींच्या कार्याचे महाराष्ट्रातील संयोजक; अशी त्यांची किती म्हणून कामे सांगावी ! त्याच्या जोडीस देश-सेवेचे व्रत घेतलेल्या ज्या संस्था त्यांना बोलावतात तेथे मामा आवर्जून जातात व आपल्याला शक्य तेवढे साहाय्य करतात. या सर्व कार्यात ते पुढारी म्हणून कधीही वावरत नाहीत. याशिवाय शाळा व कॉलेजे यांतील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी गावोगावी शिबिरे घेतली व असंख्य तरुणांच्या अंतःकरणात देशप्रेमाची, ज्ञानलालसेची व सदा-चाराची ज्योत पेटवण्याचे महान कार्य केले. १९३७ साली अकोल्याच्या अशाच एका शिबिरात मला त्यांच्या भेटीचे व मार्गदर्शनाचे भाग्य लाभले. मामा हे उत्कृष्ट वक्ते व खंदे लेखक आहेत. स्वातंत्र्यसंग्रामावरील त्यांची भाषणे तर श्रोत्यांना देहभान विसरा-वयास लावतात. त्यांचे लेखनही त्यांच्या वाणीसारखेच रसाळ, मृदुमधुर, प्रवाही व प्रभावी आहे. त्यांचे साधे पत्रही त्यांच्यातील लेखनसामर्थ्य जाणवून देण्यास पुरेसे ठरते.

पृथ्वी ज्याप्रमाणे सूर्याभोवती फिरता फिरता स्वतःभोवतीही फिरते त्याप्रमाणे वरील अनेक कार्ये करीत असतानाच मामा आमच्यासारख्या अनेक मुलांमुलींच्या जीवनातील वैयक्तिक अडीअडचणी अतिशय जिव्हाभावाने सोडवतात, आमचे दुखले–खुपले पाहतात. म्हणून अनेकांच्या तोंडून ' पाळिले पोसिले लावियला ळळा । सांभाळिले आम्हा सर्वस्वाने ।। ' असे कृतज्ञतेचे उद्‌गार बाहेर पडतात. जनाबाईचे दळण दळण्यास विठ्ठल जात होता की नाही, हे त्याचे त्याला माहीत; पण मामा मात्र अनेक जनाबाईंच्या मदतीस धावून जातात. त्यांची शांत, शीतल व अमृतमधुर जीवनसरिता माझ्यासारख्या अनेकांची जीवने उमलवीत, फुलवीत व कृतार्थ करीत वाहात आहे. मात्र या सरितेला त्याची मुळीच जाणीव नाही. उलट तिला वाटते की, आम्हीच तिच्या प्रवाहास मदत करीत आहोत !

मामांचे असे असाधारणत्व आणखी अनेक बाबतींत व्यक्त होते. थोर व्यक्ती म्हटली की, तिच्याभोवती जमणारी मंडळी बहुधा तिचे भक्त म्हणूनच वावरत असतात. त्यातच त्यांना व त्या व्यक्तीलाही धन्यता वाटते. एवढेच नव्हे तर, त्या भक्तांपैकी जे सर्वांत जास्त निष्ठावान असतील त्यांना त्यांच्या मगदुराप्रमाणे त्या थोर व्यक्तीची कामे वाटून दिली जातात किंवा अनुयायी उत्स्फूर्तपणे स्वतःच ती स्वीकारतात. कोणी त्या व्यक्तीचे खाणे, पिणे, झोपणे इत्यादी शारिरीक स्वास्थ्य सांभाळण्यात आपली आयुष्ये

वेचतात; कोणी तिची बौद्धिक कामे करीत राहतात, तर कोणी तिच्या तत्त्वांचा किंवा मोठेपणाचा प्रसार करीत हिंडतात. कोणत्याही मोठ्या व्यक्तीची अशी कामे करण्यात सकृद्दर्शनी काही गैर दिसत नाही; परंतु थोडा विचार करताच त्यात एक फार मोठा दोष असल्याचे आपल्या लक्षात येते. हा दोष म्हणजे हे अनुयायी आपल्या पुढाऱ्याची केवळ साधने बनतात. त्यामुळे त्यांच्या स्वत्त्वाचा, अस्मितेचा विकास होण्यास वाव राहत नाही. त्यांच्यातील आंतरिक सुप्त शक्ती जागच्याजागीच गोठून जातात व कालांतराने नाहीशा होतात. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे याची जाणीव त्या अनुयायांना तर नसतेच, पण त्या पुढाऱ्यालाही नसते! मामांचा विशेष हा की, माझ्यासारख्या असंख्य व्यक्ती त्यांच्याभोवती जमल्या, पण त्यांपैकी कोणालाही त्यांनी आपले साधन बनवले नाही. त्यांनी स्वतःचे कोणतेही काम तर कोणाला करू दिले नाहीच; पण आपले कार्य, तत्त्वे, विचारप्रणालीही त्यांच्यावर लादली नाही. त्यांनी ती पाळली पाहिजेत असा यत्किंचितही आग्रह धरला नाही. त्यांनी प्रत्येकातील सुप्त सामर्थ्य जाणून घेऊन त्याची जोपासना व वाढ केली. त्याच्यातील स्वत्वाचा विकास करून त्याला प्रतिष्ठेने जगण्यास व समाजात स्वतंत्र स्थान मिळवण्यास समर्थ केले. त्यासाठी ते सर्वस्वाने राबले, "मी तुमच्यामुळे ओळखला जावा." असे ते म्हणतात. त्यातच त्यांना धन्यता वाटते. त्यांच्या 'मी'पणाचा असा पूर्ण निरास झालेला पाहून ज्ञानदेवांच्या पुढील पंक्तीचे मला स्मरण होते.

**'आणि मी हे भाष नेणें। माझें काहिंचि न म्हणें।**
**सुखदुःख जाणणें। नाहि जेया॥'**

मामांनी आमची जी शारीरिक, मानसिक व बौद्धिक वाढ केली तिला खरोखरीच तोड नाही. आई, गुरू व पालक या त्रिविध नात्यांनी त्यांनी अनेक मुला-मुलींचे, उपेक्षितांचे व गरजूंचे संगोपन व संवर्धन केले. कोणी आजारी असल्यास त्यांच्या डोळ्यांत आधी पाणी येते. आलोचन जागरण करून ते त्यांची सेवा करतात. मी महिन्याची असतानाच माझी आई गेली म्हणून अनेकांना फार हळहळ वाटते. मी जेव्हा त्यांना सांगते की "अहो मला आई नाही, पण तिच्याहून खूप मोठे असे मामा आहेत ना!" तेव्हा ते म्हणतात की, "आईची बरोबरी जगात कोणीच करू शकत नाही." परंतु त्यांच्यापैकी काहींना जेव्हा मामांच्या भेटीचे भाग्य लाभते तेव्हा त्यांची खात्री पटते. आमच्यासाठी एवढे करूनही मामांची आमच्याकडून काहीही अपेक्षा नाही. मात्र आम्ही कोणाच्या विरुद्ध बोललो तर त्यांना फार वाईट वाटते. कोणाची निंदा तर त्यांना विलक्षण असह्य होते. लोक कृतघ्न आहेत, आमच्याशी वाईट वागतात अशा तक्रारींनी ते बेचैन होतात व अतिशय तळमळीने आम्हाला सांगतात की, "बाळ, लोकांना दोष देणे बरोबर नाही. तुम्ही आत्मपरीक्षण करा, स्वतःमध्ये सुधारणा करा, निरपेक्ष वृत्ती अंगी बाणवा, कोणी काय केले नाही ह्याऐवजी काय केले याकडे लक्ष द्या,

दोषासकट मनुष्य स्वीकारायचा असतो हे लक्षात ठेवा. तुम्ही तरी सर्वस्वी निर्दोष आहात का ? तसेच आपण दुसऱ्यासाठी जे काही करतो ते आपल्या समाधानासाठी व विकासासाठी करीत असतो. तेच आपले बक्षीस असते. उपकृत व्यक्ती कृतज्ञ राहिली तर, त्यात त्या व्यक्तीचा विकास असतो. त्याच्या कृतज्ञतेवर आपले सुखदुःख अवलंबून ठेवणे बरोबर नाही.''

अर्थात आम्ही जेव्हा एखाद्या कृतीला, व्यक्तीला किंवा ग्रंथाला तात्त्विक विरोध करतो तेव्हा मामा अगदी आवर्जून त्याची दखल घेतात. याबाबतीत ते आम्हाला पूर्ण मतस्वातंत्र्य देतात. वास्तविक त्यांच्यापुढे सर्वच बाबतीत आम्ही नगण्य; पण तरीही ते आम्हाला बरोबरीच्या नात्याने वागवतात व त्यायोगे आमच्यात आत्मविश्वास निर्माण करतात. ज्ञानेश्वर, विनोबा ही त्यांची श्रद्धास्थाने असूनही 'ज्ञानेश्वरीवरील आक्षेप : एक चिंतन' या माझ्या लेखाचा त्यांनी पाठपुरावा केला. एवढी परमतसहिष्णुता केवळ सत्यनिष्ठ, उदार व व्यक्तिस्वातंत्र्याची कदर करणाऱ्या व्यक्तीतच असू शकते.

असे थोर मामा मला लाभले याहून दुसरे कोणते मोठे भाग्य असू शकेल ? आपल्या मानस कन्यापुत्रांचा मामांनी केलेला असा असाधारण सांभाळ पाहून ज्ञानदेवांनी संतश्रोत्यांना उद्देशून काढलेले पुढील उद्गार आमच्या मामांना तंतोतंत लागू पडतात हे कोणालाही पटावे :

**'कां जे ललेयाचे लळे सरति । मनोरथाचे मनौरे पुरति ।**
**जरि माहेरें श्रीमंते होंति । तुम्हा ऐसीं ॥'**

□ □

# जीवनबाग फुलवणारा माळी

## श्री. वा. मेहेंदळे

खरोखर, सामान्य माणसाचं जीवन म्हणजे नापीक जमीन! तीत पीक आलंच तर स्वार्थ, लोभ, मोह, मद, मत्सर अशा दुर्विकारांचंच! पण पू. मामा क्षीरसागरांच्यासारख्या कुशल माळ्याच्या ताब्यात ती जमीन गेली, तर तिच्यावर प्रेम-जलाचा वर्षाव होतो, तीत सद्विचाराचं बी पेरलं जातं, आणि सदाचाराच्या सुगंधी फुलांनी व गोड फळांनी बहरलेल्या जीवनबागेत तिचं रूपांतर होतं!

मामांनी ज्यांची जीवनबाग फुलवली, अशा शेकडो भाग्यवान व्यक्तींपैकी मी एक आहे. कोकणातील कुलाबा जिल्ह्यात 'रोहे' हे मामांचं गाव. त्याच गावात मला जन्म लाभला. माझं विशेष भाग्य असं, की अगदी पाळण्यात असल्यापासून मला त्यांचे संस्कार लाभले!

तेव्हाच्या मामांची एक आठवण माझी आई मला सांगत असे. मी पाळण्यात झोप घेत होतो. आई भाजी चिरीत होती. मामा तिला श्रीमद्भगवद्गीतेतील श्लोक वाचून समजावून सांगत होते. इतक्यात मी 'ट्यँहांऽ, ट्यँहाऽ' सुरू केलं! "अगबाई मधू उठला वाटतं!" असं म्हणून आई गडबडीनं हात धुवायला गेली. मामांनी हातातली गीता शांतपणं बाजूला ठेवली. ते बाळंत खोलीत गेले. "ए बाबा, का रे रडतोयस? तू असा रडलास तर स्वातंत्र्य-संग्रामात भाग कोण घेणार? चल, थांब रडायचा एकदम!" असं बोलत-बोलत त्यांनी चटकन पाळण्यात हात घातला. 'सगळा चिखल' केला होता मी! तसाच त्यांनी मला बाहेर काढला, कोरडा केला. लंगोट नेसवून नीट दुपट्यात गुंडाळला! हे कौतुक पाहत असलेल्या माझ्या आईच्या हाती मला देऊन ते म्हणाले, "गोदूताई, घ्या आता या मधूला! बघा कसा हसतोय!"

तेव्हा मामा पंधरा-सोळा वर्षांचेच होते. एखाद्या स्त्रीलाही लाजवील इतक्या सहजतेनं, सराईतपणानं त्यांनी महिन्याच्या पोराला घेतलं होतं, त्याचं 'सर्व काही' केलं होतं! मामांना असं मातेचं मन लाभलेलं आहे! हे मन प्रेम-जलाचा वर्षाव करतं आणि सद्विचाराचं बी पेरून जीवनबाग फुलवतं!

मामाचं हे जीवनबाग फुलवण्याचं काम गेली जवळ-जवळ साठ वर्षं अव्याहत चालू आहे! मी पाळण्यात होतो, तेव्हाची आणखी एक आठवण माझी आई सांगत असे. शिक्षणासाठी पुण्यात राहिलेले मामा सुट्टीबिटीत रोह्याला येत, तेव्हा ते आमच्या-

कडेच असायचे. एकदा आई मला पाळण्यात ठेवून झोपवीत होती. तोंडानं ती 'आमुचा मधु-बाळ' अशा ओव्या म्हणत होती. तिला मामा म्हणाले, "गोदूताई, आता या ओव्या नाही म्हणायच्या!" "मग सांग बाबा काय म्हणू?" आईनं विचारलं. "आता स्वातंत्र्याचं अंगाई गीत म्हणून बाळाला झोपवायचं!" मामांनी सांगितलं. आई म्हणाली "असं कर, तू म्हण, तसं मी म्हणेन!" मामांनी सुरुवात केली,

**'बाळा, जो जो रे! शुभदात्या, मनोहरा स्वातंत्र्या**
**बाळा, जो जो रे!'**

हे ओजस्वी अंगाई–गीत मामा सांगत गेले, तसतसं माझी आई म्हणत गेली—

**'सकला वाटियली बहुमधुरा ऐश्वर्यरूप शर्करा;**
**या हो या बाळा आलिंगा, सुंदर मधुमुख चुंबा,**
**बाळा, जो जो रे!'**
**हिंदू बंधूंनो! या बाळा फार फार सांभाळा!**
**ना तर सटवी ती परवशता करील निश्चित घाता**
**बाळा, जो जो रे!'**

असे स्वातंत्र्यप्रेमाचे संस्कार बाळाच्या आणि मातेच्या मनावर मामा तेव्हापासून करीत आलेत! त्यांच्याही आधीपासून त्यांच्या अंतःकरणात स्वातंत्र्यप्रेमाची ठिणगी पडलेली होती. भगतसिंग, सुखदेव, राजगुरू अशा हुतात्म्यांच्या बलिदानामुळे त्यांना स्फूर्ती मिळालेली होती. दहशतवादी चळवळीचं आकर्षण त्यांच्याही तरुण मनाला वाटलेलं होतं. परकी सत्ता घालवण्यासाठी आपणही काही करावं अशी तळमळ त्यांना लागून राहिलेली होती.

ही तळमळ लागलेलं तरुण मन शिक्षणात गुंतणं शक्य नव्हतं. मामांनी कॉलेज शिक्षणाचं पहिलं वर्ष कसंबसं पुरं केलं आणि शिक्षणाला राम राम ठोकला! ते 'मसूराश्रम' या हिंदुसंघटन आणि शुद्धीकरण हे कार्य करणाऱ्या प्रख्यात संस्थेत दाखल झाले. त्यांच्या जीवनाला एक वेगळीच दिशा लागली.

मसूराश्रमात दाखल झाल्यावर मामांनी 'शान्तमूर्ती' हे अन्वर्थक नाव धारण केलं. त्यांच्या जीवनातील हा कालखंड मोठा वैचित्र्यपूर्ण होता. त्यांना या काळात भलेबुरे खूप अनुभव आले. खूप काही शिकायला मिळालं. त्यांनी मसूराश्रमाच्या शुद्धीकरण चळवळीत हिरिरीने भाग घेतला. गोवा हे त्यांचं कार्यक्षेत्र झालं. गोव्याच्या शुद्धीकरण कार्यात मामांचा सिंहाचा वाटा आहे. हे करीत असता प्रखर देशभक्ती त्यांच्या मनात फुलत होती. असीम त्यागाचे धडे गिरवले जात होते. गोव्याच्या दौऱ्यावर असताना मामा एका फार मोठ्या मोटार-अपघातात सापडले. त्यातून ते कसे वाचले, कोण जाणे!

तेव्हापासून त्यांना कंबरदुखीचा त्रास सुरू झाला, तो आजतागायत त्यांची पाठ धरून आहे!

१९३०–३२ चा काळ. महात्माजींनी देशात असहकाराचं पर्व सुरू केलं. त्यांच्या सत्याग्रही चळवळीनं देशाचा चेहरा-मोहराच पार बदलून टाकला! 'नहि रखना, नहि रखना, जालिम सरकार नहि रखना!', 'चरखा फिरा-फिराके लेंगे स्वराज्य लेंगे', अशा अद्भुत घोषणांनी वातावरण चैतन्यमय झालं होतं. प्रभात-फेऱ्या निघत होत्या. 'हे घनश्याम श्रीराम! मदात्माराम!' हे गीत गायलं जात होतं. या गीतामधल्या—

**'त्वां अमेरिका नटवीली। स्वातंत्र्ये**
**भू जपानची सुखवीली। स्वातंत्र्ये**
**मग आम्हांलाच का पारतंत्र्य-पंजरी कोंडिले राम?**
**हे घनश्याम श्रीराम! मदात्माराम!'**

या ओळी आर्ततेनं म्हटल्या जात होत्या!

मसूराश्रमात दाखल होऊन हिंदु-धर्म-सेवा करणारे मामा या सर्वांपासून अलिप्त राहणं अशक्य होतं. त्यांनी मसूराश्रम सोडला नाही, सत्याग्रह-लढ्यात उडी घेतली नाही; पण गांधीजींनी दिलेल्या विधायक प्रेरणा तरुण-मनांपर्यंत पोचवण्याचं काम त्यांनी केलं. 'बलोपासक मंडळ', 'नमस्कार मंडळ' असे काही वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम त्यांच्या प्रेरणेनं रोह्यात सुरू झाले. गुरुवर्य नारायणराव कुलकर्णी यांनी या उपक्रमांची जबाबदारी सांभाळली आणि ते यशस्वी केले. त्यावेळच्या आम्हा बारा-तेरा वर्षांच्या मुलांत एक नवा उत्साह निर्माण झाला. सूर्य नमस्कारांमुळे आमची शरीरं सुदृढ बनली. याचबरोबर आमच्या मनावर संस्कार सुरू झाले. साखर खायची नाही, चहा-कॉफी वर्ज्य, संपूर्ण स्वदेशी वस्तूंचा वापर, अशी काही व्रतं आम्ही स्वीकारली, 'खादी' प्रचार सुरू झाला. यांपैकी खादी माझ्या जीवनात अजूनही टिकून आहे. देशाचं स्वातंत्र्य मिळवायचं आणि ते पुढं टिकवायचं, तर शरीर जसं सुदृढ हवं, तसंच मन निर्भय बनलं पाहिजे. सर्व बांधवांवर प्रेम केलं पाहिजे; मग तो कोणत्याही जातीचा, धर्माचा, पंथाचा असो, अशी शिकवण आम्हाला मामांनी दिली. स्वतःच्या आचरणानं ही शिकवण आमच्या मनावर बिंबवली.

'खऱ्या प्रेमाला बंध नसतात', हे तत्त्व मामांनी आपल्या आचरणानं आमच्या मनावर बिंबवलं, याबद्दलची एक आठवण माझ्या मनात मी जपून ठेवलेली आहे. एका सुटीच्या दिवशी दुपारी मी माझी सायकल पुसून स्वच्छ करीत होतो. अंगातील शर्ट–पँट चांगलीच मळली होती. हातांना अगदी कोपरापासून रॉकेल लागलं होतं. इतक्यात अगदी अचानक मामा समोर येऊन उभे राहिले. त्यांना पाहून मला इतका आनंद

झाला, की प्रथम मला काय बोलावं, हेच सुचेना! मी उद्गारलो, 'तात्या, तुम्ही?' (उभा महाराष्ट्र त्यांना 'मामा' म्हणून ओळखतो, त्यांचं रोह्यातलं नाव 'तात्या' आहे.) 'हो!' मामा म्हणाले, 'तुला काय एखादं भूतबीत आलंसं वाटलं की काय?' 'तसं नाही', मी म्हणालो, 'पण तुम्हाला अगदी मिठी मारावीशी वाटतेय!' 'मग थांबलास का?' असं मामांनी विचारलं. मी म्हटलं, 'नाही; पण माझे हे हात, कपडे—' हे मामांनी ऐकलं आणि 'हात् वेड्या!' असं म्हणत त्यांनी मला केव्हा जवळ घेतलं, आणि माझी मान त्यांच्या खांद्यावर केव्हा विसावली, हे मला कळलंच नाही! हे खरं प्रेम! घाणीची पर्वा न करणारं! 'धन्यास्तदङ्गरजसा मलिनीभवन्ति' असं मानणारं!

मामांच्या मसूराश्रमाच्या काळातली एक हृदयस्पर्शी आठवण मी माझ्या अंतः-करणात जपून ठेवली आहे. मामा आपल्या आश्रमातल्या काही मंडळींना घेऊन मधून-मधून रोह्यात येत. 'ब्रह्मचारी शान्तमूर्ती' मामा घरी राहत नसत. आश्रमाच्या इतर कार्यकर्त्यांप्रमाणे देवीच्या देवळात त्यांचा मुक्काम असे. सर्व मंडळी रोज सकाळी गावात फिरून 'भिक्षा' मागत. या फेरीत जे मिळे, त्याव्यतिरिक्त अन्य कशाचाही स्वीकार ते करीत नसत! अशाच एका मुक्कामात एके सकाळी ही भिक्षेची फेरी निघाली. देवळा-समोरच आमचा वाडा. माझ्या आईनं मामांच्या भिक्षेच्या झोळीत तांदूळ ओतले. फेरी पुढे निघाली.

नंतर चार घरं टाकल्यावर मामांचं घर! तिथं काय होणार, याबद्दल आम्हांला फार मोठं कुतूहल होतं. म्हणून आम्ही मुलांनी अगोदरपासून मामांच्या घरापाशी गर्दी केलेली होती. लवकरच फेरी तिथं आली! अग्रभागी ब्र. शान्तमूर्ती! कसे तेजस्वी डोळे! काळ्याभोर जटा आणि काळीभोर दाढी! मानेवर गाठ मारलेलं एकच शुभ्र वस्त्र अंगावर! आमचं ते स्फूर्तिदायी दैवत! शान्तमूर्ती स्वतःच्याच घरासमोर 'भिक्षे'साठी उभे राहिले! व्यवस्थाप्रमाणे!

**समर्थाचिया सेवका वक्र पाहे**
**असा सर्व भू-मंडळी कोण आहे?**
**जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही**
**नुपेक्षी कदा रामदासाभिमानी।**
**जय जय रघुवीर समर्थ! ॥**

अगदी खणखणीत आवाजात शान्तमूर्तींनी श्लोक म्हटला आणि 'ॐ भवति, भिक्षां देहि।' म्हणून भिक्षेची झोळी पसरली!

जांभळ्या रंगाचं टोपपदरी लुगडं नेसलेल्या, कपाळावर कुंकवाची चीर रेखलेल्या

नाकात नथ घातलेल्या मामांच्या मातुश्री सौ. मथूमावशी हातात तांदुळांनी भरलेली दुरडी घेऊन दारात उभ्याच होत्या. त्यांच्यामागे अंगात पांढरा सदरा घातलेले डोक्याला तांबडा रुमाल बांधलेले मामांचे वडील डॉक्टरकाका उभे होते. मामांची ललकारी झाल्यावर सौ. मथूमावशी पुढे झाल्या. त्यांनी तांदुळाची दुरडी त्या ब्रह्मचाऱ्याच्या झोळीत रिती केली ! आपल्याच मुलाला ' भिक्षा ' घातली !

' शान्तमूर्ती ' काही पावलं पुढं सरकले, त्यांनी मातेच्या व वडलांच्या पायांवर डोकं ठेवलं. मातेचा प्रेमळ हात क्षणभर आपल्या मुलाच्या पाठीवर विसावला, ' औक्षवंत हो ! ' असा आशीर्वाद त्या माउलीच्या मुखातून बाहेर पडला असेल ! नेमकं काय घडलं ते सांगणं कठीण, इतके आम्ही तेव्हा भान हरवून बसलो होतो !

क्षणभरात फेरी पुढे सरकली. मामांचा तो चिरपरिचित आवाज आमच्या कानी पडत होता. ' तो स्थितप्रज्ञ संयमी ' आम्ही साक्षात पाहत होतो !

तरुणांचं जीवन घडवण्याचं मामांचं कार्य अहोरात्र सुरू असे ! त्यासाठी आवश्यक त्या कोणत्याही साधनाचा ते उपयोग करीत. एकदा आम्ही हट्ट धरला, " तात्या तुम्ही कीर्तन करा ! " मामांनी विचारलं, " तुम्ही मला साथ कराल ? " क्षणाचाही विचार न करता आम्ही ' हो '–कार दिला. मामा विठोबाच्या देवळात कीर्तनाला उभे राहिले ! आम्ही त्यांच्या साथीला ! देऊळ श्रोत्यांनी गच्च भरलं, आत जागा उरली नाही, तेव्हा मंडळी बाहेर अंगणात आणि रस्त्यावरही उभी राहिली ! लाउडस्पीकरची तेव्हा सोय नव्हती; पण मामांचा आवाज भरदार नि खणखणीत ! त्याला कशाचीच अडचण नव्हती.

मामांनी बाजीप्रभू देशपांड्यांचं आख्यान लावलं. सगळे श्रोते भारावून गेले. निःशब्द होऊन ऐकत राहिले. मामांनी अभिनव आरती म्हटली—

**' दे हेचि दान देवा । प्रिय हिंदभूमिसाठी ।**
**दे हाचि दिव्य ठेवा । प्रिय मातृभूमिसाठी ॥**
**स्मरता सदा रिझावे । त्वन्मुक्तिगीत गावे ।**
**राहोनी अर्धपोटी । प्रिय मातृभूमिसाठी ॥**
**नलगे सुभोग काही । मज दे पुनःपुन्हाही ।**
**जनने अनंत कोटी । प्रियमातृभूमिसाठी ॥**
**मत्प्राणपंकजांची । माला सुसेवकांची ।**
**दे घालूदेचि कंठी । प्रिय मातृभूमिसाठी ॥**
**स्मरता तिच्या पदांना । हे रक्त चेतताना ।**
**लागोत पाश कंठी । प्रिय मातृभूमिसाठी ॥ '**

असा त्या काळात मामांनी ‘ अवघा हलकल्लोळ ’ केला! कीर्तनांतून, प्रवचनांतून, भाषणांतून, बलोपासक मंडळातून देशप्रेमाचा, समाजप्रेमाचा फैलाव केला. त्यांच्यापासून अनेकांनी प्रेरणा घेतली. अनेकांनी स्वातंत्र्य-संग्रामात उडी घेतली. त्यांची जीवनं कृतार्थ झाली!

पुढे मामा मसूराश्रमातून बाहेर पडले. ‘ सर्व सेवा संघा ’च्या अधिक विशाल क्षेत्रात ते काम करू लागले. पुढं त्यांनी दर्यापूर येथे ठाण मांडलं. शिक्षणाचं काम त्यांनी तिथं सुरू केलं. वयाची पंचाहत्तरी आली. अनेक शारीरिक त्रास आहेत. तरीही त्यांचा उत्साह, त्यांची जिद्द कमी झालेली नाही! ‘ अनासक्त कर्मयोगा ’चं उदाहरण कोणाला पाहायचं असेल, तर त्यानं मामांचं दर्शन घ्यावं!

मामांचं खरं कार्य संस्थात्मक नाही! आपल्या सहवासात आलेल्या प्रत्येक व्यक्तीवर प्रेमाचा वर्षाव करावा, तिची सुख-दुःखं समजून घ्यावीत, तिच्या मनावर सु-संस्कार करावेत, त्यात सुविचारांचं बीज पेरावं, आणि त्या व्यक्तीची जीवनबाग सदाचाराच्या फुलां-फळांनी बहरवावी, हे खरं मामांचं जीवितकार्य! व्यक्तिशः माझं जीवन तर त्यांनीच घडवलं. माझ्या हातून ज्या काही भल्या गोष्टी घडल्या, त्यांचं सारं श्रेय मामांनी माझ्या लहानपणापासून माझ्यावर केलेल्या सु-संस्कारांना आहे! ‘ मामांनी माझं जीवन घडवलं, ’ असं अभिमानानं सांगणाऱ्या कितीतरी व्यक्ती भेटतील!

आज मामांसारख्या कार्यकर्त्यांची समाजाला फार फार गरज आहे. समाज वैफल्यग्रस्त झाला आहे. सचिंत झाला आहे. त्याग, सेवा, सचोटी अशी जीवनमूल्यं हरपतात की काय, अशी भीती निर्माण झाली आहे. अशी जीवनमूल्यं आचरणाऱ्या व्यक्ती असतात, यावरचा विश्वासच उडत चालला आहे! अशा वेळी मामांसारख्या व्यक्ती ठामपणे उभ्या आहेत, सुसंस्कारित जीवनं घडवण्याचं काम निष्ठेनं करीत आहेत, सद्‌गुणांची जोपासना करीत आहेत, हे आपलं केवढं भाग्य!

श्रीमद्‌भगवद्‌गीतेत भगवान श्रीकृष्णांनी एक अभिवचन दिलेलं आहे —

**ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः।**
**अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते॥**
**तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्।**
**भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम्॥**

हे आश्वासन मामांच्या बाबतीत खरं कर आणि त्यांचे आशीर्वाद आम्हांला खूप खूप वर्षं लाभू दे, हीच परमेश्वरचरणी प्रार्थना!

□ □

# आमचे तात्या

## प्रा. सुहासिनी पटवर्धन

लतांनो, सांगू का तुम्हा उद्या श्रीराम येणार ।
वनाला सर्व ह्या आता, खरा आनंद होणार ॥

हे गीत गाताना तात्या शबरीमय होत असत. रानातल्या प्रत्येक वेलीला, वृक्षाला आवाहन करीत शबरी फिरत आहे, फिरत आहे. श्रीराम तिला भेटणार याचा आनंद तिच्या मुखावरून ओसंडत आहे असे दृश्य आमच्या डोळ्यासमोर उभे करण्यात तात्या, यशस्वी होत. आमची नजर त्यांच्यावर खिळलेली असे. अशा रीतीने आम्ही एकचित्त झालो की तात्या आम्हाला शिवाजी अथवा संभाजीची गोष्ट सांगत असत. शिवाजीची आग्र्याहून सुटका ही गोष्ट तर आम्हाला फारच आवडे. कैदेत असताना शिवाजीने आजारी पडल्याचे ढोंग कसे केले, नंतर कैदेतून पळून जाण्याचे मनसुबे कसे रचले, मिटाईच्या पेटाऱ्यातून निसटल्यावर घोड्यावर स्वार होऊन मजल दरमजल करीत तो दक्षिणेकडे कसा निघाला. याचे रसभरित वर्णन तात्या करीत असत. औरंगजेबाचे सैन्य शिवाजीचा पाठलाग करीत आहे, असे त्यांनी म्हणताच आमच्या हृदयाचे ठोके जोरजोरात पडू लागत.

मला आठवते, 'भवाळपूरचा सन्यासी' ही गोष्ट जवळ जवळ ३६ वर्षांपूर्वी त्यांनी आम्हाला सांगितली. पण अजूनही माझ्या मनश्चक्षूंसमोर- ' ते कलकत्त्याजवळचे संस्थान, तिथली ती दुष्ट राणी, तिचा क्रूर भाऊ, स्मशानात विझलेल्या चितेवरील कण्हत असलेले राजाचे प्रेत, साधूंच्या ताफ्याबरोबर आपल्या राज्यात परत आलेला तो राजा आणि मग राणीविरुद्ध झालेला तो सुप्रसिद्ध खटला–' हे सारे जसेच्या तसे तरळते. ही किमय केवळ तात्याच करू जाणे. त्यांच्या वाणीमध्ये एक अजब शक्ती आहे, जादू आहे. दुसऱ्यांना खिळवून टाकावयाची.

" तात्या, तात्या, आम्हाला गाणे शिकवा ना नवीन ! "

बहु असोत सुंदर संपन्न की महा ।
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥

अत्यंत सुरेल, पण खड्या आवाजात गाईलेले हे गीत मी माझ्या अंतःकरणात पकडून ठेवले आहे.

वीर सावरकरांचा तात्यांना केवढा अभिमान. देशासाठी सावरकरांनी केलेल्या त्यागाची महती सांगताना तात्यांचा ऊर अभिमानाने भरून येई.

**ने मजसी ने परत मातृभूमीला।**
**सागरा प्राण तळमळला॥**

हे गीत तात्यांनी आपल्या गोड आवाजात म्हणावयास सुरुवात केली की आमचाही जीव गलबलत असे.

**ते जननीहृद् विरह संचितची झाले।**
**परि तुवा वचन तिज दिधले॥**

विशेषतः ह्या ओळी आमच्या मनाचा ठाव घेत.

बाळगोपाळांना गोष्टी सांगणे आणि गाणी गाऊन दाखवणे ह्यांत तात्यांचा हातखंडा. तात्या येतात कधी आणि नवीन गोष्ट सांगतात कधी, याची आम्ही वाट पाहत असू. आजकाल कथाकथनाचा प्रकार खूप लोकप्रिय होऊ लागला आहे. पण तात्यांनी कथाकथन हा प्रकार चाळीस वर्षांपूर्वीच सुरू केला.

तात्यांनी आम्हाला वीरश्रीच्या पुष्कळ गोष्टी सांगितल्या, गाणी शिकवली, मनाचे श्लोक शिकवले, देशप्रेम जागृत केले, पण ते आमच्यात कधीच गुंतून पडले नाहीत. त्यांनी आमच्यावरील प्रत्येक संकटसमयी आम्हा सर्वांना धीर दिला. माझी धाकटी बहीण लीना हिचे अपघाती निधन झाले, त्यावेळीं तात्या आपले सर्व कामकाज सोडून आमच्याजवळ येऊन राहिले. ते माझ्या आईला निरनिराळ्या गोष्टी सांगून तिचे मन रिझवण्याचा खूप प्रयत्न करीत. त्यावेळीं त्यांनी आईला ‘भारतीय संस्कृती’ हे पू. साने गुरुजींचे पुस्तक वाचावयास दिले. तसेच तिने ह्यापुढे घरात न राहता काही तरी सार्वजनिक कार्य करा असे त्यांनी तिच्या मनावर ठसवले व त्यानंतर तिने शिक्षण क्षेत्रात पदार्पण केले.

माझ्या आईची आपल्या भावोजींवर अपार श्रद्धा, विश्वास. स्त्रियांनी आत्मसंरक्षण करावयास शिकले पाहिजे, प्रसंगावधानी असले पाहिजे, ह्यासाठी त्यांनी महाराष्ट्र व विदर्भ ह्या भागांत खास स्त्रियांचे लाठी व लेजीमचे वर्ग विनामूल्य चालवले. मी ३, ४ वर्षांची असताना माझी आई व सौ. उदगांवकर अशा प्रकारचा एक वर्ग न्यू हॉल माटुंगा येथे घेत असत. तात्यांच्याच प्रेरणेने माझी आई ‘राष्ट्रभाषा प्रचार समिती’तर्फे चाललेल्या वर्गांना जाऊन हिंदी शिकली व कोविदपर्यंतच्या प्रत्येक परीक्षेत सबंध भारतात सर्वप्रथम आली. त्यांनी तिच्या मनावर असे काही संस्कार केले होते की तिने राष्ट्रभाषा प्रचाराचे जे व्रत अंगीकारले ते अखेरपर्यंत अव्याहतपणे पाळले.

आमच्या लहानपणी आम्हाला कोडे पडत असे की तात्या करतात काय? नेहमी असतात कुठे? आणि जातात कुठे? सर्वच गूढ, अनाकलनीय...! ते आले की माझी आई त्यांच्यासाठी खास गोडधोड करीत असे. घरी असताना दुपारचा बराचसा वेळ ते झोपून काढत. माझी आई सांगे, 'त्यांना त्रास देऊ नका थकले आहेत ते.'

एकदा काय झाले, तात्या आंघोळ करून येऊन पलंगावर झोपले होते. मी आणि मंदाने पाहिले त्यांचे केस पलंगाखाली रुळले होते आणि प्रथमच आमच्या लक्षात आले की त्यांचे केस खूप लांब आहेत. आम्हाला वात्रटपणा करावयाची लहर आली. लगेच मी त्यांचे केस फणीने विंचरले आणि वेणी घालावयास सुरवात केली. मंदा म्हणाली, 'ताई आपल्यासारख्या दोन वेण्या घाल ना!' मग मी क्षणाचाही विलंब न लावता त्यांच्या केसांच्या दोन वेण्या घातल्या, रिबिनी बांधल्या आणि आपण कशी मज्जा केली म्हणून तात्यांना आरसा दाखवला. तात्या हसत होते! ते काही आम्हावर रागावले नाहीत, पण आमचा दंगा ऐकून माझी आई आतून बाहेर आली, आणि 'हा काय फाजीलपणा चालवलाय' असे म्हणून रागावली!

एकदा मी माझ्या आईपाशी हट्ट धरून बसले, 'वारूताई सांग ना ग तात्या काय करतात ते?'

ती म्हणाली, "त्यांनी किनई देशसेवेचं व्रत घेतलं आहे. जनजागृती करीत ते हिंदुस्थानाच्या ह्या टोकापासून ते त्या टोकापर्यंत फिरत असतात." मग तिने मला तात्या पोर्तुगिजांच्या गोव्यात जाऊन कसे राहिले, गोवाविमुक्ती संग्राम होण्यापूर्वी कित्येक वर्षे आधी गोव्यातील लोकांसाठी त्यांनी काय केले, ह्याबद्दलची माहिती सांगितली. गोमांतक शुद्धी इतिहास म्हणजेच तात्या, हे आज किती महाराष्ट्रीयांना ठाऊक आहे?

मला आठवते, १९६१ साली आम्ही घरातील सर्व मंडळी कोल्हापूरला त्यांच्या आश्रमात गेलो होतो. हा आश्रम गुन्हेगार जमातीतील मुलांचे सुधार केंद्र आहे. माझे आईवडील १५ दिवस आश्रमात राहिले व तेथील लोकांची त्यांनी सेवा केली. आम्हाला हा अनुभव अगदी नवाच होता. जीवनाचे एक आगळे दर्शन त्या वेळी आम्हाला घडले.

१९६६ साली दर्यापूरला प्रबोधन विद्यालयाच्या रौप्यमहोत्सवाला गेलो होतो. पूज्य विनोबाजींनी खास संदेश पाठवला होता. सर्वश्री अच्युतराव पटवर्धन, मृणालिनी देसाई, मे. ज. थोरात, बा. नी. अष्टीकर, राम शेवाळकर वगैरे नामवंत मंडळी त्या प्रसंगी हजर होती. त्यांची भाषणे ऐकून मन भरून आले. तात्यांच्या अनेक संस्था, माधान कोल्हापूरचा आश्रम, रत्नागिरी येथील मातृमंदिर– एक ना दोन. प्रत्येक संस्थेबद्दल त्यांना तीच आत्मीयता. त्यासाठी त्यांचा तेवढाच त्याग.

तात्यांचा मुंबईत मुक्काम कधी फारसा नसे. त्यातून त्यांच्या मानाने आम्ही म्हणजे दादा, मंदा व मी फारच लहान. त्यामुळे त्यांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या निर्णयाचे प्रतिसाद घरात कसे उमटले हे आम्हाला कळण्याचे कारणच नव्हते. एकतर ते माझ्या वडलांच्या पाठचे भाऊ. दुसरे म्हणजे, शिक्षण अर्धवट सोडून ते देशकार्यासाठी बाहेर पडलेले आणि ह्या घटनेनंतर जवळजवळ ७ वर्षांनी माझ्या आईचे लग्न झाले. त्या काळात ते मसूराश्रमात होते. आणि तिसरे म्हणजे माझ्या वयाच्या ७ व्या वर्षी त्यांनी मसूराश्रम सोडला. तेव्हा त्यांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या कालखंडाबाबत आम्ही मुले अनभिज्ञ राहिलो यात नवल ते कसचे? प्रसिद्धी पराङ्मुख असलेले तात्या स्वतःच्या कार्याबद्दल फारसे कधी बोलतच नसत. मला मात्र त्यांच्या जीवनाबद्दल औत्सुक्य होते. ते दोन दिवस मुंबईत येत तेवढ्या वेळात त्यांना अनेक लोकांना भेटायचे असे. सर्वश्री काका तांबे, केदारनाथजी, पुंडलीकजी कातगडे, प्रकाश मोहाडीकर वगैरे. आमच्या वाट्याला ते फारसे येतच नसत! माझ्या आईला मात्र ते सारे काही सांगत असत व तिच्याकडून थोडीफार हकीगत आमच्या कानांवर पडत असे. माझी आई वारल्यापासून त्यांचा मुंबईतला मुक्काम बहुधा माझ्याकडेच होऊ लागला. पूर्वीचे नुसते 'काकांची लाडकी पुतणी' हे नाते न उरता त्यांच्याशी बरोबरीच्या नात्याने संवाद साधण्याचा मी प्रयत्न करू लागले. त्यातून झालेला काही गोष्टींचा उलगडा—

लोकमान्य टिळकांच्या जीवनापासून स्फूर्ती घेतलेल्या तात्यांनी इंटरच्या वर्गात एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये शिकत असताना वयाच्या अठराव्या वर्षी निर्णय घेतला की, देशासाठी— स्वदेश बांधवांसाठी आजन्म झटेन. त्या वेळी ते साधकाश्रमात गेले. तेथे त्यांच्यासारखे अनेक विद्यार्थी दाखल झाले होते. त्या ठिकाणी एक वर्षाचा अभ्यासक्रम पुरा करून ते विधायक कार्यासाठी गावोगाव फिरू लागले. माझ्या आजोबांना तात्यांच्या ह्या वागणुकीचा राग आला होता! त्यांनी थोडे दिवस तात्यांशी बोलणे सोडून दिले. परंतु माझी आजी अत्यंत प्रेमळ होती. आपला मुलगा काही चुकीचे करत नसून योग्य त्या दिशेनेच जीवनाची वाटचाल करीत आहे, ह्याबद्दल तिची संपूर्ण खात्री होती. तात्यांच्या आयुष्यातील प्रत्येक महत्त्वाच्या निर्णयाच्या प्रसंगी माझी आजी त्यांच्या पाठीशी उभी राहिली.

तात्यांच्याच तोंडून एक ऐकलेली हकीगत अशी— भगतसिंगांना फाशी दिले त्या वेळी रोह्यात राम मंदिरासमोर जाहीर सभा होती. सभेला जाण्यास व भाषण करण्यास माझ्या आजोबांचा सक्त विरोध होता. परंतु तात्यांचा निर्धार कायम होता. ते घरातून बाहेर पडल्याबरोबर माझी आजीही त्यांच्याबरोबर गेली.

तात्यांनी जे व्रत १९२१–२२ साली अंगीकारले त्याचा त्यांनी आयुष्यभर पाठपुरावा केला. एक लुंगीवजा खादीचे कापड, अंगात एक लांब हाताचा खादीचा सदरा, हा त्यांचा वेश. भल्या पहाटे ४॥ ५ वाजता उठून सूर्यनमस्कार घालणे, आसने करणे,

गीतेतील काही श्लोक म्हणणे, स्नान करून कपडे धुऊन दूध पिणे, तुम्ही काही खावयास दिले तर ठीक– नाहीतरी ठीक, नंतर वृत्तपत्र वाचन, अन्य वाचन-लेखन, अगदी साधे सुटसुटीत जेवण, दुपारी बहुधा पत्रलेखन अशी त्यांची दिनचर्या, या क्रमात यत्किंचितही बदल झालेला मला दिसला नाही. साधकाश्रम सुटला, मसूराश्रम सुटला, स्वराज्य मिळाले. प्रबोधन विद्यालयाची स्थापना झाली. त्याला उर्जितावस्था आली, पण तात्यांच्या कपड्यालत्यांत, राहणीमानात फरक पडला नाही की आचार-विचारात बदल घडला नाही.

**खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे ।**
**जगी जे दीन पददलित, तया जाऊन उठवावे, जगाला प्रेम अर्पावे ॥**

हा त्यांच्या जीवनाचा खरा स्थायिभाव. कित्येक दुःखी स्त्रियांचे अश्रू पुसून त्यांच्या आयुष्याला योग्य ती दिशा दाखवण्यात ते सफल झाले आहेत. त्यांचा हिंदू धर्माचा सखोल अभ्यास व व्यासंगही पुष्कळ, तसेच मराठी भाषेवरील प्रभुत्वही अगाध. त्यामुळे स्वतःजवळ कोणत्याही विद्यापीठाची पदवी नसतानाही तात्यांनी एम्. ए.च्या वर्गात शिकणाऱ्या मनूताईंना ( प्रो. मनूताई नातू ) उपनिषदे व वेदाभ्यास शिकवला. पाठांतराच्या बाबतीत तर त्यांचा हात कोणीच धरू शकणार नाही. साधे बोलतानादेखील ते संस्कृत सुभाषिते व गीतेतील अवतरणे देत असतात.

१९३४ ते ३८ ह्या कालखंडात तात्या अनेक गावांतून, जिल्ह्यांतून शिबिरे घेत हिंडत असत. त्यांच्यासमवेत माणिकरावांचे शिष्य आबासाहेब जोग व धाकटे महाराज ( बाबा रेड्डीकर ) असत. या शिबिरांसाठी लागणारा पैसा, दाणागोटा शिबिराची आखणी व प्रात्यक्षिके, बौद्धिके घेणे हे सारे तात्याच करत असत. खेड्यापाड्यांतून मंदिरात मुक्काम ठोकावयाचा, दुपारी एक वेळा ५ घरी माधुकरी मागायची, व त्यावर दोन वेळा गुजराण करायची संध्याकाळी मंदिरात भजन करायचे, राष्ट्रीय कीर्तन करायचे व जनसामान्यांपर्यंत आपले विचार पोचवायचे हा त्यांचा उपक्रम. ह्या उपक्रमामधून सातपुड्याच्या जंगलात ११ मारुतींची प्रतिष्ठापना त्यांनी केली. दर्यापूर येथील प्रबोधन विद्यालयाची स्थापनासुद्धा देवळामध्ये भजन-कीर्तनाला जमणाऱ्या लोकांच्या मदतीनेच केली.

प्रबोधनच्या सुरवातीच्या काळात तात्या शिक्षकाचे काम करत होते. त्यांच्या आवडीचे विषय इतिहास, मराठी व संस्कृत. आता शाळा नावारूपाला आली. दर्यापूरचे एक वैभव बनली, विदर्भातील एक सुप्रसिद्ध ज्ञानदान केंद्र ठरली तेव्हा तात्यांनी शाळेचे संबंध न तोडता ती चालवण्याची जबाबदारी संपूर्णपणे आपल्या सहकाऱ्यांवर सोडली.

वृक्षाचा विस्तार किती आहे हे ज्याप्रमाणे त्याच्या बुंध्याशी बसलेल्या माणसाला समजत नाही तर रस्त्यावरून लांबून पाहणाऱ्याला समजते, त्याप्रमाणेच तात्यांच्या मायेच्या सावलीत राहणाऱ्या मला त्यांच्या विविध प्रकारच्या सामाजिक कार्याचे समालोचन

करणे अशक्य आहे. कधी ते पूज्य विनोबाजींच्या पदयात्रेचे व्यवस्थापक तर कधी बाबा आमट्यांच्या श्रमसंस्कार शिबिराचे व्यवस्थापक. विनोबाजींची आचार्य कुलाची कल्पना मूर्त स्वरूपात आणण्याची त्यांची धडपड चालू आहे. गेली ८–१० वर्षे ते या कार्यासाठी सतत महाराष्ट्रभर शिक्षकांची शिबिरे घेत फिरत आहेत. शिक्षकाने निव्वळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांना समाजोन्मुख बनवले पाहिजे, सुसंस्कृत बनवले पाहिजे. शाळा ही परिसरातील लोकांना प्रकाशाचा किरण बनली पाहिजे. ही आचार्यकुलाची स्थूलमानाने कल्पना.

तात्यांचे जीवन म्हणजे मूर्तिमंत त्याग. कधी त्यांनी अर्थार्जन करण्याचा प्रयत्न केला नाही. राजकारणात पडण्याचा हव्यास धरला नाही की प्रसिद्धीची हाव धरली नाही. सातत्याने गेली ५२ वर्षे त्यांनी विधायक कार्य केले, मिशनऱ्यांच्या जिद्दीने. अपयशाने ते कधी नाउमेद झाले नाहीत तर यशाने कधी हुरळून गेले नाहीत. स्वतः सुरू केलेल्या संस्थेमध्ये स्वतःला एक विशिष्ट अधिकाराचे स्थान असावे अशी अभिलाषा त्यांनी धरली नाही आणि असे असूनही त्यांच्या निष्ठेला थोडाही तडा गेला नाही. अठराव्या वर्षी ज्या ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी आपल्या आगळ्या जीवनाला सुरवात केली ती निष्ठा गेली ५७ वर्षे कायम आहे. ते कधी उतले नाहीत, मातले नाहीत की घेतला वसा टाकला नाही.

तात्यांचा अमृत महोत्सव साजरा होत आहे हा त्यांच्याविरुद्ध त्यांच्या सहकाऱ्यांनी रचलेला एक कट आहे. त्यात सामील होण्याचे भाग्य मला लाभले यातच मी आनंद मानते.

तात्या हे आधुनिक ऋषी. तात्या म्हणजे आपल्या अंतःकरणात पेटलेल्या मानवतेच्या ज्योतीने नुसता प्रकाश न देता अनेक ज्योती पेटवण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी केलेली अविश्रांत धडपड.

□ □

# माझी जीवनयात्रा

## मामा क्षीरसागर

### प्रास्ताविक

वस्तुतः मी माझ्या व्यक्तिगत जीवनासंबंधी आजवर कोठेही जाहीर वाच्यता केलेली नाही व करूही इच्छित नव्हतो. पण श्री. अण्णाजी वैद्यांच्या आग्रहाला नकार देण्यात मी माझा अहंकार तर पोशीत नाहीना, अशी शंका मला जाणवू लागली आणि मी ही जीवनयात्रा लिहिण्यास प्रवृत्त झालो.

व्यक्तिगत जीवनासंबंधी जाहीर वाच्यता न करण्याचे एक कारण असे की, स्वतःच्या-संबंधी बोलण्यात मला संकोच वाटत राहतो. आणि दुसरी व महत्त्वाची गोष्ट ही की, भावी पिढ्यांना मार्गदर्शक ठरणारे असे माझ्या जीवनात विशेष काही आहे असे श्री. अण्णाजींप्रमाणे मला वाटतही नाही. खास कोणी दखल घ्यावी अशी कोणतीही वैशिष्ट्य-पूर्ण कामगिरी माझ्या हातून झालेली नाही. संतश्रेष्ठ ज्ञानेशांपासून तो विनोबापर्यंत आणि श्रीशिवरायांपासून तो लोकमान्यांपर्यंत येथे इतके लोकोत्तर महापुरुष होऊन गेले आहेत की, त्यांनी आपल्या आचार विचारांनी प्रत्यक्ष घालून दिलेल्या आदर्शांपेक्षा मी काही नवीन आदर्श वा उपदेश भावी पिढ्यांसाठी देऊ शकेन, अशी माझी पात्रताही नाही.

### देशासाठी फकिरी

माझे लहानपणचे शिक्षण पुण्यास न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाले. त्यावेळी केवळ पुण्याचेच नव्हे, तर साऱ्या देशाचे वातावरण लोकमान्य टिळकांच्या कर्तृत्वाने, विद्वत्तेने आणि धगधगीत देशभक्तीने भारलेले होते. त्यामुळे टिळकांच्या त्या तेजस्वी चरित्राचा आणि चारित्र्याचा ठसा माझ्या बालमनावर जोरदारपणे उमटला. म्हणून लोकमान्यांच्या मृत्युसमयी १ ऑगस्ट १९२० ला मुंबईच्या चौपाटीवर आम्ही काही मित्रांनी देशासाठी आजन्म फकिरी स्वीकारण्याची प्रतिज्ञा केली. त्यानंतर गांधीजींचे असहकार आंदोलन आले आणि त्यावेळी गांधीजींनी केलेल्या आवाहनानुसार मी माझे कॉलेज शिक्षण व घरदार सोडून देशसेवेसाठी गांधीजींच्या साधकाश्रमात (अंधेरी-मुंबई) दाखल झालो. आमच्या या आश्रमाचे प्रमुख संचालक गांधीजींचे निकट सहकारी बडोद्याचे बॅ. केशवराव देशपांडे हे होते आणि आचार्य काका कालेलकर, आचार्य जुगलकिशोर व आचार्य भणसाळी हे आमचे अध्यापक होते. श्री. पुंडलीकजी हे आश्रमाचे व्यवस्थापक होते.

## सार्वजनिक जीवनाचा श्रीगणेशा

त्या वेळी देशसेवेचे कोणतेच स्पष्ट चित्र माझ्या डोळ्यांसमोर नव्हते; पण आश्रमातील थोर थोर व्यक्तींच्या निकट सहवासात माझ्या सार्वजनिक जीवनाची जडण-घडण सुरू झाली. एका प्रार्थना प्रवचनात गांधीजींनी स्वसुख-निरभिलाष-वृत्तीच्या सेवा-परायण जीवनाचे महत्त्व आम्हाला पटवून दिले. गांधीजींच्या त्या प्रवचनाने माझ्या मनाची घट्ट पकड घेतल्याचे मला स्मरत आहे. लोकमान्यांपासून देशभक्तीची प्रेरणा मला प्रथम मिळालीच होती. आता गांधीजींच्या सहवासात देशसेवेचा प्रत्यक्ष कार्यक्रम हाती लागला. आणि तेव्हापासून हिंदस्वराज्याचा एक सर्वसामान्य पाईक-एक सामान्य स्वयंसेवक या नात्याने सुरू झालेली माझी जीवनयात्रा गेली पंचावन्न वर्षे अखंडपणे चालली आहे.

## माझे गणगोत

१९०३ साली रोहे (जि. कुलाबा) येथे माझा जन्म झाला. वडील धोंडो चिंतामणी क्षीरसागर वैद्यकीचा व्यवसाय करीत होते. आईचे नाव मथूताई (सौ. राधाबाई) पाली सिद्धेश्वर येथे तिचे माहेर होते. तिने आपल्या उपजत व सहजसुंदर थोर आचार-विचारांनी केवळ माझेच नव्हे तर, अनेकांची जीवने घडवली आहेत. तिच्या या थोर जीवनाचा धावता परिचय माझी भाची सौ. लीलावती भागवत हिने तिच्या "पांढरा चाफा" या पुस्तकात आणि नंतर मुंबईच्या आकाशवाणीवरून सर्वांना करून दिला आहे. १९३९ साली माझी आई कॅन्सरच्या दुखण्याने मुंबईला निधन पावली व वडील रोह्याला १९४४ साली निवर्तले. माझे सर्वांत ज्येष्ठ बंधू डॉ. गजाननराव इंग्लंडला FRCS च्या अभ्यासासाठी गेले होते, ते तिकडेच दिवंगत झाल्याचे समजले. त्यांच्या पाठची माझी विधवा झालेली बहीण श्री पार्वतीबाई (माई) पोतदार सध्या आपल्या मुला-जवळ राहत आहे. तो तळेगाव (पुणे) येथे डॉक्टर आहे. माझे दुसरे ज्येष्ठ बंधू श्री. रघुनाथराव हे मुंबईला सेवानिवृत्त होऊन राहत आहेत. त्यांची पत्नी सौ. वारूताई दिवंगत झाल्याला आता चार वर्षे झाली आहेत. ती एक उत्कृष्ट व जातिवंत शिक्षिका होती. हिंदी भाषेवर तिचे प्रभुत्व असामान्य होते. हिंदीच्या कोविद परीक्षेत ती गुण-क्रमाने अखिल भारतात पहिली आली होती. त्यासाठी तिला पू. विनोबांच्या हस्ते एक विशेष पारितोषिक देण्यात आले होते. तिच्या अकाली निधनानंतर तिच्या सर्व आप्तेष्ट सुहृदांनी मिळून तिच्या नावाने एक 'विज्ञान भवन' प्रबोधन विद्यालयाच्या परिसरात उभारण्यास आर्थिक साह्य केले आहे.

## माझा सार्वजनिक परिवार

पण माझे गणगोत रक्ताच्या नातेवाईकांपुरतेच मर्यादित राहिलेले नाही. माझ्या दीर्घकालीन सार्वजनिक जीवनात माझे अनेक व्यक्तींशी व परिवारांशी घरच्या नातेवाईकां-

पेक्षाही अधिक निकटचे व जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित झाले आणि त्या सर्वांच्या अपरंपार स्नेहावर व जिव्हाळ्यावरच माझे उभे आयुष्य जोपासले गेले आहे.

माझ्या या सार्वजनिक परिवारात श्री. बाबा रेडीकर यांच्या मैत्रीचा अपूर्व लाभ मला घडला. मसूराश्रमात त्यांचा-माझा निकटचा संबंध आला व त्याचेच रूपांतर पुढे दृढ मैत्रीत झाले. देशासाठी आजन्म फकिरी घेण्याची मूळ प्रेरणा बाबांची व माझी एकच होती. बाबांची प्रखर वैराग्यशीलता मला पेलण्यासारखी नव्हती; तथापि बाबांच्या कठोर तपस्वी जीवनामागील त्यांची विनम्र सेवापरायणता आणि त्यांच्या बालसदृश निष्पाप, प्रांजळ व कोमल मनाने मी अगदी मोहून गेलो आणि ओघाओघाने आम्ही जीवनाचे साथी-सोबती बनलो. बाबा-मामांची ही जोडी महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांमध्ये पुढे सर्वतोमुखी झाली. कै. शंकरराव देव आम्हा दोघांसंबंधी एकदा सहज बोलून गेले- " डोळे दिसायला दोन पण दृष्टी एकच." त्याचप्रमाणे पू. विनोबांनीही आम्हांसंबंधी म्हटले आहे की- " मामा आणि बाबा ज्या कामात लागले आहेत आणि जेथे पाठीराखा देव उभा आहे " तेथ मी पाहतो नित्य। धर्म श्री जय वैभव. "

## मुले, मुली, भगिनी

माझ्या सार्वजनिक जीवनात बाबांनी मित्र म्हणून जसे अग्रस्थान मिळवले आहे, तद्वतच कित्येक मुलांनी आणि विशेषेकरून मुलींनी आपण होऊन माझी पितृस्थानी स्थापना केली आहे.- आपल्या वडिलांच्या निर्याणानंतर : १ चि. मनूताई नातू माझ्याजवळच लहानाची मोठी झाली. आता ती अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयात मराठी विभागाची प्रमुख म्हणून काम पाहात आहे. तिचा दांडगा विद्याव्यासंग, तिचे असामान्य भाषाप्रभुत्व व अमोघ वक्तृत्व आणि त्याचबरोबर कोणाही दीन दलितांसंबंधी तिला वाटणारा अपरंपार जिव्हाळा इत्यादी तिच्या विलोभनीय सद्गुणांमुळे ती विद्यार्थी-जगात अत्यंत लोकप्रिय आहे. २ चि. सौ. डॉ. लीला देशमुख सध्या आपल्या यजमानांसह (डॉ. रामसिंग) केरिचो-केनिया (आफ्रिका) येथे डॉक्टरी व्यवसाय करीत आहे. ३ चि. शांता पितळे गेली वीस वर्षे माझ्या प्रत्यक्ष पितृछायेत वावरत असून ती प्रबोधन प्राथमिक शाळेची मुख्याध्यापिका आहे. ४ चि. सौ. कुमुदिनी चौहान व चि. सौ. मनोरमा वर्मा ह्यांनी इन्दौरला ' मुकुल भारती ' संस्था स्थापन केली असून पाळणाघर, बालक मंदिर, प्राथमिक शाळा इ. प्रवृत्ती चालवल्या आहेत. ५ चि. चंद्राताई किर्लोस्कर व श्री. इंदिराबाई हळबे ह्यांनी देवरुख (जि. रत्नागिरी) येथे एक ' मातृमंदिर ' संस्था स्थापन केली असून आज त्या संस्थेत वीस बेड्सचे सूतिकागृह, दवाखाना, जनरल हॉस्पिटल, चार बालक मंदिरे, गोकूळ (अनाथ आश्रम), वाचनालय इत्यादी प्रवृत्ती गेली कित्येक वर्षे यशस्वीपणे चालवीत आहेत. ६ चि. डॉ. शकुंतला व चि. माधवराव दळवी ह्यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील ' चुये ' गावाचा आपल्या ग्रामसेवेच्या विविध कार्यक्रमांनी कायापालट घडवून आणला आहे. ७ चि. सौ. काशीताई व तिचे यजमान चि. डॉ. कामेश-

वाली हे दोघे पूर्वी हिंदू युनिव्हर्सिटीत (बनारस) प्राध्यापक होते. तेथून ते आता अमेरिकेत गेली दहा वर्षे स्थायिक झाले असून, आपल्या विद्वत्तेने व कर्तृत्वाने त्यांनी उत्कृष्ट अध्यापक म्हणून चांगला नावलौकिक संपादन केला आहे. ८ चि. कु. इंदू जाधव ही माझ्या सहवासात सर्वांच्या मागून आली; पण तिने आपल्या गोड बोलण्याने व सेवापरायण वागण्याने मला चांगलाच लळा लावला आहे. सध्या ती औरंगाबादच्या कॉलेजात बी. ए. च्या वर्गात शिकत आहे. त्याचप्रमाणे ९ चि. प्रभाकर ओक (एंजिनीअर) १० लेफ्टनंट कमांडर चि. कृष्णा दुर्गे (नौदल) विक्रान्त ११ चि. भाऊराव देशमुख (सागर पोलीस ट्रेनिंग कॉलेज लेक्चरर व राष्ट्रपति पदक विजेता) १२ प्राध्या. डॉ. दशरथ जाधव (व्हेटर्नरी कॉलेज, मुंबई) १३ चि. शरद मेहेंदळे (ॲडव्होकेट) १४ चि. अविनाश पितळे (ज्योती इंजिनिअर) १५ चि. दिवाकर हरिदास (खडकलाट बेळगाव) इत्यादी अनेक मुले माझ्या निकट सहवासात आली व ती आता समाजात प्रतिष्ठा पावली आहेत, लोकांच्या मनी-मुखी बसली आहेत.

तद्वतच चि. सौ. कमलाताई धर्माधिकारी, चि. बाई डोईफोडे, चि. कमलाताई वैद्य, श्री. ताराबेन मश्रूवाला (माधान), श्री पुष्पाबेन देसाई (भणसाळी आश्रम), सौ. साधनाताई आमटे, सौ. सुमनताई बंग...अशा माझ्या मानलेल्या भगिनींची तर गणतीच करता येणार नाही.

असा माझा हा सार्वजनिक परिवार रक्ताच्या नात्यापेक्षाही अधिक जवळचा, व्यापक आणि विशाल असा आहे. आणि तो आपल्या सत्प्रवृत्तीने व कर्तबगारीने मला निरंतर आनंद व समाधान देत आला आहे. या सर्वांच्या माझ्यासंबंधीच्या आत्यंतिक जिव्हाळ्यामुळेच मला माझे जीवन सुखप्रद आणि आनंददायी झाले आहे.

प्रबोधन विद्यालयाच्या गेल्या ३५ वर्षांच्या सेवेमुळे व सहवासामुळे दर्यापूरमधील घरन् घर जेव्हा माझ्याशी अगदी कौटुंबिक जिव्हाळ्याच्या नात्याने वागताना मी पाहतो, तेव्हा माझे अंतःकरण भरून येते.

त्याचप्रमाणे जेव्हा एखाद्या अनोळखी ठिकाणी एखादी व्यक्ती एकदमच पुढे येऊन लवून नमस्कार करते व "मी तुमचा प्रबोधनचा विद्यार्थी" असे मोठ्या विनयाने व कृतज्ञतेने सांगते तेव्हा माझे धन्यतेचे अश्रू आवरणे मला अशक्य होऊन बसते.

## थोरांच्या कृपाछत्राखाली

परमेश्वरकृपेने माझ्या जीवनात माझा अनेक थोर सज्जन व्यक्तींशी घनिष्ठ संबंध आला. त्यांच्या मंगल प्रेरणेने, प्रेमळ प्रोत्साहनाने आणि प्रत्यक्ष सहवासाने माझे संपूर्ण जीवन सुसंस्कारित व सुगंधित झाले आहे. माझ्या एकूण जीवनाच्या जडणघडणीत या थोर महाभागांचा फार मोठा वाटा आहे. म्हणून मी त्यांचा या आत्मनिवेदनात कृतज्ञतापूर्वक ऋणनिर्देश करीत आहे.

## साधक-आश्रमातील गुरुजन

( १ ) अंधेरीचा साधकाश्रम ही माझ्या सार्वजनिक जीवनाची गंगोत्री आहे. येथे आश्रमाचे प्रमुख बॅ. केशवराव देशपांडे व व्यवस्थापक श्री. पुंडलिकजी यांच्या प्रेमळ कृपाछत्राखाली सार्वजनिक जीवनाचे पहिले धडे मी गिरवले. आचार्य काका कालेलकर, आचार्य भणसाळी, आचार्य जुगलकिशोर, श्री. गुलजारीलाल नंदा यांच्या सहवासाचा लाभही येथेच मिळाला.

( २ ) **श्री. गंगाधरराव देशपांडे** ( बेळगाव ) आणि केसरीचे **श्री. दा. वि. ( बाबूराव गोखले )** यांच्या प्रोत्साहनामुळेच मी साधकाश्रमात प्रवेश मिळवला होता. गंगाधररावांच्या प्रेमळ स्वभावामुळे मी खूपच प्रभावित झालो. त्यांच्याबरोबर त्यांनी मला कर्नाटकाच्या दौऱ्यात नेले होते. त्यांच्या ‘ कुमरी ’ येथील आश्रमात मी त्यांच्या निकट सहवासात राहिलो आणि नंतर त्यांच्याच सांगण्यावरून बेळगावच्या स्वराज्य आश्रमात विणकामाचे शिक्षण घेतले. गंगाधररावांच्यामुळेच श्री. बाबासाहेब सोमण, श्री. गोविंदराव व जीवनराव याळगी प्रभृतींशी माझे घरोब्याचे संबंध निर्माण झाले.

### ( ३ ) श्री. चिंतामणीशास्त्रीजी जोशी

शास्त्रीजी आमच्या रोह्याचे व थोडेसे नात्यातीलही होते. त्यामुळे त्यांचा अगदी लहानपणापासून संबंध आला. त्यांना हिन्दी, बंगाली, गुजराथी, सिंधी या भाषा येत होत्या. संस्कृत भाषेचे तर ते काव्यतीर्थच होते. बॅ. केशवराव देशपांडे व श्री. अरविंदबाबू यांनी नर्मदातटाकी काढलेल्या ‘ गंगानाथ भारती विद्यालया ’त ते अध्यापक होते. गुरुदेव टागोरांच्या शांतिनिकेतनातही ते काही काळ होते; पण त्यांचा हा सर्व परिचय त्यांनी आम्हाला कधीच सांगितला नाही. ते एके ठिकाणी फारसे राहत नसत व जातील तेथे भक्तिगीते ऐकवीत असत. म्हणून आम्ही त्यांना ‘ नारद ’ म्हणत असू. त्यांनी शिकवलेली भजने व योगासने मला जन्मभर आशीर्वादरूप झाली आहेत. इंदौरला त्यांना मोटारचा धक्का लागून त्या अपघातातच ते स्वर्गवासी झाले.

### ( ४ ) श्री. दादासाहेब पंडित

अकोल्याच्या टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिराचे संस्थापक. माधानच्या कस्तुरबाधाम संस्थेचे आधारस्तंभ आणि दीनदुःखी दलितांचे कैवारी श्री. दादासाहेब पंडित यांचा व माझा स्नेहसंबंध सुमारे तीन तपांचा होता. ग्रामीण भागातील हरिजन वस्तीत आणि सातपुड्याच्या आदिवासी भागात त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मला पुष्कळ वेळा लाभली. त्या प्रत्येकवेळी त्यांच्या अगाध पांडित्यापेक्षा किंवा त्यांच्या कठोर तपस्वी जीवनापेक्षाही त्यांच्या शब्दाशब्दांतून पाझरणाऱ्या वात्सल्यपूर्ण व कारुण्यपूर्ण भावनांनी माझ्या मनाची पकड जन्मभरासाठी घेतली.

## (५) पंडित मदनमोहन मालवीयजी

गोव्यातील शुद्धिकार्याच्या निमित्ताने पं. मालवीयजींचा संबंध जडला. दिल्ली, पुणे, मुंबई इत्यादी ठिकाणी त्यांचा निकटचा सहवास लाभला. त्यांनी त्या वेळी लिहून दिलेला संदेश मी जपून ठेवला आहे.

" सत्येन ब्रह्मचर्येण व्यायामेनाथ विद्यया ।
देशभक्त्याऽत्म त्यागेन संमानार्हः सदाभव ॥ "

( १६–७–१९३३ ) गंगेसारखे त्यांचे पवित्र जीवन आणि गंगौघासारखे त्यांचे अमोघ वक्तृत्व यांची छाप माझ्या चित्तावरून कधीच पुसली गेली नाही.

## (६) श्री. न. चिं. केळकर

मसूराश्रमप्रणित 'लक्षदासबोधा'ची योजना आणि गोव्यातील शुद्धिकार्य या गोष्टींमुळे श्री. तात्यासाहेब केळकरांचा संबंध आला. मसूराश्रमाच्या जप्तीच्या काळात त्यांनी अगदी लहानसहान बाबतीतही माझा पाठीराखेपणा केला व त्या आपत्प्रसंगी आवश्यक ते साहाय्य आणि मार्गदर्शन केले.

## (७) प्रो. माणिकराव (वडोदा)

बलोपासनेच्या प्रचार कार्याच्या निमित्ताने माणिकरावांशी संबंध आला व तो बॅ. देशपांडे यांच्यामुळे दृढावला. मोटर अपघाताने माझे कमरेतील दोन मणके एकमेकांत घुसले होते. त्यासाठी माणिकराव सुमारे तीन महिनेपर्यंत माझे मॉलिश करीत असत. त्या वेळी श्री. आबासाहेब जोग, नाशिकचे महाबळ गुरुजी, मुंबईचे काळेमास्तर, पंढरपुरच्या सोनूताई शेख प्रभृती त्यांची शिष्य मंडळी मला मित्र म्हणून लाभली.

## (८) तीन 'विनायक'

माझ्या एकूण जीवनयात्रेत तीन विनायकांचा प्रभाव निरनिराळ्या वेळी पडत गेलेला आहे. त्या तिघांपैकी–

(१) पहिले श्री. विनायक महाराज मसूरकर यांचा संबंध १९२४ साली आला. त्या वेळी ते एकटेच फिरत फिरत आमच्या अंधेरीच्या साधकाश्रमात आले होते. हिंदूधर्म प्रचाराच्या दृष्टीने ख्रिश्चन मिशनरी संस्थांच्या धर्तीवर एखादा आश्रम काढण्याची त्यांची योजना होती. आचार्य काका कालेलकर प्रभृतींशी त्या वेळी त्यांची झालेली चर्चा किंवा वादविवाद मला मोठे आकर्षक वाटले. आणि १९२५ साली जेव्हा साधकाश्रम बंद झाला, तेव्हा मसूरकर महाराजांनी 'हिंदू मिशनरी' म्हणून काम करण्यासाठी मला जे आवाहन केले, त्याला अनुसरून मी त्यांच्या मसूराश्रमात दाखल

झालो ( १९२६ ) आणि प्रवचने, व्याख्याने, धर्मशिक्षणाचे वर्ग, बलोपासना, साहित्य-प्रचार, धर्मांतरितांचे शुद्धिकार्य इत्यादी स्वरूपाच्या कार्यात भाग घेतला.

( २ ) दुसरे विनायक " स्वातंत्र्यवीर सावरकर." त्यांची धगधगीत देशभक्ती, त्रिखंडात गाजलेली त्यांची समुद्रभेदी उडी, अंदमानातील राक्षसी अत्याचारांशी त्यांनी घेतलेली मृत्युंजयी झुंज, त्यांचे अमोघ वक्तृत्व, त्यांचे तेजस्वी पोवाडे व जिवंत साहित्य इत्यादी गोष्टींची माझ्या मनावर जबरदस्त मोहिनी होती. रत्नागिरी येथे ते स्थानबद्ध असताना त्यांच्या गाठीभेटी पुष्कळ वेळा झाल्या. गोव्यातील हजारो गावड्यांच्या शुद्धी-करणामुळे त्यांना खूप आनंद झाला आणि त्यांनी माझ्या 'गोमांतक शुद्धीच्या इति-हासा'ला तत्काळ प्रस्तावनाही लिहून दिली.

( ३ ) तिसरे विनायक म्हणजे भूदानप्रणेते पू. विनोबा भावे. गांधीजींच्या हत्ये-नंतर विनोबांचा व माझा निकटचा संबंध आला आणि त्यांच्या ऋषितुल्य उज्ज्वल चरितामुळे व चारित्र्यामुळे माझे पुढील संपूर्ण जीवन त्यांच्या विचारांनीच भारले गेले. गेली २५ वर्षे मी त्यांच्याच कृपाछत्राखाली वावरत आहे असे म्हणण्यात अतिशयोक्ती होणार नाही.

## ( ९ ) सर्वोदय परिवार

पू. विनोबाजींच्यामुळे माझा सर्वोदय परिवारात प्रवेश झाला. सर्वोदय समाजाची स्थापना सेवाग्राम येथे १९४८ साली झाली. त्या सेवाग्रामच्या अधिवेशनापासून भाई धोत्रे यांच्या हाताखाली त्यांचा मदतनीस म्हणून मी अनेक सर्वोदय संमेलनांत काम केले. भाई धोत्रे यांच्यामुळेच माझा सर्वोदय समाजातील प्रमुख कार्यकर्त्यांशी अगदी जवळून संबंध आला– श्री. गोपबंधू, नवकृष्ण बाबू, मनमोहन चौधरी, रविशंकर महाराज, कृष्णदास जाजू, आशादेवी आर्यनायकम् इत्यादी. सर्वोदयाचे यथार्थ दर्शन घडविणारे आचार्य दादा धर्माधिकारी यांचा परिचय दर्यापूरचे, त्यांचे चुलते डॉ. अण्णा-साहेब धर्माधिकारी यांनी आधीच करून दिला होता. दादा म्हणजे आमचे ज्ञान–विद्यापीठच.

## ( १० ) श्री. जयप्रकाश नारायण

सर्वोदय परिवारातील श्री. जयप्रकाशजींचे स्थान पहिल्यापासूनच वैशिष्ट्यपूर्ण राहिले. भूदानमूलक ग्रामोद्योगप्रधान अहिंसक क्रांतीला श्री. जयप्रकाशजींनी जीवनदान दिल्यानंतर भूदान आंदोलनाला भरती आली. या भरतीच्या काळात निरनिराळ्या कामांच्या निमित्ताने त्यांच्याशी माझा निकटचा संबंध आला व तो पुढे वाढतच गेला. पुढे मी जेव्हा विनोबांच्या आज्ञेवरून आचार्यकुलाचे काम करू लागलो तेव्हा जेपींनीच माझी नियुक्ती अखिल भारतीय केन्द्रीय समितीवर केली.

त्यांचे प्रसन्न व्यक्तिमत्त्व, त्यांचे निर्मळ, प्रांजळ व कारुण्यपूर्ण मन आणि त्यांचा हिमालयाएवढा त्याग पाहून धन्यता वाटल्यावाचून राहत नाही.

## ( ११ ) श्री. शंकरराव देव

श्री. शंकरराव देवांशी माझा परिचय तसा जुनाच होता. मुळशी सत्याग्रहाच्या वेळीं त्यांनी भोगलेल्या पाशवी फटक्यांच्या शिक्षेमुळे मला त्यांच्यासंबंधी फार मोठा प्रेमादर वाटत असे; पण १९४६ साली त्यांनी कोरगावकर ट्रस्टमार्फत जो आश्रम काढण्याचे ठरवले व त्यासाठी त्यांनी मला जेव्हा बोलावून घेतले, तेव्हापासून त्यांचा संबंध घनिष्ठ झाला. शंकररावांची आणि माझी मुळातली जीवनाची बैठक किंवा प्रेरणा धार्मिक (आध्यात्मिक) असल्यामुळे, त्यांच्याप्रमाणेच मलाही आश्रमसंस्थेचे विलक्षण आकर्षण होते. कोल्हापूरच्या संकल्पित आश्रमाची साधना, ग्रामसेवेच्या माध्यमातून व्हावी असे आम्ही दोघांनी ठरवले व त्याप्रमाणे या ग्रामसेवाश्रमामार्फत पुढे सात वर्षे ग्रामसेवेच्या निरनिराळ्या प्रवृत्ती चालू राहिल्या. गांधीहत्त्येनंतर शांतता प्रस्थापित करण्यासाठी आश्रमाने केलेल्या कामगिरीमुळे शंकररावांना अत्यंत आनंद झाला. अन्य क्षेत्रांतील आश्रमाची कामगिरीही त्यांना समाधानकारक वाटत होती. पण आश्रमाच्या हयातीत अनेक उन्हाळे-पावसाळे येत गेले आणि अशाच एका प्रसंगी आश्रम एकदम बंद करण्याचा निर्णय शंकररावांनी घाईघाईने घेतला. त्याबद्दलचा पश्चात्ताप त्यांनी माझ्याजवळ अनेकवेळा बोलून दाखवला.

आश्रम बंद झाल्यानंतर मी विनोबाप्रणित भूदान आंदोलनाकडे वळलो. शंकररावही भूदानासाठी दक्षिणेकडे गेले. शंकरराव केरळमध्ये पदयात्रा करीत असताना त्यांनी मला केरळमध्ये बोलावून घेतले. तद्वतच पुढे त्यांची दिल्ली–पेकिंग मैत्री यात्रा सुरू झाली, त्या वेळी आसाममध्ये मी १५ दिवस त्यांच्याबरोबर सहयात्री म्हणून राहिलो होतो. ह्या दोन्ही पदयात्रेत शंकररावांच्या अंतःकरणाचे अपूर्व दर्शन मला घडले. ते एक जीवनाचे निष्ठावंत साधक होते; परंतु त्यांच्या या सत्यस्वरूपाचे आकलन महाराष्ट्रातील फारच थोड्या लोकांना झाले आहे.

## ( १२ ) श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे

कोल्हापूरच्या ग्रामसेवाश्रमाच्या स्थापनेनंतर आश्रम संचालनासाठी श्री. शंकरराव, श्री. अण्णासाहेब व मी अशा तिघांची एक समिती नेमण्यात आली. पण शंकरराव व अण्णासाहेब यांच्यामध्ये कार्यपद्धतीबद्दल मतभेद उत्पन्न झाल्यावर अण्णासाहेब बाजूला सरले. तथापि व्यक्तिशः त्यांचे–माझे संबंध कमी झाले नाहीत. इतकेच नव्हे तर ते वाढतही गेले. मतभेद पचवून सहकार्य देत राहण्याची अण्णासाहेबांची शक्ती अपूर्व आहे. ते स्वतः अत्यंत तत्त्वनिष्ठ राहतात; पण समोरच्या व्यक्तीच्या मर्यादा लक्षात घेऊन, त्याच्या पातळीवर उतरून त्याच्याशी ते समरस होऊ शकतात. हेच त्यांचे

वैशिष्ट्य आहे. म्हणूनच शेकडो कार्यकर्ते त्यांच्याकडे मार्गदर्शनासाठी धाव घेत असतात. आणि त्यांना ते कुठल्यातरी कामात गुंतवून ठेवतात. आणि याहीपेक्षा पुढे जाऊन या कार्यकर्त्यांच्या सुखदुःखाशी ते समरस होतात– त्यांच्या आजारीपणात त्यांची जीवाभावाने सेवाशुश्रूषाही करतात. या सेवेचा ते गर्वही वाहत नाहीत किंवा त्या व्यक्तीकडून कसल्याही मोबदल्याची अपेक्षाही बाळगत नाहीत.

पवनार येथील महाराष्ट्र आचार्यकुल परिषद किंवा अ. भा. आचार्यकुल संमेलन या दोन्ही वेळी अण्णासाहेबांनी आम्हाला दिलेल्या सर्वप्रकारच्या साह्यामुळेच ही अधिवेशने यशस्वी होऊ शकलीं.

व्यक्तिशः मला अण्णासाहेब हे एक जीवनाचे आधारच वाटतात.

## ( १३ ) बॅरिस्टर रामराव देशमुख आणि श्री भाऊसाहेब खरे

प्रबोधन विद्यालयाच्या स्थापनेपासून या दोन्ही महापुरुषांचे पितृछत्र आम्हाला लाभले. प्रबोधन विद्यालयाच्या अखंड प्रगतीचे श्रेय या दोघांनाच आहे. विद्यालयाला व व्यक्तिशः मला त्यांच्याकडून मिळालेली वात्सल्यपूर्ण वागणूक सर्वथैव अविस्मरणीय अशीच आहे. लोकमान्यांच्या पिढीतील हे दोन्हीही महान थोर पुरुष आम्हाला ‘ आमचे ’ म्हणून लाभले ही परमेश्वराची कृपाच होय.

## ( १४ ) कोरगावकर ट्रस्ट परिवार

आपले जीवनसर्वस्व ज्यांनी समाजसेवेला वाहिले आहे अशा समर्पित वृत्तीच्या निष्ठावंत लोकसेवकांचा एक भ्रातृसंघ १९४६ साली श्री. शंकरराव देवांनी कोरगावकर ट्रस्टमार्फत स्थापन केला त्यात आचार्य जावडेकर, आचार्य भागवत, रावसाहेब पटवर्धन एस्. एम्. जोशी, जे. पी. नाईक, रा. कृ. पाटील, अप्पासाहेब पटवर्धन, अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, भाई धोत्रे बाबा आमटे प्रभृतींचा समावेश झालेला होता. पू. केदारनाथजी हे संघाचे अध्यक्ष व मी कार्यवाह होतो. महाराष्ट्राच्या जीवनक्षेत्रातील बाह्यतः परस्परविरोधी दिसणारी आणि भिन्नभिन्न विचारप्रणालीचा पुरस्कार करणारी ही मंडळी भ्रातृसंघाच्या या व्यासपीठावर एकत्र येऊन देशातील अनेक समस्यांचा व प्रचलित ज्वलंत प्रश्नाचा मुक्तमनाने व खेळीमेळीच्या वातावरणात विचार करीत असत. त्यामुळे महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाला परिशुद्ध व स्नेहपूर्ण वळण देण्याचा एक अभिनव प्रयोग शंकररावांनी चालवला होता. सेवकसंघाची ही संमेलने कोल्हापुरच्या ग्रामसेवाश्रमातच दरवर्षी भरत असत, त्यामुळे उपरोक्त सर्व महापुरुषांचा व माझा अगदी जवळचा संबंध आला आणि या सर्वांना माझ्या जीवनात एक महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले.

### (१५) श्री. लक्ष्मीवहिनी कोरगावकर

श्री. लक्ष्मीवहिनी कोरगावकर नावाप्रमाणेच साक्षात लक्ष्मीस्वरूप होत्या. विपुल संतति-संपत्तीने त्यांनी कोरगावकरांचे घराणे सर्व दृष्टींनी ऐश्वर्यसंपन्न केले. श्री. प्रभाकर-पंतांच्या दानशूरत्वाला शोभेसे लक्ष्मीवहिनींचे मनही अत्यंत उदार व श्रीमंत होते. कोरगावकर ट्रस्टच्या भ्रातृसंघाची मंडळी म्हणजे प्रभाकरपंतांचा विशाल परिवारच होता. या परिवाराचा अगदी घरगुती नात्याने सांभाळ करण्याची कामगिरी लक्ष्मीबाईंनी जन्मभर केली. संघातील कोणत्याही व्यक्तीच्या अडीअडचणीत आणि विशेषतः आजारीपणात त्या धावून जात असत व मातृवात्सल्याने त्याची सेवा करीत असत. घटप्रभेला माझ्या प्रोस्टेट ग्लँडच्या ऑपरेशनच्यावेळी त्यांच्या या मातृवत्सल हृदयाचा मला केवढा तरी आधार वाटला. पण त्याहीपेक्षा कोरगावकर ट्रस्टच्या सचीवाने आश्रमातील काही आर्थिक व्यवहाराच्या बाबतीत व्यक्तिशः माझ्यावर जेव्हा चिखलफेक केली, तेव्हा या गोष्टीला अजाणता मूकसंमती दिल्याबद्दल लक्ष्मीवहिनींनी प्रभाकरपंतांची माझ्या देखत जी हजेरी घेतली, ती त्यांच्या तेजस्वी व स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची प्रचीती होती. प्रभाकरपंतांशी त्यांचे झालेले एकरूपत्व असामान्य होते. तथापि प्रसंगविशेषी त्यांचा स्वतंत्र व तेजस्वी बाणा आम्हा सर्वांच्या प्रत्ययाला येत असे आणि म्हणूनच श्री. शंकरराव देवांपासून तो थेट आम्हा सर्वांपर्यंत त्यांच्याविषयी आम्हा सर्वांना नितांत प्रेमादर वाटत असे.

### (१६) श्री. दादासाहेब मावळंकर (अहमदाबाद)

धुळ्याच्या समर्थ वाग्देवता मंदिराचे अध्यक्ष म्हणून दादासाहेबांचा व माझा परिचय झाला. या संस्थेत मी वर्षभर काम केले. त्यामुळे दादासाहेबांचा व माझा जवळून संबंध आला. पुढे मी कोल्हापूरच्या ग्रामसेवाश्रमात काम करण्यासाठी गेल्यानंतर दादासाहेब दरवर्षी कोल्हापूरला येत असत. तेथेही गाठीभेटी होऊ लागल्या. माझ्या एका संस्कृतिशिक्षण अभ्यास वर्गाचा समारोप दादासाहेबांच्या हस्ते केला होता. दादासाहेब नियमितपणे डायरी लिहीत असत. त्यांच्या या डायऱ्यांमधून आलेल्या अनेक विषयांचे वर्गीकरण व संपादन करण्याचे काम त्यांनी मला दिले होते. उन्हाळ्याच्या सुट्टीत दादासाहेब पन्हाळ्यावर येऊन राहत. त्या वेळी मी त्यांच्याबरोबर रोज फिरण्यासाठी जात असे—

**“ या स्तेषां स्वैरकथा ता एव भवन्ति शास्त्राणि । ”**

या वचनाचा प्रत्यय या फिरण्यातील गप्पांच्यावेळी मला सहजच आला. वस्तुतः दादासाहेब भारतीय संसदेचे अध्यक्ष होते; पण ते माझ्याशी अगदी घरगुती नात्याने वागत असत. त्यांचे माझ्यावर अपत्यनिर्विशेष प्रेम जडले होते.

### (१७) साने गुरुजी

वस्तुतः साने गुरुजी माझ्यापेक्षा वयाने लहान. पण त्यांच्या “ श्यामच्या आईने ”

ते माझे गुरुजीच बनले. त्यांच्या लेखणीच्या व वाणीच्या सामर्थ्याने मी भारून गेलो. फैजपूरच्या काँग्रेसच्यावेळी घसा सुजेपर्यंत त्यांनी गावोगावी केलेला तुफानी प्रचार पाहून मला सानंद कौतुक वाटले. पंढरपूरचे मंदिर हरिजनांसाठी खुले करण्याकरता त्यांनी पंचप्राणांची लावलेली बाजी हा सर्वांच्याच चिंतेचा विषय झाला होता. त्या निमित्ताने त्यांनी म. गांधीजींशी घेतलेली विनम्र झुंज व अंती त्यांना मिळालेले सुयश, हा सर्वच मोठा हृद्य इतिहास मला प्रत्यक्ष दादासाहेब मावळंकरांकडून जेव्हा ऐकण्यास मिळाला, तेव्हा विटेवरच्या पांडुरंगापेक्षाही या चालत्या बोलत्या पंढरीरायाच्या चरणी मी नतमस्तक झालो.

## (१८) श्री. आपटे गुरुजी (येवले)

येवल्याच्या टिळक राष्ट्रीय विद्यालयात आपटे गुरुजींचे प्रथम दर्शन झाले. दुसऱ्या दिवशी नरकचतुर्दशी होती. गुरुजींनी मला ठेवून घेतले व मोठ्या पहाटेस स्वतःच्या हाताने अभ्यंगस्नान घातले. गुरुजींच्या रेशमी हाताच्या मातृस्पर्शाने मी भारावून गेलो. देशासाठी घरदार सोडल्यानंतरची माझी ही पहिलीच दिवाळी होती. पुढे गुरुजी पुष्कळ वर्षांनी पुण्यास भेटले व परत गाठीभेटी वरचेवर होऊ लागल्या. कोल्हापूरला ग्राम-सेवाश्रमात ते पुष्कळ वेळा आले. त्यांच्या उपस्थितीत आश्रमीय कार्यकर्त्यांच्या परि-वारासाठी म्हणून एक विशेष शिबिर घेतले होते. कार्यकर्त्यांचा सर्व परिवार गुरुजींच्या मातृवात्सल्याने न्हाऊन निघाला.

मरणानंतर आपला पार्थिव देह पुण्याच्या ताराचंद हॉस्पिटलला विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी समर्पित करण्याचा गुरुजींच्या जीवनातील शेवटचा प्रसंग सर्वांच्या हृदयाला चटका लावून गेला. जे शरीर जन्मभर कणाकणाने राष्ट्रीय शिक्षणासाठी झिजले, त्याची पूर्णाहुती मरणानंतरही राष्ट्रीय शिक्षणासाठी झाली, हे दृश्य भव्य व दिव्य होते. माझ्या जीवनाचा शेवटही अशाच पद्धतीने व्हावा अशी माझी मनीषा मी माझ्या मित्रांजवळ नोंदून ठेवली आहे.

## (१९) श्री. बाबा रेडीकर

श्री. बाबांचा व माझा मसूराश्रमात स्नेहसंबंध जडला. देशासाठी फकिरी स्वीकारण्याची त्यांची व माझी मूळ प्रेरणा एकच असल्यामुळे, त्यांची–माझी मैत्री निकटच्या सहवासाने दृढ होत गेली आणि आम्ही जीवनाचे साथीदार बनलो.

मसूराश्रम सोडण्याचा निर्णय आम्ही दोघांनी मिळून घेतल्यानंतर १९३८ साली आम्ही दर्यापूरला आलो व गुरुकुलाची प्रवृत्ती राममंदिरात सुरू केली. त्यानंतर १९३९ साली प्रबोधन विद्यालय सुरू करण्यात आले. या विद्यालयाची उभारणी करण्यासाठी बाबांनी जिवापाड मेहनत घेतली. "घरापर्यंत शाळा पोचवली पाहिजे आणि शाळेमध्ये घर

आणले पाहिजे." ह्या महान शैक्षणिक सिद्धान्ताला बाबांनीच दर्यापूरला साकार केले. त्यासाठी 'गीता मंडळा'चे माध्यम त्यांनी फार कौशल्याने हाताळले.

बाबा विरक्त वृत्तीचे असले तरी ते माणुसघाणे नाहीत. ते समाजशील आणि मित्रप्रेमी आहेत. जातील तेथे ते आपला मित्रपरिवार उभा करतील. त्यांना सत्यवृत्तीचे धडे देतील, त्यांच्या सुख-दुःखात समरस होतील, त्यांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी धावपळ करतील, त्यांच्या मुलाबाळांना अंगाखांद्यावर घेऊन नाचतील; 'प्रबोधन' मधील विद्यार्थ्यांबरोबर रिंग किंवा व्हॉलीबॉल खेळण्याची त्यांची या वयातही तयारी असते. पण अशा प्रकारे ते सर्वांशी समरस होत असले तरी त्यांना बेशिस्तपणा किंवा ढिलेपणा बिलकूल खपत नाही. तथापि, या त्यांच्या कडकपणाच्या पोटातही दुसऱ्याच्या हिताची व कल्याणाची तळमळ असते हे कळून आल्याशिवाय राहत नाही. म्हणून त्यांच्यासंबंधी वैरभाव किंवा कटुता कोणाच्या मनात राहत नाही.

दर्यापूरला काही दिवस काम केल्यानंतर बाबांना दर्यापूरचे कार्यक्षेत्र अपुरे वाटू लागले आणि ग्रामीण जनतेची सेवा करण्यासाठी ते कोल्हापूरला गेले. १९४६ सालापासून कोरगावकर ट्रस्टच्यामार्फत ग्रामसेवाश्रम सुरू करण्यात आला व तेथे सुमारे ७ वर्षे आम्ही दोघांनी आश्रमाच्या वतीने काम केले.

कोल्हापूरच्या त्या वेळच्या गढूळलेल्या राजकीय वातावरणात विधायक विचाराचे व प्रवृत्तींचे लोण खेड्यापाड्यांपर्यंत पोचवण्याची नितान्त जरुरी होती. त्या दृष्टीने ग्रामीण भागात सतत दौरे काढून बाबांनी अनेक कार्यकर्ते हुडकून काढले. त्यांच्या प्रशिक्षणासाठी तात्पुरती व दीर्घ मुदतीची शिबिरांची व्यवस्था ग्रामसेवा श्रमाने केली. या कार्यकर्त्यांच्या द्वारा ग्रामसेवेच्या योजना आखण्यात आल्या व त्यासाठी अनेक सेवा केन्द्रे आश्रमाने चालवली. या सर्व कामात बाबा सतत आघाडीवर होते व अद्यापिही त्यांच्या त्या प्रयत्नाना उसंत नाही.

गांधीजींच्या हत्येनंतर कोल्हापूर जिल्ह्यात हिंसाचाराचा आगडोंब उठला. त्या वेळची जाळपोळ व हिंसाचार शांत करण्यासाठी बाबांनी घेतलेले अपरंपार परिश्रम केवळ अविस्मरणीयच आहेत.

ह्याशिवाय कोल्हापूरचा अनाथ महिलाश्रम, रिमांड होम, जिल्हा तुरुंग, शेंडेपार्क, कुष्टरोगी वसाहत, शांतिनगर इत्यादी अनेक संस्थांतून बाबांनी जी शांत व मूक सेवा केली, ती अत्यंत मोलाची आहे.

१९५२ पासून विनोबाप्रणित भूदान-ग्रामदान कार्याला बाबांनी स्वतःला वाहून घेतले आहे व त्याच कामात आजही ते तन्मयतेने काम करीत आहेत.

बाबा मूळचे कोकणातले आणि कोकणाच्या फणसामुळे—नारळाप्रमाणे त्यांचे बाह्य दर्शन जरी खडबडीत— राकट व कठोर दिसले तरी त्यांचे अंतरंग फणसा—नारळाप्रमाणेच अत्यंत कोमल व मधुर असे आहे, हे सहवासाने कोणाच्याही लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

## माझे राजकीय-सामाजिक-धार्मिक जीवन

(१) देशभक्तीसाठी म्हणून मी जरी सार्वजनिक जीवनाला प्रारंभ केला असला, तरी मला प्रत्यक्ष राजकारणासंबंधी विशेष आकर्षण वाटले नाही. कारण राजकारण म्हणजे माझ्यामते मोठया सभा घेऊन आवेशपूर्ण मोठी भाषणे करणे, जंगी मिरवणुका काढणे, संप व हरताळ घडवून आणणे, कोणत्या तरी सत्तेच्या स्थानासाठी निवडणुका लढवणे, प्रतिस्पर्धी व्यक्तीला सूक्तासूक्त मार्गाने धुळीला मिळवणे, आणि मुख्य म्हणजे पुढारी होऊन सर्व सूत्रे चालवणे पण या किंवा यासारख्या गोष्टी माझ्या स्वभावाच्या अगदी विरुद्ध होत्या. माझा असा पिंडच नव्हता. रामदासांच्या भाषेत 'राजकारण म्हणजे धकाधकीचा मामला.' तो माझ्यासारख्या अशक्ताला कसा पेलणार? म्हणून मी त्या मार्गाकडे वळलोच नाही. आश्रमीय जीवनाची मला उपजत गोडी होती आणि म्हणून माझ्या जीवनाचा महत्त्वपूर्ण काळ निरनिराळ्या आश्रमांत व त्या आश्रमांच्या द्वारा प्रवर्तित असलेल्या भिन्नभिन्न विधायक प्रवृत्तीतच गेला.

(२) १९२१ ते १९२५ पर्यंत मी गांधीजींच्या असहकार आंदोलनात रंगलेला होतो. त्यासाठी मी ज्या साधकाश्रमात शिक्षित व दीक्षित झालो होतो, तो आश्रम १९२५ मध्ये बंद पडला.

(३) मग मी मसूराश्रमात 'हिंदू मिशनरी' म्हणून काम करण्यासाठी १९२६ साली दाखल झालो. १९३२ मध्ये गांधीजींच्या चळवळीत सरकारी वटहुकूमाने मसूराश्रम जप्त करण्यात आला व प्रमुखाची धरपकड झाली.

(४) गोव्यातील हजारो ख्रिश्चन गावड्यांचे शुद्धीकरण ही मसूराश्रमाची महनीय कामगिरी होती. ही कामगिरी भारतीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीला अप्रत्यक्षपणे मदतरूप होईल, असे मला मनापासून वाटत होते, म्हणून मी या चळवळीशी पूर्णपणे समरस झालो होतो आणि गोव्याशी जडलेल्या या पूर्वीच्या ऋणानुबंधामुळेच पुढे १९५५ साली झालेल्या गोवामुक्ती आंदोलनात मी सक्रिय भाग घेतला.

(५) त्यानंतर १९४२ च्या 'चले जाव!'च्या प्रचंड लढ्यात सामील होण्याची माझी तीव्र इच्छा होती. परंतु नव्यानेच काढलेल्या दर्यापूरच्या प्रबोधन विद्यालयाचा मला मोह पडला आणि सरकारी अवकृपेला किंवा रोषाला आपले हे विद्यालय बळी पडू नये, म्हणून मी या चळवळीत प्रत्यक्षपणे कोणताही भाग घेतला नाही. तथापि हे दुःख मला सारखे सलत राहिलेले आहे.

(६) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर माझा सर्व काळ मिळालेले स्वातंत्र्य स्थिरपद होण्यासाठी आवश्यक असलेल्या लोकशिक्षणमूलक विधायक कामात गेला. काँग्रेसचे रूपांतर 'लोक सेवक' संघात व्हावे, ही गांधीजींची इच्छा मला पूर्णपणे मान्य होती. म्हणून त्या दृष्टीने पक्षीय राजकारणापासून सर्वस्वी मुक्त असलेल्या 'सर्वोदय' समाजात मी सामील झालो. पक्षीय किंवा सत्तास्पर्धेचे राजकारण मला कधीच आकर्षू शकले नाही.

(७) श्री. जयप्रकाश नारायण यांच्या भ्रष्टाचार निर्मूलक बिहार आंदोलनात सहभागी होण्याची उत्कट मनीषा होती; पण अलीकडे वरचेवर दगा देणारी नाजूक प्रकृती घेऊन बिहारला जाणे म्हणजे आपल्याच प्रकृतीचा बोझा तेथील कार्यकर्त्यांवर घालण्यासारखे होईल. अशी माझी समजूत घालून माझ्या हितचिंतकांनी मला बिहारला जाण्यापासून परावृत्त केले. तथापि बिहार आंदोलनाला आपला नैतिक पाठिंबा दर्शवण्यासाठी दिल्लीला अखिल भारतीय स्वरूपाचा जो भव्य व प्रचंड मोर्चा लाखो लोकांचा निघाला होता त्यात मी सामील झालो होतो.

## (१) सामाजिक

लहानपणी अजाणता मी जरी लोकमान्यांना विरोध करणाऱ्या समाज सुधारकांच्या विरुद्ध होतो, तरी पुढे अभ्यासाने समजू लागल्यानंतर म. फुले, न्या. रानडे, आगरकर, गोखले प्रभृतींच्या विचारासंबंधी मला प्रेमादर वाटू लागला. महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्या कार्यासंबंधी तर मला विशेष आपुलकी व आस्था वाटू लागली.

(२) समाजातील उच्चनीचता, जातिभेद व स्पृश्यास्पृश्यता मी कधीच मानली नाही. आमच्या घरच्या वातावरणाचा तो वारसा मला अनायासे मिळाला होता. तथापि समाजातील आर्थिक विषमतेचे उच्चाटन झाल्याशिवाय रोटी-बेटी व्यवहार, शिवाशिव निषेध, मंदिर-प्रवेश इत्यादी समाजसुधारणेचे कार्यक्रम वरवरच्या मलमपट्टीसारखेच ठरतील, असे मला अनुभवाने कळून चुकले होते.

(३) स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच माझे लक्ष आदिवासी [ गिरीजन ] लोकांच्या सेवेकडे वळले होते. १९३५ नंतर मी सातपुड्यातील आदिवासींच्या सेवेसाठी गेलो होतो. अक्राणी महालातील [ ता. तळोदे, जि. धुळे ] अक्रा गावी मी श्री मारुतीरायांच्या मूर्तींची स्थापना केली या ११ मूर्ती पोलादाच्या होत्या व त्या कै. शंकरराव किर्लोस्करांनी मला मुद्दाम ओतवून दिल्या होत्या. मारुतीरायांच्या सेवेच्या माध्यमातून दारूमुक्ती, कर्जेदलाली, जुगार इ. प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न मी करीत होतो पण पुढे सातपुड्यातील भयंकर मलेरियाने मी पछाडला गेलो व शेवटी मला निरूपायाने सातपुडा क्षेत्र सोडणे भाग पडले.

(४) डॉ. शिवाजीराव पटवर्धन व श्री. बाबा आमटे यांच्यामुळे कुष्ठ रोग्यांच्या सेवेच्या प्रश्नाकडे माझे लक्ष वेधले गेले. पण त्या बाबतीत जाईन त्या ठिकाणी या प्रश्नाचा प्रचार करण्यापलीकडे मात्र मी काही करू शकलो नाही. महारोगातून मुक्त झालेल्या कुष्ठरोग्यांचे स्वावलंबनपूर्वक पुनर्वसन करण्याचे श्री. बाबा आमटे यांचे प्रयत्न अभिनंदनीय व अनुकरणीय आहेत असे मला वाटले.

(५) पण समाजातील या अनेक समस्या सोडवण्यासाठी जी युवाशक्ती पुढे आली पाहिजे, ती तर आज भलत्याच मार्गाने जात आहे. या तरुणांना योग्य ते मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने श्री. बाबा आमटे यांनी १९६६ साली कोरेगावकर ट्रस्टच्या पुणे

येथील संमेलनात ' युवक प्रगती सहयोग ' ( युप्रस )ची एक अभिनव योजना मांडली. ती आम्ही सर्वांनी उचलून धरली व त्या दृष्टीने पहिली श्रम-संस्कार छावणी वरोड्याला आनंदवनात घेण्यात आली. बुलढाण्याचे श्री. दिवाकर आगाशे हे या छावणीचे ' कमांडर इन चीफ ' होते. देशातील युवाशक्ती नवनिर्माण कार्याला भिडवणारा हा नूतन प्रयोग. नंतर सोमनाथ ( जि. चांदा ) येथे दरवर्षी सुरू झाला. देशभरातल्या हजारो तरुणांचा घाम या श्रमतीर्थावर दरवर्षी गाळला जाऊ लागला. यातून अशा छावण्यांसाठी लागणारे अन्न-धान्य भरपूर प्रमाणात निर्माण होऊ लागले. त्याबरोबरच Production Oriented Education चा प्रत्यक्ष प्रयोगही सुरू झाला. त्याशिवाय तरुणांच्या उच्छृंखल व विद्रोही वृत्तीला अत्यंत इष्ट व देशाला हितकारक असे विधायक वळण लागण्याची शक्यता सर्वांना अनुभवता आली. म्हणून त्या दृष्टीने ' युप्रस ' नावाची एक संघटना स्थापन करण्यात आली ( १९६७ ) आणि या योजनेचा प्रचार करण्यासाठी मी महाराष्ट्रभर हिंडण्याची कामगिरी केली. १९६७ ते १९७३ पर्यंत मी या सोमनाथच्या श्रमसंस्कार छावणीत सक्रिय भाग घेत राहिलो.

## माझे धार्मिक जीवन

माझ्या घरचे वातावरण तसे रूढ अर्थाने धार्मिक होते. देवपूजा, नैवेद्य, वैश्वदेव, पोथीपाठ, कीर्तन-पुराण श्रवण, सणवार, तीर्थयात्रा इत्यादी गोष्टींना आई-वडलांच्या जीवनात फार मोठे स्थान होते. आणि आईची व्रत वैकल्ये, उपास-तापास, धरणी-पारणी इत्यादी गोष्टींना तर गणतीच नव्हती. तथापि माझे आईवडिल कट्टर सनातनी किंवा जुनाट बुरसटलेल्या विचारांचे नव्हते. आमच्या एकूण परिवारात काल-मानानुसार आंतरप्रांतीय व आंतरजातीय विवाह घडून आले. या विवाहांना त्यांनी विरोध तर केला नाहीच, पण मुक्त मनाने आशीर्वादच दिले. आमच्या आईने तर एका पुनर्विवाहित वधूची खणानारळाने ओटीही भरली होती. वडलांचा व्यवसाय वैद्यकीचा असल्यामुळे त्यांची ये-जा सर्व जाती-धर्मियांच्या घरी होत असे. त्यांनी अस्पृश्यांना कधी दूर केले नाही. त्यांचा विटाळ मानला नाही की कंटाळा केला नाही. डॉक्टरकाकांच्या घरी सर्वांनाच मुक्तद्वार असे. आणि आमच्या आईच्या हातचा पाहुणचार घेणाऱ्यांत हुसेन मिया हिंगवाला, बाळशेट कासार, लखमीचंद पंजाबी इत्यादींपासून तो गावात येणाऱ्या प्रत्येक पुराणिक कीर्तनकारापर्यंत अनेकजण असत आणि त्या सर्वांनाच त्या आईच्या पाहुणचाराबद्दल धन्यता वाटत असे. आमच्या आईवडलांनी गावातील सर्वांची मने आपल्या निर्व्याज प्रेमाने आणि उत्कट सेवेने जिंकून घेतली होती. या सेवाधर्मात त्यांना जात-धर्म कधी आड आला नाही.

आमच्या घरच्या या सर्व वातावरणाचा माझ्या जीवनावर खोल ठसा उमटला. या पार्श्वभूमीवरच मी पुढे देशसेवेसाठी घराबाहेर पडल्यानंतर अनेक थोर पुरुषांच्या सहवासाने आणि ग्रंथ वाचनाने धर्मप्रणित शुष्क कर्मकांडावरचा माझा विश्वास उडाला.

मूर्तिपूजेचे अवडंबर, श्राद्ध-तर्पणादी विधी, स्वर्गनरकाच्या कल्पना, धर्माधिष्ठित चातुर्वर्ण्य-मूलक रूढ समाजरचना इत्यादी विषयांसंबंधीचे सत्यस्वरूप मला थोडे फार समजू लागले आणि माझा रूढिग्रस्त धर्मासंबंधी भ्रमनिरास झाला. तथापि मूलभूत परमेश्वरी तत्त्वावर, प्रार्थनेवर, सदाचारावर आणि अहंकाररहित परोपकारावर किंवा सत्प्रवृत्तीवर माझी नितांत श्रद्धा आहे आणि त्या दृष्टीने मी धार्मिक प्रवृत्तीचा आहे, असे म्हणण्यात मला कमीपणा वाटत नाही.

## सिंहावलोकन

अशा प्रकारे माझ्या गतजीवनाचे व विचारप्रवाहांचे सिंहावलोकन करीत असताना माझ्या लक्षात येत आहे की माझ्या सार्वजनिक जीवनाचे अर्धशतक उलटून गेले आहे. या दीर्घ कालावधीत माझ्या सेवेची कार्यक्षेत्रे व कार्याचे स्वरूपही परिस्थिती-नुसार बदलून गेले आहे. तथापि सेवापरायण जीवनाची माझी मूळ भूमिका कायम राहिली आहे. इतकेच नव्हे तर या सेवावृत्तीचा विकास सतत होत चालला आहे, अशी अनुभूती येत आहे. प्रारंभी देशसेवा कर्तव्यरूप वाटत होती, मनावर तिचे नकळत एक प्रकारचे ओझे वा दडपण वाटत असे आणि अहंकाराचा वारा चित्ताला अस्वस्थ करीत असे. पण आता हा अहंकार पुष्कळसा गळाला आहे आणि सेवा आनंदरूप व सहज स्वाभाविक होऊ लागली आहे.

दुसरी गोष्ट अशी की सेवाकार्य अंगीकारण्यात आरंभी माझी भूमिका लोकांना सुधारण्याची, लोकोद्धाराची मुख्यत्वे होती. ही बहिर्मुख वृत्ती आता संपत चालली असून, मूलभूत चिंतनाची व आत्मविकासाची अंतर्मुख दृष्टी स्थिरावत चालली आहे. त्यामुळे निराशेचे, मानापमानाचे व पश्चात्तापाचे हेलकावे मनाला कमी बसू लागले आहेत. सार्वजनिक जीवनातील अनेक उन्हाळे-पावसाळे मी अनुभवले आहेत. पण त्यातून निर्माण होणारी निराशा व कटुता यांपासून परमेश्वरानेच माझे रक्षण केले आहे.

माझ्या भावनाप्रधान स्वभावाला अनुसरून मी गांधीजींच्या असहकार आंदोलनात उडी घेतली. त्या वेळी मी माझ्या भावी जीवनाचा फार मोठा विचार केला नव्हता. माझ्या सार्वजनिक जीवनाचा प्रारंभ किंवा आजवरची माझी झालेली वाटचाल मोठी योजनापूर्वक झालेली नाही. देशकाल प्रवाहात जी जी कामे पुढे येत गेली ती ती तत्परतेने व तन्मयतेने पार पाडीत राहणे, एवढी एकच गोष्ट मी आयुष्यभर करीत आलो आहे. "न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिंतात गच्छति" हे गीतावचन माझ्या जीवनाची आधारशीला बनलेली आहे. देशसेवेच्या मूलभूत प्रेरणेला किंवा त्या सत्संकल्पाला मी श्रद्धापूर्वक चिकटून राहिलो आणि जमली तशी लोकसेवा शांत व मूकमनाने आणि 'स्वान्तःसुखाय' वृत्तीने अखंडपणे करीत राहिलो, हाच मी माझ्या जीवनाचा आनंद व साफल्य मानीत आलो आहे.

वस्तुतः माझ्या पात्रतेपेक्षा आणि अपेक्षेपेक्षाही परमेश्वर कृपेने मला भरपूर मान-

प्रतिष्ठा आणि लौकिकयश प्राप्त झाले आहे. आणि त्यासाठी मी परमेश्वराचा आणि एकूण समाजाचाही अत्यंत ऋणी आहे.

" अकृत्वा परसंतापम् ।
अगत्वा खल नम्रताम् ॥
अनुत्सृज्य सतां वर्त्म
यत्स्वल्पमपि तद् बहुः ॥ "

## माझा जीवनपट

| | |
|---|---|
| १९०३ | रोहे ( जि. कुलाबा ) येथे जन्म. |
| १९०८–१९१६ | रोह्याला शिक्षण. |
| १९१६–१९१९ | पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षण. |
| १९१९–१९२१ | मुंबई एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये शिक्षण. |
| १९२१–१९२५ | गांधीजींच्या असहकार आंदोलनातील स्वातंत्र्यसैनिक. |
| १९२६–१९३२ | मसूराश्रमीय कार्यकर्ता |

( १ ) समर्थ रामदासांच्या दासबोध ग्रंथाच्या एक लक्ष प्रती १२० सूर्यनमस्कार व १३ पारायणे या अटींवर विनामूल्य वाटण्याचा संकल्प आश्रमाने केला. त्या ग्रंथाचे संपादन, छपाई, वितरण इत्यादी कामगिरीवर माझी नियुक्ती झाली. ( २ ) दासबोध मासिकाचे संपादन ५ वर्षे केले. ( ३ ) सुमारे चारशे वर्षांपूर्वी सक्तीने खिश्चन केलेल्या गोव्यातील हजारो गावड्यांचे शुद्धीकरण आश्रमाने केले. या शुद्धी आंदोलनातील कार्याचा महत्त्वपूर्ण वाटा तर मी उचललाच; पण त्याबरोबर या घटनेचे सांगोपांग विवेचन करणारा ' गोमांतक शुद्धीचा इतिहास ' हा विस्तृत ग्रंथही लिहिला. या ग्रंथाला स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी प्रस्तावना लिहिली आहे.

१९३२–गांधीजींच्या १९३२ च्या चळवळीत मसूराश्रम सरकारी वटहुकुमाने जप्त करण्यात आला आणि धरपकड करण्यात आली. १९३३–१९३८.

( १ ) महाराष्ट्रात व बृहन्महाराष्ट्र विभागात गीता धर्माच्या प्रचारासाठी दौरा केला.

( २ ) शाळा कॉलेजातील विद्यार्थ्यांसाठी हिंदू धर्म शिक्षणाचे व बलोपासनेचे वर्ग अनेक ठिकाणी चालवले. त्यांची मुदत सामान्यतः एक महिन्याची असे.

वर्गाची स्थाने :– ( १ ) बोरिवली १९३३ ( जि. ठाणे ) ( २ ) चांदूर रेल्वे १९३५ ( जि. अमरावती ) ( ३ ) चाळीसगाव ( मे १९३६ ) ( ४ ) देवास ( डिसेंबर १९३६ ) ( ५ ) तळोदे ( मे १९३७ ) ( जि. धुळे ) ( ६ ) संगमनेर ( नोव्हेंबर १९३७ ) ( ७ ) अकोला ( १९३८ ) ( ८ ) हैद्राबाद ( १९४० ) १९३६–३७ सातपुड्यातील भिल्लांची सेवा. अक्राणीमहाल ( ता. तळोदे, जि. धुळे ) मधील ११ गावी श्री. मारुतीरायाच्या मूर्तींची स्थापना केली. ( १ ) ओहवा ( २ ) देहेल ( ३ ) वठफळी

( ४ ) पिंपळखुटा ( ५ ) मुलगी ( ६ ) साखळी उंबर ( ७ ) भांगरापाणी ( ८ ) जांबळी ( ९ ) जमाना ( १० ) वालंबा ( ११ ) राजमोई काठी व भगदारी येथील २ मारुतीच्या मूर्तींची स्थापना २५ ऑक्टोबर १९३६ मध्येच काठीचे राजे मानसिंग सरकार व भगदारीचे श्री रामसिंग यांच्या हस्ते मोठ्या समारंभपूर्वक झाली होती. उपरोक्त ११ मूर्तींची स्थापना १९३७ च्या एप्रिल महिन्यात झाली.

ही कामगिरी चालू असतानाच सातपुड्यातील भयंकर स्वरूपाच्या मलेरियाने मला पछाडले म्हणून शेवटी मला सातपुडा कार्यक्षेत्र सोडणे भाग पडले.

**१९३८** सातपुडा सोडल्यानंतर कार्यक्षेत्र व कामाचे स्वरूपही बदलण्याचा निर्णय घेतला. तरुण पिढीशी सतत संपर्क राखून त्यांचे जीवन संस्कारित करण्याच्या दृष्टीने मासिक वर्गापेक्षा कायमचे हायस्कूलच स्थापन करण्याची प्रेरणा झाली व त्यानुसार योजना बनवून श्री. बाबा रेडीकरांसह विदर्भातील दर्यापुरला आलो.

**१९३९** दर्यापुरला प्रबोधन विद्यालयाची स्थापना. उद्घाटन १५ जून हस्ते बॅ. रामराव देशमुख.

**१९४६** कोल्हापूर येथे कोरगावकर ट्रस्टची स्थापना झाली. आणि श्री. शंकरराव देवांनी मला व बाबांना बोलावून घेतले व ट्रस्टमार्फत सुरू करावयाच्या आश्रमाची जबाबदारी सोपवली.

**१९४६–१९५३** ग्रामसेवाश्रमाच्या विविध प्रवृत्ती ग्रामसेवा केंद्रे. कोल्हापूरचा ग्राम सेवाश्रम आर्थिक परिस्थितीपायी जरी १९५३ साली बंद झाला, तरी कोरगावकर ट्रस्टमार्फत भ्रातृसेवक संघाची वार्षिक संमेलने दरवर्षी भरतच राहिली आहेत आणि या संघाचा आणि संमेलनाचा कार्यवाह म्हणून मी आजवर काम पाहात आलो आहे.

**१९५३–१९५९** पू. विनोबांच्या भूदान ग्रामदान कार्यक्रमात सहभागी.

१९५५ गोमांतक मुक्तीच्या लढ्यात सक्रिय सहभाग.

१९६०–१९६१ श्री. शंकरराव देवांबरोबर केरळच्या भूदान यात्रेत सामील झालो.

१९६३ त्याचप्रमाणे श्री शंकरराव देवांच्या बरोबर आसाममध्ये दिल्ली-पेकिंग पदयात्रेत १५ दिवस सहयात्री होतो.

१९६४ विनोबांच्या महाराष्ट्र पदयात्रेचा व्यवस्थापक

१९६६ प्रबोधन विद्यालयाचा रौप्यमहोत्सव

१९६७–१९७३ वरोडा आणि सोमनाथ येथील श्री. बाबा आमटे यांच्या नेतृत्वाखालील श्रमसंस्कार छावण्यांमध्ये काम केले. ' युप्रस 'चा प्रचार महाराष्ट्रात केला.

१९६९–१९७५ महाराष्ट्र आचार्य कुलाचा संयोजक म्हणून काम केले. या कार्याची परिणती पवनारला महाराष्ट्राची आचार्यकुल परिषद भरवण्यात आली. ( ऑक्टोबर १९७२ ) आणि त्यानंतर जानेवारी १९७४ मध्ये अखिल भारतीय आचार्यकुल संमेलन भरवण्यात आले. या दोन्ही परिषदांच्या कार्यक्रमांना पू. विनोबाजींनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. ◻ ◻

२७८१ २२८४ निबंध

## प्रसिद्ध झाले

**प्रा. मधुकर केचे ह्यांचे ललित रेखाटन**

## झोपलेले गाव

(एका गावाची चित्तरकथा)

**याखेरीज आमची अन्य संग्राह्य प्रकाशने**

श्री. कृ. कोल्हटकर, साहित्य आणि संप्रदाय (समीक्षण) : कै. मो. र. करंदीकर रु. १२. सांगता (काव्य) : राम देशमुख रु. ५. निरुपणचंद्रिका : भाग १ व २. : कीर्तनकेसरी बा. का. शेवाळकर : दोन्ही मिळून रु. २५. त्रिदळ (समीक्षा) राम शेवाळकर रु. १५. अग्निमित्र (समीक्षा) : राम शेवाळकर रु. १०. अमृतझरी (ललित लेख) : राम शेवाळकर रु. ६. पंडित महाराज (चरित्र) : म. ता. राजुरकर रु. ३.

विक्रेत्यांना भरपूर कमिशन. शिक्षणसंस्था व ग्रंथालये ह्यांना आकर्षक सवलती.

**संपर्क : श्रीवत्स प्रकाशन, वणी (जि. यवतमाळ)**

---

## दि यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोश मर्यादित, यवतमाळ

तार : शेतकी बँक] स्थापना : २६ जानेवारी १९६२. [फोन नं. २४१६,२६२८

### मुख्य कार्यालय यवतमाळ

**अल्पभूधारक, नवभूधारक, दुर्बल घटक व आदिवासी सभासदांना शेती उद्योग, शेती माल प्रक्रिया व विक्रीसाठी अर्थपुरवठा करण्यास कटिबद्ध असलेली बँक.**

### बँकेची वैशिष्ट्ये

(१) बँकिंगचे निरनिराळ्या प्रकारचे व्यवहार केले जातात. (२) ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दर. (३) यवतमाळ, वणी, पांढरकवडा, पुसद व दारव्हा या ठिकाणी सेफ डिपॉझीट लॉकर्सची व्यवस्था. (४) यवतमाळ येथे सकाळ–सायंकाळ व्यवहारां-करिता शहर शाखा उघडली आहे. (५) तालुक्याचे ठिकाणी सोन्याचांदीचे तारणावर कर्ज देण्याची सोय उपलब्ध आहे. (६) रिझर्व बँक ऑफ इंडियाची "डिपॉझिट इन्शुरन्स स्किम" आमच्या ठेवीदारांना लागू आहे. (७) शेतकऱ्यांच्या अविरत सेवेसाठी ४७ शाखांद्वारे बँक कार्यरत आहे.

**वि. ह. गोहोकार**, अध्यक्ष **गो. मु. पाटील**, उपाध्यक्ष **र. ग. चेटूले**, उपाध्यक्ष

**सु. र. राऊळ**, सर-व्यवस्थापक **श. ज. पैठणकर**, व्यवस्थापक

प्रबोधन–रचना–संघर्ष या आघाडीवरील

प्रमुख मराठी साप्ताहिक

# सा ध ना

संस्थापक–**साने गुरुजी**

**वार्षिक वर्गणी**

**सर्व विशेषांकासह रु. २५–००**

**साधना साप्ताहिक**

४३०–३१ शनिवार पेठ,

पुणे ४११ ०३०

एकात्म भारताच्या

नवनिर्मितीच्या चळवळीचे

**मासिक हिंदी मुखपत्र**

# आन्तर भारती

**वार्षिक वर्गणी रु. ५–००**

आन्तर भारती, द्वारा अभ्यास मंडल,

नया राजवाडा इंदौर, मध्यप्रदेश

## श्रीविद्या प्रकाशनची

**नवी प्रकाशने**

**पु. ल. देशपांडे**
अपूर्वाई — रु. २०
पूर्वरंग — रु. २०

**य. दि. फडके**
शोध : बाळगोपाळांचा — रु. १८

**वि. स. वाळिंबे**
बंगलोर ते रायबरेली — रु. २०
रायबरेली व त्यानंतर — रु. २०

**श्रीपाद जोशी**
वाळवंटातील चंद्रकोर — रु. १२

**रा. चिं. ढेरे, मो. मा. वाळिंबे**
मुरारिमल्ल विरचित बाळक्रीडा — रु. १५

**रा. चिं. ढेरे**
लज्जागौरी — रु. २५
सन्तसाहित्य आणि लोकसाहित्य — रु. २५

**वि. रा. करन्दीकर**
ग्रंथवेध — रु. २५

**भालचन्द्र फडके**
दलितसाहित्य-वेदना आणि विद्रोह — रु. १८

**श्री. ज. जोशी**
पुणेरी — रु. १५

**म. शं. गोडबोले**
सार्थ श्रीज्ञानेश्वरी — रु. ६०

**व्यंकटेश माडगूळकर**
रानमेवा — रु. ८

**त्र्यं. वि. सरदेशमुख**
प्रदेश साकल्याचा — रु. २०

**श्रीविद्या प्रकाशन**

**२५० शनिवार पेठ, पुणे ३०**

पूजनीय श्री. मामासाहेब क्षीरसागर ह्यांच्या
अमृतमहोत्सवानिमित्त आमच्या हार्दिक शुभेच्छा !

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

स्थापना १९३६) हेड ऑफिस – सातारा (शेड्यूल्ड बँक

आपुलकीनं वागणारी माणसं !

चेअरमन : वि. श्री. दामले


## ' साधने 'च्या त्रिदशक पूर्तीनिमित्त
## खास सवलत योजना

(१) रु. १०० ची पुस्तके रु. ८० ला अगर (२) रु. ५०० ची पुस्तके रु. ३७५ ला मिळवा. आपल्या निवासाजवळील स्थानकापर्यंत वाहतूक मोफत, बांधणावळ व धाडणावळ मोफत.

यादीतील आपल्या पसंतीची किमान रु. १०० ते ४९९ अगर रु. ५०० पेक्षा अधिक दर्शनी मूल्याची पुस्तके निवडा व त्या यादीसोबत अनुक्रमे २० % अगर २५% रक्कम वजा करून उरलेली रक्कम रोख, मनीऑर्डरने, पोस्टल ऑर्डरने अथवा पुणे बँकेवरील ड्राफ्टने ' साधना प्रकाशन ' या नावाने खालील पत्त्यावर पाठवा.

कोणत्याही पुस्तकाच्या एकाहून अधिक प्रती मागविल्या तरी चालतील.

रक्कम हाती येताच आपल्या निवडीची पुस्तके रेल्वे/मोटार ट्रान्स्पोर्ट/अगर एस्. टी. पेड पार्सलने नजिकच्या स्थानकापर्यंत आमच्या खर्चाने धाडू. रसीद रजिस्टर पोस्टाने पाठवू.

ही सवलत योजना ११ जून १९७९ साने गुरुजी पुण्यतिथीपर्यंत चालू राहील.

यापूर्वी जाहीर केलेली पुस्तकांची यादी व नव्याने समाविष्ट केलेल्या पुस्तकांची पुरवणी यादी मागवा व सवलत योजनेचा लाभ घ्या.

**साधना प्रकाशन, ४३०-३१ शनिवार पेठ, पुणे-४११ ०३० फोन ४७०६८६**

# जिद्द आणखी हिंमत ह्यांचा संगम येथे घडे सुरू आमुचा प्रवास अविरत ध्येयमंदिराकडे...



**सर्वेऽत्र सुखिनः सन्तु...**

सारी जनता सुखी व्हावी. प्रत्येकाला न्याय मिळावा. समतेची भावना सर्वत्र अनुभवास यावी. सर्वांना सुरक्षितता लाभावी. प्रत्येकाला आपले हक्काचे मानाचे जीवन जगता यावे. ह्या मूलभूत मूल्यांनी प्रेरित होऊनच महाराष्ट्र शासनाची धोरणे आखली जातात...

परिणामतः राज्याच्या सर्वांगीण सामाजिक-आर्थिक प्रगतीच्या किंबहुना संपूर्ण विकासाच्या कार्यक्रमाचा केंद्रबिंदू सहजच ठरतो समाजातील आजवर उपेक्षित राहिलेला दीनदुर्बल घटक, गरीब सर्वसामान्य माणूस...

मागासवर्गियांना प्राथम्याने जमीनवाटप, बेघरांसाठी घरे, झोपडपट्टयांची सुधारणा, आर्थिकदृष्टया दुर्बलांना सवलती, आदिवासी कल्याणासाठी खास उप-योजना, शेतीसाठी स्वस्त वीजपुरठा, कृषिउत्पादनाला वाजवी दामाची हमी, शेतमजुरांसाठी किमान वेतन, ग्रामीण रोजगार हमी योजना, सुशिक्षित बेकारांसाठी अधिक रोजगारांची निर्मिती, स्वयंउद्योगांच्या उभारणीस मदत अशा अनेक क्रांतिकारी अन् पुरोगामी योजनांची मालिकाच महाराष्ट्रात सुरू झाली आहे...

सतत चार वर्षे रोजगार न मिळू शकलेल्या अगर आपला उद्योगव्यवसाय कारणपरत्वे उभारू न शकलेल्या सुशिक्षित बेकारांना दरमहा १०० रुपये निर्वाहवेतन देण्याचा शासनाचा निर्णयही ह्यापैकीच एक होय...

ही सर्व अन् अशीच इतर अनेक क्रांतिकारी अन् पुरोगामी धोरणे कसोशीने राबविण्याचा शासनाचा निर्धार आहे. मात्र त्यांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी हवा जनतेचा संपूर्ण अन् सक्रिय सहभाग...

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन.

नवनिर्मितिचे घुमती पडघम राज्य चालले पुढे पुढे...

REFBK-0022794

मामांची शाळा बिनभिंतीची
आहे आणि अनौपचारिक शिक्षणाची
मामा ही साक्षात पाणपोई आहे.

त्यांचे सहज बोलणे
हा हितोपदेश असतोच,
पण नित्य नवे शिकण्याइतके
त्यांचे मन उमदे आहे.

मामांनी आपल्या प्रासादिक वाणीने
कितीतरी जीवने
उजळून टाकली आहेत.

गीते म्हणताना मामा
मंत्रमुग्ध करतात आणि बोलतात तेव्हा
त्यांचे शब्द तळमळीने
नुसते ओथंबलेले असतात.